संस्थानात संस्थानाधिपती नंतर स्टेट कारभारी State Karabhari हा संस्थानातील दुसरा महत्वाचा अधिकारी होता. काही वेळा कारभा–यांस दिवाण असेही संबोधले आहे. मराठा कालखंडात ज्या ज्या वेळी जहागिरदार किंवा संस्थानिक लष्करी मोहिमेवर संस्थानापासून दूर जात असे त्यावेळी संस्थानचा दररोजचा प्रशासकीय राज्यकारभार हा कारभारी पहात असे. संस्थानच्या कारभा–यांस बरेचसे प्रशासकीय मुलकी, न्यायालयीन अधिकार होते. सर्व साधारणपणे संस्थानच्या सुरुवातीपासून संस्थान विलीन होईपर्यंत सोंडूर संस्थानात कारभा–याचे पद भरले जात होते. काही वेळा कारभारी संस्थानिकांच्या मर्जीतील व विश्वासू असे तर काही वेळा संस्थानचा कारभारी हा इंग्रज सरकार नेमत असे कारभारी राज्यकारभार करत असताना जर दोषी आढळला तर त्यांस काढून टाकण्याचा अधिकार संस्थानिकास असे.

दिवाण:

दिवाण हा संस्थानिकाचा प्रमुख कारभारी सल्लागार म्हणून काम करीत असे ज्या ज्या वेळी संस्थानिक सोंडूर संस्थान सोडून दुस–या संस्थानात जात असे त्यावेळी संस्थानचा प्रमुख म्हणून दिवाण दररोज काम पहात असे. राजाला (संस्थानिकाला) सल्ला देण्याचे काम दिवाण आणि त्यांचे दोन प्रमुख सचिव करीत असत.[१] बेल्लारी जिल्हयाचा जिल्हाधिकारी हा सोंडूर संस्थानचा पदसिध्द पोलिटिकल एजंट असल्यामुळे सोंडूर संस्थानच्या दिवाणास त्याच्या मार्गदर्शनानुसार कामे करावी लागत. सोंडूर संस्थानातील दिवाणाला महत्वाचे प्रशासकीय व मुलकी आणि फौजदारी अधिकार होते. संस्थानातील दावे, वाद दररोजचे कामकाज यांच्यावर दिवाणाचे नियंत्रण असे. म्हणून दिवाण हा संस्थानिकाचा अत्यंत विश्वासू अधिकारी असे संस्थानातील कायदयाची अंमलबजावणी करणे हे प्रमुख कार्य दिवाणाचे असे. दिवाण हा संस्थानात वेळोवेळी भेटी देऊन शेतक–यांची स्थिती संस्थानिकास सांगत असे. दिवाण हा प्रजा व संस्थानिक यांच्यातील प्रमुख दुवा होता.[२]

काही वेळा सोंडूर संस्थानात इंग्रज अधिका–यांनी सुध्दा राजाचे सल्लागार प्रतिनिधी आणि दिवाण म्हणून काम केलेले दिसते. मि. जे. मॅकार्टनीजो. बेल्लारीला नोकरीस होता तो सोंडूर संस्थानाधिपतीचा २२ वर्षे सल्लागार होता. आणि त्याच्या कारकिर्दीत सोंडूर संस्थानने बरीचशी प्रगती केलेली दिसते.[३] मेकॉर्टनी निवृत्त झाल्यानंतर सप्टें १८८५ ला बेल्लारीचा निवृत्त तहसिलदार मि. जे. जी. फर्थ हे सोंडूर संस्थानाधिपतीचे सल्लागार झाले. त्यांना संस्थानचे दिवाण म्हणूनच संबोधण्यात येत होते.[४] काही वेळा संस्थानाधिपती अल्पवयीन असल्यास संस्थानाचा कारभार चालवण्यासाठी मद्रास सरकार राजघराण्यातील एखाद्या व्यक्तीची प्रशासक म्हणून नेमणूक करीत असत. सोंडूर संस्थानाधिपती व्यंकटराव इ. स. १८९३ मध्ये गादीवर आला. त्यावेळी तो अल्पवयीन होता. त्यावेळी संस्थानचा राज्यकारभार चालविण्यासाठी व्यंकटरावाचा चुलता मालोजीराव बाळासाहेब याला संस्थानचा प्रशासक म्हणून नेमले आणि मि. फर्थला दिवाण म्हणून नेमले मि. फर्थ हा एप्रिल १८९७ ला सोंडूर संस्थानातून निवृत्त झाला. त्यानंतर मि. एम. आर. कोंडुधरम नायडू बेल्लारीचा तहसिलदार याची नोकरी संस्थानकडे वर्ग करण्यात आली. आणि इ. स. १९०१ ला बाळासाहेब यांच्याकडून दिवाणाच्या हाती सत्ता सुपुर्त करण्यात आली.[५]

सोंडूर संस्थानचा विस्तार:

सोंडूर संस्थान एकेकाळी फार मोठे होते. सुरुवातीला गुत्ती, गजेंद्रगड आणि सोंडूर इ. भागात विस्तारले होते. कर्नाटकातील एक महत्वाचे मराठा संस्थान म्हणून त्या संस्थानाला मान होता. परंतु दुर्दैवाने इ. स. १८१८ नंतर इंग्रजांचे हे संस्थान मांडलिक बनले व मद्रास प्रांतात समाविष्ठ करण्यात आले.

मद्रास सरकारच्या प्रत्यक्ष देखरेखी खाली असलेल्या पांच संस्थानांपैकी हे एक अतिशय कमी लोकवस्तीचे संस्थान आहे. हे बेल्लारी जिल्हयाने परिवेष्ठित असून तेथील कलेक्टर या संस्थानाचा पोलिटिकल एजंट होय.[६]

सोंडूर संस्थानचा दर्जा:

मुरारराव घोरपडे आणि त्याचे पूर्वज यांनी कर्नाटकात प्रदेश जिंकून राज्य मिळविले होते. त्याने आपल्या स्वत:च्या कर्तुत्वावर व स्वपराक्रमावर गुत्ती, गजेंद्रगड आणि शेवटी सोंडूर या भागात आपला जम बसविला होता. पेशव्यांची फारशी मदत त्यांना झाली नव्हती. म्हणून १८ व्या शतकात ते पेशव्यांचे ते कधीच मांडलिक नव्हते. तर इ. स. १८१८ ला ज्या वेळी इंग्रजांची सत्ता संपूर्ण महाराष्ट्रात व भारतात स्थापन झाली त्यावेळी ते स्वतंत्र व सार्वभौम होते. असे मन्रोने मद्रास प्रांताचे गव्हर्नरला सांगितले आहे. इ. स. १८१८ नंतर ते इंग्रजांचे मांडलिक संस्थान बनले व त्यावेळचा सोंडूरचा संस्थानिक यांच्याशी स्वतंत्र करार करुन सोंडूर संस्थानिकांना अंतर्गत राज्य कारभारात स्वायतत्ता दिलेली होती. सोंडूर संस्थानचे परकिय किंवा पराष्ट्रीय धोरण किंवा भारतातील इतर संस्थानिकांशी होणारा पत्रव्यवहार हा प्रामुख्याने बेल्लारीचा जिल्हाधिकारी जो सोंडूर संस्थानचा पॉलिटिकल एजंट म्हणून काम पहात असे. त्याच्यामार्फत केला जात असे. १ जुलै १८१८ पासून ते १५ ऑगस्ट १९४७ पर्यंत सोंडूर संस्थान इंग्रजांचे मांडलिक संस्थान होते.[७]

हुजुर खाजगी खाते:

सोंडूर संस्थानात एक हुजुर खाजगी विभाग असून तो सर्वात जुना विभाग होता इ. स. १८६३ पर्यंत या विभागाचा प्रमुख संस्थानचा मुख्य सचिव व खाजगी सचिव हे काम बघत असे. इ. स. १८६३ नंतर या खात्यात थोडा बदल होऊन मुख्य खाजगी कारभा—याचे पदनिर्माण केले या खात्याचा प्रमुख हा संस्थानिकांचे नातेवाईक, त्यांचा होणारा खर्च, खाजगी जमिनीचा खर्च, उत्पन्न इ. बाबी बघत असे. संस्थानचे जे अतिथी येतील त्यांचे स्वागत व व्यवस्था करणे हे हुजुर खाजगी खात्याचे काम होते. त्याचबरोबर संस्थानातील जे महत्वाचे सण, उत्सव, यात्रा असत ते खाजगी खात्यामार्फत साजरे केले जात असत. तसेच राजकर्त्याच्या खाजगी देवालयाची व्यवस्था पाहणे. विशेषत: कार्तिक स्वामी व इतर देवालयांची व्यवस्था या खात्यामार्फत पाहिली जात होती. खाजगी खात्यात छत्रीबाग ज्या ठिकाणी पूर्वजांची थडगी आहेत त्याची व्यवस्था या खात्यामार्फत पाहिली जात होती.[८]

प्रजामंडळाची स्थापना:

इ. स. १९३० पूर्वी सोंडूर संस्थानाचा राज्यकारभार हा प्रामुख्याने संस्थानाधिपती, त्यांचा दिवाण, इतर अधिकारी चालवित असत. लोकांचा सहभाग प्रशासनात कमी होता. इ. स. १९३० च्या दरम्यान प्रशासनाचे विकेंद्रीकरण व्हावे म्हणून प्रजामंडळाची स्थापना झाली. दिवाणाच्या अधिकारावर थोडी बंधने आलेली आहेत. आणि संस्थानचे मंत्रीमंडळ अस्तित्वात आले. प्रजामंडळ म्हणजे संस्थानातील कनिष्ठ सभागृह संबोधण्यात येऊ लागले.[९] मंत्रीमंडळाचा प्रमुख हा राजघराण्याशी संबंधित व हुजुरने नेमलेला असून तो कार्यकारी मंडळाचा अध्यक्ष होता. मंत्रीमंडळाचे इतर सदस्य राज्यमंत्री, गृहमंत्री असत आणि त्यांची नेमणूक वेळोवेळी केली जात असे. ज्या वेळी प्रतिनिधी गैरहजर असे, त्यावेळी राजमंत्री हा कारभार चालवित असे. श्रीमंत सरदार बी. वाय. राजे घोरपडे हा इ. स. १९३९ ला मंत्रीमंडळाचा प्रमुख होता. तर मि. व्ही. एन. राव हा राजमंत्री, मि. आर. के. निडगल हे गृहमंत्री राज्यसेना, मि. आर. रंगाराव हा संस्थानचा सल्लागार होता. प्रशासनाची सर्व खाती ही राजमंत्री आणि गृहमंत्री यांच्यात विभागलेली असे.[१०]

राजमंत्री आणि गृहमंत्री यांना संबंधित खात्याचे विभागप्रमुख, कमाविसदार, मेडिकल ऑफिसर्स, इलेक्ट्रिक ऑफिसर, फौजदार, फॉरेस्ट ऑफिसर्स, हेड मास्टर, सार्वजनिक बांधकाम अधिकारी, व्हेटरनरी (पशु वैद्यकिय सॅनिटरी) अधिकारी मदत करीत असत. राजमंत्री हा संस्थानचा प्रमुख असे आणि जिल्हा मॅजिस्ट्रेटला जशी अधिकार व कर्तव्ये होती तो हा पहात असे.'तसेच मंत्र्यांना दैनंदिन कामात थोडी सवड मिळावी म्हणून ''वहिवाटदार'' हे नविन पद संस्थानात निर्माण केलेले होते. या वहिवाटदाराला ब्रिटिश भारतातील तहसिलदाराला जे अधिकार असतात ते अधिकार व तसा दर्जा दिलेला होता.[११] प्रजामंडळात एकंदर २५ सदस्य असून त्यापैकी २१ सदस्य जनतेमार्फत निवडलेले असत. स्त्रियांना व पुरुषांना मतदानाचा अधिकार २० एप्रिल १९३१ पासून संस्थानात अस्तित्वात होता. तसेच जो पुरुष किंवा स्त्री सोंडूर संस्थानात १ वर्षापेक्षा जास्त वास्तव्यात असेल त्यांना मतदानाचा अधिकार देण्यात आला होता व वयाची अट २१ वर्ष ही होती. तसेच प्रजा मंडळाचे सदस्य हे राजा, संस्थानिक नेमत असे. प्रजामंडळातूनच कार्यकारी मंत्रीमंडळ नेमले जात असत.[१२]

सोंडूर संस्थानचा दरबार:

सोंडूर संस्थानचा महत्वाच्या प्रसंगी दरबार भरत असे. त्या प्रसंगी खालील सदस्य हजर रहात असे.

अ. संस्थानातील सर्व सरदार, मानकरी, जहागिरदार

ब. वेळोवेळी हुजुर ने नेमलेले संस्थानातील अधिकारी

क. सोंडूर संस्थान स्टेट मंडळाचे निवडून आलेले सर्व सदस्य

ड. सोंडूर म्युनिसिपालिटीचे अशासकीय सदस्य, ग्रामपंचायतीचे सदस्य आणि सार्वजनिक संस्थांचे सदस्य.

इ. वेळोवेळी संस्थानातील जास्तीत जास्त शेतसारा भरणारे शेतकरी व कर भरणारे व्यापारी.

अशा प्रकारे वरील सर्व सदस्य सोंडूर संस्थानच्या महत्वाच्या प्रसंगी दरबारात हजर रहात व त्यांना संस्थानाधिपती वेळोवेळी मार्गदर्शन करीत संस्थानचे प्रशासन चांगल्या पध्दतीने चालविण्यासाठी काही सूचना असतील तर, त्याही विचारात घेतल्या जात.[१३]

सोंडूर नगरपालिका:

सोंडूर संस्थानात सोंडूर हे एक मोठे नगर असल्याने त्या ठिकाणी एक नगर पालिका इ.स. १९३१ ला स्थापन झाली असून सोंडूरचा कारभार, स्वच्छता, आरोग्य, पाणी इ. पहात असे. संस्थानिकाचे अधिकाराखाली ही नगरपालिका होती. काही काळ सोंडूर नगरपालिकेने संस्थानिकाच्या मार्गदर्शनाखाली चांगले काम केलेली दिसते. परंतु इ.स. १९४७ ला ही नगरपालिका बरखास्त झाली. आणि शहराच्या विकासासाठी संस्थानिकांनी स्वतंत्र व्यवस्था केली. सॅनिटरी अधिकारी आणि इतर नगरपालिकेचे नोकर यांना संस्थान दरबारात समाविष्ट करुन घेतले तसेच सोंडूर नगराचा सर्व्हे करुन नवीन विकास वाढीसाठी काही योजना संस्थानिकांनी आखलेल्या दिसतात.[१४]

ग्रामपंचायत:

सोंडूर संस्थानात एकंदर २० गावे व ५ वाडया होत्या. प्रत्येक गावाच्या ठिकाणी गावाच्या विकासासाठी ग्रामपंचायतीची स्थापना केली होती. गावातील गुन्हे कमी करणे. वाद मिटविणे तसेच लहान सहान झगडयामध्ये निवाडा करणे इ. कामे या पंचायती मार्फत करण्यात येत होती.[१५]

सोडूर लोकनियुक्त मंत्रीमंडळ कायदा : इ. स. १९४५

दुस–या महायुध्दानंतर भारताचे स्वातंत्र्य दृष्टीपथात दिसू लागले देशभर स्वातंत्र्य चळवळ जोरात सुरु होती. सोंडूर संस्थानातही स्वातंत्र्य चळवळीने जोर धरला होता त्यामुळे इ. स. १९४५ ला संस्थानात लोकनियुकत मंत्री मंडळ स्थापन करणारा कायदा इ. स. १९४५ ला संस्थानने केला. इ. स. १९४६ ला सोंडूर संस्थानाची राज्यघटना तयार करण्यात आली.[१६] अशा रितीने सोंडूर संस्थानचा प्रशासकीय कारभार इ. स. १८०० पर्यंत मराठा राज्य पध्दती नुसार चालू होता तर इ. स. १८०० ते इ. स. १९४८ पर्यंत इंग्रजांच्या मार्गदर्शना नुसार चालू होता.

संदर्भ सुची:

१	सोंडूर संस्थान प्रकाशित	सोंडूर संस्थानचा प्रशासकिय अहवाल वर्ष – १९३१–३२ बेंगलोर पृष्ठ ६
२	हंटर डब्ल्यु. डब्ल्यु. इंपिरियल गॅझेटिअर ऑफ इंडिया खंड – २२ ऑक्सफर्ड, १९०८, पृष्ठ ४६	
३	थॉमस डब्ल्यु. एम. मॅन्युअल ऑफ द डिस्ट्रिक्ट बेल्लरी गॅझेटिअर, मद्रास १८७२ पृष्ठ ३१५	
४	थॉमस डब्ल्यु. एम.	कित्ता
५	थॉमस डब्ल्यु. एम.	कित्ता पृष्ठ ३१६
६	केतकर श्रीधर व्यंकटेश	महाराष्ट्रीय ज्ञानकोश विभाग – २१ पुणे, १९२७, पृष्ठ २२९
७	सोंडूर संस्थान प्रकाशित	सोंडूर संस्थानचा प्रशासकिय अहवाल वर्ष १९४८, बेंगलोर, पृष्ठ ७
८	सोडून संस्थान	कित्ता पृष्ठ ५८
९	सोडून संस्थान	कित्ता पृष्ठ ११
१०	सोडून संस्थान	सोंडूर संस्थानचा प्रशासकिय अहवाल वर्ष १९३०–३९ बेंगलोर, पृष्ठ ३४
११	सोडून संस्थान	कित्ता
१२		कित्ता
१३		उपरनिर्दिष्ट पृष्ठ ३७
१४	सोंडूर संस्थान प्रकाशित	सोंडूर संस्थानचा प्रशासकिय अहवाल वर्ष १९३०–३९ बेंगलोर, पृष्ठ ३८
१५		कित्ता
१६	सोंडूर संस्थान प्रकाशित	सोंडूर संस्थानचा प्रशासकिय अहवाल वर्ष १९३१–३२ बेंगलोर पृष्ठ ३७,३८

9. कोल्हापूर संस्थानातील १८५७ चा उठाव: एक विकित्सक अभ्यास

प्रा. डॉ. सौ. कल्पना राजीव मोहिते
एम.ए.एम. फिल.पीएच. डी.
इतिहास विभाग प्रमुख, यषवंतराव चव्हाण कला, वाणिज्य महाविदयालय इस्लामपूर.

आधुनीक भारताच्या इतिहासातील अत्यंत महत्वाची घटना म्हणजे १८५७चा उठाव होय. या घटनेमुळे भारताच्या इतिहासाला वेगळी कलाटणी मिळाली या देशव्यापी सशस्त्र उठावाने भारतात दृढमूल झालेल्या ब्रिटीश सत्तेला जबरदस्त हादरा दिला. या उठावासंबंधी अनेकांनी वेगवेगळी मते व्यक्त केली आहेत. काहींच्या मते 'स्वातंत्र्यासाठी केलेला पहिला राष्ट्रव्यापी उठाव' म्हणजे १८५७ चा उठाव होय[१]. तर काहींनी याला 'शिपायांचे बंड' म्हटले आहे.[२] तर इतिहास संशोधक एस. बी. चौधरींच्या मते, 'सर्व स्तरातील लोकांनी एकत्रीत येऊन परकीय सत्तेला दिलेले पहिले आव्हान म्हणजे १८५७ चा उठाव होय व त्याची प्रथम सुरूवात सैनिकांमध्ये झाली. त्यांनी याला 'मुलकी उठाव' (Civil Rebellion) असे म्हटले आहे'[३] थोडक्यात या राष्ट्रव्यापी आंदोंलनास काहीही म्हटले तरी याचे अंतिम उद्दिष्ट प्रस्थापित इंग्रजी सत्ता उलथून टाकणे हेच होते[४].

डॉ जोशींच्या मते 'उठाव म्हणजे कायदेशीर सत्तेविरूध्द जेव्हा विविध प्रकारच्या हिंसक कारवाया केल्या जातात तेव्हा त्याला 'बंड' म्हणतात व बंडाचे वर्तन शब्दाने अथवा कृतीने असू शकते. त्यामध्ये लष्करी शिस्त धाब्यावर बसविणे, वरिष्ठ अधिका-यांविरूध्द दंड थोपटणे, प्रस्थापित लष्करी अधिका–यांविरूध्द उठाव करणे, थोडक्यात प्रस्थापित सत्ता उलथून टाकणे हे गंभीर व विस्तृत स्वरूपाच्या बंडाचे अंतिम उद्दिष्ट असते.'[५] वरील मत पाहता या उठावाचे स्वरूप लक्षात येते. राजकीय, सामाजिक, आर्थिक, धार्मिक, सांस्कृतिक व लष्करी अशा अनेक कारणांच्या परिपाकातून हा उठाव भारताच्या विविध भागात घडून आला हे सर्वश्रूत आहेच. इंग्रजाचे साम्राज्यवादी धोरण, भारतीयांचे अनेक पध्दतीने शोशण, भारतीयांच्या धर्म, रूढी,चालीरितीमध्ये ढवळाढवळ,दत्तक वारस नामंजूर, अनेक राज्ये खालसा करण्याचे धोरण इ. अनेक कारणातून प्रजा व संस्थानिकामध्ये ब्रिटीश सत्तेविरूध्द असंतोश निर्माण झाला [६] अशा स्फोटक परिस्थितीत हिंदू -मुस्लीम सैनिकांच्या धार्मिक भावना दुखविणारी घटना हिंदी सैनिकांत घडली. म्हणजेच उठावाची प्रथम सुरूवात लष्करात झाली व नंतर हळूहळू त्यात भारतीय जनता, राजेरजवाडे सामील झाले. देशाच्या पूर्व–पश्चिम, दक्षिण–उत्तर अशा भागात इंग्रजीसत्तेविरूध्द उठाव झाला. त्यात भारताच्या दक्षिणेकडे कोल्हापूर संस्थानात प्रत्यक्ष कोल्हापूर शहरात हा उठाव झाला[७] कोल्हापूर संस्थानातील उठावासंबंधी उपलब्ध संदर्भ साधनांच्या आधारे प्रस्तुत शोधनिबंध तयार करण्यात आलेला आहे.

आधुनीक भारताच्या इतिहासातील अत्यंत महत्वाची घटना म्हणजे १८५७चा उठाव होय. या घटनेमुळे भारताच्या इतिहासाला वेगळी कलाटणी मिळाली या देशव्यापी सशस्त्र उठावाने भारतात दृढमूल झालेल्या ब्रिटीश सत्तेला जबरदस्त हादरा दिला. या उठावासंबंधी अनेकांनी वेगवेगळी मते व्यक्त केली आहेत. काहींच्या मते 'स्वातंत्र्यासाठी केलेला पहिला राश्ट्रव्यापी उठाव' म्हणजे १८५७ चा उठाव होय[१]. तर काहींनी याला 'शिपायांचे बंड' म्हटले आहे.[२] तर इतिहास संशोधक एस. बी. चौधरींच्या मते, 'सर्व स्तरातील लोकांनी एकत्रीत येऊन परकीय सत्तेला दिलेले पहिले आव्हान म्हणजे १८५७ चा उठाव होय व त्याची प्रथम सुरूवात सैनिकांमध्ये झाली. त्यांनी याला 'मुलकी उठाव' (Civil Rebellion) असे म्हटले आहे'[३] थोडक्यात या राश्ट्रव्यापी आंदोंलनास काहीही म्हटले तरी याचे अंतिम उद्दिश्ट प्रस्थापित इंग्रजी सत्ता उलथून टाकणे हेच होते[४]. डॉ जोशींच्या मते 'उठाव म्हणजे कायदेशीर सत्तेविरूध्द जेव्हा विविध प्रकारच्या हिंसक कारवाया केल्या जातात तेव्हा त्याला 'बंड' म्हणतात व बंडाचे वर्तन शब्दाने अथवा कृतीने असू शकते. त्यामध्ये लश्करी शिस्त धाब्यावर बसविणे, वरिश्ठ अधिका-यांविरूध्द दंड थोपटणे, प्रस्थापित लश्करी अधिका–यांविरूध्द उठाव करणे, थोडक्यात प्रस्थापित सत्ता उलथून टाकणे हे गंभीर व विस्तृत स्वरूपाच्या बंडाचे अंतिम उद्दिश्ट असते.'[५] वरील मत पाहता या उठावाचे स्वरूप लक्षात येते. राजकीय, सामाजिक, आर्थिक, धार्मिक, सांस्कृतिक व लश्करी अशा अनेक कारणांच्या परिपाकातून हा उठाव भारताच्या विविध भागात घडून आला हे सर्वश्रूत आहेच. इंग्रजाचे साम्राज्यवादी धोरण, भारतीयांचे अनेक पध्दतीने शोशण, भारतीयांच्या धर्म, रूढी,चालीरितीमध्ये ढवळाढवळ, दत्तक वारस नामंजूर, अनेक राज्ये खालसा करण्याचे धोरण इ. अनेक कारणातून प्रजा व संस्थानिकामध्ये ब्रिटीश सत्तेविरूध्द असंतोश निर्माण झाला [६] अशा स्फोटक परिस्थितीत हिंदू -मुस्लीम सैनिकांच्या धार्मिक भावना दुखविणारी घटना हिंदी सैनिकांत घडली. म्हणजेच उठावाची प्रथम सुरूवात लश्करात झाली व नंतर हळूहळू त्यात भारतीय जनता, राजेरजवाडे सामील झाले. देशाच्या पूर्व–पश्चिम, दक्षिण–उत्तर अशा भागात इंग्रजीसत्तेविरूध्द उठाव झाला. त्यात भारताच्या दक्षिणेकडे कोल्हापूर संस्थानात प्रत्यक्ष कोल्हापूर शहरात हा उठाव

झाला[७] कोल्हापूर संस्थानातील उठावासंबंधी उपलब्ध संदर्भ साधनांच्या आधारे प्रस्तुत शोधनिबंध तयार करण्यात आलेला आहे.

कोल्हापूर संस्थान –

स्वातंत्र्यपूर्वकाळातील कोल्हापूर संस्थान हे एक मानाचे व महत्वाचे संस्थान होते. या संस्थानची स्थापना छत्रपती शिवरायांच्या सूनबाई महाराणी ताराबाई यांनी इ. स. १७१० साली केली. छत्रपती शिवरायांच्या वंशजाचे संस्थान म्हणून तत्कालीन परिस्थितीत याला विशेश महत्व होते [८]

पार्श्वभूमी -

१८४४ पासूनच कोल्हापूर संस्थानात इंग्रजीसत्तेविरूध्द असंतोंश निर्माण झाला होता. १८४४ साली कोल्हापूर संस्थानात इंग्रजांनी कारभारी म्हणून दाजी कृश्ण पंडितांची नेमणूक करून संस्थाच्या कारभारात प्रशासकीय बदल केले.[९] गडावरून प्रांताचे प्रशासन खाली आणले, सैन्य कमी केले, खर्चात कपात केली, जमीन महसूल, शिबंदी, किल्ल्यांचा कारभार, जमाबंदी, पैशाचे व्यवहार ,शिवाय किल्लेदारांना दिलेल्या जमिनी काढून घेतल्या इ. अनेक बदल करून पंडितांनी करडा अंमल संस्थानात बसविला . त्यामुळै १८४४ साली कोल्हापूर संस्थानातील अनेक गडावर गडक-यांनी इंग्रजीसत्तेविरूध्द बंड केले होते .त्याचे लोण कोल्हापूर शहरातही पसरले होते. त्यावेळचे छत्रपती बाबासाहेब महाराज (१८३१ - १८६६) अल्पवयीन असल्याने संस्थानचा सर्व कारभार इंग्रजांच्या हाती होता. त्यामुळे छत्रपती नामधारी बनले व प्रजेमध्ये असंतोश पसलेला होता. पुढे बाबासाहेब महाराज सज्ञान झाले तरी इंग्रजांनी संस्थानचा कारभार त्यांच्या हाती सोपविला नाही. इंग्रजांनी कारभार पाहणे म्हणजे त्यांचे अधिपत्य मानण्यासारखे होते. १८४४ पासून 12 वर्श अशा अनेक कारणांनी जनतेच्या मनात असंतोश होता त्याचे पर्यवसान १८५७ च्या बंडात झाले[१०]. अशा अनेक कारणांनी १८५७ च्या उठावाची पार्श्वभूमी कोल्हापूर संस्थानात तयार झालेली होती. दक्षिण भारत इंग्रजी सत्तेविरूध्दचा १८५७ चा सर्वात मोठा उठाव कोल्हापूरात झाला[११]

उत्तरेकडील स्थिती –

भारताच्या उत्तरेकडेही ब्रिटीशविरोधी आग धुमसत होती. इंग्रजीसत्तेचा अन्याय तलवारीच्या साहयाने नश्ट करण्याचा निश्चय नानासाहेब पेशव्यांनी केला व उत्तरेकडे कानपूरच्या उठावाचे नेतृत्व त्यांनी केले. दिल्ली ते म्हैसूरपर्यंतच्या सर्व संस्थनिकांना या स्वातंत्र्यसंग्रामात सहभागी होण्याचे आवाहन त्यांनी केले होते. त्यासाठी राजेरजवाडयांना त्यांनी पत्रे पाठविली होती. त्यांनी कोल्हापूरचे छत्रपती बाबासाहेब महाराजांना पत्र पाठवून उठावासंबंधी संधान साधण्याचा प्रयत्न केला होता . बिठूरहून हे पत्र जगन्नाथ वासुदेव थत्ते यांनी नानासाहेबांच्या प्रेरणेने पाठविले होते. त्यात लिहले होते, 'कोल्हापूरच्या छावणीतील शिपायांनी बंड केले तेव्हा तुम्ही काहीही केले नाही पण आता दुसरा उठाव होण्यासाठी तुम्ही काहीतरी केले पाहिजे. तुम्ही थोर आहात याची जाणीव ठेवावी. आम्ही इकडे तळहातावर शीर घेऊन सज्ज आहोत. शिंदे सरकारची काही फौज आम्हाला सामील झालेली आहे. परमेश्वर आम्हाला साहय करील. आपणही जास्तीत जास्त प्रयत्न करावेत. इंग्रजांच्या बाजूला असत्य आहे. त्यांचा हेतू चांगला नाही. हे पत्र महाराजांच्याच हाती द्यावे व तसे जे करणार नाहीत, पत्र लपवून ठेवतील त्यांना गाई ब्राम्हणांची शपथ आहे.'[१२]

उठावात सहभागी होण्यासंबंधी वरील पत्र घेऊन आलेला दूत व ज्योतिराव घाटगे येताना पुण्यामध्ये इंग्रजांच्या चुलती सईबाई उर्फ दिवाण साहेब यांची भेट घेऊन कोल्हापूरला आले होते. १८४४ च्या गडक-यांच्या उठावाला सईबाई साहेबांचे साहय होते हे सिध्द झाल्यामुळे इंग्रजांनी त्यांना बंदी बनवून पुण्यात ठेवले होते.[१३] उठावात सहभागी होण्यासाठी त्या पुण्याहून चिमासाहेबांना गुप्तपणे पत्रे पाठवीत. उठावासाठी छत्रपतींना तयार करण्यासाठी आलेल्या ज्योतिराव उर्फ भाऊसाहेब घाटगेनी छत्रपती बाबासाहेब महाराजांबरोबरच चिमासाहेब महाराजांशींही उठावासंबंधी गुप्तपणे चर्चा केली. युध्दातील सहभागाचे चिन्ह म्हणून नानासाहेबांनी चिमासाहेबांना चांदीची मूठ आणि मौल्यवान पाते असलेली एक तलवार भेट दिली होती. तीवर नक्षीदार अक्षरात लेख कोरलेला होता.[१४] नानासाहेबांचे पत्र पाहून मवाळ वृतीचे बाबासाहेब महाराज अलिप्तच राहिले शिवाय त्यांच्या हाती संस्थानची सत्ताही नव्हती. परंतू त्यांचे बंधू चिमासाहेब महाराज जहालवृत्तीचे होते. ते पत्र पाहून त्यांनी काय करायचे हे मनोमन ठरवून हे आव्हान स्वीकारले[१५] कोल्हापूर आणि सातारा याठिकाणी झालेल्या उठावाची सुत्रबध्द योजना होती कारण रंगो बापूजी

गुप्ते यांचे चिरंजीव सिताराम गुप्ते हे कोल्हापूरमध्ये जुलै 1857 मध्ये होते. त्यांची व चिमासाहेब महाराजांची उठावासंबंधी चर्चा झाली होती. अशा रितीने उठावासाठी कोल्हापूरात वातावरण तयार होऊ लागले.

कोल्हापूरला २७ वी नेटिव्ह पलटण होती. चिमासाहेब महाराजांच्या काही माणसांची ये-जा पलटणीकडे गुप्तपणे सुरू होती. उत्तरेकडील उठावाच्या बातम्या ऐकून त्याचा परिणाम कोल्हापूरातील सैनिकांना प्रेरित करीत होता. कोल्हापूरातील सरदार बळवंतराव नाईक निबांळकर पांढ-या घोडयावर बसून जात व २७ व्या नेटिव्ह पलटणीतील शिपायांना उठावासाठी तयार करत होते.[१६] कोल्हापूरात ब्रिटीश सत्तेविरोधी वातावरण तयार झाले होते उठावाची तारीख १०. ऑगस्ट १८५७ ही ठरली होती. कारण अशी बातमी समजली होती की त्यादिवशी गाई व डुकराची चरबी लावलेली काडतुसे कोल्हापूरला पाठविण्यात येणार आहेत तेव्हा हा उठाव एकाचवेळी तीन ठिकाणी करण्याचे ठरले होते. कोल्हापूरात २७ वी पलटण, धारवाड मधील २८ वी पलटण व बेळगावमधील २९ वी पलटण अशा तीन ठिकाणी उठाव करण्याचे ठरले होते पण ऐनवेळी उठावाचा निर्णय कोल्हापूरमध्ये बदलला[१७] व कोल्हापूरात उठाव ३१ जुलैच्या रात्री झाला. कारण कोल्हापूरच्या पलटणीतील एका ज्यू शिपायाचे वर्तन संशयास्पद वाटू लागले. याचा अर्थ तो आपला गुप्त बेत फोडेल असे उठाववाल्यांना वाटले. तेव्हा इंग्रजांना समजण्याआधीच उठाववाल्यांच्या पुढा-यांनी ३१ जुलैच्या रात्रीच उठाव करण्याचे ठरवले. त्यामुळे ठरलेल्या दिवसाच्या ११ दिवस अगोदर हा उठाव झाल्याने इतरांना त्याची सूचना मिळू शकली नाही त्यामुळे काही लोक यामध्ये सहभागी झाले नाहीत.[१८]

३१ जुलै १८५७ -

कोल्हापूरातील २७ व्या पलटणीतील २०० शिपायांनी ३१ जुलै १८५७च्या रात्री 'मारो फिरंगीको' अशा घोशणा देत प्रथम इंग्रज अधिका-यांच्या निवासस्थानावर हल्ला केला .पण या अधिका-यांना याची अगोदरच कुणकुण लागल्याने ते रेसिडेन्सीत निघून गेले होत. या उठावाचे नेतृत्व रामजी शिरसाट याने केले. निवासस्थानावरील हल्ल्यात इंग्रज न सापडल्याने क्रांतीकारकांनी रामजीच्या आदेशाने छावणीतील खजिना लुटला त्यांनतर दारूगोळा हस्तगत केला व छावणीतील बाजारही लुटला.[१९] लश्करी छावणीची जागा म्हणजेच २७ वी नेटिव्ह इन्फंट्री जिथे ठेवली होती त्या जवळच्या सदर बाजारास कॅप म्हटले जाई. हा कॅम्प विभाग कसबा बावडा व कोल्हापूर शहराच्या दरम्यान होता. या उठावाच्यावेळी कॅप्टन जॉन स्नायडर हा इन्फंट्रीवरील अधिकारी होता. तर पोलिटिकल सुपरिटेंडेट कर्नल मॉहन हा होता[२०] नंतर कोल्हापूर शहराचे दरवाजे बंद असल्याने बंडवाल्यांनी शहराबाहेर घोडयाच्या पागेत तळ दिला. उठाव ठरलेल्या दिवसाच्या अगोदर झाल्याने आतील लोकांना माहिती नव्हती. त्यामुळे शहरातून लोकांचा प्रतिसाद मिळाला नाही. कर्नल मॉंहनने उठाववाल्यांना रोखून धरण्याचा प्रयत्न केला परंतू पुरेशा दारूगोळयाअभावी त्याचा प्रयत्न अयशस्वी झाला. कर्नल मॉहन मुंबईला उठावासंबंधी बातमी पाठविली पण तार कचेरीतील सैनिकही उठाववाल्यांना सामील झाल्याने बातम्या मुंबईला पोहचल्याच नाहीत.[२१]

१ ऑगस्टला रामजी शिरसाटसह उठाववाले पागा सोडून रत्नागिरीकडे निघाले होते पण समुद्रमार्गे मुंबईहून आलेल्या इंग्रजांनी घाट अडवून धरल्याने तेथून त्यांनी सावंतवाडीकडे पलायन केले. बेळगावहून ५० घोडेस्वारांच्या पलटणीसह लेफटनंट केर कोल्हापूरला दाखल झाला सावंतवाडीच्या जंगलात पळून गेलेल्यापैकी ४० जणांनी परत कोल्हापूरला येऊन पागेचा ताबा घेतला ले. केरने ५० घोडेस्वार व इन्फंट्रीतील काही शिपाई व दरबारच्या दोन तोफांसह पागेवरती हल्ला केला .तोफा डागल्या पण काही उपयोग झाला नाही. एका फितुरामुळे केरला पागेत जाण्यासाठी एक छोटा चोर रस्ता दाखविल्याने त्याने गोळीबार केला. कॅप्टन इन्सच्या तुकडीनेही तेथे हल्ला केला. १० ऑगस्ट १८५७ रोजी घडलेल्या या घटनेत केवळ ४० बंडवाल्यांनी इंग्रजांशी टक्कर दिली यात पकडलेल्यापैकी काहींना फाशी दिली तर काहीना तोफेच्या तोंडी दिले.[२२]

मुंबईचा गर्व्हनर एलफिन्स्टनने हा उठाव मोडून काढण्यासाठी कर्नल ग्रॅन्ड जॅकोब याची स्पेशल कमिशनर म्हणून नेमणूक करून कोल्हापूरच्या परिस्थितीचा मुकाबला करण्यासाठी त्याला पाठविण्यात आले. पण जॅकोब १४ ऑगस्टला कोल्हापूरला पोहचला तत्पूर्वीच उठाव शमला होता[२३] त्याने उठाव मोडून काढला पण त्याला सूत्रधाराची नावे कळू शकली नाहीत. १८ ऑगस्टला २७ व्या पलटणीतील पकडलेल्या सैनिकांना प्रथम निशस्त्र करण्यात आले. त्याने बंडखोरांना शिक्षा देण्यासाठी महाराजांच्याच ४ तोफा आणल्या होत्या. २ जणांना फासावर लटकविले व बंदूकीच्या गोळया घालून ११ जणाांना ठार करण्यात आले.[२४] कर्नलने उठावाचा सूत्रधार शोधण्याचा प्रयत्न केला. २८ व्या पलटणीतील शिपाई गोविंद दळवी याने घाबरून खरे

सांगितले. सुभेदार दाऊद बेग याचे घरी २७ व्या पलटणीतील नेते म्हणजे रामजी शिरसाट, इमामखान इ. तेथे जमत. व पांढ-या घोडयावरून एक मराठा गडी शहरातून त्यांच्याकडे व त्यांच्याकडून शहराकडे वारंवार जात येत होता. त्याने धाकटया राजाची संमती व मदत आपल्या कार्यासाठी मिळेल असे आश्वासन त्या बंडखोरांना दिले होते[२५] शिक्षेचे सत्र सुरू असताना एका अत्यंत जखमी अवस्थेत असलेल्या सैनिकाला जॅकोबने जीवदान मिळेल पण तू सत्य सांग असे आव्हान केले पण जॅकोब म्हणतो, 'रक्तबंबाळ अवस्थेत तो शिपाई निधडया छातीने तोफेसमोर चालत गेला जे काही केले ते मीच केले आहे एवढेच तो म्हणाला' परंतू त्याने काहीही सांगितले नाही. आपला जीव वाचेल याची पर्वा न करता अनेक शिपायांनी मृत्यू पत्करला [२६] अशाप्रकारे कोल्हापूरात सगळीकडे दहशत, अस्थिरता निर्माण होऊन भीतीचे वातावरण निर्माण झाले परंतू या दहशतीच्या वातावरणात देखील ब्रिटीशांच्याविरोधी असंतोश खदखदत होता.

५ डिसेंबर १८५७ –

३१ जुलैच्या उठावानंतर चिमासाहेब महाराजांच्या प्रेरणेचने कोल्हापूरातील राश्ट्रप्रेमी शक्तींनी पुन्हा उठावाची तयारी केली ४ डिसेंबरला एका अज्ञात इसमांने ५ तारखेच्या उठावाची कल्पना जॅकोबला दिली जंगलामध्ये १० मैलावर एका खेडयानजीक ५०० लोक जमून गुप्तपणे परत उठावाची तयारी करत आहेत या बातमीची जॅकोबने खात्री केली तेव्हा बातमी खरी असल्याचे समजल्यावर ते सावध झाले. गोंडाजी नाईक व ज्योतीराव घाटगे यांच्या नेतृत्वाखाली ५ डिसेंबरला रात्री शहराच्या वेशीवर हल्ला चढविला नंतर शहराचा कब्जा घेतला पण ब्रिटीशांना याची अगोदरच माहिती मिळाल्याने ते सावध होते. झालेल्या झटापटीत ८ राश्ट्रभक्त मारले गेले [२७] फिरंगोजी शिंदे याच्या नेतृत्वाखाली उठाववाल्यांनी राजवाडयात प्रवेश केला होता. पण गाफीलपणामुळे एका शिपायाने त्याच्यावर गोळी झाडून फिरंगोजीला ठार केले.

कॅप्टन रनायडर सकाळी राजवाडयात पोहचला तेव्हा त्याला हत्यारासह शेकडो लोक खिडक्या, गच्चीत असलेले दिसले. मध्यभागी फिरंगोजी शिंदेचे प्रेत पडलेले दिसले. रनायडरने बाबासाहेब महाराजांची भेट घेऊन सर्वाना शस्त्रे खाली ठेवण्याचे आवाहन केले व गुन्हेगार सोडून इतरांना संरक्षण मिळेल व राजघराण्यातील लोकांचा मान राखला जाईल असे सांगितले नंतर जॅकोबने देखील राजवाडयात प्रवेश करून बाहेरून पकडून आणलेल्या ३६ जणांना राजवाडयाच्या भिंतीशी उभे करून सर्वाच्यासमोर गोळया घालून ठार केले. सर्वत्र दहशतीचे वातावरण निर्माण केले. नंतरही चौकशी करून अनेकांना शिक्षा देण्याचे काम केले. एकंदरीत ५१ लोक मृत्यूमुखी पडले.[२८] अशारितीने ३१ जुलै १८५७ ते ५ डिसेंबर १८५७ पर्यत कोल्हापूरात ब्रिटीशविरोधी आग धुमसत होती हा उठाव दडपण्यात ब्रिटीशांना यश आले. उठावामागील सूत्रधार शोधण्याचा जॅकोबने प्रयत्न केला . त्याला चिमासाहेब महाराजांचा संशय होता. कारण राजवाडयात बाबासाहेब महाराजांची भेट घेतल्यानंतर त्याचे वर्णन करताना तो म्हणतो 'थोरल्या राजाने पुन्हा पुन्हा कर्तव्यता व्यक्त केली. धाकटा राजा मात्र शेवटपर्यत एक शब्दही न बोलता गप्प बसला होता. मला अगोदरपासूनच धाकटया राजाच्या हालचाली संशयास्पद वाटत होत्या. पण पुरावा हाती नसल्याने मला काहीही करता येत नव्हते' केवळ संशयावरून चिमासाहेब महाराजांना अटक करणे म्हणजे जनतेच्या असंतोशाला सामोरे जावे लागेल याची जाणीव त्याला होती. जॅकोब म्हणतो, 'धाकटा राजा चिमासाहेब मोठा धीराचा माणूस, धिप्पाड शरीरयश्टीचा व उत्साही असून शिवाजीचा खरा वारस शोभतो'.[२९]

२१ मार्च १८५८ रोजी पाठविलेल्या अहवालात जॅकोब म्हणतो ,

– 'कोल्हापूर राजाचे धाकटे बंधू हे या कटाचे सूत्रधार आहेत.

– नानासाहेब पेशव्यांशी चिमासाहेबांचे संधान होते व त्यांच्या गुप्त दूताने एक रत्नजडित तलवार चिमासाहेब यांच्यासाठी आणली होती.

– ग्वाल्हेरहून एक शिश्टमंडळ येऊन चिमासाहेबाबरोबर वाटाघाटी करून गेले होते.

– जून १८५७ मध्ये साता-याहून आलेल्या विश्वासू दूताला चिमासाहेबांनी आश्वासन दिले होते काही कोल्हापूरचे शिपाई व काही प्रमुख कृती करण्यास तयार असून ते साता-याहून येणा-या इशा-याची वाट पाहतील. [३०] जॅकोबच्या दृश्टीने चिमासाहेबच या कटाचे सूत्रधार होते हे वरील पत्रावरून सिध्द होते. त्यांने हा उठाव चिरडून टाकला परंतू इंग्रजांच्या दृश्टीने चिमासाहेबांना

मोकळे राहू देणे धोक्याचे होते कारण ते लोकांना परत उठाव करण्यासाठी चिथावणी देतील म्हणून त्यांना दूर ठेवण्याचा इंग्रजानी निर्णय घेतला.

चिमासाहेब महाराजांना कैद –

३१ मार्च १८५८ मध्ये जॅकोबने चिमासाहेब महाराजांना रेसिडेन्सीत भेटीस बोलविले. तत्पूर्वीही त्यांना एकदा चौकशीसाठी बोलविले होते पण त्यांच्या बोलण्यातून काहीच निश्पन्न झाले नव्हते. आता चौकशीविना त्यांना ताब्यात घेऊन कैद केले छत्रपती बाबासाहेब महाराजांनाही हे कळले नाही. मे १८५८ मध्ये वाघोटणे बंदरातून त्यांना कराचीला नेण्यात आले स्वाभिमानी व स्वातंत्रप्रिय अशा चिमासाहेबाना तेथे नजर कैदेत ठेवण्यात आले पुढे ११ वर्शानंतर १५ मे १८६९ रोजी चिमासाहेब महाराजांचे कराचीतच निधन झाले. [३१] पुढे छत्रपती शाहू महाराजांनी कराचीला चिमासाहेब महाराजांचे स्मारक व छत्री बांधली चिमासाहेब महाराज १८५७ च्या स्वातंत्र्य समरातील उठावाचे नेते बनले. त्यांचा उल्लेख स्वातंत्र्य सैनिक असाच केला जातो. ज्याअर्थी इंग्रजांनी कराचीसारख्या दूर ठिकाणी त्यांना बंदिवासात ठेवले त्याअर्थी ते क्रांतीकारक होते हे निर्विवाद सिध्द होते.

या उठावातील कोटमार्शल न्यायदानाचे आकडे मिळतात त्यावरून

ब्रिटीश पार्लमेंट पेपर्स १८५९ खंड २३ पृश्ठ ४८५ वर आकडेवारी

मृत्यूदंडाची शिक्षा	६३
जन्मठेप	६६
कारावास	१८
निर्दोश मुक्त	१४
दयादान	४[३२]

एकंदरीत १०३ उठाववाले यामध्ये ठार झाले.[३३] चिमासाहेब महाराजांचे कारभारी अण्णा चिटणीस व सेवक तात्या मोहिते यांनाही यात जन्मठेप झाली[३४] चिमासाहेब महाराजांसोबत १५ जणांना हद्द्पार करण्यात आले होते. गोंडाजी दिवेकर नाईक व इतर ६ जण अखेरपर्यत सापडले नाहीत[३५]. रामजी शिरसाट सावंतवाडीकडे पळून गेल्यानंतर इंग्रजांनी त्याचा पाठलाग केला त्यात तो पावशी गावाजवळ ६नोव्हेंबरमध्ये गोळीबारात ठार झाला. फिरगोजी शिंदे याही स्वातंत्र्यवीराचे बलिदान झाले. कोल्हापूरातील चिमासाहेबांच्या सहका–यांचाही इंग्रजांनी खूप छळ केला

समारोप –

अशारितीने ३१ जुलै १८५७ ते ५ डिसेंबर १८५७ या कालावधीत भारताच्या दक्षिणेकडील कोल्हापूर संस्थानात ब्रिटीश सत्तेविरूध्द झालेला हा उठाव इंग्रजांनी मोडून काढला. प्रस्थापित ब्रिटीश सत्ता मोडून काढण्यासाठी अनेकजण निधडया छातीने मृत्यूला सामोरे गेले. सर्वसामान्य कोल्हापूरवासीयांनी आपापल्या परीने बंडाचा झेंडा उभारला. छत्रपती बाबासाहेब महाराजानी तटस्थता दाखविली परंतू त्यांच्या तटस्थतेच्या भूमिकेमुळे कोल्हापूर संस्थान खालसा होण्यापासून वाचले. चिमासाहेब महाराजांनी मात्र अप्रत्यक्षपणे या उठावाचे नेतृत्व केले. ते या उठावाचे प्रेरक होते. १८५७ चा कोल्हापूर संस्थानातील हा उठाव अपयशी ठरला. कारण मवाळ स्वभावाचे छत्रपती बाबासाहेब महाराज यापासून अलिप्त राहिले. चिमासाहेब महाराजांनी अप्रत्यक्ष सहभाग घेतला ते उघडपणे काहीच करू शकत नव्हते. शिवाय ठरलेल्या दिवसाच्या ११ दिवस हा उठाव अगोदर झाल्याने इतर ठिकाणच्या उठाववाल्यांना त्याची काहीच सूचना मिळाली नाही त्यामुळे एकाचवेळी उठाव ठरलेल्या ठिकाणी झाला नाही. दक्षिणेकडील इतर ठिकाणापेक्षा तो कोल्हापूर संस्थानातच हा उठाव मोठया प्रमाणात झाला यावरून प्रस्थापित अन्यायी इंग्रजी सत्ता उलथून टाकून स्वराश्ट्राविशयी असणारे प्रेम व त्यासाठी निधडया छातीने मृत्यूला सामोरे गेलेले कोल्हापूर संस्थानातील स्वातंत्र्यवीर यांच्या स्वातंत्र्यप्रियतेची कल्पना यातून येते. हा उठाव मोडून काढण्यात ब्रिटीशांना तात्पुरते यश आले तरी याची दखल मात्र ब्रिटीश सरकारला घ्यावीच लागली. १८५७ च्या उठावानंतर इंग्रजानी आपल्या सत्तेची पकड घट्ट करण्यासाठी अनेक उपाय योजले, या उठावाने समाजाची व कोल्हापूर राज्याची घडी विस्कटून गेली अनेक बदल केले गेले. १८६४ ला छत्रपती बाबासाहेब महाराजांना राज्याच्या कारभाराची संपूर्ण मुखत्यारी मिळाली पण पुढे दोन वर्शातच १८६६ ला त्यांचे निधन झाले.

संदर्भ :

1 . Gupta D. C . Indian Ntional Movement Vikas Publication 1970 P-11

2 . Mujumdar R . C . History of the freedom movement in India Vol I P 429

3 . Chaudhari S -B – Civil Rebellion in the Indian Mutinies 1857 – 1858 The world Press Calcutta P- 297

4 Singh Sukhbir- The Great Rebellion of 1857 Rajat publications, New Delhi 2009 P-11

5 . जोशी(डॉ. बी. आर. इतिहास संरक्षणशास्त्र संज्ञासिध्दांतचा कोश इतिहास संरक्षणशास्त्र संज्ञासिध्दांतचा कोश डायमंड प्रकाशन पुणे २००७ पान नं. ५०६

6. भेडसगावकर शिरीश १८५७ देशव्यापी जनसंघर्शाची कथा भारतीय, विचार साधना प्रकाशन पुणे १५ ऑगस्ट २००७ पान ८

7 उपरोक्त – पान नं. ११

8 Gazetter of the Bombay Presidency Kolhapur Vol XXIV 1886 P – 1

9 Rav V. D. - Chhatrapaties of Kolhapur P-362

10. गोखले पी. पी. – १८५७ चा महाराश्ट्र, सातारा १९५७ पान ३७

11. भिडे ग. र –पु ल. देशपांडे (सं) – कोल्हापूर दर्शन श्रीमान मदनमोहन लोहिया अभिनंदन ग्रंथ इंटरनॅशनल पब्लिसिंग सर्व्हिस २३ जानेवारी १९७१ पान ६२ प्रथम आवृत्ती

12. गर्गे स. मा– . करवीर रियासत भंडारी प्रेस पुणे श्री. गो. य. राणे १९८० दुसरी आवृत्ती पान ५५८, ५५९

13. उपरोक्त – पान ५४५

14. Malgaonkar Manohar – The chhatrapaties of Kolhapur, Popular Prakashan Bombay 1971 P- 506

15 . गर्गे स. मा. – करवीर रियासत पान -५५८

16 . झांबरे श्री. स. ध – महान भारतीय क्रांतीकारक महाराश्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ मुंबई २००७ पान ८२

17 Malgaonkar Manohar – The chhatrapaties of kolhapur p . 510, 511

18 Jacob Colonel Sir Grand Le- Western India Before and During Mutinies Mayur Publication Delhi 1872 p . 177

19 Copland Ibn - The British Raj and Indian Princess Paramountary in Western India 1857 – 1930 – Bombay 1982 P. 89

20 Jacob Colonel Sir Grand Le- Western India Before and During the Mutinies p .147-148

21 गर्गे स. मा. – करवीर रियासत पान -५६०

22 Jacob Colonel Sir Grand Le- Western India Before and During the Mutinies p 157

23 भोसले डी. एम. – 1857 चा स्वातंत्र्य समरातील कोल्हापूर, हुतात्मा स्मारक समिती, 15 ऑगस्ट 1957 पान 14

24 Malgaonkar Manohar – The chhatrapaties of Kolhapur p 508

25 झांबरे श्री. स. ध – महान भारतीय क्रांतीकारक पान – 83

10. कोल्हापूर सावंतवाडी संबंध

प्रा. सौ. वंदना रामचंद्र लोंढे
मालती वसंतदादा पाटील कन्या महाविद्यालय,
इस्लामपूर. ता. वाळवा जि. सांगली

इ.स. १७०७ मध्ये शाहू महाराजांची मोगलाच्या कैदेतून सुटका झाल्यानंतर महाराणी ताराबाई व शाहू यांच्यात खेड या ठिकाणी लढाई होऊन मराठयांचे राज्य विभागले गेले. शाहू महाराजांनी साताऱ्याला सत्ता स्थापन केली तर महाराणी ताराबाईंनी पन्हाळयाला गादी स्थापन केली. इ.स.१७१४ मध्ये रक्तहिन सत्तांतर होऊन सर्व सत्ता संभाजी महाराज पहिले यांच्याकडे गेली. छत्रपती संभाजी महाराजांकडे कोल्हापूर बरोबर कोकणातील सिंधुदुर्ग, मालवण, प्रसिध्दगड, मनोहरगड,भैरवगड, राजकोट इ. प्रदेशही ताब्यात होता. त्यामुळे कोल्हापूरकरांचा संबंध सावंतवाडीकरांशी आला. सावंतवाडीकरांचे घराणे शिवकाळापासून प्रसिध्द होते.[१] इ.स. १६५० साली खेमसावंताचे पुत्र लखमसावंत यांनी कुडाळचा प्रदेश जिंकुन छत्रपती शिवाजी महाराजांचे मांडलिकत्व पत्करले होते.[२] सावंतवाडीकर हे घराणे कोकणातील असल्यामुळे त्यांच्या ताब्यात रेडी पेडणे डिचोळी साखली, वेंगुर्ले, यशवंतगड, कुडाळ इ. प्रदेश होते.[३] वारणेच्या तहाने मालवण (सिंधुदुर्ग) चा भाग कोल्हापूरकरांच्या ताब्यात होता. त्यामुळे सावंतवाडीकरांशी त्यांचा वारंवार संबंध येत असे.

सावंतवाडीकरांना मोर्चेलचा मान (१७८५) :

महादजी शिंदे आणि सावंतवाडीकर यांचे निकटचे नाते होते. महादजी शिंदे यांची पुतणी (जयाजीराव शिंदे ची मुलगी) लक्ष्मीबाई हिचा विवाह खेमसावंतशी इ.स. १७६३ मध्ये झाला होता. या नात्यामुळे महादाजींनी सावंतवाडीकरांना मोगल बादशहाकडून मोर्चेलचा मान आणि 'राजेबहाद्दर' असा किताब मिळवून दिला.[४] स्वतंत्र राज्याप्रमाणे आपल्यालाही मोर्चेल असावे अशी खेमसावंत भोसल्यांची इच्छा होती. मोगल बादशहा आलम संपूर्णपणे महादजींच्या हातात होता आणि महादजींचे सेनापती जिवबादादा बख्शी हे मूळचे सावंत वाडीचे होते. त्यामुळे सावंत वाडीकरांनी आपला हेतू जिवबादादाकडे स्पष्ट केली जिवबादादांनी महादजींकडे तशी विनंती केली महादजी व सावंतवाडीकर यांचा आप्तपणा असल्यामुळे महादजींनीही ते मान्य केले. महादजींनी बादशहाकडून सावंतास राजेबहाद्दर असा किताब व मोर्चेलचा मान मिळवून दिला.[५]

मोर्चेलचे युध्द (१७८७) :

कोल्हापूरचे छत्रपती व पेशव्यांनाही सावंतवाडीकरांचा हा नवा मान व दर्जा मान्य नव्हता त्यामुळे दोघांनीही सावंतवाडीकरास विरोध केला. यातूनच मोर्चेलचे युध्द सुरू झाले. मोगल बादशहाकडून मिळालेला मोर्चेल समारंभाने सावंतवाडीत नेले व तेथे ता. ११ मे १७८५ रोजी सावंतवाडीकरांनी त्याचा स्वीकार केला.[६] मोर्चेलचा मान मिळाल्यावर सावंतांनी राजेबहादूर असा किताब लावण्यास सुरूवात केली. कोल्हापूरकर व सावंतवाडीकर यांचे पुर्वीच संबंध चांगले नव्हते. या किताबामुळे अधिक बिघडले मोर्चेल वापरण्याचा मान फक्त छत्रपतीलाच आहे. असे कोल्हापूरकरांचे म्हणणे होते. तो मान बादशहाने सावंतवाडीकरांना दिला हे छत्रपतींना मान्य नव्हते.[७] त्यांचे म्हणणे होते की सावंतवाडीकर छत्रपतीचे मांडलिक असल्यामुळे त्यांना हा मान मिळू शकत नाही. सावंतवाडीकरांचा मोर्चेलचा मान चालू नये म्हणून करवीरकरांनी मोठया फौजेनिशी इ.स. १७८७ मध्ये सावंतवाडीवर स्वारी केली. त्यांना पेशव्यांनी ही मदत केली. सावंतवाडीकरांचे हेरेचे ठाणे, गंधर्वगड व रांगणा कोल्हापूरकरांनी जिंकून घेतले. तसेच नरसिंहगड, भरतगड व निवती हे ही किल्ले घेऊन वेंगुर्ल्याला तळ देऊन राहिले.[८] सावंतकरांची परिस्थिती त्यावेळी तितकीशी चांगली नव्हती. सैन्य दारूगोळा पैसा इ. चा तुटवडा असल्यामुळे वाडीकरांनी पोर्तुगीजांशी तह करून त्यांची मदत घेतली करारानंतर ५ फेब्रुवारी १७८८ रोजी दोन्ही पक्षांच्या फौजा एकत्र आल्या आणि त्यांनी करवीरकरांचा वेढा मोडून काढण्याच्या दृष्टीने वेंगुर्ल्याच्या कोटाजवळ मोर्चे उभारले पोर्तुगीजांनी गोव्याहून आरमार आणून करवीरकरांच्या फौजेला शह देण्याचा प्रयत्न केला. त्यावेळी करवीरच्या फौजा रेडीहून मालवणला परतल्या आणि तेथून सावंतवाडीवर चाल करण्यासाठी मालवणहून रवाना झाल्या. त्यांचा प्रतिकार करण्यासाठी वाडीकरांनीही आपली फौज पाठविली. नांदोस येथे दोन्ही फौजांची लढाई झाली. त्यात सावंतवाडीकरांचा पराभव झाला. शिवराम जिवाजी सबनीस, माणगावकर भोसले, परमेकर देसाई इ. सावंतवाडीकरांचे सरदार करवीरकरांच्या हाती लागले या सर्वांना मालवणच्या किल्यात नेऊन ठेवले. करवीरकरांना विजय मिळाल्यामुळे त्यांची फौज आणखी पुढे गेली अकेरी येथे पुन्हा लढाई झाली. त्यात करवीकरांचे काही लोक ठार झाल्यामुळे त्यांची फौज मालवणला परत गेली.[९]

कोल्हापूरविरूध्द सावंतवाडीकर, पटवर्धन :

सावंतवाडीकरांना पोर्तुगीजांची मदत मिळाल्यामुळे कोल्हापूरकरांना माघार घ्यावी लागली होती हे छत्रपती शिवाजी विसरले नाहीत. परंतु वाडीकरांची जी ठाणी करवीकरांच्या हाती लागली होती ती मात्र त्यांनी सोडली नाहीत. त्यासाठी वाडीकरांना पेशव्यांची मदत घ्यावी लागली. सावंतवाडीकरांविरूध्द कोल्हापूरकरांना जे विजय मिळत गेले ते पुन्हा एकदा पेशवे पटवर्धनांशी संघर्ष वाढण्यास कारणीभूत ठरले. मोर्चेलच्या युध्दापासून

वाडीकरांनी महादजी शिंदेकडे छत्रपती विरूध्द तक्रारी केल्या. महादाजी शिंदेने नाना फडणिसाला हे कळविले. परंतु पेशव्याने इ.स. १७९२ पर्यंत याकडे लक्ष दिले नाही. शेवटी महादजी शिंदे पेशव्याकडे पुण्याला आल्यावर छत्रपतींनी सावंताचा घेतलेला मुलुख परत करावा असा तगादा लावल्यामुळे पेशव्यांनी पटवर्धनांना कोल्हापूरवर स्वारी करण्यास पाठविले.[१०] परशुरामभाऊ पटवर्धन यांनी कोल्हापूरवर आक्रमण करून विजय मिळविला परंतु या विजयातच पुढील वैमन्याची कायमची बीजे रोवली गेली.[११] कोल्हापूर विरूध्द सावंतवाडीकर व पटवर्धन एक झाले तरीही कायमचे शत्रूत्व पटवर्धनांनी ओढवून घेतले. कोल्हापूरकर सावंतवाडीकर व पटवर्धन यांच्यातील संबंध कायमचे बिघडले जे इंग्रजांना फायदेशीर व मराठेशाहीला घातक ठरले.

सावगावची लढाई (१८०८) :

सावंतवाडीचे खेमसावंत इ.स. १८०३ साली निधन पावले त्यांना पुत्रसंतती नसल्यामुळे सावंतवाडीत यादवी सुरू झाली. फौंडसावंताचा मुलगा सोमसावंत व सोमसावंताचा पुतण्या श्रीराम सावंत यांच्यात वाद सुरू झाला. सोम सावंतांच्या मृत्युनंतर त्यांचे पुत्र फोंड सावंताने कोल्हापूरांकडे लक्ष्मीबाई सावंतवाडीकर (खेम सावंतांची पत्नी) यांच्या विरूध्द मदत मागितली. छत्रपतींनी हया संधीचा फायदा घेऊन सावंतवाडीवर आक्रमण केले लक्ष्मीबाईने आपल्या मदतीसाठी सिधोजीराव निपाणकर यास बोलावून घेतले त्यामुळे कोल्हापूर व निपाणकर यांचे संबंध बिघडले ४ फेब्रुवारी १८०८ रोजी निपाणकर व कोल्हापूरकर यांच्यात सावगावजवळ लढाई होऊन त्यात कोल्हापूरकरांचा (छ. शिवाजी दुसरे) पराभव झाला.[१२] सावगावच्या लढाईत स्वत: छत्रपती शिवाजी महाराज दुसरे जखमी झाले.[१३] या लढाईमुळे कोल्हापूर फौजेचे मोठे नुकसान झाले एवढेच नाही तर सावंतवाडीकरामुळे निपाणकर कोल्हापूरचे शत्रू झाले हे मराठेशाहीचे दुर्देव म्हणावे लागेल.

समारोप :

शककर्ते शिवाजी महाराजांनी स्वराज्याची स्थापना करून मराठयांना एक संघ बनवले होते. परंतु राजाराम महाराजांनंतर कोल्हापूर व सातारा या दोन ठिकाणी स्वराज्याची विभागणी होऊन दोन सत्ताकेंद्रे स्थापन झाली. शाहू महाराजांनी पेशव्यांना पुढे आणून मराठेशाहीचा विस्तार केला. असे कोल्हापूरकरांच्या बाबतीत घडले नाही. त्यांच्या आसपास अनेक शत्रू निर्माण झाले. सावंतवाडीकरांना स्वतंत्र राज्याप्रमाणे महादजी शिंदेमुळे बादशहाकडून मोर्चेलचा मान मिळाला हे छत्रपतींना मान्य नसल्यामुळे मोर्चेलचे युध्द सुरू झाले. पुढे पटवर्धनांनीही सावंतवाडीकरांना मदत करण्यासाठी पेशव्याच्या आज्ञेवरून कोल्हापूरवर आक्रमण करून शत्रूत्व ओढवून घेतले एवढेच नव्हे तर सावंतवाडीकरांनी सिधोजीराव निपाणकरांची मदत घेऊन छत्रपतींना शह देण्याचा प्रयत्न केला या सर्वातून सावंतवाडीकर व करवीरचे छत्रपती यांच्यातील संबंध कायमचे बिघडले याचा फायदा इंग्रजांनी घेवून आपली सत्ता मराठेशाहीवर स्थापन केली.

संदर्भ :
१. खरे ग.ह. शिवचरित्र साहित्य, भारत इतिहास संशोधक मंडळ, पुणे खंड १३ पृ. १
२. वैध म.ना. श्रीमंत बापूसाहेब महाराज यांचे चरित्र व आठवणी १९३८ पृ. २०
३. डॉ. खोबरेकर वि.गो. कोकणचा राजकीय इतिहास पृ. २१०
४. गर्गे, स.मा. करवीर रियासत, श्री शहाजी छत्रपती ट्रस्ट कोल्हापूर, तिसरी आवृत्ती २००३ पृ. ३२५
५. कित्ता पृ. ३२६
६. पिंगुळकर वि.गो. सावंतवाडी संस्थानचा इतिहास पृ. ७९
७. मोडक बा. प्र. कोल्हापूर प्रातांचा अर्वाचीन इतिहास पृ. १२३
८. गर्गे स.मा. उपरोक्त २००३ पृ. ३२६
९. कित्ता
१०. खरे वा.वा. ऐ.ले.सं., खंड ९ पृ. ४६५९
११. कित्ता
१२. मोडक बा.प्र. कोल्हापूर प्रांताचा अर्वाचीन इतिहास पृ. १२८
१३. गायकवाड, ख.आ. करवीर संस्थारांच्या कैफियती पृ.६७

11. कोल्हापूर संस्थानातील राजर्षी शाहूंच्या औद्योगिक धोरणाचा इतिहास

प्रा. डी. आर. पाटील
देशभक्त आंनदराव बळवंतराव नाईक कॉलेज,
चिखली. ता. शिराळा, जि. सांगली.

करवीर राज्यनिर्मिती :

करवीर अर्थात कोल्हापूरचा प्रदेश पूर्वापार आदिलशाही साम्राज्याचा घटक होता.छत्रपती शिवाजी महाराजांची तो ताब्यात घेवून तिथे मराठयांचा अंमल सुरू केला. पुढे छत्रपती संभाजी महाराजांचा पुत्र शाहू आणि राजाराम महाराजांची पत्नी ताराबाई या स्वकीयांचा संघर्ष ही या प्रदेशाने अनुभवला. 'ताराबाई ने इ.स. १७१० मध्ये पन्हाळा किल्ला जिंकून घेवून आपला अल्पवयीन पुत्र दुसरा शिवाजी यास गादीवर बसवले आशा प्रकारे करवीर गादीची स्थापना झाली.'[१] अशा प्रकारे 'पन्हाळयाचे राज्य' व 'साताऱ्याचे राज्य' अशी दोन राज्ये महाराष्ट्रात राजकीय प्रक्रियेचा भाग म्हणून अस्तीत्वात आली. पन्हाळयाचे राज्य 'करवीर राज्य' अथवा 'कोल्हापूरचे राज्य' म्हणून ओळखले जावू लागले. १७१० ते १९४९ या काळात करवीर राज्याने अनेक चढउतार अनुभवले. इ.स. १५ ऑगस्ट १९४७ या दिवशी ब्रिटीशांनी भारताला स्वातंत्र्य बहाल केले. भरतातील बहुतांशी संस्थने स्वतंत्र भारतात विलीन झाली. 'कोल्हापूर संस्थान इ.स.०१ मार्च १९४९ या दिवशी स्वतत्र भारतात विलीन झाले.'[२] दरम्यान 'मुंबई प्रातांचे मुख्यमंत्री बाळासाहेब खेर यांच्या अध्यक्षते खाली विलीनीकरण सोहाळा पारपडला.'[३]

करवीर संस्थानातील औद्योगिकरण :

करवीर संस्थानात विविध उद्योगधंदयाची भरभराट झाल्याचे दिसते. तत्कालीन नेतृत्वाने उद्योग व्यवसायात दाखवलेली रूचीच उद्योग वाढीस हातभार लावण्यास कारणीभूत ठरली. करवीर संस्थानात सोन्या–चांदीचे काम करणारे लोहार काम,कुंभारकाम, बांगडीउद्योग, चर्मोद्योग, कातडीकमवणारे, चाभांरकाम, वीणकाम, सुतिविणकाम, तेलकाढण्याचाउद्योग, कागदउद्योग, सुगंधीद्रव्य व पदार्थ तयार करणारे उद्योग गुळ व साखर उद्योग यांना संस्थानातील नेतृत्वाने मोठी चालना दिली. राजर्षी शाहू महाराजांनी देश आणि परदेशभ्रमण केल्यानंतर या सर्व उद्योगांना नवी दृष्टी लाभली. त्यांच्याच खास प्रयत्नातुन सदरचे उद्योगधंदे मोठया प्रमाणात भरभराठीस आले व विकसीत झाले. इचलकरंजीला आजही महाराष्ट्राचे मॅचेस्टर म्हणून ओळखले जाते. त्याची सुरवात संस्थानकाळात निर्माण झालेल्या औद्योगिकदृष्टीकोनात आसल्याचे दिसते. करवीर संस्थातील इचलकरंजी येथे पूर्वीपासूनच हातमागावर कापडविणले जाई 'सन १८४५ मध्ये हातकणंगले पेठयातील आळते येथे ६३६ हातमाग होते.'[४] तर ' सन १८९४ च्या सुमारास कोल्हापूर राज्यात ३०३२ हातमाग होते.'[५] अशाचप्रकारे करवीर संस्थानात कागदही मोठया प्रमाणात बनवला जात होता. कोल्हापूरात तयार होणारा कागद जाडा,भरडा व बळकट होता. या कागदाला करवीर संस्थानाबरोबरच बाहेरही मोठया प्रमाणात मागणी होती.'सन १६५४ मध्ये कोल्हापूर संस्थानात कागद तयार करण्याचे १८ कारखाने होते व त्यात ६६६ मजुर काम करत होते.'[६] सहाजिकच यावरून असे दिसून येते की करवीर संस्थानात तत्कालीन राज्यकर्त्यांनी औद्योगिक विकासावर भर दिल्याने औद्योगिक विकासात करवीर संस्थान अग्रेसर होते. एवढेच नव्हे तर १९०२ मध्ये राजर्षी शाहू महाराजांची दृष्टी खरी विशाल झाली ती युरोपदौऱ्याने असे मानले जाते. 'बादशाह सातवा एडवर्ड याच्या राज्यारोहन सोहळयास हजर राहण्यासाठी महाराज इंग्लंडला गेले.'[७] याच वेळी महाराज फ्रान्स,इटली या देशांत विज्ञानाने घडवून आणलेल्या आश्चर्यकारक भौतिकप्रगती व आधुनिक उद्योयोगधंदयामध्ये झालेल्या बदलाचे महाराजांच्या मनावर विलक्षण प्रभाव पडल्याचे त्याना यावेळी जाणवले. म्हणूनच त्यांनी आपल्या संस्थानात नवे उद्योग सुरू करण्याच्या दृष्टीने औद्योगिक सर्वेक्षण करून घेतले.

'सन १९०५ सालापर्यत कोल्हापूर संस्थानात तेलउद्योग, मधुमक्षीका पालन उद्योग, सुगंधीद्रव्य उद्योग व कापडउद्योग इत्यादी उद्योग सुरू केले'[८]. महाराजांनी उद्योग वाढीस चालना मिळावी आणि उद्योगांना भरभराट यावी यासाठी त्या त्या उद्योगांचे प्रशिक्षण घेण्यासाठी संस्थनातील माणसे बाहेर पाठवली तर बाहेरची प्रशिक्षीत माणसं आपल्या संस्थानात अधिकार पदावर नेमून उद्योगाला नवी दृष्टी दिली. खऱ्या अर्थाने आधुनिक काळात औद्योगिकशिक्षण देणारी पहिली शाळा फ्रान्स मध्ये नेपोलियनच्या काळात (१८०२–१८१५) ला सूरू झाली.'[९] राजर्षीशाहू महाराजांनी कोल्हापूर संस्थानाचे रिजंट व शाहूंचे जनकपिता जयसिंगराव उर्फ आबासाहेब घाटगे यांच्या नावाने तंत्रशिक्षण देणारी संस्था सुरू केली त्याची स्थापना १८६७ मध्ये झाली. जयसिंगराव घाटगे टेक्नीकल इन्स्टीटयुट या नावाने ही संस्था उभी राहीली. 'या संस्थेत कारपेंटरी, ब्रास ॲण्ड आयर्न वर्क, मेटल टनग, ऑपरेटीव्ह सिपल इंजिन, इलेक्ट्रीक कटींग, बेव्हींग इत्यादी सात प्रकारचे अभ्यासक्रम शिकवले जात होते.'[१०] या संस्थेला माठा प्रतिसाद मिळाला. आपल्या राज्यात उद्योगधंदे उभारावेत आणि संस्थानाची भरभराट करावी यासाठी अशा स्कुल व संस्थांची शाहू महाराजांनी उभारणी केली. उद्योगधंदे राज्यात स्थिर करायचे आसतील तर या उद्योग धंदयांना पुरक असा कुशल कामगार व अधिकारी वर्ग आसायला हवा हा या पाठीमागचा शाहूंचां व्यापक विचार होता. म्हणूनच सन १९२० मध्ये राजाराम इंडस्ट्रीयल स्कुल ही औद्योगिक शाळा सुरू केली. या शाळेच्या इमारतीसाठी ३०,००० रूपये खर्च केले व या इमारतीमध्ये ग्रामिण भागातील विद्यार्थ्यांना राहण्यासाठी वसतीगृहाची व्यवस्था करून त्यांचा खर्च संस्थानामार्फत देण्याची व्यवस्था केली.'[११]

राजर्षी शाहू महाराजा सारखा दूरदृष्टी लाभलेला कर्तबगार राजा लाभल्यानेच कोल्हापूर संस्थानाची औद्योगिक क्षेत्रात भरभराट झाली. या राजाने आपल्या काळात केलेली शाहू मिल ची स्थापना म्हणजे कोल्हापूर संस्थानातील औद्योगिक क्षेत्रातील प्रगतीचा कळसच म्हणावा लागेल. दुर्दैवाने आज या शाहूमिलचा भोंगा बंद झाला आहे. या शाहू मिल ने संस्थानातील अनेकांच्या रोजगाराचा प्रश्न मिटवलाच शिवाय कोल्हापूरला औद्योगिक विकासाच्या नकाशावर एक वेगळी ओळख करून दिली. शाहू माहाराजांच्या प्रेरणेने व त्यांच्याच पुढाकाराने '२७ सप्टेंबर १९०६ रोजी दसऱ्याच्या शुभ मुहूर्तावर द शाहू स्पीनींग ॲण्ड विव्हींग मिल्स या गिरणीचे उदघाटन महाराजांच्या हस्ते झाले.'[१२] या प्रसंगी शाहूंनी आपण इंग्लड दौऱ्यावर आसताना तेथील लोकांच्या उद्योगधंदयाच्या क्षेत्रातील प्रगतीने आपण कसे प्रभावीत झालो होतो. व अशां प्रगती आपल्या संस्थानात कशां करता येईल याविचाराने आपण कसे बैचेन झालो होतो याचा वृतांत सांगीतला होता. गिरणीच्या उभारणीसाठी महाराजांच्या अवाहनावरून संस्थानातील सरदार व धनिक मंडळींनी पुढाकार घेतला होता. स्वत: शाहूंनी जागा,पाण्याचेतळे,आणि ५०हजार रूपयांचे भाग भाडवंल उपलब्ध करून दिले. विजयादशमी या दसऱ्याच्या दिवशी मराठे नवा मुलुख जिंकण्यासाठी आपल्या राज्याच्या सिमेबाहेर पडत पण नव्या बदललेल्या आधुनिक काळात केवळ लाढाया आणि मोहीमा काढून उपयोग नाही तर उद्योगधंदयातल्या विविध सीमा ओलांडल्याशिवाय प्रगती आणी समाज उन्नती होणार नाही असे राजर्षी शाहूंचे मत बनले होते. शाहू महाराज संस्थानात औद्योगिक प्रदर्शने भरवीत जेणे करून संस्थानातील लोकांत उद्योगधंदयाविषयी रूची निर्माण व्हावी हा त्यापाठीमागील उदेश होता. जत्रा उत्सव याचा मोका साधून औद्योगिक प्रदर्शने भरवण्यात येत होती. शाहूंची औद्योगिकरणाविषयीची दृष्टी एवढी व्यापक होती की त्यांनी संस्थानाबाहेरील उद्योजक व व्यापाऱ्यानांही मदत केल्याची उदाहरणे आहेत. 'किर्लोस्कर बंधूना आपल्या इलाख्यातून लोखंड तयार करण्यासाठी हवी असणारी लाल खडी मोफत देण्याचा हुकूम दिलेला आढळून येतो.'[१३] एकंदरीत राजर्षी शाहूंचे यावरून उद्योगवाढीबदलचे व्यापक धोरण दिसून येते.

निष्कर्ष :

करवीर संस्थानामधील तत्कालीन राज्यकर्त्यींनी औद्योगिकरणा मध्ये जी रूची दाखवली त्यामुळेच या क्षेत्रात करवीर संस्थान प्रगतीपथावर राहिल्याचे दिसते. विशेषत्वाने राजर्षी शाहू महाराजांनी औद्योगिक क्षेत्रावर आधिक लक्ष केद्रींत केले. एवढेच नव्हे तर त्यांनी त्यासाठी खास उपाययोजना आंमलात आणल्या. त्याच्यामुळे करवीर संस्थानाला या क्षेत्रात नवा आयाम लाभला. राजर्षी शाहूंनी ब्रिटीशांच्या बरोबर सलोक्याचे संबंध राखले होते. करवीर संस्थानाने औधोगिक बाबीकडे जाणीवपूर्वक लक्ष दिल्यानेच आजची कोल्हापूर जिल्हयांची या क्षेत्रात प्रगती झाल्याचे दिसते. कोल्हापूरचे उघमनगर असेल अथवा कोल्हापूर जिल्हयामधील औद्योगिक विकास असेल आजची प्रगत संस्थानकाळात राबवलेल्या ध्येयधोरणाची फलश्रृती होती.

संदर्भ:

१. चौधरी कि.का.;(संपा),कोल्हापूर जिल्हा गॅझेटीअस दर्शमिका विभाग,महाराष्टभ शासन,१९८९,पान नं,५५.

२. भिडे.जी.आर,पी.एल.देशपांडे, कोल्हापूर दर्शन, इंटरनॅशनल पब्ली.,पुणे,प्रथम आवृती,जानेवारी १९७१, पान नं.६६.

३. दैनिक सत्यवादी,ता.२ मार्च, १९४९.

४. डॉ.शिंदे खंडेराव, कोल्हापूर राज्याचा इतिहास,निर्मीती विचारमंच,कोल्हापूर, प्रथम आवृती,जानेवारी,२००९,पान नं.१४५

५. कित्ता.

६. कित्ता.

७. डॉ.पवार जयसिंगराव राजर्षी शाहू स्मारकग्रंथ, जयसिंगराव पवार, व्दित्तीय आवृती,२६जून १९७६,पान नं.३२

८. कित्ता, पानं नं.२०५

९. जोशी लक्ष्मणशास्त्री संपा., मराठी विश्वकोष, खंड.३, महाराष्ट राज्य साहित्य संस्कृती मंडळ, मुंबई, १९७६, पान नं.१०६ – १०७

१०. Admistrative Repost of ज्ञवसींचनत State1900&1901Page No.42

११. Latthe A.B. Memories of H.H.Rajarshi Shahu Chh. Maharaja of Kolhapur, Time Press Bombay,1924,Page No.149&150

१२. डॉ.पवार जयसिंगराव,राजर्षी शाहू स्मारकग्रंथ, जयसिंगराव पवार, व्दितिय आवृति, २६ जून,२००७, पान न.२०७

१३. Dr. Sangave Vilas, Rajarshi shahu Chhatrapati Papers, Shivaji University Kolhapur,1994, Vol-8, Page No.114.

12. भोर संस्थानमधील राजकीय घडामोडी

प्रा. डॉ. आरती प्रविण चौगले
इतिहास विभाग प्रमुख, डी. आर. माने महाविद्यालय,
कागल. ता. कागल, जि. कोल्हापूर

भोर हे दक्षिणेकडील एक महत्वाचे संस्थान.छत्रपती शिवाजी महाराजांच्या अष्टप्रधान मंडळातील सचिवांचे हे संस्थान होते. या संस्थानाचे क्षेत्र २३३० चौ.कि.मी. लोकसंख्या १६५९३१ (१९४१) आणि वार्षिक उत्पन्न ९ लाख रुपये होते. विचित्रगड, राजगड, पवनमावळ, प्रचंडगड आणि सुधागड अशा पाच तालुक्यांचे व ५०० गावांचे हे लहानसे संस्थान होते. संस्थानातील प्रजा अशिक्षित आणि गरीब मावळयांची होती. तरी राजकीय हक्क संपादनाची लोकचळवळ सर्व दक्षिणी संस्थानामध्ये प्रथम भोरमध्ये सुरु झाली. अन्यायी करांच्या विरोधात राजकीय हक्क प्राप्तीसाठी व घटनात्मक सुधारण्यांसाठी भोरमधील या अशिक्षीत मावळयांनी अतिशय तीव्र स्वरुपाचे आणि दिर्घकाळ लढे दिले. प्रस्तुत शोधनिबंधात मी भोर संस्थानातील राजकीय घडामोडींचा आढावा घेतला आहे.

साताराची गादी नष्ट झाल्यानंतर भोर संस्थान ब्रिटीश सरकारच्या सार्वभौमत्वाखाली आले. ब्रिटीश साम्राज्याच्या काळात राजकीय बदलांमुळे संस्थानात शैक्षणिक आणि सांस्कृतिक प्रगती घडून आली. पंतसचिव चिमणाजी रघुनाथ उर्फ नानासाहेब (१८३६–१८७१) यांनी संस्थानची कर्जफेड करुन संस्थानात सुधारणांचा पाया घातला. शंकर चिमणाजी उर्फ रावसाहेब (१९२२–१९४८) यांच्या कारकिर्दीत मोफत प्राथमिक शाळा, आरोग्य, पक्कया सडका, कारखाने, डाक तार खाते, स्थानिक स्वराज्य संस्था, वाचनालये, बालवीर चळवळ, शेती सुधारणा, अस्पृश्यता निवारण, ग्रामोध्दार अशा अनेक सुधारणा झाल्या. सन १९२१ मध्ये भोर संस्थानमध्ये प्रजापरिषदेची स्थापना झाली. भाऊसाहेब शेटे, दामुआण्णा पोतनीस, गोपीनाथ पोतनीस, शंकर वाळींबे, त्यांचे पुत्र दत्तोपंत, जानराव देशमुख, जे.एल. आपटे इ. नेत्याच्या नेतृत्वाखाली भोर मधील लोकांनी आंदोलने तसेच हिरडा सत्याग्रह व जंगल सत्याग्रह यासारखे अतिशय व्यापक आणि दिर्घकाळ चाललेले सत्याग्रह केले. त्याप्रमाणे जबाबदार राज्यपध्दती स्थापन करण्याकरीता देखील प्रजासभेला लढा द्यावा लागला.

राजकीय सुधारणांचे टप्पे :–

१९२८ चे कायदेमंडळ :–

भारताच्या खालसा प्रदेशात अंशत: जबाबदार राज्यपध्दतीची सुरुवात १९१९ च्या मॉंटेग्यू चेम्सफर्ड सुधारणा कायद्यान्वये सुरु झाली. या कायद्यानुसार प्रांतात द्विदल राज्य पध्दती सुरु झाली. या घटनेचा प्रभाव संस्थानी प्रजेवरही पडला. भोर संस्थानातही प्रजापक्षाने केलेले सत्याग्रह अन्यायी करांना केलेला सतत विरोध या दडपणाचा प्रभाव म्हणून १९२८ साली पाहिले कायदेमंडळ अस्तित्वात आले. तत्कालीन पंतसचिव रघुनाथराव पंडीत यांनी आपल्या राज्यरोहणाच्या पाचव्या वाढदिवसाच्या दिवशी म्हणजे १८ ऑगस्ट १९२८ रोजी कायदेमंडळ स्थापन केल्याचे जाहीर केले.[१] या कायदेमंडळात १० सरकारी अधिकारी व १० बिनसरकारी अधिकारी व १ दिवाण, हा पदसिध्द अध्यक्ष असे २१ सभासद होते. या कायदेमंडळाचे स्वरुप केवळ सल्लागार मंडळासारखे होते.

१९३२ चे कायदेमंडळ :–

सन १९३२ मध्ये कायदेमंडळाच्या सुधारणेचा दुसरा हप्ता राजेसाहेबांनी दिला. २० सभासदांच्या कायदेमंडळात ७ सरकारी सभासद व १३ बिनसरकारी सभासद अशी तरतूद करण्यात आली. म्हणजे बिनसरकारी सभासदांचे मताधिक्य झाले. पूर्वीप्रमाणे दिवाण अध्यक्ष परंतू उपाध्यक्षांची नवीन जागा निर्माण करुन ती बिनसरकारी सभासदाकडून एकाची निवड करुन भरावी असे ठरविण्यात आले.[२] या कायदेमंडळाच्या अधिकारात मात्र कोणत्याही प्रकारची वाढ करण्यात आली नव्हती.

१९३८ चे कायदेमंडळ :–

सन १९३८ मध्ये पंतसचिवांचा षष्ठयब्दिपूर्ती समारंभ होता. यानिमित्त त्यांनी कायदेमंडळात सुधारणा जाहीर केल्या. त्यानुसार कायदेमंडळात १३ लोकनियुक्त, ५ अध्यक्षांसह बिनसरकारी परंतू सरकार नियुक्त आणि ५ सरकारी अधिकारी असे एकंदर २३ सभासद घेण्याचे ठरले.[३] या सुधारणानुसार संस्थानात प्रथमच निवडणूक तत्वाचा अंमल होऊन लोकनियुक्त सभासद बहुसंख्येने कायदेमंडळात येण्याची संधी मिळाली. कायदेमंडळाचा अध्यक्ष होण्याचा मान बिनसरकारी सभासदांना मिळाला. तसेच कायदेमंडळाच्या अधिकारात वाढ करण्यात आली. अंदाजपत्रकावर कपातीच्या सूचना मांडण्याचा नवीन अधिकार सभासदांना मिळाला. दक्षिणी संस्थान प्रजासभेचे नेते श्री.वामनराव पटवर्धन यांच्या सांगण्याप्रमाणे भोरच्या

प्रजा सभेने कायदेमंडळाच्या वरील सुधारणा मान्य करून राबविण्याचा निर्णय घेतला. कारण संथपणे का होईना पण एक सारखी क्रमाक्रमाने प्रगती होत राहील आणि यथाकाल पूर्ण लोकसत्तेची स्थापना होईल. अशी अशा वामनरावांना वाटत होती.[४] भोर प्रजासभेचे १२ वे अधिवेशन २९ व ३० एप्रिल १९३९ रोजी भोर येथे भरले होते. त्याप्रसंगी परिषदेचे अध्यक्ष श्री.श्री.ग.वझे यांनी कायदेमंडळाच्या वरील सुधारणा अपु—या व असमाधानकारक असल्या तरी त्या राबवाव्यात असा सल्ला दिला.[५]

कायदेमंडळाच्या निवडणूका :—

नवीन घटनेप्रमाणे कायदेमंडळातील १३ जागांसाठी ११ मे १९४२ रोजी निवडणुका झाल्या. या निवडणुकीत प्रजासभा व राजासाहेबांच्या बाजूचा लोकपक्ष यांच्यातच खरी लढत होती. लोकपक्षाने आपला मगदूर पाहून चारच उमेदवार उभे केले होते. या चारही उमेदवारांचा प्रजासभेच्या उमेदवारांनी दणदणीत पराभव केला. प्रजासभेने उभे केलेले १० उमेदवार विजयी झाले व ३ अपक्ष निवडून आले. या निवडणूकीत लोकपक्षाच्या उमेदवारांना एकूण २४० मते तर प्रजासभेच्या उमेदवारांना ४,७२३ मते मिळाली.[६] कायदेमंडळाच्या पहिल्या अधिवेशनाच्या उदघाटनाच्या वेळी १५ नोव्हेंबर १९४२ रोजी श्रीमंतानी द्विदल राज्यपध्दती सुरु करण्याची तसेच मंत्र्याची नेमणूक करण्याची घोषणा केली.

निकालांविरुध्द कोर्टात अर्ज :—

कायदेमंडळाच्या निवडणूकीत प्रजासभेच्या उमेदवारांनी १० जागा जिंकल्या तर लोकपक्षाने उभे केलेले चारही उमेदवार पडले होते. तेव्हा प्रजासभेच्या विजयी उमेदवारांविरुध्द लोकपक्षाकडून कोर्टात अर्ज दाखल करण्यात आले होते. असे सात अर्ज होते. या अर्जाचा निकाल देण्यासाठी भोर दरबारने पुण्यातील स्मॉल कॉज कोर्टामध्ये रजिस्ट्रार म्हणून काम करीत असणा—या श्री.के.पी.जोशी यांची नियुक्ती केली खालसातील हे काम एक हायकोर्ट जज्ज, एक बॅरिस्टर आणि एक सार्वजनिक कार्य करण्याचा अनुभव असलेली व्यक्ती अशा तिघांकडे सोपविण्यात येत होती.[७]

श्री.के.पी.जोशी यांनी सात पैकी दोन अर्जाचा निकाल दिला प्रजापक्षांने श्री. दामूआण्णा पोतनीस आणि श्री. शंकरराव लिमये यांनी जिंकलेल्या जागा श्री. दाजी बाबूराव पासलकर व श्री. मध्वराज शिंगरे यांना मिळाल्या. श्री. शिंगरे यांना प्रत्यक्षात निवडणूकीत फक्त ६७ मते मिळालेली होती. ११३२ आणि १२५६ मते मिळालेल्या प्रजासभेच्या उमेदवारांना कोर्टाने बाद ठरविले. त्यानंतर १५ नोव्हेंबर १९४३ रोजी राजेसाहेबांनी लोकपक्षाच्या दोन सभासदापैकी श्री. शिंगरे यांनी मंत्रीपदावर नेमणूक केली. यानंतर दिड महिन्याने म्हणजे २७ डिसेंबर १९४३ रोजी कायदेमंडळातील रिकाम्या पांच जागांसाठी पोटनिवडणूका झाल्या. या पाचही जागांवर प्रजापक्षाचे उमेदवारच निवडून आले आणि लोकपक्षाच्या जवळजवळ तिप्पट इतके मतदार प्रजापक्षास प्राप्त झाले.[८] पुन्हा १ मे १९४४ रोजी दोन जागांसाठी पोटनिवडणूका झाल्या व त्या जागाही प्रजा पक्षास मिळाल्या, परंतू या सर्व यशस्वी उमेदवारांविरुध्द पुन्हा लोकपक्षाच्या उमेदवारांनी कोर्टात अर्ज दाखल केले. वरील अर्जांचा निकाल देण्यासाठी राजेसाहेबांनी श्री.बी.व्ही. पोतदार यांची निवडणूक कोर्टाचे विशेष न्यायाधिश म्हणून नेमणूक केली परंतू कोर्टाच्या निकालात फारसा फरक पडला नाही.

कोर्टाचे निकाल :—

वरील प्रत्येक केसमध्ये प्रजापक्षाच्या उमेदवारांवर निवडणूक गैरव्यवहाराचा ठपका ठेवून त्यांना अपात्र ठरविण्यात आले आणि त्या जागी लोकपक्षाचे उमेदवार निवडून आल्याचे जाहीर करण्यात आले त्यासाठी त्यांना पुन्हा निवडणूकीस उभी रहाण्याची दगदग देखील करावी लागली नाही याशिवाय बाद झालेल्या प्रजासभेच्या उमेदवारांना पुन्हा निवडणूका लढण्यात पाच वर्षे मनाई करण्यात आली. कायदेमंडळात लोकपक्षाचे बहुमत झाले व श्री. शिंगरे मानाने मंत्रीपद उपभोगू लागले.[९]

चौकशी समिती :—

वरील प्रकारे भोर संस्थानात विधीमंडळाच्या निवडणूकांबाबत खेळखंडोबा केला गेला. दक्षिण संस्थान लोकसभेचे १४ वे अधिवेशन भोर येथे दिनांक १२ मे १९४५ रोजी श्री.बाळासाहेब खेर यांच्या अध्यक्षतेखाली भरले तेव्हां या अधिवेशनात भोरमधील राजवटीबाबत फार तक्रारी मांडण्यात आल्या. विधिमंडळातील निवडणूकाबाबत चौकशी करणे आवश्यक झाले. तत्पूर्वीच दक्षिणी संस्थान लोकसभेच्या कार्यकारी समितीकडून ११ फेब्रुवारी १९४५ रोजी स्थापन केलेल्या चौकशी समितीस या अधिवेशात मान्यता देण्यात आली. चौकशी समितीत पुढील सदस्य होते. —

१) श्री.जी.व्ही. मावळणंकर, सभापती, मुंबई कायदेमंडळ, हे या समितीचे अध्यक्ष होते.

२) श्री.एन.जी.चाफेकर, रिटायर्ड जज्ज, व औंध स्टेट कौन्सीलचे अध्यक्ष.

३) श्री.ए.व्ही.साबडे, ॲडव्होकेट जमखिंडी, दक्षिण संस्थान, प्रजा परिषदेचे सचिव, 'संस्थानी स्वराज्य' चे संपादक.

४) श्री.एस.आर.दाते, पुणे 'काळ' चे संपादक.

५) श्री.व्ही.ए.पटवर्धन, 'संस्थानी स्वराज्य' चे सहसंपादक हे चौकशी समितीचे सचिव होते.[१०]

या समितीचे काम ता. ८ एप्रिल १९४५ पासून २७ डिसेंबर १९४५ पर्यंत चालले. व २७ डिसेंबर १९४५ रोजी समितीने आपला अहवाल तयार केला. कोर्टाच्या सर्व निर्णयांचा विचार केल्यानंतर चौकशी समितीने असा निष्कर्ष काढला की यामागे निश्चितपणे व सुसुत्रपणे आखलेला एक कट होता. आणि त्यानुसारच प्रत्येक निर्णय घेण्यात आला होता. सातत्याने घटनात्मक चौकटीत व्यवहार करण्याचा आग्रह धरणा—या प्रजापक्षाबरोबर राजाचे संबंध केव्हाच जुळले नाहीत म्हणून राजेसाहेबांनी लोकपक्षाचा आधार घेवून प्रजापक्षाला संपविण्याचा प्रयत्न केला.

अहवालाबाबतचा प्रतिसाद :—

समितीने आपल्या अहवालात प्रथम संस्थानची सर्वसाधारण माहिती, प्रारंभीच्या सुधारणा, प्रजापरिषदेची आंदोलने इ. ची माहिती दिली. त्यांच्या मते १६ डिसेंबर १९३८ रोजी राजेसाहेबांनी घटनात्मक सुधारणांसाठी जी पावले उचलली होती त्यामागे ब्रिटीश हिंदूस्थानातील तत्कालीन राजकीय परिस्थिती, (१९३५ चा भारत विषयक कायदा आणि १९३७ ची प्रांतिक कॉग्रेस मंत्रीमंडळे) प्रजासभेच्या सातत्यपूर्ण लढयामुळे जनमताचा आलेला दबाव, आणि षष्ठब्दपूर्ती समारंभ शांततेने पार पडावा ही सुप्त इच्छा घटनात्मक बदलाची प्रमुख कारणे होती मात्र घटनात्मक बदल ही निव्वळ धुळफेक होती अशा निष्कर्षाप्रत समिती आली.[११] चौकशी समितीने आपला अहवाल प्रसिध्द करु नये म्हणून भोर दरबारने औंधचे श्रीपाद दामोदर सातवळेकर यांच्याशी संपर्क साधून विनंती केली. श्री० सातवळेकर यांनी भोर दरबार पुढे पुढील पर्याय ठेवले होते.

१) भोर दरबारने सध्याचे कौन्सील बरखास्त करावे.

२) नवीन निवडणूका घेवून नवीन कौन्सील बनवावे.

३) प्रजासभेच्या सभासदांवरील अपात्रता, दूर करुन त्यांना निवडणूकीस उभे राहता येईल असे करावे.

४) निवडणूक तक्रार अर्जाचे निकाला समाईक हायकोर्ट जज्ज कडून करुन घ्यावेत.

५) श्री.पोतनीस वगैरेवर भरलेले खटले काढून घ्यावेत.

६) अधिकार संक्रमण (Transfer of Power) करावयाची इच्छा असेल तर भोर दरबारने प्रजापक्षाशी चर्चा करुन एवढया सुधारणा घडवून आणाव्यात की ज्यामुळे प्रजेच्या हातात काही अधिकार आले हे सिध्द होईल. या सर्वाला अध्यक्ष म्हणून बाळासाहेब खेर यांना नेमावे.[१२]

वरील सर्व गोष्टीचा परिणाम म्हणजे चौकशी समितीचा रिपोर्ट प्रसिध्द होण्यापूर्वीच दि.२ सप्टेंबर १९४६ च्या भोर दरबारच्या दप्तरी ठरावाने भोरच्या राजेसाहेबांनी राजकीय सुधारणांची घोषणा करुन प्रजेला नवीन राजकीय हक्क दिले. या जाहिरनाम्यामध्ये संस्थानी प्रजेस काही मुलभूत हक्क ही दिले होते. तसेच संस्थानच्या राज्यकाराभाचे अंतिम ध्येय जबाबदार राज्यपध्दती (Responsible Govt.) असल्याचा उल्लेख केला.[१३] याशिवाय प्रजासभेचे कार्यकर्ते श्री.गोपीनाथ पोतनीस यांचेविरुध्द संस्थानच्या सेशन्स कोर्टात चाललेली खटला काढून घेऊन त्यांच्यावर असलेले निर्बंध काढून टाकण्यात आले. तसेच कोर्टाने प्रजासभेच्या ज्या उमेदवारांना निवडणुकीकरिता अपात्र ठरविले होते. त्यांच्यावरील निर्बंध काढून टाकण्यात आले.

त्यानुसार संस्थानातील जुने कायदेमंडळ ६ फेब्रुवारी १९४६ रोजी बरखास्त करण्यात आले व नवीन कायदेमंडळ जाहीर केले ते २६ सभासदांचे होते. त्याची विभागणी १९ लोकनियुक्त ५ सरकार नियुक्त बिनसरकारी सभासद आणि २ सरकार नियुक्त सरकारी सभासद अशी होती. लोकमताचा पाठींबा असलेल्या पक्षाच्या प्रमुखाला मंत्री म्हणून निवडणेत येईल. या मंत्र्याकडे पूर्वी सोपविलेली सहा खाती व नवीन १३ खाती मिळून १९ खाती देण्यात आली.[१४] याचवेळी भोर संस्थानच्या कार्यकारी मंडळाचे अध्यक्ष राजेसाहेब होते त्यांच्या जागी पुणे येथील सुप्रसिध्द साहित्यिक नरसिंह चिंतामण उर्फ तात्यासाहेब केळकर, बी.ए.एल.एल.बी. यांची फेब्रुवारी १९४६ मध्ये नेमणूक करण्यात आली. नवीन राजकीय सुधारणानुसार भोर संस्थान कायदेमंडळाच्या २३ नोव्हेंबर १९४६ रोजी निवडणूका झाल्या आणि सर्व १९ जागा प्रजासभेने मिळविल्या. १८ ऑगस्ट १९४७ रोजी साहेबांच्या कारकिर्दीस २५ वर्षे पूर्ण झाली म्हणून आयोजित केलेल्या रौप्यमहोत्सव समारंभात राजेसाहेबांनी असे जाहिर केले की, आजपासून संस्थानच्या राज्यकारभारासंबंधीची सर्व खाती लोकनियुक्त मंत्र्याकडे संपूर्ण जबाबदारीने सुपूर्द करण्यात येत आहेत.[१५]

अशा प्रकारे भोर संस्थानात १८ ऑगस्ट १९४७ पासून जबाबदार राज्यपध्दती सुरु झाली. याच दिवशी श्री.न.चि.केळकर यांनी भोर शासन मंडळाचे अध्यक्षपद सोडले. संस्थानात प्रजापक्ष हाच निवडून आलेला पक्ष होता. गोपीनाथराव पोतनीस हे प्रजापक्षाचे नेते होते तेच मुख्यमंत्री झाले.

संदर्भ :

१. रानडे वि.गो.हिज हायनेस राजा श्रीमंत रघुनाथराव पंडित पंत सचिव, के.सी.आय.ई. यांचे चरित्र, खंड ४ था पृ.३९३

२. कित्ता पृ.३९४

३. पोतनीस दामोदर बाळकृष्ण, मुकादम विष्णू दामोदर सचिव शाहीची पाच वर्षे १९४०—४५, पृ. ६६, ६७

४. कित्ता, पृ.८६

५. कित्ता. परिशिष्ठ ८, श्री.ग.वझे यांचे भाषण, पृ.१००

६. कित्ता, पृ.१२८

७. कित्ता पृ. १६९, १७०

८. कित्ता पृ.१७२

९. प्रजासभेचे पत्रक ९ मे १९४४

१०. भोर संस्थान चौकशी समितीचा अहवाल पृ.१,२

११. कित्ता पृ. १२

१२. भोर संस्थान (जादा गॅझेट) अंक ३९, दि. ०६/०२/१९४६

१३. भोर संस्थान दप्तरी ठराव, संस्थानी स्वराज्य दि.०२/०९/१९४६

१४. पोतनीस गंगाधर गोपीनाथ, येथे कर आमुचे जुळती पृ.४४

13. Role of British Administrator in the Princely State of Mysore

Dr. Chandravadan Naik,
Devchand College, Arjunnagar.

Introduction

Form 1831 onwards Mysore was under the rule of the commissioners for about fifty years. The period was of great importance, in the development of the state into a model province. The native ways gave way to the British methods. The English brought changes in almost all the levels of administration. All the unnecessary and unwieldy positions in the government were removed. Corrupt officers were mercilessly dismissed. The secretariat of the Dewan was abolished and under the commissioner a central administrative office came into existence. In the beginning a senior and a junior commissioner controlled the administration of the state. But this gave rise to conflicting views between them. So from 1832 onwards a single commissioner was appointed. Col. Mark Cubbon was the first among them

ADMISTRATION OF SIR MARK CUBBON (1834-64)

IN 1834, COL. Mark Cubbon was appointed commissioner during his period, administration of state was carried on lines, which won admiration everywhere. He shifted the capital from Mysore to Bangalore and made Tipu's palace the first secretariat

ADMINISTRATIVE UNITS

Cubbon divided the state into four administrative division's viz., Patna Ashtagrama , Chitradurga, Bidanur (all old divisions) and Bangalore (new division). Each division was placed under the control of one European Superintendent. There were 120 talukas in the state, each looked after by one 'amildar'. Below the 'amildar' was an official called 'hoblider' or 'shekder' who looked after one hobli i.e. a group of villages.

commissioner's secretariat

The commissioner's secretariat had nine departments namely. (i)revenue, (ii)police , (iii)post, (iv)swar, (v)maramat, (vi)medical, (vii)justice, (viii)education and (ix) amritmahal. Every department had a departmental head. The head of the revenue department, for example, was known as shirestedar, who performed the duties of the former divan in course of time, separate departments for public works, education, audit and accounts and forest were established.

Judicial reorganization

Mark Cobbon reorganized judicial system in the state. He established 85 taluk course courts, some of which had jurisdiction over more than one taluk. There were eight principal sardar munsiff courts and four superintending courts, one huzur adalat court with three judges and one commissioner's court the last two being appeal courts. A judicial commissioner's court was set up to unload the burden of the Comissioners.The powers of all the courts were defined.

His other Innovations

Cubbon was responsible for many innovations. He connected Bangalore with all headquarter towns by road because the state capital had been shifted there. New roads measuring 1,597 miles with as many as 309 bridges were constructed. Telegraph lines of the length of 365 miles were also laid. Railways were laid for the first time in the state when Bangalore was connected with Jolarpet by railway line in 1859. He was also responsible for establishing coffee plantation in the state and by the close of his administration; there existed almost 1, 60,000 acres of plantation. The total revenue of the state increase from Rs 68 lakhs in 1834-35 to Rs. 84 lakhs in 1855-56 in spite of the fact that 769 minor vexations taxes were abolished. When Cubbon assumed office in 1834, the public debt was rs.85lakh but it was completely repaid by 1857. When he resigned in 1861, Cubbon left Rs.40 lakhas in the name of the state in British Government securities. Cubbon was, no doubt, a remarkable administrator, who streamlined administration of Mysore on modern lines. He was responsible for laying down a sound and solid foundation for the material progress and prosperity of the people in the state, his sense of justice, sympathy, humanity and tact won him the honored place in the hearts of the people. He resigned in 1861 and was succeeded by Lewing Banthgem Bowming in the office

ADMINISTRATION OF LEWIN BENTHAM BOWRING (1861-70)

Administrative Units

Lewin Bentham Bowring had great administrative ability and experience in Indian affairs. He overhauled the administrative machinery. The Mysore state was divided into three divisions: Ashtagrama, Nandidurga and Nagar. Each division

 ISBN 978-93-5212-145-8

was under a European superintendent until 1869 when a Commissioner replaced him. Each division was divided into districts. Each district was looked after by a Deputy Commissioner. Each district was divided into talukas, graded into five groups. The taluka were looked after by amildars and shekdars, who worked under Deputy Commissioners.

Separation of powers

Lewin Bowring took steps to separate the judicial powers from the executive. This policy of separation of powers, initiated by him, was later continued by his successors. He was also responsible for the introduction of the 'Indian Penal Code' and code of criminal procedure act was passed and registration was made compulsory for all property transactions.

Department of police

Lewin Bowring abolished the Kandahar police system and organized a new department of police on the Madras model; it was placed under European Superintendent. The Department consisted of the Inspector-General of police with deputy Inspectors General and District Superintendents. The police were made independent of the District Magistrate.

Encouragement to education

Bowring gave encouragement to education on a large scale. Special efforts were made to set up school in villages. In 1868, a Central Education Agency was set up to promote education in Mysore. The Central College buildings and the Bangalore Museum building were built during his time

His other achievement

Bowring reorganized the revenue survey and settlement department and introduced regularity in the measurement of land and assessment and collect of land revenue. A large medical staff was put in charge of jails and hospital in the chief towns; Special efforts were made to expand engineering department and horticultural gardens. Judicial organization was also overhauled. The system of fees was abolished and, in its place, the stamp rules and stamp papers were introduced. After ten years' meritorious service Bowring resigned in 1870

Conclusion

Lewis Bentham Bowring was followed by three commissioners, one after the other, namely, (1) sir Richard Meade (1870-75), G.B. Saunders (1875-77) and J.D. Gordon (1877- 81) However, among the commissioners, who administered Mysore , Cubbon and Bowring were the most outstanding administrators who have left behind indelible marks by their good and industrious work. During this period, the administration of Mysore came to be modernized, law and the order were better enforced, revenue system was improved and the process of modernization was started.

References:-

1) P.B. Desai 'History of karnataka.', Dharuweel 1970.

2) H.V. Sreenivas murthy, R. Ramakrishnan 'A history of Karnataka, from the earlist times to the present day',. 1977.

3) M.B. Gayathri -'Development of Mysore state 1940-56', Mysore 1990.

4) Subrahmanian N. 'History of south India ',new Delhi 2003.

5) Kamath S.G. 'A concist history of Karnataka From pre historic times to the present',Banglore 1980.

6) Murthy. K. Narasimha 'Modern Kannada Literature'. 1992.

7) Narasimhacharya R 'History of Karnataka', new Delhi 1988.

8) Sustri Nilakanta K.A 'History of south India', new Delhi 1955.

9) Venkata Ramanappa M.N. 'Outlines of south Indian history with special reference to Karnataka ',Delhi 1975.

10) Chopra P.N. Ravidran T.K. Subramanian N 'History of south India', new Delhi 2003.

11) Basavaraj K.R. 'History and culture of Karnataka', Dharwad 1984.

12) Krishnarao M.v and Keshar bhatt M ' Karnataka Itihas Darshan', Banglore 1970.

13) Karmarkar B.P. 'Culture history of Karnataka', Dharwad 1947.

14) Dr. Krishnarao M.V. and Halapp. G.S 'History freedorn movement in Karnataka',Banglore

15) Diwakar R.R 'Karnataka through the ages' Banglore 1968.

14. गांधी हत्या आणि कोल्हापूर संस्थानातील राजकीय बदल

१. डॉ. तानाजी रामचंद्र हवलदार
इतिहास विभागप्रमुख,
बाबा नाईक महाविद्यालय, कोकरूड.
ता. शिराळा, जि. सांगली

२. प्रा. वसंत ज्ञानदेव ढेरे
इतिहास विभागप्रमुख,
राधानगरी महाविद्यालय, राधानगरी.
ता. राधानगरी, जि. कोल्हापूर

प्रस्तावना:–

३० जानेवारी रोजी महात्मा गांधीजीची हत्या घडून आली. सर्व देशभर विशेष महाराष्ट्रात राजकीय व जातीयदृष्टया अस्वस्थ वातावरण निर्माण झाले. महात्मा गांधीजीची हत्या करणारा नथूराम गोडसे हा ब्राह्मण असल्यामुळे महाराष्ट्रात ब्राह्मण समाजाच्या घरांवर हल्ले होवून जाळपोळ सुरू झाली. कोल्हापूरातही याचे पडसाद उमटल्याशिवाय राहिले नाहीत. कोल्हापूर शहरातील व ग्रामीण भागातील ब्राह्मण समाजावर हल्ले झाले.[१] कोल्हापूर संस्थानात मोठया प्रमाणात राजकीय बदल घडून आले.

३० जानेवारी १९४८ रोजी महात्मा गांधीजीना श्रध्दाजंली वाहण्यासाठी बिंदू चौकात भरलेल्या सभेला २०,००० लोक उपस्थित होते. यावेळी माधवराव बागलांनी उपस्थित लोकांना असे सांगीतले की, 'आपणाकडून चुकीचे काहीही घडू नये हे आपले कर्त्यव्य आहे.' ३१ जानेवारी १९४८ रोजी कोल्हापूरात हरताळ पाळण्याचे जाहीर केले. मात्र याच दिवसापासून जाळपोळीस सुरूवात झाली. माधवराव बागल व मंत्रीमंडळ शहरात फिरून जाळपोळ होवू नये म्हणून लोकांना विनंती करत होते. मात्र अनेक ब्राह्मण लोकांच्या घरावर लोकांनी हल्ले करून ते पेटवून दिले. या मधून भालजी पेंढारकरांचा स्टुडिओ देखील सुटू शकला नाही.[२] प्राचार्य बाळासाहेब खर्डेकर व प्राचार्य एम. आर. देसाई शहरात आणि मुरगूड, राधानगरी, कागल इत्यादी भागात फिरून शांतता निर्माण करण्याचे काम करत होते.[३] कोल्हापूर राज्य तालीम संघानेही शांतता निर्माण करण्याकामी महत्वपूर्ण कामगिरी केली. तालीम संघाचे कार्यकर्ते गावोगावी जावून शिस्तबध्द पध्दतीने शांतता निर्माण करत होते. याकरीता तालीम संघाने एक कमिटी स्थापन केलेली होती. त्यामध्ये पुढील लोकांचा सहभाग होता आण्णासाहेब पाडळकर–गंगावेश, केशवराव जगदाळे – मंगळवार पेठ, श्रीपतराव जाधव – जुनी बुधवार पेठ, बळवंत खरे पाटणे– शाहुपूरी, केशवराव सांवत – राजारामपुरी, पांडुरंग पोवार – रविवार पेठ, वाय. डी. पाटील – सेक्रटरी, श्रीपतराव बोंद्रे – शिवाजी पेठ उपाध्यक्ष तालीम संघ[४]

कोल्हापूरमधील दंगलीविषयी रत्नाप्पा कुंभार यांची भूमिका :–

कोल्हापूरामध्ये माधवराव बागल गट व रत्नाप्पा कुंभार गट असे दोन राजकीय विरोधक गट राजकीय क्षेत्रात कार्यरत होते. कोल्हापूरात दंगल चालू झाली त्यावेळी ३० जानेवारी १९४८ रोजी पंतप्रधान सुर्वे हे पुण्यात होते. संस्थनचे अधिपती छत्रपती शहाजी महाराज देवासला होते. रत्नाप्पा कुंभार हे ही कोल्हापूरात नव्हते मात्र महात्मा गांधीच्या हत्येनंतर कोल्हापूरात निर्माण झालेली अस्थिर परिस्थिती ही माधवराव बागल गटाला नामोहरण करण्याची नामी संधी चालून आलेली आहे असे वाटून गांधी हत्येनंतर कोल्हापूर संस्थानात उद्भवलेल्या दंगलीचा सविस्तर २२ पानी अहवाल रत्नाप्पा कुंभार यांनी अखिल भारतीय प्रजापरिषदेचे सचिव व सरदार वल्लभभाई पटेल यांना पाठवला. त्यामध्ये खालील महत्वाच्या मुद्दयांचा समावेश होता –

१. कायदा व सुव्यवस्था राखण्यात बागल मंत्रीमंडळ अपयशी ठरले आहे.
२. बागल मंत्रीमंडळाची दंगलखोरांना सहानुभूती होती व या मंत्रिमंडळाने या दंगलीकडे जाणीपूर्वक दुर्लक्ष केले.
३. धर्मनिरपेक्ष मंत्रीमंडळाची कोल्हापूर संस्थानात स्थापना करावी.
४. कोल्हापूरात झालेल्या दंगलीची न्यायालयीन चौकशी करून त्यासाठी समिती स्थापन करावी.
५. या दंगलीमध्ये ज्यांचे ज्यांचे नुकसान झाले त्यांना नुकसान भरपाई मिळावी.
६. तालीम संघावर बंदी आणावी.

वरील रत्नाप्पा कुंभार यांनी केलेल्या मागण्या भारत सरकारने मान्य करून मार्च ते जून १९४८ या कालावधीत त्या अंमलात आणल्या[५]

व्ही. पी. मेनन चौकशी आयोग :–

महात्मा गांधीजीच्या वधानंतर कोल्हापूर संस्थानात जे अत्याचार झाले त्याच्याबद्दल ब–याच तक्रारी भारत सरकारकडे गेल्या त्यामुळे भारत सरकारच्या संस्थान खात्यास त्याची दखल घेणे आवश्यक बनले. त्यामुळे संस्थानी खात्याचे राजकीय सल्लागार व्ही. पी. मेनन यांची चौकशीसाठी नेमणूक केली गेली. व्ही. पी. मेनन हे १९४८ च्या मार्चच्या दुस–या आठवडयात चौकशीसाठी कोल्हापूरात आले. कोल्हापूरातील चौकशीनंतर भारत सरकारला बागल मंत्रीमंडळ बरखास्त करण्याची व संस्थानात प्रशासक नेमण्याची शिफारस केली. या विरूध्द माधवराव बागल यांनी पंडीत नेहरू, सरदार

पटेल इत्यादी कॉंग्रेस श्रेष्ठीना निषेधाच्या तारा पाठवून सरकारचा वरील निर्णय हा लोकशाही विरोधी असून सनदशीर नसल्याचे कळविले. याबद्दल काढलेल्या १९/०३/१९४९ च्या पत्रकात बागल नमूद करतात की ''मंत्री वाईट निघाले तर त्यांना काढून टाकण्याचा अधिकार जर कोणी काढून घेतला तर प्रतिकार करू, कोल्हापूर मुंबई प्रांतात सामील होता कामा नये. हिंद स्वराज्याचा ते स्वतंत्र घटक राहतील व तसा तो ठेवण्याचा आमचा अढळ निश्चय आहे.''[६]

कॅ.व्ही.पी.नंजाप्पा यांची कोल्हापूरच्या प्रशासकपदी नेमणूक :–

भारत सरकारने व्ही. पी. मेनन यांची शिफारस त्वरित स्विकारून बागल मंत्रीमंडळ बरखास्त केले आणि संस्थानचे प्रशासक म्हणून नाशिकचे कलेक्टर कॅ.व्ही.नंजाप्पा यांची २२ मार्च १९४८ रोजी नेमणूक केली. या नेमणूकीस शहाजीराजे यांनीही सहमती दर्शवली. प्रशासकाची नेमणूक ही कोल्हापूरच्या कायदेमंडळाच्या निवडणुकीपर्यंतच्या कालावधीसाठी केली होती. मात्र सरकारने कॅ. नंजाप्पावर प्रशासनाचेच काम सोपवले असे नाही तर संस्थानच्या विलीनीकरणाची प्रक्रिया अधिक वेगवान करण्याचीही जबाबदारी त्यांच्यावर सोपवली.[७]

सरकारच्या या निर्णयास प्रजापरिषदेतील बागल गटाचा जोरदार विरोध झाला. माधवराव बागलांनी या प्रसंगी बिंदू चौकातील जाहीर भाषणात काढलेले उद्‌गार त्यांची भूमिका स्पष्ट करणारे आहे. ते म्हणाले की, 'कोल्हापूरची लोकशाही टिकवण्यासाठी आम्हीही हिंद सरकारशी जरूर तर झगडा देवू, हिंद सरकारने आमच्यावर प्रशासक नेमण्याचा जो घाट घातला आहे तो लोकशाहीला कमीपणा आणणारा आहे.' दंगलीच्या बाबत त्यांच्यावर जे आरोप केले होते त्याबाबत ते म्हणतात की, ''महात्माजी निघून गेल्यावर बेभान झालेल्या जमावाकडून जाळपोळ सुरू झाली. मी सकाळी सातवाजल्या पासून ते संध्याकाळी साडेसात वाजेपर्यंत हिंडून जमावाला शांत राहण्याबाबत उपदेश करून जमाव आवरता येईल असे मला वाटत होते व तसे करणेच आपले कर्तव्य होते. त्या दिवशी जर गोळीबार केला असता तर हजारो लोक महात्माजीचे नाव घेत गोळीबाराला बळी पडले असते. मंत्र्याकडून हल्ला होवू नये म्हणून मी प्रयत्न करीत होतो. मंत्रीपद गेले तरी हरकत नाही पण गोळीबार नको होता. गोळीबार का केला नाही त्याचे खापर कोणावर फोडावयाचे असेल तर ते माझ्यावर फोडा, याबद्दल माधवराव बागलांना फाशी देणार असाल तर दया. पण मला कोल्हापूरची जालियानवाला बाग करावयाची नव्हती.''[८] मेनन यांनी आजरा, कागल, गडहिंग्लज इत्यादी ठिकाणांना भेटी देवून लोकांची मते जाणून घेण्याचा प्रयत्न केला. रत्नाप्पा कुंभाराच्या काही समर्थकांनी मेनन यांची भेट घेतली. परिस्थितीची पहाणी करून मेनन यांनी शहाजी छत्रपती यांच्याशी चर्चा केली व मंत्री मंडळ बरखास्त करून प्रशासक नेमण्याची भूमिका मांडली. मेनन यांच्या या भूमिकेला शहाजी महाराजांनी मान्यता दिली.[९] शहाजी महाराजांसमोर प्रशासक म्हणून पाच नावे ठेवण्यात आली पैकी कॅ. व्ही. नंजाप्पा यांची प्रशासक म्हणून नेमणूक करण्यास शहाजी महाराजांनी मान्यता दिली, बागलांनी मात्र प्रखर विरोध केला.

२२ मार्च १९४८ रोजी कॅ. नंजाप्पा यांची प्रशासक म्हणून नियुक्ती करण्यात आली. प्रशासक म्हणून कॅ. नंजाप्पा यांच्या नेमणूकीबाबत शहाजी छत्रपती यांचे राजकीय सल्लागार श्री लठ्ठे म्हणतात–''गांधीवादाच्यानंतरच्या परिस्थितीचा बागल मंत्रीमंडळाने गैररितीने फायदा करून घेतला. या मंत्रीमंडळाविरूध्द ब–याच तक्रारी होत्या म्हणून महाराजांनी आपणहून काही करावे अशी सरकारची इच्छा होती. त्या दृष्टिने महाराजांनी पावले टाकताच प्रजापरिषदेने महाराजांना सत्तेचा लोभ सुटत नाही व दंगल परिस्थितीचा फायदा घेवून ते मंत्रीमंडळ बरखास्त करत आहेत अशी ओरड चालू केली. हा आरोप टाळण्यासाठी महाराजांनी सर्व गोष्टी सरकारकडे सोपवल्या व त्यामुळेच प्रशासक आला. दरम्यानच्या काळात कुंभार विरूध्द बागल संघर्ष चालूच होता. ७ मार्च १९४८ रोजी रत्नाप्पा कुंभार यांनी प्रजापरिषदेची बैठक शाहुपूरीतील प्रभाकरपंत कोरगांवकर यांच्या घरी बोलावली. बैठकीचे अध्यक्ष शंकरराव माने होते. बैठकीला एकूण ९३ लोक हजर होते. पैकी काही बागल गटाचे देखील होते. या बैठकीत दोन महत्वाचे ठराव मंजूर करण्यात आले.

१. कोल्हापूर संस्थान भारतीय संघराज्यात विलीन करावे

२. प्रजा परिषदेचे अध्यक्षपदावरून बागलांना काढून रत्नाप्पा कुंभार यांना नेमावे

यावेळी रत्नाप्पा कुंभारानी उपस्थितांना आवाहन केले की, त्यांनी बागलांच्या नेतृत्वाखाली प्रजापरिषदेतून बाहेर पडावे. दुसरीकडे माधवराव बागलांनी पन्हाळयावर ९ मार्च १९४८ रोजी प्रजापरिषदेच्या कार्यकारी मंडळाची सभा बोलावली तिला १५३ पैकी ८४ सदस्य हजर होते. म्हणजेच बहुमत बागलांकडे होते त्यांनी माधवराव बागलांच्या अध्यक्षपदावर विश्वासदर्शक ठराव पास केला. १० मार्च रोजी प्रजापरिषदेच्या सभासदांची बैठक बोलाविली तिला ११५२ पैकी ७५४ सभासद हजर होते. या सभेत माधवराव बागलांनी जाहीर केले की, रत्नाप्पा कुंभारानी बोलावलेली ७ मार्चची सभा बेकायदेशीर होती. ती प्रजापरिषदेच्या घटनेनुसार नव्हती त्यामुळे रत्नाप्पा कुंभारानी स्वत:साठी जाहीर केलेले अध्यक्षपद बेकायदेशीर आहे. यानंतर १७ मार्च १९४८ ला माधवराव बागलांनी प्रजापरिषदेच्या कार्यकरिणीची सभा बोलावली व रत्नाप्पा कुंभार, ॲड. श्रेष्ठी, बगाडे, गोपाळ बकरे, शंकरराव माने इत्यादी १३ सभासदांची तीन वर्षासाठी प्रजापरिषदेतून हकालपट्टी करण्याचा ठराव पास केला.[१०]

कोयाजी आयोग :–

छत्रपती शहाजी महाराजांनी गांधीहत्येनंतर झालेल्या दंगलीची न्यायालयीन चौकशी करण्यासाठी न्यायमुर्ती कोयाजी यांची नियुक्ती केली. या कोयाजी आयोगाने १७/०६/१९४८ ते ०७/०९/१९४८ पर्यंत दंगलीचा गुप्तपणे आपला अहवाल तयार केला. त्यात छत्रपती शहाजी महाराजांनी नेमलेल्या श्री. एस्. के. माने, श्री. एस्. एन्. माने व श्री. एस्. आर. जाधव या तिन्हीही मंत्र्याना दंगलीच्या आरोपातून दोषमुक्त ठरवले. तर प्रजापरिषदेने नेमलेल्या बागल मंत्रीमंडळातील चारही मंत्र्यांना दंगलीसाठी दोषी ठरवले. त्यांच्यावर दंगलीला प्रोत्साहन देवून गुंडाच्या गुन्ह्यांकडे बुध्दीपुरस्कर कानाडोळा केला असा आरोप केला. भाई माधवराव बागलांनी ब्राह्मणविरोधी भावना भडकावल्यामुळे गांधी हत्येनंतर दंगलीत फक्त ब्राह्मणांची हानी झाली असे कोयाजी आयोगाने मत मांडले. परंतु माधवराव बागलांनी हे आरोप निराधार व असत्य असल्याचे जाहीर करून कॅ. नंजाप्पा यांनी कोल्हापूरात कसा अन्याय चालविला आहे याचा सविस्तर वृतांत देणारी पत्रे सरदार पटेल, पट्टाभिसितारामया इत्यादी नेत्यांना पाटविली. पण असे दिसते की, कॅ. नंजाप्पानी भारत सरकारच्या आदेशानेच कडक धोरण स्विकारले होते. त्यामुळे माधवराव बागलांच्या अर्ज विनंत्यांचा काही परिणाम दिसून आला नाही.[११]

अशा प्रकारे गांधीजीच्या हत्येनंतर कोल्हापूर संस्थानात मोठया प्रमाणात राजकीय बदल घडून आला. माधवराव बागल मंत्रीमंडळाला आपली सत्ता गमवावी लागली. तसेच पुढील कालखंडात कोल्हापूर संस्थान विलीनीकरणाची प्रक्रिया भारत सरकारने जोमाने राबविली. ०१ मार्च १९४९ मध्ये कोल्हापूर संस्थान भारत सरकारमध्ये विलीन झाले. शाहू खासबाग मैदानात तत्कालिन पंतप्रधान बाळासाहेब खेर यांच्या उपस्थितीत विलीनीकरणाचा सोहळा पार पडला. या सोहळयास अनेक मान्यवर व ७५ हजार लोकांचा जनसमुदाय जमला होता.[१२]

संदर्भसूची :–

१. गर्गे स. मा. करवीर रियासत, पुणे, २००३, पृ. ६३५.

२. बागल माधवराव, जीवन प्रवाह, १९५६, पृ. १४८ – १५२.

३. देसाई के. एम., प्रा.एम.आर.देसाई चरित्र ग्रंथ, गोखले कॉलेज, कोल्हापूर, १९८६, पृ. २४६.

४. दै. पुढारी, २ फेब्रुवारी १९४८.

५. गर्गे स.मा., उपरोक्त, पृ. ६१५.

६. पटवर्धन वि.अ., दक्षिण महाराष्ट्रातील संस्थान विलीनीकरणाची कथा, पुणे, १९६५, पृ. १००.

७. Menan V. P., The Story of integration of Indian States, Oriental, Bombay, 1960, Page- 209.

८. गर्गे स. मा., उपरोक्त, पृ. ६३६.

९. Kolhapur Archival file No- 461., Secret letter of Police Superintend to Diwan, 19/03/1948.

१०. फडके य. दी., आण्णासाहेब लठ्ठे, श्री विद्या प्रकाशन पुणे, १९८९, पृ. २६९.

११. न्या. ना. कोयाजी यांच्या अहवालाचा सारांश, कोल्हापूर सरकारी मुद्रणालय, कोल्हापूर, ऑक्टोबंर १८४८.
दै. सत्यवादी, दि. ०२ मार्च १९४९.

15. Indian economy under Colonial Rule

Dr. Arati B. Nadgouda
Dept of History
Devchand college, Arjunnagar.

Introduction

The disintegration of the Mughal empire in the 18th century inevitably brought about economic fragmentation and disruption. The continuous conflicts and wars between host of rival Indian princes disrupted economic activity. New agencies of pillage and plunder sprang up. Cultivation was adversely affected. European trading companies dabbled in politics and profited from the administrative and political confusion.

Self-Sufficient village communities.

The most outstanding feature of the Indian village economy was the existence of self-sufficient and self-governing village communities. Village economy was self-subsisting, providing the foodstuffs it needed except perhaps a few necessities like salt and iron. Another marked feature was the union of agriculture and handicraft industry. The family of the peasant undertook spinning and weaving as a secondary activity and produced the cloth needed for the family. The other economic needs were also provided by village craftsmen like the carpenter, the goldsmith, the potter, the blacksmith, the oil-presser, etc. who in effect were servants of the village and revived a customary share in the village crops for their services. The land in the village belonged to the cultivating community, each family having its share of arable land. Since population was small and land more plentiful than at present land was not an article of free purchase or sale It did not become a commodity. Karl Marx described this communal ownership of land as the Indian form of communism. The village communities were self-governing . The village Panchayat administered the village affairs, settled disputes and administered justice. The village Headman was its leader in dealing with the government. The urban economy of India presented a better picture. Indian handicrafts enjoyed worldwide renown. The cotton manufactures of Bengal (Dacca), Gujarat (Ahmedabad) and Masaulipatam; the silk fabrics of Murshidabad, Lahor and Agra; woolen shawls and carpets of Agra, Lahore and Kashmir were in demand both in India and abroad. India also had a very favourable balance of trade and enjoyed the reputation of being the sink of gold and silver.

Three phases of Economic Exploitation:

R.P. Dutt a Marxist dialectician and scholar has analyzed three periods in the history of imperialist rule in India .i) Period of merchant capital(mercantitilism) from 1757 to the end of 18th century.ii) Period of Industrial Capital (Free Trade Capitalism) developed during the 19th century and iii) Period of Finance Capital –from the closing decade of 19th century to 1947. Dutt rightly points out that each stage developed out of the conditions of the earlier stage and the different modes of colonial exploitation overlapped; old forms of colonial exploitation never entirely ceased but got integrated into new patterns of exploitation.

The Drain of Wealth

The constant flow of wealth from India to England for which India did not get an adequate economic, commercial or material return has been described by Indian national leaders and economists as drain of wealth from India. The drain of wealth was interpreted as an indirect tribute extracted by imperial Britain from India year after year. In the mercantilist concept an economic drain takes place if gold and silver flow out of the country as a consequence of an adverse balance of trade. After Plassey the situation was reversed and the drain of wealth took an outward turn as England gradually acquired monopolistic control over the Indian economy. From 1813 onwards economic drain took the from of unrequited exports. Barring a few exceptional years, favorable balance of trade had been the normal feature of our foreign trade till the outbreak of World War II. The Indian administration was in British hands and was conducted in a manner to subserve the interests of England.

Estimate of Economic Drain

Scholarly estimates about the drain of wealth from India widely differ depending on the period under review and the method of calculation employed. Dadabhai Naoroji described the drain of wealth as the evil of all evils and the main cause of Indian poverty. The drain of wealth checked and retarded capital accumulation in India, thereby retarding the industrialization of India. Indian products and treasure drained to England without adequate return was of great help in creating condition in that country conducive for the growth of British factory industry in the early stage of the industrial revolution. In the historical perspective the Drain of wealth theory highlighted the foreign and exploitative character of British rule in the languages within the comprehension of the average Indian. During our Freedom Struggle the Drain theory became a convenient slogan for any damnation of British colonial rule in India.

Deindustrialization : Decline of Indian Handicrafts.

During the first half the 19th century or even up to 1880 India's economy witnessed a strange phenomenon. While western countries were experiencing industrialization. India suffered a period of industrial decline. This process has been described as de-industrialization. India's traditional handicraft industry decayed beyond recovery. The period of decline of Indian handicraft was contemporaneous with the firm foundation of the Industrial Revolution in England and England's tight control over the strings of Indian economy.

 ISBN 978-93-5212-145-8

Ruralization of Indian Economy

With de-industrialization, Indian economy tended to become more and more agricultural. Millions of manufacturing classes in industrial towns like Decca. Murshidabad, Surat and other places were rendered jobless and drifted from towns to villages for a livelihood. This increasing dependence of the population on agriculture for subsistence and slant of the Indian economy on production of agriculture goods and raw materials to the neglect of industrial development has been described as a trend towards realization or peasantization of the Indian economy. British writers of the 19th and 20th centuries took pride in describing India as traditionally an agricultural country. Industrialized British desired the development of the vast potential of India's agricultural resources. However a possible snag was the poor quality of Indian raw material. To make good this deficiency the British nationals needed to be given permission for free entry and settlement in India. The over-pressure on agriculture created serious distortions in Indian economy apart from creating serious problem in the agrarian sector. The stagnation in Indian agriculture production amidst increasing population accounted for recurring famines and increasing poverty in the 19th and first quarter of the 20th century.

Commercialization of Indian Agriculture

In the latter half of the 19th century another significant trend in Indian agriculture was the emergence of the commercialization of agriculture. So far agriculture had been a way of life rather than a business enterprise. Now agriculture began to be influenced by commercial considerations i.e. certain specialized crops began to be grown not for consumption in the village but for sale in the national and even international markets. Commercial crops like cotton, jute, groundnuts, oilseeds, sugarcane, tobacco, etc. were more remunerative than food grains. Again, the cultivation of crops like condiments, spices, fruits and vegetables could cater to a wider market. Perhaps, the commercialization trend reached the highest level of development in the plantation industry i.e. in tea, coffee, rubber, etc. which were all produced for sale in a wider market. For the Indian peasant commercialization seemed a forced process. Thus, the cultivator hardly emerged better from the new commercialization development.

Rise of Modern Industry :

The British rulers of Indian did not conceive of an industrialized. India much less plan for her industrialization. Rather the British rulers deliberately followed policies to de-industrialize India and convert it and preserve it as agriculture farm of industrialized Britain. However compulsion of maintaining imperial control over the country and its through economic exploitation led Britain to construct roads, railways, posts and telegraph lines, develop ports, irrigation works banking exchange and insurance facilities etc. development which provided the material basis for the beginning of modern industry in India. Indian traders, money –lenders and bankers had amassed some wealth as junior partners of English merchant capitalists in India. Their role fitted in the British scheme of colonial exploitation. The Indian money lender provided loans to hard-pressed agriculturists and thus facilitated the state collection of land revenue; the loans also made possible the marketing of agricultural products the Indian trader carried imported British products to the remotest corners of India and also helped in the movement of Indian agricultural products to the ports for export to the European market.

Impact of First and Second World War :

The first World War proved a boon for Indian industrialists and gave Indian industries some sort of a protection against foreign competition. Foreign imports fell to a very low level while there was increase in government purchases for war purposes. Further, export of raw material became less which kept down there prices to the advantage of Indian industrialists. Again, wages did not rise much. All these advantages made possible fabulous profits during the war. The Second World War brought a period of scarcity and famine conditions for the general population but a period of super profits for the Indian businessman the near stoppage on industrial import amidst large-scale war requirements created especially favorable circumstances for the growth and consolidation of Indian capitalism. The unscrupulous producers and traders added to their profits through speculation, hoarding and black-marketing.

Conclusion

A century and half of British rule in India has left behind a legacy of extreme poverty and economic backwardness both in the agricultural and industrial sectors. When the British withdrew from India in 1947 they left behind the world's most refractory land problem-hierarchy of land rights, insecurity of tenure, primitive techniques of cultivation, low per acre yield, fragmented agricultural holding, money lenders in control of credit and marketing of crops investments in agriculture very shy. The British left behind a poor people with low per capita income.Thus when Britain quit India in 1947, it left behind an economy reeling under centuries of colonial exploitation and guided underdevelopment.

REFERENCES

1. Anstey, Vera 'Economic Development of India',Longmans,Green and Co,1929.
2. Digby, William ' Prosperous British India', London 1901.
3. Dutt, R. C. 'Economic History of India' ,vol ;2,London 1904.
4. Gadgil D.R ' The Industrial Evolution of India in Recent Times',Oxford univesitypress,1929.
5. Kumar Dharma 'Cambridge Economic History of India' vol 2, Cambridge university,1983.
6. Morris D Morris 'Indian Economy in the Nineteenth Century' Delhi, 1969.
7. Pavlol V. I. 'The Indian Capitalist Class: A Historical Study'Delhi,1999.
8. Singh V.B.' Economic History of India 1857-1956'Bombay 1965.
9. Tomlinson, B. R.:'The Political Economy of the Raj, 1914-47'Macmillian publisher,1979.

16. "फलटण संस्थानच्या ऐतिहासिक कागदपत्रांचा आढावा" (१८२०-१९४८)

प्रा. डॉ. एस. एम. गावडे
इतिहास विभाग प्रमुख,
मुधोजी महाविद्यालय, फलटण. जि. सातारा

फलटण संस्थान हे दक्षिणेतील संस्थानापैकी एक प्राचीन संस्थान असून त्याचा प्रारंभ १३ व्या शतकात झालेला आहे. राजपुतान्यातील सुप्रसिध्द परमार (पवार) या रजपुत घराण्यातील निंबराज नावाचा पुरूष इ.स.१२७० च्या सुमारास दक्षिणेत येऊन शंभु महादेवाच्या डोंगराच्या पायथ्याशी काही काळ राहून तेथून तो फलटणच्या पुर्वेस ९ मैलावर असलेल्या निंबळक गावी राहू लागला. तेथील निंबजाई देवीची उपासना करून इ.स.१२८४ मध्ये त्याने स्वपराक्रमाने आसपासच्या मुलखात स्वतंत्र राज्य स्थापन केले. निंबळक गावावरूनच फलटणच्या राजघराण्याचे नाव निंबाळकर असे पडले. अशा या नाईक निंबाळकर घराण्यात एकूण २५ राज्यकर्ते होऊन गेले. सन १२८४ ते १९४८ पर्यंत हे संस्थान अनेक राजकीय चढउतार व स्थित्यंतरे यातून गेले.[१] या घराण्याने १७ व्या व १८ व्या शतकात मराठी राज्यात मोलाची कामगिरी केली. पेशवेकाळात श्रीमंत मुधोजी तिसरे, श्रीमंत मालोजी तिसरे, श्रीमंत सगुणाबाई, श्रीमंत जानराव नाईक निंबाळकर यांनी महाराष्ट्र व कर्नाटक भागात अनेक मोहिमात भाग घेऊन मराठी राज्याची सेवा केल्याचे दिसून येते.

सन १८१८ ला पेशवाईचा अंत झाला आणि सर्व मराठी संस्थाने इंग्रजांचे मांडलिक बनले. फलटण संस्थानची स्थापना झाल्यापासून सुमारे ६६४ वर्षे या संस्थानाने आपले स्वतंत्र अस्तित्व राखले आहे. व आद्य संस्थानिकापासून ते शेवटचे संस्थानिक श्रीमंत मालोजीराजे यांच्यापर्यंत एकाच घराण्याकडे हे संस्थान चालत आले आहे. पुष्कळ वेळी या संस्थानाला निरनिराळ्या प्रसंगातून जावे लागले. तरी मुळचे राजघराणे बदलले नाही. येथील अधिपतींना वेळोवेळी दिल्ली, विजापूर व सातारा येथील राज्यकर्त्यांचे मांडलिकत्व पत्करून त्यांच्यापासून सनदा मिळवाव्या लागल्या. परंतू ब्रिटीश सत्तेची स्थापना झाल्यापासून ही स्थिती पालटली व सार्वभौम सत्तेशी येणाऱ्या संबंधाला निश्चित व व्यवस्थित स्वरूप प्राप्त झाले. दि.२२ एप्रिल १८२० मध्ये फलटण संस्थान व ब्रिटीश सत्ता यांच्यात तहनामा झाल्यापासून हे संस्थान मुंबई सरकारच्या अधिपत्याखाली होते. १ एप्रिल १९३३ पासून हे संस्थान हिंदुस्थान सरकारकडे गेले. फलटण संस्थान व हिंदुस्थान सरकार यांचे संबंध अतिशय सलोख्याचे असल्याने संस्थानात प्रजेच्या हिताची अनेक कामे झाली आहेत. दक्षिणेतील संस्थाने यांची बाजू मांडण्याकरीता याच संस्थानचे अधिपती श्रीमंत मालोजीराजे हे जॉईंट पार्लमेंटरी कमिटीसाठी लंडनला दक्षिणी संस्थानची बाजू मांडण्यासाठी गेले होते. अशा या फलटण संस्थान व ब्रिटीश सरकार यांचे संबंध चांगले होते.[२] अशा महत्त्वपुर्ण फलटण संस्थानात ब्रिटीशकालीन अभ्यास करण्यासाठी अनेक ऐतिहासिक कागदपत्रे उपलब्ध आहेत. त्यामध्ये २३४ प्राथमिक संदर्भ साधने उपलब्ध आहेत. मी काही प्राथमिक संदर्भ साहित्यांचा आढावा घेतलेला आहे.

या प्राथमिक संदर्भ साधनांमध्ये फलटण संस्थानचे वार्षिक प्रशासकीय अहवाल फलटण स्टेट गॅझेट Aitchison C.U.A Collection of Treaties Engagements and sanads relating to India and neighbouring countries, मुंबई पुराभिलेखागार, पुना पुराभिलेखागार येथील काही कागदपत्रे फलटण दरबारातील रोजनिशी, सातारा गॅझेट फलटण तहशीलमधील काही कागदपत्रे ही महत्त्वपूर्ण कागदपत्रे आहेत. या प्रस्तुत शोधनिबंधामध्ये मी काही प्राथमिक संदर्भ साधनांचा आढावा घेतलेला आहे.

१) फलटण संस्थानचे वार्षिक प्रशासकीय अहवाल:–

फलटण संस्थानच्या ब्रिटीशकालीन अभ्यास करण्यासाठी फलटण संस्थानचे वार्षिक प्रशासकीय अहवाल सन १८८६–८७ ते १९४६–४७ पर्यंतचे ५९ अहवाल उपलब्ध आहेत. या वार्षिक अहवालामध्ये संस्थानची भौगोलिक स्थिती, नाईक निंबाळकर घराण्याची माहिती, राजकीय घडामोडी, महत्त्वपूर्ण व्यक्तींच्या भेटी, संस्थान अधिपतींनी दिलेल्या देणग्या, संस्थानच्या जमाबंदी खात्याची माहिती, जमिनीची प्रशासन व्यवस्था, मोजणी क्षेत्रफळ, हवामान, पिके, पिकांचे दर, शेतसारा, पोलीस सैन्य, न्यायव्यवस्था, मुलकी व लष्करी न्यायालये, मामलतदार कचेरी, तुरूंग व कैदी, फलटण नगरपालिकेची व्यवस्था, नगरपालिकेचे उत्पन्न व खर्चाच्या बाजू, नगरपालिकेची व्यवस्था, सदस्यसंख्या निवडणूका, वेगवेगळया समिती पाणीपुरवठा, स्वच्छता, संस्थानातील जंगल, संस्थान अधिपतींनी केलेली लोकोपयोगी कामे, व्यापार आणि उद्योगधंदे, संस्थानातील पोस्ट ऑफिस, संस्थानची सामान्य माहिती व लोकांची सर्वसाधारण माहिती, संस्थानातील गावांची संख्या व लोकसंख्या, संस्थानचे उत्पन्न व खर्च संस्थानातील आरोग्यखाते, साथीचे रोग व उपाय फिरते दवाखाने, संस्थानातील शिक्षणाची व्यवस्था, संस्थानातील खेडेगावातील शाळा, सक्तीचे शिक्षण, स्त्रीशिक्षण, हायस्कुल शिष्यवृत्त्या, तज्ञ शिक्षकांची नेमणूक, महत्त्वाच्या व्यक्तींची शिक्षणखात्यास भेटी, शाळांचे निकाल, संस्थानचा शिक्षणावरील खर्च, संस्थान अधिपतींनी शाळांना दिलेल्या भेटी, त्यासाठी काढलेले दौरे, संस्थानातील प्रिटींग प्रेस, ग्रंथालये, वाचनालये यांची माहिती तसेच संस्थानाती सहकारी संस्था व चळवळ, सहकारी बॅक,

शेतीला अर्थपुरवठा करण्यासाठी संस्थानातील खेडेगावात सहकारी सोसायटया त्यांना केलेला अर्थपुरवठा, बिगरशेती सहकारी संस्था, कामगारांची संस्था, लहान उद्योजकांची सहकारी संस्था, सहकाराचा कायदा, अधिपतींनी केलेला अर्थ पुरवठा या संस्थांना अर्थतज्ञांच्या दिलेल्या भेटी, संस्थानच्या वेगवेगळया खात्यातील नोकरवर्ग, मुंबई, पुणे, सातारा येथील ब्रिटीश अधिकाऱ्यांनी दिलेल्या भेटींचा वृतांत, दक्षिणेतील संस्थानिकांनी फलटण संस्थानास दिलेल्या भेटी, अनेक इतिहासकार, अर्थतज्ञ, दिवाण, राजपरिवारातील सगेसोयरे यांच्या भेटीचा वृतांत, शिक्षणतज्ञ व सहकार क्षेत्रातील महत्वपूर्ण व्यक्तींच्या भेटी, ब्रिटीश सरकाला संस्थानाकडून दिलेला कर या सर्व गोष्टींची माहिती आपणास या वार्षिक प्रशासकीय अहवालात मिळते.[३]

२) मुंबई प्रांताचे प्रशासकीय अहवाल:—

मुंबई प्रांताच्या प्रशासकीय अहवालात थोडीबहुत माहिती संस्थाना संदर्भात मिळते. या अहवालात दक्षिणेतील सर्व संस्थानची माहिती मिळते. यामध्ये ब्रिटीशांना दिला जाणारा कर, संस्थानचे वार्षिक जमाखर्च, संस्थानचे उत्पन्न, खर्च, संस्थानची सरहद्द, लोकसंख्या, जमीन महसूल, बांधकामे, आरोग्य, पाण्याच्या सोयी, शिक्षण, नगरपालिका, संस्थान अधिपतींची माहिती इत्र माहिती यामध्ये आहे.[४]

३) फलटण दरबार आज्ञापत्रिका:—

फलटण संस्थानात सन १९१८ ते १९४८ पर्यंत फलटण दरबारामार्फत आज्ञापत्रिका प्रसिध्द केली जाई. प्रत्येक महिल्याला ही आज्ञापत्रिका काढली जाई. फलटण संस्थानच्या ऐतिहासिक अभ्यासासाठी फलटण स्टेट गॅझेट अतिशय महत्त्वाचे आहे. फलटण दरबार आज्ञापत्रिका ह्या ३० आहेत. या आज्ञापत्रिकेत सन १९१८ पासून अतिशय महत्त्वाची माहिती आहे. त्यामध्ये गुरांचे दवाखाने, लोकल बोर्ड, संस्थानातील युवराजांचे जन्मोत्सव, रयत लोकांची सभा, फलटण स्टोअर्स दुकान, संस्थानातील पावसाची पिकपाणी, बाजारभाव, हवामान, मोटार सर्व्हिस, कायदे कानू व नियम, शिष्यवृत्या, खेळांचे सामने, दि फलटण बॅकेची स्थापना, फलटण संस्थान कायदेमंडळ, साखरवाडी येथील साखरेच्या कारखान्याची माहिती सन १९३३ चा फलटण ॲक्ट, प्रवाशी भाडे, मोटार वाहन नियम, फलटण दरबारातील दिवाण व इतर अधिकाऱ्यांची माहिती, फलटण महिला मंडळाची माहिती, फलटण मधील मंदिरे, खेडेगावातील मंदिरे, रामरथ, यात्रा उत्सव, दसऱ्याच्या स्वाऱ्या, श्रीमंत मालोजीराजे यांची भाषणे, शेतकी खाते, कृषीप्रदर्शने, सातारा व कोल्हापूर, मुंबई येथील ब्रिटीश अधिकाऱ्यांच्या भेटी व त्यांनी संस्थानासंबंधी काढलेली उद्गार, फलटण संस्थानास मान्यवर व्यक्तींनी दिलेल्या भेटी महर्षी धोंडो केशव कर्वे यांचा संस्थानामार्फत साजरा केलेला ८२ वा वाढदिवस, फलटण शहरात असलेला राजवाडा, विमानतळ, कचेरी इमारत, शिवाजी वाचनालय, शाळेच्या इमारती, अनेक महत्वपूर्ण बांधकाम, रस्ते, घाट, पुल, धरणे, तलाव, फलटण संस्थान कायदेमंडळाच्या निवडणूकीचा इतिहास पध्दत, 'संयुक्त दक्षिणी संस्थान' याची माहिती, फलटण संस्थानातून गेलेला निरा उजवा कालवा, फलटण संस्थानाचा ब्रिटीश काळातील कोकण, इतर ठिकाणचा व्यापार, बाजारपेठ, सातारच्या छत्रपतींच्या संस्थानास दिलेल्या भेटी. संस्थान अधिपतींनी शिक्षण संस्थेस दिलेल्या देणग्या इ. सर्व माहिती आपणास या फलटण दरबार आज्ञापत्रिकेत मिळते[५]

वरील सर्व कागदपत्रे आपणास मुंबई, पुणे, सातारा, कोल्हापूर, औंध, विजापूर येथे उपलब्ध होतात. या कागदपत्रांशिवाय त्याकाळातील वृत्तपत्रे, स्मरणिका, मासिके, अनेक लेखकांची दुर्मिळ पुस्तके उपलब्ध आहेत. या सर्व कागदपत्रांच्यामुळे ब्रिटीश कालीन फलटण संस्थानची आपणास माहिती मिळते.

संदर्भसूची :—

१. फलटण संस्थानचा वार्षिक प्रशासकीय अहवाल सन १९३४—३५, पृ.३.

२. फलटण दरबार आज्ञापत्रिका १० फे.१९३५ पृ.३५.

३. फलटण संस्थानचा वार्षिक प्रशासकीय अहवाल सन १८९६—४७.

४. मुंबई प्रांताचे प्रशासकीय अहवाल सन १८६६ ते १९४१—४२.

५. फलटण दरबार आज्ञापत्रिका १० सप्टेंबर १९१८ ते १९४७.

17. राजर्षी शाहूंचे अस्पृश्यता निवारण विषय कार्य

प्रा. के. आर. गावडे
इतिहास विभाग प्रमुख, विश्वासराव नाईक कला, वाणिज्य आणि बाबा नाईक विज्ञान महाविद्यालय, शिराळा.

राजर्षी शाहू छत्रपतींनी २ एप्रिल १८९४ रोजी कोल्हापूर गादीची राज्यसुत्रे आपल्या हाती घेतली. त्यावेळी केसरीकार टिळकांनी 'करवीर क्षेत्री राजकीय कपिलाषष्ठीचा योग' या अग्रलेखात छत्रपती शाहूंना शुभेच्छा दिल्या. तो दिवस खरोखरीच केवळ कोल्हापूर संस्थानालाच नव्हे तर अखिल महाराष्ट्राला मंगलदायक ठरला. छत्रपती शिवाजी महाराजानंतरचा लोकाभिमुख, प्रजाहितदक्ष, जनतेस शहाणी करून सोडणारा, त्यांची 'अवनती थोपवून त्यांना उन्नतीकडे नेणारा असा राजा महाराष्ट्रात प्रथमच अवतरला. ते ज्ञानी व क्रियाशील होते. राजा असूनही रयतेमध्ये मोकळेपणाने फिरणारे होते. त्यांनी सर्व थरातील प्रजेचे जीवन जवळून पाहिले. अज्ञान, अंधश्रद्धा व दारिद्रय हे मानवाचे तीन मोठे शत्रू आहेत हे त्यांना ज्ञात होते. अस्पृश्य व्यक्तीच्या सावलीचाही विटाळ मानणारी विकृत विचारधारा मुळापासून उपटून टाकण्यासाठी त्यांनी आयुष्यभर आपल्या जीवाचे रान केले. राजर्षी शाहूंनी अस्पृश्यता निवारण करण्यासाठी पुढील कार्य केले.

१. अस्पृश्यांसाठी शिक्षण :–

अस्पृश्यांच्या वाटयाला आणलेल्या तिरस्कारामय जीवन हे त्यांच्या अज्ञानाचा एक भाग होते. हा अज्ञानमय अंध:कार त्यांच्या जीवनातून दूर होऊन त्यांना ज्ञानाचा प्रकाश मिळावा ते मानसिक गुलामगिरीतून मुक्त व्हावेत यासाठी त्यांनी 'अस्पृश्य मानलेल्या जातीत विद्या प्रसारक मंडळी' नावाची संस्था स्थापन करून भास्करराव जाधवास त्याचे प्रमुख केले.[१] अस्पृश्य विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी व राहण्यासाठी शाहूंनी कोल्हापूरात १९०८ साली 'मिस क्लार्क' हे वसतिगृह सुरू केले.[२] राजर्षी शाहूंनी अस्पृश्यांच्या शिक्षणासाठी केलेल्या खास प्रयत्नांचे उल्लेख त्यांच्या ६ निवडक आदेशात मिळतात. कोल्हापूरात चांभार, महार इ. अस्पृश्य लोकांसाठी असलेली 'रात्रीची शाळा' त्यांनी २८ नोव्हेंबर १९०६ च्या आदेशाने कायम केली.[३] ४ आक्टोंबर १९०७ च्या एका आदेशान्वये कोल्हापूरातील चांभार व ढोर या अस्पृश्य समाजातील 'मुलींच्या शाळेसाठी' मंजूरी देण्यात आली. तसेच त्या शाळेसाठी दरसाल रूपये ९६ खर्चाची तरतूदही संस्थानच्या स्त्री शिक्षणाच्या अंदाजपत्रकातून करण्यात आली.[४] भास्करराव जाधवांनी १९०९ साली स्थापन केलेल्या अस्पृश्यांच्या वसतीगृहास इमारतीसाठी जागा उपलब्ध करुन दिली.[५] राजर्षी शाहूंनी संस्थानातील सर्व अस्पृश्य वर्गास सर्व प्रकारचे शिक्षण मोफत करण्यात आल्याचा आदेश २४ नोव्हेंबर १९११ रोजी काढला.[६] दैनाअवस्थेतील अस्पृश्यांना शिक्षणासाठी उत्तेजन द्यावे म्हणून त्यांनी ७ एप्रिल १९१९ रोजी अस्पृश्यांच्या शिक्षणासाठी पुस्तके, पाटया, पेन्सिली मोफत देण्यासाठी अडीच हजार रुपये मंजूर केले.[७] तलाठी वर्गातील अस्पृश्य विद्यार्थ्यांसाठी त्यांनी एप्रिल १९१९ साली आठ रुपये शिष्यवृत्ती जाहिर केली.[८] राजर्षी शाहूंनी २४ सप्टेंबर १९१९ रोजी 'संस्थानातील अस्पृश्यांच्या स्वतंत्र शाळा बंद करुन त्यांना सरकारी शाळांतून इतर लोकांच्या मुलांप्रमाणेच दाखल करुन घ्यावे' असा आदेश केला. धाकटे पुत्र प्रिन्स शिवाजी यांच्या स्मरणार्थ शाहू राजांनी १९२० साली १०,००० रुपये गुंतवूण त्याच्या व्याजातून दरमहा पाच रुपये प्रमाणे आठ शिष्यवृत्या सुरु केल्या. त्यापैकी तीन शिष्यवृत्ती अस्पृश्य मुलींच्यासाठी ठेवल्या होत्या.[९] राजर्षी शाहूंच्या राज्यारोहणाच्यावेळेस संस्थानात अस्पृश्यांसाठी फक्त ५ शाळा होत्या. त्यामध्ये १६८ विद्यार्थी शिक्षण घेत होते तेच प्रमाण १९१२ साली अस्पृश्यांसाठी २७ शाळा पर्यंत गेले व त्यामध्ये ६३६ विद्यार्थी शिक्षण घेत होते.[१०] यावरुनच अस्पृश्यांच्या शिक्षणाच्या क्षेत्रात राजर्षी शाहूंनी केलेल्या धाडसी व क्रांतीकारी कार्याची कल्पना येते.

२. परिषदा व प्रबोधन :–

राजर्षी शाहू अस्पृश्यांच्यात जनजागृती करण्यासाठी सातत्याने झटत होते. अस्पृश्यांच्या अनेक परिषदा त्यांनी भरविल्या. त्या परिषदांचे अध्यक्षस्थानही त्यांनी भूषविले. अस्पृश्यांच्यात जनजाग?तीसाठी त्यांनी माणगाव ते दिल्ली आणि नागपूर ते हुबळी पर्यंत भाषणे दिली.मार्च १९२० च्या माणगाव येथील अस्पृश्यता निर्मूलन परिषदेत ते म्हणाले की, 'इतर देशात मनुष्याला मनुष्याप्रमाणे जसे वागवितात तसे आपल्या देशात वागविले पाहिजे तसे वागविल्याशिवाय देशकार्य कसे होणार? तोंडाने बडबडणारे पुढारी आम्हांस नको आहेत, कृतीने जातिभेद मोडून आम्हांस मनुष्याप्रमाणे वागवतील असे पाहिजेत.'[११] नाशिक येथे १५ एप्रिल १९२० रोजी श्री उदोजी मराठा विद्या वसतीगृहाच्या कोनशिला समारंभाच्यावेळी शाहू महाराज म्हणाले की, 'जातीभेद पाळणे हे पाप आहे. देशोन्नतीच्या मार्गात हा अडथळा आहे. हा दूर करण्याचे प्रयत्न जोमाने केले पाहिजेत.'[१२] शाहूंनी आपल्या भाषणाच्या माध्यमातून अस्पृश्यांच्यात जनजागृती केली. त्यांना आपल्या हक्कांची जाणीव करुन दिली.

३. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना मदत :–

राजर्षी शाहूंनी डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या कार्यास मोठे सहाय केले. त्यांनी आर्थिक सहाय देऊन डॉ.बाबासाहेब आंबेडकरांना 'मूकनायक'

नावाचे पाक्षिक काढण्यास मदत केली.[१३] डॉ.बाबासाहेब आंबेडकरांना १९२० साली उच्च शिक्षण घेण्यासाठी लंडनला जाण्याकरीता राजर्षी शाहूंनी आर्थिक सहाय केले.[१४] माणगांव येथे मार्च १९२० रोजी अस्पृश्यता निवारण परिषद शाहूंनी आयोजित केली. त्याचे अध्यक्षस्थान डॉ.बाबासाहेब आंबेडकरांना दिले.[१५] बाबासाहेब आंबेडकर हेच भावीकाळात अस्पृश्यांचे उद्धारक असतील आणि तेच तुमचे नेते असतील असा आशावाद व्यक्त केला.[१६] अस्पृश्य समाजाच्या मुलाने मिळवलेल्या ज्ञानाचा गौरव करण्यासाठी शाहूंनी कोल्हापूरात बाबासाहेबांची हत्तीवरुन मिरवणूक काढून साखर वाटली. सोनतळी कॅम्पवर बाबासाहेबांसमवेत सहभोजन घेतले. कोल्हापूरी जरीपटका देऊन गौरव केला.[१७]

४. असपृश्यता मुक्तीचे जाहिरनामे :–

अ. महार वतने रददबातले केली :–

महार वतनामुळे त्यांचे जीवन अत्यंत हलाखीचे बनले होते. ते सवर्णाच्या गुलामगिरीत कैद झाले होते. त्यांची यातून मुक्तता करण्यासाठी राजर्षी शाहूंनी कोल्हापूर संस्थानात १९१८ साली महारांची बलुते बंद केली.[१८] त्या जमीनी त्यांच्या नावावर रयतवारीने करुन दिल्या.[१९] कोल्हापूर संस्थानातील महारांची महाखतनाच्या गुलामगिरीतून मुक्तता केली.

ब. सरकारी व सार्वजनिक ठिकाणे असपृश्यांसाठी खुली :–

आपल्या संस्थानातून असपृश्यतेचे उच्चटन करण्यासाठी त्रूांनी अनेक जाहिरनामे काढले. १ जानेवारी १९१९ रोजी त्यांनी महसूल व न्याय खाते आणि आरोग्य विभागासाठी काढून अस्पृश्यता पाळण्यास मनाई केली.[२०] जानेवारी व ऑगस्ट १९१९ मध्येच विद्याखात्यासाठी ही जाहिरनामा काढला.[२१] राजर्षी शाहूंनी ६ सप्टेंबर १९१९ रोजी 'सर्व सार्वजनिक इमारती, धर्मशाळा, रेस्ट हासीस, सरकारी अन्नछत्रे वगैरे ठिकाणी व नदीचे पाणुते, सार्वजनिक विहिरी येथे कोणत्याही मनुष्य प्राण्याचा विटाळ मानण्याचा नाही.[२२] असा अस्पृश्यता निवारणाचा जाहिरनामा तमाम जनतेसाठी काढला. हे सर्व जाहिरनामे त्यांनी गॅझेट करुन घेतले. महार मांगदी अस्पृश्यांना दिलेल्या मानवी हक्कांच्या विरुद्धजे दंगेधोपे करतील त्यांना कडक शासन होईल असे फर्मानही काढले.

क. अस्पृश्यांना सरकारी सेवेत सामावून घेतले :–

राजर्षी शाहूंनी पाटलांच्या मुलांना त्यांच्या कारभाराचे ज्ञान देण्यासाठी इ.स.१९१३ ला 'पाटील शाळा' काढली तिचे नामकरण 'दिल्ली दरबार पाटील शाळा' असे झाले. २३ फेब्रुवारी १९१८ रोजी शाहूंनी कुलकर्णी वतने बंद करुन तलाठी पद्वत सुरु केली. महार समाजातील आणि इतर अस्पृश्य वर्गातील तरुणांना शाहू राजांनी तलाठी पदी नेमले.[२३] दत्तोबा पवारांची कोल्हापूर नगरपालिकेच्या स्थायी समितीच्या अध्यक्ष पदी नेमणूक केली.[२४] त्यांनी १९१७ साली संस्थानच्या लष्करी फडात चार अस्पृश्यांची नेमणूक केली. त्यापैकी दोघे महार होते तर दोघे मांग होते.[२५] त्यांनी अस्पृश्यांपैकी काहींची मुलकी खात्यात 'दप्तरबंद' म्हणून तर २० महारांच्या पोलीस म्हणून नेमणूका केल्या.[२६] शाहू महाराजांनी अस्पृश्यांच्या शिक्षणाचा बाऊ न करता त्यांना आपल्या आनेक खात्यात सामावून घेतले. सरकारी पागेत, हत्तीखान्यात, शिकारी खुतात, टपाल खात्रूात त्यांना संधी दिली. काहींना माहूत बनवले तर काहींना आपल्या राज परिवाराचे कोचमन / ड्राव्हर बनवले.[२७]

ड. अस्पृश्योद्धार : प्रत्यक्ष कृती कार्यक्रम :–

लोकांच्या मनातून शिवाशिव, उच्चनिच्चता ही भावना नष्ट व्हावी म्हणून राजर्षी शाहूंनी गंगाधर कांबळे या मुलास सत्यसुधारक हॉटेल काढून दिले.[२८] ते नेहमी तेथे चहा पिण्यास जात व आपल्या समवेत सर्व लोकांनाही सोबत नेत. ते महार, मांग, कातकरी, बुरुड यांना पंक्तीस घेऊन जेवत असत. त्यांच्या मडक्यातले पाणी ते पीत असत. ते त्यांना सोबत घेऊन दौरे करत असत.[२९] राजकन्या आक्कासाहेब यांच्या लग्नाच्या वरातीत १०८ साली कंबरेस तलवारी बांधलेले गाडया घोडयावरील रुबाबदार अस्पृश्य कोमननी व राजेशाही हत्तीवरील संस्थांनी पोशाखतील माहुतांनी आपल्याबरोबर समस्त अस्पृश्य समाजाचीही प्रतिष्ठा वाढवली होती. भंगी, महार व चांभार या जातीतील पैलवानांना त्यांच्या अस्पृश्यतेमुळे जोड मिळत नसे. तेव्हा शाहू महाराजांनी भंग्यांना 'पंडीत' महारांना 'जाट' तर चांभार पैलवानांना 'सरदार' ही नवीन नावे दिली.[३०] राजर्षी शाहूंनी संधी, योग्य शिक्षण व प्रोत्साहन मिळाल्यास कोणतेही लहान–मोठे काम करण्याची लायकी आपल्या समाजाचे अंगी आहे याची जाणीव त्यास व इतरांस ही करुन दिली.

सारांश :–

राजर्षी शाहूंचे अस्पृश्यता निवारणाचे कार्य अत्यंत क्रांतीकारी आहे. महाराष्ट्रातच नव्हे तर भारतातील इतर प्रांतातही अशी महान क्रांती पूर्वी घडली नव्हती. अस्पृश्य समजल्या जाणाऱ्या व्यक्ती तलाठी, वकील, नगरपालिकेच्या स्थायी समितीच्या अध्यक्षपदी नेमणे. त्यांना पैलवान करणे, पोलीस व दप्तरबंदी नेमणे हे दुर्मिळ क्रांतीमय दृश्य महाराष्ट्रातच दिसले. राजर्षी शाहूंनी शाळा, तलाव, रुग्णालये, कचेऱ्या, राजवाडा, राजांची पंगत ही

सर्व हरीजनांना नि गिरीजनांना खुली केली. त्यांची हजेरी व अवहेलना बंद करुन त्यांचे माणुसकीचे हक्क परत दिले. त्यांना सन्माने जगता यावे म्हणून नोकऱ्या दिल्या. धंदे काढण्यास उत्तेजन दिले. एका अस्पृश्यास उपहारगृह काढून देऊन त्या उपहारगृहात महारात स्वत: चहा घेऊ लागले. त्यांनी महार मांगाना माहूत व कोचमन म्हणून नेमले. राजकन्येच्या विवाहाच्यावेळी इतर नागरिकांबरोबर हरितनांनाही पाहुण्यांच्या आदरसत्काराची कामे देऊन त्यांनी त्या समारंभात त्यांना मिरवले. म्हणूनच त्यांच्या कार्याचा गौरव करताना धनंजय कीर म्हणतात, 'मानवी हक्काचा जाहिरनामा घोषित न करता दलितंना आणि पददलितंना त्यांचे मानवी हक्क परत देण्याची ही कृती म्हणजे युगप्रवर्तक धैर्याची नि कृतीशूरपणाची पताकाच होय'.

संदर्भ ग्रंथसूची :–

१. संपादक डॉ.पवार जयसिंगराव, राजर्षी शाहू स्मारकग्रंथ, महाराष्ट्र इतिहास प्रबोधिनी, कोल्हापूर व्दितीय आवृत्ती २००७ पृ.७२
२. कित्ता, पृ. ७३
३. कित्ता, पृ. ७४
४. कित्ता, पृ. ७४
५. कित्ता, पृ. ७४
६. कित्ता, पृ. ७४
७. कित्ता, पृ. ७४
८. कित्ता, पृ. ७४
९. कित्ता, पृ. ७४, ७५
१०. कित्ता, पृ. ८२
११. श्रीमन्ममहाराज शाहू छत्रपती सरकार करवीर यांची भाषणे पृ. ८६, ८७
१२. कित्ता, पृ. ९०, ९१
१३. संपादक डॉ.पवार जयसिंगराव उपरोक्त पृ. ९६
१४. कित्ता, पृ. ९८
१५. कित्ता, पृ. ९७
१६. जनता खास अंक एप्रिल १९३३ पृ. ४६
१७. संपादक डॉ. पवार जयसिंगराव उपरोक्त पृ. ९७
१८. कित्ता, पृ. ७९
१९. कित्ता, पृ. ७९
२०. कित्ता, पृ. ८१
२१. कित्ता, पृ. ८१, ८२
२२. कित्ता, पृ. ८२
२३. कित्ता, पृ. ८५
२४. कित्ता, पृ. ८५
२५. कित्ता, पृ. ८४, ८५
२६. कित्ता, पृ. ८५
२७. किर धनंजय, प्रेषित राजर्षी शाहू छत्रपती व्याख्यानमाला, डॉ इथापे उषा शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर मार्च १९७० पृ २३
२८. कित्ता, पृ. २५
२९. संपादक कुरणे दत्ताजीराव यशवंतराव, कै. राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या आठवणी पृ. ४६
संपादक, डॉ.जयसिंगराव पवार व शिंदे विजयराव, विजयी मराठा राजर्षी शाहू दर्शन विजयी मराठा, कोल्हापूर २०११ पृ. १३५

18. "कोल्हापूर संस्थानी राज्यातील सामाजिक परिस्थिती विशेष संदर्भ कुंभार समाज (१८२९-१८४७)"

प्रा. कुंभार रामचंद्र वसंत
इतिहास विभागप्रमुख,
राजर्षी छत्रपती शाहू कॉलेज, कोल्हापुर

प्रस्तावना :

इ.स.१७५७ च्या प्लासीच्या लढाईने बंगाल व पर्यायाने भारतात ब्रिटीश सत्तेचा पाया घातला. यानंतर ब्रिटीशांनी हळूहळू संपूर्ण भारतावर आपले वर्चस्व प्रस्थापित केले. भारतातील लहान मोठया अशा सर्वच राज्यांवर ब्रिटीशांनी आपले वर्चस्व स्थापन केले. ब्रिटीशांच्या वर्चस्वाखालील भारतातील राज्यांना संस्थानी राज्ये (Princely States) असे म्हटले जाते. कोल्हापूरचे राज्यही ब्रिटीश साम्राज्यातील एक संस्थानी राज्य (Princely State) होते. ब्रिटीश सत्तेचा भारताच्या सामाजिक, आर्थिक व राजकीय परिस्थितीवर जसा प्रभाव पडला तसाच तो कोल्हापूर राज्यावर पडल्याचे दिसते. कोल्हापूर राज्यातील सामाजिक परिस्थितीवर ब्रिटीश सत्तेचा कितपत प्रभाव पडला होता हे पहात असताना राज्यातील कुंभार समाजावरील ब्रिटीश सत्तेचा प्रभाव पहाणे व त्याचा कुंभार समाजाच्या सामाजिक स्थितीत झालेला बदल अभ्यासने हा प्रस्तुतच्या शोधनिबंधाचा उद्देश आहे.

कोल्हापूर संस्थानी राज्याचा पूर्वेतिहास :

कोल्हापूरला खूप प्राचीन इतिहास लाभलेला आहे. प्राचीन काळापासून आधुनिक काळापर्यंत कोल्हापूरवर अनेक राजघराण्यांनी राज्य केले. प्राचीन कोल्हापूचरचे व्यापारीसंबंध रोमन साम्राज्याशी असल्याचे ब्रम्हापूरीयेथे पंचगंगानदीकाठी झालेल्या उत्खननात मिळालेल्या रोमन नाण्यांवरून स्पष्ट होते. मध्ययुगीन कालखंडात कोल्हापूरवर बहामनी सत्तेचे व काही काळ आदिलशाहाचे वर्चस्व होते. इ.स.१६५९ मध्ये कोल्हापूरवर छ. शिवाजी महाराजांनी आपले वर्चस्व निर्माण केले. पुढे छ. संभाजीपुत्र शाहूची मुघल कैदेतून सुटका झाल्यानंतर मराठी स्वराज्यात वारसा युद्ध सुरू झाले. या वारसा युद्धामुळे इ.स.१७१0 मध्ये स्वराज्याचे विभाजन होऊन कोल्हापूर व सातारा अशी दोन राज्ये निर्माण झाली. सातारा राज्याचे अधिपत्य छ. शाहू महाराजांनी केले तर कोल्हापूरचे अधिपत्य महाराणी ताराबाईंनी केले. दि. १३ एप्रिल १७३१ च्या वारणेच्या तहाने कोल्हापूर राज्य स्वतंत्र व सार्वभौम राज्य म्हणून मान्य करण्यात आले[१]. इ.स. १८२९ मध्ये कोल्हापूर राज्य ब्रिटीश सत्तेच्या वर्चस्वाखाली आले. इ.स. १८२९ ते १९४७ पर्यंत कोल्हापूर राज्य ब्रिटीशांच्या भारतातील साम्राज्यातील संस्थानी राज्य (Princely State) होते[२]. १९व्या शतकाच्या शेवटी कोल्हापूर राज्याचे क्षेत्रफळ २,८५५ चौ.मैल होते. त्यामध्ये सात तालुके अथवा पेठा व पाच जहागिरी होत्या. २0 व्या शतकात कोल्हापूर राज्याच्या क्षेत्रफळात वाढ झाल्याचे दिसते. १९४१च्या प्रशासकीय अहवालानुसार कोल्हापूर राज्याचे क्षेत्रफळ ३,२२९.५ चौ.मैल होते व त्यामध्ये नऊजाहागिरी व बारा तालुके अथवा पेठा होत्या[३].

कोल्हापूर संस्थानी राज्यातील हिंदू समाजरचना :

भारतातील व महाराष्ट्रातील हिंदू समाजाप्रमाणे कोल्हापूर राज्यातील हिंदू समाजही चातुर्वर्ण व्यवस्थेमध्ये विभागलेला होता. त्यामुळे व्यक्तीचे सामाजिक स्थान त्याच्या जातीवरून न ठरता ती ज्या वर्णामध्ये मोडते यावरून ठरत होते. कोल्हापूर राज्यातील हिंदू समाजात ब्राहमण सर्वोच्च स्थानी होते तर त्याखालोखाल मराठा जातीचा क्रम लागत होता. त्यानंतर लिंगायत समाजाचे स्थान होते. लिंगायतांमध्ये वाणी व जंगम अशा पोटजाती होत्या. लिंगायत समाजानंतर गुरव व त्यानंतर बलुतेदार वर्गातील सुतार, कुंभार, धोवी, न्हावी हा एकाच श्रेणीतील समाज होता. पण त्यामध्ये श्रेष्ठ कनिष्ठ असा भेद होता. सर्वात उच्च कुंभार, सुतार, न्हावी, धोवी असा क्रम लावला जात होता. हे एकाच श्रेणीतील असले तरी एकमेकात रोटी बेटी व्यवहार होत नव्हते. हिंदू समाजरचनेच्या सर्वात शेवटी चांभार, ढोर, रामोशी, महार, मांग, व्हलर या जातीचे स्थान होते[४]. २0व्या शतकात कोल्हापूर राज्यातील हिंदू समाजरचनेत बदल झाल्याचे दिसून येते. १९0१च्या सेन्सस रिपोर्टनुसार कोल्हापूर राज्यातील हिंदू समाज पाच वर्गामध्ये विभागला होता. पहिल्या वर्गास ब्राहमण, दुसऱ्या वर्गास क्षत्रिय असे संबोधले जात होते, तर तिसऱ्या व चौथ्या वर्गाचे नाव सर्वसाधारण वर्ग (General Classes) असे देण्यात आले होते. सर्वात शेवटचा व पाचवा वर्ग अस्पृश्य (Unclean Castes) म्हणून ओळखला जात असे[५]. वरील पाच वर्गांशी निगडीत व्यक्तीचे सामाजिक स्थान होते. १९३१च्या सेन्सस रिपोर्टनुसार कोल्हापूर राज्यातील हिंदू समाज चारच वर्गांमध्ये विभागला होता. पहिला वर्ग प्रगत वर्ग (Advanced Class), दुसरा मध्यम वर्ग (Intremediate Class), तिसरा मागास वर्ग (Backward Class) व चौथा अतिमागास/दरिद्री वर्ग (Depressed Class) अशी वर्गवारी करण्यात आली होती[६].

कोल्हापूर संस्थानी राज्यातील कुंभार समाजाचा सामाजिक दर्जा :

कोल्हापूर राज्यात कुंभार हा मातकाम करणारा बलुतेदारांपैकी समाज होता. १९व्या शतकात कुंभाराचे सामाजिक स्थान हिंदू समाजरचनेत ब्राहमण, मराठा, लिंगायत, गुरव समाजानंतर पाचव्या क्रमांकावर होते[७]. कोल्हापूर राज्यात कुंभारांच्या लिंगायत कुंभार व मराठा कुंभार अशा दोन जाती[८] आढळत होत्या. दोन्ही जातींमध्ये रोटीबेटी व्यवहार होत नव्हते. तसेच दोन्ही जातीच्या रूढी परंपरा भिन्न होत्या. मराठा कुंभार लिंगायत कुंभारापेक्षा संख्येने जास्त होते. १९व्या शतकात लिंगायत व मराठा कुंभारांचा सामाजिक दर्जा सारखाच होता. परंतू २0व्या शतकाच्या सुरूवातीला लिंगायत व मराठा कुंभारांच्या सामाजिक दर्जात फरक केला होता. १९0१ च्या सेन्सस रिपोर्टनुसार कोल्हापूर राज्यातील हिंदु समाजरचनेमध्ये लिंगायत कुंभारांचा

समावेश दुसऱ्या म्हणजे क्षत्रिय वर्गामध्ये केला होता तर मराठा कुंभारांचा समावेश तिसऱ्या म्हणजे सर्वसाधारण वर्गामध्ये (General Classes) करण्यात आला होता[९]. थोडक्यात १९0१च्या सेन्ससनुसार लिंगायत कुंभाराचे सामाजिक स्थान मराठा कुंभारापेक्षा उच्च होते. मात्र १९३१च्या सेन्ससमध्ये लिंगायत व मराठा कुंभारांचे सामाजिक स्थान सारखेच दर्शविण्यात आले होते. १९३१च्या सेन्ससमध्ये मराठा व लिंगायत या दोन्ही कुंभार जातींचा समावेश दुसऱ्या वर्गामध्ये म्हणजेच मध्यम वर्गामध्ये (Intremediate Class) करण्यात आला होता[१0]. थोडक्यात कोल्हापूर राज्यातील लिंगायत कुंभार व मराठा कुंभार जातींचे सामाजिक स्थान ब्राहमण, मराठा जातींप्रमाणे उच्चही नव्हते तसेच त्यांचा समावेश मागास जातींमध्येही करण्यात आला नव्हता.

कोल्हापूर संस्थानी राज्यातील लोकसंख्यावाढ व कुंभार समाज ः

कोल्हापूर राज्यातील कुंभार समाजाची लोकसंख्या एकूण लोकसंख्येच्या एक टक्का असल्याचे दिसते. १९0१च्या सेन्ससनुसार कोल्हापूर राज्यातील कुंभारांची संख्या ११,४६0 होती तर त्यावेळी कोल्हापूर राज्याची एकूण लोकसंख्या ९,१0,0११ होती. म्हणजेच १९0१मध्ये कोल्हापूर राज्यात कुंभारांची संख्या १.२५% होती. कोल्हापूर राज्यातील कुंभार समाजाच्या लोकसंख्येपैकी ५७८६ पुरूष व ५६७४ स्त्रिया होत्या. याचा अर्थ १९0१मध्ये कोल्हापूर राज्यातील कुंभार समाजात हजार पुरूषांमागे स्त्रियांचे प्रमाण ९८0.६४ इतके होते. याचवेळी कोल्हापूर राज्यातील एकूण लोकसंख्येचा विचार करता हजार पुरूषांमागे स्त्रियांचे प्रमाण ९७४.५३ (४,६0,८७४ पुरूष व ४,४९,१३७स्त्रिया) होते[११]. १९२१च्या सेन्ससनुसार कोल्हापूर राज्याची एकूण लोकसंख्या ८,३३,७२६ होती तर राज्यातील कुंभार समाजाची संख्या ७,६२४ होती. १९0१च्या तुलनेत १९२१मध्ये कोल्हापूर राज्याची लोकसंख्या ८.३३% कमी झाली तर कुंभार समाजाची लोकसंख्या ३३.४७% कमी झाल्याचे दिसते. १९२१मध्ये एकूण लोकसंख्येमध्ये स्त्रिपुरूष प्रमाण हजार पुरूषामागे ९४५.४८ स्त्रिया (४,२८,५४३पुरूष व ४,0५,१८३स्त्रिया) होते तर कुंभार सामाजात स्त्रिपुरूष प्रमाण हजार पुरूषामागे १0१२.२१ स्त्रिया (३,७८९पुरूष व ३,८३५स्त्रिया)होते[१२]. १९३१च्या सेन्ससनुसार कोल्हापूर राज्याची एकूण लोकसंख्या ९,५७,१३७ होती तर राज्यातील कुंभार समाजाची संख्या ७,४७१ होती. १९२१च्या तुलनेत १९३१मध्ये कोल्हापूर राज्याची लोकसंख्या १४.८0% वाढली तर कुंभार समाजाची लोकसंख्या मात्र २.५३% कमी झाल्याचे दिसते. १९३१मध्ये एकूण लोकसंख्येमध्ये स्त्रिपुरूष प्रमाण हजार पुरूषामागे ९५२.0१ स्त्रिया (४,९0,३३६पुरूष व ४,६६,८0१स्त्रिया) होते तर कुंभार सामाजात स्त्रिपुरूष प्रमाण हजार पुरूषामागे १0२0.२८ स्त्रिया (३,६९८पुरूष व ३,७७३स्त्रिया) होते[१३].

कोल्हापूर संस्थानी राज्यातील शैक्षणिक स्थिती व कुंभार समाज ः

कोल्हापूर राज्यातीलशैक्षणिक स्थिती फारशी चांगली नव्हती. मात्र राजर्षीछ. शाहूमहाराजांच्या पुरोगामी धोरणांमुळे कोल्हापूर राज्याच्या शैक्षणिक विकासास सुरूवात झाली. २0व्या शतकाच्या सुरूवातीला कोल्हापूर राज्यातील इतर समाजांप्रमाणे कुंभार समाजातील लोकही शिक्षण घेऊ लागले. सन १८५४च्या ग्रॅहॅमच्या अहवालानुसार असे दिसून येते की, १९व्या शतकात कोल्हापूर राज्यात शिक्षण पारंपारिक पद्धतीने दिले जात असे. वडिलांचा धंदा मुलाने शिकून घेणे आणि चालविणे हाच शिक्षण प्रकार सर्वमान्य होता. आधुनिक शिक्षण उच्चवर्गियांपैकी हाताच्या बोटावर माजण्याइतपत लोकांनी घेतले होते. कोल्हापूरात ब्रिटीश सरकारच्या मदतीने काही शाळा सुरू करण्यात आल्या होत्या. मात्र शाळेची फी न परवडणारी होती. मराठी माध्यमाच्या शाळेची फी महिना एक आणा होती तर इंग्रजी माध्यमाच्या शाळेची फी महिना आठ आण्यापासून एक रूपयापर्यंत होती. १८५४मध्ये कोल्हापूर संस्थानात सरकारी शाळा १0 होत्या व त्यात ४६६ मुले शिकत होती. याशिवाय कोल्हापूर संस्थानात १२२ खाजगी शाळा होत्या व त्यातून १८२८ मुले शिक्षण घेत होती. कोल्हापूरात मुलींची पहिली शाळा १८५३साली सुरू झाली. १८५५मध्ये मुलींच्या शाळेत ९0मुली शिक्षण घेत होत्या. १८५९साली कोल्हापूर संस्थानातील सरकारी शाळांची संख्या १७ पर्यंत गेली व विद्यार्थीसंख्या १२शेच्या वर गेली होती[१४]. १९व्या शतकाच्या शेवटी कोल्हापूर राज्यातील शाळांची संख्या २२७पर्यंत पोहोचली व त्यामधून शिक्षण घेणाऱ्या मुलांची संख्या १४हजार पर्यंत गेली होती. तर साक्षरतेचे प्रमाण पुरूष ७.६% व स्त्रि 0.१५% होते. त्यावेळी साक्षरतेचे प्रमाण सर्वात जास्त ब्राहमण पुरूषांचे ७९.१% होते. मराठा पुरूष साक्षरतेचे प्रमाण ८.६%, मुसलमान पुरूष साक्षरतेचे प्रमाण ७.५% तर कुणबी पुरूषसाक्षरतेचे प्रमाण १.५% होते. याकाळात स्त्रियांची शैक्षणिक स्थिती फारच वाईट होती. सर्वात जास्त साक्षरतेचे प्रमाण ब्राह्मण स्त्रियाचे होत तेही फक्त १.६५% इतके कमी होते. मराठा स्त्री साक्षरता 0.0३%, मुसलमान स्त्री साक्षरता 0.0३% व कुणबी स्त्री साक्षरता 0.0४% होती[१५].

२0व्या शतकात कोल्हापूर संस्थानातील शैक्षणिक परिस्थितीमध्ये सुधारणा झाल्याचे दिसते. १९३१च्या सेन्ससनुसार कोल्हापूर संस्थानातील साक्षरतेचे प्रमाण ६.६१% होते. मात्र स्त्रियाच्या साक्षरतेचे प्रमाण पुरूषापेक्षा फारच कमी होते. १९३१मध्ये स्त्रियांच्या साक्षरतेचे प्रमाण फक्त १.१३% होते तर त्यावेळी पुरूषांच्या साक्षरतेचे प्रमाण ११.८२% होते. कोल्हापूर संस्थानातील एकूण लोकसंख्येच्या तुलनेत कुंभार समाजाची शैक्षणिक स्थिती फारशी चांगली नव्हती. कुंभार समाजाच्या साक्षरतेचे प्रमाण १९३१मध्ये ३.0६% म्हणजे एकूण लोकसंख्येच्या साक्षरतेच्या निम्म्यापेक्षा कमी होते. याचवेळी कुंभार समाजातील पुरूषांच्या साक्षरतेचे प्रमाण ६.११% तर स्त्रियांच्या साक्षरतेचे प्रमाण 0.0७% होते[१६]. थोडक्यात २0व्या शतकात कोल्हापूर संस्थानातील कुंभार समाजातील स्त्रियांची शैक्षणिक स्थिती पुरूषांपेक्षा फारच वाईट होती.

कोल्हापूर संस्थानी राज्यातील स्त्रियांची स्थिती व कुंभार समाज ः

कोल्हापूर संस्थानातीलस्त्रियांची स्थिती फारशी चांगली नव्हती . १९व्या शतकात कोल्हापूर संस्थानामध्ये कुलस्त्री, नायकीण व वैश्या असे तीन स्त्रीयांचे वर्ग होते . उच्च वर्गातील बहुपत्निकत्वाची पद्धत, हुंडा पद्धती, बालविवाह यामुळे स्त्रीच्या दर्जावर अनिष्ट परिणाम होत होता . कोल्हापूर संस्थानात बालविवाहाची पद्धत प्रचलित होती . मुलाचे लग्न १२१५ वर्षाचा असताना व मुलीचे लग्न ८१० वर्षाची असतानाच केले जाई . विधवा स्त्रीला अपमानास्पद वागणूक दिली जाई . जरठकुमारी विवाहसुद्धा होत असत .उच्च वर्गीय स्त्रिया घराबाहेरही पडत नसत . शेतकरी वर्गातील स्त्रीया पुरूषांच्यावरोवरीने शेतात कामे करीत . कुंभाराची वायको कुंभारकामामध्ये त्याला मदत करीत असे[१७] . कोल्हापूर संस्थानातील स्त्रीयांची शैक्षणिक स्थिती फारशी चांगली नव्हती . १९३१च्या सेन्ससनुसार कोल्हापूर संस्थानातील पुरूषांची साक्षरता ११ .८२% होती तर स्त्रीयांची साक्षरता केवळ १ .१३% होती .कोल्हापूर संस्थानातील कुंभार समाजातील स्त्रीयांची शैक्षणिक स्थिती तर फारच वाईट होती . १९३१च्या सेन्ससनुसार कुंभार समाजातील पुरूषांची साक्षरता ६ .११% होती तर स्त्रीयांची साक्षरता ० .०७% इतकी कमी होती[१८] .

निष्कर्ष ः

कोल्हापूर संस्थानातील हिंदू समाजरचना १९व्या शतकात चातुर्वर्ण व्यवस्थेवर आधारलेली होती . त्यामुळे व्यक्तीचे सामाजिक स्थान त्याच्या जातीवरून न ठरता ती ज्या वर्णामध्ये मोडते यावरून ठरत होते .कोल्हापूर राज्यातील कुंभार समाजाचे सामाजिक स्थान ब्राहमण, मराठा जातींप्रमाणे उच्चही नव्हते तसेच त्यांचा समावेश मागास जातींमध्येही करण्यात आला नव्हता .कोल्हापूर राज्यातील कुंभार समाजाची लोकसंख्या एकूण लोकसंख्येच्या एक टक्का होती . म्हणजेच कोल्हापूर राज्यातील कुंभार समाज अल्पसंख्याक होता . मात्र कोल्हापूर राज्यातील दर हजारी पुरूषामागे स्त्रीयांचे प्रमाण एकूण लोकसंख्येपेक्षा कुंभार समाजात चांगले होते . कोल्हापूर राज्यातील शैक्षणिक स्थिती फारशी चांगली नव्हती . मात्र राजर्षी छ .शाहू महाराजांच्या पुरोगामी धोरणांमुळे कोल्हापूर राज्याच्या शैक्षणिक विकासास सुरूवात झाली . १९३१च्या सेन्ससनुसार कोल्हापूर संस्थानातील साक्षरतेचे प्रमाण ६ .६१% होते . मात्र कुंभार समाजाची साक्षरता तर फारच कमी होती . कुंभार समाजाच्या साक्षरतेचे प्रमाण १९३१मध्ये ३ .०६% म्हणजे एकूण लोकसंख्येच्या साक्षरतेच्या निम्म्यापेक्षा कमी होते .कोल्हापूर संस्थानातील स्त्रीयांचे सामाजिक स्थान दुय्यम प्रतिचे होते .स्त्रीयांची शैक्षणिक स्थिती तर खुपच विकट होती .

संदर्भ ः

१ . डॉ . अ .रा .कुलकर्णी व खरे ग .ह ., मराठयांचा इतिहास, खंड दुसरा, कॉन्टीनेन्टल प्रकाशन, पुणे, १९८४, पान नं . १७५ .

२ . डॉ .खंडेराव शिंदे, हिस्ट्री ऑफ कोल्हापूर स्टेट (१८३८-१८९४),पीएच .डी . प्रबंध, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर, २००२, पान नं . १ व २ .

३ . कोल्हापूर राज्य प्रशासकीय अहवाल १९४४-४५, कोल्हापूर राज्य सरकार, कोल्हापूर, १९४६, पान न . १ .

४ . नंदकुमार भोसले, कोल्हापूर राज्यातील सामाजिक आर्थिकपरिस्थिती (१८०१-१८६०), एम .फिल .प्रबंधिका, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर, १९९०, पान नं . १८ ते २३ .

५ . Census of 1901 Kolhapur and S.M.C. States, Kolhapur Government, Kolhapur, 1903, P.P. – 100 to106.

६ . Census of 1931 Kolhapur and S.M.C. States, Kolhapur Government, Kolhapur, 1932, P.P. –172 to173.

७ . नंदकुमार भोसले, उपरोक्त, पान नं . २० .

८ . प्रसिद्ध मानववंश शास्त्रज्ञा डॉ . इरावती कर्वे यांनी आपल्या 'हिंदू समाज एक अन्वयार्थ' या ग्रंथात कुंभारांच्या पोटजाती म्हणजे जाती असून कुंभार हा एक जातीपुंज आहे असे म्हटले आहे . (हिंदू समाज एक अन्वयार्थ, दि .धो .कर्वे, गुलटेकडी पुणे, १९७५, पान .नं . ९ ते १०)

९ . Census of 1901, Op.Cit. P. P.- 102 -103.

१० . Census of 1931, Op.Cit. P.- 173.

११ . Census of 1901, Op.Cit. P.- 102 -108.

१२ . Census of 1921 Kolhapur and S.M.C. States, Part – II, Kolhapur Government, Kolhapur, 1923, P. – 178.

१३ . Census of 1931, Op.Cit. P.- 173.

१४ . नंदकुमार भोसले, उपरोक्त, पान नं . ३१ ते ३२ .

१५ .डॉ .खंडेराव शिंदे, कोल्हापूर राज्यातील सामाजिक आर्थिकपरिस्थिती (१८५१-१९००), एम .फिल .प्रबंधिका, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर, पान नं . ३६ .

१६ . Census of 1931, Op.Cit. P.P.- 586 – 624 .

१७ . नंदकुमार भोसले, उपरोक्त, पान नं . ३३ ते ३६ .

१८ . Census of 1931, Op.Cit. P.P.- 586 – 624 .

19. मुधोळचे संस्थानिक मालोजीराजे घोरपडे यांचे सामाजिक व शैक्षणिक कार्य

डॉ. मंजूश्री शिवाजीराव घोरपडे
विवेकानंद कॉलेज,
इतिहास विभाग प्रमुख, कोल्हापूर.

भारतात एकूण ५६२ संस्थाने अस्तित्वात होती. त्यापैकी दक्षिण महाराष्ट्रात एकूण १८ संस्थाने होती. या अठरा संस्थाना पैकी मुधोळ हे एक संस्थान होते. दक्षिण महाराष्ट्र व उत्तर कर्नाटकाच्या सीमेवर जमखंडीच्या दक्षिणेस १२ मैलावर मुधोळ हे लहानसे संस्थान वसलेले आहे. या संस्थानावर कोल्हापूर येथील ब्रिटीश सरकारच्या पोलिटिकल एजंटचा ताबा होता. या संस्थानिकांना वंश परंपरागत नऊ तोफांची सलामी होती. ते नरेंद्र मंडळाचे कायमचे सभासद होते. इ. स. १४ व्या शतकातील हिंदूराजा नारायण याने मुधोळ शहर वसविले होते. मुधोळ संस्थानने १४ व्या शतकापासून कित्येक शतके सत्ता अखंडीतपणे राखण्याचा प्रयत्न केला. व ही सत्ता संस्थान विलीणीकरणापर्यंत कायम राहिली होती. घोरपडे घराण्याने बहामनी, अदिलशहा, मोंगल, मराठे शाहीमध्ये सेवा केली होती. इ. स. १८१८ मध्ये महाराष्ट्रातील पेशव्यांचे राज्य संपुष्ठात येवून इंग्रजांचा अंमल सुरू झाला. इंग्रज व मुधोळकर घोरपडे यांच्यात तह होवून सरंजामा ऐवजी रू. २,६७२ वार्षिक खंडणी बसवून घोरपडयांच्या संस्थानास मान्यता दिली. २० स्वारानिशी इंग्रज सरकारची सेवा करण्याचे मान्य केले. होते.[१] व्यंकटराव घोरपडे यांच्या मृत्यूनंतर मालोजीराव घोरपडे अज्ञान असल्यामुळे संस्थानचा राज्यकारभार इंग्रज सरकार तर्फे चालत होता. २५ जानेवारी १९०४ साली मालोजीराजे सज्ञान झाल्यानंतर त्यांना दक्षिण महाराष्ट्रातील संस्थानचे पोलिटिकल एजंट कर्नल फेरीस यांचे हस्ते मुधोळ संस्थानचे अधिकार प्रदान करण्यात आले होते.[२] श्रीमंत मालोजी राजे सत्तेवर आल्यानंतर संस्थानात विविध सुधारणा करण्याचा प्रयत्न केला. त्या पुढीलप्रमाणे होत्या.

रस्ते :

संस्थानातील व्यापार सुरळीत चालावा व त्यासाठी दळणवळणाच्या सोयी सुलभ व्हाव्यात म्हणून त्यानी अनेक रस्त्यांचे काम केले. १८ मोठे पूल, १७ छोटे पूल ३५ मोऱ्या बांधलेल्या होत्या. एकंदर ७ मुख्य रस्ते मुधोळहून महालिंगपूर, जमखंडी, गलगली, कळादगी, लोकापूर, रामदूर्ग आणि यादवाड या ठिकाणी जात या सर्वाची मिळून लांबी ६६ मैल होती. या पैकी मुधोळ – महालिंगपूरचा रस्ता वायव्येस १२ मैल तयार केलेला होता.[३]

इमारतींचे बांधकाम :

पूर्वी दिवाणी कामाकरिता एक न्यायाधिशाचे हायकोर्ट होते. राजेसाहेबांनी मुलकी, फौजदारी, दिवाणीचे खटले वेगवेगळया ठिकाणे चालवावेत यासाठी स्वतंत्र इमारती बांधल्या व कोर्टाचे काम सुरळीत पार पाडण्यासाठी मदत केली.[४]

कुस्तीचे आखाडे :

कोल्हापूरशी नाते संबंध असल्यामुळे मालोजी राजे कोल्हापूरला येत असत. कोल्हापूरातील कुस्तीच्या मैदानात त्यांनी अनेक मोठ मोठया पैलवानांच्या कुस्त्या पाहिलेल्या होत्या. कोल्हापूरात शाहू महाराजांनी कुस्तीला राजाश्रय दिल्यामुळे अनेक नामवंत पैलवान तयार झाले होते. कोल्हापूरातील कुस्तीचे वातावरण पाहून मालोजी राजांनी मुधोळ संस्थानात कुस्ती या खेळाला प्राधान्य देवून मुधोळ संस्थानात अनेक कुस्तीचे आखाडे बांधले व अनेक पैलवान तयार केले. त्यांची दोन्ही मुले जयसिंगराव व गोविंदराव हे नांवाजलेले पैलवान होते. ते कोल्हापूरात कुस्ती खेळण्यासाठी येत असत.[५]

करमणुकीच्या खेळांना प्राधान्य :

संस्थानातील लोकांचे मनोरंजन व करमणूक व्हावी यासाठी रेडयाच्या, बकऱ्याच्या, टक्करी कोंबडयांच्या झुंजी, बैलगाडयांच्या शर्यती यांचे खेळ संस्थानात सुरू केले होते. मुधोळात नबीसाहेबांचा ऊरूस व इतरत्र संस्थानात यात्रा भरविण्यास प्रोत्साहान देत असत.[६]

मुधोळ हाऊंड ची पैदास :

घोडयांच्या पैदाशीप्रमाणे मालोजी राजांनी शिकारी कुत्र्यांची पैदास केली. व त्यांना मुधोळ हाऊंड किंवा मराठा हाऊंड नांव दिले. शिकार करण्यासाठी ही कुत्रे तरबेज होती. त्यामुळे संपूर्ण महाराष्ट्र व महाराष्ट्राच्या बाहेर या कुत्र्यांना मागणी होती.[७]

कायदे कौन्सीलची स्थापना :

संस्थानचा राज्यकारभार सुव्यवस्थीत व्हावा. यासाठी संस्थानातील राज्य कारभारत वेगवेगळे बदल केले. तसेच संस्थानातील लोकांचे सामाजीक राहणीमानाचा दर्जा वाढविण्याच्या दृष्टिकोनातून कायदे कौन्सीलची स्थापना केली होती. त्याच्या वारंवार बैठका संस्थानात होत असत.[८]

मुंडगोड येथील तळयाचे बांधकाम :

पहिल्या महायुध्दात राजे साहेबांनी ब्रिटीश सरकारला मदत केल्यामुळे इंग्रज सरकारने त्यांच्यावर खुश होवून कारवार जिल्हयातील मुंडगोड तालुक्यातील तीन हजार एकर जमीन बक्षीस म्हणून दिली होती. ती जमीन राजेसाहेबाना मिळाल्यामुळे त्यांनी त्या ठिकाणी एक मोठे तळे तयार करून दोन हजार एकर जमिनीत उसाची लागवड करायची व एक साखर कारखाना काढावयाचा अशी त्यांनी योजना आखली होती. या कामावर दोन अधिकारी

लोकांची नियुक्ती करून कामास सुरूवात केली होती. या कामावर नियंत्रण ठेवण्यासाठी एक पेन्शनर मुनसफ व दुसरे पेन्शनर मामलेदार होते. मुंडगोड येथील शेतकऱ्यांच्या जमिनी लागवडी खाली येतील. तसेच या योजनेस ५ लाख खर्च होणार होता. या सर्व खर्चाचा विचार करून संस्थानातील रयतेला फायदा होवून त्याची सामाजीक आर्थिक स्थिती सुधारले हा महाराजांचा दृष्टिकोन होता. त्यासाठी महाराजांनी बरेच पैसे खर्च केले होते.[९]

हातसूत व खादीची योजना :

मुधोळातील प्रजासंघाचे कार्यकर्ते कौजलगी बंधू, मसूरकर व सोन्नद, यांनी हातसूत व खादीची योजना राजेसाहेबांच्या पुढे मांडली होती. त्यावेळी राजेसाहेबांनी ही योजना मान्य करून स्वत:ची इमारत बिन भाडयाने दिली. तसेच बिनव्याजी चार हजार एका तज्ञाचा पगार, या योजनेला अशी मदत राजेसाहेबांनी केली होती. राजेसाहेबांच्या अध्यक्षतेखाली सन १९३० मध्ये दसऱ्याच्या मुहूर्तावर खादी संघाची रीतसर स्थापना झाली. तसेच महालिंगपूर येथेही खादी मंडळाची स्थापना होवून संस्थानात वेगवेगळया ठिकाणी यांच्या शाखा निघू लागल्या. त्यामुळे सूत कातण्याची मजूरी दरसाल दहा ते बारा हजार रूपये संस्थानातील स्त्रिया व पुरूषांना खादी मंडळाकडून मिळू लागली होती.[१०]

प्रजेच्या विविध मागण्या :

राजेसाहेबांनी सुधारित योजना संस्थानात राबविल्या तरीही संस्थानी 'स्वराज' व 'केसरी' या वृत्तपत्रातून त्यांच्या बद्दल तक्रारी येत होत्या. केसरी या तृत्तपत्राद्वारे काही कार्यकर्त्यांनी प्रजेच्या हितासाठी विविध मागण्या राजेसाहेबांच्यापुढे मांडल्या. १) संस्थानची औद्योगिक दृष्टया सुधारणा करावी. २) खेडयातील रस्ते नीट करावेत. ३) संस्थानातील नगरपालिकेची कामे व्यवस्थीत व्हावीत. ४) खेडयातून पाण्याची सोय करावी. ५) श्रीमंतानी आपला खाजगी खर्च कमी करावा. सुचविलेल्या व इतर काही सुधारणा राज्यकारभारच्या दृष्टीने त्या अंमलात आणाव्यात श्रीमंतांनी अधिकाऱ्या मार्फत जरूर तजवीज करावी. प्रजेच्या कामी मदत करावी अशा मागण्या होत्या.[११]

प्रजाप्रितीनिधी सभेची स्थापना :

२८ ऑगस्ट १९३१ मध्ये राजेसाहेबांच्या मध्यस्थीने प्रजाप्रितीनिधी सभेची स्थापना झाली. त्यामध्ये प्राथमिक मराठी शाळा, आरोग्य, औषधोपचार, सार्वजनीक कामे, म्युनिसिपालटया, खेडेगांवातील देवस्थान धर्मदाय देणग्या याबाबत व्यवस्था करण्याचा ताबा असेंब्लीकडे दिला. राजेसाहेबांनी याच वेळी श्री मसुरकर यांची नगराध्यक्षपदी निवड केली. व नगर पालिकेकडून त्यांनी सामाजीक प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न केला. नगरपालिकेचे उत्पन्न जेमतेम असल्याने घरपट्टी बसण्याकरिता मंजूरी मागण्यात आली. गरीबांना जिन्नसावरील कर कमी करून चैनीच्या पदार्थावरील कर वाढविण्यात आले. रस्ते, गटारी, डेनेज यासारखी कामे महाराजांनी नियोजित करून घेतली होती.[१२] राजेसाहेबांनीमुधोळ संस्थानातील सामाजिक प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न केला होता. तसेच त्यांनी शिक्षणाला ही महत्त्व दिले होते.

शाळेच्या इमारतीचे बांधकाम :

शाळांच्या इमारती इंग्रजीधर्तीच्या नमुन्याप्रमाणे बांधल्या होत्या. न्यायाधिशास शाळेवर देखरेख ठेवण्याचे काम सोपविले होते.[१३]

शिवाजी क्षत्रिय वैद्यीक विद्यालयाची स्थापना :

कोल्हापूरच्या श्रीमंत शाहू महाराजांनी वेदोक्त चळवळ चालवली होती. त्याचा परिणाम म्हणून मालोजी राजे यांनी मुधोळात १९२१ मध्ये श्री. शिवाजी क्षत्रिय वैद्यीक विद्यालयची स्थापना केली होती. श्री महादेव यादव, गोपाळराव पाडुरंग भोसले, दत्तात्रय रावजी घडेल व बापूसाहेब जगताप हे या कार्यक्रमासाठी उपस्थित होते. राजवाडयात दररोज मार्कंडेय, गुरू आणि शिष्य, राजर्षि शाहू महाराजांचे धार्मिक ध्येय इ. विषयावर किर्तने होते असत.[१४]

मराठी शिक्षण परिषदेचे अध्यक्षपद :

१९२५ मध्ये कोरेगांव येथे मराठा शिक्षण परिक्षदेचे अधिवेशन भरले होते. त्यावेळी मालोजीराजे यांच्याकडे या परिषदेचे अध्यक्षपद होते. मराठा समाजातील लोकांनी शिक्षणाचा लाभ घेवून आपली प्रगती साधावी, असे विचार मांडून इतर देशातील उदाहरणाबरोबर श्रीमंत सयाजीराव गायकवाड व शाहू महाराज यांच्या आदर्श व कार्याची माहिती सांगून त्यांच्याबद्दल आदरव्यक्त केला होता. स्त्री शिक्षणाचे महत्व व त्याचा कुटुंबाला फार मोठा उपयोग आहे. म्हणून स्त्री शिक्षणाची गरज असून स्त्रियांना शिक्षण देणे किती महत्वाचे आहे, हे पटवून सांगितले होते. सर्व शिक्षणात धंदे शिक्षणाला हल्लीच्या काळात महत्वाचे स्थान आहे. शास्त्राची प्रगती फारच झपाटयाने झाली असून नवीन शोध, नवीन कला, नवीन साधने, सोयी जर आपल्या शिक्षण क्रमात आल्या तर आपल्या देशाचे चांगले भवितव्य घडून येईल असे विचार मांडले होते. यांत्रीकी शिक्षणाबरोबर, व्यापारी शिक्षण, लष्करी शिक्षण मिळणे आजच्या घडीला किती महत्वाचे आहे हे अनेक उदाहरणे देवून आपले मत मांडले होते.[१५]

शैक्षणिक मदत :

मालोजी राजे यांना शिक्षणाबद्दल व ज्ञान घेण्याऱ्या जिज्ञासू व्यक्तींच्या बद्दल फार आस्था होती. अशा विद्यार्थ्यांना ते मदत करीत असत. श्री. मारूतराव घोरपडे यांना मिल्ट्रीचे ट्रेनिंग घेण्यासाठी त्यांनी ग्वाल्हेरला पाठविले होते. त्यांचे ट्रेनिंग पूर्ण झाल्या नंतर सुजान सिंह पलटणीत त्यांना चांगली

दुद्याची जागा दिली होती. संस्थानातील डॉक्टर व्यंकटराव घाटगे यांचा मुलगा वसंतराव यांना बॉम्बे येथील मेडिकल कॉलेजमध्ये प्रवेश मिळाला होता. तेंव्हा त्यांचा शिक्षणाचा सर्व खर्च राजेसाहेबांनी दिला होता. माधवराव घोरपडे यांना चित्रकलेचे शिक्षण घेण्यासाठी बॉम्बे येथील जे.जे. स्कूलमध्ये पाठविले होते. त्यानंतर त्यांच्या चित्रांचे प्रदर्शन ठिकठिकाणी भरविण्यास मदत केली होती. रा. सा. गदणकर यांना राजकारणाचा अभ्यास करण्याकरिता त्यांना विलायतेला पाढवून देवून तेथील येणारा सर्व खर्च महाराजांनी दिला होता. अशा अनेक गरजू विद्यार्थ्यांना त्यांनी मदत केली होती.[१६]

भारत इतिहास संशोधक मंडळास भरघोस आर्थिक मदत :

मालोजी राजे यांनी आपले घराणे व त्याच्या इतरत्र असलेल्या घोरपडे घराण्याच्या शाखा व मराठेशाहीतील अन्य लहान मोठी घराणी यांच्या हकीकती व त्यांच्यातील कर्त्या पराक्रमी पुरूषांनी किर्तीरूपी पराक्रम केला होता. त्यांचा इतिहास लिहण्याचे काम भारत इतिहास संशोधक मंडळाचे इतिहस संशोधक दत्तोपंत आपटे यांच्या मदतीने घोरपडे घराण्याचा इतिहास प्रसिध्द केला. म्हणून राजेसाहेबांनी भारत इतिहास संशोधक मंडळास ५००० रू. मदत केली होती.[१७]

मराठा शिक्षण परिषदेस मदत :

६,५०० रू. ची मदत मराठा शिक्षण परिषदेस मालोजी राजांनी केलेली होती. या परिषदेचे कामकाज उत्तम चालावे हा उद्देश या देणगी पाठीमागे होता.[१८]

महाराष्ट्र मंडळास देणगी :

मालोजीराजे यांनी युवराज जयसिंगरावांच्या लग्नानिमित्त कलकत्ता येथील महाराष्ट्र मंडळाच्या इमारती फंडास १००० रूची देणगी दिली होती.[१९]

डेक्कन मराठा एज्यूकेशन पुणे : डेक्कन मराठा एज्यूकेशन पुणे या संस्थेला मालोजी राजांनी ८०० रूपयांची मदत केली होती.[२०]

स्मारक फंडास मदत :

गोपाळराव देवधर यांच्या स्मारक फंडास मालोजीराजांनी १०००रू ची देणगी दिली होती. मुधोळ संस्थान इतर संस्थाना पेक्षा छोटे संस्थान होते. मालोजी राजांनी मुधोळ संस्थानात अनेक सुधारणा करून सामाजिक प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न केला होता. प्रजाप्रतिनिधी संभेची स्थापना करून संस्थानातील अनेक सामाजिक प्रश्नांची उकल केली होती. समाजिक प्रश्ना बरोबर शिक्षणाला ही त्यांनी अधिक महत्व दिले होते. शिक्षणाचा प्रसार सार्वत्रीक व्हावा यासाठी त्यांनी प्रयत्न केले. हुशार, गरजू मुलांना शिक्षणासाठी मदत केली. संस्थानातील विद्यार्थी शिकुन त्यांचा उपयोग संस्थानाची प्रगती होण्यासाठी व्हावा हा महाराजांचा दृष्टी कोन होता. स्त्री शिक्षण व्यावसायीक शिक्षण, लष्करी शिक्षणाचे महत्व इत्यादी बद्लचे विचार मराठा शिक्षण परिषदेमध्ये त्यांनी मांडले होते. मालोजीराजांनी अनेक शैक्षणिक संस्थाना उदारहस्ते देणग्या देवून त्यांचे कामकाज सुरळीत चालावे यासाठी मदत केली होती. त्यांचे संस्थानातील कार्य चांगले असूनही पुण्यातील केसरी व संस्थांनी स्वराज्य, या वृत्तपात्रांच्या मधून मालोजीराजांच्या कार्यावर सतत टिका होत होती. तरीही कोणत्याही टिकाटिपणीस नजूमानता कोल्हापूरच्या राजर्षी शाहू महारांजान प्रमाणे लोककल्याणाचे कार्य केले होते

संदर्भ : १) मराठी ज्ञानकोष – १९२५, खंड १३ वा. पृष्ठ – १७८ २) ॲडमिनिस्ट्रेशन रिपोर्ट मुधोळ स्टेट, १९०५ पृष्ठ – १,२

३) मुंबई इलाख्याचे गॅझेटियर १९१४, पृष्ठ – ५९० ४) तुळपुळे र. वि. मुधोळ संस्थानचा भूगोल सरकारी ग्रंथ पुणे, १९३०, पृष्ठ –९

५) दै. केसरी १३ ऑक्टोंबर १९३३ पृष्ठ – ४ ६) मुलाखत घोरपडे शंकरराव १९९५, वेळ ४वा

७) मराठी ज्ञानकोष उपरोक्त पृष्ठ – १७८ ८) दै. केसरी उपरोक्त, पृष्ठ – ४

९) पटवर्धन वि. अ. संस्थानातील लोकशाहीचा लढा पुणे संस्थानी कचेरी १९४०,पृष्ठ –३९,४०

१०) दै. केसरी उपरोक्त, पृष्ठ –४ ११) पटवर्धन वि. अ. उपरोक्त पृष्ठ – २०८

१२) मुलाखत डॉ. भिडे गोपीनाथ मुधोळ दि. २.९.१९९५ स. १० वा.

१३) मुंबई इलाख्याचे गॅझेटियर उपरोक्त पृष्ठ – ५९२ १४) दै. विजयी मराठा, पुणे ९ एप्रिल १९२३ पृष्ठ – ४

१५) मुलाखत श्री. घाटगे बाबूरात मुधोळ ३.९.१९९५ दु. ४ वा.

१६) दै. विजयी मराठा पुणे २० एप्रिल १९२५ पृष्ठ –५८ १७) दै. विजयी मराठा पुणे २० फेब्रुवारी १९२९ पृष्ठ –५

१८) कित्ता पृष्ठ –५ १९) दै. विजयी मराठा पुणे २९ एप्रिल १९२९ पृष्ठ –४

२०) दै. विजयी मराठा पुणे १७ जून १९३६ पृष्ठ –३

20. कोल्हापूर संस्थानातील स्त्रीवर्ग संरक्षक कायदे आणि राजर्षी शाहू

प्रा. मनिषा श्रेणिककुमार पाटील
कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेज
उरूण इस्लामपूर, जि. सांगली.

भारत हा मातृसत्ताप्रधान देश आहे. मोहेंजोदाडो हडप्पा कालीन उत्खननातून मिळालेल्या स्त्रीदेवतेची शिल्पेही आपणास तसेच सांगतात. स्मृती काळात मनुस्मृती स्त्रीदास्याचे समर्थन करते. लोकायत सांख्य बौध्द, जैन पेरियर, फुले, शाहू, आंबेडकर यांची परंपरा वर्ण, जाती, स्त्रीदास्यअंताची भुमिका घेते. स्त्रियांच्या अत्याचाराकडे दयाबुध्दीने न पाहता स्त्री प्रश्नाकडे 'मुक्तीवादी' आशयाने पाहण्याचे कार्य राजर्षी शाहूनी केले. बालविवाह, विधवापुनर्विवाह प्रतिबंध, केशवपन, शिक्षणबंदी, पडदा पध्दती, सांपत्तीक वारसाहक्क नकार. या रूढीगत प्रथा विरोधी संस्थानात कायदे करून स्त्रीमुक्तीस, उन्नतीस द्वारे खुली केली. स्त्रियांचा विचार माता भगिनी इतक्याच मर्यादीत स्वरूपात न करता त्यांचा स्वायत्त व स्वतंत्र दर्जा सार्वजनिक क्षेत्रातील स्थान बळकट केले. राजर्षी शाहूंनी आपल्या संस्थानात स्त्रीशिक्षणास प्रोत्साहन दिले. आणि तिच्या नैसर्गिक हक्कांचे संरक्षण करणारे कायदे अमलात आणले. ही त्यांच्या पुरोगामी आणि कर्त्या समाजसुधारकत्वाची खरी खुण आहे.[१]

स्त्रीशिक्षणास प्रोत्साहन :–

स्त्री व पुरूष दोघानाही समाजात समान स्थान असले पाहीजे असे राजर्षी शाहूंचे मत होते. ब्राम्हणांचे कट्टर नेते लोकमान्य टिळक यांनी ही स्त्री शिक्षणास विरोध केला होता. परंतू शाहूंनी मात्र स्त्री शिक्षणाचा जोरदार पुरस्कार केला. स्त्रीया शिकल्यातर त्या अपत्यसंगोपनाबरोबरच कौंटुबिक स्वावलंबनास ही हातभार लावतील असे शाहूमहाराजांचे मत होते.[२] शाहू कालखंडात मुलीच्या शिक्षणाची पायाभरणी सुरू होती. ट्रेंड शिक्षिकाही तयार होत होत्या. त्यांच्या स्त्रीशिक्षण समर्थन व प्रोत्याहनामुळे रखमाबाई केळवकर, डॉ. कृष्णाबाई केळवकर, यमुनाबाई व द्वारकाबाई केळवकर यांचे आयुष्य आकारास आले. रखमाबाईंचे पती वसईचे, ते डॉक्टर होते. कृष्णाजी दादाजी त्यांचे नाव प्रार्थना समाजी होते. आपल्या पत्नीसही त्यांनी शिक्षण दिले. अलिबाग ते पनवेल येथे त्यांची डॉक्टरी चाले. रखमाबाई उच्चश्रेणित फिमेल ट्रेनिंग स्कुल परिक्षा उत्तीर्ण झाल्या होत्या. कोल्हापूर संस्थानाने ब्रिटिश सरकारकडे ट्रेंड शिक्षिकेची मागणी केल्यानंतर रखमाबाईच्या नावाची शिफारस झाली. चौथे शिवाजीराजे (१८८३) यांच्या पत्नीला शिकवण्याचे काम त्यांनी केले. या काळात आबासाहेब घाटगे कागलकर संस्थानचे रीजन्ट होते. (१८८३ ते १८९५) दरमहा ५५ रू. पगारावर रखमाबाईनी ट्रेनिंग स्कूलचा कारभार सांभाळला. सुरूवातीस लेडी सुपरिटेंडेट मिस लिटल यांच्या हाताखाली त्या काम करित होत्या. मिस लिटल मायदेशी गेल्यानंतर १८८५ मध्ये संस्थानातर्फे त्या ठिकाणी रखमाबाईंची निवड झाली. 'लेडी सुपरिटेंडेंट ऑफ दि मेन स्कूल' असा हुद्दा देण्यात आला.

काशीबाई कानिटकर यांनी 'आनंदीबाई जोशी चरित्रात' कोल्हापूर कारभारी मंडळावर दोषारोप केले. त्या म्हणतात. ''कोल्हापूर कारभारी मंडळ अगदी जुन्या मताचे व कुत्सित होते.'' तेव्हा 'केरळ कोकीळ' मासिकात (वर्ष दहावे, अंक ८) रखमाबाईंच्या नेमणुकीसंदर्भात लिहिले आहे. रमाबाई रानडे, भांडारकर, रावबहादूर पटवर्धन, आगरकर, यांनी स्त्रीशिक्षणाचे समर्थन केले. १८८७ मध्ये केसरीचे संपादकपद लो. टिळकांकडे आले. तेव्हा पुण्यातील शाळेवर (मुलींची शाळा) टिळकानी टीकेची झोड उठविली. शाहू राजांनी त्यांची सून इंदुमती राणीसाहेब (युवराज शिवाजीच्या विधवा पत्नी) यांनाही शिक्षणासाठी प्रोत्साहन दिले. त्या पुढे डॉक्टर झाल्या.[३] त्यांनी राजाराम कॉलेजमधील मुलींना शिक्षण फी माफ केली होती.[४] शाहूंच्या स्त्री मुक्ती, स्त्रीविकास विषयक आचरण त्यांच्या पुरोगामत्वाची साक्ष देते.

जोगत्या मुरळी प्रतिबंधक कायदा :–

भारतीय समाजव्यवस्थेने स्त्रीस अत्यंत हीन दर्जाची वागणूक दिली. स्त्री म्हणजे एक उपभोग्य वस्तू असा स्त्रीकडे पाहण्याचा दृष्टीकोन होता. खालच्या जातीत मुली मुले देवाला सोडण्याचा प्रघात होता. त्यामुळे जोगता, जोगतीन, देवदासी, मुरळी इ. वर्ग तयार होत.[५] जोगतीन, देवदासी, मुरळी या स्त्रीयांचा त्यांच्या घरातील संपत्तीवर कोणताच अधिकार रहात नसे. देवस्थानात परंपरेने तिला हक्क मिळत, परंतू तो हक्क आणि दर्जा हीनच असे. यास तरीही समाज मान्यता होती. राजर्षी शाहूंनी यास पायबंद घालण्यासाठी 'जोगत्या मुरळी प्रतिबंधक कायदा' केला. अशा स्त्रियांना जनक आई बापाच्या मिळकतीत वारश्याने अधिकार प्राप्त करुन दिले. देवदासी प्रथा उखडून टाकण्याचे प्रयत्न केले.[६] ही प्रथा त्या कालखंडात समुळ नष्ट जरी झाली नसलीतरी शाहूंनी स्वातंत्रपूर्व काळात केलेल्या या कायदयास महत्वाचे स्थान आहे.

आंतरजातीय आंतर धर्मीय विवाह कायदेशीर :–

सध्याच्या युगात ऑनर किलिंग खाप पंचायती सारखे प्रकार, गोत्र, जात, धर्म, प्रतिष्ठा यांना कवटाळताना दिसतात. १२ जुलै १९१९ मध्ये कोल्हापूर इलाख्यातील कायदा कोल्हापूर गॅझेट मध्ये प्रसिध्द झाला. त्यानुसार हिंदू व जैन या दोन मुख्य धर्माच्या लोकांना जाती निर्बंध न पाळता सदरहू दोहोपैकी आपआपल्या कोणत्याही धर्माच्या मनुष्याशी विवाह करण्याची मुभा' दिली गेली. या कायदयान्वये विवाहसमयी पुरुषाचे वय १८ व स्त्रीचे १४ पूर्ण असले पाहिजे असा निर्बंधही घातला गेला. पूर्वी मुलींचे विवाह १० वर्षे वयाच्या आतच केले जात. 'वाढीव वयाचा दंडक' हिंदू धर्मात ढवळाढवळ

करणारा आहे. अशी भूमिका लोकमान्य टिळकांनीही घेतली. १८ वर्ष पूर्ण असणा–या स्त्रीला विवाहासाठी पित्याच्या परवानगीची आवश्यकता नाही असे कलमही या कायदयात होते. या विवाहाची नोंदणी होणार होती. हे शाहूराजांचे क्रांतीकारी पाऊल होते.[७] यामुळे बालविवाहास आळा बसणार होता. विवाह परस्पर संमतीने होणार होते. तसेच विवाहास कायदेशीरपणाही प्राप्त होणार होता. स्त्रीच्या शारीरीक सक्षमतेचा विचारही होता. १९१७ मध्ये वल्लभभाई पटेल यांचे वडील विठ्ठलभाई पटेल यांनी केंद्रीय मंत्री मंडळात आंतरजातीय विवाह विषयक बिल मांडले (पटेल बिल) असे विवाह कायदेशीर मानले जात नसत. संततीसंबंधीही प्रश्न निर्माण होत असत. 'पुरीचे शंकराचार्य' आणि करवीर संस्थानातील धार्मिक नेते यांचा या कायदयाला विरोध होता. राजर्षी शाहूंनी मात्र या बिलास जोरदार पाठींबा दिला.[८] शाहू महाराजानी आपली बहीण राजकन्या चंद्रप्रभाबाई यांचा विवाह 'तुकोजीराव होळकर' (इंदूर) यांचे पुत्र यशवंतराव यांच्याशी करण्याचे योजले होते. मराठा राजघराण्यातील कन्या पाऊणशेवर्षापूर्वी घनगर घराण्यात देणे हे मोठे क्रांतीकारी पाऊल होते. परंतू हा विवाह होण्यापूर्वीच राजर्षीचा मृत्यू झाला. (६ मे १९२२) परंतु चिरंजीव राजाराम महाराजानी स्थगित झालेला हा विवाह १९२४ मध्ये घडवून आणला.[९] (इंदूर मुक्कामी) याचा समग्र वृत्तांत विजयी मराठा मध्ये मिळतो.

सत्यशोधक समाजाने शाहूंच्या आंतरजातीय विवाहविषयक धोरणाचे समर्थन केल्याचे दिसते. शाहूनी म. फुल्यांचे सच्चे शिष्य असल्याचे सिध्द केले. कालखंड जरी वेगळा असला तरी त्यांनी सत्याशोधक विचारांना पाठिंबा दिला. आणि सत्यशोधक समाजानेही शाहूंच्या या धोरणाचे समर्थन केले.[१०] महाराजानी जातीचा कोता अभिमान बाळगला नाही. ब्राम्हणेत्तर चळवळीचे सामाजिक ध्येय जातीभेद मोडणे हेच होते. १९२० मध्ये एका ब्राम्हण मुलीचा मि. अरूंडेल यांच्याशी विवाह झाला. तेव्हा महाराज म्हणतात. ''पूर्व आणि पश्चिम यांच्यात विवाह घडून यावेत, हे अत्यंत इष्ट आहे. असल्या सुधारणेशिवाय त्यांना विभागणारी खाच भरून येणार नाही. मी जातीभेद मुळीच मानत नाही.''[११] यावरून असे दिसते की फक्त आंतरजातीय नव्हे तर आंतरधर्मीय विवाहासही शाहू महाराजानी समर्थन दिले होते.

क्रुरपणाच्या वर्तनास प्रतिबंध करणारा कायदा:–

२ ऑगस्ट १९१९ रोजी कोल्हापूर सरकारच्या गॅझेट मध्ये स्त्रियाना क्रुरपणे वागविण्यास प्रतिबंध करणारे कायदे केले गेले. कुटुंबात नवरा व इतर नातेवाईक यांच्याकडून स्त्रीचा छळ होत असतो. अशा छळाना इंडियन पिनलकोडच्या मर्यादेत आणता येत नसते. या कायदयाच्या प्रास्ताविकात म्हटले आहे की, हिंदूस्थानात लोकांचे अनेक समज आहेत. त्यामध्ये 'हिंदू शास्त्रकारानी हिंदू कुटुंबाच्या पुढा–याना स्त्रियांना हलकेसे शासन करण्याचा अधिकार दिला आहे. त्याचा दुरूपयोग होवून स्त्रियाना वाटेल तसे वागविण्याचा परवाना मिळाला असे पुरूषाना वाटते.'' या विरोधी कायदयात क्रुरपणाची वागणूक या शब्दाची व्यापक व्याख्या केली आहे. शारीरिक छळाबरोबर मानसिक छळ, उपाशी ठेवणे, अवहेलना करणे, सतत उभे करणे आपल्या स्त्रीचा सहवास टाळणे, अशा गोष्टी आहेत.[१२] एकूण ११ कलमांच्या या कायदयानुसार स्त्रीला क्रुपणाची वागणुक देणा–या अपराध्यास ६ महीने कारावास २०० रू. पर्यंत दंड अशी शिक्षा देण्याची तरतूद केली. यामुळे छळ जरी थांबले नसलेतरी समाजात सामाजिक जाणिव जागृतीचे कार्य सुकर झाले.

घटस्फोटाचा व वारसाचा कायदा :–

प्राचीनकाळी स्त्रियांचा दर्जा उन्नत होता. कॉ. शरद पाटील यांनी आपल्या दास शुद्रांची गुलामगिरी भाग–१ या ग्रंथात आदिम गणसमाजात स्त्रीसत्ता अस्तित्वात होती, असे म्हटले आहे. मनुस्मृतीत मनु स्त्रियांचा संपत्तीचा अधिकार नाकारतो. तिचा पतिपासुन विभक्त होण्याचा अधिकार नाकारतो. पत्नीला सोडून देण्याची मोकळीक मनु पुरूषाला देतो त्याच्या सिध्दांतास तो धार्मिक कायदयाचे स्वरूप देतो.[१३] स्त्रीहक्क संरक्षणासाठी तिच्या अन्न, वस्त्र, खर्चाची तरतुद, संततीचा ताबा, पोटगी व शिक्षणाबाबत तरतुद राजर्षी शाहूच्या घटस्फोटासंबंधी कायदयाने केली. पती–पत्नीमधील संबंध काडीमोड घेवून संपूष्टात आणावेत. यात जातपंचायतीच्या पंचाचा हस्तक्षेप लहरीपणा अमान्य करण्यात आला. सर्व कामे कोर्टात केली जाणार होती. करवीर सरकारच्या गॅझेटमध्ये १७ जाने. १९२० रोजी ''हिंदू वारशाच्या कायदयाच्या दुरूस्तीचा कायदा केला. सर्व वर्णाच्या संततीना जनक बापाच्या मिळकतीतील वारसा हक्क दिला गेला. हे कलम स्त्रीउध्दाराच्या दृष्टीने महत्वाचे आहे.[१४] हे कायदे करताना महाराजानी तज्ञांचा सल्ला घेतला होता. मुंबई हायकोर्टाचे एक निवृत्त न्यायाधीश आणि मद्रास हायकोर्टाचे निवृत्त न्यायाधीश यांच्या सल्ल्याने महाराजानी हे नियम केले. मुसलमान नव–याला आपल्या बायकोला तलाक देण्याचा अधिकार होता. जबर मारहाण, महारोगी नवरा, वेडा, असल्यास स्त्रीस घटस्फोट घेता येत होता. (१७ जाने १९२०)

विधवा पुर्नविवाह कायदा :–

लहानपणी मुलांची लग्ने होत. पाळण्यासही बाशिंग बांधले जाई. साथीचे रोग किंवा अन्य कारणाने नवरा मरण पावला तर विधवेस विवाह करण्याची परवानगी नव्हती. ताराबाई शिंदे आपल्या स्त्री–पुरूष तुलना या निबंधात लिहीतात, ''या प्रांती असे जे मराठे म–हाटशाहीला मरतात त्या त्यांचे कुळात तर ब्राम्हणांपेक्षाही पुनर्विवाह न होण्याची सक्ती दिसून येते. (स्त्री–पुरूष तुलना सं.पा.स.ग.मालशे) १९१७ च्या जुलै महिन्यात शाहूनी विधवा पुर्नविवाहास मान्यता देणारा कायदा केला. या कायदयामुळे पुनर्विवाहामधील अडथळा दुर होवून विधवा पुर्नविवाहास कायदेशीरपणा प्राप्त झाला. व संभाव्य अडचणी दूर झाल्या. १९१९ मध्ये कानपूर मधील कुर्मी क्षत्रिय परिषदेत कुर्मी क्षत्रियात विधवा पुर्नविवाह प्रचलित असलेला पाहून ते खुश

झाले. मनुष्य समाज निर्दोष राखण्यासाठी वेदादी शास्त्रांचे पाठबळ त्याना मान्य होते. परंतु ज्या जातींमध्ये भृणहत्या व्यभिचार पाप करून हजारो मुले मरतात ही दु:खाची गोष्ट आहे असे ते म्हणतात. या ठिकाणी शाहू महाराज पडदापध्दती विधवा पुर्नविवाह बंदी संर्वानी मिळून भोजन न करणे या भारतातील अंधश्रध्द कल्पनांचा निषेध करतात. राजमाता जिजाबाई, महाराणी ताराबाई, अहिल्याबाई महाराणी, कमलाबाई यांनी रणांगणी विजय मिळविले. पडदापध्दतीत हे शक्य होणार नव्हते असे ते म्हणतात.[१५] राजर्षी शाहूंनी स्त्रियांचा सर्वांगीन विकास व्हावा म्हणून स्त्री संरक्षणाचे कायदे केले. ब्रिटिश काळात पुरोगामीत्व जपणारा लोकराजा राजर्षी शाहू विरळाच. शाहूंनी आपण बोलके सुधारक नाही तर कर्ते समाजसुधारक आहोत हे दाखवून दिले.

निष्कर्ष :–

१. राजर्षी शाहूनी सामाजिक, आर्थिक, धार्मिक सुधारणांबरोबर स्त्री उन्नतीसाठी अनेक कायदे केले.

२. न्या. रानडे, लोकहितवादी, लो. टिळक यांच्या तुलनेत शाहू कर्ते सुधारक ठरतात.

३. आंतरजातीय व आंतरधर्मिक विवाहाचे समर्थन करून न थांबता शाहूंनी आपल्या कुटुंबात तसा विवाह करण्याचे धाडस केले.

४. विवाहाचे वय, शारिरीक सक्षमता, यांचा विचार करून बालविवाह थांबविले.

५. मुलींच्या शिक्षणाचा विचार करून स्त्री शिक्षणास प्राधान्य दिले. राजाराम कॉलेजमध्ये मुलीना फी माफ होती.

६. वारसाहक्क, घटस्फोटाचे हक्क, परंपरेने स्त्रीला नाकारले तेव्हा शाहूंनी स्त्रीस असे हक्क बहालकरणारा कायदा केला. व स्त्रीमुक्ती स्त्रीदास्यअंतास हातभार लावला.

७. विधवा पुर्नविवाहाचा कायदा करण्याचे धाडस करून त्यासही कायदेशीरपणा प्राप्त करून दिला.

संदर्भ :–

१. कॉ. गोविंद पानसरे – राजर्षी शाहू वसा आणि वारसा प्रकाशन – श्रमिक प्रतिष्ठान कोल्हापूर – प्रथमावृत्ती – ऑगस्ट २००३ पृष्ठ क्र – १४

२. (सं) डॉ. जयसिंगराव पवार – राजर्षी शाहू स्मारक ग्रंथ – संचालक महाराष्ट्र इतिहास प्रबोधिनी कोल्हापूर – प्रथमावृत्ती २५ मे २००७ – पृष्ठ क्र. ६०८

३. तत्रैव पृष्ठ क्र. – ६१२, ६१३, ६१४, ६१५, ६१६, ६१७.

४. डॉ. संगवे विलास – राजर्षी छत्रपती शाहू महाराज – कार्य व प्रभाव – एक्सप्रेस पब्लिशिंग हाऊस – प्रथमावृत्ती ऑक्टो. २००१ पृष्ठ क्र. ३२

५. सुरेश यशवंतराव चौथाईवाले – शाहू महाराजांचे आरक्षणाचे धोरण व सध्यास्थिती – कैलाश पब्लिकेशन्स – औरंगपुरा औरंगाबाद – प्रथमावृत्ती – जानेवारी २००४ पृष्ठ क्र. ३०

६. (सं) डॉ. जयसिंगराव पवार – राजर्षी शाहू स्मारक ग्रंथ – संचालक महाराष्ट्र इतिहास प्रबोधिनी कोल्हापूर – प्रथमावृत्ती २५ मे २००७ – पृष्ठ क्र. ११५, ११६

७. डॉ. जयसिंगराव पवार–राजर्षी शाहू छत्रपती जीवन व कार्य–महाराष्ट्र इतिहास प्रबोधिनी कोल्हापूर–प्रथमावृत्ती–१ जाने. २०१२ पृष्ठ क्र. ९२

८. कॉ. गोविंद पानसरे – राजर्षी शाहू वसा आणि वारसा पृष्ठ क्र. १४

९. विजयी मराठा – २१ जाने १९२४

१०. डॉ. जयसिंगराव पवार – राजर्षी शाहू स्मारक ग्रंथ – पृष्ठ क्र. ७०४

११. (सं) माधव खंडेराव बागल – सत्यशोधक हीरक महोत्सव ग्रंथ १९३० – प्रथमावृत्ती – १९३३ (श्री शाहू सत्यशोधक समाज प्रणित) पृष्ठ क्र. १३४

१२. कॉ. गोविंद पानसरे – राजर्षी शाहू वसा आणि वारसा पृष्ठ क्र. १५

१३. प्रतिमा परदेशी व सरोज कांबळे – जातीव्यवस्था व स्त्रीमुक्ती–क्रांतीसिंह नानापाटील अकादमी – अहमदनगर – प्रथमावृत्ती १९९९ – पृष्ठ क्र. १५

१४. डॉ. जयसिंगराव पवार – राजर्षी शाहू स्मारक ग्रंथ – पृष्ठ क्र. ११५

१५. सुरेश यशवंतराव चौथाईवाले – शाहू महाराजांचे आरक्षणाचे धोरण व सध्यस्थिती – पृष्ठ क्र. २७

21. भारतीय स्वातंत्र्य संग्रामातील रेवाडी राज्याचे योगदान

प्रा. अनघा मोरूस्कर
सहयोगी प्राध्यापिका,
इतिहास विभाग, के. एच. कॉलेज, गारगोटी.

I प्रस्तावना : अहिरवाल व रेवाडी

हरियाणातील एक प्रदेश ''अहिरवाल'' म्हणुन ओळखला जातो. अहिर यादव लोक मोठया प्रमाणात वसल्याने या प्रदेषाला ''अहिरवाल'' हे नामाभिधान प्राप्त झाले. हा प्रदेश 'वीरांची भुमी' म्हणुन ओळखला जातो. महाभारत काळापासूनच अहिर वा यादव हे बलाढय लढवय्ये म्हणुन प्रसिदध् आहेत त्यांनी भारतातील अनेक भुभागावर वेळोवेळी असंख्य राजघराण्याची स्थापना केली तसेच गुजरात, महाराष्ट्र, हरियाणा, उत्तरप्रदेश, इ. विभिन्न भागात वसाहती स्थापन केल्या. त्यापैकीच एक म्हणजे हरियाणातील ''अहिरवाल'' होय. अहिरवाल प्रदेशाचा केंद्रबिंदु रेवाडी होय. अहिर राजा राव चारूराव याने ९ व्या शतकात रेवाडी राज्याचा पाया घातला. अहिरांबरोबरच या भागात जाट, गुजर, रोड मराठा, सैनी, राजपुत हेही रहिवासी असुन त्यांचा सामाजिक दर्जा एकसमान आहे.

II रेवाडी राज्य व इंग्रज :

१८०३ मध्ये उत्तर भारतात इंग्रजाचे वर्चस्व प्रस्थापित झाले. एकसंध असणारे रेवाडी राज्य इंग्रजांनी अनेक तुकडयात विभाजित केले. कारण मराठा इंग्रज संघर्षात रेवाडी नरेश तेजसिंहाने मराठयांना मदत केली. पुढे तेजसिंहाचे वारस राव तुलाराम, राव गोपालदेव. या बंधूंनी इग्रंजाविरूद्ध क्रांतिचे रणशिंग फुंकले. गव्हर्नर जनरलचा एजंट डब्ल्यु. मोर याने दिलेल्या अहवालात ''तुलाराम और गोपालदेव के दफ्तरोपर अधिकार करने के बाद पुष्ट प्रमाण प्राप्त हुए है की ये १८५७ के विद्रोह मे भागिदारही नही बल्की इस कार्य को आरंभ करनेवाले थे .....वे विद्रोहीयोके नेता रहे है अत: ये क्षमादान से बाहर है'' इतिहासकार बुदध् प्रकाश **"***Rao Tula Ram* was an important pioneer freedom fighter of India. He waged a significant struggle against the British from 1857 to 1863**"**

III राव तुलारामची पूर्वतयारी :

राव तेजसिंहाचा नातू राव तूलाराम होय, इंग्रजांनी अहिरवाल प्रदेशावर स्थापित केलेला अधिकार स्वाभिमानी राव तूलारामाला सहन झाला नाही. रेवाडी येथून त्याने इंग्रजांविरूद्ध संघर्षाची तयारी सुरू केली. अहिर, जाट, गूजर, राजपूत, मेव, रोड, मीणा, रांघड इ. विभिन्न लढाऊ जातींना सैन्यात सामील केले. भारतातील विभिन्न राजांना इंग्रजविरूद्ध सहाय्य करण्यासाठी पत्रे पाठविले. लवकरच रेवाडी कांतिकारकांचे केंद्रबिंदू बनले. १८५६ पूर्वीच रेवाडीत राव तूलारामाने किल्ला उभारणी, तोफ कारखाना, बंदूक कारखाना, इ. उभारले काका राव किशनगोपाल यांच्याकडे मिरतची कोतवाली होती. चूलतभाऊ राव गोपालदेव साधूवेशात हरियाणातील अंम्बाला येथे तळ ठोकून होता. स्वत: राव तूलारामाने दिल्लीचा मोगल बादशाह, बहादूरशहा यांच्याशी चर्चा करून दिल्ली व आसपासच्या परिसराची व्यवस्था लावली. एप्रिल १८५७ मध्ये राव तूलाराम यांच्या नेतृत्वाखाली गुप्त बैठक बोलविण्यात आली याची भणक इंग्रजांना लागल्यानंतर त्यांनी अनेक ठिकाणी धरपकड सुरू केली. इकडे नानासाहेब पेशवे, झाशीची राणी, तात्या टोपे, यांनी ही इंग्रजाविरूद्ध संघर्षाची तयारी सुरू केली होती. तत्पूर्वी मंगलपांडेने २९ मार्च १८५७ ला इंग्रजाविरूद्ध विद्रोह केला लवकरच त्याला फाशी देण्यात आले.

 ISBN 978-93-5212-145-8

IV मिरत व दिल्ली काबीज :

राव तूलारामाचा चूलतभाऊ किशनगोपाल हा मिरत शहराचा कोतवाल होता. इंग्रजांची दिशाभूल करून कांतिकारकांना प्रेरणा देण्याचे कार्य त्याने केले .मिरत शहरात इंग्रजाविरोधी पोस्टर्स लावले. तात्या टोपेंचे पाचवे वंशज स्वामी सांख्यायन यांच्यामते राव गोपालदेव यांच्या नेतृत्वाखालील सैन्याने १० मे १८५७ इंग्रजांकडून मिरत जिंकून घेतले त्यानतंर ११ मे दिल्ली जिंकून बहादूरशहा जफर यास पुनश्च भारताचा शासक म्हणुन घोषित केले.१३ मे १८५७ ला गुडगाव येथे क्रांती घडवुन आणली कर्नल फोर्ड यास हरवुन शाही खजिना लुटला.

V. रेवाडीवर आक्रमण व नारनौल चे युदध् :

लवकरच २० सप्टेंबर १८५७ इंग्रजांनी दिलीवर पुन्हा : अधिकार प्राप्त केला व आता त्यांची नजर रेवाडी राज्यावर होती. ब्रिगेडिअर शॉवर्स याने रेवाडीवर आक्रमण केले पण तत्पुर्वीच राव तेथुन निसटले शॉवर्स परत गेल्यानंतर राव तुलारामने पुन्ह: रेवाडीवर वर्चस्व मिळविले. आता इंग्रजांनी कर्नल जेरार्ड यास पाठविले नारनौल जवळील नसिबपुर येथे उभयतात लढा होउन त्यात जेरार्ड ठार झाला. या युदध्ात राव किशन, राव रामलाल, मुहम्मद अजिम व समदखानाचा पुत्र शहीद झाले. या लढाइतील शौर्याचे वर्णन करतांना समकालीन कवी घनश्यामदास म्हणतो

तेजसिंह तेज तुलेराम श्री गोपालदेव भुजदण्ड पे घमंड रजपुती को

नारनौल येथील पराभवानंतर राव तुलाराम विदेषी मदत मिळावी यासाठी इरान ,रशिया येथे रवाना झाले.

१८६३ साली काबुल प्रवासात त्यांचे निधन झाले .राव गोपालदेव व तात्या टोपे इंग्रजांविरूदध् अपयशी ठरल्यानंतर महाराष्ट्रात संन्यस्त जीवन जगु लागले. अशा प्रकारे इंग्रजांनी रेवाडी राज्यावर आपली सत्ता प्रस्थापित केली.

संदर्भग्रंथ :

1. बोरसे दा. गो. (1940) ''अहिराणी लोकसाहित्याची वैश्ष्टे'' मालेगाव: गिरीजा साहित्य प्रकाशन पृष्ठ क्र. ५
2. Atkinson , (1874) statistical description and historical Account of North Western province of india, vol.I ,alahabad
3. Law b .c.,(1943) tribes in ancient india,poona,p.79;Elliot,races of N.W.P. of india, vol.1,London.mdccclix,p.305
4. Gazetteer of the Bombay Presidency (1880)Volume 12 , Government Central Pressp-
5. यादव रामदेवबाबू (२०१०) यदुकुल का इतिहास नसीराबाद; राजस्थानद्ध :जय किशन यादव
6. Joon ramswaroop (1938) history of the jats
7. Tyagi vidya prakash (2009) martial races in undivided india delhi : ghyan publishing house
8. पाण्डे डॉ. राजबली (२००४) यदुवंश का इतिहास दिल्ली: यदुकूल प्रकाशन.
9. ठाकूर देषराज (१९३४) जाट इतिहास दिल्ली :महाराजा सुरजमल षिक्षा संस्थान.
10. Rao, M.S. A. 1987. Social Movement and Social Transformation. New Delhi : Manohar Publishers.
11. Sigh K.S.(1998) People Of India: Rajasthan - Part 1 vol-xxxvIII ,Mumbai:popular prakashan.
12. Khari Rahul (2007)jats and gujars :origin history and culture delhi:Reference Press.
13. karve Irawati.(1968)Maharashtra its land and people Directorate of Government Printing, Stationery and Publications, Maharashtra State.
14. Yadav K. C. Rao Tularam.
15. Ghurye G.S. (1974). Whither India? delhi : Popular Prakashan.
16. मुन्शी सिंह ''शुरवीर एवं शहिदोकी अमरगाथा''
17. अनिल यादव ''क्रांतिदुत राव तुलाराम''

22. संस्थान विलीनीकरण : जुनागड

प्रा. सुशमा विलासराव जाधव
वारणा महाविदयालय, ऐतवडे खुर्द,
ता. वाळवा, जि. सांगली.

१५ ऑगस्ट १९४७ रोजी भारत स्वतंत्र झाला. सुमारे दीडशे वर्षे साम्राज्यवादी ब्रिटिशांनी भारतावर राज्य व पाकिस्तान या दोन राष्ट्रांत विभागणी केली. भारतीय जातीयवादाच्या समस्येला केवळ हिंदु– मुस्लीम प्रश्न किंवा दोन धर्मातील विरोध असे म्हणणे योग्य होणार नाही. या समस्येला धार्मिक कमी आणि राजकीय जास्त, असा आधार आहे. त्याशिवाय तिसराही एक पक्ष इंग्रजांच्या रूपाने होताच.भारत देश स्वतंत्र झाल्या झाल्या नव्या सरकार पुढे ज्या अनेक समस्या उभ्या होत्या त्यामध्ये भारतीय संस्थानाचे विलीनीककरण ही फार मोठी समस्या होती.[१] कारण त्यातील काही संस्थानीक सहजासहजी भारतात विलीन होण्यास तयार होतील यांची शक्यता कमी वाटत होती. त्यामुळे या संस्थानांच्या विलीनीकरणाची समस्या भरतापुढे उभी राहिली होती.
१९४७ या स्वातंत्र्याचा कायदा :

विलीनीकरणाच्या समस्यांचे खरे, कारण ब्रिटिश राजीनीतच दडले होते. ब्रिटिश भारत सोडून गेला की भारतीय संस्थानावरील ब्रिटिश सार्वभौमत्व आपोआपच संपुष्टात येईल. त्या संस्थानाचे ब्रिटनप्रती किंवा भारत सरकारप्रतीकोणतेही उत्तरदायित्व किंवा बंधन राहणार नाही आणि भारतात जे सरकार अस्तित्वात येईल. त्यांच्याशी वाटाधारी करण्याचे, भारत किंवा पाकिस्तान यापैकी कोणात विलीन व्हावयाचे की स्वतंत्र राहावयाचे हे ठरविण्याचे पूर्ण स्वतंत्र संस्थानिकांना राहील असे ब्रिटिश सरकारने जाहीर केले होते.[२] याबद्दल विलीनीकरण कार्यवाहीतील सरदार पटेलांचे प्रमुख मदनीस व्ही.पी. मेनन म्हणतात की, भारताची व संस्थानाचीही सर्वाधिक हानी करणारी कोणती एक गोष्ट ब्रिटिशांनी केली असेल तर त्यांनी संस्थानिकांना स्वयंनिर्णयाने दिलेले स्वातंत्र्य होय.

ब्रिटिशांची कुरनिती :

ब्रिटिशांनी कुटनितीचा फायदा घेऊन भारतीय प्रदेशातील भोपाळ, हैद्राबादसारखी मुस्लीम शासक असलेली संस्थाने पाकिस्तानला जाऊन मिळतील किंवा स्वतंत्र राहण्याचा निर्णय घेतील आणितसेझाले तर अगोदरच पाकिस्तानच्या निर्मितीमुळेविभाजन झालेल्या भारताचे आणखीतुकडे पडतील व भारत हे राष्ट्र दुबळे होईल. किंवा विघटनाच्या या संकटाला तोंड देणे भारताला सर्वस्वी अशक्य होईल. असे त्या काळी अनेकांना वाटत होते परंतु या ब्रिटीश धूरीणांचे हे भावी स्वप्न भारतीय राज्यकर्त्यानी धुळीस मिळविल्यांचे पुढील इतिहासावरून दिसुन येते.[३]

संस्थान मंत्रालयाची स्थापना :

संस्थांनाच्या विलीनीकरणाची समस्या खरोखरच अवघड होती व भारताच्या ऐक्यालाही बाधक होती. कारण विलीनीकरणाबाबत काही संस्थानांनी बरीच आडमुठी व राष्ट्रविरोधी भुमिका घेतली होती. परंतु ब–याच समस्यांचे राजकारण करून जुनागड, हैद्राबाद काश्मीर वगळता बहुसंख्यसंस्थाने ऑगस्ट, १९४७ पर्यंत भारतीय संघराज्यात विलीन करण्यात आली होती. इतक्या मोठया संख्येने असलेली, जवळजवळ स्वतंत्र अशी संस्थाने इतक्या अल्पकाळात व नाममात्र शस्त्रबळाचा वापर करून एका राष्ट्रात विलीन करून घेतल्याचे उदाहरण जगाच्या इतिहासात क्वचितच आढळेल. भारतीय संस्थांचा प्रश्न कॉग्रेसने यशस्वी रितीने हाताळला त्याचे सर्व श्रेय सरदार पटेल आणि व्ही. पी मेनन यांना दयावे लागेल सरदार पटेलांच्या सुचनेनुसार 'संस्थान मंत्रालय' (States Ministry) स्थापना करण्यात आली आणि त्याच्या प्रमुखपदी सरदार वल्लभाई पटेल यांची नियुक्ती करण्यात आली.[४]

सर्व संस्थांनिकांना मान्य होईल असा करार तयार करण्यात आला. विलीनीकरणाच्या आणि कराराच्या प्रती सही करण्यासाठी संस्थानिकांना देण्यात आल्या. संरक्षण, परराष्ट्रसंबंध आणि दळणवळण हे विषय फक्त भारतीय संघराज्याकडे दयावयाचे होते. दुस–या शब्दात सांगावयाचे झाल्यास त्यांचे अंतर्गत स्वातंत्र्य पूर्णपणे दयायचे होते. पटलांनी संस्थानिकांच्या अंतर्गत कारभारात सरकारने हस्तक्षेप करावयाच्या नाही असे धोरण आखलेले आहे. असे या संस्थानिकांना सांगितले. याशिवाय संस्थानिकांच्या देशभक्तीच्या भावनेला त्यांनी हाक दिली. ते म्हणाले 'भारतीय इतिहासाच्या महत्त्वाच्या टप्प्यावर आपण या वेळी एकजुट केली नाहीतर सार्वत्रिक गोंधळाला आपल्याला तोंड दयावे लागेल. भावी पिढया आपल्याला दोष देणार नाहीत असे आपले वर्तन असले पाहिजे.[५] लॉर्ड माऊंटबॅटन यांनी २५ जुलै १९४७ रोजी चेंबर ऑफ प्रिन्सेसला उद्देशून जे भाष्य केले त्यात त्यांनी हाच मुद्दा मांडला. आपल्या भाषणात त्यांनी १५ ऑगस्ट १९४७ पूर्वी भारतीय संस्थांनांनी हिंदुस्थान किंवा पाकिस्तानमध्ये सामील होण्याचे' आवाहन केले. ब्रिटिशांनी कार्यक्षम राज्यव्यवस्था या तारखेनंतर राहणार नसल्याने हा निर्णय त्यांनी लवकारात लवकर घ्यावा असा आग्रह धरला. निर्माण होणा–या परिस्थितीत कोणतेही संस्थान एकाकी राहू शकणार नाही. असे त्यांनी सांगितले.जे तीन विषय संघराज्याकडे सोपविले जाणार आहेत. त्यांचा कारभार संस्थानिकांना पहाता येणार नाही. असे माऊंटबॅटन यांनी सांगितले.याशिवाय कोणत्या संस्थानाने कोणत्या संघराज्यात सामील व्हावे हे भौगोलिक समीपतेवरून ठरणार होते. बहूसंख्य राज्ये हिंदुस्थानात सामील व्हावीत,अशी भौगोलिक समीपतेची गरज होती. "कोणत्याही संस्थानाने आपले अंतर्भत स्वातंत्र्य मिळालेले आहे. अशा स्थितीत जवळच्या हिंदुस्थानात किंवा पाकिस्तानात सामील होण्यावाचून दुसरा पर्याय नाही."[६] असा माऊंटबॅटन यांच्या सांगण्याचा आशय होता.

संस्थानांचे एकत्रीकरण :

सरदार पटेलांनी विलीनीकरणाचे मसूदे तयार करून घेतले. आणि त्यावर त्यांनी निरनिराळया संस्थानाच्या संस्थानाच्या सहया घेतल्या होत्या. परंतु या संस्थानाचे एकीकरण,लोकशाहीकरण अजून व्हावयाचे होते. ती प्रकिया २६ जाने.१९५१पर्यत पुढील टप्प्यात पूर्ण झाली.

१) २१६ संस्थाने शेजारच्या घटक राज्यात विलीन केली.

२) २७५ संस्थानांचे पाच संघातरूपांतर होऊन त्यांचा 'ब' वर्गातील राज्यांचा दर्जा मिळाला.

या संस्थानांवर स्वातंत्र्यपूर्व काळात ब्रिटिशांचे वर्चस्व होते. परंतु हेसंस्थानिक आपल्या संस्थानात एक प्रकारे सर्वेसर्वा होते. अनेकांचा कारभार मनमानी व प्रजेवर अत्याचार करणारा होता. तिथे लोकमताला काहीही किंमत नव्हती. ही संस्थाने भारतात विलीन झाल्यावर मात्र ही परिस्थिती राहिली नाही. आपल्या राज्यातील लोकांना आणि विलीन झालेल्या संस्थानातील लोकांना सरकारने सर्वांना समान अधिकार दिले. संस्थानाचे विलीनीकरण शांततेच्या मार्गाने व्हावे, अशी वल्लभाई पटेल व भारत सरकारची इच्छा होती. मात्र हे जुनागढ, हैद्राबाद व काश्मिर या संस्थानांनी भारतात विलीन होण्यास नकार दिला. या संस्थानांचा विलीकरणासाठी नकार म्हणजे भारत सरकारपुढे उभी ठाकलेली एक समस्या होती. ही समस्या सोडविण्यासाठी शेवटचा उपाय म्हणून भारत सरकारने साम, दाम, दंड, भेद या चारही अस्त्रांचा परिणामकारक उपयोग केला.[७] जुनागढ या संस्थनाचे विलीनीकरण करण्यात पटेल यांनी आपल्या मुत्सद्दिगिरीचा परिचय भारतीय जनतेला करून दिला.

जुनागढ संस्थानाचे विलीनीकरण :

भारत स्वतंत्र झाल्यावर भारतात विलीन होण्यास जुनागढ, हैद्राबाद व काश्मिरच्या संस्थानिकांनी नकार दिला होता. जुनागड हे काठीयावाड मधील एक मुस्लीम राज्यकर्ता असलेले राज्य होते. तेथील नवाबाने नाव महाबतखान असे होते. जुनागडच्या सीमा या भारताशी संलग्न होत्या. जुनागडच्या पुर्व, पश्चिम उत्तर बाजूला भारतात सामील झालेली संस्थाने होते तर द. ला अरबी समुद्र होता. तेथील ८०: प्रजा हिंदु होती तर २०: प्रजा मुस्लीम होती. जुनागडचे क्षेत्रफळ ३०३३७ चौ. मैल होते. तर लोकसंख्या ६,७०,१९ इतकी होती.जुनागडचा नबाव हा मुस्लीम होता. नवाब हा ऐषारामी आणि विलासी होता. त्याला अनेक व्यसने होती. त्याचे प्रमुख व्यसन म्हणजे उत्तमोत्तम कुत्री बाळगणे हे होते. ११ एप्रिल १९४७ रोजी जुनागडच्या नबावाने वृत्तपरिषद घेतली आणि त्यात पुढील विधाने केली. "जुनागड हे संस्थान काठियावाड राज्यांशी संलग्नित आहे. आणि ही एकी कोणी भंग करू शकणार नाही.काठियावाड राज्यातील सर्व संस्थानांनी मिळून एक स्वतंत्र राज्य बनविल्यास त्याचे स्वागतच होईल."त्याच दिवशी जुनागड पाकिस्तानात सामील होणार. या बातमीचे नवाबाने खंडन केले. सर शहनवाझ भुटटो हा मुस्लीम लीगचा एक पुढारी होता त्याची नेमणूक जुनागडच्या मंत्रीमंडळात करण्यात आली. मे १९४७ मध्ये त्याला जुनागडचा दिवान नेमण्यात आले. जुनागडचा विलीनीकरणाचा कराराचा मसूदा भारत सरकारने जुनागडच्या नवाबाला त्यांच्या सहीकरीता पाठविला १३ ऑगस्ट १९४७ रोजी जुनागडच्या सरकारने खालील पत्रक प्रसिध्द केले. "पाकिस्तानात किंवा हिंदुंस्थानात सामील व्हावे असा प्रश्न जुनागड सरकार समोर गेले सहा महिने विचारार्थ होता. या प्रश्नांच्या सर्व पैलुचे आम्ही निट अध्ययन केले आहे. जुनागडच्या जनतेच्या कल्याणाच्या दृष्टीने आम्ही त्याबाबतीत निर्णय घेतलेला आहे. जुनागडचे राज्य पाकिस्तानात सामील होईल हा निर्णय आम्ही जाहीर करीत आहोत."[८]

स्टॅड – स्टील करार :

१३ सप्टें, १९४७ रोजी पाकिस्तान सरकारने हिंदुस्थान सरकारला जुनागड पाकिस्तानात सामील झाले आहे. आणि त्याच बरोबर आम्ही जुनागडशी "स्टॅड – स्टील" करारावर सहया सुदधा केलेले आहेत असे कळविले.[९] वेरावळ कराची पासून अतिशय दूर आहे. ही वस्तूस्थिती जुनागडच्या विलीनीकरणाच्या आड येणार नाही असे ही बॅ. जिनांनी जुनागडच्या नवाबाला कळविले. थोडक्यात भौगोलिक समीपता लक्षात न घेता जुनागड पाकिस्तानात सामील व्हावे, असे कारस्थान पाकिस्तानच्या राज्यकर्त्यानी आणि मुस्लीम लिगच्या नेत्यांनी केले आणि ते कारस्थान यशस्वी झाले.

काठियावाड –वाल्यांची नाराजी :

काठियावाडच्या इतर संस्थानिकांनी जुनागड्चे पाकिस्तानाच्या विलीनीकरणाचा निषेध केला.नवानगरचे जामसाहेब आणि भावनगर, धांगगाधारा मोरवी, पोरबंदर इ. संस्थानाच्या नबाबांनी सुदधा आपला विरोध नोंदविला. नवाबगरचे जामसाहेब यांनी भारत सरकारला खालील शब्दात परिस्थितीचे वर्णन केले."काठियावाडाच्या इतर प्रदेशाने संरक्षण सरकारने केले नाही, तर लोकांच्या सरकारवरील विश्वास पूर्णपणे उडेल." १७ सप्टें १९४७ रोजी भरत सरकारने जुनागड राज्यातील जी लहान सहान राज्ये हिंदुस्थानात विलिन झाली होती. त्यांचे सैम्य काठियावाडच्या सीमेवर आणून ठेवण्याचा निर्णय घेतला.[१०] या निर्णयानुसार २४ सप्टें १९४७ रोजी भारत सरकारने आपले काही सैन्यसुदधा त्या राज्याचे संरक्षण करण्याकरीता पाठविले.२५ सप्टें १९४७ रोजी पाकिस्तानच्या पंतप्रधानाने भारत सरकारला एक टेली ग्राम पाठविला. त्यात असे म्हणण्यात आले होते की,भौगोलिक समीपता लक्षात न घेता जुनागडला पाकिस्तानात सामील होण्याचा अधिकार आहे.

तात्पुरत्या सरकारची स्थापना :

मध्यतंरीच्या काळात जुनागड मधील अंतगर्त परिस्थिती दिवसेंदिवस बिघडत गेली. संपूर्ण काठियावाड संस्थानातच कायदा आणि सुव्यवस्था अजिबात राहिली नाही. अशा परिस्थितीत काठियावाडच्या कॉग्रेस पुढा–यांनी २५ सप्टें १९४७ रोजी मुंबई या ठिकाणी जुनागडचे तात्पुरते सरकार स्थापन केल्याची घोषणा केली.या तात्पुरत्या सरकारमध्ये सात सदस्यांचा अंतर्भाव होता. श्री. सामळदास गांधी हे या मंत्रिमंडळाचे अध्यक्ष होते. ज्यावेळी श्री. गांधी आणि त्यांच्या सहका–यांनी मुंबईहून त्यांचे भव्य स्वागत करण्यात आले. त्यांनी राजकोट याठिकाणी आपले मुख्य कार्यालय ठेवले आणि मोठया प्रमाणात स्वंयसेवक नोंदण्याचा प्रारंभ केला. यावेळी जुनागडच्या सैन्याने मंगरोळ संस्थानात प्रवेश केला. मंगरोळ संस्थानाने भारतात सामील होण्याचे ठरविले होते. त्याला विरोध करण्याचा जुनागडच्या सैन्यांचा बेत होता. म्हणून भारत सरकारने आपले सैन्य 'मंगरोळश संस्थान व्यापणाकरीता पाठविले. हीच परिस्थिती श्मानवदारश या संस्थानात होतो. तिथला खान आपल्याच प्रजेवर अत्याचार करीत होता. म्हणून त्याही ठिकाणी सैन्य पाठविण्यास आले. अशारितीने २२ आक्टों १९४७ रोजी ही दोन्ही संस्थाने जिंकून घेण्यात आली.

नवाबाचे पलायन :

जुनागडच्या नवाबाने पाकिस्तानात सामील होण्याचा घेतलेला निर्णय सर्वसामान्य जनतेला मान्य नव्हता. प्रजेने संस्थानिकांच्या विरोधात चळवळ सुरू केली.तर दुसरीकडे नवाबाला पाकिस्तानची लष्करी मदत पुरेशा प्रमाणात मिळत नव्हती. तो निराश झाला. कारण पाकिस्तानच्या लष्करी मदतीवरच त्याची सर्व मदार होती. शेवटी तो संस्थान सोडून १९४७ च्या ऑक्टोबरमध्ये पळून गेला. त्याने आपल्याबरोबर आपले सर्व कुंटूबिय, सर्व जड–जवाहीर आणि पैसा कवाचीला नेला शहानवाझखान कराची याने मात्र दिवाणगिरी सोडली नाही. २७ ऑक्टों १९४७ रोजी शहातबाझखान याने महमदअली जिना यांना पत्र पाठविले त्यामध्ये "शेतसारा, रेल्वे आणि कस्टर्न यापासून आम्हाला काहीच उत्पन्न मिळत नाही. धान्याचा दुष्काळ तीव्र आहे. रेल्वेतून मुसलमान प्रवास करतात त्यांना अपनास्पद वागणूक मिळते. यात आमच्या नवाबाला आमचे संस्थान सोडून जावे लागले, कारण त्याला त्याचा जीव धोक्यात आहे, अशा गुप्त वार्ता मिळाल्या होत्या. पाकिस्तानात सामील झाल्यामुळे आमच्यावर अभिनंदनाचावर्षाव झाला, तरी आज अशी स्थिती आहे की, काठियावाडया मुसलमांनाना पाकिस्तानबददल अजिबात उत्साह राहिलेला नाही, माझे जेष्ठ सहकारी कॅ. हार्वे जोन्स यांनी आपल्याला परिस्थितीची सर्व कल्पना दिली असेल प्रस्तुत प्रश्न सर्वाना समान न्याय होईल अशा पद्धतीने सोडविला गेला पाहिजे. रक्तपात होऊनचे अशी आमची इच्छा आहे. अशा स्थितीत हिंदुस्थान – पाकिस्तान या दोन राष्ट्रांच्या प्रतिनिधींची सभा व्हावी व या प्रश्नावर विचार विनिमय व्हावा असे मी सुचवितो."[११] या पत्राला पाकिस्तानकडून कोणताच प्रतिसाद मिळाला नाही.

जुनागड संस्थान भारतात विलीन :

शहानवाझखानने ७ नोंव्हें १९४७ रोजी कॅ. जोन्स यांच्या मध्यस्थाने सामळदास गांधी यांच्याशी वाटाघाटींना प्रारंभ केला. त्यांनी राज्याची सर्व सुत्रे श्री. सामळदास गांधी यांनी स्वीकारावीत आणि राज्यात शांतता आणि सुव्यवस्था प्रस्थापित करावी अशी विनंती केली.[१२] परंतू जुनागडच्या मुसलमानांनी सामळदास गांधी ऐवजी श्री.बुच (पश्चिमी प्रादेशिक कमिशनर) यांना सत्ता सोपविण्यासाठी विनंती श्री. शहनवाझरवान यांना केली. व ती त्यांनी मान्य केली. अशा परिस्थितीत ९ नोंव्हें १९४७ रोजी श्री.बुच यांनी जुनागडचा राज्यकारभारआपल्या हाती घेतला. शहानवाझखान यांनी १ दिवस अगोदरच कराची या ठिकाणी मुक्काम हलविला.

सार्वमत :

संस्थालाचे विलीनीकरण करताना कोणताही अडथळा संस्थानिकांची आणला तर प्रजेचे मत विचारात घेतले जाईल असे त्रिमंती योजनेत व माउंटबॅटन योजनेत नमुद करण्यात आलेले होते. जुनागडमध्ये शांतता आणि सुव्यवस्था प्रस्थापित झाल्यानंतर भारतसरकारने जुनागडमध्ये सार्वमत घेण्याची व्यवस्था केली. श्री. सी. बी. नगरकर या भारत सरकारच्या आय.सि.एस. अधिका–याकडे सार्वमताची सर्व जबाबदारी सोपविण्यात आली. हे सार्वमत दि.२० फ्रेंबु १९४८ रोजी घेण्यात आले. २,०१,४५७ लोकसंख्या पैकी १,९०,८७० लोकांनी हिंदुस्थानच्या बाजूने मतदान केले. पाकिस्तानच्या बाजुने फक्त ९१ मते पडली. याच पद्धतीने मंगरोल, मानवदार, सारंगगड या संस्थानात सुद्धा सार्वमत घेण्यात आले. अशा रितीने जुनागडचा प्रश्न सोडविण्यात आला व जुनागड भारतीय संघराज्याचा एक अविभाज्य भाग बनले. जुनागडमधील जीनांचे व भूत्तोचे कारस्थान हाणून पाडण्यात प्रजा परिषदेच्या नेत्यांची व काठियावाडातील नरेशांनी महत्त्वाची भुमिका बजावली.[१३]स्वतंत्र्य प्राप्तीनंतर संस्थानाचे विलीनीकरण ही महत्त्वाची समस्या बनलेली होती. मात्र वल्लभभाई पटेल यांच्या सारख्या कणखर नेत्यांनी संस्थानिकांना आवाहन करून गरज पडेल त्या ठिकाणी लष्करी कारवाई करून भारतातील संस्थानांचे विलीनीकरण केले. आणि संस्थानांच्या विलीकरणाच्या प्रश्न हाताळला.

संदर्भ साधने :

१) डॉ.वैदय सुमन व डॉ.कोठेकर शांता– 'स्वतंत्र भारताचा इतिहास' (१९४७ –१९८६) पान ८–९

२) पटवर्धन वि. आ. – 'द. महाराष्ट्रातील संस्थानाच्या विलीनीकरणाची कथा' पान – ५५,५६

३) 'कित्ता'–पान ५६–६०

४) प्रा. पवार जयसिंगराव भाऊसाहेब – 'हिंदुस्थानचा राजकीय आणि घटनात्मक इतिहास'

५) पटवर्धन वि.आ. –द. महाराष्ट्रातील संस्थानांच्या विलीनीकरणाची कथा' पान नं १२ –१३

६) डॉ. कोलारकर शं.गो. – 'स्वतंज्य हिंदुस्थानाचा इतिहास' (१९४७–१९८०)श्री. मंगेश प्रकाशन नाकपूर, पान – १२७

७) डॉ. लोहार. र.म. – 'आधुनिक भरताचा इतिहास' पान नं – ३२४

८) डॉ.वैदय सुमन व डॉ.कोठेकर शांता – 'स्वतंत्र भारताचा इतिहास' (१९४७ –१९८६) पान नं १३

९) 'कित्ता' पा नं १०,११

१०) डॉ. वव–काणी नि. आ. – 'आधुनिक भारताचा इतिहास' (१९८० – १९६३) श्री. मंगेश प्रकाशन, नागपूर पा. नं – ८८

११) Bipan chadra and others " India Afther Indepndence 1947 – 2000 p.68,69

१२) Bipan chadra and others " India Afther Indepndence 1947 – 2000 p.68

१३) भाळे. भा. ल.– 'आधुनिक भारताचा राजकीय विचार' पा. नं.–४८

23. A Study of Princely States in India

Prof. D. A. Pawar
Dept. of Pol. Science,
Shri. Sant Gadgebaba
Mahavidyalaya, Kapashi.

Introduction:-

The East India Company acquired, in the process of conquest, important coastal tracts, the valleys of the great navigable rivers and such tracts which were rich in agricultural products and densely populated by prosperous people, while, generally, the Indian states were "the inaccessible and less fertile tracts of the Indian peninsula".The making of Indian states was largely governed by the same circumstances which led to the growth of East India Company's power in India.

The evolution of relations between the British authority and states can be traced under the following broad stages:

East India Company and Princely States (1740-1765):

Starting with Anglo-French rivalry with the coming of Dupleix in 1751, the East India Company asserted political identity with capture of Arcot (1751). With the Battle of Plassey in 1757, the East India Company acquired political power next only to the Bengal Nawabs. In 1765 with the acquisition of the Diwani of Bengal, Bihar and Orissa, the East India Company became a significant political power.

Policy of Ring Fence (1765-1813):

This policy was reflected in Warren Hastings' wars against the Marathas and Mysore, and aimed at creating buffer zones to defend the Company's frontiers. The main threat was from the Marathas and Afghan invaders (the Company undertook to organize Avvadh's defense to safeguard Bengal's security). Wellesley's policy of subsidiary alliance was an extension of ring fence—which sought to reduce states to a position of dependence on British Government in India. Major powers such as Hyderabad, Awadh and the Marathas accepted subsidiary alliance. Thus, British supremacy was established.

Policy of Subordinate Isolation (1813-1857):

Now, the imperial idea grew and the theory of Paramount began to develop—Indian states were supposed to act in subordinate cooperation with the British Government and acknowledge its supremacy. States surrendered all forms of external sovereignty and retained full sovereignty in internal administration. British Residents were transformed from diplomatic agents of a foreign power to executive and controlling officers of a superior government. In 1833, the Charter Act ended the Company's commercial functions while it retained political functions. It adopted the practice of insisting on prior approval/sanction for all matters of succession. In 1834, the Board of Directors issued guidelines to annex states wherever and whenever possible. This policy of annexation culminated in usurpation of six states by Dalhousie including some big states such as Satara and Nagpur.

Policy of Subordinate Union (1857-1935):

The year 1858 saw the assumption of direct responsibility by the Crown. Because of the states' loyalty during the 1857 revolt and their potential use as breakwaters in political storms of the future, the policy of annexation was abandoned. The new policy was to punish or depose but not to annex. After 1858, the fiction of authority of the Mughal emperor ended; sanction for all matters of succession was required from the Crown since the Crown stood forth as the unquestioned ruler and the paramount power. Now the ruler inherited the gaddi not as a matter of right but as a gift from the paramount power, because the fiction of Indian states standing in a status of equality with the Crown as independent, sovereign states ended with the Queen adopting the title of "Kaiser-i-Hind" (Queen Empress of India).The paramount supremacy of the Crown presupposed and implied the subordination of states. The British Government exercised the right to interfere in the internal spheres of states—partly in the interest of the princes, partly in the interest of people's welfare, partly to secure proper conditions for British subjects and foreigners and partly in the interest of the whole of India. The British Government was further helped in this encroachment by modern developments in communication— railways, roads, telegraph, canals, post offices, press and public opinion. The

 ISBN 978-93-5212-145-8

Government of India exercised complete and undisputed control in international affairs—it could declare war, peace or neutrality for states. According to the Butler Commission in 1927, "For the purpose of international relations, state territory is in the same position as British territory and state subjects in the same position as British subjects.

Curzon's Approach:

Curzon stretched the interpretation of old treaties to mean that the princes, in their capacity as servants of people, were supposed to work side-by-side with the governor-general in the scheme of Indian Government. He adopted a policy of patronage and "intrusive surveillance". He thought the relation between the states and Government was neither feudal nor federal, a type not based on a treaty but consisting of a series of relationships having grown under different historical conditions that, in the course of time, gradually conformed to a single line. The new trend seemed to reduce all states to a single type—uniformly dependent on the British Government and considered as an integral part of Indian political system.

Post-1905:

A policy of cordial cooperation began to counter progressive and revolutionary developments in face of large-scale political unrests. According to the recommendations of Montford Reforms (1921), a Chamber of Princes (Narendra Mandal) was set up as a consultative and advisory body having no say in the internal affairs of individual states and having no powers to discuss matters concerning existing rights and freedoms.

For the purpose of the chamber the Indian states were divided into three categories:

1. Directly represented—109

2. Represented through representatives—127

3. Recognised as feudal holdings or jagirs.

The question of extent of sovereignty and Paramountcy was still undefined. The Butler Committee (1927) was set up to examine the nature of relationship between the states and Government.

It gave the following recommendations:

1. Paramountcy must remain supreme and must fulfil its obligations, adopting and defining itself according to the shifting necessities of time and progressive development of states.

2. States should not be handed over to an Indian Government in British India, responsible to an Indian legislature, without the consent of states.

Thus, "Paramountcy" was left undefined and this hydra- headed creature was left to feed on usage, Crown's prerogative and the princes' implied consent.

Policy of Equal Federation (1935-1947):

The Government of India Act, 1935 proposed a Federal Assembly with 125 out of 375 seats for the princes and the Council of States with 104 out of 160 seats for the princes, under its scheme of an all-India federation, which was subject to ratification by states representing more than half of the population and entitled to more than half of the seats in the Council of States. This scheme never came into existence and after the outbreak of World War II (September 1939) it was dropped altogether.

Integration and Merger:

After World War II began and a position of non- cooperation was adopted by the Congress, the British Government tried to break the deadlock through the Cripps Mission (1942), Wavell Plan (1945), Cabinet Mission (1946) and Attlee's statement (February 1947). Cripps held that the British Government did not contemplate transferring Paramountcy of Crown to any other party in India. The states tried various schemes to forge a union of their own, envisaging themselves as sovereign in status or as a

third force in the Indian political scene. The June 3rd Plan and Attlee's statement made it clear that the states were free to join either of the two dominions, and Mountbatten refused to give a sovereign status to the states. Sardar Patel, who was in charge of states' ministry in the interim cabinet, helped by V.P. Menon, the secretary in the ministry, appealed to the patriotic feeling of rulers to join the Indian dominion in matters of defense, communication and external affairs—the three areas which had been part of the Paramountcy of the Crown and over which the states had anyway no control.

Conclusion:-

The problem of integration of Independent India now was two-folds i.e. of transforming the states into viable administrative units, and of absorbing them into the constitutional units. **This was sought to be solved by:**

1. Incorporating smaller states (216 such states) into contiguous provinces and listed in Part A. For instance, 39 states of Orissa and Chhattisgarh were incorporated into Central Pro-vinces, Orissa. Gujarat states were incorporated into Bombay;

2. Making some states as centrally administered for strategic or special reasons, listed in Part-C (61 states) — Himachal Pradesh, Vindhya Pradesh, Manipur, Tripura, Bhopal, etc.;

3. Creating five unions—United States of Kathiawar, United States of Matsya, Patiala and East Punjab States Union, Rajasthan and United States of Travancore-Cochin (later Kerala).

Initially these states acceded with respect to defence, communication, external affairs; later they felt that a closer association was necessary. The five unions and Mysore accepted Indian jurisdiction in Union, concurrent subjects except taxation and subject to differences as under Article 238 and the supervisory power of Union for ten years. The Seventh Amendment (1956) abolished Part-B states as a class and formed one class out of Parts A and B; thus special provisions relating to Part B states were deleted. The Indian states thus lost their identity and became part of one uniform political set-up.

References:-

1) Ramusack, Barbara N. (2004), *The Indian Princes and Their States*, The New Cambridge History of India III.6, Cambridge, England: Cambridge University Press.
2) Menon, V.P. (1956), *The Story of the Integration of the Indian States*, New York: Macmillan
3) Mitra, Subrata Kumar (2006), *The Puzzle of India's Governance: Culture, Context and Comparative Theory*, London: Routledge.
4) Majumdar , Romesh Chandra, (1971). History of the Freedom Movement in India, 3 vols, 2nd ed., Calcutta.

Mill, James, (1817). The History of British India, 3vol, London: Baldwin, Cradock and Joy.

24. भारतातील राज्य आणि तैनाति फौज

प्रा. सिध्दार्थ आर. दवाणे
सहा. प्राध्यापक, इतिहास विभाग,
कमलादेवी कॉलेज ऑफ आर्टस अॅन्ड कॉमर्स, विठ्ठलवाडी, कल्याण.

प्रस्तावना–

१७५७ च्या प्लासीच्या विजया मुळे ब्रिटीशांनी भारतात आपल्या सत्तेची स्थापना केली. भारतातील केंद्रीय सत्तेचा अभाव व राजकिय अस्थिरता याचा फायदा ब्रिटीशांनी घेतला व भारतात आपला साम्राज्य विस्तार करण्यास सुरूवात केली. भारतातील राज्य जिंकत असतांना त्यांनी कधि युध्दाचा तर कधि विविध निति–धोरणांचा प्रयोग केला या धोरणा मध्ये लॉर्ड कॉर्नवॉलिस याचे शांततेचे धोरण, सर जॉन शोर याचे तटस्थतेचे धोरण, लॉर्ड वेलस्लीचे तैनाति फौज, लॉर्ड डलहैसिचे दत्तक वारसा नामंजुर तत्व महत्वाचे होते. लॉर्ड वेलस्लीने आपल्या तैनाति फौजेच्या धोरणा द्वारे देशी राजांशी युध्द न करता भारतातील विविध राज्य जिंकुन तो प्रदेश ब्रिटीश साम्राज्यास जोडला. आपल्या सात वर्षाच्या कारर्किदीत (१७९८–१८०५) त्याने कंपनीची आर्थिक व प्रादेशीक स्थीती भक्कम करून भारतातील विविध राज्य जिंकले.

लॉर्ड वेलस्ली–

लॉर्ड वेलस्ली चा जन्म २० जुन १७६० मध्ये झाला. त्याचे सुरूवातीला नाव 'लॉर्ड मॉर्निंग्टन' असे होते. नंतर तो मार्क्विस म्हणून नावाजला. १७८० मध्ये ब्रिटीश हाऊस ऑफ कॉमन तर १७९३ मध्ये तो बोर्ड ऑफ कंट्रोलचा सदस्य बनला. १७९८ ते १८०५ या काळात तो भारताचा गवर्नर जनरलहोता. या काळात त्याने भारतात साम्राज्य वादी धोरण राबवून भारतातील विविध राज्य जिंकुन घेतले. त्याने सर जॉन शोरच्या तटस्थेतेच्या धोरणाचा त्याग करून युध्द निती व तैनाती फौजेचा अवलंब करून भारतात ब्रिटीशांना एक सर्वश्रेष्ठ शक्ती बनवली.

लॉर्ड वेलस्लीच्या आगमनाच्या वेळची भारतातील राजकिय परिस्थीती :–

मराठयांचे राज्य– दुस–या बाजिरावच्या कर्तृत्वहिन राज्य कारभारामुळे पेशवाई जरी पोखरली गेली असली तरी मराठा राज्य हे भारतातील सर्वात शक्तीशाली राज्य होते. पेशवा माधवराव यांच्या मृत्यू नंतर पेशवाईची शक्ती ही कमी होऊन मराठा संघात अंतर्गत संघर्षाला सुरूवात झाली. बडोदयाचे गायकवाड यांनी ब्रिटीशांच्या विरोधात तटस्थेचे धोरण स्विकारले तर भोसले, शिंदे, होळकर यांनी ब्रिटीशांचा विरोध केला. दौलतराव शिंदे यांनी उत्तरेकडे आपला साम्राज्य विस्तार वाढवून मुगल बादशाह शहा आलम याला स्वंरक्षण दिले तसेच त्याने डी बॉयने व मस्यूर पेरन या फ्रेंच अधिकारांच्या मदतीने युरोपियन धर्तिवर आधारीत एक सुसज्ज फौज उभारली होती. जसवंतराव होळकर हा एक आणखी महत्वकांक्षी मराठा सरदार होता जो पुण्यात आपली सत्ता प्रस्थापित करण्यासाठी प्रयत्नशिल होता तर नागपूर मधिल भोसल्यांची सत्ता ही नागपूर पासून कटक पर्यंत पसरलेली होती.

म्हैसूरचे राज्य–

कॉर्नवॉलिस ने म्हैसून बरोबर केलेल्या दोन युध्दांमुळे म्हैसूरचे अर्धे राज्य गेले होते तरी सुध्दा टिपू सुलतान याने ब्रिटीशांचा सर्व शक्तीनिशी विरोध केला. त्याने अफगानिस्तानचा शासक आमिर जमान शाहा याच्यशि पत्र व्यवहार केला, तुर्कीच्या सुलतानाशी संपर्क साधला, आपल्या सैन्यामध्ये फ्रांसीसी अधिका–यांची नियुक्ती करून फ्रान्स मधिल क्रांतिकारकांची ब्रिटीशांच्या विरूध्द मदत घेण्याचा प्रयत्न केला.

आयोध्या, कर्नाटक व हैद्राबाद–

आयोध्या, कर्नाटक व हैद्राबाद हे तिनही राज्य ब्रिटीशांचे मित्र राज्य होते. आयोध्या हे पुर्ण पणे ब्रिटीशांवर अवलंबून असलेले राज्य होते. व या राज्या पासून ब्रिटीशांना कोणत्याही प्रकारचा धोका नव्हता. कर्नाटकच्या नवाबाचे राज्य हे अत्यंत दुर्बल होते व नवाब पुर्ण पणे कर्जात डूबलेला होता. सर जॉन शोर चे धोरण व १७९५ मध्ये खडर्याच्या लढाईत निजामाचा झालेला पराभव या मुळे हैद्राबादच्या निजामाचा ब्रिटीशांवर विश्वास नव्हता. सहाजिकच ब्रिटीशांवर रूष्ठ झालेल्या निजामाने फ्रांसच्या मदतीने आपले सामर्थ्य वाढविण्याचा प्रयत्न केला तर मद्रासच्या इंग्रजांशी वितुष्ट असल्यामुळे कर्नाटकचा नवाब टिपुच्या गोटात जाण्याच्या विचारात होता.

फ्रांसीसी कंपनी–

ब्रिटीशांना सर्वात जास्त धोका हा फ्रांस कडून होता. नेपोलियनला इजिप्त मध्ये मिळालेल्या विजया मुळे तो भारतावर आक्रमण करण्यास प्रयत्नशिल होता. टिपू सुलतान देखिल नेपोलियनशी संपर्क साधून होता. तसेच भारतातील अनेक राज्यात विविध राजांनी आपल्या दरबारात अनेक फ्रांसीसी अधिका–यांची नियुक्ती केलेली होती.

पंजाब व अफगानिस्तान–

पंजाब मध्ये याच दरम्यान शिखांनी रंणजीतसिहच्या नेतृत्वाखाली आपले सामर्थ्य वाढवीण्यास सुरूवात केली होती. तर अफगानिस्तानातील महत्वकांशी सुलतान झमान शाहा हा देखील भारतातील राजकारणात हस्तक्षेप करण्यासाठी उत्सूक व प्रयत्नशिल होता. लॉर्ड वेलस्लीच्या आगमनाच्या वेळेस भारतातील राजकिय परिस्थीती ही कंपनीच्या दुष्टीने गंभीर होती. भारतातील कोणतेही राज्य हे ब्रिटीशांचे मित्र नव्हते व जे होते ते शक्तीहीन व असामर्थ्यशालि होते. तैनाति फौज पध्दत– भारतात ब्रिटीश सत्ता सार्वभौम करण्यासाठी लॉर्ड वेलस्ली ने तैनाति फौजेचा प्रभावि वापर केला पण लॉर्ड

वेलस्ली हा तैनाती फौजेचा जनक नव्हता. त्याने फक्त शास्त्र सुध्द पध्दतीने या व्यवस्थेला विकसित केले. भारतात तैनाति फौजेची पध्दत सुरू करण्याचे श्रेय फ्रांसीसी गवर्नर डूप्लेला जाते. त्याने सव्र प्रथम भारतीय राजांना आपले सैन्य भाडयाने देण्यास सुरूवात केली. ब्रिटीशांनी सर्व प्रथम या पध्दतीचा प्रयोग १७६५ मध्ये अवधच्या नवाबाशी करून पैश्याच्या मोहबदल्यात अवधचे संरक्षण करण्याचे निश्चित केले व एक ब्रिटीश रेजीडंट सुध्दा अवधच्या दरबारी ठेवला. १७८७ मध्ये लॉर्ड कॉर्नवॉलिस याने कर्नाटकच्या नवाबावर शर्थ लादली कि, त्याने ब्रिटीशांशिवाय अन्य कुठल्याही युरोपियन शक्तीशी संबंध ठेवू नये. १७८९ सर जॉन शोर याने अशीच एक अट अवधच्या नवाबाला घातली. १७९८ मध्ये वेलस्ली ने निजामाशी करार करून प्रति वर्ष २४,००,०००/— रूपयांच्या मोहबदल्यात ब्रिटीश फौज निजामाच्या तैनातीस ठेवण्याचे मान्य केले. भारतात तैनाती फौज जरी डुप्लेने चालू केली व वेलस्लीने याला विकसीत केले असले तरी एम.जी. रानडे यांच्या मते, " तैनाती फौज ही एक प्रकारे मराठयांच्या त्या विचारांची संघटीत पुनरावृत्ती होती जी शंभर वर्षा पुर्वी सुरू झाली होती. ही पध्दत दिल्ली सरकार कडून चौथ व सरदेशमुखी प्राप्त करण्याबाबत होती"

लॉर्ड वेलस्लीने पूर्वीच्या या पध्दतीत अनेक बदल करून या पध्दतीला साम्राज्यविस्ताराचे एक प्रमुख शस्त्र बनविले. त्याने तैनाती फौजेच्या मोहबदल्यात पैसा घेण्यापेक्षा तैनाती फौज स्वीकाणा—या राज्यकर्ताकडून त्यांच्या राज्याचा काही भाग मोडून घेण्याचे स्विकारले. कारण प्रदेश मोडून देण्यात राज्यकर्ते हे टाळाटाळ करणार नव्हते. तसेच युध्दाचा अवलंब न करता ईस्ट इंडिया कंपनीचा प्रादेशीक विस्तार होणार होता.

तैनाती फौजेच्या अटी— तैनाती फौज स्विकारणारे राज्य आणि ब्रिटीश ईस्ट इंडिया कंपनी यांच्यात पुढिल अटिंवर तह होत होता.

१. तैनाती फौजेची पध्दत स्वीकारणा—या भारतीय राजांनी ब्रिटीशांची तैनाती फौज ठेवावी. व त्यांचा खर्च म्हणून कंपनीला पैसा व काही प्रदेश दयावा.

२. ही पध्दत स्वीकारणा—यांनी दुस—या शक्तिशी (राज्याशी) युध्द वा तह करू नये.

३. ही पध्दत आमलात आणणा—या दोन शासकांमध्ये जर आपआपसात मतभेद झाले तर त्यांनी इंग्रजांना मध्यस्त नेमुन त्यांचा निर्णय मान्य करावा.

४. या राज्यांना आपल्या राज्यात एक इंग्रज रेजीडेंट (अधिकारी) ठेवावा लागेल.

५. कंपनीच्या परवानगी शिवाय राज्यांना दुस—या युरोपीयांना सेवेत ठेवता येणार नाही.

६. या सर्व अटि स्वीकारणा—या राज्याचे ब्रिटीश कंपनी आंतरिक व बाह्य संकटापासून संरक्षण करेल.

तैनाती फौजे द्वारे जिंकलेली राज्य—

हैद्रबाद— लॉर्ड वेलस्लीच्या तैनाती फौजेचा सर्व प्रथम स्विकार हैद्राबादच्या निजामाने केला. मराठे व दक्षिणेकडून म्हैसूरची होणारी सततची आक्रमणे व फ्रांन्स कडून अपेक्षित मदत न मिळाल्याने आपल्या राज्याचा सुरक्षेसाठी हैद्राबादच्या निजामाने १ सप्टेंबर १७९८ रोजी वेलस्लीच्या तैनाती फौजेचा स्विकार केला. त्या नुसार इंग्रजांच्या फौजेच्या सहा तुकडया आपल्या राज्यात ठेवून घेण्याचे निजामाने कबुल करून फौजेच्या खर्चा करिता २४ लाख रूपये प्रतिवर्षे देण्याचे ठरवले. १८०२ मध्ये वेलस्लीने निजामाबरोबर एक व्यापारी तह करून हैद्राबाद राज्यात कंपनीच्या व्यापाराला विस्तृत क्षेत्र उपलब्ध करून दिले. पुढिल काळात वेलस्लीने तैनाती फौजेचा खर्च वाढविला. ब्रिटीशांच्या सततच्या हस्तक्षेपामुळे व त्याची सुरक्षतेची चिंता संपल्यामुळे निजाम प्रशासनाबाबत निष्काळजी झाला.

तंजावर—

१७८६ मध्ये तंजावरचा राजा तुळाजी याच्या मृत्यूनंतर त्याचा पुत्र सर्फोजी व राजाचा सावत्र भाऊ अमरसिंह याच्यात गादीसाठी संघर्ष निर्माण झाला. तंजावरमधिल गोंधळ व अस्थिरतेचा फायदा घेवून लॉर्ड वेलस्लीयाने सर्फोजी भोसल्याशी २५ ऑक्टोबर १७९९ ला तह करून वार्षिक ४,००,०००/— रूपये निवृत्ती वेतनाच्या मोहबदल्यात तंजावरचे राज्य कंपनीच्या हातावर सोडण्यास सर्फोजीला बाध्य केले. व १७९९ मध्ये तंजावर ब्रिटीश भारतात विलीन झाले.

सुरत—

१७८९ मध्ये ब्रिटीशांनी भारतातील आपली पहिली वखार सुरत येथे स्थापन केली. व सुरतच्या स्वरक्षणाची जबाबदारी नवाबाने ब्रिटीशांकडे सोपावली. त्या मोहबदल्यात ब्रिटीशांना दयावयाची रक्कम तो नियमित देवू शकला नाही. ब्रिटीशांनी १७९७ मध्ये नवाबाला आपली संपूर्ण लष्कर समाप्त करण्यास बाध्य केले. १७९९ मध्ये सुरतच्या नवाबाच्या मृत्यूनंतर त्याचा वारस असलेल्या त्यांच्या बंधुंशी तह करून सुरतच्या संरक्षणासाठी कंपनीला नवाबाकडून मिळवायची रक्कम वजा करून उरलेल्या महसुलचा १/५ हिस्सा आणि वार्षिक १,००,०००/— रूपये निवृत्तीवेतन नवाबाला देण्याच्या मोहबदल्यात वेलस्लीने सुरत कंपनी राज्यात विलिन केले.

कर्नाटक—

कर्नाटकचा नवाब हा विलासी व ऐषोरामात डूबलेले जीवन जगत असल्याने कंपनीच्या अधिकारांकडून घेतलेल्या कर्जाचा डोंगर हा वाढतच होता. त्यामुळे कर्नाटकमध्ये दुरअवस्था व गोंधळ वाढला. १७८७ मध्ये लॉर्ड कॉर्नवॉलिस याने कर्नाटकमधिल काही जिल्हे कंपनी साम्राज्यात जोडले. पुढील काळात लॉर्ड वेलस्लीने कर्नाटकच्या नवाबावर काही कागदपत्राच्या आधारे टिपु सुलतानशी पत्रव्यवहार केल्याचा आरोप लावला. १८०१ मध्ये

अली हूसैन हा नविन नवाब गादीवर येताच वेलस्लीने नवाबाच्या पुतण्याशी म्हणजेच अझीमुद्दौलाशी तह करून नवाबाची उपाधी व पेन्शन याच्या मोहबदल्यात कर्नाटकचे मुलकी व लष्करी शासन कंपनीकडे सोपविन्याचा करार केला. खरे तर हा करार कायदेशीर नव्हता. कारण अझीमुद्दौला हा कर्नाटकच्या गादीचा वारसच नव्हता. तसेच नवाबाने टिपूशी केलेल्या पत्रव्यवहाराचा श्रीरंगपट्टम येथे सापडलेल्या कागपदत्रातून कुढलाही पुरावा सापडत नाही. वेलस्लीने साम्राज्यवादी धोरणाच्या अंतर्गत हे राज्य जिंकले होते.

मराठा राज्य–

१८ व्या शतकाच्या अखेरीस भारतात ब्रिटीशांना आव्हान देऊ शकेल अशी एकच सत्ता होती. ती म्हणजे मराठा पण या दरम्यान मराठा राज्यात निर्माण झालेली यादवी, आराजक व गोंधळ या स्थितीचा फायदा ब्रिटीशांनी घेतला. यशवंतराव होळकर यांच्या वाढत्या सामर्थ्याला घाबरून दुस–या बाजीराव ३१ डिसेंबर १८०२ रोजी ब्रिटीशांशी वसईचा तह केला. या तहाद्वारे बाजीरावने ६,००० पायदळाची तैनाती फौज स्वीकारून तिच्या खर्चासाठी २६,००,०००/– रूपये वार्षिक उत्पन्न असलेला प्रदेश ब्रिटीशांना तोडून देण्याचे मान्य केले. पण हा वसईचा तह मराठा संघानील अन्य सदस्यांना म्हणजेच शिंदे, होळकर व भोसले यांना मान्य नव्हते. पण ब्रिटीशांनी धूर्तपणे मराठा सरदारांना एकजूट होऊ न देता त्यांचा वेगवेगळे लढून देण्यासभाग पाडले. ज्यामुळे शिंदेनी १८०३ मध्ये सुर्जो अंजनगावचा तह, भोसल्यांनी देवगावचा तह तर १८०६ मध्ये राजपूरघाट येथे होळकरांशी तह केला.

म्हैसूर–

तिस–या इंग्रज म्हैसूर युध्दात टिपूला आपले अर्धे राज्य गमवावे लागले होते. त्यामुळे १७९९ मध्ये लॉर्ड वेलस्लीने टिपूवर तैनाती फौज स्विकारण्यास दबाव टाकला. पण टिपूने नकार दिल्याने वेलस्लीने टिपूची राजधानी त्रावणकोर वर हल्ला चढविला. त्यात टिपू मारला गेल्याने म्हैसूरच्या गादीवर ओडयार वंशाच्या कृष्णराव यास बसविले. व या राज्यावर तैनाती फौज लादली. व त्या सैन्याच्या खर्चासाठी प्रतिवर्ष ७,००,०००/– पगोडा दयावा अशी अट घातली. अवध–बक्सारच्या लढाई पासूनच अवध हे ब्रिटीश प्रभावाखालचे राज्य होते. ब्रिटीशांनी अवधच्या नवाबाशी विविध करार करून आर्थिक, राजकीय व लष्करी दृष्टया अवधला कुमकवत बनविले. १८०१ मध्ये ब्रिटीशांनी जबरदस्ती अवधच्या नवाबाकडून एक करार करून त्याला तैनाती फौज स्विकारण्यास बाध्य केले. या व्यतिरीक्त नवाबाकडून रोहिलखंड, गोरखपूर, गंगा–यमुनेचा दोआब इत्यादी प्रदेश मिळून जवळपास अवध राज्याचा निम्मा प्रदेश ब्रिटीशांनी मिळवला.

तैनाती फौजेच्या पध्दतीचे मुल्यमापन –

तैनाती फौज ही पध्दत भारतीय राज्यांसाठी फारच हानिकारक ठरली. १७९८ मध्ये ब्रिटीश भारतातील एक प्रमुख शक्ति होती. पण १८०५ मध्ये ती भारतातील एक सर्वेश्रेष्ठ शक्ति बनली. मराठा साम्राज्य ज्यांचा भारतात १०० वर्षे कोणीही विरोध करू शकले नव्हते. तो साम्राज्य वेलस्लीच्या कुटनिती व शक्तिच्या पूढे पतन झाले. व मराठयांचे राज्य व परराष्ट्रिय धोरण ब्रिटीशांच्या हाती गेले. अवधचा नवाब व हैद्राबादचा निजाम यांना आपले अर्धे साम्राज्य ब्रिटीशांना देण्यास वेलस्लीने भाग पडले. तर कर्नाटक, तंजावर व सूरत इत्यादी प्रदेश ब्रिटीश साम्राज्याचा एक भाग बनले. म्हैसूरच्या टिपूची सत्ता संपूस्ठात आणून तिचे ब्रिटीशांनी अप्रत्यक्षरित्या आपली सत्ता गाजवली. फ्रांन्सचा प्रभाव भारतातून नाहिसा झाला. मद्रास, मुंबई व बंगाल इत्यादी राज्य स्थलमार्गाद्वारे एकमेकांशी जोडले गेले. तर आग्रा, दिल्ली, रोहिलखंड इत्यादी प्रदेश त्यांना मिळाल्याने उत्तर भारतात त्यांची सत्ता मजबूत झाली. तसेच अनेक महत्वपूर्ण सागरी किनारपट्टी ब्रिटीशांना मिळाली. वेलस्लीने केवळ कुटनिती व दंडेलशाहीच्या जोरावर भारतातील विविध राज्य ब्रिटीश साम्राज्यास जोडली. एक सर्वोच्च सत्ता म्हणून भारतात ब्रिटीश ईस्ट इंडिया कंपनीला प्राप्त झालेली. अव्वल दर्जाचे स्थान हे वेलस्लीचे महत्वाचे योगदान आहे. सिडने – जे ओवन यांच्या मते.***"wellesly converted the british empire in india to the British empire of india"***

संदर्भ ग्रंथ –

१) Om Prakash – lord Wellesley and policy of expansion (Anmol pub.Dec. 2004)

२) James mill – The history of British India (vol – 3) (associated publishing House, New Delhi)

३) Alfred lyall – The Rise and expansion of British Dominion in India (Shree publishing house, Delhi)

४) RamakrishnaMukherjee – The Rise and fall of the east Indiacompany. (Popular prakashan, Bombay)

५) पी.ई. रॉबर्टस (अनुवादक – रामकृष्ण शर्मा कॅवल) – ब्रिटीशिकालीन का भारत का इतिहास (एस. चंन्द ॲन्ड कंपनी, नई दिल्ली)

६) एल.पी.शर्मा – आधुनिक भारत (लक्ष्मीनारायण अग्रवाल पब्लिकेशन, आग्रा)

७) बी.एल. ग्रोवर व एन के बेल्हेकर आधुनिक भारताचा इतिहास (एस. चंन्द ॲन्ड कंपनी नवी दिल्ली)

८) बिपीन चंन्द्र, अमलेश त्रिपाठी, बरूनडे (अनुवादक – मा. कृ. पारधी) – स्वातंत्र्याचा लढा. (नेशनल बुक ट्रस्ट NBT, इंडिया)

25. फलटण संस्थानामध्ये झालेला शैक्षणिक विकास

प्रा. डॉ. संतोष तुकाराम कदम
इतिहास विभाग प्रमुख
एस.बी.आर. कॉलेज, म्हसवड,

भारतास स्वातंत्र्य मिळण्यापूर्वी ५६२ संस्थाने होती. त्यापैकी फलटण संस्थान हे दक्षिण महाराष्ट्रातील सर्वात जुने आणि वैभवशाली संस्थान होते. त्याची स्थापना सन १२८४ मध्ये पहिल्या निंबराज(परमार) याने केली. सन १२८४ ते १९४८ पर्यंत हे संस्थान अनेक राजकीय चढउतार व स्थित्यंतरे यातून गेले. एकंदर २५ राज्यकर्ते या फलटणच्या नाईक निंबाळकर घराण्यात होऊन गेले.

शिवपूर्व काळातील महाराष्ट्रात जी जुनी ऐतिहासिक घराणी होऊल गेली, त्यात नाईक निंबाळकर घराण्याचा समावेश होतो. सुरूवातीला ८४ गावांचे संस्थान लहान असलें, तरी मानाने मोठे होते. फलटणच्या नाईक निंबाळकर घराण्याची राजकीय सत्ता ६६४ वर्षे अबाधित राहीली.[१] अशा या संस्थानच्या सत्ताधिशांचा इतिहास हा गौरवशाली आणि वैभवशाली होता. या संस्थानातील सत्ताधिशांनी आपल्या प्रजेच्या शैक्षणिक विकासाच्या दृष्ट्रीने जाणीवपुर्वक सातत्याने प्रयत्न केले.

शिक्षण प्रसार :–

मानवाच्या सर्वांगीण उन्नतीचा सर्वात महत्त्वाचा घटक शिक्षण आहे. एवढेच नव्हे तर शिक्षणाने मानवाला प्रगल्भता प्राप्त होते. याची जाणीव येथील सत्ताधीशांना होती. म्हणूनच त्यांनी फलटण संस्थानातील प्रजेला शिक्षणाची सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी विपुल प्रमाणात पैसा खर्च करून अनेक गावी प्राथमिक व माध्यमिक शाळा सुरू केल्या.

प्राथमिक शिक्षण :–

श्रीमंत मुधोजीरावांनी मुलीच्या शिक्षणाकडे लक्ष दिले होते. सन १८८४–८५ मध्ये फलटण संस्थानामध्ये मुलींसाठी स्वतंत्र असे 'गर्ल्स स्कूल' सुरू केले. या शाळेत दुसरीपर्यंतचे वर्ग होते.[२] पुढे फलटण संस्थानच्या ग्रामीण भागात मुलामुलींच्या प्राथमिक शिक्षणाची सोय व्हावी या हेतुने श्रीमंत मालोजीरावांनी आपल्या कारकिर्दीत साखरवाडी, बरड, गुणवरे, तरडगाव व बिबी इत्यादी ठिकाणी इयत्ता सातवीपर्यंत शिक्षण देणाऱ्या शाळा सुरू केल्या. तसेच संस्थानातील अनेक लहान गावामध्ये इयत्ता चौथीपर्यंतचे शिक्षण देणाऱ्या शाळा सुरू केल्या. दि.०९/०९/१९१८ रोजी श्रीमंत मालोजीरावांनी शिक्षणाचे महत्व ओळखून नगरपालिकेच्या क्षेत्रामध्ये प्राथमिक शिक्षणाचा सक्तीचा कायदा केला होता.[३]

माध्यमिक शिक्षण :–

फलटण संस्थानातील मुलांच्या इंग्रजी व माध्यमिक शिक्षणासाठी सन १८८३–८४ मध्ये 'ॲग्लो व्हर्नाक्युलर स्कूल' या नावाने शाळा सुरू केली. शाळेकडे तालुक्यातील विद्यार्थी मोठया संख्येने आकर्षित झाले. यावेळी श्रीमंत मुधोजीरावांनी शाळेसाठी १४ हजार रूपये खर्च करून स्वतंत्र, दिमाखदार, नवीन वास्तू उभारली आणि दि.५ डिसेंबर १९८३ रोजी या वास्तूत 'मुधोजी इंग्लिश स्कूल' सुरू झाले. पुढे या शाळेचे दि. १ जानेवारी १८९५ रोजी 'मुधोजी हायस्कूल' असे नामकरण झाले.[४] पुढे श्रीमंत मालोजीरावांनी माध्यमिक इंग्रजी शिक्षण घेणे शक्य व्हावे या उद्देशाने आपल्या कारकिर्दीत मुधोजी हायस्कूलमध्ये प्रारंभी मोफत शिक्षणाची सोय केली. पुढील काळात अगदी अल्प स्वरूपात फी घेण्यास सुरूवात केली. पण मागासवर्गीय विद्यार्थ्यांना फी पूर्णपणे माफ केली. शिवाय गरीब व होतकरू विद्यार्थ्यांना नादारी दिली जाई. पुढे माध्यमिक शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या वाढल्याने मुधोजी हायस्कूलची इमारत अपुरी पडू लागली ही गैरसोय दूर करण्यासाठी श्रीमंत मालोजीराजांनी सन १९३९ मध्ये रू.६०,०००/– खर्च करून आठ–आठ खोल्यांचे दोन मजली विभाग बांधले. तसेच विद्यार्थ्यांसाठी प्रयोगशाळेची व फर्निचरची सोय केली.[५] आर्थिकदृष्ट्या कमकुवत म्हणून शिक्षणापासून वंचित राहणाऱ्या विद्यार्थ्यांकरीता 'युवराज प्रतापसिंह गरीब विद्यार्थी शैक्षणिक फंड लि.' या नावाची सहकारी सोसायटी स्थापन करण्यात आली. आपल्या संस्थानातील इच्छा असणारा एकही विद्यार्थी शिक्षणापासून वंचित राहू नये याची दक्षता त्यांनी घेतली होती.[६]

मोफत शिक्षण :–

फलटण येथे मुलींच्या शिक्षणाची सोय नाही व मुलांच्या हायस्कुलात मुलींना पाठविल्यास प्रजाजनांस संकोच वाटत असे. त्यामुळे श्रीमंत लक्ष्मीदेवी राणीसाहेब यांनी आपली कन्या श्रीमंत सरोजनीदेवी उर्फ आक्कासाहेब यांना सन १९३९ मध्ये हायस्कूलमध्ये पाठविले. तेव्हापासून हायस्कुलमध्ये मुलींची संख्या वाढत जावू लागली. श्रीमंत मालोजीरावांनी संस्थानातील माध्यमिक शिक्षण मुलींसाठी मोफत केल्याची घोषणा सन १९३२–३३ मध्ये केली. या घोषणेमुळे इयत्ता पहिलीपासून ते मॅट्रिकच्या शिक्षणापर्यंत मुलींची मोफत शिक्षणाची सोय झाली. त्यामुळे आर्थिक बाबींपासून वंचित राहणाऱ्या मुलींच्या शिक्षणाची सोय झाली.

इंग्रजी शिक्षण :–

श्रीमंत मालोजीराजांच्या प्रेरणेने व प्रोत्साहनाने सन १९२१ मध्ये राजवाड्यात फलटण मधील प्रौढ स्त्रियांना इंग्रजी शिकविण्याचा वर्ग सुरू करण्यात आला होता. या वर्गात सौ. लिखिते, सौ.उषाताई कानेटकर, सौ. हळबे, श्रीमंत लक्ष्मीदेवी राणीसाहेब व इतर स्त्रिया शिक्षण घेत होत्या.या वर्गाला शिकविण्याची जबाबदारी श्री.शं.के.कानेटकर यांच्यावर सोपविली होती.[८]

अस्पृश्य समाजातील विद्यार्थ्यांना शिक्षण :—

श्रीमंत मालोजीराजे यांच्या अंत:करणात पददलित वर्गाबद्दल कणव होती. अस्पृश्य समाजातील मुलांना शिक्षणाची संधी उपलब्ध व्हावी. मिळालेल्या शिक्षणाच्या बळावर त्यांनी स्वत:ची व आपल्या समाज बांधवांची उन्नती साधावी या उद्देशाने श्रीमंत मालोजीराजांनी आपल्या संस्थानातील अस्पृश्य समाजातील मुला—मुलींना प्राथमिक व माध्यमिक शाळामध्ये संपूर्ण फी माफीची सवलत दिली होती.[९]

प्रतापसिंह शेतकरी बोर्डींग:—

फलटण संस्थानच्या ग्रामीण भागातून माध्यमिक शिक्षण घेण्यासाठी फलटणमध्ये येणाऱ्या शेतकऱ्यांच्या मुलांची निवासाची व भोजनाची गैरसोय दुर करण्यासाठी सन १९४१ मध्ये श्रीमंत मालोजीराजांनी बोर्डिंग समिती स्थापन करून त्या समितीला १० एकर जमीन देणगी दिली तेथे बोर्डिंग बांधून ग्रामीण भागातील शेतकऱ्यांच्या मुलांची निवासाची व भोजनाची सोय केली. या बोर्डिंला 'प्रतापसिंह शेतकरी बोर्डिंग' असे नाव देण्यात आले.[१०]

स्त्री शिक्षण :—

स्त्रियांच्या शिक्षणाचे महत्व श्रीमंत मालोजीराजांनी जाणले होते. परंतु पारंपारिक विचाराच्या प्रभावाखाली असणाऱ्या समाजात त्यावेळी मुलीच्या शिक्षणासंबंधाने दोन प्रमुख अडचणी होत्या. पालक मुलींना मुलांच्या शाळेत पाठविण्यास तयार नव्हते आणि मुलींचे शिक्षण तिच्या लग्नानंतर फुकट जाते तेव्हा त्यावर पैसा कशासाठी खर्च करावयाचा?अशी पालकांची भ्रामक समजून झाली होती. या दोन्ही अडचणींवर मात करण्यासाठी श्रीमंत मालोजीराजांनी सन १९३२ मध्ये प्रथम आपली सुकन्या श्रीमंत सरोजिनीदेवी उर्फ आक्कासाहेब यांना फलटणच्या शाळेत घातले आणि प्रजेपुढे एक आदर्श निर्माण करून जनमत बदलण्यासाठी प्रत्यक्ष कृती केली. केवळ खर्चाच्या सबबीमुळे मुलींना शिक्षणापासून वंचित ठेवले जावू नये म्हणून श्रीमंत मालोजीराजांनी आपल्या संस्थानात मुलींना संपूर्ण फी माफी दिली होती.[११]

प्रौढ शिक्षण :—

फलटण संस्थानातील खेडोपाडी मंडळामार्फत शिक्षणाचे महत्व पटविण्यासाठी व्याख्याने आयोजित केली जात होती. तसेच वाचनाची आवड प्रौढ स्त्रियांमध्ये निर्माण व्हावी म्हणून फलटण संस्थानातील गुणवरे, पिंप्रद, विडणी, तरडगाव येथे मंडळामार्फत वाचनालये सुरू केली होती[१२]

शारिरीक शिक्षण व संगीत :—

विद्यार्थ्यांच्या बौध्दिक विकासाबरोबर शारीरीक सामर्थ्यांचा विकास झाला पाहिजे या उद्देशाने श्रीमंत मालोजीराजांनी फलटण संस्थानातील शाळामध्ये शारीरीक शिक्षण सक्तीचे केले. तर मुधोजी हायस्कूलमध्ये शारीरीक शिक्षण हा परीक्षेसाठी स्वतंत्र विषय सुरू केला. मुलांसाठी क्रिकेट, व्हॉलीबॉल, फुटबॉल तर मुलींसाठी आट्या पाट्या, खो—खो, कबड्डी, लेझीम इत्यादी खेळ सुरू केले. त्याबरोबरच विद्यार्थ्यांच्या ठायी असणाऱ्या कला गुणांचा विकास व्हावा म्हणून संगिताच्या शिक्षणाची सोय केली.[१३]

समारोप :— यावरून असे दिसून येते की फलटण संस्थानातील सत्ताधिशांनी आपल्या संस्थानात शैक्षणिक विकास मोठ्या प्रमाणात घडवून आणला.

संदर्भसूची :

१) फलटण संस्थानचा वार्षिक प्रशासकीय अहवाल सन १९३१—३२, पान २२

२) दै. लोकमत सिंहावलोकन, दि.३/८/२०१३ पान १५.

३) देशमुख विश्वासराव (प्राचार्य) मालोजीराजे, श्रीमंत मालोजीराजे स्मृती प्रतिष्ठान, फलटण, २००४, पान.३४.

४) दै. लोकमत सिंहावलोकन, उपरोक्त, पान १५.

५) आपटे विक्रम (संपा.), विवेकानंद, विभागीय मराठी साहित्य संमेलन सरणिका, फलटण २०११, पान ४०, ४१

६) देशमुख विश्वासराव (प्राचार्य),उपरोक्त, पान.३५.

७) फलटण दरबार आज्ञापत्रिका दि.१० एप्रिल १९३०, पान ४४.

८) दै. स्थैर्य, दि.१९/११/२०१२ पान २.

९) भोसले शिवाजीराव (संपा), स्मरणिका, कै.मालोजीराजे नाईक निंबाळकर राजेसाहेब पुतळा स्मारक समिती, फलटण, १९८३ पान २७.

१०) नाईक निंबाळकर श्रीमंत विजयसिंह तथा शिवाजीराजे, रयत सेवक: श्रीमंत मालोजीराजे, श्रीमंत मालोजीराजे स्मृती प्रतिष्ठान, फलटण, १९९७, पान १७.

११) दै.स्थैर्य, उपरोक्त, पान २.

१२) फलटण दरबार आज्ञापत्रिका दि.१५ डिसेंबर १९३८, पान २०.

१३) आपटे विक्रम (संपा), उपरोक्त पान ४१.

26. राजर्षी शाहू महाराज यांनी भटक्या, विमुक्त जाती-जमातीच्या कल्याणार्थ केलेले कार्य'

प्राचार्य डॉ. एस. डी. घोलप
श्रीमंत भैयासाहेब राजेमाने महाविद्यालय,
म्हसवड. ता. माण, जि. सातारा.

प्रस्तावना:—

आधुनिक महाराष्ट्राच्या जडणघडणीत राजर्षी शाहू महाराजांचा बहुमोल वाटा आहे. बहुजन समाजाचा उध्दार करणाऱ्या महात्मा फुलेंचा वारसा चालविणारा राजा म्हणून महाराष्ट्राच्याच नव्हे तर हिंदुस्थानच्या इतिहासातील त्यांच एक महत्वपूर्ण स्थान आहे. इंग्रजांनी सन १८७१ साली 'गुन्हेगार जमाती कायदा' जारी केला आहे. त्यामुळे भटक्या जमातीतील एखादी व्यक्ती कितीही चांगली असो, प्रामाणिकपणे पोट भरत असो, त्यांना गुन्हेगार जमातीचा म्हणून ओळखले जाऊ लागले.[१] सन १८७१ च्या कायद्यानुसार अंदाजे २०० च्या आसपास बहुसंख्या भटक्या जातींना गुन्हेगार जाती म्हणून अधिसूचित केले.[२] हा कायदा गुन्हेगार जमातीचा अभ्यासक टि.व्ही. स्टिफन्स यांच्या तीन गृहितकांवर आधारित होता व त्यांनी गुन्हेगार जातीमध्ये फासेपारधी, कोरवी, कुचीकोरवी, वुडडर, डोंबारी, गोसावी, रजपूत भामटा यांचा प्रामुख्याने समावेश केला होता. अशा भटक्या विमुक्त जातींना त्यांच्या गुन्हेगारी क्षेत्रापासून त्यांचे परिवर्तन करुन माणसात आणण्याचे काम राजर्षी शाहू महाराज यांनी केले आहे. एवढेच नव्हे तर ब्रिटीश भारतातला गुन्हेगार जमातीचा कलंकित कायदा सर्व देशाने स्वीकारला असताना राजर्षी शाहू महाराजांनी आपल्या संस्थानात तो नाकारला आणि आपल्या संस्थानात या गुन्हेगार जमातींना आश्रय दिला म्हणून राजर्षी शाहू महाराजांचे भटक्या विमुक्त जाती जमातीच्या कल्याणाबाबत उदारमतवादी दृष्टीने केलेले कार्याचा पुढीलप्रमाणे आढावा घेतला आहे.

फासेपारधी :—

जिवंत पक्षी व प्राणी फासाच्या सहाय्याने पकडण्यात पारंगत असलेली वन्य जमात म्हणजे फासेपारधी होय. फासेपारधी ही शूर, काटक व सर्वांत विश्वासू जात होती. जीव गेला तरी विश्वासघात करणार नाही. जंगलातील पक्ष्यांना व प्राण्यांना पकडून ते आपला उदरनिर्वाह करीत पण केवळ यावर त्यांचा उदरनिर्वाह होत नसे. त्यामुळे अवैध मार्गाने जीवन जगण्याचा हे लोक प्रयत्न करू लागले.[३] फासेपारध्यांचा जथा फार जंगी असतो. त्यांच्या तळावर कधी कधी १०० पर्यंत माणसे असतात. ते आपली गुरे उभ्या पिकात चारतात व पेवातील धान्य, गुरे, शेळया, मेंढया व उभे पीक यांची चोरी करतात. जमिनीमध्ये लहान भेग असेल तर ती खोदून तळाशी मोठी खाच करून तिच्यामध्ये चोरीचे अन्न घालून बंद करतात.[४] अशा प्रकारचा फासेपारधी लोकांबद्दल समज होता.

सर्व गुन्हेगार जमातीमध्ये सर्वात 'खतरनाक गुन्हेगार जात' म्हणून फासेपारधी ओळखले जात होते. आपल्या राज्यातील फासेपारध्यांना पकडून तुरूंगात टाकणे किंवा इंग्रजांच्या सेटलमेंटप्रमाणे तारेच्या कुंपणाच्या वसाहती तयार करणे महाराजांना अवघड नव्हते. पण छत्रपतींचा मुक्काम कटकोळ येथे होता. त्यावेळी फासेपारधी जमातीबद्दल लोकांनी एक तक्रार केली होती. हे लोक चोरटे आहेत. लहान मोठया चोऱ्यांनी लोक हवालदिल झाले आहेत. महाराजांच्या कॅम्पवरसुध्दा हे लोक चोऱ्या करणार आहेत. महाराजांनी लोकांच्या तक्रारी ऐकून घेतल्या आणि आपले सैनिक पाठवून बऱ्याच फासेपारध्यांना अटक केली. पण महाराजांनी अटकेतील फासेपारध्यांना शिक्षा केली नाही उलट चांगले जेवणखाण दिले. हे लोक चोऱ्या का करतात?हे महाराजांना समजून घ्यायचे होते. फासेपारध्यांशी चर्चा केल्यानंतर महाराजांना समजले की, उदरनिर्वाहाच्या अपुऱ्या साधनांमुळे कुटुंबाचे पोट भरत नाही, त्यामुळे पोटासाठी चोऱ्या कराव्या लागतात. चोऱ्यांचे महाराजांना खरे कारण कळाले. त्यांना फार वाईट वाटले. त्यांनी सर्व फासेपारध्यांना त्यांच्या कुटुंबासह सोनतळीला हलविले. प्रत्येकाला शिधा देण्याची व्यवस्था केली. शूर, काटक, विश्वासू फासेपारध्यांना नोकऱ्या दिल्या.[५] पण इतर ७० ते ८० कुटुंबांना कोणते काम दयायचे?फुकटचा रोजचा शिधा त्यांना ऐतखाऊ बनवणार होता. महाराजांना ते नको होते. भटकणाऱ्या फासेपारध्यांच्या वसाहत निर्मितीसाठी महाराजांनी प्रयत्न केला. १६ नोव्हेंबर १९१२ रोजी कोर्टातीर्थ माळावर फासेपारधी लोकांना त्यांच्या तेवीस कुटुंबास झोपडया बांधून दिल्या व या कामासाठी संस्थानकडून बाराशे रूपये देण्यात आले.[६] १९१७ मध्ये अलगवाडी खणदाळ कांकणवाडी गावात फासेपारध्यांना जमिनी दिल्या. खणदाळ येथे फासेपारध्यांना एकूण १२० एकर १० गुंठे जमीन दिली. या जमिनीची किंमत २२ रूपये होती.[७] राजर्षी शाहू महाराजांनी खतरनाक गुन्हेगार समजल्या गेलल्या फासेपारध्यांना आपले नातेवाईक मानले. फलटणचे राजे कै.बुवासाहेब नाईक निंबाळकर यांच्याशी चर्चा करताना महाराजांनी हा खुलासा दिला.[८]

महाराजांनी फासेपारध्यांना रोजगार धंदा उपलब्ध करून दिला. महाराजांचा रायबागला एक बंगला होता. त्या बंगल्यावर फासेपारध्यांना पहारेकरी म्हणून ठेवले.[९] आंबेवाडी ते सोनतळी हा रस्ता बांधण्याचे काम फासेपारध्यांकडे सोपविले. सोनतळीवर अब्दुल हवालदार मुकादम म्हणून काम करीत होता तर पगार वाटपासाठी महाराजांनी विठ्ठलराव देसाई यांची नेमणूक केली होती. तसेच महाराजांनी काही फासेपारध्यांना राधानगरी धरणाच्या कामावर पाठविले.[१०] या जमातीला कष्टाने काम करून सन्मानाने जगायला शिकविले. माधवराव बागल यांच्या मते ''राजाच्या शिकारीच्या नादाने शेकडो फासेपारधी जे अंत्यजाच्याही पलिकडे असत. ते सुधारून उदयोगधंदयाला लागले. ज्यांना समाजात कुठेच जागा नव्हती, त्यांना महाराजांनी माणुसकीची जाणीव करून दिली.''[११] कितीतरी जमातीच्या लोकांनी आपल्या पदरी बाळगले. त्यांना नोकऱ्या दिल्या. स्वत:चे शरीररक्षक, शिकारीतील सहकारी, राखणदार म्हणून त्यांना सेवेत घेतले. आजचे शिवाजी विद्यापीठ ज्या जागेवर बसले आहे ती जागा (सुमारे ६०० एकर) पारधी कंजारभाटांना महाराजांनी बक्षिस म्हणून दिली होती.[१२]

माकडवाले :–

इंग्रजांनी ज्या त्या प्रांतातील उठाव करणाऱ्या जमाती त्या त्या प्रांतात न ठेवता त्यांना अन्य प्रांतात दूर ठिकाणी विभक्त अवस्थेत ठेवले त्याप्रमाणे कैकाडी, कोरवी समाज तामिळनाडूतून महाराष्ट्रात आणला. या जातीला कोरवी, कुचीकोरवी किंवा माकडवाले असे म्हणतात. कोरवी समाजापैकी कुंची करू लागले. कुंची म्हणजे रंगारी लोकांना लागणारे कुंचले. म्हणून त्यांना कुंची कोरवी म्हणू लागले. काही माकडे पकडण्यात पटाईत होते. ते माकडे पकडून त्यांचा खेळ करीत असत. त्यांना माकडवाले म्हणू लागले. करवीर नगरीला लागून जाणाऱ्या जुन्या पुणे–बॅगलोर महामार्गालगत सदर बाजाराला लागून मिशन हॉस्पिटलच्या जवळ माकडवाल्यांची वसाहत उभी केली. त्यांना सरकारी नोकरीत सामावून घेतले. मुलाबाळांच्या शिक्षणाची सोय केली. औषधपाण्याची व्यवस्था लावली व स्त्री पुरूषांना रोजंदारीच्या कामावर ठेवले. तोरगलकर सरकारकडे एकदा शाहू महाराज गेले होते. तोरगलकर आणि शाहू महाराज एकत्र शिकार करीत होते तेंव्हा इराप्पा कोरवींच्या शिकारीची पध्दत महाराजांना आवडली आणि कोरव्यांना आपल्या संस्थानात त्यांच्या कुटूंबासह आणले आणि त्यांना शिकारखान्यात नोकरीस ठेवले. गुराप्पा कोरवी या तरूण मुलग्याला पैलवान केले आणि त्याला राजाश्रय दिला.[१३]

वडार समाज :–

शाहू महाराजांनी अनेक भटक्या समाजांना जवळ केले. त्यांच्यामधील गुणवान लोकांच्या गुणांनी संधी दिली. वडार (वड्डु) हा अशापैकीच एक भटका समाज होय. असेच एकदा आपल्या खडखड्यातून महाराज फेरफटका मारत असताना त्यांनी वडार समाजातील इराप्पा नावाच्या एका आडदांड वड्डुस पाहिले. हा वड्डु दगडाच्या खाणीतून एकटाच दगड काढत होता आणि एकटयानेच मोठमोठे दगड उचलून गाडी भरत होता आणि दगडांनी भरलेली गाडी एकटाच ओढत. महाराज त्याच्या पीळदार शरीराकडे कौतुकाने पहात होते. काही दिवसांनी कोल्हापूरात पंजाबी पैलवान आले होते. या पैलवानांनी महाराजांकडे येऊन आपल्या लढतीस जोड मागितला. महाराजांनी इराप्पाला बोलावून घेतले आणि पंजाबी पैलवानाबरोबर कुस्ती धरण्यास सांगितले. खरे म्हणजे इराप्पा हा काही पैलवान नव्हता. त्यास कुस्तीचे डावपेच माहित नव्हते. पण महाराजांची आज्ञा होताच इराप्पा तयार झाला. पंजाबी पैलवान आणि इराप्पा यांची कुस्ती सुरू झाली. इराप्पाने कुस्ती जिंकली. शाहू महाराज इराप्पावर खुष झाले आणि वडार समाजाला खाणीसाठी जागा दिली.[१४]

डोंबारी समाज :–

शाहू महाराजांनी असाच जवळ केलेला दुसरा भटका समाज म्हणजे डोंबारी (कोल्हाटी) हा होय. एकदा महाराज कोल्हापूरहून राधानगरीच्या जंगलात शिकारीला निघाले होते, रस्त्यात त्यांना डोंबाऱ्याचा तांडा दिसला, महाराजांनी आपला खडाखडा थांबवून त्यांची चौकशी केली. तेंव्हा तांडयाचा प्रमुख घाबरत–घाबरत महाराजांच्या जवळ येऊन म्हणाला महाराज आम्ही डोंबारी लोक! भाताची सुगी मागायला निघालोय. महाराजांनी विचारले, तुम्ही काय काय काम करता?कोणत्या वस्तु बनवता? तेंव्हा तो डोंबारी म्हणाला 'आम्ही फिरती लोकं, आम्ही गाणं म्हणतो. ढोलगं वाजवतो, त्यावर आमच्या बायकापोरी नाचतात मग माणसं सुगीच्या दिवसात आमच्या पदरात काही ना काहीतरी टाकतात. आम्ही जनावरांच्या शिंगापासून निरनिराळया चिजा बनवतो. पक्षांचे पिंजरेपण तयार करतो. महाराजांनी त्यांना पक्षाचा एक पिंजरा तयार करण्यास सांगितले. पक्षाचा सुंदर पिंजरा तयार करून डोंबारी महाराजांच्या वाडयावर गेले. डोंबाऱ्यांनी तयार केलेल्या त्या सुंदर वस्तु पाहून महाराज खुष झाले. ते म्हणाले अरे, तुम्ही तर हरहुन्नरी सुतारासारखे कलावंत आहात. खरं म्हणजे तुम्हाला सुतार डोंबारी म्हणायला पाहिजे. आजपासून तुम्ही सुतार डोंबारी आहात. अशा हिंडणाऱ्या सर्व टोळयांची वसाहती महाराजांनी कोल्हापूरमध्ये निर्माण केली. त्यांना व्यवसाय काढून दिले. शिक्षण देण्याची योजना आखली व सरकारी खर्चाने त्यांच्यासाठी घरे बांधली.[१५] महाराजांनी या समाजाची भटकंती थांबविण्यासाठी त्यांच्यापैकी अनेकांना सरकारी कामावर घेतले. कोल्हापूरच्या जयंती ओढयाजवळ या समाजासाठी जागा दिली तेथे हा समाज घरेदारे बांधून स्थायिक झाला.

उपसंहार :–

छत्रपती शाहू महाराजांनी आपल्या कारकिर्दीत अस्पृश्यता निवारण, स्त्री शिक्षण, मोफत सक्तीचे शिक्षण, विद्यार्थी वसतिगृहाची चळवळ, धरणे बांधून हरीतक्रांतीच्या दिशेने केलेली वाटचाल इ. विविध क्षेत्रात बहुमोल कार्य केले. त्याचबरोबर शाहू महाराजांनी संस्थानामध्ये दौरे काढून भटक्या लोकांमध्ये मिसळून त्यांच्या समस्या जाणून घेतल्या व त्यांच्या समस्यांचा अभ्यास करून त्यांच्यासाठी घरे बांधून दिली. उदरनिर्वाहासाठी फासेपारध्यांना जमिन दान दिल्या. भटक्यांना काम मिळावे यासाठी संस्थानामधील विविध पदांवर त्यांच्या नेमणूका केल्या. त्यांच्या आरोग्याची काळजी घेतली. भटक्या लोकांच्या मुलांनी शिक्षण घ्यावे यासाठी शिक्षणाची सोय केली. पण सर्व सुविधा देऊन त्यांना आळशी बनविले नाही. तर त्यांना व्यवसायाभिमुख बनवले. अशा प्रकारे शाहू महाराजांनी भटक्या लोकांना माणसात आणण्यासाठी क्रांतीकारक सुधारणा केल्या व त्यांना सन्मानाने जगायला शिकविले. भटक्या विमुक्त समाजातील एक कार्यकर्ते व लेखक लक्ष्मण माने यांनी एका ठिकाणी म्हंटले आहे.'शाहू महाराजांनी फासेपारधी सारख्या अनेक भटक्या–विमुक्त जमातीवर आईच्या मायेने व पित्याच्या वात्सल्याने प्रेम केले. देवाच्या ठिकाणीच आईची माया व पित्याचे वात्सल्य एकरूप असते. म्हणूनच ही समाजाकडून तिरस्कृत झालेली माणसे शाहू महाराजांना देव मानत होती. अशा लोकांच्या श्रध्देतच शाहू महाराजांचे समाजक्रांतीचे मुर्त स्वरूप पाहावयास मिळते.' म्हणूनच राजर्षी शाहू महाराज 'भटक्या विमुक्त जातीचे मुक्तीदाता' होते. छ.शाहू महाराजांचे हे कार्य राष्ट्रउभारणीचे कार्य होते.

संदर्भ सूची :–

१. गर्गे स.मा. भारतीय समाजविज्ञान कोष खंड ३, मेहता पब्लिकेशन हाऊस, पुणे १९८९ पानं. ३९२

२. परिवर्तनाचा वाटसरू, दि. १६ ते ३० जून, २०१३ पानं. ५८

३. सुर्यवंशी कृ.गो. राजर्षी शाहू राजा व माणूस, ठोकळ प्रकाशन, पुणे १९८४ पानं. ४२६

४. अत्रे त्रि.ना. गावगाडा, मोरे प्रकाशन, मुंबई १९५९ पानं. ८६

५. गौतम प्रज्ञावंत (संपा), शाहू राजा दि राहूल पब्लिकेशन, कोल्हापूर १९९१ पानं. १२४

६. कोल्हापूर पुरालेखागार, जनरल ठराव नं. ४९८

७. कोल्हापूर पुरालेखागार, मुलकी ठराव नं. ५४७

८. बन्ने डी.एस. राजर्षी शाहू स्मारक ग्रंथ, कोल्हापूर जिल्हा सरकारी मुद्रण व प्रकाशन संस्था लि. कोल्हापूर १९६८ पानं. ११६

९. पवार जयसिंगराव (डॉ.) राजर्षी शाहू छत्रपती: जीवन व कार्य, महाराष्ट्र इतिहास प्रबोधिनी, कोल्हापूर, २०१२ पान नं. ८६

१०. बागल माधवराव, राजर्षी शाहू महाराजांच्या आठवणी, कोल्हापूर १९९५ पानं. १७५

११. शिंदे श्रीपतराव ल. (संपा), विजयराव मा. शिंदे, राजर्षी शाहू अंक १९२३, विजयी मराठा प्रकाशन, २००७ पानं. ५१

१२. पवार ज.मा. (संपा), राजर्षी शाहू स्मारक ग्रंथ, महाराष्ट्र इतिहास प्रबोधिनी, कोल्हापूर २००७ पानं. ५०४

१३. भोसले व्यंकाप्पा, आम्ही उपेक्षित परिवर्तन प्रकाशन, कोल्हापूर २००६ पानं. २५ ते २७

१४. पवार ज.भा. (संपा) राजर्षी शाहू स्मारक ग्रंथ पानं. ५१०

१५. सुर्यवंशी कृ. गो., उपरोक्त पानं. ४११

27. EDUCATIONAL AND SOCIAL THINKER : CHHATRAPATI SHAHU MAHARAJ

Prof. Arun Sadashiv Katkole
Dept. of History
Kakasaheb Chavan College,
Talmavale. Tal: Patan, Dist: Satara.

1. Introduction

Rajarshi Shahu Maharaj was known as the epoch-making and had lion's share in changing pre independent Indian social scenario. He spread the social-revolutionary thoughts in the society. He was undoubtedly a political leader and religion reformer. He was also famous as a king of social-justice. In his political tenure he inspired the people in the society and caused changes in the ethics of equality. He shaped the mentality of Indian people. He created a change not only in Maharashtra but also in the whole India. In his age there was a wide-spread social in equality. People used to hold god as responsible for social inequality. According to them inequality was god made and there was a wide-spread blind faith. Shahu Maharaj convinced the people that the untouchability was not god made but man-made. All the backward people were stirred by his thoughts. Then there emerged a society having rational and scientific attitude.

2. Research Methodology-

There were 42 princely states in the India since before impendence. Kolhapur was one of the biggest princely states in the India. Shahu Maharaj was founder of Kolhapur princely states. Methodology play important role in research. Researcher collected data by secondary method as a magazine, books, newspapers etc.

3. Objective of Research paper –

1. To know educational thoughts of Shahu Maharaj

2. To know social situation of Shahu's kingdom.

3. To know the social equality.

4. To know the contribution of Shahu Maharaj in social work

4. Social and educational thoughts of Shahu Maharaj

Mahatma Phule was a great social reformer in Maharashtra. He was a follower of the three famous principles, namely equality, fraternity and brotherhood. His work, according to Dr. Keer is as quoted below:

The followers of Mahatma Phule worked for the uplift of the lower classes, peasants and workers promoting education, the principle of equality of man liberating women, workers and peasants from the religious and mental thralldom of the priests who added to their poverty, ignorance and superstition. Jotirao Phule knew the secret that only education is the responsible factor in the progress without which non-Brahmins were suffering. So, he opened schools and began to teach everybody who desired for it. In Maharashtra a New Era was written by his name. 'It was Mahatma Jotirao Phule who struggled to liberate the lower Classes and Indian woman from the thralldom of Brahmin scriptures, priest craft and the caste system and opened schools for their education. His followers and his organization, the Satya Shodhak Samaj, strove disseminate education among the lower and the backward classes.' Mr. A.B. Latthe also describes the efforts of Jotirao Phule as under:

Mr. Jotirao's friends under his lead started what is called the Satya Shodhak movement whose avowed object was to pull down the Brahmin cal superstition which sat heavily like an incubus upon the intellect and the soul of the non-Brahmin. They also tried to agitate for mass education in those early days. Jotirao himself inaugurated a scheme for the education of women and depressed classes. But he was born somewhat before his time in Maharashtra and died in 1890 only a pioneer, a solitary beacon light in the darkness of the age for the guidance of the non-Brahmin reformers who had yet to come. Brahmins were dominant because of their priesthood. Jotirao Phule denied their priesthood and created priest of his own non-Brahmin society.

Jotirao Phule, who had struggled to abolish priesthood based on birth, had interviewed the Maharaja (of Baroda) in 1884 at Baroda and discussed with him the principles of Satya Shodhak Samaj. The result was that his lieutenants Awate and Dhamanskar started a class to train Maratha priests. Mahatma Phule wished all-round development of the society. He observed the poor condition of farmers and depressed classes and he found out the remedy of education to improve it. In his opinion education was the base. He began the work of spreading education for backward class people. The Satya Shodhak Samaj was the first institution to spread education among the backward and suppressed classes in rural area of Maharashtra… Jotirao Phule started that work in 1848. England under her Education Act of 1870 provided schools and in 1880 made primary education compulsory up to age often. Inspired by this progressive change, Jotirao Phule was appealed to the British Government towards the close of 1879 and early in 1880 to introduce compulsory primary education into villages. For, he knew that equality as a force would operate slowly but definitely through the means of education. In the middle of nineteenth century Mahatma Phule fought against traditions of religion and mental and physical slavery of the masses, especially the downtrodden people. He tried to

achieve his goal with the help of education.

Jotirao Phule who died in 1890, before Chh. Shahu's ruling period, was an outstanding social reformer of Maharashtra. The credit must be given to him as the first leader of non- Brahmin movement in Maharashtra. His work of spreading education among the non- Brahmins and women was appreciated by British Government and then by his fellow countrymen. Prof. A.B. Latthe writes about him – Mr.Jotirao's friends had under his lead started what is called Satya Shodhak movement. … They also tried to agitate for mass education in those early days. Jotirao Phule criticized British education efforts. He always criticized 'Filtration Theory' because of its unsuccessfulness. He said about it, "They have educated many children of wealthy men, and have been the means of advancing vary materially the worldly prospects of some of their pupils. But what contribution have these made to the great work of generating their fellowmen?"

- He paid a keen attention on society so that the people should not follow discrimination.
- The untouchables had no right to education. In such problamatic situation he opened schools for the children of untouchables. Thus he started an educational revolution. Only upper-class people had right to education. So he formed some laws for the generalization of primary education. Dalits were not allowed in the class- rooms but they were kept outside the class room to take education. He banned this custom.
- The dalits got right to go to water tank and fetch water at public water tank only because of him.
- He also passed some laws for dalits to fetch water at public wells.
- He protested all the ill-customs in the society.
- He made the primary education free and compulsory for poor and uneducated people. He started the expedition of compulsory education. He had to face the protest of rich-people. But not paying attention on the protest he continued his education work.
- He gave reservation to backward people in 1902. This time also he had to face the severe protest of upper-class people.
- In 1906 he founded the educational institution to spread education.
- He also gave dalits the education related to religion.
- He passed the law of divorce.
- To reduce the distance among different castes and to bring equality and coherence among people he brought the law of inter-caste marriage. He married his own cousin sister to a man of law caste and put an example of inter caste marriage before society.
- To stop unjust with prisoners he made some improvements in rules regarding prison.
- He also banned the bad customs such as bonded labour and devdasi.
- He opened hostels for the students of every religion.
- He passed domestic violence act. Due to this act many bad customs were automatically stopped such as mental torture to women, starvation, beating wife etc. Before him there was wide spread unjust with women. No one dared to voice against it. But due to the domestic violence act women got freedom form unjust.
- He also inspired for the remarriage of widows. The widows were not allowed to remarry on the other hand widowers were allowed to remarry. Even men would practice polygamy. The Widowers would demand unmarried girl to marry and the fact was that they would get it.

5. Conclusion :

His thoughts had a power to show the right direction to society. Because of his valuable social work the people in the society got inspired and it helped for the eradication of castism. He established equality and freedom in the society. The ill customs were banned and rigid customs were loosened and there came a true harmony in the society. But his thoughts were not spread as wide as he had expected. A nation can't make progress with the society based on castism and discrimination on religion. If we really want the progress of our nation, we should build a nation of equality. It is the responsibility of every citizen to keep alive the social work and thoughts of Rajarshi Shahu Maharaj. Then there will be a society which he had dreamed. If we want to respect his social work then it is the need of time to follow his thoughts in our life. Following his thoughts in social life will only be the homage to him.

6. References :

1. Dundiyal S.P. - Research Methodology in social science. Friends' publication, Meerut 1991.
2. Sumpadak Rajlaishor - Dalit Rajniti ki samasyay.
3. Dr. Kalicharn snehi - Hindi sahityame asmite.
4. Ram Ahuja - Bahrty Samajik Samasys
5. Dr. Jaysingrao Bhausaheb Pawar, Chhatrapati Shahu's life.

28. Print Media in Marathawada under the Princely State of Hyderabad and its impacts on development

Mr. Santosh Keshav Khadase
Head Dept.of Pol.Sci.
K.B.P.college, Islampur.

Smt. Sunita S. Borde –Khadase
Head, Dept. of History
Smt C.B.Shah Mahila
Mahavidyalay, Sangli.

Introduction:

According to Archeologist, Marathwada had the tradition of thousands of years of cultural heritage. Marathwada had ruled by the different dynasties in the course of time, such as Satvahanas , Vakatakas , Challukyas and Rashtrakutas in ancient period ,Sultans and Mughals in medieval period and Nizams of Hyderabad in colonial and post independence period. Mughal king Muhammad Shah appointed a Turani Noble Asaf Jaha I as the Wazhir of Mughal Empire in 1722, but in 1724 he left for Deccan to start his own kingdom and had the title of Nizam Ul Mullk, Marathwada become the part if Nizami domain, which later came to known as the princely state of Hyderabad, outside but under the suzerainty of British India."[1] Marathwada had faced suppression in every aspect of life under the Nizami domain, till 17 September 1948. It was the colony inside the colony or slave of slave's, so obviously Marathwada had lagged behind in its development process which had almost started in the colonial period. When reform movement had emerged in all over India and particularly in Maharashtra , Marathwada was unaware about that movement because there were no source of information to understand the nature and work of that movement. It was far away from the newly emerged reforms like educational and social upliftment of women, freedom movement and print media movement. Today when we discuss about the underdevelopment issues of Marathwada region we may found its few roots in the Nizami domain, absence of direct British rule etc. News papers always plays very crucial roll in the public awareness. In the Nizamshahi newspapers couldn't reach easly in Marathwada. This research paper is an attempt to find out that were there really any scope for newly arisen print media in Marathwada under the priencly state of Hydrabad.

News papers in Marathwada :

British colonialism was the new era in social history of India. "Few of the intellectuals believed in the benign view of British rule a belief in divine dispensation or providence." [2]Mahatma Jyotiba Phule had described that in very appropriate words as divine rule in India, because British rule had showed the path of liberalism , humanitarianism, unity before the law, education, equality and many more things. Indian scholars had got familiar with the English language and western philosophers. Thus the process of thinking against the social cruelties and outdated traditions had started among Indian scholars. Consequently Galaxy of eminent social reformers like Mahatma Phule , Savitribai Phule, Lokmanya Tilak,G.G. Agarkar, Mahatma Gandhi, Dr. B.R.Ambedkar and many more had emerged on Indian horizon ." Along with the British power, English knowledge had also reached to India. Indian scholars had realized about loopholes in their tradition "[3] Maharashtra was on frontier in social reform in colonial period, but its part and parcel ,Marathwada was far behind in that movement. Since 1724 it was the territory of Nizamshahi so it couldn't benefit by the social reform movement which was largely spread out all over the Maharashtra. "In that way the question of the social reform was emerged and handled in the rest of Maharashtra can't interpreted or understood in the princely state of Hyderabad, in which Marathwada was included.British Rule , Education , western philosophy, power of news papers and work of Phule and Agarkar all those things were affecting positively to the lives of people, but maratwada was lagged behind In that process. "[4] Print media is the pillar of the success of any social or political movement because it had the power to transfer a thought into the mass movement. In that sense, News papers works like the positive transformers in the development process in any movement in any region. But there was not a single Marathi News paper till the year of 1920 in Marathwada region. It meant that Marathwada was unaware of the basic source of information like News paper, which was the foundation of reform.

In the year of 1920 shri Laxmanrao Phatak had started the first Marathi weekly named 'Nizam Vijay'. As the namesake 'Nizam Vijay' was full of with the news in nizanshahis fever , actually there were not a slight possibility to any newspaper to write a single line against Nizamshah's administration and policies. Laxmanrao Phatak had adopted a midway policy that without touching the ego and interest of Nizami rule he had written for the social awareness. "In 1920 Laxmanrao Phatakha had started to publish Nizam Vijay . He had such careful approach for the matter published in his paper wouldn't heart the Nizami rule."[5] That was a historical fact that except Nizam Vijay there was no Marathi newspaper in Marathwada under the rule of Hyderabad the princely state. "Some people from Aurangabad had started the news paper called Nagrik patra on the 10th April 1927, but Nizam Govt. had banned on that newspaper on 8 August 1931."[6]

Nizami rule had suppressed the freedom of speech and writing. Consequently the subject from marathwada region had left far away from the information regarding the various contemporary movements in political as well as in social sphere of life. They were not able to be receive any information not only from Maharashtra but also from Marathwada. "almost all the

newspapers published from each and every district of Maharashtra had banned in the princely state of Hyderabad . Kesari had banned from 1907, Dyanprakash , Kal and Vidyasevak were also in that list. Therefore Marathwada was unaware of the information related the contemporary activities in rest of Maharashtra."[7] Including Marathi, Punjabi, Bengali, Tamil, news papers were also prohibited into the Hyderabad state. "All other news papers from the various states of India had also prohibited Hyderabad state. Punjabi news papers were next to the Marathi newspapers which were strictly banned in this region."[8]

"Let leave the people unaware and rule easily" was the Nizanshaha's theory behind the suppression of print media in Hyderabad state. They didn't want to spread any single bit of information which could lead into the insurgencies against the Hyderabad state. Marathi language was even not a medium of learning in the school after primary level. Urdu was the medium of all the education in Hyderabad state. So rate of illiteracy was very high in Marathwada and it become very easy for Nizam to rule on those illiterate people. People who had benefited by primary education in Marathi medium were very few in numbers; they also couldn't read any information from news papers because Marathi news papers were not available. Social reformer like Swamy Ramnand Tirth , Govindbhai Shrof , A. K. Waghmare, Dr. Simant etc. had tried their best to awaken the Marathwada region, but they had also faced the cruality of Nizamshahi. Indian reform movement couldn't spread its roots strongly in the Marathwada region due to that reason. Rest of Maharashtra was highly affected by the social reform movements like education, women's education, widow remarriage, female feticide, etc. but Marathwada couldn't. Obviously that has resulted into the social backwardness of Marathwada which lead towards the political, economical and cultural backwardness.

Conclusion:

Marathwada as the part and parcel of the Princely state of Hyderabad had faced different kinds of suppression in the course of History. It had totally molded under the political as well as cultural impression of Nizamshahi of Hyderabad. Due to absence of sources of information like newspapers and magazines it couldn't aware thoroughly like the region from rest of Maharashtra. When all over India and particularly Maharashtra was responsing to the reform movement, Marathwada was busy to fighting against the cruelty of Nizamshahi. That's why ….

1) Overall education awareness couldn't spread into Marathwada.
2) Particularly women's education movement couldn't establish its roots during that period in Marathwada.
3) Literacy rate had remained very low in Marathwada because of the Nizanshahi's policy of the suppression of Marath language.
4) Women's reform movement such as self emollition, widow remarriage, female foticide, etc couldn't beneficial for women from this region.
5) Nizam of Hyderabad had deliberately imposed the illiteracy on subject of Marathwada.
6) Due to the ban on Marathi news papers, reform movement couldn't flourish in proper way in this region .
7) Nizami domain was the basic negative factor in social, economical, political and educational development of Marathwada.
8) After the independence, the leaders who had participated in freedom movement had actively participated in the Indian democratic politics, had the important possessions in decision making and took initiatives on the development issues of their region. But Marathwada couldn't swing in the mainstream of political leadership, which may helpful in its development process.

I would like to conclude with the reference of above mentioned points that we can find some causes of today'sunderdevelopment position of Marathwada into the Nizami rule. If there were direct rule of British Government on Marathwada, development issues might be different in its nature. If reform movements, freedom movement might have spread rapidly in Marathwada and people might had participated in that movement in full swing. But it couldn't happen because Nizami rule had closed all the doors of information very tightly to hold on its power on Marathwada region.

Reference :

1. www.wikipdia/wiki/marathwada/p.1
2. Ganachari Arvind, National and social reform in colonial situation, Kalpaz publications, Delhi,2005. P,12
3. Bhosale Narayan, Maharashtratil streevishayak sudharnavadache sattakaran, Taiechi publications, pune.2008,p.63
4. Ibid
5. Joshi D.P., Behind the curtain of ages, 19192,p.6
6. Phadke Y.D., 20th century Maharashtre., vol.III, Shri Vidya publications , Pune.1999.p.205
7. Joshi D.P., Behind the curtain of ages, 19192,p.6
8. Ibid

29. कोल्हापूर संस्थान आणि ललित कला

प्रा. डॉ. सौ. संगिता संपत पाटील
कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय,
पलूस. ता. पलूस, जि. सांगली.

प्रास्ताविक:

दक्षिण महाराष्ट्रातील सर्वात मोठे संस्थान म्हणजे कोल्हापूरचे संस्थान होय. हे छत्रपतींचे संस्थान असल्यामुळे या विषयी जनतेचा पाहण्याचा दृष्टीकोन वेगळा होता.[१] कोल्हापूर संस्थान हे प्रदेश विस्तार, लोकसंख्या आणि महसूल उत्पन्नाच्या मानाने मोठे व सर्वात श्रेष्ठ असे मराठयांचे सत्ताकेंद्र होते.[२] कोल्हापूर संस्थानाला छत्रपती शाहू महारांजासारखा पुरोगामी राजा लाभला. शाहू महाराजांनी अठ्ठावीस वर्षाच्या काळात फक्त लोककल्याणकारी राज्यकारभार केला नाही तर आपल्या कारकिर्दीत अनेक कला व विदया यांना आश्रय दिला. कोल्हापूरच्या भूमिने महाराष्ट्राला अनेक नामवंत कलाकार दिले. शाहू महाराजांच्या आश्रयाखाली अनेक विदया व कला यांना प्रोत्साहन मिळाले. कलादालने समृध्द तर झालीच, पण त्यांच्या राजाश्रयाने महाराष्ट्रात या कलांचे सुवर्णयुगच निर्माण झाले. यामध्ये संगीत, नाटय व चित्रकला या कलांचा विकास मोठया प्रमाणात झाला. या ललित कलेला महाराजांच्या आश्रयाने मिळालेल्या प्रोत्साहनाचा थोडक्यात आढावा घेण्याचा प्रयत्न या शोधनिबंधात केला आहे.

संगीत :

महाराजांचे जनक पिता आबासाहेब घाटगे हे संगीत कलेचे भोक्ते होते. संगीताचा वारसा त्यांना पित्याकडून मिळाला. राजाश्रयामुळे संगीत कलेचा विकास झाला. १८९२ साली देवल क्लब ची स्थापना केली. देवल क्लब या संस्थेने कोल्हापूरला संगीताच्या क्षेत्रात अत्युच्च स्थानावर नेवून पोचवले. प्रसिध्द संगीत तज्ञ एस.ए. कुलकर्णी यांनी शाहू कालीन "संगीत व नाटय कला" या विषयावर भाष्य करताना म्हटले आहे. आज देशात विविध संगीत घराण्याचे गायक – गायिका किर्तीमान झालेल्या आहेत. त्यांची वंशावळ करवीर नगरीतच सवंर्धिली आहे. त्यांचे मुळ प्रणेते होते राजर्षी शाहू महाराज ! कोल्हापूरात महाराजांच्या कृपाप्रसादाने बहरलेला देवल क्लब प्रसिध्दीस आला. तेव्हा देशातल्या प्रत्येक गायक गायिकेला वाटायचे आपले गायन देवल क्लब मध्ये व्हावे. देवल क्लब मध्ये जो जो कलाकार आपले गायन वादनाची कला सादर करु शकला तो देशाच्या कीर्तिवलयात तरंगू लागला.[३] १८९५ साली शाहू महाराजांनी गानमहर्षी अस्लादियाखॉ यांना आपल्या दरबारात गायक म्हणून आणले आणि जयपूर घराण्याच्या गायकीचे दर्शन कोल्हापूरच्या व महाराष्ट्राच्या रसिकांना प्रथमच घडून आले. संगीताच्या क्षेत्रात या महान कलावंताने कोल्हापूरला अखिल भारतीय कीर्ती मिळवून दिली. खॉसाहेबांबरोबर त्यांचे बंधू हैदरखॉ आणि तीन पुत्र मंजीखॉ, भूजीखॉ, व नसिरुद्दीनखॉ असे सर्वच गवई कुटुंब वास्तव्याला आले आणि संगीताच्या विद्यापीठाची स्थापनाच कोल्हापूरला झाली.[४] या विदयापीठातून पं. भास्करबुवा बखले, हैदरखॉ, मंजीखॉ, नथ्थनखॉ, केसरबाई केरकर, मोगूबाई कुर्डीकर, जसदनवाला, जरीवाला गोविंदबुवा, शाळीग्राम, निवृत्तीबुवा सरनाईक इत्यादी अखिल भारतीय कीर्तीचे शिष्य उदयास आले[५] शाहू महाराजांनी दिलेल्या प्रेरणेने शास्त्रीय संगीतात ही मेनका शिरोडकर, अझमबाई, सरदारबाई, सी बालाजी, आप्पासाहेब देशपांडे यांनी थोर कामगिरी बजावली, महाराजांनी भजन गायकीसही प्रोत्साहन दिले.[६]

नाटयकला :

संगीत कलेच्या बरोबरच नाटय कलेला शाहू महाराजांच्या कारकिर्दीत राजाश्रय मिळाला. राजाराम कॉलेजमधील हौशी कलाकार, 'बुकिश' नाटकाचे प्रयोग करत असत. त्याचे काही प्रयोग महाराजांनी लहानपणी बघितले होते. १८९४ ला राज्यारोहण सोहळयानिमित्त 'किर्लोस्कर', 'शाहूनगरवासी' अशा अनेक कंपन्या कोल्हापूरात आल्या होत्या. 'हॅम्लेट' या नाटकाने महाराजांवर मोठी मोहिनी घातली होती.[७] दत्तोपंत हल्याळकर यांनी महाराजांच्या प्रोत्साहनाने 'महालक्ष्मी प्रासादिक कंपनी' काढली. दत्तोपंत भोसले हे एक गुणी कलाकार होते त्यांच्या 'मृच्छकटिक' व 'मनापमान' या नाटकांतील भूमिका गाजल्या[८] गोविंदराव टेंबे या अष्टपैलू कलावंताने महाराजांच्या आश्रयाखाली नाटयकलेची विविध अंगाने सेवा केली. त्यांची 'सिध्दसंसार', 'चित्रवंचना' ही नाटके रसिक प्रिय झाली.[९] त्यांची थोर कामगिरी म्हणजे 'बालगंधर्व' महाराष्ट्र कोकीळ 'शंकरराव सरनाईक' आदि थोर गायकनटाने संगीताचे शिक्षण व दिशा दिली बालगंधर्व ही शाहू महाराजांची मराठी रंगभूमीस अनमोल देणगी होती. बालगंधर्वाच्या 'गंधर्व संगीत मंडळी' या कंपनीवरही महाराजांची कृपा अखेरपर्यंत होती. केशवराव भोसल्यांच्या रुपाने मराठी रंगभूमीस एक असामान्य प्रतिभेचा कलावंत लाभला. त्यांनी वयाच्या दहाव्या वर्षी शारदेची भूमिका करुन महाराजांकडून वन्समोअर ची शाबासकी मिळवली. 'ललित कलादर्श मंडळी' ही कंपनी निर्माण केली केशवराव व बालगंधर्व यांचा संयुक्त मानापमानाचा मुंबइतील प्रयोग, रंगभूमीच्या इतिहासातील सुवर्णक्षण ठरला. रसिक जनांनी केशवरावांना 'संगीतसूर्य' ही पदवी बहाल केली. १९१६ साली केशवराव आपली कंपनी घेवून कोल्हापूरात आले तेव्हा शाहू महाराजांनी त्यांचा गौरव केला[१०] रोममधील प्रशस्त नाटयगृहाप्रमाणे आपल्या राजधानीत असेच थिएटर असावे ही महाराजांची जिद्द होती. १९१५ साली कोल्हापूरात अतिशय भव्य व राजेशाही असे 'पॅलेस थिएटर' उभे राहिले. महाराष्ट्र शासनाने या थिएटरचे 'केशवराव भोसले नाटयगृह' असे नामकरण करुन शाहू कालीन महान कलावंताचे स्मारक बनविले.[११]

चित्रपट :

कोल्हापूर हे चित्रपट सृष्टीचे माहेरघरच होते. चित्रपट कला खरी बहरली, फुलली ती कोल्हापूर नगरीत, करवीरनगरी ही भारतीय चित्रपट सृष्टीची माहेर घर

बनली तो कलामहर्षी बाबूराव पेंटर यांच्यामुळे बाबूराव हे एक प्रतिभासंपन्न अष्टपैलू कलावंत होते. चित्रकार होते, शिल्पकार व तंत्रज्ञही होते. बाबूराव पेंटर व त्यांचे बंधू आनंदराव पेंटर यांनी १९१३ साली महाराष्ट्र सिनेमा नावाचे थिएटर कोल्हापूरात बांधले 'महाराष्ट्र फिल्म कंपनी' ची स्थापना केली. शाहू महाराजांनी त्यांच्या कंपनीस मंगळवार पेठेत जागा दिली व प्रोत्साहन दिले यातूनच बाबूरावांची चित्रपट निर्मिती सुरु झाली [१२] कृष्णाजी प्रभाकर खाडीलकर यांचे 'कीचक वध' या नाटकाच्या कथेवर बाबूरावांनी 'सैरंध्री' हा चित्रपट तयार केला. पुढे १९२९ साली व्ही. शांताराम, दामले, एस.फत्तेलाल आणि केशवराव धायबर चा बाबूरावांच्या शिष्यानी कोल्हापूरात स्वत:ची 'प्रभात फिल्म' कंपनी काढली.

चित्रकला :

कोल्हापूर जिल्हयाचा परिसर गड, किल्ले, तलाव, निसर्ग, ऐतिहासिक वास्तू यांनी नटलेला आहे. शाहू महाराजांनी चित्रकारांना राजाश्रय देवून चित्रकलेचा विकास केला. शाहू महाराजांच्या कारकिर्दीच्या सुरुवातीसच आबालाल रहिमान सारखा असामान्य प्रतिभेचा कलावंत कोल्हापुरात उदयास आला. महाराजांनी 'दरबार चित्रकार' म्हणून त्यांना तनखा सुरु केला. आनंदराव व बाबूराव पेंटर हे कलंदर कलावंत होते. बाबुराव पेंटर हे कोल्हापूरच्या कलाक्षेत्रातील नैसर्गिक अंकुर होते. [१३] असामान्य प्रतिभेचा कलावंत शाहू महाराजांच्या कारकिर्दीत निर्माण झाला. चित्रपट सृष्टीत प्रसिध्द झालेले बाळासाहेब यादव, व्ही. शांताराम, विष्णूपंत पागनीस, मा. विठ्ठल, बाळ गजबर, आय.टी. निंबाळकर, बी. नांद्रेकर आदि अनेक गुणी कलावंत बाबूरावांच्यात आश्रमात तयार झाले [१४] रावबहादुर माधवराव धुरंधर आणि माधवराव परांडेकर असे दोन चित्रकार कोल्हापूरने महाराष्ट्राला दिले. विनायक मसोजी, बाबा गजबर, दत्तोबा दळवी, माधवराव बागल असे नामवंत कलावंत होते. या चित्रकारांच्या कलाकृतीतून त्यांच्यातील गुणवंत चित्रकाराचे दर्शन घडते. या चित्रकारांच्या कुंचल्यातून घोडयांची, शिकारीची विविध पशुपक्ष्यांची, राजघरण्यातील स्त्री–पुरुषांची, बडया विदेशी पाहुण्यांची पोट्रेट रंगविली होती. त्याच बरोबर निसर्गचित्रे, पौराणिक विषयांवरील चित्रे यांचा समावेश होता. या सर्व कलांना कोल्हापूर संस्थानात राजाश्रय मिळाल्यामुळे कला विकसीत होत गेली. त्यामुळेच आज दळवी आर्ट्स इन्स्टिटयुट आणि कलामंदिर, कला निकेतन महाविद्यालय या संस्था कोल्हापूरात मोलाचे कार्य करत आहेत. [१५]

उपसंहार :

छत्रपती शाहू महाराजांनी करवीर नगरीत सर्व कलांना राजाश्रय दिल्यामुळे अनेक कलावंत निर्माण झाले. अनेक कलांचे माहेरघर म्हणून सर्व जगात कोल्हापूरची ख्याती झाली. अनेक कलावंताना कोल्हापूरच्या भूमीने जन्म दिला. शाहू काळात कोल्हापुरात गायन कला, वादनकला, नाटयकला, शिल्पकला, चित्रपट इ. कलांना येथे राजाश्रय मिळाला, प्रोत्साहन मिळाले. म्हणून कोल्हापूरची 'कलापूर' म्हणून चोहिकडे किर्ती पसरली.

संदर्भ :

१. सरदेसाई बी.एन., आधुनिक महाराष्ट्र, कोल्हापूर, २०००. पृ. २०९

२. पटवर्धन वि.अ., संस्थानातील लोकशाहीचा लढा, पुणे, १९४०, पृ. ५६

३. डॉ. पवार जयसिंगराव, राजर्षी शाहू छत्रपती (जीवन व कार्य), अरुंधती प्रकाशन, कोल्हापूर, २०१४ पृ.१५४,१५५

४. कित्ता, १५५

५. डॉ. पवार जयसिंगराव, (संपादक), राजर्षी शाहू स्मारक ग्रंथ, प्रथमावृत्ती, २००१, पृ. २१७,२१८

६. राजर्षी शाहू छत्रपती जीवन व कार्य, पृ.१५५

७. कित्ता, पृ.१५६

८. राजर्षी शाहू स्मारक ग्रंथ, २००१, पृ. २२०

९. कित्ता, पृ. २२१

१०. कित्ता, पृ. २२३

११. कित्ता, पृ. २२३

१२. राजर्षी शाहू छत्रपती जीवन व कार्य पृ.१५९

१४. कित्ता, पृ. २२६

१५. सकाळ, कोल्हापूर, २ जाने २००५ पृ. ५

30. दक्षिण महाराष्ट्रातील संस्थानी प्रजापरिषदेचा इतिहास सांगली व मिरज संस्थानातील प्रजापरिषदा

श्री. दतात्रय पांडुरंग खराडे
इतिहास विभाग प्रमुख,
बाबासाहेब चितळे महाविद्यालय, भिलवडी.

प्रस्तावना :—

स्वातंत्र्यपूर्व काळात भारताची विभागणी ब्रिटिश भारत (खालसा भारत) व संस्थानी भारत अशा दोन विभागात झाली होती. ब्रिटिश भारत व संस्थानी भारत यांच्या प्रशासकीय स्वरूपामध्ये खूप मोठया प्रमाणावर फरक होता. त्याला कारण म्हणजे ब्रिटिशांनी खालसा केलेल्या भागाचे प्रशासन गव्हर्नर जनरलच्या माध्यमातून चालविले जात होते, तर संस्थानी भारताचा कारभार हा संस्थानिकांच्या हातामध्येच होता. व तेथील प्रशासन संस्थानिकाकडून चालविले जात होते. पण या संस्थानिकांच्यावर सार्वभौमत्व हे ब्रिटिशांचेच होते. त्यामुळे संस्थानी जनतेला दुहेरी गुलामगिरीत रहावे लागत होते. सन १८८५ मध्ये अखिल भारतीय राष्ट्रीय काँग्रेसची स्थापना होऊन आपआपल्या हक्कांबाबत देशातील पुढारी ब्रिटिश सरकारकडे दाद मागत होते पण संस्थानातील लोकांच्याबद्दल ते अगदी उदासीन असत. खालसा (ब्रिटिश भारत) तील प्रजेच्या निरनिराळया तक्रारीबद्दल अनेक ठराव राष्ट्रीय काँग्रेसच्या व्यासपीठावरून पास करण्यात येत होते. परंतु संस्थानी भारतातील असलेल्या राजकीय, सामाजिक, शैक्षणिक अगर आर्थिक परिस्थितीकडे राष्ट्रीय काँग्रेसच्या नेत्याचे लक्ष नव्हते. राष्ट्रीय काँग्रेसच्या अधिवेशनासाठी संस्थानी प्रजेपैकी काही लोक हजर राहात असत परंतु त्यांनाही राष्ट्रीय कॉग्रेसच्या व्यासपीठावरून फारशी दाद मागितलेली दिसत नाही. ही स्थिती अनेक वर्षे होती. अशा या मनमानी संस्थानिकांच्या कारभारास प्रतिबंध करण्यास व संस्थानी प्रजेची गाऱ्हाणी व प्रश्न सोडविण्यासाठी सन १९२१ पर्यंत सार्वजनिक संस्था नव्हती.

महाराष्ट्र – कर्नाटकात दक्षिणी संस्थाने म्हणून ओळखली जाणारी लहान मोठी अठरा संस्थाने होती. या दक्षिणी संस्थानांमध्ये अक्कलकोट, औंध, भोर, जमखंडी, जंजिरा, जत, कुरूंदवाड (थोरली पाती), कुरूंदवाड (धाकटी पाती), मिरज, मिरजमळा, मुधोळ, फलटण, रामदुर्ग, सांगली, सावनूर, सावंतवाडी, व कोल्हापूर या संस्थानांचा समावेश होता.[१] या दक्षिणी संस्थानात राजकीय जागृती घडवून आणून तिथल्या राजकीय संघटित करण्याच्या कामी ''दक्षिणी संस्थान हितवर्धक'' संस्थेने महत्वाची कामगिरी बजावली. सन १९२१ मध्ये दक्षिणी महाराष्ट्रातील संस्थानी प्रजेच्या हितसंवर्धनाकडे लक्ष देण्याकरता कै. नरसिंह चिंतामणी केळकर, कै. अनंत विनायक उर्फ वामनराव पटवर्धन व कै. प्रा. गणेश रघुनाथ अभ्यंकर यांनी पुण्यात दक्षिणी संस्थान हितवर्धक सभा स्थापन करून संस्थानी प्रजेच्या गाऱ्हाण्यांना आणि आकांक्षांना वाचा फोडणारे व्यासपीठ निर्माण केले.[२] म्हणूनच न. चिं केळकर, वामनराव पटवर्धन, प्रा. ग. रा. अभ्यंकर यांना संस्थानी चळवळीचे आद्य जनक असे म्हटले जाते. दक्षिण महाराष्ट्रातील अठरा संस्थानांपैकी बऱ्याच संस्थानांतून दक्षिणी संस्थान हितवर्धक सभेच्या खटपटीने लोक जागृती होण्यास मोठी मदत झाली.

भारताच्या पारतंत्र्याच्या काळात संस्थानांचा प्रश्न इतका बिकट झाला होता की, तो भारताच्या स्वातंत्र्याच्या आड येण्याची भीति नेहमी बाळगली जाई. ब्रिटिश राजसत्तेचे जे चार आधारस्तंभ महात्मा गांधीनी कल्पिले होते, त्यापैकी एका आधारस्तंभाचा मान महात्मा गांधीनी संस्थानांना दिला होता. व त्यांनाही संस्थानातील प्रजा ही गुलामांची गुलाम असल्याचे मान्य होते. असे असूनही त्यांनी संस्थानी चळवळीत फार मोठा भाग घेतल्याचे अगर संस्थानातील चळवळीला फार मोठा पाठिंबा दिलेला दिसून येत नाही. सन १९३८ नंतर मात्र या परिस्थितीमध्ये बराच बदल घडून आला आणि पुढील काळात दक्षिणी महाराष्ट्रातील संस्थानी चळवळीत कै. न. वि. गाडगीळ, श्री. शंकरराव देव, बापुसाहेब गुप्ते, बाळासाहेब खेर, केशवराव जेधे, रावसाहेब पटवर्धन, श्री. निजलिंगाप्पा, श्री. दोडमेट्टी इत्यादी काँग्रेस नेत्यांनी भाग घेतला होता. सन १९३६ साली पट्टाभिसीतारामय्या हे भारतीय संस्थान लोकपरिषदेचे अध्यक्ष झाल्यानंतर मात्र काँग्रेसचे जास्त प्रमाणात संस्थानी चळवळी लक्ष वेधलें गेले होते.[३] महाराष्ट्रात दक्षिणी संस्थान प्रजापरिषदेची स्थापना सन १९२१ मध्ये झाल्यानंतर निरनिराळया संस्थानांतून राजकीय चळवळीचे बी रोवले गेले आणि त्या वृक्षाची वाढ निरनिराळया संस्थानात कमी अधिक प्रमाणात होऊ लागली याकामी तेथील वृत्तपत्राची महत्वाची कामगिरी केली. दक्षिणी संस्थान हितवर्धक सभेमार्फत १९२६ पासून 'संस्थानी स्वराज्य' हे वृत्तपत्र प्रसिध्द झाले. या वृत्तपत्राला संस्थानी कारभारातील माहिती मिळु लागली आणि संस्थानी राजवटीची लक्तरे चव्हाटयावर येऊ लागली. संस्थानी स्वराज्य या वृत्तपत्राप्रमाणे सांगलीचा 'दक्षिण महाराष्ट्र' व विजय, सावंतवाडी 'वैनतेय' कोल्हापूरचे 'विद्याविलास' यासारख्या क्रांती वृत्तपत्रानी केलेली कामगिरी उल्लेखनीय आहे.[४]

दक्षिण महाराष्ट्रातील संस्थानी चळवळीचा जन्म १९२१ मध्ये पुण्यात झाला. लोकमान्य टिळकाचे राजकीय वारसदार न. चिं. केळकर व नामदार गोपाळ कृष्ण गोखले यांच्या भारत सेवक समाजाचे सभासद वामनराव पटवर्धन यांनी १९२१ मध्ये पुण्यात दक्षिणी संस्थान प्रजापरिषदेचे पहिले अधिवेशन भरवून संस्थानातील राजकीय चळवळीची प्रतिष्ठापना केली.[५] संस्थानी चळवळीचा काळ म्हणजे सन १९२१ ते १९४८ हा २८ वर्षांचा. सन १९२१ मध्ये संस्थानी चळवळ सुरू झाली तेव्हापासून ते संस्थानांचे विलिनीकरण होईपर्यंत म्हणजेच १९४८ पर्यत दक्षिण महाराष्ट्रातील अठरा संस्थानांपैकी पंधरा संस्थानांत प्रजापरिषदेंचे किमान एक तरी अधिवेशन झाले होते. परंतु कुरुंदवाड (धाकटी पाती), सावनुर आणि वाडी जहागिर यामध्ये एकही परिषद झाली नाही. इतर संस्थानातून प्रजा परिषदा स्थापन होऊन लोकजागृतीचे कार्य कमीजास्त प्रमाणात झाले. सांगली संस्थानांत सर्वात जास्त म्हणजे २० अधिवेशने झाली त्या खालोखाल भोर संस्थानचा क्रमांक लागतो, भोर संस्थानात एकूण १६ अधिवेशने झाली. जमखिंडी १२, मिरज १०, जंजिरा ५, कोल्हापूर,

सावंतवाडी, अक्कलकोट, औध व कुरूंदवाड प्रत्येकी ४ तर जत, मुधोळ व मिरजमळा प्रत्येकी २ आणि फलटण व रामदुर्ग प्रत्येकी १ अशा प्रकारे अधिवेशने भरली होती.[६] संस्थानात भरलेल्या अधिवेशनांच्या संस्थेवरून त्या त्या संस्थानात लोकजागृती किती झाली हे पाहता सांगली, भोर, जमखंडी या संस्थानांतुन लोकजागृतीचे कार्य विशेष व सातत्याने झालेंचे दिसुन येते. तसेच मिरज, जंजिरा व कोल्हापूर या संस्थानातुन विशिष्ट काळात विशेष कार्य झाले असे म्हणवयास हरकत नाही परंतु इतर राहिलेल्या काही संस्थानांतुन प्रजापरिषदांचे काम वाढीस लागलेले दिसत नाही त्याचे कारण कदाचित तेथील जनतेला आपल्या हक्कांची विशेष जाणीव झालेली नसावी.

दक्षिण महाराष्ट्रातील भूभागात सतरा संस्थाने व एक जहागीर होती. ही संस्थाने पूर्वीच्या मुंबई प्रांतांतील निरनिराळया जिल्हयात विखुरलेली होती. या संस्थानापैकी मिरज संस्थानाची एकुण लोकसंख्या १,०८,५४७ तर क्षेत्रफळ ३४२ चौ. मैल व खेडयांची संख्या ६४ होती.[७] मिरज संस्थानात प्रजापरिषदेची १९२२ ते १९४८ या कालावधीत १० अधिवेशनें झाली. यातील पहिले अधिवेशन ११ व १२ मे १९२२ रोजी चिंतामणराव वैद्य यांच्या अध्यक्षतेखाली भरले होते. दुसरे अधिवेशन २६ मे १९२४ रोजी ग. र. अभ्यंकर यांच्या अध्यक्षतेखाली भरले तर मिरज संस्थानी प्रजापरिषदेचे तिसरे व चौथे अधिवेशन अनुक्रमे बाबुराव गोखले व गोंविदराव रानडे यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाले होते.[८] या अधिवेशनात, मुद्रण व भाषण स्वातंत्र्य, शेतसारा सुट, तगाई देणे, पिण्याच्या पाण्याचा पुरवठा, तालुका व जिल्हा बोर्डाची स्थापना यासारखे ठराव पास ते दरबाराकडे पाठविण्यात आले होते. यावेळी मिरज दरबाराने मिरज संस्थान प्रजापरिषदेची चळवळ प्रथम कमकुवत बनविण्याचा प्रयत्न केला परंतु तरीही प्रजापरिषदेतील नेत्यानी लोंकामध्ये जागृत घडवून लोकमत जागृत ठेवले व दरबाराविरूध्द लढा चालू ठेवला.

२५ मे १९३१ रोजी मिरज संस्थान प्रजापरिषदेचे पाचवे अधिवेशन न. चि. केळकर यांच्या अध्यक्षतेखाली भरले. तर सहावे अधिवेशन मे १९३२ साली अण्णासाहेब लठ्ठे व सन १९४० रोजी सातवे अधिवेशन टी. भाल्यम यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाले होते. ११ जानेवारी १९४२ रोजी माधवराव बागल व डिसेंबर १९४४ मध्ये बाळासाहेब खेर याच्या अध्यक्षतेखाली आठवे व नववे अधिवेशन झाले. २५ व २६ डिसेंबर १९४६ रोजी रावसाहेब पटवर्धन यांच्या अध्यक्षतेखाली मिरज संस्थान प्रजापरिषदेचे शेवटचे अधिवेशन संपन्न झाले होते.[९] यावेळी अधिवेशनात जबाबदार राज्यपध्दती स्थापन करण्याचा ठराव पास करण्यात आला. व पुढे भारताच्या एकीकरण्यासाठी प्रांताचा अविभाज्य भाग म्हणून मिरज संस्थानाचे विलीनीकरण व्हावे हे अंतिम उदिष्ट स्वीकारले. अशा प्रकारे मिरज संस्थानातील प्रजापक्षीय लढयात गोविंदराव रानडे, बाबुराव गोखले, अण्णासाहेब लठ्ठे, माधवराव बागल वि. रा. नेने, तात्या शिखरे, पुंडलीकजी कातगडे, बाबण्णा घुळी, रावसाहेब पटवर्धन, डी. पी. गोर्डे इत्यादी अनेक नेत्यांनी मिरज संस्थानातील जनतेच्या विविध मागण्यांसाठी प्रयत्न केले. त्यामुळे पुढे मिरज संस्थानात जबाबदार राज्यपध्दती लागू झाली.

दक्षिण महाराष्ट्रातील सांगली या संस्थानाची एकूण लोकसंख्या पाहता ती २,९३,३८१ एवढी होती तर सांगली संस्थानाचे क्षेत्रफळ ११३६ चौ. मैल व खेडयांची संख्या २८५ होती. अशा या सांगली संस्थानात सांगली प्रजापरिषदेची सन १९२२ ते १९४८ च्या काळात वीस अधिवेशनें झाली. मिरजेप्रमाणेच सांगली संस्थानातही १९२२ साली प्रजापरिषदेची स्थापना करण्यात आली. त्यानंतर १९२९ पर्यत दरवर्षी प्रजापरिषदेचे अधिवेशन भरवण्यात येत होते फक्त सन १९२६ मध्ये प्रजापरिषदेचे अधिवेशन भरलेले नव्हते. यावेळी सांगली दरबाराने संस्थानच्या हद्दीत सांगली संस्थान प्रजापरिषदेचे अधिवेशन भरविण्यास कधीच विरोध केला नाही. मात्र दक्षिणी संस्थान प्रजापरिषदेचे सांगलीत अधिवेशने भरवण्यास सांगली दरबाराने परवानगी दिली नाही. त्यामुळे २८ व २९ मे १९२४ रोजी बॅ. जयकरांच्या अध्यक्षतेखाली दक्षिणी संस्थन प्रजा परिषदेचे चौथे अधिवेशन सांगली जवळील कुपवाड हद्दीत भरविले गेले होते.[१०] या अधिवेशनाच्या वेळी ब्राम्हण – ब्राम्हणेत्तर वाद निर्माण करण्यात आला होता. सांगली दरबाराची फोडा व झोडा ही कुटिलनीती लक्षात घेऊन सन १९२८ साली तेरदाळ येथे सांगली संस्थान प्रजापरिषदेचे सहावे अधिवेशन भरले होते. या अधिवेशनाचे अध्यक्ष ब्राम्हणेत्तर पक्षाचे नामवंत नेते पंडितप्पा चिकोडी यांनी ब्राम्हणांना तसेच ब्राम्हणेत्तरांना सांगितले की '' तुमच्यात फुट पाडण्याचे प्रयत्न होतील व तुमच्यात भांडणे लागली की Law and order च्या सबबीवर तुम्हाला दडपुन टाकण्यात येईल. तेव्हा कोणाच्याही फुस लावणीस बळी पडु नका व परिषदेची कास सोडु नका.''[११]

सांगली संस्थानातील प्रजापरिषद चळवळ संपूर्णपणे सनदशीर पायावर रचलेली होती. येथील चळवळीत गणपतराव अभ्यंकर, गोविंदराव बिनिवाले, केशवराव छापखाने, का. ह. खाडिलकर, अश्वत्थराव महिषी, विष्णुपंत देशपांडे यांचा प्रमुख सहभाग होता. सन १९३८ मध्ये सांगलीस दक्षिणी संस्थान प्रजापरिषदेचे १२ वे अधिवेशन भरले होते. या अधिवेशनाचे अध्यक्ष सरदार वल्लभभाई पटेल होते. या अधिवेशना पासून संस्थानी राजकारणाची सोयरिक काँग्रेस राजकारणाशी जास्त होऊ लागली. या अधिवेशना पासून परिषदेला लोकसभा अशी संज्ञा मिळालेली होती.[१२] सन १९४० मध्ये सांगली संस्थान प्रजापरिषदेचे अधिवेशन अण्णासाहेब लठ्ठे यांच्या अध्यक्षतेखाली भरले होते. तसेच सन १९४१ मध्ये सांगली संस्थान प्रजापरिषदेचे अधिवेशन बुवासाहेब गोसावी यांच्या अध्यक्षतेखाली भरले यावेळी संस्थानातुन जबाबदार राज्यपध्दती स्थापन करावी व लहान संस्थानांचा सहकारी तत्वावर सामाईक कारभार चालावा असा ठराव पास करण्यात आला होता. सांगली संस्थान प्रजापरिषदेचे २० वे अधिवेशन कोडोली येथे यशवंतराव चव्हाण यांच्या अध्यक्षतेखाली १७ जानेवारी १९४७ रोजी भरले होते. यावेळी विषयनियामक समितीत संघराज्याचा ठराव फेटाळण्यात झाला. पण खुल्या अधिवेशनांत भारतीय लोकपरिषदेच्या सल्ल्याने या बाबतीत काय ते धोरण ठरवावे असे ठरले व पुढे लोकपरिषदेने संघराज्यास पाठिंबा देण्याचा आदेश दिला.[१३]

निष्कर्ष :–

सन १९२१ ते १९४८ संस्थानी राजकारणाचा जन्म दक्षिणी संस्थानांकरिता पुण्यांत झाला आणि दक्षिणी संस्थान हितवर्धक सभा १९२१ मध्ये स्थापन करण्यात आली. तात्यासाहेब केळकर, वामनराव पटवर्धन व गणपतराव अभ्यंकर यांनी संस्थानी चळवळीची मशागत केली म्हणून यांना दक्षिणी

संस्थानातील प्रजापक्षीय चळवळीचे अध्वर्यु मानले जाते. पुणे हेच चळवळीचे बराच काळ मुख्य केंद्र होते. सन १९३० पासुन बहुतेक सर्व दक्षिणी संस्थानातील प्रजा परिषदेची स्थापना होऊन प्रजापक्षीय चळवळ प्रभावी होऊ लागली होती. दक्षिणी संस्थान हितवर्धक सभेच्या कार्यालयातच अखिल भारतीय संस्थानी लोकपरिषद स्थापन करण्याचे ठरले व मणिशंकर त्रिवेदी, बळवंतराव मेथा (मेहता), रंगीलदास कपाडिया, जयनारायण व्यास यांच्या सहकार्याने अखिल भारतीय संस्थान लोकपरिषद स्थापन होऊन पुढे तिची निरनिराळया ठिकाणी अधिवेशने झाली. १५ ऑगस्ट १९४७ रोजी भारत स्वतंत्र झाला. ८ मार्च १९४८ रोजी दक्षिण महाराष्ट्रातील सतरा संस्थानांचे व १ मार्च १९४९ रोजी कोल्हापूर संस्थानाचे मुंबई प्रांतात विलीनीकरण झाले आणि दक्षिण महाराष्ट्र संस्थानी चळवळीचा शेवट झाला.

संदर्भ सूची :—

१. पटवर्धन वि. अ. दक्षिण महाराष्ट्रातील संस्थानांच्या विलिनीकरणाची कथा, आर्यभूषण छापखाना, पुणे, १९६६ पृष्ठ क्र. ०१

२. कित्ता पृष्ठ क्र. ०८

३. पटवर्धन वि. अ. 'संस्थानातील लोकशाहीचा लढा' आर्यभूषण मुद्रणालय पुणे, १९४० पृष्ठ क्र. ३९

४. ''दक्षिण महाराष्ट्र'' साप्ताहिक, सांगली संपा. ह. गो. टिळक, २५ ऑगस्ट १९४७.

५. उपरोक्त पटवर्धन वि. अ. दक्षिण महाराष्ट्रातील संस्थानाच्या विलीकरणाची कथा. पृष्ठ क्र. ०२

६. कित्ता पृष्ठ क्र. ११५

७. कित्ता पृष्ठ क्र. ११२

८. फडके य. दि. विसाव्या शतकातील महाराष्ट्र, खंड ७, श्रीविद्या प्रकाशन,पुणे पृष्ठ क्र. २०८

९. दै. ज्ञानप्रकाश, पुणे, २७ डिसेंबर, १९४६

१०. उपरोक्त — फडके य. दि. पृष्ठ क्र. २०९

११. उपरोक्त — पटवर्धन वि. अ. ' संस्थानातील लोकशाहीचा लढा ' पृष्ठ क्र. १७७

१२. उपरोक्त — पटवर्धन वि. अ. 'दक्षिण महाराष्ट्रांतील संस्थानांच्या विलिनीकरणाची कथा, पृष्ठ क्र. २६, २७.

१३. कित्ता — पृष्ठ क्र. ७३.

31. सांगली संस्थानातील उच्च शिक्षण

सौ. सीमा नवनाथ इंदलकर
पीएच. डी. विद्यार्थी,
सोलापूर विद्यापीठ, सोलापूर.

डॉ. विलास निंबाळकर
विभागप्रमुख,
बुर्ला महिला वरिष्ठ महाविद्यालय,सोलापूर.

आज सांगली जिल्हा महाराष्ट्रात एक प्रगत शैक्षणिक केंद्र म्हणून ओळखला जातो. प्राथमिक पासून महाविद्यालयीन तसेच वैद्यकीय व आभियांत्रिकी शिक्षणाची सोय सांगलीत आहे. या शैक्षणिक विकासाची बीजे आपल्याला शोधावयाची असतील तर संस्थान काळात विशेषत: चिंतामणराव दुसरे यांची शैक्षणिक कार्ये पाहणे आवश्यक आहे. त्यांनी आपले शैक्षणिक धोरण पुरोगामी ठेवले होते व सर्व समाजास शिक्षणाची संधी कशी देता येईल यासंबंधी शैक्षणिक धोरण आखले होते. त्यांच्या मते Education is the basis of all reforms and is the only way of solution from our present condition.[1]

चिंतामणरांवाची कारकीर्द सन १९१० ते संस्थान भारतीय संघराज्यात विलीन होईपर्यंत म्हणजेच ८ मार्च १९४८ पर्यंत होती. संस्थानाधिपती असताना त्यांनी जनहित डोळयांपुढे ठेवून आदर्श कारभार करून दाखविला. सांगली संस्थानाला शैक्षणिक, औद्योगिक व सांस्कृतिक केंद्र बनविण्यामध्ये चिंतामणरावांचा सिंहाचा वाटा होता.[2] सांगलीतील विलिंग्डन कॉलेज, इंजिनीअरिंग कॉलेज, ट्रेनिंग कॉलेज राजेसाहेबांच्या शिक्षणप्रेमाची ग्वाही देत आहेत. चिंतामणरावांनी उच्च शिक्षणाला प्रोत्साहन दिल्यामुळेच सांगली संस्थानात कॉलेज सुरू झाले.

वुडचा शिक्षणविषयक खलिता :

१९ जुलै १८५४ ला वुडचा शिक्षणविषयक खलिता ही ईस्ट इंडिया कंपनीची, भारतातील इंग्रजी शिक्षणाची एक महत्वाची सनद म्हणून समजली जाते. वुडच्या खलित्याचा ताबडतोब परिणाम म्हणजे ब्रिटिश भारतात शिक्षण खात्याची निर्मिती झाली व लंडन युनिव्हर्सिटीच्या धर्तीवर भारतात पहिल्यांदा कलकत्ता, मद्रास व मुंबई या तीन शहरात तीन विद्यापीठे स्थापन करण्याचे निश्चित करण्यात आले. त्याचबरोबर पाच प्रातांत सार्वजनिक शिक्षण खाते सुरू करण्यात आले. सांगली संस्थानाचे शिक्षण खाते हे मुंबई प्रांतांच्या डायरेक्टर ऑफ पब्लिक इन्स्ट्रक्शन यांच्या नियंत्रणाखाली होते.[3]

सन १९१९ पर्यंत सांगली संस्थानात प्राथमिक शाळा, हायस्कूल, मुलींच्या शाळा, रात्रीच्या शाळा, संस्था नामाकित काढण्यात आल्या होत्या. परंतू महाविद्यालयीन शिक्षणाची सोय संस्थानात नव्हती ही गोष्ट चिंतामणराव दुसरे यांना नेहमी खटकत असे. काही मोजकी श्रीमंताची मुले पुणे.मुंबई कोल्हापूर या ठिकाणी जाउन महाविद्यालयीन शिक्षण घेत होती. परंतू सर्वसामान्य विद्यार्थी शिक्षणापासून वंचित होता. चिंतामणारावांना ही उणीव जाणवत होती. म्हणून त्यांनी सांगली संस्थानात महाविद्यालयीन शिक्षण असावे यासाठी प्रयत्न सुरू केले.

विलिंग्डन कॉलेज :

पुणे येथील डेक्कन एज्युकेशन सोसायटीचे चिंतामणराव दुसरे हे व्हाईस प्रेसिडेंट होते. त्यांनी डेक्कन एज्युकेशन सोसायटीला उदार हस्ते अनेक देणग्या दिलेल्या होत्या आणि त्या संस्थेचा नावलौकीक संपूर्ण महाराष्ट्रभर होता. म्हणून डेक्कन एज्युकेशन सोसायटीचे सांगलीला महाविद्यालय सुरू करावे म्हणून चिंतामणरावांनी प्रयत्न केले. १९१९ दरम्यानचे मुंबई प्रातांचे गव्हर्नर लॉर्ड विलिंग्डन यांना रॅग्लर परांजपे आणि प्राचार्य भाटे भेटले. मंजुरीसाठीचे सरकारी पातळीवरील सर्व अडथळे विलिंग्डन यांच्यामुळे दूर झाले त्यामुळे महाविद्यालयास विलिंग्डन असे ना देण्यात आले. २२ जून १९१९ ला डेक्कन एज्युकेशन सोसायटीचे सांगलीस विलिंग्डन कॉलेज सुरू झाले. या कॉलेजला चिंतामणराव दुसरे यांनी सर्वतोपरी सहाय्य केले व ७५००० रूपयांची देणगी दिली. तसेच जागा देउन कॉलेज सुरू झाले.[4] संस्थानाच्या इमारतीत महाविद्यालयाचा उद्घाटन समारंभ झाला होता. मुंबई विद्यापीठाचे तत्कालीन कुलगुरू सर चिमणलाल सेटल वाड उद्घाटनपर भाषणात म्हणाले होते की, दख्खनच्या दृष्टीने आजचा दिवस महान आहे. या भागातील शैक्षणिक व राजकीय क्षेत्रात या संस्थेचा मोठा सहभाग असेल. याच काळात महात्मा गांधीजी व लोकमान्य टिळक यांनी महाविद्यालयास भेट दिली होती. सुरवातीला हे कॉलेज सांगली गावात सरकारांच्या खाजगी वाडयातच भरत होते. एक छोटेसे इंटरमिजिएट आर्टस कॉलेज म्हणून कॉलेजची स्थापना झाली.[5] दक्षिण महाराष्ट्रात मुख्यत: ग्रामीण भागात कॉलेज हा मोठया कुतूहलाचा व कौतुकाचा विषय होता. उच्च शिक्षणाच्या विकेंद्रीकरणाच्या सरकारी व विद्यापीठीय धोरणाचा तो श्रीगणेशा होता. खुध्द विलिंग्डन कॉलेजची वाढ झाली तसतशी आजूबाजुच्या भागात शैक्षणिक जाणिवेचीही वाढ होत गेली. सांगली मिरजेच्या मध्यावर असलेल्या विश्रामबागेच्या निसर्गसुंदर परिसरात स्वतंत्र सुसज्ज वास्तुत कॉलेज १९४१ थाटाने सुरू झाले. सुरवातीला आर्टस आणि सायन्स कॉलेज म्हणून सुरू झालेले कॉलेज पुढे पदवीपूर्ण शिक्षण देणा—या व संशोधन करणा—या महासंस्थेत झाले. हे कॉलेज दक्षिण महाराष्ट्राचे एक मध्यवर्ती शिक्षण व सांस्कृतिक केंद्र होउन राहिले होते. संस्थान काळात दरवर्षी २००० रूपयाचें अनुदान विलिंग्डन कॉलेजला देण्यात येत होते.[6]

विलिंग्डनचे ग्रंथालय :

विलिंग्डन महाविद्यालयाचे ग्रंथालय विविध विषयांवरील एक लाखावर पुस्तकांमुळे पहिल्यापासूनच समृध्द म्हणून ओळखले जाते. मिरजेचे अधिपती श्रीमंत गंगाधरराव उर्फ बाळासाहेब पटवर्धन यांच्याकडून सुमारे पाच हजारांवर पुस्तकांची देणगी विलिंग्डनचे पहिले प्राचार्य गोविंद चिमणाजी भाटे यांनी स्विकारली. म्हणून या ग्रंथ संग्रहास बाळासाहेब पटवर्धन यांच्या पत्नी श्रीमंत सौभाग्यवती उमाबाईसाहेब पटवर्धन मिरजकर ग्रंथालय नाव देण्यात आले.[7] विलिंग्डनच्या स्थापनेत मोठा वाटा असलेल्या श्रीमंत चिंतामणरावांनी विलिनी करणाच्या वेळी संस्थानचे ग्रंथालय महाविद्यालयाला बहाल केले

होते. महाराष्ट्र ज्ञानकोशाचे तीन संच स्वातंत्र्यपूर्व काळातील गॅझेटियर्स ही त्यामध्ये होती. याशिवाय त्यांनी पाच हजार ग्रंथाचा वैयक्तिक संग्रह ही विलिंग्डनला दिला.[८]

ट्रेनिंग कॉलेज :

शिक्षक प्रशिक्षित असला तर तो अधिक कार्यक्षम व मुलांना चांगल्या प्रकारे शिकवू शकतो. सांगली संस्थानातील शिक्षकांसाठी सन १९४२ ला ट्रेनिंग कॉलेज सुरू करण्यात आले. चिंतामणराव दुसरे यांनी या ट्रेनिंग कॉलेजसाठी ५००० रूपये वार्षिक अनुदान मंजूर केले. सांगली संस्थानातील अप्रशिक्षित शिक्षक, शिक्षिका या कॉलेजमधून प्रशिक्षण घेउन बाहेर पडू लागले त्यामुळे संस्थानातील अध्यापनाचा दर्जा उंचावला या कॉलेजचे प्राचार्य म्हणून आर. एस. जोशी यांनी काम पाहिजे. सन १९४२—४३ ला २३ सन १९४३—४४ ला २५ शिक्षक ट्रेनिंग घेत होते.[९]

आभियांत्रिकी कॉलेज :

महाराष्ट्र टेक्निकल एज्युकेशन पुणे यांनी अभियांत्रिकीसन १९४६ ला ठरविले. हे कॉलेज पुण्यामध्ये सुरू करण्याचा विचार होता. सांगली संस्थानाधिपती चिंतामणराव दुसरे यांनी सांगलीत महाविद्यालय सुरू करीत असाल तर मदत देतो अशी ग्वाही दिली. अखेर सांगलीत महाविद्यालय सुरू करण्याचा निर्णय झाला. विलिंग्डन समोरील जागेची खरेदी झाल्यानंतर श्रीमंत राणी सरस्वतीदेवी पटवर्धन यांच्या हस्ते ३१ मार्च १९४७ रोजी पायाभरणी झाली.[१०] या कॉलेजचे सुरवातीचे नाव सांगली इंजिनिअयरिंग कॉलेज असे होते. परंतू शेठ लालचंद हिराचंद यांच्यासारख्या दानशूर उद्योगपतीनी केलेल्या मदतीमुळे वालचंद अभियात्रिकी महाविद्यालय असे नामकरण झाले. सांगलीत आभियांत्रिकी महाविद्यालय सुरू होत असल्यामुळे श्रीमंत चिंतामणराव पटवर्धन यांनीही उभारणीपासून मदत केली होती. या कॉलेज मध्ये सुरवातीला अनेक नामवंत प्राध्यापकांनी विनामोबदला शिकवले. त्यामध्ये प्राचार्य जी. एन. गोखले, के. व्ही. कार्डिले, सी. जी. काळे, जी. आर. वर्तक, व्ही. के. केळकर, एस. डी. फाटक, जी. सी. कानेटकर, डॉ. पी. ए. कुलकर्णी यांचा समावेश होता.[११]

वालचंद कॉलेज ची सुरवात स्थापत्य आभियांत्रिकी शाखेने झाली. त्यावेळी इंटर नंतर तीन वर्षाचा पदवी अभ्यासक्रम होता. सुरवातीस कॉलेजमध्ये १८० विद्यार्थ्यांना प्रवेश मिळत होता. सुरवातीस हे महाविद्यालय मुंबई विद्यापीठाशी संलग्न होते. नंतर ते पुणे विद्यापीठ व शिवाजी विद्यापीठाशी संलग्नित झाले. पहिली काही वर्षे कॉलेज विनाअनुदानित होते. १९४७—४८ मध्ये पहिले वर्ष वालचंद कॉलेज येथे आणि पुढच्या दोन वर्षाचे शिक्षण पुण्यात होत असे. १९४८—४९ मध्ये पहिली दोन वर्षे येथे आणि तिसरे वर्ष पुण्यात अशी व्यवस्था होती. १९४९—५० मध्ये मात्र तीनही वर्षाचा अभ्यासक्रम येथे सुरू झाला होता. अशी माहिती जेष्ठ प्राध्यापक मकरंद जोगळेकर यांनी दिली.[१२]

अशा प्रकारे वालचंद महाविद्यालयाला सुरवातीपासूनच पश्चिम महाराष्ट्रातील तांत्रिक सल्लामसलीतीचे केंद्र मानले जाते. अनेक संस्थाना या कॉलेज ने तांत्रिक मार्गदर्शन दिले आहे. एका छोटयाशा खोलीत १९४८ मध्ये ५००० पुस्तकांसह वालचंद ग्रंथालय सुरू झाले. १९८५ मध्ये ग्रंथालयाच्या इमारतीचे बांधकाम पूर्ण झाले. ग्रंथालय ४५ हजारांवर ग्रंथ आहेत. पुस्तकपेढी योजनेसह ७० हजार पुस्तके आहेत. तंत्रशास्त्रातील नियतकालिकांचे १९२७ पासूनचे बांधीव असे शेकडो खंड आणि स्थापत्य आभियांत्रिकी साठीची १९२७ पासूनची इंडियन कॉक्रिट जर्नल्स उपलब्ध आहेत. स्थापत्य आभियांत्रिकी बरोबरच मेकॅनिकल, इलेक्ट्रिकल, इलेक्ट्रॉनिक्स आणि संगणक आभियांत्रिकी अशा सर्व ज्ञानशाखांच्या असंख्य पुस्तकांनी वालचंद कॉलेजचे ग्रंथालय समृध्द आहे.[१३] चिंतामणराव आप्पासाहेब दुसरे यांच्या कारकीर्दीत सांगली संस्थानात उच्च शिक्षणाचा पाया घातला गेला. चिंतामणराव दुसरे हे एक प्रजाहितदक्ष, न्यायप्रिय, आदर्श आणि चारित्र्यवान व्यक्तीमत्व होते. त्यांनी सांगली संस्थानातील प्राथमिक, माध्यमिक व उच्च शिक्षणाला प्रोत्साहन दिले व शिक्षण संस्थाना सर्वतोपरी उदार हस्ते आर्थिक मदत दिली. त्यांच्या या कार्यामुळेच सांगली शहरातील शैक्षणिक विकास झालेला दिसून येतो.

संदर्भ :

१. सांगली संस्थानचा वार्षिक प्रशासकीय अहवाल, १९०८—१९०९, पृष्ठ २७
२. सांगली संस्थानचा वार्षिक प्रशासकीय अहवाल सन १९०२—०३, पृष्ठ ३
३. ग्रोवर बी.एल. २००३, आधुनिक भारताचा इतिहास एस.चंद ॲण्ड कम्पनी, नवी दिल्ली, पृष्ठ ३०६
४. सांगली संस्थानाचा वार्षिक प्रशासकीय अहवाल सन १९१९—१९२०, पृष्ठ ३८
५. कित्ता
६. चिंतामणराव आप्पासाहेब पटवर्धन राजेसाहेब गौरव ग्रंथ, पृष्ठ १३५
७. विलिंग्डन कॉलेज, सांगली सन १९१९—१९४४ रौप्य महोत्सवी अंक पृष्ठ ३
८. कित्ता
९. सांगली संस्थानचा वार्षिक प्रशासकीय अहवाल सन १९४२—१९४३ पृष्ठ १७,१८
१० वालचंद कॉलेज, स्मरणिका १९८५ पृष्ठ १८
११. कित्ता
१२. सांगली संस्थानचा प्रशासकीय अहवाल १९४७, पृष्ठ २९
१३. सहस्त्रबुध्दे चिंतामणी २०१०, सांगलीच्या पाउलखुणा, सकाळ पेपर्स लिमिटेड, कोल्हापूर

32. कोल्हापूर संस्थानातील शैक्षणिक चळवळ

प्रा . शशिकांत महादेव मोहिते
सहा . प्राध्यापक, इतिहास विभाग,
आर्टस ॲण्ड कॉमर्स कॉलेज, आष्टा .

केवळ महाराष्ट्राच्याच नव्हे तर आधुनिक भारताच्या इतिहासामध्ये विटिशकालीन ५६२ संस्थानात अनेक बावतीत आपले वेगळेपण निर्माण करणारे संस्थान म्हणजे 'कोल्हापूर संस्थान' होय . राजर्षी शाहू महाराजांच्या काळात कोल्हापूर संस्थानातील सामाजिक, धार्मिक, आर्थिक व सांस्कृतिक क्षेजात जे अभूतपूर्व वदल घडून आले त्या वदलांमुळे एक छोटे परंतू 'आदर्श' संस्थान म्हणून कोल्हापूर संस्थानची ख्याती देशभर पसरली . इ . स . १८९४ते इ . स . १९२२ या आपल्या अवघ्या २८ वर्षाच्या राजकीय कारकिर्दीत राजर्षी शाहू छजपतींनी आपल्या संस्थानाचा चहरा-मोहरा पार वदलुन टाकला . त्यांनी पुरोगामी दृष्टिकोणातुन अनेक सामाजिक, आर्थिक व धार्मिक चळवळी उभ्या केल्या . त्यामध्ये त्यांच्या काळातील 'शैक्षणिक चळवळ' अनेक बावतीत महत्वपूर्ण ठरते . किंवहुना शाहू छजपतींनी सुरू केलेल्या इतर चळवळींसाठी त्यांनी हाती घेतलेले शिक्षण प्रसाराचे कार्य पुरक व पोषक ठरले . त्यांची शैक्षणिक चळवळ इतर चळवळींना बौध्दिक व वैचारिक अधिष्ठान प्राप्त करून देणारी ठरली . त्याहून सर्वात महत्वाची बाव म्हणजे राजर्षी शाहूंच्या शैक्षणिक चळवळीमुळे वहुजन समाजाची सामाजिक मानसिक व बौध्दिक गुलामगिरीतुन मुक्ति होण्याचा मार्ग खुला झाला .

कोल्हापूर संस्थान ः

कोल्हापूर नगरीला प्राचीन काळापासून ऐतिहासिक परंपरा लाभली आहे . महर्षी व्यासांनी लिहिलेल्या 'पदमपुराण' ग्रंथातील करवीर महात्म्यात कोल्हापूरचा उल्लेख ''दक्षिण काशी'' असा येतो .[१] कोल्हापूरला 'करवीर' किंवा 'कलापूर' असेही संवोधले जाते . प्राचीन व मध्यायुगीन काळात कोल्हापूर आणि परिसरावर अनेक राजघराण्यांनी राज्य केले . परंतु औरंगजेवाच्या मृत्युनंतर निर्माण झालेल्या विशिष्ट परिस्थितीमुळे महाराणी तारावाई यांनी इ . स . १७१0 साली कोल्हपूर येथे स्वतंज राज्य व राजगादी स्थापन केली . तथापि कोल्हापूरला राजर्षी शाहू छजपतींच्या काळातच खरे महत्व प्राप्त झाले . इ . स . १८१२ मध्ये ब्रिटिशांशी झालेल्या तहानुसार कोल्हापूर राज्याचे स्वतंज अस्तित्व नष्ट होऊन कोल्हापूर ब्रिटिशांचे मांडलिक राज्य म्हणजेच 'संस्थान' बनले .[२] कोल्हपूर संस्थानचे क्षेजफळ २८१६ चौ . मैल एवढे होते . त्याची उत्तर-दक्षिण लांवी ८१मैल, दक्षिणोत्तर रूंदी ६८ मैल एवढी होती . संस्थानत ६ तालुके (पेटे) व १0७९ गावे होती . संस्थानचे एकुण उत्पन्न ३,६0,000 रू एवढे होत तर लोकसंख्या ९,१९,१३१ एवढी होती .[३]

राजर्षी शाहूपुर्व काळातील कोल्हापूरची शैक्षणिक स्थिती ः

राजर्षी शाहू पुर्व काळात कोल्हापूर संस्थानातील शैक्षणिक स्थिती फारशी समाधानकारक होती असे दिसत नाही . परंपरेप्रमाणे केवळ मुठभर उच्चवर्णीय लोकांसाठीच शिक्षणाचे दरवाजे खुले होते . वहुजन समाज शिक्षणापासुन वंचित होता . छजपती राजाराम महाराजांचा अपवाद वगळता अन्य छजपतींनी शिक्षणावावत फारशी आस्था दाखवली नाही . इ . स . १८४४ मध्ये संस्थानातील १२२ खेडयात ग्रामीण शाळा होत्या . १८४८ साली कोल्हापूर, आळते, पन्हाळा व शिरोळ येथे शाळा सुरू झाल्या तर पुढील वर्षी भूदरगड ,कागल, मलकापूर याठिकाणी शाळा सुरू झाल्या .[४] इ . स . १८५१ मध्ये कोल्हापूरात पहिली इंग्रजी शाळा सुरू झाली इ . स . १८६७ मध्ये तिचे रूपांतर राजराम हायस्कूलमध्ये झाले व पुढे राजराम कॉलेजमध्ये झाले . इ . स . १८८१ मध्ये संसथानात साक्षरतेचे प्रमाण ब्राम्हण समाजात ७९ . १ टक्के, जैन समाजात १0 . ६ टक्के, मराठा समाजात ८ . ६ टक्के, मुस्लिम समाजात ७ . ५ टक्के, तर कुणवी समाजात १ . ५ टक्के असे होते . इ . स . १८९१ मध्ये एकुण लाकसंख्यमध्ये ब्राम्हणांचे साक्षरतेचे प्रमाण ७९ . १ टक्के एवढे होते . तर ब्राम्हणेत्तरांचे साक्षरतेचे प्रमाण अवघे ३ . २ टक्के एवढे होते . इ . स . १८९१ मध्ये राजराम हायस्कुलमधील ४४१ विदयार्थ्यांमधील ३६८ विदयार्थी ब्राम्हाण होते . तर राजाराम कॉलेजमध्ये ६१ पैकी ५५ विदयार्थी ब्राम्हाण होते . इ . स . १८९४ मध्ये संस्थानाच्या एकूण उत्पन्नापैकी केवळ ३ . ७५ टक्के खर्च शिक्षणावर होत होता .[५] ही आकडेवारी वहुजन समाजाची 'शिक्षणवंचितता' सिध्द करते .

राजर्षी शाहू छजपतींची वैचारिक भूमिका ः

राजर्षी शाहूंची शिक्षणविषयक दृष्टी अत्यंत व्यापक व सखोल होती . शिक्षणाकडे ते केवळ व्यक्तिविकासाचे व समाजोन्नतीचे साधन म्हणून पाहत नव्हते तर सामाजिक, आर्थिक व धार्मिक विषमतेच्या आणि अज्ञान व अंधश्रध्देच्या विरोधी युध्दातील प्रभावी शस्त्र म्हणून पाहत होते . विशेषत: त्यांच्या आयुष्यातील 'वेदोक्त' प्रकरणामुळे त्यांच्यावर जेा कठीण प्रसंग ओढावला तो पाहून त्यांच्या मनात वहुजन समाजाचे अज्ञान ,निरक्षरता त्यातून त्यांचे होणारे शोषण या वावींवद्दल चिंतन सुरू झाले . या सर्वातुन वहुजन समाजाची सुटका करण्याचा मार्ग म्हणजे त्यांचे 'शिक्षण' या निष्कषापर्यंत ते पोहचले . यातुनच ''To take care of weak among my subjects more than the strong '' हे त्यांचे शिक्षणाविषयी सुज बनले .[६]

शाहूंनी शिक्षणाचा व्यापक स्तरावर विचार केला . 'स्वराज्यासाठी शिक्षण' ही संकल्पना त्यांनी मांडली . त्या दृष्टीने ''माझी प्रजा मराठी इयत्ता तिसरी शिकुन तयार झाली असती तर त्यांना राज्याकारभाराचे हक्क आनंदाने देऊन मी आजच विश्रांती घेतली असती .''[७] हे त्यांचे विधान आशयपूर्ण आहे . स्वराज्य मिळण्यापुर्वी स्वराज्यापासुन मिळणारे फायदे घेण्याइतपत लोक साक्षर असले पाहिजेत, ही त्यांची भूमिका महत्वाची दिसते . देशोन्नतीच्या मार्गातील जातीभेदाचा अडसर दुर करून मागासलेल्या वर्गाला पुढे आणणारे, परस्परांशी वंधुत्वाचे नाते सांगणारे आणि ''सुशिक्षितांची व्युरॉक्रॉसी-मक्तेदारी'' मोडून काढणारे शिक्षण त्यांना अभिप्रेत होते . याचदृष्टीने सर्व जातींच्या पुढा -यांना,''आपली दृष्टी दूरवर ठेवा पाया पुरते पाहु नका .'' असे ते सांगतात .[८] वहुजन समाजाची वौध्दिक गुलामगिरितुन मुक्तता व्हावी, त्यांचे भवितव्य उज्ज्वल व्हावे म्हणुन ब्राम्हणेत्तरांना '' आत्मवल ''

देणारे त्यांच्यात ''हत्तीचे बळ'' निर्माण कारणारे शिक्षण त्यांना अभिप्रेत होते .[९]

राजश्री शाहूछत्रपतींचे शैक्षणिक कार्य ः

न्या . रानडे,गो . कृ . गोखले आणि गंगारामभाऊमस्के यांच्यापासून प्रेरणा घेऊन राजर्षीनी शैक्षणिक क्षेत्रात पुढील कार्य केले -

१) वसतिगृह चळवळ ः

शाहू छत्रपतींच्या शैक्षणिक कार्यात त्यांनी सुरू केलेली 'वसतिगृह चळवळ' महत्वाची ठरते . त्यांनी वसतिगृहाचा पहिला प्रयोग आपल्या राजवाडयातच केला . परंतू त्यांच्या अपेक्षानुरूप विदयार्थ्यांचा शैक्षणिक प्रतिसाद न मिळाल्यामुळे त्यांनी हा प्रयोग बंद केला . राजर्षी शाहूंनी वसतिगृहासंबंधी दुसरा प्रयत्न १८९७ च्या दुष्काळाच्यावेळी केला . दुष्काळामुळे निर्माण झालेली टंचाई व अन्नधान्याचे भाडकलेले दर यामुळे खानावळीचे दर एवढे वाढले की खेडेगावातल्या पालकांना आपल्या मुलांना कोल्हापूरला ठेवणे कठीण होऊन बसले . म्हणून त्यांनी गरीब व गरजु विदयार्थ्यांची सोय व्हावी या उद्देशाने राजाराम कॉलेजला जोडून सर्व जातींच्या विदयार्थ्यासाठी एक वसतिगृह सुरू केले . तेथे मासिक २रू दराने खानावळ उपलब्ध करून दिली . सुरूवातीला त्यांच्या अपेक्षेप्रमाणे या वसतिगृहात सर्व जातीजमातीचे विदयार्थी राहु लागले परंतू काळाच्या ओघात या वसतिगृहात पंगतीतील भेदभाव, विटाळ, शिवाशीव यासारख्या विनबुडाच्या कल्पनांमुळे ब्राम्हण व ब्राम्हणेत्तर विदयार्थ्यांमधील दुरावा वाढत गेला आणि शेवटी बहुजन समाजातील एक एक विदयार्थी वसतिगृह सोडुन निघून जाऊलागले . त्यामुळे 'जातिधर्मनिरपेक्ष' वसतिगृह स्थापन करण्याचा शाहूंचा प्रयत्न फसला . वसतिगृह स्थापन करण्याचा तिसरा प्रयत्न म्हणजे 'जातवार वसतिगृहांची' चळवळ होय . संस्थानात क्रमांक १ ने मॅट्रिक परिक्षा उत्तीर्ण होणारे पहिले मराठा विदयार्थी डॉ . पा . चि . पाटील आपल्या '' माझा आठवणी '' या ग्रंथात सांगतात त्याप्रमाणे कोल्हापूरातील गरीब व गरजु विदयार्थ्यांची खानावळीत होणारी परवड आणि जातिमत्सरामुळे त्यांच्या मनावर होणारे दुष्परिणाम व इतर काही अडचणीमुळे शाहूंनी 'जातवार' वसतिगृह स्थापन करण्याचा निर्णय घेतला .[१०] यातुनच व्हिक्टोरिया मराठा बोर्डिंग (१९०१),जैन बोर्डिंग (१९०१), मुस्लिम बोर्डिंग (१९०६),लिंगायत बोर्डिंग (१९०७), नामदेव बोर्डिंग (१९११), कायस्थ बोर्डिंग (१९१२), पांचाळ ब्राम्हण बोर्डिंग, सारस्वत बोर्डिंग (१९१२) अशा विविध जातींची वसतिगृह कोल्हापूरात सुरू झाली . जातवार वसतिगृहे स्थापन करण्यामागे शाहूंची भूमिका जातिजातींचा शैक्षणिक विकास साधने हाच होता . शाहूंच्या कार्यामुळे त्यांना वसतिगृह कल्पनेचा 'आदय जनक' संबोधले जाते तर कोल्हापूराला वसतिगृहांची जननी संबोधले जाते .

२) मोफत व सक्तीचे प्राथमिक शिक्षण ः

राजर्षी शाहू महाराजांनी प्राथमिक शिक्षणाची सामाजिक गरज ओळखुन प्राथमिक शिक्षण सक्तीचे व मोफत करण्यासाठी एक समिती नेमली या समितीच्या शिफारशीनुसार सप्टेंबर १९१६ मध्ये सक्तीच्या शिक्षणाचा कायदा करण्यात आला . १९१७ मध्ये या कायदयाची अंमलबजावणी सुरू झाली . करवीर पेठयातील चिखली येथे या प्रकारची पहिली शाळा सुरू झाली . मोफत व सक्तीच्या शिक्षण कायदयानुसार ७ ते १४ वर्षे वयादरम्यानच्या मुलांना शाळेत पाठवण्यावाबत पालकांवर सक्ती करण्यात आली . या नियमांचे उल्लंघन करणा-या पालकांना प्रत्येक महिन्याला १ रूपया याप्रमाणे दंड आकारण्यात आला . ३० दिवसांच्या आत दंड न भरल्यास जमीन महसुल नियमानुसार त्यांची जंगम मालमत्ता जप्त करून दंड वसुल करण्याची तरतुद केली . प्राथमिक शिक्षणाचे महत्व सांगताना शाहु छत्रपती म्हणतात,'' शिक्षणानेच आपला तरणोपाय आहे . शिक्षणाशिवाय कोणत्याही देशाची उन्नती झाली नाही असे इतिहास सांगतो . अज्ञानात बुडुन गेलेल्या देशात उत्तम मुत्सददी व लढवय्ये वीर निपजनार नाहीत . म्हणून सक्तीच्या व मोफत शिक्षणाची हिंदुस्थानाला गरज आहे .''[१२]

शाहू छत्रपतींना प्राथमिक शिक्षणाच्या प्रसारासाठी अनेक योजना रावविल्या . त्यांनी खेडयातील शाळांमधुन वतनी शिक्षकांची नेमणूक केली . शिक्षकांच्या प्रशिक्षणासाठी ६ महिने कालावधीचे प्रशिक्षण वर्ग सुरू केले . शिक्षक भरतीसंदर्भात सार्वजनिक सेवा परीक्षेचा दर्जा असणारी परीक्षा घेण्यास सुरूवात केली . देवस्थानचे उत्पन्न आणि देवालयाच्या इमारतींचा शिक्षणासाठी अधिकाधिक उपयोग करण्याच्या दृष्टिने ९ जुलै १९१७ रोजीच्या नियमावलीत देवस्थानच्या खोल्यांचा आणि नित्य व नैमित्तिक खर्चातुन उरलेल्या शिल्लक रक्कमेचा उपयोग शिक्षणासाठी करण्याचा आदेश दिल्याचा उल्लेख आढळतो . एवढेच नव्हे तर पंढरपूर देवस्थानच्या नैवदयावर होणारा अनाठायी खर्च कमी करून तो गरीब विदयार्थ्यांसाठी वापरण्याचा आदेश दिल्याचे आढळते .[१३]

३) मागासवर्गीयांचे शिक्षण ः

शाहू छत्रपतींनी समाजातील दुर्बल वर्गाला सक्षम बनविण्यासाठी शिक्षणाचा 'शस्त्र' म्हणून उपयोग केला . दलितांची स्थिती सुधारण्यासाठी शिक्षणाशिवाय पर्याय नाही या भूमिकेतुन अस्पृश्यांसाठी शाळा, वसतिगृहे निर्माण केली . कोल्हापूरात असणा -या महार - चांभार यांच्या राजीशाळांना २८ नोव्हेबर १९०६ रोजीच्या आदेशान्वये मान्यता दिली . तसेच चांभार व ढोरांच्या मुलींच्या शाळेलाही मंजुरी दिली . २४ नोव्हेबर १९११ च्या एका आदेशातन्वये राज्यातील सर्व अस्पृश्यांना मोफत शिक्षण देण्याची तरतुद केली . याहुन सर्वात महत्वाचे म्हणजे शाहूंनी १ जानवारी १९१९ राजी दिलेल्या आदेशात स्पष्ट नोंद आढळते की, विदया खात्यातील खासगी किंवा सरकारी संस्थाना ग्रॅट, इमारती किंवा प्ले ग्राऊंड वगैरे रूपाने मदत मिळते त्याठिकाणी अस्पृश्यांना स्पृश्यांपेक्षा जास्त ममतेने वागवावे . शाळा मध्ये किंवा खाजगी संस्थामध्ये स्पृश्य अस्पृश्य भेदभाव करणा-या संस्था, शिक्षक किंवा प्राचार्य यांच्यावर कारवाई करण्याचा इशारा त्यांनी दिल्याची नोंद आढळते .[१४]

४) उच्च व व्यवसाय शिक्षण ः

शाहू छत्रपतींना उच्च व व्यवसाय शिक्षणाचे महत्व पटले होते . म्हणून त्यांनी राजाराम कॉलेजच्या खर्चासाठी दरवर्षी ५0,000 रूपये देण्याची तरतुद केली . खेडेगावचा कारभार व्यवस्थित चालावा म्हणुन पाटील व तलाठी शाळा सुरू केल्या . या शाळामधुन पाटील व तलाठयांना जमाखर्च, महसुल विषयक कायदे तसेच शांतता व सुव्यवस्थेचे धडे दिले जात असत . शिक्षकासाठी प्रशिक्षण वर्ग सुरू करून ६ महिन्याच्या काळात २0 शिक्षकांना अंकगणित, भाषा, शालेय व्यवस्था व अध्यापन पध्दतीचे शिक्षण देण्याची व्यवस्था केली . तांत्रिक शिक्षणाच्या प्रसारासाठी त्यांनी ''जयसिंगराव घाटगे तांत्रिक संस्थेची'' स्थापना केली . लोहारकाम, गवंडीकाम, सुतारकाम यासारख्या विषयांचे शिक्षण येथे देण्यात येई . लष्करी शिक्षणासाठी 'इन्फंट्री स्कुल ' सुरू केले .[१५]

५) स्त्री शिक्षण ः

स्त्री शिक्षणाबावतीत शाहू छत्रपतींची भुमिका निश्चितच महत्वपूर्ण होती . गरीब, गरजु व हुशार मुलींना शिक्षणासाठी आर्थिक मदत करणे, त्यांची शिक्षण फी माफ करणे, त्यांना शिष्यवृत्या देणे, स्त्री शिक्षणाच्या संदर्भात उल्लेखनीय कार्य करणा -या शिक्षकांना उत्तेजनार्थ बक्षीसे देणे, पालकांनी आपल्या मुलींना शाळेत घालावे म्हणून त्यांना प्रोत्साहन देणे, गुणवत्तेला वाव देणे असे अनेक प्रयोग राबविले . कृष्णाबाई केळवकर या हुशार मुलीला ग्रँट मेडिकल कॉलेजमध्ये प्रवेश मिळावा म्हणून मदत केली . मुलींना शैक्षणिक प्रोत्साहन देण्यासाठी ''श्री राधाबाई आक्कासाहेब महाराज शिष्यवृत्ती'' आणि ''श्री नंदकुंवर महाराणी भावनगर शिष्यवृत्ती'' या शिष्यवृत्त्या सुरू केल्या .गुजराथी मुलींना शिष्यवृत्ती देण्यासाठी भावनगरच्या कोषागारात २४00 रूपयांची रक्कम ठेव म्हणुन ठेवली . मागासवर्गीय मुलींसाठी भोजन, निवास व शिक्षण शल्क यावावत उदारहस्ते मदत केली . राधाबाई सुर्यवंशी, ताराबाई खानीलकर यासारख्या हूशार मुलींना शिक्षणासाठी मुक्तहस्ते मदत केली . स्वत:ची सुनबाई इंदूमतीदेवी यांना शिक्षण दिले . रखमाबाई केळकर यांची महाराजांनी स्त्री शिक्षण अधिक्षक पदावर नेमणूक केल्याचा उल्लेख आढळतो .[१६]

निष्कर्ष ः

शाहू छत्रपतींच्या शैक्षणिक धोरणाचे बारकाईने अवलोकन केल्यास असे दिसून येते की सामाजिक, धार्मिक व बौध्दिक गुलामगिरी विरूध्दचा लढाईमध्ये सर्वसामान्य, बहुजन समाजातील लोकांचे आत्मबळ वाढवून त्यांना स्वत:ची उन्नती करणारा मार्ग निर्माण करून देऊन त्या मार्गावरून चालण्याची ताकद निर्माण करणारी शैक्षणिक चळवळ शाहूंनी आपल्या कारकिर्दीत सुरू केली असे दिसते .त्यांनी स्वीकारलेल्या ध्येय धोरणांचा प्रभाव पुढील काळातील अनेक समाजसुधारकांवर पडल्याचे दिसून येते . त्यांच्याच वैचारिक मुशीतुन तयार झालेल्या कर्मवीर भाऊराव पाटील, डॉ . पंजाबराव देशमुख, डॉ .बाबासाहेब आंबेडकर सारख्या शिक्षणमहर्षींनी जाती-पातीचा विचार न करता खेडयापाडयापर्यंत, वाडी- वस्तीपर्यंत शिक्षणाची गंगा पोहचविणाचे महान कार्य केले . या कार्यामागे मुख्य प्रेरणा शाहूंचीच होती . कोणत्याही राज्यकर्त्यांचे आदर्श शैक्षणिक धोरण कसे असावे याचे उत्तम उदाहरण म्हणून राजर्षी शाहू छत्रपतींच्या शैक्षणिक चळवळीकडे पहावे लागते . यातच त्यांच्या शिक्षणविषयक कार्याचे सार सामावलेले आहे .

संदर्भ ः

१) डॉ . सुर्यवंशी ग .सु . - राजाशाहू आणि समाजप्रबोधन ,रणजित प्रकाशन, इचलकरंजी
२) किर धनंजय - राजर्षी शाहू छत्रपती, पॉप्युलर प्रकाशन,मुंबई
३) डॉ . सांगवे विलास (संपा)- राजर्षी शाहू छत्रपती पेपर्स,खंड : २ शाहू संशोधन केंद्र, शिवाजी विदयापीठ कोल्हापूर
४) किर धनंजय - उपरोक्त
५) डॉ . जाधव रमेश -लोकराजा शाहू छत्रपती ,सुरेश एजन्सी ,पुणे
६) जाधव वी .वी . (संपा)- राजर्षी श्री शाहू महाराजांची निवडक भाषणे, लोकवाड ;मय गृह
७) डॉ .भोसले एस .एस . (संपा)-क्रांतिसुक्ते :राजर्षी छत्रपती शाहू, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई
८) डॉ .भोसले एस .एस . (संपा)- उपरोक्त
९) डॉ .भोसले एस .एस . (संपा)- उपरोक्त
१0) डॉ .पाटील पी . सी .- 'माझा आठवणी', मॉज प्रकाशन गृह, मुंबई
११) डॉ .कठारे अनिल - आधुनिक महाराष्ट्राचा इतिहास , विदया बुक पब्लिशर्स, औरंगाबाद
१२) डॉ .भोसले एस .एस . (संपा)- पूर्वोक्त
१३) डॉ .कठारे अनिल -उपरोक्त
१४) डॉ .कठारे अनिल -उपरोक्त
१५) जाधव वी .वी . (संपा)-उपरोक्त
१६) डॉ .कदम जयसिंगराव (लेख)- संशोधन पत्रिका मुखपत्र, शिवाजी विदयापीठ इतिहास परिषद

33. हैद्राबाद संस्थानात आर्य समाजाचे कार्य

प्रा. शिलेदार चंद्रकला बसापा
कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय,
उमदी. ता. जत जि. सांगली

ब्रिटिशांच्या भारतातील सत्तेच्या स्थापनेनंतर त्यांनी भारताची दोन प्रदेशात विभागणी केली होती. पहिला विभाग ब्रिटिश इंडिया म्हणजे खालसा भारत व दुसरा विभाग प्रिन्स्ली इंडिया म्हणजे संस्थानी भारत. ब्रिटिश खालसा प्रदेश व संस्थानी भारत यांच्या प्रशासकीय स्वरूपामध्ये खूप मोठया प्रमाणावर फरक होता याला कारण म्हणजे बिट्रिशांनी खालसा केलेल्या भागाचे प्रशासन गव्हर्नर जनरलच्या माध्यमातून चालविले जात होते, तर संस्थानी भारताचा कारभार हा संस्थानिकांच्य हातामध्येच होता व तेथील प्रशासन संस्थानिकांकडून चालविले जात होते .पण या संस्थानिकांच्यावर सार्वभौमत्व हे बिटिशांचेच असे. त्यामुळे संस्थांनी जनतेला दुहेरी गुलामगिरीत रहावे लागत होते. या संस्थानांमध्ये विसाव्या शतकाच्या दुसऱ्या दशकाच्या शेवटी जागृतीस सुरूवात झाली. अशा संस्थानापैकी हैद्राबाद संस्थान एक होते.

हैद्राबाद संस्थान :

ब्रिटिश राजवटीच्या काळात भारतात जवळपास 563 देशी राज्ये आणि संस्थाने होती. दक्षिण भारतात श्रावणकोर, बडोदा, कोल्हापूर, नागपूर आणि हैदराबाद ही पाच ठिकाण होते. यापैकी मोगल साम्राज्याच्या विघटनाच्या काळात जन्माला आलेले हैद्राबादचे संस्थान भारताच्या मध्यभागी वसले होते. भारतातील तीन चार मोठया संस्थानापैकी हैद्राबादचे शासक हे सर्वसाधरणतः ब्रिटिशधार्जिणे असल्यामूळे हैद्राबादच्या अंतर्गत कारभारात ब्रिटिशांचा हस्तक्षेप होत नसे हैद्राबादच्या प्रजेपैकी सूमारे 85% लोक हिंदू व जेमतेम 15% मुसलमान असूनही शासक मुसलमान असल्यामुळे हिंदू प्रजेवर सतत अन्याय होई. 1911 साली मीर उस्मान अली खान निजाम बनल्यापासून शासनात सुधारण घडवून आणण्याचा सल्ला ब्रिटिश सरकारने त्याला अधूनमधून दिला असला तरी त्याचा निजामावर फारसा परिणाम झााला नाही. हिंदू प्रजेवरील जुलुमान व अत्याचारात कधी खंड पडला नाही. हैद्राबादमधील हिंदू प्रजा सतत दडपली जाण्याचे एक महत्वाचे कारण होते, ते म्हणजे त्यांच्यातील ऐक्याचा अभाव हिंदू प्रजा कानडी, तेलगू व मराठी अशा तीन गटात विभागलेली असल्यामुळे निजामाच्या शोशक व जुलमी शासनाला संघटितरीत्या विरोध करणे त्यांना शक्य होत नव्हते. हैद्राबाद राज्यात मराठवाडा, तेलगंणा, कर्नाटक या प्रादेशिक विभागांचा समावेश होत होता. 1920 नंतर हैद्राराबाद मधील हिंदू प्रजेच्या प्रबोधनाची कार्य आर्य समाजी मंडळीनी हाती घेतले.

आर्य समाज :

स्वामी दयानंद सरस्वती यांनी 10 एप्रिल 1875 रोजी सर्वप्रथम मुंबई येथे' आर्य समाज' या संघटनेची स्थापना केली तर इ.स 1880 मध्ये हैद्राबाद संस्थानात मराठवाडयातील बीड जिल्हा, ता. किल्ले धारूर या ठिकाणी सर्वप्रथम आर्य समाजाची स्थापना झाली पुढे इ.स 1892 मध्ये या आर्य समाजाच्या शाखेचे स्थलांतर हैद्राबाद येथे 'सुलतानबाजार' या ठिकाणी करण्यात आले. खऱ्या अर्थाने येथूनच आर्य समाजाच्या कार्याची सुरूवात झाली. बॅरिस्टर विनायकराव कोरटकर हे आर्य समाजाचे अध्यक्ष होते. तर उदगीरचे बन्सीलालजी हे मुख्यमंत्री होते. इ. स. 1930 मध्ये संस्थानातील प्रत्येक जिल्हयात आर्य समाजाच्या शाखा स्थापना करण्यात आल्या. हैद्राबाद संस्थानाच्या स्वातंत्र्य आंदोलनाची उभारणी करण्याचे महत्त्वाचे कार्य आर्य समाजानेच केले. संस्थानातील जनतेत जनजागृती करून आंदोलनाची पायाभरणी आर्य समाजाने केली नसती तर संस्थानातील संपूर्ण समाज हैद्राबाद स्वातंत्र्य आंदोलनात पेटून उठला नसता. सामाजिक धार्मिक सुधारणा घडवून आणणे हे आर्य समाजाचे मूळ कार्य होते.

आर्य समाज–समाज जागृतीचे कार्य :

संस्थानातील हिंदू समाजात धार्मिक आणि राजकीय जागृती करण्याचे महान कार्य आर्य समाजानेच केले. समाजात राजकीय जागृती झाल्याशिवाय तो अन्याय व अत्याचाराविरूध्द उद्रेकाने पेटून उठत नसतो. आर्य समाजाने केलेल्या जनजागृतीमुळेच हिंदू समाज निजाम सरकारविरूध्द उद्रेकाने पेटून उठला.उदगीरचे भाई बन्सीलालजी यांनी उदगीरला आपले मुख्य कार्यालय उघडले. त्यांनी 'वैदिक संदेश' या नावाचे वृत्तपत्र सोलापूर येथून प्रसिध्द करण्यास सुरूवात केली. सोलापूर येथून 'सुदर्शन' हे आर्य समाजाचे मुखपत्र प्रसिध्द होत होते. हैद्राबाद येथून 'वैदिक आदर्श' हे साप्ताहिक पंडित नरेंद्र प्रसिध्द करीत होते. या वृत्तपत्रांद्वारे त्यांनी समाजात जागृती घडवून आणली व लोकांना संघटीत केले. धारूर येथील धारूर आर्य समाज' या केंद्रानेही महत्वाची समाज जागृती केली. स्वामी दयानंदांच्या सिध्दांताचे ते प्रचार केंद्र होते. बन्सीलाल तिवारी व पंडित आर्य भानुजी यांनी धारूर आर्य समाजाच्या उन्नती मध्ये सिंहाची भूमिका बजाविली.

इ.स. 1897 साली महात्मा बेनी माधव, पंडित योगानंद, स्वामी आत्मानंद सरस्वती, पंडित केशवराव वकिल, राजा गोविंद

प्रसाद, श्री इंद्रजित, भवानी शंकर, श्यामलाल व बन्सीलाल यांनी आर्य समाजाचा केलेला प्रचार महत्वाचा ठरला. त्यांनी जातीयतेला मुठ माती देऊन आपण सर्व समान व एक आहोत ही भावना समाजात रूजविली, त्यामुळे समाज संघटीत होऊ शकला. स्वामी श्रध्दानंदांनी इ.स. 1901 साली हरिद्वार जवळ गुरूकुल कांगडीची स्थापना केली. आणि हे आर्य समाजाचे प्रमुख राश्ट्रीय शिक्षणाचे केंद्र बनले. आज ही संस्था केंद्रीय विद्यापीठ म्हणून सर्वत्र ज्ञात आहे. या स्वामी श्रध्दानंदांनी समाज जागृतीचे 7 डिसेंबर 1934 रोजी त्यांनी हैद्राबादला 'वैदिक आदर्श' हे साप्ताहिक सुरू केले. त्याची जनजागृतीच्या कार्यात मोठा वाटा होता. आर्य समाजाने ठिकठिकाणी 'आर्य कन्या' पाठशाळा स्थापन केल्या व त्यांद्वारे स्त्रियांमध्ये जागृती घडवून आणली.त्यामूळे स्त्रिया संघटीत होऊ शकल्या. थोडक्यात समाज निजामाच्या विरोधात पेटून उठला.

सामाजिक सुधारणा :

आर्य समाजाने केलेल्या सामाजिक सुधारणामुळे संस्थानात एक राष्ट्रीयत्वाची भावना वाढीस लागली. हिंदू धर्माला प्राप्त झालेले विकृत स्वरूप नाहीसे करणे, वैदिक धर्माचे पुनरूज्जीवन करणे, वेदाध्ययनाचा अधिकार समाजातील सर्व जातींना देणे, वेदातील ज्ञान सर्वांना समजावे यासाठी ते हिंदी भाषेत करून उपलब्ध करणे, यज्ञोपविधी संस्कार करण्याचा अधिकार सर्व जातीना देणे, विभक्त समाजाला संघटित करणे, जातीय विशमता नश्ट करून सामाजिक समता प्रस्थापित करणे व अस्पृश्यता नष्ट करणे इत्यादी कार्यक्रम आर्य समाजाने राबविले. धर्मांतरित हिंदूना पुन्हा हिंदू धर्माची दिक्षा देण्याचेही काम आर्य समाजाने केले. आर्य समाजाची दारे सर्व जातीसाठी खुली होती. त्यांनी दलितांच्या उध्दाराचे महान कार्य केले. आर्य समाजाच्या या कार्यामुळे सामाजिक ऐक्य आणि धार्मिक सलोखा निर्माण झाला. परिणामी आर्य समाजाने सुरू केलेल्या चळवळीत दलितांशिवाय समाजातील सर्व जातीतील लोकांनी सहभाग घेतला आंतर जातीय विवाहास सर्वप्रथम आर्य समाजानेच प्रोत्साहन दिले. विधवांच्या पुनर्विवाहास चालना दिली.गणपतराव वैद्य या ब्राम्हण आर्य समाजी व्यक्तीने शांतीदेवी या नावाच्या अस्पृश्य स्त्री बरोबर आंतरजातीय विवाह केला. पंडित मनोहर लालजी व पंडित शंकरदेव विद्यालंकार हे जन्मतः हरीजन होते. परंतु त्यांनी ब्राम्हण मुलीबरोबर विवाह केला होता. या विरोधाला न जुमानता आर्य समाजाने आपले कार्य केले आाणि त्या कार्यादवारे संस्थानातील हिंदू समाजात ऐक्य निर्माण केले व त्यांना संघटित करून निजामाच्या विरोधात खंबीरपणे उभे केले. निजाम सरकारला सर्वप्रथम उघडपणे विरोध करण्याचे कार्य आणि धाडस आर्य समाज या संघटनेनेच केले. आर्य समाजाने ठिकठिकाणी आर्य समाज मंदिरे, व्यायाम शाळा व वाचनालये काढली होती. आर्य समाजाच्या कार्यामुळे लोक निजामाच्या विरोधात दंड थोपटून उठले. त्यामुळे सरकारने आर्य समाजाची चळवळ दडपून टाकण्याचा प्रयत्न केला.

आर्य समाजाच्या कार्याचे मूल्यमापन :

हैद्राबाद स्वातंत्र्य संग्रामात आर्य समाजाने केलेल्या कार्याचे मूल्यमापन पुढील प्रमाणे करता येईल.

1) हैद्राबाद संस्थानात आर्य समाजाने व्यापक स्वरूपाचे कार्य केले. आर्य समाजानेच सर्व प्रथम सत्याग्रह लढयाचे रणशिंग फुंकले आणि स्वातंत्र्यासाठी प्रभावीपणे संघर्ष केला.
2) हिंदू धर्मातील अनिष्ट प्रथा, रूढी व परंपरांचे उच्चाटन करून शुध्द वैदिक धर्माचे तत्वज्ञान व स्वरूप समाजापुढे मांडले.
3) जाती व्यवस्था आणि अस्पृश्यता नष्ट करण्यासाठी प्रयत्न केला. व दलित उध्दारांचे कार्य हाती घेतले.
4) आंतरजातीय विवाहास आणि पुनर्विवाहास प्रोत्साहन दिले. विधवा विवाहावरची बंदी अन्यायकारक असल्याने त्याबाबतचे केशवराव कोटकरांनी 'बाबेहुकूमत' मध्ये एक विधेयक मांडले होते.
5) सामाजिक व धार्मिक कार्याच्या माध्यमातून आर्य समाजाने संस्थानातील जनतेत राष्ट्रीयत्वाची जागृती केली.
6) आर्य समाजाने हैद्राबाद स्वातंत्र्य आंदोलनाची पायाभरणी केली म्हणून स्टेट कॉग्रेस निजामाविरूध्द खंबीरपणे लढा देऊ शकले.
7) आर्य समाजाने आपली दारे सर्व जातीतील लोकांना खुली केले जबरदस्तीने मुस्लिम बनविलेल्या हिंदूचे वैदिक पध्दतीने शुध्दीकरण करून त्यांना आर्य समाजाची दीक्षा दिली. अस्पृश्यांना आर्य समाजात घेतले. या महान कार्यामुळे सामाजिक ऐक्य व धार्मिक एकता निर्माण झाले.
8) संस्थानातील समाजात जनजागृती करून त्यांना वैदिक धर्माच्या ध्वजाखाली स्वातंत्र्य आंदोलनासाठी सशस्त्र संघटीत केले.
9) आर्य समाजाने जातीप्रथा, अस्पृश्यता, विधवा विवाहास बंदी व अनिश्ठ रूढी परंपरा विरूध्द बंड पुकारले, परंतु या कार्यास निजाम सरकार व हिंदू धर्मातील कर्मठ लोकांनीही कडाडून विरोध केला.

10) आर्य समाजाची चळवळ दडपण्यासाठी सरकारने दडपशाही सुरू केली. हिंदूवर अन्याय, अत्याचार केले. या कृतीचा आर्य समाजाने सशस्त्र प्रतिकार केला. त्यामुळे अनेक आर्य लोकांना प्राणास मुकावे लागले.

11) हैद्राबाद स्वातंत्र्यसंग्रामात आर्य समाज आघाडीवर राहिला. स्वातंत्र्य संग्रामातील आर्य समाजाची कामगिरी सुवर्णाक्षरांनी लिहावी अशी आहे. उदगीरचे श्यामलालजी व बन्सीलालजी, गुंजोटीचे वेदप्रकाशजी आर्य, हुमनाबादचे शिवचंद्र, तांडूरडे विष्णू भागवत, उमरीचे दत्तात्रय उत्तरवार व निजामाबादचे राधाकृष्ण या आर्य समाजी नेत्यांनी स्वातंत्र्यासाठी बलिदान दिले.

उपसंहार :

18 जुलै 1947 रोजी ब्रिटीश सरकारने भारतीय स्वातंत्र्याचा कायदा पास केला, या कायदयानुसार 15 ऑगस्ट 1947 रोजी भारत ब्रिटीशांच्या राजकीय वर्चस्वातून मुक्त झाला. परंतु देशी राज्ये व संस्थाने भारतीय संघराज्यात कशी विलीन करून घ्यावयाची हा मोठा प्रश्न भारत सरकारपूढे निर्माण झाला. शेवटी भारताचे पंतप्रधान पंडित नेहरू आणि गृहमंत्री सरदार वल्लभभाई पटेल यांनी बहुतेक संस्थाने भारतात विलीन करून घेतली. परंतु हैद्राबाद राज्याचा सत्ताधीश निजाम–मीर–उस्मान अलीखान याने 11 जून 1947 रोजी आपले राज्य स्वतंत्र राहणार असल्याचे जाहीर केले. तसेच निजामाची सत्ता अन्यायी, अत्याचारी होती. याशिवाय देशाच्या व दख्खनच्या मध्यभागी असलेले हैद्राबाद संस्थानाचे भारतात विलीनीकरण झाल्याशिवाय स्वातंत्र्याला पूर्णत्व प्राप्त होणार नव्हते. यासाठी आर्य समाजाने केलेल्या सामाजिक सुधारणा,अनेक नेत्यांची कामगिरी विशेष महत्वाची आहे. शिवाय जनजागृती झाल्यामुळे जनतेने हैद्राबाद राज्याचे भारतीय संघराज्यात विलीनीकरण करण्यासाठी सत्याग्रह व सशस्त्र आंदोलन केले. शेवटी 13 सप्टेंबर 1948 रोजी भारत सरकारने हैद्राबाद राज्याच्या विलीनीकरणासाठी जनतेने जे सत्याग्रह व सशस्त्र आंदोलने केले. हेच आंदोलन भारतीय इतिहासात 'हैद्राबाद स्वातंत्र्यसंग्राम' या नावाने ओळखले जाते.

संदर्भः

1) डॉ. शांता कोठेकर– आधुनिक भारताचा इतिहास (1947–2000) श्री साईनाथ प्रकाशन,नागपूर–नोव्हेबर 2010

2) डॉ. अनिल कठारे–आधुनिक महाश्ट्राचा इतिहास (1818–1960) विदया बुक्स पब्लिशर्स–औरंगपुरा, औरंगाबाद–जून 2012

3) भालेराव अनंत– हैदराबाद स्वातंत्र्य संग्राम आणि मराठवाडा मंबई, मौजे प्रकाशनग्रह ,2001

4) फडके य. दी.– विसाव्या शतकातील महाराष्ट्र, खंड 03 श्री विदया प्रकाशन, पुणे 1993

5) संशोधक– इतिहिासाचार्य वि.का राजवाडे संशोधन मंडळ धुळे. 2014

6) महाराष्ट्र इतिहास– महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ पुणे–2012

34. औंध संस्थानातर्गत शांतता व सुरक्षाव्यवस्था

प्रा. डॉ. बी. यु. तुपे
संशोधन मार्गदर्शक व इतिहास विभाग प्रमुख,
नाईट कॉलेज ऑफ आर्टस् ॲण्ड कॉमर्स,
इचलकरंजी. जि. कोल्हापूर.

प्रस्तावना:—

विसाव्या शतकामध्ये ब्रिटिश अंमलात हिंदुस्थानचे ब्रिटिश हिंदुस्थान व संस्थाने असे विभाजन झालेले होते. संस्थानिक हे जरी तत्वत: स्वतंत्र असले तरी ते ब्रिटिश अधिसत्तेचे मांडलिकच होते. अंतर्गत व बाहय शत्रूपासून संस्थाने व संस्थानिकांच्या संरक्षणाची पूर्ण हमी ब्रिटिश अधिसत्तेने घेतलेली होती. त्यामुळे अंतर्गत बंडाळी , परकीय आक्रमण या बाबतीत या संस्थानिकांना कसल्याच प्रकारची भिती राहिली नव्हती. त्यामुळे बहुतेक संस्थानाधिपती चैनी विलासी बनले होते. अंतर्गत राज्यकारभार , प्रशासन व्यवस्था, संस्थानी प्रजेचे हित या बाबींकडे संस्थानिकांनी पूर्ण दुर्लक्ष केलेले होते. काही संस्थानात तर प्रशासन नावाला सुदधा उरलेले नव्हते. अशा पार्श्वभूमीवर औंध संस्थानातर्गत शांतता व सुरक्षा व्यवस्था कशी होती आणि यासंदर्भात औंध अधिपतींनी कोणत्या उपाययोजना केलेल्या होत्याया गोष्टींची प्रस्तुत शोध निबंधामध्ये अभ्यासपूर्ण चर्चा केलेली आहे.

औंध संस्थानचा पुर्वेतिहास:—

औंध हे दक्षिण महाराष्ट्रातील छोटेसे संस्थान होते. औंध हे संस्थानच्या राजधानीचे ठिकाण होते. ते साता—याच्या अग्नेयेस ६७.५ कि.मी. अंतरावर असून ते १७०.३२ उत्तर व ७४०.२० पूर्व अक्षांश रेखांशावर आहे. औंध संस्थान हे सातारा व विजापूर या दोन जिल्हयात पसरलेले होते. 'प्रतिनिधी' घराणे हे औंधचे राजघराणे होते. किन्हई गावचा त्रंबक कृष्णाजीपंत हा औंधच्या प्रतिनिधी घराण्याचा मूळ पुरुष होय. ज्यावेळी छ. राजाराम महाराज जिंजीच्या आश्रयास गेलेले होते त्यावेळी परशुरामपंत त्रंब्यक हा त्रंब्यकपंताचा पहिला मुलगा याने महाराष्ट्रात मुघलांना प्रखर प्रतिकार करुन आपले शौर्य आणि कर्तबगारी दाखविली. त्यामुळे छ. राजाराम महाराजांनी परशुरामपंत त्रंब्यक यांचा गौरव करुन त्यांना सन १६९८ मध्ये 'प्रतिनिधी' हा किताब दिला.[१]

औंध संस्थानात खालील राज्यकर्ते होवून गेले:—

१. परशुराम त्रंबक २. श्रीनिवास उर्फ श्रीपतराव ;१७१८ — १७४६द्ध ३. जगज्जीवनराव परशुराम उर्फ दादोबा ;१७४६ — १७५४द्ध ४. श्रीनिवास गंगाधर उर्फ भवानराव ;१७५४ — १७७७द्ध ५. परशुराम श्रीनिवास उर्फ थोटेपंत ;१७७७—१८४८द्ध ६. श्रीनिवास परशुराम उर्फ रावसाहेब ;१८४८ — १९०१द्ध ७. परशुराम श्रीनिवास उर्फ दादासाहेब ;१९०२ — १९०५द्ध ८. गोपाळकृष्ण परशुराम उर्फ नानासाहेब ;१९०५ — १९०७द्ध ९. भवानराव श्रीनिवास उर्फ बाळासाहेब ;१९०९ — १९४८द्ध

विसाव्या शतकातील पुरोगामी औंध अधिपती बाळासाहेब पंतप्रतिनिधी यांच्या कालखंडापासून नवीन युगाची सुरुवात झालेली दिसून येते. औंध संस्थानच्या इतिहासातील हा कालखंड म्हणजे सुवर्णयुग होय. औंध संस्थानने या कालखंडात राजकीय, सामाजिक, आर्थिक, धार्मिक, शैक्षणिक, सांस्कृतिक इ. अनेकाविध क्षेत्रांमध्ये लक्षणीय प्रगती केल्याचे दिसून येते. विशेषत: विसाव्या शतकामध्ये छोटयाशा औंध संस्थानने राबविलेला ग्रामराज्याचा प्रयोग आणि सूर्यनमस्कार चळवळ यामुळे औंध संस्थान प्रकाशझोतात आले व देशभर प्रसिध्द पावले.

अंतर्गतशांतता व सुव्यवस्था :—

परचक्रापासून राज्याचे संरक्षण करणे जेवढे महत्वाचे असते त्यापेक्षाही राज्याअतर्गत सुरक्षा व्यवस्था मजबूत करणे व समाजामध्ये शांतता व सुव्यवस्था प्रस्थापित करणे आणि ती टिकवणे हे अधिक महत्वाचे असते. समाजाच्या निकोप वाढीसाठी आणि राज्याच्या प्रगतीसाठी हे पूरक व पोषक असते . समाजामध्ये शांतता व सुव्यवस्था नांदत असेल तर समाजाचा सर्वांगिण विकास होत असतो. अस्थिर अराजकसदृश्य परिस्थिती समाजाला सर्वांगीण विनाशाकडे घेवून जाते. बाहय घटकांच्या हस्तक्षेपामुळे सामाजिक शांततेचा भंग होवून अव्यवस्था निर्माण होते असे नाही तर समाजामध्येही काही गुंड प्रवृत्तीच्या व्यक्ती, गुन्हेगारी प्रवृत्तीची माणसे असतात. त्यांच्यामुळेही समाज स्वास्थ्य बिघडते. कोणत्याही समाजामध्ये अशी गुन्हेगारी प्रवृत्तीची माणसे आपणाला दिसून येतात. त्यापैकी काही व्यक्ती या मुळातच गुन्हेगारी प्रवृत्तीच्या असतात तर काही व्यक्तींना त्यांच्या सभोवतालची सामाजिक परिस्थिती गुन्हेगार बनवित असते. समाजातील वाढते दारिद्रय,भूक, अनैतिकता,निरक्षरताइ. अनेक गोष्टींचा परिणाम म्हणून समाजातील गुन्हेगारी प्रवृत्ती वाढीस लागते. ज्या समाजामध्ये गुन्हेगारीचे प्रमाण जास्त असते त्या समाजातील शांतता व सुव्यवस्था नष्ट होवून समाजजीवन अस्थिर बनते. असा अस्थिर समाज सर्वच बाबतीत मागासलेला, अप्रगत दिसून येतो. याचा अर्थ प्रगत समाजामध्ये गुन्हेगारी प्रवृत्ती नसते असा नव्हे तर प्रगत समाजामध्येही गुन्हेगारी असते. परंतु त्याचे प्रमाण कमी असल्याचे दिसून येते. या दृष्टिकोनातून औंध संस्थानातील समाजजीवनाचा विचार करता समाजातील गुन्हेगारीचे प्रमाण त्यामानाने कमी असल्याचे दिसून येते आणि त्यातही खून, बलात्कार अशा क्रूर गुन्हयांचे प्रमाण तर अगदीच कमी होते. हे या संदर्भातील अगदी १० वर्षाच्या आकडेवारीवरुनही आपल्या लक्षात येईल. सन १९११—१२ मध्ये एकूण ५८ गुन्हयांची नोंदझालेली होती.त्यापैकी खून ३ व बलात्कार १, सन १९१५—१६ मध्ये गुन्हे नोंद १४० होते त्यापैकी खून १ व बलात्कार २, सन १९२०—२१ मध्ये एकूण १३८ गुन्हेगारी कृत्यांची नोंद

होती त्यामध्ये खूनाचा एकही गुन्हा नोंद झालेला नव्हता. बलात्काराचे फक्त २ गुन्हयांची नोंद होती यावरुन औंध संस्थानातील समाजजीवन तसे सामान्य असल्याचे दिसून येते.[२] त्याचबरोबर समाजातील शांतता व सुव्यवस्था टिकून रहावी अंतर्गत सुरक्षा व्यवस्था मजबूत बनावी आणि समाजजीवन स्थिर व भयमुक्त व्हावे यासाठी विसाव्या शतकातील प्रजाहितदक्ष औंध अधिपती बाळासाहेब पंतप्रतिनिधीची सतत धडपड चालू होती यासाठी त्यांनी अनेकविध उपाययोजना केलेल्या दिसून येतात.

गावगुंड व टग्यांचा बंदोबस्त :–

समाजामध्ये कामधंदा न करणा–या रिकाम्या व्यक्ती असतात. गुंडगिरी, टगेगिरी करणारे गावगुंड किंवा टगे असतात हे लोक समाजामध्ये अनेक क्लुप्त्या, कुरापती करीत असतात, भांडणे लावीत असतात, गावांत दुफळी निर्माण करीत असतात आणि त्यामुळे सामाजिक शांतता नष्ट होवून समाजस्वास्थ्य बिघडते. जनावरे मारणे, गंजी जाळणे, पिके कापून नेणे, त्याचप्रमाणे एकमेकांचे खून करणे असे प्रकार दुफळीतून घडत असतात. त्यामुळे समाजामध्ये अनेक सामाजिक विकृती निर्माण होवून समाजजीवन अस्थिर बनते. याची औंध अधिपती बाळासाहेब प्रतिनिधीना जाणीव होती. औंध संस्थानातील कुंडल तालुक्यातील दुशेरे हे गाव दुफळीच्या बाबतीत प्रसिद्ध होते.[३] अशा प्रकारे समाजामध्ये दुफळी निर्माण होवून समाज बिघडू नये याची औंध अधिपती बाळासाहेब पंतप्रतिनिधीनी दक्षता घेतलेली दिसून येते. यासाठी त्यांनी प्रत्येक गावातील ग्रामपंचायतींना रयत सभेच्या सभासदांना गावात रिकामटेकडा कोण आहे. गुंडगिरी, टगेगिरी करणारे कोण आहेत हे ओळखून त्यांचा वेळीच बंदोबस्त करावा त्याला कामाला लावावा आणि त्याच्याकडून गावातील शांततेचा भंग होणार नाही अशी व्यवस्था करावी अशा सूचना दिलेल्या होत्या. त्याचप्रमाणे गावांतील लोकांनी देखील अशा व्यक्तींना खड्यासारखे उचलून समाजाबाहेर फेकून दिले पाहिजे आणि लोकांना ते शक्य नसेल तर अशा व्यक्तींची नांवे सरकारला कळवावीत. सरकार त्यांचा बंदोबस्त करेल असे ते नेहमीच प्रजेला सांगत असत.

गावातील दुफळीच्या संदर्भात ते म्हणतात –''प्रत्येक गावांस दुफळी तर असतेच. कित्येक वेळा खूनही या दुफळीमुळे घडतात. त्या–त्या गांवची खरी परिस्थिती तुम्हास ठावूक असते. तुम्ही ती सांगितल्यास आपण सर्वास मिळून काही उपाय शोधून काढता येईल. दुफळी मोडली तर गांवचे किती कल्याण होईल ? तुम्ही म्हणाल सरकारचे स्टांफचे उत्पन्न बुडेल. हरकत नाही. आमचे न्यायाधिशाकडे एकही खटला न आला तरी आम्ही त्यांस बसून पगार देवू पण ही दुफळी मोडा. खटपट केल्यास काय होत नाही?''[४] यावरुन गावपातळीवरील समाजजीवन शांत, स्थिर आणि निकोप रहावे यासाठी औंधअधिपती कसे दक्ष होते हे दिसून येते.

गांवसभा व तालुकासभा :–

औंध संस्थानात सार्वजनिक हिताच्या दृष्टीने प्रत्येक गांवात 'गांवसभा' व तालुक्याच्या ठिकाणी 'तालुकासभा' यांची स्थापना केलेली होती. या सभा आपआपल्या कार्यक्षेत्रातील सामाजिक हिताच्या विविध गोष्टींकडे लक्ष देत होत्या. गावसभा ही गावची निती, शिक्षण, आरोग्य याबरोबरच गावची शांतता , सुरक्षितता आणि सुव्यवस्थायाकडेही लक्ष देत असे. गांवात टगेगिरी करणा–या, गुंडगिरी करणा–या, भांडणे लावणा–या, गावात दुफळी निर्माण करणा–या लोकांना वठणीवर आणून त्यांना सन्मार्गास लावणे आणि वेळ पडल्यास सरकारकडून अशा गुन्हेगारी प्रवृत्तीच्या लोकांचा बंदोबस्त करणे हे काम गांवसभा करीत होत्या. त्याचप्रमाणे गावांमधील अनेक जाती–जमातीच्या लोकांमध्ये सलोख्याचे वातावरण निर्माण करणे, गावात एकीची भावना वाढीस लागावी व ती टिकून रहावी आणि एकमेकांच्या मनात कोणत्याही प्रकारची कटुता न राहता बंधुभावाचे वातावरण निर्माण व्हावे अशी व्यवस्था करणे, गांवात कोणत्याही कारणांवरुन भांडण तंटा होवून गांवातील शांतता भंग पावेल आणि समाजजीवनात अस्थैर्य निर्माण होईल असे कृत्य न होवू देणे याची काळजी घेणे ही जबाबदारी गांवसभेकडे सोपवलेली होती.[५]

गांवसभा जी कामे गांवात करीत होत्या ती कामे तालुक्यात तालुकासभा करीत होत्या. तालुकासभेवर गावसभेपेक्षा अधिक जबाबदारी होती. तालुक्यात बदफैली, कज्जेदलाल, लोकांची घरे जाळणारे कोण असतील त्यांचा बंदोबस्त करण्याचे काम तालुकासभा करीत होत्या. आणि या गांवसभा आणि तालुकासभांना औंध अधिपती बाळासाहेब पंतप्रतिनिधी सतत मार्गदर्शन करीत होते. व त्यांच्या कार्याला प्रोत्साहन देत होते. यावरुन औंध संस्थानातील अंतर्गत शांतता व सुरक्षितता यासाठी औंध अधिपती कसेप्रयत्नशील होते हे दिसून येते.

गुन्हेगार व्यक्तींचा विकास प्रक्रियेमध्ये सहभाग : –

औंध संस्थानातील कुंडल तालुक्यातील आळसंद गावचा दत्तोबा पाटील हा खुनी, दरोडेखोर म्हणून प्रसिध्द होता. गुन्हेगारीच्या आणि भांडण–तंटयाच्या बाबतीत आळसंद गाव सर्व औंध संस्थानात प्रसिध्द होता. आणि त्यामुळेच हा गांव विकासाच्या सर्वच बाबतीत मागासलेला होता. साधी एक मास्तरची शाळा देखील या गावात टिकत नव्हती. या गावात शांतता व सुव्यवस्था प्रस्थापित करण्यासाठी पाच वर्षे सतत पोलीस पार्टी ठेवावी लागलेली दिसून येते. या गांवातील दुही संपुष्टात यावी, शांतता प्रस्थापित व्हावी आणि या गावच्या विकासाला चालना मिळावी यासाठी औंध अधिपती बाळासाहेब पंतप्रतिनिधींनी कुंडल तालुका समितीचे अध्यक्ष शंकरभाउ किर्लोस्करांना या गावच्या खुनी, दरोडेखोर दत्तोबापाटलालाच हाताशी धरुन गावचाविकास घडवून आणण्याचा सल्ला दिलेला दिसून येतो आणि त्याप्रमाणे शंकरभाउ किर्लोस्करांनी या दत्तोबा पाटलालाच हाताशी धरुन त्याच्या सहकार्यानेच आळसंद गावचा विकास घडवून आणला. एवढेच नव्हे तर हे गांव औंध संस्थानातील ७२ गावांमध्ये एक नंबरचे बनविलेले दिसून येते.[६]

यावरुन समाजस्वास्थ्य बिघडविणा–या आणि सामाजिक सुरक्षितता धोक्यात आणणा–या गुन्हेगार प्रवृत्तीच्या व्यक्तींनाच समाजप्रवाहात आणून त्यांच्या मनातील गुन्हेगारी प्रवृत्ती नष्ट करुन त्यांचा समाजामध्ये शांतता, सुव्यवस्था टिकवण्यासाठी व समाजाच्या प्रगतीसाठी उपयोग करुन घ्यावयाचा हे बाळासाहेब पंत प्रतिनिधींचे समाजहिताचे व सामाजिक सुरक्षिततेचे धोरण असल्याचे दिसून येते.

गुन्हेगार जमाती कायदा :–

ब्रिटिश राजवटीमध्ये ज्या अस्पृश जाती–जमाती वारंवार गुन्हे करत होत्या अशांना गुन्हेगार जमाती म्हणून घोषित केलेले होते आणि त्यांच्या हालचालींवर नियंत्रण ठेवण्यासाठी 'गुन्हेगार जमाती कायदा' ;क्रिमिनल ट्राइब्ज ॲक्टद्ध केलेला होता. या कायदयान्वये वारंवार गुन्हे करणा–या अशा व्यक्तींना आपल्या हालचालीचे क्षेत्र ठरवून दिले जात असे. अशा व्यक्तींना पोलीस प्रशासनाच्या पुर्वपरवानगीशिवाय ठरवून दिलेल्या क्षेत्राबाहेर जाता येत नसे. अशा व्यक्तींच्या प्रत्येक हालचालींवर पोलीस प्रशासनाकडून बारकाईने लक्ष ठेवले जात असे. औंध अधिपती बाळासाहेब पंतप्रतिनिधींनीही गुन्हेगारीवर नियंत्रण ठेवण्यासाठी आपल्या औंध संस्थानात हा कायदा लागू केलेला होता.[७] सन १९४२ मध्ये औंध संस्थानातील निंबवडे या गावच्या रामोशी समाजातील काही लोकांना हा कायदा लागू करुन त्यांच्या हालचालींवर नियंत्रण लादलेले दिसून येते. त्याचप्रमाणे वहिमी गुन्हे करणारे व शिक्षा भोगून परत आलेल्या अशा लोकांच्या हालचालींवर पोलीस प्रशासनाकडून लक्ष ठेवले जात होते. त्यांची दिवसातून तीन वेळा हजेरी घेतली जात होती. त्यांना काही कारणानिमित्त परगावी जायचे झाल्यास त्यांना त्यासंबंधी दाखला देवून पाठविले जात होते. आणि असा दाखला घेवून न गेल्यास त्या व्यक्तींवर सन १८२७ च्या रेग्युलेशन प्रमाणे खटलेही दाखल केले जात होते.[८] अशाप्रकारे गुन्हेगारी जमाती कायदा औंध संस्थानात लागू करुन जे लोक वारंवार गुन्हे करुन समाजजीवन अस्थिर बनवीत होते अशा गुन्हेगार प्रवृत्तीच्या लोकांच्या हालचालींवर नियंत्रण ठेवून त्यांचा उपद्रव समाजाला होवू नये अशी व्यवस्था औंध अधिपती बाळासाहेब पंतप्रतिनिधींनी केलेली दिसून येते. यावरुन त्यांचा संस्थानांतर्गत शांतता व सुरक्षा विषयक दृष्टिकोन स्पष्ट होतो.

अट्टल गुन्हेगार व्यक्तींची संरक्षणासाठी योजना :–

कोणताही गुन्हा आणि तो करणारा गुन्हेगार हा समाजाच्या दृष्टीने तिरस्करणीय असतो. गुन्हा करणा–याला आपण केलेल्या वाईट कृत्याचा पश्चात्ताप व्हावा आणि त्याचे त्याला प्रायश्चित्त्य मिळावे यासाठी त्याला गुन्हयाचे स्वरुप पाहून कमी किंवा दीर्घ मुदतीची सजा दिली जाते. या सजेच्या कालखंडामध्ये त्याच्या मनांमध्ये, विचारांमध्ये परिवर्तन होत असते. कारावासाची सजा भोगून परत समाजामध्ये आलेला माणूस पूर्वीचा खूनी, दरोडेखोर राहत नाही. त्यालाही इतरांप्रमाणे सन्मार्गाने जीवन जगावे वाटत असते. परंतु समाज मात्र त्याच्याकडे एक गुन्हेगार म्हणूनच पाहत असतो आणि त्याच्यापासून फटकून वागत असतो. समाजाकडून मिळणा–या या उपेक्षितपणाच्या वागणुकीमुळे अशा व्यक्ती पुन्हा अधिकच विकृत बनतात आणि त्यामुळे समाज स्वास्थ्य बिघडते. याची औंध अधिपती बाळासाहेब पंतप्रतिनिधींना जाणीव होती. यासाठी अशा गुन्हेगारीचा कपाळावर शिक्का मारलेल्या व्यक्तींना समाजप्रवाहात आणून त्यांच्या उपेक्षित जीवनाला कलाटणी देण्याचा आणि त्यांच्या शारीरिक ताकदीचा , परंपरागत शस्त्र कौशल्याचा आणि बेडरपणाचा उपयोग करुन घेवून औंध संस्थानातील अंतर्गत सुरक्षा व्यवस्था मजबूत करण्याचा अभिनव क्रांतीकारी प्रयोग त्यांनी आपल्या औंध संस्थानात राबविण्याचा ठरविला आणि तो यशस्वीही करुन दाखविलेला दिसून येतो. या संदर्भात आपणाला चिंचणीचा पिरा मांग व कुंडलचा तुका रामोशी यांची उदाहरणे देता येतील. यापैकी पिरा मांग हा गाजलेल्या औंध प्रकरणातील ;जेकब बापूजी खून प्रकरणद्ध प्रमुख आरोपी होता. त्यामुळे त्याचे थोडक्यात चरित्र सांगणे आवश्यक वाटते.

पिरा मांग हा खानापूर तालुक्यातील चिंचणीचा ;अंबक द्धरहिवाशी होता. 'मांग' या उपेक्षित अस्पृश्य जातीमध्ये त्याचा जन्म झालेला होता. बलदंड शरीरयष्टी, तीक्ष्ण डोळे , पहाडी धीरगंभीर आवाज अशी पि–याला निसर्गाकडूनच देणगी मिळालेली होती. पि–याला कुस्तीचा मोठा शौक होता. गरीब परिस्थितीत देखील मिळेल ते खावून आणि रात्रं–दिवस व्यायाम करुन त्याने शरीर कमावलेले होते. कुस्तीच्या फडात पाटलाच्या मुलाबरोबर कुस्ती धरण्यास पुढे झाला म्हणून त्याला अपमान सहन करावा लागला. ''जातीचा मांग तू अन् माइयासारख्या पाटलाशी कुस्ती धरतोस?'' या शब्दात त्याची हेटाळणी केली गेली. पि–याला खूप दु:ख झाले. हीन जातीमध्ये जन्मल्यामुळे जात ही आपल्या विकासाच्या मार्गातील अडसर आहे याची पि–याला जाणीव होवू लागली. अशातच पुर्व वैमनस्यातून पोलीस अधिका–यानीच दरोड्यातील माल पि–याच्या घरात लपवून ठेवून त्याच्यावर दरोडयाचा खोटा आरोप ठेवून तुरुंगात पाठविण्याचा प्रयत्न केल्यामुळे पि–या फरारी झाला. आणि कोल्हापूर संस्थानातील कुंभोज चा सत्त्याप्पा बंडकरी याच्या टोळीत सामील झाला. सत्त्याप्पा बंडकरी, बागणीचा बाबू गोंधळी, बोरगावचा ज्ञानू शिंदे , खाजा मुसलमान , बहे बोरगावचा दादू पाटील, रेडेवाडीचा पांडू पाटील, वाटेगावचा फकिरा मांग अशी या बंडवाल्यांची टोळी होती. या टोळीने औंध संस्थानातवाळवा, माण, कोरेगाव तालुक्यांत, वारणा खो–यात आणि सांगली संस्थानच्या हद्दीत खून व दरोडेखोरीचे सत्र सुरु केले. अमाप संपत्ती लुटून डोंगर , द–या–खो–यात पुरुन ठेवली. पुढे पि–याने नैतिकतेच्या प्रश्नावरुन टोळी सोडली आणि सांगलीत आपल्या पाहुण्याकडे आला असता त्याच्या सतत पाळतीवर असणा–या पोलीसांनी त्याला पकडले आणि औंध संस्थानच्या ताब्यात दिले. औंध संस्थानने त्याला दीड वर्षाची सश्रम कारावासाची शिक्षा दिली.

पि–या औंध संस्थानच्या तुरुंगात सजा भोगत असताना औंध संस्थानचे तात्कालीन औंध अधिपती नानासाहेब पंतप्रतिनिधी आणि संस्थानचे कारभारी जेकब बापूजी यांच्यामध्ये कटुता निर्माण झाली. जेकब बापूजीने संस्थानचे अधिपती नानासाहेब यांना राज्यकारभार व्यवस्थित सांभाळता येत

नाही म्हणून प्रतिनिधी पदावरुन त्यांना पदच्युत करुन दुस–या योग्य व्यक्तीची संस्थानचे अधिपती म्हणून नेमणूक करावी अशा आशयाचे पत्र मुंबई गव्हर्नरांकडे पाठविले होते. आणि त्यामुळेच नानासाहेबांनी जेकब बापूजीचा बंदोबस्त करण्याची जबाबदारी पि–यावर सोपविली. पि–यानेही ही जबाबदारी स्वीकारली आणि एका आठवडयाच्या आत तो तुरुंग फोडून पळून गेला. परंतु जेलमधील एका कैदयाने चुगली केल्यामुळे हा कट उघडकीस आला. पळून गेलेल्या पि–याला महत्प्रयासाने परत पकडण्यात आले. पुढे सातारा कलेक्टर कचेरीत पंत–जेकब खटल्याची सुनावणी सुरु झाली. त्यावेळी पि–याने परिस्थिती ओळखून कटाची कबुली दिली. त्यानुसार नानासाहेब पंतप्रतिनिधींना पदच्युत करण्यात आले. आणि पि–याने योग्य माहिती व कबूलीजबाब दिल्यामुळे न्यायाधिशांनी त्याचे पाठीमागील गुन्हे माफ करुन थोडी शिक्षा दिली.[९]

औंध अधिपती बाळासाहेब पंतप्रतिनिधींनी या पि–याच्या जीवनाला कलाटणी देवून त्याला माणसांत आणले. किर्लोस्कर कारखान्याचे संस्थापक लक्ष्मणराव किर्लोस्कर यांना बोलावून घेवून त्यांच्याशी विचारविनिमय केला आणि गुन्हेगिरीमध्ये आयुष्य जगणा–या पि–यासारख्या व्यक्तींना कारखान्यात काम देवून त्यांना गुन्हेगारी प्रवृत्तीवर मात करुन स्वत:ला सुधारण्याची व समाजामध्ये मानाने जगण्याची संधी उपलब्ध करुन देणे गरजेचे आहे. तेव्हा आपण त्यांना किर्लोस्करवाडीत काम द्यावे अशी बाळासाहेबांनी लक्ष्मणराव किर्लोस्करांना आज्ञा केली. त्याप्रमाणे लक्ष्मणरावांनी पिरा मांग, तुका रामोशी या खुनी व दरोडेखोरीमध्ये आयुष्य गेलेल्या गुन्हेगारांना आपल्या कारखान्यामध्ये कामाला घेवून त्यांच्यावरच वाडीच्या संरक्षणाची संपूर्ण जबाबदारी सोपवली.[१०] परंतु असे असले तरी मांग, रामोशी या गुन्हेगार समाजातील लोकांच्याकडे औंध संस्थानची औद्योगिक राजधानी समजल्या जाणा–या किर्लोस्करवाडीची व कारखान्याच्या संरक्षणाची जबाबदारी सोपविणे म्हणजे अतिशय जोखमीचे व जाणीवपुर्वक स्वत:हून फार मोठा धोका पत्करण्यासारखेच आहे याची बाळासाहेबांना पूर्ण जाणीव होती. त्यामुळेच त्यांनी अशा गुन्हेगार प्रवृत्तीच्या लोकांच्या हालचालीवर नियंत्रण ठेवण्यासाठी 'क्रिमिनल ट्राईब्ज ॲक्ट' हा कायदा यापूर्वीच औंध संस्थानात लागू केलेला होता. याचा उल्लेख मागे आलेला आहेच आणि असे असतानाही त्यांनी या लोकांच्यावर ही जबाबदारी सोपवलेली होती याचे कारण हे लोक अट्टल गुन्हेगार आणि कितीही बदमाश असले तरी मांग समाज दिलेल्या वचनाला आणि रामोशी समाज खाल्लेल्या मिठाला जागणारा अशी या समाजाची पूर्वापार ख्याती आहे. आणि ही या समाजाची पारंपारिक वैशिष्टये आहेत. हे ही त्यांना माहीत होते. त्यामुळेच तर बाळासाहेब पंतप्रतिनिधींच्या आज्ञेने लक्ष्मणराव किर्लोस्करांनी रामोशी समाजातील सर्व लोकांना जेवू घालावयाचे ठरवून जाणीवपूर्वक तुका रामोशी याच्या मुलाचे लग्न किर्लोस्करवाडीत घेतलेले होते. त्याचप्रमाणे प्रत्येकाकडून बेलभंडारा उचलून दगाफटका करणार नाही अशी शपथही घेतलेली होती. असे दिसून येते. औंध अधिपती बाळासाहेब पंतप्रतिनिधींचा गुन्हेगारांना समाज प्रवाहात आणून त्यांच्यामध्ये परिवर्तन घडवून आणण्याचा हा एक प्रयोग होता. आणि त्यांचा हा अभिनव प्रयोग यशस्वी झाल्याचा दिसून येतो. कारण मांग, रामोशी या अट्टल गुन्हेगार समाजातील लोकांच्याकडेच किर्लोस्करवाडीच्या संरक्षणाची जबाबदारी सोपविल्यामुळे 'काटयाने काटा काढणे' असे म्हणतात त्याप्रमाणे या योजनेमुळे या समाजातील इतर चोर, दरोडेखोरांचा परस्परच बंदोबस्त झालेला होता त्यामुळे त्यांचा किर्लोस्करवाडीला कसल्याही प्रकारचा त्रास झालेला दिसत नाही. पिरा मांग आणि तुका रामोशी या दोघानीही बेलभंडा–याची शपथ घेतल्याप्रमाणेशेवटपर्यंत आपले काम आणि किर्लोस्करवाडीच्या संरक्षणाची जबाबदारी यशस्वी आणि प्रामाणिकपणे पार पाडलेली दिसून येते.[११] यावरुन औंध अधिपती बाळासाहेब पंतप्रतिनिधींनी अट्टल गुन्हेगार व्यक्तींचा औंध संस्थानांतर्गत सुरक्षा व्यवस्था मजबूत बनविण्यासाठी कसा धूर्तपणे व खुबीने वापर करुन घेतलेला होता हे लक्षात येते.

पोलीस दल :–

विसाव्या शतकात औंध संस्थानात लष्कर नव्हते. परंतु लोकांच्या जीवित व वित्ताचे रक्षण करण्यासाठी व प्रजेला भयमुक्त जीवनाची हमी देण्यासाठी आजच्या सारखेच पोलीसदल कार्यरत होते. औंध अधिपती बाळासाहेब पंतप्रतिनिधींनी आपल्या कारकिर्दीमध्ये प्रशासनाचे एक महत्त्वाचे अंग म्हणून या पोलिसदलाची कार्यक्षमता वाढविण्याचा आणि संस्थानातर्गत सुरक्षा व्यवस्था बळकट करण्याचा प्रयत्न केलेला दिसून येतो.

पोलीसांची संख्या व खर्च :–

बाळासाहेब सत्तेवर आले ;१९०९द्ध त्यावेळी संस्थानात शिबंदीसह एकूण पोलीस शिपायांची संख्या १६२ होती. यापैकी ४ इन्स्पेक्टर, १५ हेडकॉन्स्टेबल, ४२ कॉन्स्टेबल आणि ११ स्वार होते. या व्यवस्थेवर एकूण खर्च २२,३३६ रुपये२९ आणे७ पैसे इतका होता. यापैकी शिबंदी म्हणून नेमलेल्या शिपायांवर वरील रक्कमेपैकी ९,७८४रुपये १४आणे ३ पैसे इतका खर्च होत होता. बाकी रक्कम पोलीस शिपायांवर खर्च होत होती. शिबंदी म्हणून संस्थानात जी व्यवस्था होती ती सरकारी खजिना, तुरुंग व राजवाडा यांच्या संरक्षणासाठी ठेवली होती. यांना कवायतीचे शिक्षण दिले जात होते. सन १९२१–२२ मध्ये एकूण पोलीसांची संख्या १४३ होती. यापैकी शिबंदी शिपाई ७८ व इतर शिपाई ६५ होते. खर्च अनुक्रमे ८,५०७ रुपये १४आणे ८ पैसे आणि १४,९०७ रुपये १२ आणे ८ पैसे इतका होत होता. सन १९२९–३० मध्ये एकूण पोलीस शिपायांची संख्या १३९ होती. यापैकी शिबंदी ७८ व शिपाई ६१ होते. त्यावर होणारा खर्च अनुक्रमे ७,३८४ रुपये ८आणे ६ पैसे व १४,२७४ रुपये ३ आणे ४ पैसे इतका होता. सन १९३९–४० मध्ये एकूण पोलीसांची संख्या १२१ होती. यापैकी ८२ शिबंदी शिपाई व ४९ शिपाई होते. खर्च अनुक्रमे १,१३८ रुपये ८आणे ० पैसे व १३,९२४ रुपये ११ आणे ८ पैसे इतका होत होता.[१२]

वरील विवेचनावरुन बाळासाहेबांच्या कारकिर्दीमध्ये पोलीस दल व त्यावर होणारा खर्च यात घट झालेली दिसून येते. मात्र बाळासाहेब

पंतप्रतिनिधींनी या खात्याची कार्यक्षमता वाढविण्याचा प्रयत्न केलेला दिसून येतो. सुरुवातीला संस्थानच्या कारभा—याकडेच पोलीस निरीक्षक व डिस्ट्रीक्ट मॅजिस्ट्रेट यांचे अधिकार एकवटले होते. पोलीस प्रशासनातील हा दोष दूर करण्यासाठी बाळासाहेबांनीया अधिकारांची विभागणी करुन पोलीस निरीक्षक हे पद स्वतंत्र अधिका—याकडे सोपविले. त्याप्रमाणे इ.स. १९३५ मध्ये रावसाहेब रामचंद्र गणेश हिवरेकर हे पोलीस निरीक्षक होते. गावची सुरक्षा व्यवस्था पोलीस पाटीलकडे होती. प्रत्येक गावी पोलीस पाटील होते.

पोलीस दलाची कार्यक्षमता वाढविण्याचा प्रयत्न :—

औंध अधिपती बाळासाहेब पंतप्रतिनिधींनी पोलीस प्रशासनातील दोष दूर करुन हे खाते अधिकाअधिककार्यक्षम, प्रजाभिमुख व भ्रष्टाचारमुक्त बनविण्याचा प्रयत्न केलेला दिसून येतो. पोलीस दलात चांगले लोक यावेत यासाठी त्यांनी या खात्यातील लोकांना भरपूर पगार देण्याचे धोरण स्वीकारलेले दिसून येते.[१३]त्यांनी आपल्या कारकिर्दीमध्ये पोलीस दलात हुशार व तज्ञ माणसे नेमण्याकडे कटाक्ष ठेवला होता. पोलीस खात्याकडून निष्कारण कोणासही त्रास होवू नये याकडे त्यांचे विशेष लक्ष होते. यासाठी त्यांनी कडक उपाययोजना केलेली होती. त्याचप्रमाणे कर्तव्यदक्ष अधिका—यांना योग्य बक्षिसे, पारितोषिके व बढती देवून त्यांना प्रोत्साहन देण्याचे , त्यांची कार्यक्षमता वाढविण्याचे त्यांनी प्रयत्न केलेले दिसून येतात.

संस्थानच्या पोलीस खात्यातील जे लोक आपली हुशारी, कर्तबगारी दाखवित त्यांची सबइन्स्पेक्टर म्हणून नेमणूक केली जात असे. त्याचप्रमाणे जे आपल्या कर्तव्यामध्ये कसूर करीत अशांना सेवेतून काढून टाकले जात असे. बाळासाहेबांनी ब—याच पोलीस शिपायांना व गावच्या पोलीस पाटलांना कर्तव्यात कसूर केल्याबद्दल काढून टाकल्याची उदाहरणे आहेत. सुरुवातीला पोलीस शिपायांपैकी बहुतेक लोक मराठी शिकलेले असेच होते. परंतु नंतर इंग्रजी भाषेचा सर्वत्र प्रसार होवू लागला. त्यामुळे इंग्रजी भाषेचे ज्ञान असणा—या अधिकारी वर्गाची संस्थानात गरज भासू लागली. यासाठी बाळासाहेबांनी पोलीस ट्रेनिंग स्कूल नाशिक येथे संस्थानच्या विद्यार्थ्यांना प्रशिक्षणासाठी पाठवून प्रशिक्षित अधिकारी वर्ग संस्थानात निर्माण करण्याचाही प्रयत्न केलेला दिसून येतो. त्यांनी संस्थानचे रहिवाशी असलेले रा. गोविंद देशमुख व रा. कासम मोदी यांना प्रशिक्षणासाठी नाशिकला पाठविले होते. त्यानंतर खर्चाच्या व इतर दृष्टीने विद्यार्थ्यास नाशिकला प्रशिक्षणासाठी पाठवून तयार करणे गैरसोयीचे वाटू लागले. त्यामुळे बाळासाहेबांच्या या कार्यास मर्यादा पडल्या होत्या. पुढे सांगली संस्थानने मे. रावसाहेब बापट यांच्या देखरेखीखाली नाशिक पोलीस ट्रेनिंगच्या धर्तीवरच पोलीस ट्रेनिंग स्कूल सुरु केल्यानंतर त्यामध्ये बाळासाहेबांनी विद्यार्थ्यांना पाठवून प्रशिक्षण देण्याचा प्रयत्न केला. पोलीस शिपायांमध्ये देखील अशिक्षित शिपाई होते. त्यामुळे बाळासाहेबांनी आपल्या कारकिर्दीमध्ये पोलीसात भरती करताना शक्यतो लिहिता वाचता येणा—या लोकांनाच भरती करण्याचे धोरण ठेवले होते.[१४]

गुन्ह्यांचा तपास व बक्षिसे :—

औंध अधिपती बाळासाहेब पंतप्रतिनिधींच्या कारकिर्दीच्या सुरुवातीच्या २५ वर्षात एकंदर १,३८३ गुन्हयांची नोंदझाली होती. त्यापैकी खून दरोडयासारखे भयानक गुन्हे ४० होते. या भयंकर गुन्हयांचा पोलीस खात्याने तपास लावलेला होता. बाकी इतर गुन्हयांपैकी बहुतेक गुन्हयांचाही तपास लागलेला होता. एकंदर चोरीस गेलेली मालमत्ता १,३९,९८७ रुपये १५ आणे ९ पैसे इतकी होती. त्यापैकी ६०,६७८रुपये ६ आणे ४ पैसे इतका माल परत मिळविला होता. म्हणजेच चोरीस गेलेल्या मालाचे सापडलेल्या मालाशी प्रमाण शेकडा ४३.३ इतके होते.[१५] यावरुन बाळासाहेबांच्या कारकिर्दीमध्ये पोलीस खाते चांगलेच कार्यक्षम होते, असे दिसते. संस्थानच्या हद्दीत घडलेले मोठे गुन्हे उघडकीस आणण्याच्या बाबतीत पोलीस खात्याकडून योग्य खबरदारी व मेहनत घेतली जात होती. असे दिसून येते. औंध संस्थानातील पोलीस खाते संस्थानात घडणा—या गुन्हयांच्या बाबतीत कार्यक्षम असे होतेच. परंतु अनेक वेळा संस्थानातील पोलीस खात्याने ब्रिटिश हद्दीत घडलेले गुन्हे उघडकीस आणण्याच्या कामी ब्रिटिश पोलीस खात्यालाही मदत केल्याचे दिसून येते. याबद्दल संबंधित पोलीस अधिका—यास ब्रिटिश पोलीस खात्याकडून बक्षिसे व पारितोषिके देण्यात आली होती. यापैकी सबइन्स्पेक्टर रा. कृष्णाजी चिंतामणी हलसंगीकर यांना लाटेवाडी येथील गुन्हा उघडकीस आणण्यासंबंधी व सातारा जिल्ह्यातील शेरे या गावी झालेल्या खूनाचा तपास करण्याच्या कामी ब्रिटिश पोलीसास मदत केल्याबद्दल अनुक्रमे ५० व १५ रुपयांचे बक्षीस व सर्टिफिकेट मिळाले होते. तसेच आटपाडी तालुक्यातील खरसुंडी गावच्या कैकाडी जमातीच्या लोकांनी ब्रिटिश हद्दीमध्ये बरेच गुन्हें केले होते. ते सर्व उघडकीस आणण्याच्या कामी ब्रिटिश पोलीसास मदत केल्याबद्दल रावसाहेब हलसंगीकर यांना व पोलीस जमादार रा. घोरपडे यांना मे. डिस्ट्रिक्ट सुपरिटेंडेंट ऑफ पोलीस सातारा यांनी बक्षिसे दिली होती.[१६]

ज्याप्रमाणे संस्थानातील पोलीस खाते तपासकार्यात ब्रिटिश पोलीस खात्यास मदत करीत होते त्याचप्रमाणे ब्रिटिश पोलीस खाते देखील संस्थानातील पोलीस खात्यास मदत करीत होते असे दिसून येते. हिवतड येथील खूनाच्या तपासकार्यात मदत केल्याबद्दल सबइन्स्पेक्टर वळामे, विटा यांना व त्यांच्या साथीदारांना औंध संस्थानाकडून योग्य पारितोषिके देण्यात आली होती.[१७]संस्थानच्या इतर प्रगतीच्या बाबतीत संस्थानचा विस्कळीतपणा जसा अडथळा होता तसेच पोलीस प्रशासनाच्या बाबतीतही होते. संस्थानची गावे विखुरलेली आणि मध्यंतरी काही ब्रिटिश प्रदेश असल्यामुळे खूनासारख्या गुन्हयांच्या तपासाच्या कामात बरीच अडचण येत होती. तथापि ब्रिटिश व संस्थानातील पोलीस दल एकमेकास वेळोवेळी मदत करीत असल्यामुळे गुन्ह्यांचा शोध लावणे शक्य होत होते.

ग्राम संरक्षक दले :—

औंध संस्थानात प्रजेच्या जीवित व वित्ताचे संरक्षण करण्यासाठी कार्यक्षम पोलीस दल होतेच. परंतु सुरक्षेच्या बाबतीत औंध संस्थानातील प्रजेने

केवळ पोलीसांवरच अवलंबून न रहाता स्वसंरक्षणाची स्वत:च तयारी ठेवली पाहिजे असे औंध अधिपती बाळासाहेब पंतप्रतिनिधींचे मत होते.यासाठी प्रत्येक गावातील लोकांनीच गावातीलच तरुणांची 'ग्राम संरक्षक दले' उभारावीत. गावातील लायक तरुणांचे गट बनवावेत आणि प्रत्येक गटाकडे आठवडयांतून किंवा पंधरा दिवसांतून गावच्या रक्षणाची जबाबदारी येईल अशी व्यवस्था करावी म्हणजे विनाकारण कोणावर अधिक ताण पडणार नाही, असे बाळासाहेबांचे मत होते. त्याचप्रमाणे गावांतील सोळा वर्षापासून साठ वर्षापर्यंतच्या प्रत्येक निरोगी माणसाने आठवडयांतून एक दिवस पाळीने आपल्या—आपल्या गावांत व शिवारात रात्री गस्त घातलीच पाहिजे. अशी व्यवस्था प्रत्येक गांवच्या पंचायतीने केली पाहिजे अशा सूचना बाळासाहेबांनी दिलेल्या दिसून येतात.[१८]

औंध संस्थानात एकूण ७२ गांवे होती. आणि ती एका ठिकाणी सलग अशी नव्हती. सर्व संस्थान विखुरलेले होते. त्यामुळे संस्थानातील प्रत्येक गावाला परक्या हद्दी भिडलेल्या होत्या. त्यामुळे चोर, दरोडेखोरांपासून प्रत्येक गावचे रक्षण करण्यासाठी ग्राम संरक्षक दलाच्या माध्यमातून प्रत्येक गांवात किमान शंभर माणसे गावच्या संरक्षणासाठी तयार असली पाहिजेत. असे बाळासाहेबांचे मत होते. गांवच्या संरक्षणासाठी निर्माण केलेल्या ग्राम संरक्षक दलातील तरुणांनी गांवातील सर्वच श्रीमंत गरीब लोकांचे संरक्षण करावे. त्यांच्याकडून गांवच्या संरक्षणाचे काम करीत असताना कोणत्याही प्रकारचा अन्याय, अत्याचार होवू नये. यासाठी जरुर ते शिस्तीचे शिक्षण देण्याचे आणि त्यांच्यावर नियंत्रण ठेवण्याची जबाबदारी बाळासाहेबांनी औंध संस्थानचे पोलीस खात्याचे प्रमुख डी.एस.पी व इतर इन्स्पेक्टर यांच्यावर सोपविलेली होती.[१९] औंध संस्थानात अशाप्रकारची 'ग्राम संरक्षक दले' कुंडल तालुक्यातील आळसंद, कोडोली इ. गांवी कार्यरत होती. आणि ती गांवच्या रक्षणाचे काम प्रभावीपणे करीत होती असे दिसून येते. या प्रत्येक गांवी लाठया— काठया, कु—हाडी अशी शस्त्रे घेवून दीडशे माणसे गावच्या रक्षणासाठी नेहमी सज्ज होती. ब—याच वेळेस या गांवावर आलेले दरोडे या ग्राम संरक्षक दलानी पराक्रम करुन परत फिरविलेले होते असे दिसून येते. राष्ट्रीय युध्द आघाडीचे प्रमुख कार्यकर्ते मि. फेल यांनी एकदा अचानकपणे आळसंद गावास भेट देवून ग्रामसंरक्षक दलाविषयी स्वत:च प्रत्यक्ष खात्री करुन घेतली. आणि त्यांनीही या ग्राम संरक्षक दलांविषयी आणि त्यांच्या कार्याविषयी प्रशंसोद्‌गार काढलेले दिसून येतात.[२०]

यावरुन आपल्या लक्षात येईल कि पोलीस खात्याशिवाय औंध संस्थानातील प्रजेने स्वत:ही आपल्या संरक्षणाची व्यवस्था केलेली होती. त्यामुळे प्रजेच्या जीविताचे व वित्ताचे प्रभावीपणे रक्षण होवून प्रजा चिंतामुक्त व भयमुक्त झालेली दिसून येते.

उपसंहार :—

राज्यांतर्गतशांतता व सुव्यवस्था ही सुखी व समृध्द समाजजीवनाचे जसे द्योतक असते. तसेच ते कार्यक्षम, प्रभावी अशा सुरक्षा व्यवस्थेचेही निदर्शक आहे. राज्यांतर्गत अशी शांतता सुव्यवस्था ही समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी व निकोप वाढीसाठी गरजेची असते. आणि याची औंध अधिपती बाळासाहेब पंतप्रतिनिधींना जाणीव होती. आणि यासाठी समाजातील गावगुंड, पुंड व गुन्हेगार प्रवृत्तीच्या लोकांचा समाजाला उपद्रव होवू नये आणि त्यांच्यामुळे सामाजिक शांततेचा भंग होवून सामाजिक सुरक्षितता धोक्यात येवू नये याकडे त्यांनी विशेष लक्ष दिलेले दिसून येते. समाजातील दुफळी नष्ट व्हावी. लोकांच्या मनामध्ये एकीची व बंधुभावाची भावना वाढीस लागावी यासाठी त्यांनी लोकांच्या सहकार्याने गांवसभा व तालुकासभांच्या माध्यमातून समाजविघातक घटकांच्या हालचालींवर नियंत्रण ठेवण्याचा प्रयत्न केलेला दिसून येतो. अट्‌टल गुन्हेगार व्यक्तींना समाज प्रवाहात आणून त्यांचा समाजाच्या हितासाठी व विकासासाठी उपयोग करुन घेणे हा औंध अधिपतींचा प्रयोग अव्दितीय असाच होता.

लोकांच्या जीवित व वित्ताचे संरक्षण करुन समाजामध्ये शांतता व सुव्यवस्था टिकवणे व लोकांना भयमुक्त जीवन देण्यासाठी पोलीसदलाला महत्वाची भूमिका बजावावी लागते आणि या दलाच्या कार्यक्षमतेवरच प्रजेचे हित व सुरक्षितता अवलंबून असल्यामुळे औंध अधिपतींनी जाणीवपुर्वक पोलीस प्रशासनातील दोष दूर करुन आणि प्रशिक्षण, पगारवाढ, बढती, बक्षिसे, पारितोषिके देणे इ. विविध मार्गांचा अवलंब करुन हे खाते अधिका—अधिक कार्यक्षम, प्रजाभिमुख व भ्रष्टाचारमुक्त बनविण्याचा प्रयत्न केलेला दिसून येतो. यावरुन अंतर्गत सुरक्षा व्यवस्था भक्कम व्हावी, समाजातील शांतता व सुव्यवस्था टिकून रहावी आणि समाजजीवन स्थिर, सुखी, संपन्न व भयमुक्त व्हावे व प्रजेला कल्याणकारी राज्याचा अनुभव यावा यासाठी औंध अधिपती बाळासाहेब पंतप्रतिनिधी कसे प्रयत्नशील होते हे दिसून येते.

संदर्भ व तळटीपा :

१. गौरव ग्रंथ मंडळ, औंध, शके १८५७, श्री भवानराव गौरव ग्रंथ, भाग २, विभाग १, पृ. ४

२. गॅझिटिअर ऑफ बॉम्बे प्रेसिडेन्सी व्हॉल्यूमग्प,पृ. ८१

३. औंध स्टेट गॅझेट ता.६ माहे फेब्रुवारी सन १९२३, पृ.२०

४. औंध स्टेट गॅझेट ता.६ माहे जानेवारी सन १९२५, पृ.१२

५. औंध स्टेट गॅझेट ता.६ माहे मार्च सन १९२१, पृ.८४

६. पंत आप्पा; मुलखा वेगळा राजा, पृ ५८— ५९.

७. औंध स्टेट गॅझेट ता.६ माहे जानेवारी सन १९२५इ. परिशिष्ट १, पृ. २३.
८. औंध संस्थान आज्ञापत्रिका दि.१ माहे जून सन १९४२, पृ. ६७
९. मोहिते धो.म.; मुलाखतीच्या मैदानातून, पृ. ११—२६.
पंत भवानराव; आत्मचरित्र खंड २, पृ.१९०, २८५.
१०. किर्लोस्कर मासिक जानेवारी १९३३, पृ. ३३९.
११. मोहिते धो.म.; उपरोक्त, पृ. २१ — २७.
पंत भवानराव; आत्मचरित्र खंड २, पृ. २८५
१२. औंध संस्थान प्रशासन अहवाल, वर्षे १९०९—१०, १९२१—२२, १९२९—३०, १९३९—४०.
१३. औंध स्टेट गॅझेट ता.६ माहे नोव्हेंबर सन १९२२, इ. पृ. ५.
१४. गौरव गंथ, उपरोक्त, विभाग ४, पृ. ४१.
१५. कित्ता पृ. ४१.
१६. कित्ता पृ. ४१.
१७. कित्ता पृ. ४१.
१८. उषा मासिक १ मार्च १९४५, पृ.६.
१९. कायदेमंडळ संस्थान औंध अधिवेशन मार्च १९४२ अहवाल, पृ. ३९—४०.
२०. उषा मासिक १ मार्च १९४५, पृ. ६.

35. शाहू कालीन कोल्हापूर राज्याची सामाजिक परिस्थिती (सन १९०० ते १९२०)

प्रा. डॉ. प्रमोदकुमार ओलेकर
सहा. प्राध्यापक, इतिहास विभाग,
आर्टस् ॲन्ड कॉमर्स, कॉलेज, आष्टा.

प्रस्तावना ः

छ . शाहू महाराजांचा जन्म २६ जून १८७४ रोजी झाला . त्यांचे वडील श्रीमंत जयसींगराव आबासाहेब घाटगे व त्याच्या आई राधाबाई साहेब यांच्या पोटी करवीर नगरीत यशवंतराव उर्फ छ . शाहू महाराजांचा जन्म झाला . पण चौथ्या शिवाजींच्या निधनानंतर त्यांच्या राणी आनंदीबाई यांनी यशवंतरावास दत्तक घेतले . (१७ मार्च १८८४) १९ व्या शतकाच्या सुरूवातीलाच करवीर संस्थान हे एक मांडलिक संस्थान बनले होते . शाहू महाराजांच्या राज्यरोहणापूर्वी ५० वर्षे करवीर राज्याला अल्पाायुषी राजे मिळाले . त्यांच्या कालखंडात अंदाधुंदी कारभार चालु झाला . इंग्रजांनी आपले अस्तित्व टिकवण्यासाठी एजंट किंवा दिवाण नेमले . कारस्थानी मंडळी, नोकर वर्गाची वे फिकीरी कारभारांचा उन्मत्तपणा आणि त्यातच भर म्हणजे ब्रिटीश एजंटांची मनमानी यामुळे राजे निषपन्न झाले . एवढेच नव्हे तर सर्वाच्या कार्भारामूळे चौथे शिवाजी बळी पडले . अशा विकट परिस्थितीत शाहू महाराज करवीरच्या गादीचे 'राजे ' बनले .

वेदोक्त प्रकरण (१९०१) ः

वेदोक्त या शव्दाचा अर्थ वेदांनी सांगितल्याप्रमाणे असा होतो . परंतु त्याचा प्रचरात आलेला अर्थ वैदिक मंत्रांनी कुटूंबातील षोडष संस्कारापदी धर्म कृत्ये करणे असा झाला आहे . फार प्राचीन काळापासून ब्राम्हण, क्षत्रिय व वैश्य यांना श्रेष्ठ समजले जात होते . त्यानांच वैदिक मंत्रांनी धर्म कृत्ये करण्याचा अधिकार आहे असा समज रूढ झालेला होता . सामजिक दृष्टया वेदोक्त पध्दती हि श्रेष्ठ मानन्यात आली . षा वेदोक्त प्रकरणावर काही मते मांडण्यात आली . ती म्हणजे प्राध्यापक व्हीस डेव्हीस यांच्या मते "पहिले तीन वर्ण हे मुळचे एकच होते" तर मॅकसमुल्लर म्हणतात की, "वेदांच्या सुत्रांत जातीभेद ब्राम्हणांची अन्यायी आत्मप्रौढी व शुद्रांची अवनत स्थिती इ . गोष्टिंबद्दल मुळीच आधार सापडत नाही . " तसेच स्वामी विवेकाानंद म्हणतात की, "ब्राम्हणांच्या जातिभेदाच्या सिध्दांताचा पहिला खुलासा पुरूष सुक्तात सापडतो . वेदांचे अध्ययन आमुक लोकांनी करावे व आमुक लोकांनी करू नये असे कोठेही सांगितलेले नाही . अशी वचने फक्त स्मृती व पुराणे यात आहेत . स्मृती व पुराणे यांची असली अरेरावी श्रृतीवर म्हणजे वेदावर चालू दयावी हे धन्यावर चकराची अरेरावी चालू देण्यासारखे हास्यास्पद आहे . "

कुलकर्णी वतने रद्द हजारो ब्राम्हणांचे नुकसान ः

१९०१ मध्ये वेदोक्त प्रकरण झाले व वेकायदेशीरपणे दर्मदाय म्हणून दिलेली शेकडो लोकांची ३०/४० एकर जमिन जप्त झाली . सरळ असलेले वेदोक्त प्रकरण वाढत जाऊन ते ब्राम्हण ब्राम्हणेत्तर वादावर झाले . म्हणुन कोल्हापूरात सत्यशोधक समाजाची स्थापना होऊन भट भिक्षुक ब्राम्हण व ब्राम्हण स्त्रिया यांच्या विरूध्द वाभत्स व अत्यंत हिडीस स्वरूपात खेडोपाडी सभातून व तमाशातून प्रचार झाला . टसेच कित्येक ब्राम्हणांची नासधूस जळपोळ शिवीगाळ मारहाण स्त्रियांच्या वरील आत्याचार याच गोष्टी सत्यशोधक सामाजाचे फलित ठरले .

राखीव जागांचा जाहीरनामा ः

हिंदुस्थानात अनेक वर्षे फक्त ब्राम्हणांचे वर्चस्व होते . धर्मकारण, समाजकारण अर्थकारण प्रशासन शिक्षण इत्यादी क्षेत्रात ब्राम्हणच होते . ज्या वेळी शाहु महाराजांना १८९४ ला राज्याधिकार प्राप्त झाला त्यावेळी त्यांना ही यांचे वर्चस्व दिसून आले . म्हणजो संस्थानच्या प्रशासनातील बहूतेक सर्व अधिकाराच्या जागा या ब्राम्हण वर्गाच्या होत्या . त्यात दरबार ७२ अधिकाऱ्यांच्या पैकी ६० ब्राम्हण, मग इतर जातिधर्माचेहोते . तर खाजगी ५२ अधिकाऱ्यापैकी ४५ ब्राम्हण होते व इतर ७ जाती धर्माचे होते . हे इतर जाती धर्मा लोक म्हणज इंग्रज, हिंदी ख्रिश्चन, पारशी, प्रभू असे पुढारलेल्य जातीचे लोक होते . मराठी अथवा अन्या मागासवर्गीयांचा समावेश नव्हता . त्यामुळे शाहू महाराजांनी आपल्या संस्थानातील शासनाच्या क्षेत्रात असलेल्या ब्राम्हण वर्गाची मक्तेदारी दूर करण्यासाठी २६ जुलै १९०२ रोजी 'राखीव जागांचा जाहीरनामा' प्रसिध्द करून कोल्हापूर संस्थानातील सरकारी नोकऱ्यांमध्ये ५० टक्के जागा मागासवर्गीयांसाठी राखून (आरक्षित) ठेवल्या हा जाहिरनामा म्हणजेच हिंदुस्थानच्या इतिहासात एक अपूर्वाच नव्हे तर 'नव्या युगाची नांदी' ठरणारा मानला गेला .

अस्पृश्यता निवारण ः

समाजामध्ये अस्पृश्यता ही एक भयंकर सामाजाला लागलेली किड होती त्यामुळे महाराजांनी ती कायदयाने नष्ट केली . म्हणजेच सरकारी कार्यालये, शाळा, दवाखान्यांसारखी सावर्जनिक ठिकाणे, सार्वजनिक विहिरी व पाणवठे इ . ठिकाणी अस्पृश्यता पाळणाऱ्यांना कडक शासन करण्याची कायदयाने तरतुद केली . अस्पृश्यांसाठी स्वतंत्र शाळा बंद केल्या . टसेच माणुसकीला काळिमा फासणारी महाराजांच्या पाचवीला पुजलेली 'हजेरीची' आणि 'वेठगारीची' पध्दत बंद केली . आणि महार लोकांना शतकानुशतके गुलामगिरीत टाकणारे 'महार वतन' रद्द केले . त्यामुळे राज्याचा महार हा पहिल्यांदाच रयत व स्वतंत्र प्रजाजन बनल . तर महाराजांनी मोठया विश्वासाने अस्पृश्यांना महूत, हुल स्वा पोलीस, ड्रायव्हार म्हणुन सरकारी नोकरीत घेतले . अशा प्रकारे अस्पृश्यता समाजातून दूर करण्याचा प्रयत्न महाराजांनी केला .

जाती विशिष्ट धर्मगुरू ः

ऐंक्याची भावना लोकांतील आपलेपणा तसेच एकत्र राहण्याची क्षमता ही त्यांच्यातील कमी जास्त धर्म प्रभावनेवर अवलंबून असते . धर्म प्रभावना नाहीतर ऐक्य नाही आणि ऐक्य नाही तर तो देश परक्याच्या गुलमगिरीत जायला वेळ लागणार नाही . महणजेच मुसलमान, ख्रिस्ती वगैरे समाजात एकजूट व जोर कसपणा दिसून येतो तो त्यांच्या धर्माची उभारणी व समतेच्या पायावर केली असल्यामुळेच पण अशी स्थिती हिंदू समाजात दिसते आहे काय ? असा प्रश्न निर्माण होतो . म्हणजेच साडे सहा कोटी माणसांसारखी माणसे बहिष्कृत होऊन नुसत्याहस्तस्पर्शासाठी तळमळत पडलेली दिसते . वळीच्या जातीपैकी मराठा बहुसंख्याक वर्ग मानुसकिला परखा झाला . त्यांची सुधारणा धार्मीक स्वातंत्र प्राप्त झाल्या खेरीज होणार नव्हती तर ब्राम्हणंच्या बौध्दीक गुलामगिरीला कंटाळून बौध्द, जैन, लिंगाय हे वर्ग हिंदू समजातून फूटून स्वतंत्र झाले . त्यांनी आपल्या जातीचे धर्मगुरू निवडले पण यात काहीच नुकसान न होता उलट त्यांचे हितच झालेले शाहू महाराजांनी पाहिले .

मराठा एज्युकेशन सोसायटी ः

मराठा जातीच्या लोकांचे हित लक्षात घेऊन महाराजांनी मा . अझमा व्हिक्टोरिया केसर-ई-हिंद यांचे स्मारकाप्रित्यर्थ कोल्हापूर येथे "मराठा एज्युकेशन सोसायटी" या नावाची संस्था स्थापन केली . मराठा जातीचे हेतू तसेच त्यांची मागासलेली स्थिती सुधारावी यासाठी महाराजांनी स्वतःकडील पैसे सरकारच्या खजिन्यात भरण्याची परवानगी दिली व हा पैसा व्याजावर भरला जावा यासाठी काही नियम ठरविले होते .

दुष्काळ प्रतिबंध जाहिरनामा ः

करवीर इलाख्यातील दुष्काळाचा प्रतिबंध करण्यासाठी इरिगेशनचे काम चालू करण्यासाठी मि . शंकर सिताराम गुप्ते यसा इरिगेसन ऑफिसर नेमण्यात आल्यावद्दल हुजरून नंवर १०४, तरिख २३ जानेवारी सन १९०२ या अज्ञातपत्रात काही उपाययोजना केल्या गेल्या .

राजर्षी शाहू महाराजांची सामाजिक सुधार विषयक अज्ञापत्रे बैते -वलुते रद्द करणे ः

राजर्षी शाहू महाराजांनी अलेते -वलुते दारी पध्दत होती . ती नष्ट करण्याच्या उद्देशाने काही आज्ञापत्रे काढली . पुर्वी 'बैते-वलुते' देण्याची पध्दत होती . म्हणजे करन नारस जे बैते दयावे लागत असे ते आता पैशाच्या स्वरूपात नोकरी किंवा उदयोग धंदा अशा स्वरूपात मोवदला देण्याचे ठरलेले असुन अलुत्यास - वलुत्यास बैते देण्याची गरज नाही त्यांना ही वाटेल ते काम करण्यास परवानगी दिली तसेच इतरही काही जाहिर नामे ही काढले म्हणजेच .

१ . न्हावी वगैरे वलुतेदार हा परगावचा असेले तर त्याच्यावर बहिष्कार टाकल्यास ते शिक्षेस पात्र असेल .

२ . शिमग्याला बैते देणे हे रयतेच्या मर्जीवर आहे . तसे सरकारी कामरांनी किंवा इतरांनी कोणावर जुलूम केल्यास त्याज वद्दल तसा जूलूम करणारा शिक्षेस पात्र होईल .

३ . बलुतेदार, न्हावी , सुतार वगैरे परगावचा कारागिर गावी कामाकरिता आणला असता त्यास जाती वाहेर टाकल्यास किंवा तसा प्रयत्न करणारे बलुतेदार किंवा सरकारी कामगार किंवा रयत यांना १०० रूपये पर्यत दंड किंवा ४ दिवस सक्त मजुरीच्या शिक्षेस पात्र होईल .

जोगत्या मुरळया प्रतिवंधक कायदा ः

पूर्वी धार्मिक रूढीच्या नावाखाली देवा दिकांना जोगी व जोगिणी वाहण्याची पध्दत होती . षा अनिष्ट रूढीमुळे समाजाला भयंकर हिन स्वरूप प्राप्त झाले होते . म्हणजेच भ्रष्टाचार वढला . धर्माच्या नावाखाली अमानुष कृत्ये होऊ लागली . म्हणुन यावर प्रतिवंथक कायदा वसावा यासाठी शाहू महाराजांनी "जोगत्या मुरळया प्रतिवंधक कायदा" पास केला . आणि याचे उल्लंघन केल्यास कायदयात जवर शिक्षा सुनावली . त्यामुळे भ्रष्टाचरास आळा वसला .

जैन वोर्डीग ः

कोल्हापूरच्या जैन वोर्डिगची स्थापना ही दक्षिण महाराष्ट्रातील जैनाच्या आधुनिक इतिहासातील अतिशय महत्वाची घटना होती . यासाठी श्री . आ . फ . चौगुले व श्री . आ . वा . लट्ठे यांनी दूर दृष्टी ठेवून या वोर्डिगची स्थापना केली . पण तथपूर्वी ही कल्पाना शेठ माणिक चंद हीराचंद यांनी मुंवई त जैन विदयार्थ्यासाठी एक वसतिगृह सूरू करावे अशी कल्पना आपल्या मित्रांजवळ मांडली . त्यावर विचार विनिमय होऊन श्री . आणापा चौगले व सोलापूरचे शेठ हिराचंद नेमचंद यांनी आधुनिक काळात जैन समाजाचा कायाकल्प घडविण्याचा या योजनेचे समर्थन करून त्यांना वोर्डिग उघडण्यास प्रोत्साहन दिले व त्यांच्या मदतीने त्यांनी मुंवईत ताडदेव पुलाजवळ लॅमिंग्टन रोडवर वांधलेल्या भव्य वास्तुत "शेठ हिराचंद गुमनजी जैन वोर्डिग स्कुल " या विदयार्थी वसतिगृहाची जून १९०० मध्ये स्थापना केली . वेगवेगळया ठिकाणहुन जैन विदयार्थी शिक्षण घेण्यासाठी येथे आले . त्यात कोल्हापूर हून आलेले जैन विदयार्थी हि होते . त्याच दरम्यान छ . शाहू महाराज तेथे गेले असता त्यांना हे विदयार्थी दिसले व उच्च शिक्षणासाठी हे विदयार्थी मुंवई येथील जैन वोर्डिग मध्ये शिकत असलेले पाहून त्यांना खुपच आनंद झाला व त्यांनी मुंवई येथील जैन वोर्डिगला प्रत्यक्ष भेट दिली .

सत्यशोधक समाजाची स्थापना ः

पुर्वी पासूनच समाजावर गुलामगिरी लादली गेली होती . हि काही जन्मजात किंवा देव निर्मीत नव्हतीतर तर ती माणसानेच माणसावर लादली होती . फक्त हि गुलामगिरी लादणारे लोक हे उच्च, ब्राम्हण लोक होते . ही गुलामगिरी नष्ट करण्यासाठी अनेकांनी प्रयत्न केले . त्यात वहूजन समाजाला धार्मिक, सामाजिक मूलभूत हक्क मिळावेत म्हणुन महात्मा फुल्यांनी १८९0 मध्ये सत्यशोधक समाजाच्या कार्याला सुरूवात केली . या फुल्यांच्या कार्याचा प्रभाव छ . शाहू महाराजांच्या वर झाला . त्यांनी पाहिलेल्या वेदोक्त प्रकरण, शंकराचार्याच्या जातिनिष्ठ अनुभव यामुळे महाराजांना त्याचे तीव्र चटके बसले व या गोष्टी समाजातून दूर व्हाव्यात तसेच महाराजांना सत्यशोधक समजाच्या कार्याची मूर्ण माहिती होती . त्यांनी त्यावर विचार केला आणि कोल्हापूरात अशा समाजाची स्थापना झाली पाहिजे यासाठी प्रयत्न सुरू केले . कोल्हापूरात ११ जानेवारी सन १९११ रोजी महाराजांनी श्री . परशराम घोसरवाडकर इनामदार यांच्या अध्यक्षतेखाली या सत्यशोधक समाजाची स्थापना केली . आणि कार्याला सुरूवात करून महाराजांनी या समाजाच्या कार्या लयसाठी गंगावेशीतील जागा दिली . तसेच या समाजाने चालविलेल्या 'पुरोहित शाळेस' महाराजांनी अनुदान दिले, तर 'घरचा पुरोहीत' हे पुस्तक तयार केले . श्री . हरिभाऊचव्हाण यांनी 'वास्तुशांती' पुरूषसक्त, संध्या, श्रावणी, लग्नपध्दती, श्राध्द वदशक्रिया यांची पुस्तके तयर केली . याचा प्रसार गावोगवी करून हि चळवळ संस्थानभर सुरू केली .

समारोप ः

छ . शाहू महाराजंच्या काळातील समाजिक पारिस्थिती पाहत असताना त्यानी समाजासाठी केलेले कार्य तसेच वहूजन समाजाला दिलेला प्रोत्साहन महत्वाचे आहे . समाजातील लोकांचा विकास हा शिक्षणाने होतो म्हणून त्यानी शिक्षणाला महत्व दिले . समाजातील अनिष्ट प्रथा, रूढी दूर करून लोकांना एक नवीन मार्ग दाखवण्यचा त्यांनी प्रयत्न केला वहुजन समाजातील लोकांना त्यांचा विकास व्हावा त्यांनी हि स्वतंत्र जीवन जगावे यासाठी त्यांच्यावर लादलेल्या आमानुष रूढी, वंधने दूर केली . वेदोक्त प्रकरणमुळे समाजाची क्रुर वाजू दिसून आली . तसेच अस्पृश्यता नोकऱ्यांमध्ये कमी राखीव जागा, यांना विरोध केला . त्यासाठी सत्यशोधक समजाची स्थापन केली . . तसेच अनेक प्रतिवंथक कायदे करून त्यासाठी जाहिरनामे हि तयार केले . छ . शाहू महाराजांनी दलितांसाठी, वहूजनांसाठी केलेले काये खुप मोठे आहे . लोकांचा सामाजिक विकास व्हावा त्यांनी ही मानाने जगावे यासाठी सतत प्रयत्न केले . यामुळेच लोकांचे राजे झाले .

संदर्भ सूची ः

१ . राजर्षी छ . शाहु महाराजांचे शैक्षणिक व सामाजिक हुकुमनामे, प्रकाशक – श्री . सुर्यवंशी एम . जी अध्यक्ष को . जि . माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा मुख्याध्यापक सख कोल्हापूर सुवर्ण महोत्सवी वर्ष १९९४–१९९५ .

२ . श्री . शाहु स्मारक व्याख्यन माला पुष्पा पाहिले, व्याख्यते करि धनंजय, प्रकाशक – डॉ . इथापे उषा, कुलसचिव शिवजी विदयापीठ कोल्हापूर वर्ष मार्च १९७0

३ . कोल्हापूर दर्शन आणि राजर्षी शाहू महाराज लेखक – वागल भाई माधवराव, प्रकाशक – जगताप दादासाहेव ज्ञा . संपादक 'वहूजन समाज', कोल्हापूर २६/0७/१९७२ .

४ . समाज क्रांतीकाराक राजर्षी शाहू छत्रपती, सौ . पवार वसुधा, प्रकाशक – रिया पब्लिकेशन, कोल्हापूर आवृत्ती दुसरी .

५ . विजयी मराठा राजर्षी शाहू खास अंक १९२३, संपादक – शिंदे श्रीपतराव लक्ष्मणराव, पुना संपादन शिंदे विजयराव माधवराव, विजयी मराठा प्रकाशन कोल्हापूर, प्रथम आवृत्ती – मे १९२३ व्दितीय आवृत्ती – २६ जून २00७ .

६ . श्री शाहू स्मारक व्याख्यानमाला पुष्प तिसरे श्री शाहू छत्रपती – सामाजीक सुधारणे वावत विचार जागृती वक्ते प्रा . फाटक न . र . प्रकाशक डॉ . इथापे उषा शिवजी विदयापीठ कोल्हापूर वर्ष मार्च १९७२ .

७ . Rajashri Shahu Chhatrapati Papers Volume IV (1900-1905 A.D) (New Gov. Policies) Edited By Dr. Sangave Vilas, Dr. Khane B.D., Published by Dr. Sabale B.P. Registrar Shivaji University, Kolhapur.

८ . छत्रपती राजर्षी शाहु महाराज, नाईक तकाराम वावाजी प्रकाशक – सौ . मेहता अंजली, युनिव्हर्सल पब्लिकेशन्स कोल्हापूर प्रथम आवृत्ती १९७४ .

36. कोल्हापूर संस्थान आणि प्रजा परिषद चळवळ

श्रीमती पाटील उमा उत्तम
प्रमुख व सहाय्यक प्राध्यापिका, इतिहास विभाग
श्रीपतराव चौगुले आर्टस ॲन्ड कॉमर्स कॉलेज,
माळवाडी- कोतोली . ता .पन्हाळा, जि . कोल्हापूर .

प्रस्तावना ः-

भारतीय इतिहासात दक्षिण महाराष्ट्रातील संस्थानांना अनन्यसाधारण महत्त्व आहे . इ .स . १८१८ मध्ये पेशवाईचा अस्त झाला . त्यानंतर मराठी मुलुखात ब्रिटिशांचा अंमल सुरू झाला मात्र पेशवाईच्या अस्तानंतरही काही जाहगीरदार अस्तित्वात होते . त्यांनी ब्रिटिश सत्तेशी तह केला व आपल्या जाहगीरीचे अस्तित्व टिकवून ठेवले पुढे १९ साव्या शतकात या जाहगीरदारांना 'संस्थानिक' असे संबोधण्यात येऊ लागले . 'हिंदुस्थानचे ब्रिटिश मुलुख व संस्थानी मुलुख असे दोन राजकीय विभाग पडतात . संस्थानी मुलुखाचे क्षेत्रफळ अजमासे ७0,000 चौरस मैल अथवा अखिल हिंदुस्थानच्या क्षेत्रफळाच्या शेकडा पंचेचाळीस प्रमाणात आहे . संस्थानी मुलुखातील लोकसंख्या ८ कोटी अथवा अखिल भारवर्षाच्या लोकसंख्येच्या शेकडा २६ या प्रमाणात आहे .'[१]

संस्थानचा इतिहास ः-

भारतात स्वातंत्र्यपूर्व ५६२ संस्थाने होती . दक्षिण महाराष्ट्रातील सर्व संस्थानात कोल्हापूर संस्थान महत्त्वाचे व मोठे होते . सन १९३१ च्या जनगणनेनुसार या संस्थानाची लोकसंख्या ९,५७,१३७ अशी होती ती दहा वर्षात १४ टक्क्यांनी वाढली . सन १९४१ साली १0,९२,२0५ इतकी झाली . कोल्हापूर या राजधानीच्या शहरात १९४१ साली ९३,१६६ लोक रहात होते .[२] महाराणी ताराबाईनी कोल्हापूरची गादी स्थापन करून करवीर राज्याची निर्मिती केली . राजर्षी शाहू महाराजांच्या रूपाने (१८७४-१९२२) च्या काळात थोर पुरोगामी राजा कोल्हापूर संस्थानास लाभला होता . छ . शाहूच्या काळात 'ब्रिटिशाची पृथ्वीतलावरील साम्राज्यसत्ता तिचे सामर्थ्य एवढे प्रचंड होते की, हिंदुस्थानातील कोणीही संस्थानिक त्यांना शह देऊ शकत नव्हता राजकीप व लष्करी दृष्टया या सर्व संस्थानिकांचे अस्तित्व ब्रिटिशाच्या कृपेवर अवलंबून होते . ब्रिटिश सत्ते विरूध्द बंडखोरी करणे दूरच पण ब्रिटिशांना बंडखोरीचा नुसता संशय जरी आला तरी कोणीही संस्थानिक त्याच्या गादीवर राहू शकत नव्हता . कोल्हापूर संस्थानचे अधिपतीही त्यास अपवाद नव्हते .'[३] 'हिंदूस्थानमधील सर्व संस्थानिकांना ब्रिटिश सत्तेशी आपण किती एकनिष्ठ आहोत हे वारंवार जाहीर करावे लागत असे . एवढेच नव्हे तर त्या काळातील स्वातंत्र्याची चळवळ चालवणारे दादाभाई नौरोजी, लो .टिळक, ना . गोखले एवढेच नव्हे तर म . गांधी यासारख्या दिग्गज पुढाऱ्यांनाही आपण ब्रिटिश साम्राज्याशी किती एकनिष्ठ आहोत हे कॉंग्रेसच्या व्यासपीठावरून दरवर्षी जाहीर करावे लागे . याचा अर्थ या नेत्यांना ब्रिटिशांविषयी प्रेम होते असे नाही . ती त्या काळाची बंधने होतं . ही बंधने छ . शाहु राजांच्यावर एक मांडलिक राजा म्हणून अधिकच जाचक होती . तारेवरची कसरत करत करत त्यांना राज्य तर करावयाचे होते . शिवाय आपल्या देशबांधवाना विशेषतः मागास आणि दलित वर्गाचा अभ्युदय घडवून आणावयाचा होता .'[४]

भौगोलिक स्थिती ः-

कोल्हापूर संस्थानच्या उत्तरेस वारण नदी, पूर्वेस कृष्णा नदी आहे . दक्षिणेस बेळगांव जिल्हा आहे . पश्चिमेश रत्नागिरी जिल्हा आहे . कोल्हापूर संस्थानाच्या टापूत महाराष्ट्र व कर्नाटक या दोन्ही प्रांतातील भाग आहे 'कोल्हापूर प्रांताच्या सरहद्दीत शिखरावर किंवा नजीक असलेले १३ पहाडी किल्ले आहेत . कोल्हापूरच्या हद्दीत सहयाद्रीतून खालील कोकणात उतरण्याचे सुमारे ९0 घाट आहेत त्यापैकी उत्तरेस आंबाघाट, मध्यभागी फोंडा घाट व दक्षिणेस अंबोली घाट असे तीन घाट येण्याजाण्यासारखे आहेत . कोल्हापूर प्रांतात एकंदर लहानमोठया मिळून ८ नदया आहेत . भूपृष्ठाखालील भागात २0-२५ फुटावर पाण्याचे झरे बहुतेक सर्वभागी लागतात . कोल्हापूर संस्थानात १२-१५ हजार विहिरी आहेत . १२५ तळी आहेत . त्यात सर्वात मोळा तलाव रंकाळा होय . तीर्थक्षेत्र जोतीबा, महालक्ष्मी मंदिर, ऐतिहासिक वास्तू, शिदोबा, धुळोबा, अलंप्रभू, रामलिंग इत्यादी देवळे आहेत .[५]

शासनव्यवस्था ः-

कोल्हापूर संस्थानात विशाळगड, वावडा, इंचलकरंजी, हिंमतबहाद्दूर, कागल (मोठी पाती व धाकटी पाती) कापशी, सरलष्कर या सात जाहगिरी होत्या . ' कोल्हापूर संस्थानातील अधिपती राजर्षी शाहू महाराज १९२२ मध्ये निधन पावले . त्यांच्यानंतर चिरंजीव छ . राजाराम महाराज सत्तेवर आले . १९२२-१९४0 या काळात त्यांनी राज्यकारभार केला . त्यांनी स्वतः या संस्थानात अनेक सुधारणा प्रक्रिया सुरू केली त्यातूनच प्रजापरिषदेची स्थापना झाली .'[६]

प्रजापरिषदेची स्थापना ः-

कोल्हापूर संस्थानात राजाराम महाराजाच्या काळात पंचायत पध्दतीत सुधारणा झाल्या जवाबदारी राज्यपध्दती स्थापन होण्याच्या दृष्टीने त्या अपुऱ्या आहेत असे माधवराव बागल, रत्नाप्पाआण्णा कुंभार यासारख्या नेत्याना वाटू लागले 'ब्रिटिश मुलुखात सुरू असलेले स्वातंत्र आंदोलनाचे पडसाद संस्थानी मुलुखात उमटल्याशिवाय रहात नव्हते .

१. शेतकऱ्यांचा शेतसारा कमी व्हावा.

२. लोकांना नागरी स्वातंत्र्याचे हक्क दयावेत.

३. जबाबदार राज्यपध्दती स्थापन व्हावी

अशा मागण्या लोक करू लागले. सन १९३२ साली राजाराम महाराजांच्या काळात दोन मोठे मोर्चे कोल्हापूरात निघाले या पार्श्वभूमीवर कोल्हापूर संस्थानात माधवराव बागल व रलाप्पा कुंभार या नेत्यांच्या मार्गदर्शनाखाली ६ फेब्रुवारी १९३९ रोजी 'कोल्हापूर संस्थान प्रजापरिषदेची' स्थापना झाली माधवराव बागल अध्यक्ष तर सचिव म्हणून रलाप्पा कुंभार यांना निवडले अशाप्रकारे राजकीय हक्क संघटना स्थापन केली गेली.[७] 'कोल्हापूर संस्थानातील राजकीय विकासाच्या प्रक्रियेत १९३९ ते १९४९ या काळात या प्रजापरिषद या संघटनेचा फार मोठा वाटा आहे संस्थानात जबाबदार राज्यपध्दती मागणी करून सातत्याने संघटनेने जनतेत जागृती व लोकशाही मुल्ये जीवनप्रणाली म्हणून स्विकारण्याचा आग्रह सातत्याने धरला या प्रजापरिषदेतून बहूजन समाजात अनेक नवीन नेतृत्व उभे राहू शकले.'[८]

प्रजापरिषद आणि वृत्तपत्रे ः

कोल्हापूर संस्थानात त्या काळात प्रजापरिषदेचे 'मूकनायक', 'अखंड भारत' व 'प्रजा' या साप्ताहिक वृत्तपत्रानी आपल्या प्रभावी लेखन कलेतून प्रबोधन केले. 'जनतेच्या समस्या राज्यकारभारातील अंधाधुंदीपणा, शिक्षण, शेती, व्यापार इत्यादी विषयावर प्रखरपणे विवेचन केले आणि जनजागृती केली. या वृत्तपत्रांनी प्रजापरिषदेच्या जनसमुदायाला पाठिंबा मिळवून दिला. या परिषदेच्या राजकीय भूमिकेचे समर्थन आणि विरोधकावर टीकेची झोड उडवली. यावृत्तपत्राची लेखणी बोचट, तिखट व सत्यावर पहार करणारी होती. ही वृत्तपत्रे कोणत्याही गोष्टीचा चिकित्सक अभ्यास करत. तदनंतर आपले विचार लेखनादवारे मांडत या वृत्तपत्रीय लिखणादवारे प्रबोधनाचे, जनजागृतीचे प्रभावीपणे कार्य केले यातून प्रजापरिषदेच्या प्रचाराचे कार्य घडून आले.'[९]

अखिल भारतीय संस्थानी प्रजापरिषदेचे महत्वपूर्ण अधिवेशन ः–

अखिल भारतीय प्रजा परिषदेचे अधिवेश उदयपूर येथे डिसेंबर १९४५ मध्ये झाले अधिवेशनाल 'कोल्हापूर संस्थानातून प्रजापरिषदेचे ११ प्रतिनिधी सहभागी झाले होते. त्यात श्रेष्ठी, डी.एस. खांडेकर, बागडे याचबरोबर कारखानीसांचाही सहभाग होता. या अधिवेशनाचे अध्यक्ष पं. नेहरू होते.त्यांनी कोल्हापूर संस्थान प्रजापरिषद प्रतिनिधी व दक्षिणेकडील सर्व संस्थानातील प्रजाजनांच्या चळवळीसंबंधी अगत्यपूर्वक चर्चा केली व प्रशंसाही केली. उदयपूरहून कोल्हापूरास आलेनंतर प्रजापरिषदेच्या समिती समोर उदयपूर अधिवेशनाचा अहवाल सादर केला.'[१०]

कोल्हापूर संस्थान प्रजापरिषदेची अधिवेशने ः–

अ.नं.	दिनांक	ठिकाण	अध्यक्ष	मागणी/ठराव
पहिले	१५ एप्रिल १९३९	कूपवाड (सांगली)	डॉ.पट्टाभी सितारामय्या	प्रजापरिषदेच्या मागण्याच्या ठराव/ वागलांच्या शिक्षेचा निषेध
दुसरे	१ व २ जून १९४२	खासवाग (कोल्हापूर)	वाळासाहेव खेर	कोल्हापूर संस्थानात जवावदार राज्यपध्दतीचे शासन निर्माण केले जावे.
तिसरे	२४व २५ मे १९४७	गारगोटी	काकासाहेव गाडगीळ	जवावदारी राज्य पध्दती प्रजापरिषदेच्या लोकप्रतिनिधीच्या हाती सत्तेची मागणी
चौथे	९ मार्च १९४८	पन्हाळा	शंकरराव मोरे	कोल्हापूर संस्थान विलिनीकरण संवंधी चर्चा[११]

प्रजापरिषद मंत्रिमंडळ ः–

१९१४ ते १८४७ या काळात रिजन्सी कौन्सिलचा कारभार सुरू झाला '३१ मार्च १९४७ रोजी छ. शहाजी महाराजांनी कोल्हापूर परिषदेशी तडजोड घडवून आणली. या तडजोडीनुसार संस्थानच्या मंत्रिमंडळात दरबारचे तीन व प्रजापरिषदेचे चार मंत्री समाविष्ठ करून संस्थानचा कारभार मंत्रिमंडळाकडे सोपविण्यात आला ते मंत्रिमंडळ असे.

अ.नं.	नाव	खाते
१)	माधवराव बागल	मुख्यमंत्री
२)	डी.एस. खांडेकर	महसूल खाते
३)	टी.एस. कारखानीस	अर्थखाते
४)	टी.एस. सरनाईक	नागरी पुरवठा

पण दुर्दैवाने माधवराव बागल, रत्नाप्पा कुंभार यांचे मतभेद विकोपाला गेले. तेव्हा कुंभार व श्रेष्ठींनी मंत्रीपदाचे राजीनामा दिला त्यांच्या पाठोपाठ बागलांनी आपल्या पदाचा राजिनामे दिले मंत्रिमंडळ बरखास्त झाले.[१२] बागलाचे मंत्रिमंडळ जेमतेम सव्वाचार महिने टिकले. ३० जानेवारी १९४२ रोजी म. गांधी हत्येनंतर कोल्हापूरात मोठी दंगल उसळली जाळपोळ, मारामाऱ्या, दरोडे अशा घटना घडल्या या दंगली निर्माण होण्यापाठीमागे बागल मंत्रिमंडळच जबाबदार आहे.

चलेजाव चळवळ व कोल्हापूर प्रजापरिषद :-

८ ऑगष्ट १९४२ रोजी भारतीय कॉग्रसने ब्रिटिश सरकार विरूध्द चलेजाव चळवळ पुकारली. परिणामी देशातील वातावरण बदलून गेले. या चळवळीत संस्थानातील प्रजाही सामील झाली. मुंबईमध्ये या चळवळीत हजर राहून माधवराव बागल कोल्हापूरमध्ये परत आले त्यांनी कोल्हापूर प्रजापरिषदेची बैठक घेतली काही ठराव पास केले त्यानुसार भारताच्या स्वातंत्रयाची कॉंग्रेसची मागणी मान्य आहे. कोल्हापूर संस्थान भारताच्या अविभाज्य भाग आहे. तदनंतर जाहीर सभा झाली. त्यामध्ये २० ते २५ हजार लोक उपस्थित होते माधवरावंनी मार्गदर्शन केले पण सभेनंतर त्यांना अटक झाली. मात्र भूमिगत राहून रत्नाप्पाच्या नेतृत्वाखाली दुसरा गट चळवळीचे कार्य करू लागला. शासकीय कार्यालये जाळणे, पोष्ट ऑफिस, तिजोऱ्या लूटणे, रेल्वेमार्ग उध्वस्त करणे, टेलिफोन तारा तोडणे अशाी कामे या चळवळीने केली. गारगोटी येथे प्रजापरिषदेचे सात कार्यकर्ते पोलीस गोळीबारात मारले गेले. कोल्हापूर प्रजापरिषद आणि संस्थानातील जनतेचा चलेजाव चळवळीत मोठा वाटा होता.[१३] कोल्हापूर संस्थानात २३० राजकीय घटना घडल्या १००० पेक्षा अधिक लोकांना कैद झाली ३११८५ रूपयांची शासकीय मालमत्ता नष्ट झाली. १६ लोक बळी पडले ७५ लोकांवर खटले भरले १०० विध्वंसक घटना घडल्या ४० शांततामय निदर्शने झाली. २ ऑक्टोबर १९४५ रोजी कोल्हापूर नगरपालिकेवर तिरंगा फडकविला होता. दरम्यान काळात प्रजापरिषदेमध्ये गटबाजी निर्माण झाली. जबाबदार शासनपध्दती सारख्या मूलभूत मागण्या एकमताने केल्या पण त्या छ. शहाजी महाराजांनी अमान्य केल्याने प्रजापरिषदेचा शासनाशी संघर्ष सुरू राहिला.[१४]

कोल्हापूर संस्थान विलिनीकरण प्रक्रिया :-

सरकारने संस्थान खात्याचे सचिव व्ही.पी.मेनन यांना चौकशीसाठी कोल्हापूर संस्थानात पाठविले दंगलील बागल सरकार जबाबदार धरून ते बरखास्त करावे व प्रशासकाने असा अहवाल दिला माधवरावांनी मात्र या निर्णयाला विरोध केला पण छत्रपतीनी काही निर्णय घेतला नाही एकूणच परिस्थिती पाहून बागलंनी २२ मार्च १९४२ रोजी राजीनामा दिला आणि त्याच दिवशी कॅप्टन नंजाप्पा यांची कोल्हापूर राज्याचे प्रशासक म्हणूण केंद्र सरकारने नेमणूक केली कॅ.नंजाप्पा यांनी कोल्हापूरात येऊन बेकायदेशीर रित्या दंगलीस प्रजापरिषदेच्या कार्यकत्यांना जबाबदार धरून नेत्यासह ३६० जणांना अटकेत टाकले विलिनीकरणांची भूमिका मांडणाऱ्या 'अखंड भारत' व 'प्रजा' वर्तमानपत्रावर बंदी आणली. राष्ट्र सेवा दलासारख्या संघटनेवर त्यांनी कारवाही केली. दिवाण सुर्वे यांनीही दिवाण पदाचा राजीनामा दिला. त्या ठिकाणी छ. शहाजी महाराजांनी दिवाण म्हणून श्री. लट्टे यांना नेमले. ६ जून १९४८ गांधी हत्येनंतर उसळलेल्या दंगलीची चौकशी करण्यासाठी कोयाजी आयोग नेमला ७ सप्टेंबर १९४२ पर्यंतच या आयोगाचे काम चालले कॅ. नंजाप्पानी कोल्हापूरात अन्याय कसा चालविला आहे हा वृतांत पत्रादवारे सरदार पटेल यांनी पट्टाभी सीतारामय्या यांना कळविले पण कॅ. नंजाप्पा यांनी कडक धोरण स्विकारले. बागलांचा अर्ज विनत्यांचा काही परिणाम झाला नाही.

छ. शहाजी महाराजांची भूमिका विलिनीकरणाविरोधीच राहिली या कामी लट्टयांनी मोठे सहाय्य केले आपली सर्व बुध्दीमत्ता व राजकारण कौशल्य महाराजांच्या भूमिकेचा मजबुतीसाठी खर्च केले. साहजिकच लट्टे व कॅ. नंजाप्पा प्रमुख विरोधक बनले. लट्टे हेच संस्थानच्या विलिनीकरणांच्या प्रक्रियेत अडथळा असल्याचे चित्र भारत सरकारला कॅ. नंजाप्पा यांनी कळविले दिवाण पदावरून लट्टयांना काढून टाकण्याची धमकी कॅ.नंजाप्पानी दिली. तथापि भारत सरकार संस्थानच्या विलिनीकरणासाठी छ. शहाजी महाराजांच्या वर कोणत्याही प्रकारची सक्ती करू इच्छित नव्हते. महाराजांच्या इच्छविरूध्द विलिनीकरण व्हावे असे सरकारला सुध्दा वाटत नव्हते. या प्रश्नावर वाटाघाटी करण्यासाठी सन्मानाने महाराजांना सरकारने दिल्लीस पाचारण केले शेवटी वाटाघाटी यशस्वी झाल्या कोल्हापूर संस्थान मुंबई प्रांतात विलिन करण्यात महाराजांनी संमती दिली. दरवर्षी महाराजांना १० लाख रूपयांचा तनखा देण्याचे सरकारने मान्य केले.[१५] शहाजी महाराजांच्या निर्णयाची बातमी कोल्हापूरात समजली. कोल्हापूरातील अनेक प्रतिष्ठित व्यक्तीनी या निर्णयांचे स्वागत केले. अभिनंदनही केले (१ फेब्रु १९४९) रोजी कोल्हापूरात प्रसिध्द झालेल्या पत्रकात म्हटले होते. 'कोल्हापूर

विलिनीकरण झाल्याची सरदार वल्लभभाई पटेल यांनी केलेली घोषणा आम्हास स्वागतःर्ह व समाधानकरक वाटत आहे . वदललेला काळ ध्यानी घेऊन श्रीमंत छ . शहाजी महाराज यांनी विलिनीकरणास संमती दिली व आपल्या देशाची मोठी सेवा बजावली त्यावद्दल आपले मनपूर्वक अभिनंदन करतो . संस्थानी प्रजेने आजवर खांदयाला खांदा लावून देशाच्या स्वातंत्र्यासाठी लढा दिला आहे .कमालीचा स्वार्थ त्याग केला आहे . अर्थात आपला देश एक छत्री व एक संधी व्हावा लोकशाहीला भरपूर वाव मिळावा म्हणून संस्थानी जनतेने या घटनेचे आनंदाने स्वागत करावे हे स्वाभाविक आहे .' [१६] १ मार्च १९४९ रोजी मुंबई प्रांताचे पंतप्रधान बाळासाहेब खेर यांच्या अध्यक्षतेखाली विलिनीकरणांचा समारंभ सोहळा पार पडला या समारंभास ७५ हजार लोकांचा जनसमुदाय हजर होता . व्ही .पी . मेनन या प्रसंगी उपस्थित होते . माधवराव बागलांनी प्रजा परिषद बरखास्त झाल्याचे यावेळी घोषीत केले आणि ते शेतकरी कामगार पक्षात सामील झाले .

मूल्यमापन ः–

कोल्हापूरच्या छ . शहाजी महाराजांनी आपले संस्थान विलिनीकरण्यास संमती देऊन जो त्याग, मुत्सदेगिरी व देशप्रेम दाखवले यावद्दल त्याचे अभिनंदन केले पाहिजे . आपली मातृभूमी स्वतंत्र व्हावी ही इच्छा छ . शिवाजी महाराजांची होती त्याप्रमाणे त्यांनी हिंदवी स्वराज्याची स्थापना केली . पुढे या हिंदवी स्वराज्याचे रक्षण त्यांच्या सुनेने महाराणी ताराबाई हिने प्राणपणाने लढून, युध्दे करून केले यातूनच करवीर रियासतीची निर्मिती केली त्या शिव प्रभूंच्या व महाराणी ताराबाईच्या वंशजाचे राज्य मातृभूमीला स्वातं य मिळाल्यानंतर नवराष्ट्र निर्मितीच्या प्रक्रियेत अंतर्भूत व्हावे प्रकारे इतिहासाच्या संकेत होता . अशाप्रकारे कोल्हापूरचे सामिलीकरण म्हणजे एका मराठा रियासतीचा अस्त होता . मात्र तो स्वातंत्र्य व सार्वभौम अशा हिंदी राष्ट्राच्या उदयासाठी होता हे स्पष्ट होते .

संदर्भ टीपा ः

१) श्री . देशपांडे दिनकर, 'संस्थानी राजकारण' प्रकाशक वा . गो .काशीकर काव्यशास्त्र – विनोद कोल्हापूर . फेबुवारी १९४0 पृ .0१

२) फडके य .दि . ' विसाव्या शतकतील महाराष्ट्र ' श्री . विदया प्रकाशन पुणे खं . ५ प्रथमावृत्ती १५ एप्रिल १९९७ पृ . २८७

३) डॉ . पवार जयसिंगराव, 'राजर्षी शाहू छत्रपती जीवन व कार्य' महाराष्ट्र इतिहास प्रवोधिनी कोल्हापूर प्रथमावृती १ जाने . २0१२ पृ .१

४) कित्ता पृ .२

५) http://ketkardnyankosh.com/index.php/2012

६) आधुनिक महाराष्ट्र (१८१८–१९९0) अजव पब्लिकेशन कोल्हापूर पृ .९४

७) गर्गे स .मा . 'करवीर रियासत' श्री . शहाजी छत्रपती म्यझियम ट्रस्ट न्यू पॅलेस कोल्हापूर तृतीय आवृत्ती जाने . २00३ पृ .६२९

८) खंडागळे ए . वी . 'भाई माधवराव बागल एक राजकीय अभ्यास' एमफील प्रबंध पृ .६४

९) अखंडभारत, प्रजा, पुढारी, सकाळ दि . २१ नोव्हेवर १९४७ मधील लेख .

१0) चव्हाण आ .द . 'कै .ज्य .सी .कारखानीस चरित्र व कार्य' प्रकाशन कोल्हापूर आवृत्ती २00८ पृ .१३

११) कारखानीस ज्य . सी . लेख 'प्रजा परिषदचे दिवस' दिवाळी अंक रविवार सकाळ नोव्हे . १९८६

१२) गर्गे स .मा . 'करवीर रियासत' उपरोक्त पृ . ६३४

१३) चौधरी कि . का . (संपा) 'कोल्हापूर राज्य गॅझेटिअर तृतीय आवृत्ती' १९८९ पृ .११९

१४) डॉ .शिंदे पी .एन व प्रा . थोरात ए .जी . 'भारताच्या स्वातंत्र्य लढा' भाग २ फडके प्रकाशन कोल्हापूर आवृत्ती डिसे . २0१४ पृ .५१

१५) चौधरी कि .का . (संपा) 'कोल्हापूर राज्य गॅझेटिअर' उपरोक्त पृ . ६३७

१६) कित्ता पृ ६३७

37. इंदौर संस्थानचे विवाहविषयक कायदे व स्त्री सबलीकरण

प्रा. डॉ. शिवाजी वाघमोडे
इतिहास विभाग प्रमुख, भारत महाविदयालय,
जेऊर. ता. करमाळा जि. सोलापूर.

प्रस्तावना :–

बालविवाह, विधवा पुनर्विवाह, बाल–जरठ विवाह, बहुपत्नीत्व, सती, हुंडा पध्दती अशा अनेक समस्यांच्या मुळाशी पुरुष प्रधान संस्कृती व भारतीय विवाहसंस्था होती. त्यामुळे स्त्री शिक्षणाबरोबरच विवाहसंस्थेच्या शुध्दीकरणालाही समाजसुधारकांनी आग्रक्रम देऊन समाजसुधारकांनी स्त्री उध्दारासाठी सामाजिक व शासकीय पातळीवर लढा दिला. परिणामी ब्रिटीशसरकारने विवाहासंदर्भात व स्त्रीहिताच्या दृष्टीने उपयुक्त ठरणारे विविध कायदे केले. ब्रिटीश सरकारचे कायदे भारतीय संस्थानिक राज्यांना लागू होत नसल्याने अशा कायदयांचा आदर्श ठेवून संस्थानिक राजकर्त्यांना आपल्या राज्यासाठी कायदे बनवावे लागत असत. बहुतांशी संस्थानिक अशा सुधारणांकडे सोयीस्कर दुर्लक्ष करत असत. परंतु काही संस्थानिकांनी सामाजिक सुधारणांसंबंधी विधायक भूमिका घेऊन आपल्या राज्यासाठी असे कायदे केले.

ब्रिटीशकालीन भारतात ३६५ संस्थानिक राज्य होती, त्यापैकी होळकर राजघराण्याचे इंदौर संस्थान हे राजकीय वारसा, मानमरातब प्रतिष्ठा याबरोबरच भौगोलिक विस्ताराच्या दृष्टीने एक महत्वाचे संस्थान होते. मल्हारराव होळकर, यशवंतराव होळकर यांची शौर्यपरंपरा आणि अहिल्याबाई होळकर यांचा जनकल्याणाचा वारसा जपण्याचा प्रयत्न होळकर घराण्यातील राज्यकर्त्यांनी संस्थानकाळातही प्रमाणिकपणे केला. संस्थान कालखंडाच्या अंतिम चरणात महाराज तृतीय तुकोजीराव होळकर (इ.स.१९०३–१९२६) आणि महाराज व्दितीय यशवंतराव होळकर (इ.स. १९२६ – १९४८) हे दोन आधुनिक विचाराचे व उच्च विद्याविभूषीत राज्यकर्ते इंदौर संस्थानला लाभले. त्यांनी संस्थानच्या राजकीय, आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक अशा सर्वांगीण विकासाच्या दृष्टीने खूप मोठे कार्य केले. त्यापैकी स्त्रीयांच्या हितासाठी व समाज स्वास्थासाठी महत्वपूर्ण ठरलेल्या विवाहविषयक व इतर काही कायदयांचा प्रस्तुत शोधनिबंधातून आढावा घेतला आहे.

स्त्री शिक्षणाचा प्रारंभ :–

स्त्री शिक्षणाच्या कार्यामध्ये सकारात्मक भूमिका घेणाऱ्या संस्थानिक राज्यांपैकी होळकरांच्या इंदौर संस्थानचा अग्रक्रमाने उल्लेख करावा लागतो. चार्ल्सवुडच्या खलित्यात स्त्रीशिक्षणाकडे सरकारने लक्ष देण्याची शिफारस होती, तरी येथील धार्मिक व सामाजिक रीतीरिवाजात सरकारने हस्तक्षेप करु नये असे ब्रिटीशांचे मत असल्याने ब्रिटीश सरकारने स्त्री शिक्षणात फारसे स्वारस्य दाखवले नाही. इ.स. १८६७ मध्ये लॉर्ड कॅनिंगने असे स्पष्ट केले होते की, ब्रिटीश सरकारने मुलांच्या शिक्षणासंबंधी जसा पुढाकार घेतला आहे तसा पुढाकार मुलींच्या शिक्षणाबाबत घेऊ शकत नाही याच वर्षी इंदौर संस्थानने ५ जानेवारी १८६७ आपली पहिली शासकीय कन्याशाळा इंदौरमध्ये सुरु करुन स्त्री शिक्षणाचा आरंभ केला होता. त्यानंतर पुढच्या वर्षी बरवाह येथे दुसरी कन्याशाळा सुरु करण्यात आली व आपल्या संस्थानातील सुमारे ३००० गावांत स्त्री शिक्षणाचा प्रसार होण्यासाठी पुढील काळात टप्प्याटप्प्याने प्रयत्न करण्यात आले असहाय विधवांसाठी १६ जून १९१३ रोजी अहिल्याश्रम नावाचा विधवा आश्रम इंदौर येथे स्थापन करण्यात आला. त्यामध्ये विधवांच्या निवासाची व शिक्षणाची सोय करण्यात आली. इंदौर येथेच स्त्री शिक्षणासाठी २३ जून १९१३ रोजी चंद्रावती महिला विद्यालयाची स्थापना करण्यात आली.राज्यात प्रशिक्षित महिला शिक्षिका उपलब्ध व्हाव्यात या उददेशाने इ.स.१९२१ मध्ये इंदौर येथे महिला नॉर्मल स्कूल सुरु केले.[१]

इंदौर हिंदू विधवा पुनर्विवाह कायदा :–

भारतामध्ये कनिष्ठ जातीत विधवा पुनर्विवाहाची प्रथा प्रदिर्घकाळापासून चालत आलेली असली तरी उच्च जातींमध्ये मात्र विधवा पुनर्विवाहाला मान्यता नव्हती. १९ व्या शतकाच्या प्रारंभी भारतात समाजसुधारणेच्या चळवळी सुरु झाल्यावर विधवा पुनर्विवाहाचा प्रश्न गांभीर्याने मांडला गेला. समाजसुधारकांच्या प्रयत्नांच्या पार्श्वभूमीवर भारतातील ब्रिटीश सरकारने इ.स. १८५६ मध्ये विधवा पुनर्विवाह कायदा केला होता परंतु या कायदयाकडे उच्चवर्गीय लोक संशयाच्या नजरेने पाहात होते. परिणामी हा कायदा होऊनही विधवांच्या विवाहाबाबत ठोस कृती सामाजिक स्तरावर घडून आली नाही.[२] विधवा पुनर्विवाहाची काही अपवादात्मक उदाहरणे सोडल्यास संपूर्ण भारतातील सुशिक्षित वर्गामध्ये या संबंधी केवळ चर्चा होत राहिली. ब्रिटीश सरकारच्या १८५६ च्या कायदयानंतर सुमारे साठ वर्षे कोणत्याही भारतीय संस्थानाने या कायदयानुरुप कायदा आपल्या राज्यासाठी केला नव्हता.

इंदौर संस्थानचे महाराज तिसरे तुकोजीराव होळकर यांनी विधवा पुनर्विवाहासंबंधी सकारात्मक भूमिका घेऊन आपल्या राज्यासाठी इ.स.१९१५ मध्ये इंदौर हिंदू विधवा पुनर्विवाह कायदा केला.[३] विधवा पुनर्विवाहास प्रोत्साहन देण्यासाठी पुढे आलेले पहिले संस्थानिक राज्य म्हणून इंदौर संस्थानचा उल्लेख करावा लागतो. ब्रिटीश सरकारच्या विधवा पुनर्विवाह कायदाच्या तुलनेत इंदौर संस्थानचा हा कायदा अधिक उदार व प्रगत होता. इ.स. १८५६ च्या कायदयानुसार विधवा पुनर्विवाहासाठी विधवेच्या आई वडीलांची व अन्य संबंधितांची संमती आवश्यक होती. परंपरागत भारतीय उच्चवर्गीय मानसिकता

लक्षात घेता विधवेच्या कुटुंबाकडून अशी संमती मिळणे दुरापास्त होते. त्यामुळेच कायदा असूनही विधवा पुनर्विवाहाबाबत फारशी प्रगती साधता आली नव्हती. इंदौर हिंदू विधवा पुनर्विवाह कायदयामध्ये कुटुंबाच्या संमतीचा अडथळा दूर करण्यात आला होता. पुनर्विवाहामुळे जन्मास येणाऱ्या संततीला कायदेशीर वारसाचा दर्जा देण्यात आला. त्याच बरोबर या कायदयात विधवा पुनर्विवाहासंबंधी वयाची मर्यादा वाढविण्यात येऊन १६ वर्षापेक्षा कमी वयाची विधवा पुनर्विवाह करणार नाही असे स्पष्ट करण्यात आले. या शिवाय इंदौर हिंदू विधवा पुनर्विवाह कायदयाचे वेगळे वैशिष्टये असे की, ज्या जाती जमातींमध्ये विधवा पुनर्विवाहाची प्रथा–परंपरा पूर्वापार चालत आलेली आहे त्यांना या कायदयाच्या कक्षेतून वगळयात आले होते.[४]

आपल्या राज्यातील समाजाचा नैतिकस्तर सुधारण्यासाठी आणि विधवांचा सामाजिक दर्जा उंचावण्यासाठी लोककल्याणाच्या भावनेने करण्यात आलेला हा कायदा होळकर राज्यकर्त्यांच्या आधुनिक दृष्टीकोनाचा दयोतक होता.

दिवाणी विवाह कायदा:–

ब्रिटीश सरकारने इ.स. १८७२ मध्ये केलेल्या Special Marriage Act चा आदर्श घेऊन होळकरांच्या इंदौर संस्थानने १ मे १९१६ रोजी दिवाणी विवाह कायदा ;ब्पअपस डंततपंहम ।बजद्ध केला.[५] ज्या विवाहांच्या वैधतेविषयी शंका निर्माण होतील त्यांना वैधता देण्यासाठी व जातीपातीच्या संकुचीत सामाजिक बंधनांना झुगारुन विवाह करणारांना स्वातंत्र देण्याच्या उद्देशाने हा कायदा करण्यात आला होता. तसेच अप्रत्यक्षरीत्या या कायदयातून पुरोहित वर्गाकडून विधवा पुनर्विवाहामध्ये येणारे अडथळे दूर करणे आणि आंतरजातीय विवाहाला कायदेशीररीत्या प्रोत्साहन देण्याचाही होळकर राज्यकर्त्यांचा दृष्टीकोन दिसून येतो.

विवाह करतेवेळी वर आणि वधू या दोघांपैकी कुणा एकाचा पती अथवा पत्नी जीवंत नसावा, विवाह करते वेळी वर वधू सज्ञान असावेत, विवाह करणारांचा आपापसातील रक्तसंबंध असा नसावा की त्यामुळे त्यांच्या जातीप्रथेनुसार सदर विवाह अमान्य होईल, पहिला विवाह अस्तित्वात असतानाही या कायदयांतर्गत दुसरा विवाह करणारा अपराधी ठरेल. साधारणत: असे स्वरुप इ.स. १९१६ च्या दिवाणी विवाह कायदयाचे होते.

सदर कायदयाविषयी रामसेवक गर्ग यांनी आपल्या लेखात असे म्हटले आहे की, उस समय किसी भी भारतीय रियासत में सिविल मेरेज मान्य नही थी। इस क्षेत्र में इंदौर राज्य पहला राज्य था, जिसने १ मई १९२६ से सिविल मेरेज ॲक्ट को प्रभावशील किया। रोचक बात यह है की, इस अधिनियम के लागू होने के बाद देश के अनेक क्षेत्रों से युवक युवतियॉ इंदौर आकर सिविल मेरेज करने लगे।[६]

इंदौर बालविवाह प्रतिबंधक कायदा :–

विधवा पुनर्विवाह व दिवाणी विवाह कायदयांनंतर इंदौर संस्थानने बालविवाह रोखण्यासाठी पावले उचलली. ब्रिटीश सरकारने १८७२ मध्ये केलेल्या दी नेटिव्ह मॅरेज ॲक्ट या कायदयात विवाह वयासंबंधी निर्देश होते. इ.स. १८९१ मध्ये संमतीवयाचा कायदा करुन मुलींच्या विवाहाचे वय १२ वर्षाचे केले होते.[७] भारतीयांची विवाह वयासंबंधीची आडमुठी भुमिका लक्षात घेऊन बालविवाहाची गंभीर समस्यसा ब्रिटीशांनीही फारशी गांभीर्याने घेण्याचे टाळले होते. बालविवाह रोखण्यासाठी ब्रिटीश सरकारने इ.स. १९२९ मध्ये बालविवाह प्रतिबंधक कायदा पास केला त्यालाच सुप्रसिध्द शारदा कायदा असे म्हटले जाते.[८] परंतु त्यापूर्वी एक दशक अगोदर इंदौर संस्थानने इ.स. १९१८ मध्ये इंदौर बालविवाह प्रतिबंधक कायदा केला होता. या कायदयानुसार १८ वर्षापेक्षा कमी वयाच्या मुलांना व १४ वर्षापेक्षा कमी वयाच्या मुलींना अज्ञान समजण्यात आले वर आणि वधू यापैकी कोणीही अज्ञान असेल तर तो विवाह बालविवाह ठरविण्यात आला. या कायदयाचे उल्लंघन करणाऱ्या आई वडिलांना शिक्षेची तरतूद करण्यात आली होती.[९] सदर कायदयात इ.स.१९३३ च्या दुरुस्ती नुसार १ जून १९३३ नंतर बालविवाह करणाऱ्या विदयार्थ्यांची शिष्यवृत्ती बंद केली तसेच इ.स. १९३८ पासून शासकीय शिक्षण संस्थामध्ये प्रवेश देण्यासही बंदी घालण्यात आली.[१०]

इंदौर बाल–जरठ विवाह कायदा :–

बाल–जरठ विवाह ही भारतीय समाजातील अनिष्ठ प्रथा स्त्रीयांच्या विविध समस्यांपैकी एक प्रमुख समस्या होती. या प्रथेतून अनेक सामाजिक समस्या निर्माण होत होत्या. या प्रथेला प्रतिबंध घालण्याच्या हेतूने इ.स. १९२७ मध्ये इंदौर डिस्पेरिटी मॅरेज ॲक्ट करण्यात आला. या कायदयानुसार पन्नास वर्षापेक्षा अधिक वयाच्या पुरुषाने अज्ञान (१४ वर्षापेक्षा कमी वय) मुलीशी विवाह करण्यास बंदी घालण्यात आली. अशा पुरुषासोबतच मुलीचे आई वडिल, पालक, विवाह लावणारा भटजी, वऱ्हाडीमंडळी या सर्वांना गुन्हेगार समजण्यात आले. इंदौर राज्याच्या सीमाक्षेत्राबाहेर जरी असा विवाह झाला असेल पण संबंधित लोक जर इंदौर संस्थानचे रहिवासी असतील तर त्यांना हा कायदा लागू करण्यात आला होता. इ.स. १९३४ व १९४० मध्ये या कायदयात सुधारणा करुन बाल–जरठ विवाहासंबंध अधिक कडक उपाययोजना करण्यात आल्या होत्या.[११]

इंदौर घटस्फोट कायदा :–

ब्रिटीश सरकारने इ.स. १८६९ मध्ये Indian Divorce Act केला होता. परंतु इंदौर संस्थान सुमारे साठ वर्ष त्यापासून दूर होते. इ.स. १९२८

मध्ये करण्यात आलेला Indore Divorce Act ब्रिटीश सरकारच्या इ.स. १८६९ च्या कायदयापेक्षा अधिक प्रगत असल्याचे दिसून येते. ब्रिटीश भारताच्या कायदयामध्ये पती – पत्नी यांची आपसातील सहमती आणि पत्नीशी अमानवी वर्तन या दोनच गोष्टींमुळे घटस्फोट मिळण्याची तरतुद होती. एका वर्षापेक्षा अधिककाळ पती पत्नीने अलग राहणे गरजेचे होते तसेच विवाहापासून तीन वर्षाच्या आत घटस्फोट मिळू शकत नव्हता.[१२] इंदौर घटस्फोट कायदयामध्ये मात्र पत्नीचा व्यभिचार, पतीचा दुसऱ्या स्त्री बरोबर विवाह अथवा व्यभीचार आणि त्यामुळे पत्नीशी निर्दय व निष्ठूर वर्तन, विनाकारणच पतीकडून पत्नीचा त्याग अशा कारणाने घटस्फोट मिळण्याची तरतूद होती. इंदौर संस्थानच्या या घटस्फोट कायदयाचे वैशिष्टये असे आहे की, पतीच्या व्यभिचाराबद्दलही स्त्रीयांना घटस्फोट घेण्याचा अधिकार देण्यात आला होता.[१३] इंदौर घटस्फोट कायदयाची कक्षा मात्र मर्यादित होती असे दिसून येते. इ. स.१९१६ च्या इंदौर दिवाणी विवाह कायदयानुसार झालेल्या विवाहासंदर्भातच हा कायदा लागू होता. त्यामुळे बहुतांशी समाज या कायदयाच्या कक्षेबाहेर राहिला.

विवाह खर्च नियंत्रण कायदा :–

हुंडा पध्दती व विवाहातील अमाप खर्च यामुळे मुलगी म्हणजे न पेलणारे ओझे असे अशी धारणा आजच्या समाजातही कायम आहे. भारतीय समाजातील ही जटील समस्या संपुष्टात आणणे एका चुटकीसरशी शक्य नाही, हे होळकर राज्यकर्त्यांना देखील समजत होते. हुंडा पध्दतीमध्ये प्रत्यक्ष हस्तक्षेप करण्यापेक्षा या पध्दतीच्या उपांगांवर घाव घालून गोरगरीबांना मुलीचा विवाह सुलभतेने करता यावा. या हेतूने इ.स. १९३४ मध्ये इंदौर संस्थानासाठी इंदौर विवाह खर्च नियंत्रण कायदा' (The Indore Marriage Expenses Controlling Act) करण्यात आला. या कायदयानुसार १०१ लोकांपेक्षा अधिक लोकांना भोजन घालू नये, वरातीमधील लोकांच्या संख्येवर मर्यादा, हुंडा व भेट स्वरुपात मिळणाऱ्या वस्तूंचे दागिन्यांचे, कपडयांचे लोकांसमोर प्रदर्शन करु नये, अशा तरतूदी केल्या होत्या. एखादया विशिष्ट बाबतीत १०१ पेक्षा अधिक परंतु ५०० पेक्षा कमी लोकांना भोजन देण्याची परवानगी सरकार कडून देण्यात येईल असे कलमही घालण्यात आले होते.[१४] इंदौर संस्थानातील बरेला समाजात हुंडा प्रथा अत्यंत शिगेला पोहचली होती. त्यावर मार्ग काढण्यासाठी इ.स. १९४१ मध्ये इंदौर बरलाय हुंडाबंदी कायदा (The Indore Control of Barellas Dowry Act) करण्यात आला हा कायदा विशिष्ट जनसमुदायासाठी केला होता तरी त्यामध्ये हुंडा या शब्दाची जी परिभाषा केलेली आहे ती खूप व्यापक व महत्वपूर्ण होती.

इंदौर विवाह नोंदणी कायदा :–

इंदौर संस्थानाने इ.स. १९३८ मध्ये इंदौर विवाह नोंदणी कायदा (The Indore Marriage Registration Act) करुन विवाह नोंदणी करणे आवश्यक करण्यात आले. इंदौर राज्याच्या हद्दीत झालेल्या विवाहांची नोंदणी या कायदयातील तरतुदीनुसर बंधनकारक करण्यात आली.[१५] विवाहासंबंधीच्या उपरोक्त कायदयांबरोबरच महाराज दुसरे यशवंतराव होळकर यांनी स्त्रीयांच्या उन्नतीच्या हेतूने अन्य महत्वपूर्ण कायदे करुन स्त्रीयांच्या आरोग्याच्या दृष्टीने व सामाजिक न्याय हक्कांच्या दृष्टीने महत्वपूर्ण भूमिका बजावली.

वेश्या नियंत्रण कायदा :–

वेश्या व्यवसायाचा सर्वसाधारण समाजावर अनिष्ट परिणाम होऊ नये म्हणून महाराज तिसरे तुकोजीराव होळकर यांच्या कारकिर्दीत इ.स. १९०९ मध्येच सार्वजनिक ठिकाणे व रस्त्यांवर शारीरिक अंगविक्षेप व कामोत्तेजक अंगप्रदर्शनास नगरपालिका कायदयांतर्गत बंधन घालण्यात आले होते. इ.स. १९२९ मध्ये (The Control of Brothels and Prostitution Act) करुन सार्वजनिक ठिकाणी वेश्यावृत्तीला आळा घालण्याबरोबरच मुली व स्त्रीयांना बळजबरीने कुंटणखान्यात ठेवणे, वेश्याव्यवसाय करण्यास बळजबरीने भाग पाडणे दंडनीय अपराध मानण्यात आला. अशा गुन्हेगारांना दंडासोबतच हंटरने फटके मारण्याचे तरतूद देखील या कायदयामध्ये करण्यात आली होती. या कायदयानुसार अपराधींचा खटला प्रथम वर्ग न्यायाधिशांसमोर चालवण्याबरोबरच अशा गुन्हेगारांना बीना वॉरंट अटक करण्याचे अधिकार पोलिसांना देण्यात आले होते.[१६]

इंदौर मातृत्वहित संरक्षक कायदा :–

गर्भवती कामगार महिलांच्या दृष्टीने अत्यंत महत्वपूर्ण व हितकारक ठरणारा कायदा इंदौर संस्थानने इ.स. १९३६ मध्ये केला होता. तो प्दकवतम डंजमतदपजल ठमदमपिज ।बज या नावाने ओळखला जातो. या कायदयानुसार कारखान्यांच्या मालकांनी अथवा कार्यालय प्रमुखांनी महिलांना प्रसुतीकाळात दोन महिन्यापर्यंत रजा दयावी असे स्पष्ट करण्यात आले. त्यामुळे श्रमिक महिलांच्या आरोग्याचे बाळाच्या आरोग्य व संगोपनाचे तसेच त्यांच्या अर्थाजनाचे व नोकरीच्या शाश्वतीचे अनेक प्रश्न मिटले.[१७] इ.स. १९०४ मध्ये इंदौर संस्थानने आपल्या राज्यासाठी जो फॅक्ट्री ॲक्ट केला होता त्यामध्ये महिला व बालकामगारांकडून सकाळी पाच पूर्वी व संध्याकाळी सात नंतर कारखान्यांमध्ये काम करवून घेऊ नये. तसेच धोक्याच्या ठिकाणी त्यांना नेमले जावू नये अशा स्वरुपाचे नियम घालण्यात आले होते.[१८]

निष्कर्ष :–

प्रचलित राज्यव्यवस्थेनुसार कोणतेही सरकार आपल्या राज्याच्या प्रगतीसाठी कायदेपध्दतीच्या माध्यमातून कार्य करते. स्त्री हितासाठी इंदौरच्या

होळकर राज्यकर्त्यांनी आपल्या संस्थानात जे विविध कायदे केले त्यामध्ये विवाहविषयक कायदे महत्वपूर्ण आहेत. ब्रिटीश सरकारच्या या क्षेत्रातील कायदयांना आदर्श ठेवूनच हे कायदे करण्यात आले होते तरी त्यामध्ये काही वेगळी वैशिष्टये होती असे दिसून येते. इंदौर हिंदू विधवा पुनर्विवाह कायदा ब्रिटीशांच्या कायदयापेक्षा अधिक प्रगत होता व अशा विवाहातील कुटुंबाच्या संमतीचा अडथळा दूर करण्यात आला होता. दिवाणी विवाह कायदा असाच अधिक उदार होता. बालविवाहासंदर्भात ब्रिटीश सरकारच्याही एक दशक अगोदर धाडसी पाऊल उचलण्याचे श्रेय इंदौर संस्थानला दयावे लागते. इंदौर संस्थानचा घटस्फोट कायदा ब्रिटीश सरकारपेक्षा अधिक प्रगत होता परंतु त्याची कक्षा खूपच मर्यादित होती. विवाह खर्चावर नियंत्रण घालणारा कायदा हे होळकर राज्यकर्त्यांच्या कल्पकतेचे उत्तम उदाहरण ठरते. या शिवाय श्रमिक महिलांच्या हितासाठी करण्यात आलेला मातृत्वहित संरक्षक कायदा, वेश्या व्यवसाय नियंत्रण कायदा, फॅक्ट्री ॲक्टमध्ये महिलांच्यासाठी मुद्दाम घातलेली हितकारक कलमे यांतून इंदौरच्या राज्यकर्त्यांचा पुरोगामी, आधुनिक व सुधारणावादी दृष्टीकोन स्पष्ट होतो. इंदौर संस्थानने केलेल्या विविध विवाहाविषयक कायदयांतून व स्त्री सबलीकरणाच्या प्रयत्नांतून असे दिसून येते की, आपल्या प्रजेला सुखी व समृध्द बनविण्याचा परंपरागत वसा जपण्याचे आणि अहिल्याबाई होळकर यांच्या किर्तीला साजेसा राज्यकारभार करण्याचे कार्य संस्थान काळातील होळकर राज्यकर्त्यांनी केले.

संदर्भ :–

१) होलकर मधुसुदनराव, होलकरों का इतिहास, नवी दिल्ली १९९१ पृ.५५५, ५०९

२) सरदेसाई बी.एन.नलावडे व्ही.एन.आधुनिक भारताचा इतिहास,कोल्हापूर २००४,पृ.३४२

३) हिरालाल शर्मा संपा, अहिल्या स्मारिका, खाजगी ट्रस्ट इंदौर, १९७१ पृ.५८

४) तत्रैव.

५) तत्रैव. पृ.५९

६) गर्ग रामसेवक संपा, अहिल्या स्मारिका, खाजगी ट्रस्ट इंदौर, १९७८ पृ.१८

७) वैद्य सुमन, कोठेकर शांता, आधुनिक भारताचा इतिहास, नागपूर २००० पृ.३७९–८०

८) राय हिमांशू, संपा.भारत में उपनिवेशवाद और राष्ट्रवाद, दिल्ली २०१३ पृ.४७–४९

९) शर्मा हिरालाल संपा, अहिल्या स्मारिका, खाजगी ट्रस्ट इंदौर, १९७१ पृ.५९

१०) तत्रैव. पृ.६०

११) तत्रैव. पृ.६०–६१

१२) तत्रैव. पृ.६३

१३) तत्रैव. पृ.६५

१४) तत्रैव. पृ.६१

१५) तत्रैव. पृ.६४

१६) तत्रैव. पृ.६३ Report on the Administrative of Indore state १९३३–३७

१७) तत्रैव.

१८) तत्रैव.

38. करवीर नगर वाचन मंदीर: कोल्हापूर संस्थानातील समाज विकासाचे केंद्र

प्रा. युवराज आनंदराव पाटील
ग्रंथपाल, दे. आ. ब. नाईक कॉलेज,
चिखली. ता. शिराळा, जि. सांगली.

लोकशाहीमध्ये लोकांना सत्तेत सहभाग काही अधिकार, कर्तव्ये, स्वातंत्र्य इ. मुलभूत गोष्टी मिळाल्या. या मुलभूत अधिकारानुसार प्रत्यकाला ज्ञान मिळविण्याचा अधिकार प्राप्त झाला. संविधानातून गाव तेथे ग्रामपंचायत, शाळा, दवाखाना, ग्रंथालय या संकल्पना स्वीकारल्या. यातील ग्रंथालय हे मार्गदर्शक केंद्र, माहिती केंद्र झालेले आहे. ग्रंथालयामुळे सुसंस्कृत नागरिक निर्मितीचे कार्य केले जाते. ग्रंथालये म्हणजे व्यक्तीची जिज्ञासा पूर्ण करणारी केंद्रेच आहेत. म्हणून ग्रंथालयाला समाजात महत्वाचे स्थान आहे. आधुनिक विचाराचे स्वातंत्र्यपूर्व कालात ज्या संस्थानामध्ये वारे वहात होते त्यामध्ये कोल्हापूर संस्थान अग्रभागी होते. सनातनी विचारांना मूठमाती देवून आधुनिक विचाराने संस्थानचा कारभार केला जात होता. या आधुनिक विचारांना संस्थानात रूजविण्याचे कार्य करवीर नगर वाचन मंदीर या ग्रंथालयाने केलेले आहे. या ग्रंथालयाचा ऐतिहासिक आढावा घेतला असता येथील विचार पध्दती कशी बदलत गेली हे समजते. ग्रंथालयाने काव्यसुसंगत राबविलेले उपक्रम व त्यांना मिळालेला प्रतिसाद पाहता येथे आधुनिक विचार रूजवण्यात ग्रंथालयाने महत्वाची भूमिका बजावल्याचे लक्षात येते.

करवीर वाचन मंदीर एक ऐतिहासिक आढावा :

करवीर संस्थानचे छत्रपती शिवाजी महाराज (तिसरे) उर्फ बाबा महाराज यांच्या कारकिर्दीत ''कोल्हापूर नेटीव्ह लायब्ररी'' या संस्थेची स्थापना दि.१५/०६/१८५० रोजी कर्नल एच.एल.ॲडरसन या विद्याप्रेमी अधिकाऱ्याने केली. त्यांनी येथील रविवारवाडयात सार्वजनिक सभा बोलावून संस्था स्थापन करण्याचा उद्देश व त्यापासून होणारे फायदे याचे विवेचन केले. त्यावेळी रू. ५०००/— जमा केले. त्यापैकी रू. १०००/— करवीर सरकारने दिले होते. ही रक्कम जमा झाल्यावर रू. २५०८/— खर्च करून ग्रंथालयाची इमारत बांधण्यात आली. स्थापनेच्यावेळी वर्गणीदारांची संख्या १७ व दरमहाचे उत्पन्न रू. १५ होते. पुस्तक संख्या ४४२ इतकी होती. त्यापैकी काही करवीर सरकारने, काही दक्षिणा कमिटीने व काही मिशनरी लोकांनी दिली होती. ग्रंथालयामध्ये त्यावेळी ज्ञानोदय ज्ञानप्रकाश वर्तमान दिपीका, धुमकेतू ही वृत्तपत्रे येत होती. संस्थेची व्यवस्था पाहण्याचे काम पोलिटीकल खात्याचे हेडक्लार्क पहात असत. जमा होईल ती रक्कम करवीर सरकारचे खजिन्यात ठेवली जात असे व जरूरी लागेल त्याप्रमाणे काढण्यात येई. १८७९ साली ग्रंथालयाच्या इमारतीचे काम सुरू होऊन १८८१ साली पूर्ण झाले. तेंव्हापासून हे ग्रंथालय याच इमारतीत आहे. वर्गणीदारांच्या सूचनेवरून इमारतीत मुताऱ्यांची सोय करण्यात आली.

१८५० ते १९१७ अखेर ६७ वर्षाचा कोल्हापूर नेटिव्ह लायब्ररी या संस्थेचा समग्र इतिहास संस्थेचे कार्यवाह श्री.वासूदेव रेगे यांनी लिहून ऑगष्ट १९१७ साली प्रकाशित केला. १९२२ साली ग्रंथालयाचे आश्रयदाते राजर्षी शाहू महाराज हे कैलासवासी झाले त्यावेळी जनरल मिटींग बोलावून शोकसभा घेण्यात आली. छत्रपती राजाराम महाराजांनी छत्रपती शाहू राजांचे उदार धोरण चालू ठेवण्याचे अभिवचन दिले. याबद्दल सभा घेऊन त्यांचे मन:पूर्वक अभिनंदन करण्यात आहे. ग्रंथालयाच्या स्थापनेपासून ग्रंथालय सरकारी अधिकाऱ्यांच्याच देखरेखीखाली चालत होते. ग्रंथालयाचे रूपांतर मध्यवर्ती ग्रंथालयामध्ये झाल्यानंतरही सर्व मदत करवीर सरकारकडून मिळत असे. दि. १५/११/१९३१ ते २७/११/१९३१ अखेर ग्रंथालयाचा ज्युबिली समारंभ साजरा झाला. छत्रपती राजाराम महाराज यांनी महोत्सवाचे उद्घाटन केले. यावेळी ज्युबिली कमिटीचे अध्यक्ष श्री.शंकरराव इंदूलकर यांनी स्वागतपर भाषण केले. संलग्न झालेली ही संस्था शिक्षणाची सेवा करण्यास समर्थ होवो. वाचनाभिरूची वाढून भविष्यकाळी कोणताही मोबदला न घेता ज्ञानप्रसाराची कपाटे उघडे ठेवण्याची सुसंधी या ग्रंथालयास लाभो असे त्यांनी आपले मत व्यक्त केले.

१९४४ साली ग्रंथालयासंबंधी संस्थानमध्ये कायदा करण्यात आला. एज्युकेशनल मिनीस्टर, कोल्हापूर स्टेट यांच्याकडून दि. २५/०७/१९४४ रोजी आलेल्या पत्रानुसार संस्थेचे रूपांतर मध्यवर्ती ग्रंथालयात करावे यासाठी प्रा.ना.सी.फडके यांच्या अध्यक्षतेखाली सभा भरली होती. सभेस एज्युकेशन मिनीस्टर हजर होते. या सभेत बराच उहापोह होवून सरकारशी विचार विनिमय करण्याकरिता एक समिती नेमण्यात आली. ग्रंथालयाचे सभासद व सरकारनियुक्त सभासद यांनी तयार केलेली घटना दि. २५/०२/१९४५ च्या वार्षिक सभेत मंजूर करण्यात आली. ग्रंथालयाचे ग्रंथपाल श्री.पी.टी.पाटील यांनी ग्रंथालय डिप्लोमा कोर्स पूर्ण करून आल्यानंतर शिक्षणाधिकारी यांच्या हुकूमावरून आपल्या पदाचा चार्ज घेतला. करवीर दरबारच्या १९४४ च्या ग्रंथालय कायद्यामध्ये एक मध्यवर्ती ग्रंथालय ठेवून तालुका ग्रंथालये, ग्राम ग्रंथालये व फिरती ग्रंथालये निर्माण करायची अशी योजना होती व या सर्व ग्रंथालयांचा संबंध मध्यवर्ती ग्रंथालयाशी असावा. त्याप्रमाणे १५ ग्रामवाचनालयांची नोंदणी करण्यात आली व त्यांना प्रत्येकी १०० रू. प्रमाणे प्राथमिक मदत देण्यात आली. त्याचप्रमाणे फिरत्या वाचनालयासाठी ३० पेटया तयार करून घेवून त्यासाठी पुस्तके मागविण्यात आली. ३१ मार्च १९४४ रोजी कोल्हापूर संस्थान मुंबई प्रांतात विलीन झाले व मुंबई सरकाचे क्युरेटर ऑफ लायब्ररीज यांचा संस्थेशी पत्रव्यवहार सुरू झाला. ग्रंथालयाचे जिल्हा ग्रंथालयात रूपांतर होताना कोल्हापूर दरबारची सरकारी मदत व वाचन मंदिराचा दर्जा शक्यतो पूर्ववत चालू राहिल याबद्दल व्यवस्थापन समितीने प्रयत्न करावा असे ठरले. १९५० साली जिल्हा ग्रंथालय म्हणून करवीर नगर वाचन मंदिरास मुंबई सरकारची मान्यता मिळाली.

महत्वाचे उपक्रम –

१) नामदार गोपालकृष्ण गोखले यांची व्याख्याने –

नामदार गोपालकृष्ण गोखले यांचे सन १८८६–८७ साली 'India Under British Rule' चा विषयावर व्याख्यान झाले होते. तसेच १८९३ साली 'Our Various Activities' आणि १८९४–९५ साली 'Our Educated Men' या विषयावर व्याख्याने झाली होती.

२) वक्तृत्व स्पर्धा –

१९३२ साली वक्तृत्व हा नवीन उपक्रम राबविला. पुणे येथील वक्तृत्व सभेकडून या उपक्रमासाठी १५०/– देऊ असे पत्र आले होते. या स्पर्धेमध्ये स्थानिक ५० स्पर्धकांनी भाग घेतला होता. या बरोबरच सांगली, कराड येथून स्पर्धक आले होते. विशेष म्हणजे सहा स्त्री उमेदवारांनी भाग घेतला होता. या स्पर्धेत स्थानिक नागरिकांनीही बक्षिसे ठेवली होती.

३) महाराष्ट्र साहित्य संमेलन –

महाराष्ट्र साहित्य संमेलनाचे १७ वे अधिवेशन ग्रंथालयाच्या विद्यमाने घेणेचे ठरविण्यात आले. यासाठी करविरस्थ नागरीकांची एक सभा बोलावण्यात आली. सभेस शहरातील प्रमुख लोक उपस्थित होते. या सभेत कार्यकारी मंडळ व उपमंडळे यांची निवड करण्यात आली. या संमेलनाच्या अध्यक्षपदी बडोद्याचे महाराज सयाजीराव गायकवाड यांची निवड करण्यात आली. दि.२७/१२/१९३२ रोजी साहित्य संमेलन सुरू झाले. दहा हजार लोकांची बसण्याची व्यवस्था करण्यात आली होती. दुपारी ३ वाजता छत्रपती राजाराम महाराजांनी भालदार चोपदारांच्या ललकाऱ्यास मुजरे स्वीकारीत सभ्ज्ञामंडपात प्रवेश केला व संमेलनाच्या कामास प्रारंभ झाला. नियाजित अध्यक्ष सयाजीराव गायकवाड येऊ न शकल्यामुळे सरदार माधवराव किबे यांची अध्यक्ष म्हणून निवड झाली. अध्यक्षांचे भाषण बडोद्याचे नायब दिवाण माने–पाटील यांनी वाचून दाखविले. दि. २८ रोजी ग्रंथालयाच्या इमारतीत ग्रंथप्रदर्शनाचे उद्घाटन नामदार पंजाबराव यांच्या हस्ते झाले. स्वागताध्यक्ष माधवराव बागल होते. दि. २९ रोजी कविवर्य भास्कररराव तांबे यांच्या अध्यक्षतेखाली कवी संमेलन झाले.

४) सुवर्ण महोत्सव वाढदिवस समारंभ –

ग्रंथालयाचा सुवर्णमोहत्सव वाढदिवस समारंभ दि. २९/११/१९३६ रोजी साजरा करण्यात आला होता त्यावेळी पुण्याचे आण्णासाहेब भोपटकर यांचे भाषण झाले. रात्री मास्टर निवृत्तीनाथ यांचे गायन झाले.

५) कवि माधव ज्युलियन यांचा गौरव –

सुप्रसिध्द कवि व ग्रंथालयाचे सभासद माधव ज्युलियन यांना मुंबई विद्यापीठाने डी.लीट् पदव दिल्याबद्दल त्यांचा दि. २७/१२/१९३८ रोजी कोल्हापूरचे तत्कालीन सरन्यायाधिश राव पंडितराव यांच्या अध्यक्षतेखाली गौरव करण्यात आला.

६) वि.स.खांडेकरांचा सत्कार –

दि.२८/०३/१९४१ रोजी कवि गिरीश यांचे अध्यक्षतेखाली सोलापूर येथे होणाऱ्या महाराष्ट्र साहित्य संमेलनाचे नियोजीत अध्यक्ष वि.स. खांडेकर यांचा ग्रंथालयाने सत्कार केला. त्याचबरोबर दक्षिण साहित्य संमेलनाचे अध्यक्ष व सांगलीचे राजकवी श्री.साधूदास यांची श्री.वि.स.खांडेकर यांच्या अध्यक्षतेखाली जाहिर सभा घेण्यात आली.

७) ग्रंथालयाचा वर्धापनदिन –

दि. १६/०१/१९४४ ला ग्रंथालयाचा वर्धापनदिन राजाराम कॉलेजच्या हॉलमध्ये भाई श्री.अ.डांगे यांच्या अध्यक्षतेखाली साजरा झाला. भाई डांगे यांनी चालू महायुध्दाचा मराठी साहित्यावर कोणता परिणाम होईल, अगर व्हावा या विषयावर उद्बोधक भाषण केले. रात्री श्री.गजाननराव वाटवे यांच्या भावगीत गायनाचा कार्यक्रम झाला.

८) शतक महोत्सव समारंभ –

१९५० साली ग्रंथालयाला १०० वर्षे पूर्ण होण्याचा उत्सव साजरा करण्याचे सर्वसाधारण सभेत ठरविण्यात आले. मुंबई प्रांताचे मुख्यमंत्री नामदार बाळासाहेब खेर यांच्या अध्यक्षतेखाली दि. १५ ते २१ मे १९५० अखेर आठवडाभर उत्सव साजरा करण्याचे ठरविले. पण नामदार खेर आजारी पडले. त्यमुळे उत्सवाचा कार्यक्रम पुढे ढकलावा लागला.

९) संत तुकाराम त्रिशत पुण्यतिथी –

महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या सूचनेनुसार श्री.संत तुकारम त्रिशतसांवत्सरीक पुण्यतिथी १९५० साली साजरी करण्यात आली. यानिमित्त डॉ.रा. चि.श्रीखंडे, प्रा.पां. ना.कुलकर्णी यांची व्याख्याने झाली. भजन प्रवचने असा कार्यक्रम झाला. असे अनेक वैशिष्ठपूर्ण कार्यक्रम ग्रंथालयामार्फत घेण्यात आले त्याचा लाभ कोल्हापूर संस्थानातील नागरिकांना झाला.

विशेष घटना –

ग्रंथालयाच्या १९५० पर्यंतच्या वाटचालीत अनेक विशेष घटना घडल्या. ग्रंथालयाचे कामकाज कसे चालत होते हे या घटनावरून समजते. कोल्हापूर संस्थानात आधुनिक विचारांचे बीज पेरण्यास सदर घटना कारणीभूत ठरल्या. यातील काही ठळक घटनांचा उल्लेख पुढीलप्रमाणे करता येईल. १८७३ मध्ये वक्तृत्वोत्तेजक नावाचे एक मंडळ ग्रंथालयास जोडण्यात आले. या मंडळातर्फे प्रतिवर्षी कागलकरांच्या वाडयात दोन दिवस समारंभ होवून बक्षिसे देण्यात येत. या मंडळातर्फे १८७५ साली उत्कृष्ठ सुरी तयार केल्याबद्दल बाळा गोविंद लोहार यास सुवर्णपदक देण्यात आले. या मंडळातर्फे कागद, साखर, पेन्सील तयार करण्याकरिता प्रत्येकी १०० रू. ची बक्षिसे जाहिर करण्यात आली होती. फक्त पेन्सीलीचा नमुना आला. १८७९–८० साली एक उल्लेखनीय घटना घडली. धनुवल्लद इमाम नावाच्या स्वच्छतागृहे साफ करण्याचे काम करणाऱ्या गृहस्थाने आपणास वर्गणीदार होणे असल्याचे अर्जाने विचारले. त्यावेळची सामाजिक परिस्थिती लक्षात घेवून ग्रंथालय हे सामाजिक मदतीवर व सहानुभूतीवर चालणारी संस्था असल्याने या व्यक्तीस वर्गणीदार करून घेतले नाही. दि. ०५/१०/१८७९ च्या सभेत वर्कींग कमिटीने तसा निर्णय घेतला.

१८८४ साली ग्रंथालयाने नवे नियम केले. हे नियम पास करण्यासाठी जनरल कमिटीच्या आठ सभा झाल्या.

१८९९ मध्ये दिवाण साहेबांनी ग्रंथालयास पूर्ववत पाणी मोफत दयावे असा हुकूम दिला व स्वतंत्र नळ जोडून देण्यात आला.

१८९८–९९ साली मॅनेजींग कमिटींत सौ.लक्ष्मीबाई रूईकर यांना नेमण्यात आले. पण त्या एकाही सभेस हजर नव्हत्या, म्हणजे मतदारांनी १/१२ हक्क गमावला. त्यापेक्षा हजर जातीतील लायक सभासदास नेमले असते तर बरे झाले असते असे अहवालात नमूद करण्यात आले. दि.०१/१०/१९०२ रोजी श्री.भास्करराव जाधव यांनी प्रा.राजाराम शास्त्री भागत यांचे ग्रंथालयामध्ये व्याख्यान आयोजीत करावे असे पत्र लिहून कळवले. व्यवस्था कमिटीने एक ठराव करून व्याख्यान करू नये असे कळवले. प्रा.राजाराम शास्त्री यांची तत्कालीन समाजसुधारक मते संस्थेच्या चालकांना संमत नव्हती. संस्था चालकांचे हे प्रतिगामी धोरण भावी लढयास कारणीभूत झाले. १९०९ साली ग्रंथालयात येणाऱ्या वृत्तपत्रातील महत्वाचे उतारे कात्रण करून ठेवावेत असा ठराव केला. श्री.विश्वनाथराव गोखले आणि प्रा.लठ्ठे यांनी इंग्रजी वर्तमानपत्रातील लेखाबाबत खुणा कराव्यात व श्री.य. अभ्यंकर यांनी मराठी पत्रास खुणा कराव्यात आणि सदर लेख कारकुनाचे संग्रहीत ठेवावेत असे ठरावात नमूद करण्यात आले.

१९१० साली भास्करराव जाधव यांच्या देखरेखीखाली इंग्रजी पुस्तकांचा कॅटलॉग प्रसध्दि करण्यात आला. वर्गणीदारांनी १३५०० पुस्तके घरी वाचण्यास नेली. एवढी देवघेव वाढण्याचे कारण हा कॅटलॉग होय. छत्रपती शाहू महाराज यांची ऑईल पेंटींगची तसबीर श्री.बाळकृष्ण कारखानीस ड्रॉईंग मास्तर टेक्नीकल स्कूल यांनी तयार केली होती. ती विकत घेवून ग्रंथालयाच्या दिवाणखान्यात लावण्यासाठी तीनशे रूपये मंजूर करण्यात आले. ही तसबीर २५०/– रूपये विकत घेण्याचे ठरविण्यात आले. तसबीर बसविणेसाठी ५०/– मंजूर करण्यात आले. सदर पेंटींगचा अनावरण समारंभ दि.०२/०४/१९११ रोजी झाला.

सन १८७१ सालचे ग्रंथालयाचे सेक्रेटरी श्री.बाळाजी मोडक यांनी सूचना मांडली होती की संस्थानातील जहागिरीतून व तालुक्याच्या गावातून ठिकठिकाणी ग्रंथालये स्थापन करावीत व हे ग्रंथालय मध्यवर्ती असावे ही सूचना कालानुरूप अंमलात आली आहे. १९११ सालामध्ये श्री.भास्करराव जाधव यांना अध्यक्ष व महादेव डोंगरे यांना उपाध्यक्ष नेमण्यात आले. मॅनेजिंग कमिटीचे नवीन निवडून आलेले १२ सभासद विविध जाती धर्माचे होते. १९१३ साली लायब्ररीयन आपटे यांच्या हलगर्जीपणाने रू. १४१/– ची चोरी झाली. आपटे यांना मिळणारी बोनसची रक्कम त्यांस न देता चोरीस गेलेल्या रक्कमेची भरपाई होईपर्यंत ग्रंथालयास जमा करावी असे ठरले. मेजर ग्रॅहम यांनी स्वत: लिहिलेले 'The Statistical Report on The Principality of Kolhapur' हे पुस्तक लायब्ररीस भेट दिले होते. हे पुस्तक श्री.बापूसाहेब गोविंदराव जाधव सरनोबत यांनी दि. १९/११/२०१२ मध्ये वाचायाचा नेले होते. अनेकवेळा मागणी करूनही हे पुस्तक परत मिळाले नाही. अखेर १९१७ साली सरनोबत यांना रजिस्टर्ड नोटीस पाठविण्यात आली. त्यांनी ती घेतली नाही. सरसुभेदार यांचेकडे लिहून कळविणेत आले. शेवटी दिवाण साहेबांच्याकडे काम पाठविण्यात आले. अखेर सरनोबत यांच्यावर दावा लावण्याचे ठरले. १९१९ साली पुस्तक जमा केले. वरीलप्रमाणे अनेक घटना घडल्या त्याने वाचन संस्कृती समृध्द करण्याचे कार्य केले. संस्थानात होणाऱ्या परिवर्तनाचे प्रतिबिंब सदर घटनांत दिसून येते. संस्थानात होणारे विचार परिवर्तन ग्रंथालयाच्या कामकाजात दिसून येते. संस्थान काळात एक सांस्कृतिक केंद्र म्हणून करवीरनगर वाचनालयाचे स्थान संस्थानात होते. शाहू राजांचे आधुनिक विचार समाजात रूजविण्याचे कार्य या ग्रंथालयाने केले आहे त्यामुळे संस्थानच्या इतिहासात या ग्रंथालयाचे महत्वाचे स्थान आहे.

निष्कर्ष – करवीर नगर वाचन मंदीर हे ग्रंथालय संस्थान काळामध्ये एक महत्वाचे सांस्कृतिक केंद्र होते. संस्थानातील विद्वानांना विचार पुरविण्याचे एक साधन होते. या ग्रंथालयाने विविध कार्यक्रमातून आधुनिक विचार समाजात रूजविण्याचे कार्य केले. ग्रंथालयाच्या वार्षिक सभा नियमित होत असत. विचार विनिमयातून पुढची दिशा ठरत असे. कामाची ही पध्दत आजही आदर्शवत आहे.

संदर्भ – १) उजळंबकर एम.व्ही., २००३ : कोल्हापूर जिल्हा सार्वजनिक ग्रंथालय एक दृष्टीक्षेप, ग्रंथवाहिणी विशेषांक.

२) मेश्राम एम.बी., २००५ : महाराष्ट्रीय सार्वजनिक ग्रंथालय चावले, ग्रंथमित्र गौरव अंक.

३) करवीर नगर वाचन मंदीर, स्मरणिका १९७५–७६.

39. हैद्राबाद संस्थानातील सामाजिक व आर्थिक स्थिती

प्रा. भांजे विजयकुमार प्रल्हादराव
इतिहास विभाग,
कर्मवीर डॉ. मामासाहेब जगदाळे महाविद्यालय,
वाशी. ता. वाशी जि. उस्मानाबाद.

प्रस्तावना :

हैद्राबाद संस्थान हे भारतातील तत्कालीन संस्थानापैकी एक मोठे आणि प्रभावशाली संस्थान म्हणून ओळखले जाते. भारताच्या भौगोलिक दृष्टिकोनातून देशाच्या मध्यभागी असलेले पाहावयास मिळते. या संस्थानाचा उदय १८ व्या शतकात झाला. मोगल बादशहा औरंगजेबाच्या मृत्युनंतर मोगल सरदार निजाम–उल–मुल्क याने मोगलशाहीच्या विरोधात बंड करुन इ.स. १७१९ या वर्षी स्वतंत्र असफजाही म्हणजेच निजाम सत्तेची स्थापना आधुनिक हैद्राबाद (तत्कालिन भागानगर) येथे केली. हैद्राबाद संस्थानात तेलंगणा, मराठवाडा व कर्नाटक हे विभाग होते. प्रत्येक विभागाची विभागणी जिल्हयात झाली होती. मराठवाड्यात पाच, तेलगनात आठ व कर्नाटकात तीन जिल्हये होती. एकूण १६ जिल्ह्यांचा मिळून हैद्राबाद संस्थान होते.

हैद्राबाद संस्थानचा संस्थानीक हा धर्माने मुस्लीम होता पण येथील प्रजा मात्र बहुसंख्य हिंदू होती या संस्थानात सात संस्थानिक होवून गेले. प्रत्येक संस्थानिकाच्या मनात येथील प्रजेबदद्ल भिती वाटायची कारण येथील प्रजा बंड करुन आपली सत्ता उलथावून टाकतील असे वाटायचे. यामुळे निजामाने मुस्लीम धर्म संस्थानात कसा वाढीस लागेल या दृष्टीकोनातून प्रयत्न करण्यास सुरुवात केली. यामुळे सर्वसामान्य प्रजा आणि संस्थानिक यांच्यात संघर्ष होण्यास प्रारंभ झाला या कारणामुळे हैद्राबाद संस्थानातील सामाजिक व आर्थिक परिस्थिती स्तब्ध राहिली आणि सामाजिक, आर्थिक विकास होवू शकला नाही या संबंधिची चर्चा आपण पुढील प्रमाणे करु.

हैद्राबाद संस्थानातील सामाजिक परिस्थिती :

शासक मुस्लिम असल्यामुळे सर्व निजामांनी हे संस्थान मुस्लिम राज्य आहे असे मानले त्यामुळे निजामी राजवटीत स्थानिक जनतेला दुय्यम वागणुक दिली जात होती. विषमता आणि दैन्य यामुळे पिढ्यान पिढ्या लोक दबलेले व दु:खी कष्टी जीवन जगत असत. हैद्राबाद संस्थानातील अंध:कार हा एक तर गुलामगिरीचे प्रतिक होते व तो मध्ययुगीन सरंजामशाहीच्या काळ्या भिन्न परंपरेतून आलेला होता यामुळे संस्थानातील जीवनाला मोगलायी जीवन असे संबोधले जात होते. त्यामुळे येथील जीवनात कमालीची जातीयता होती. मुस्लीमांचे वर्चस्व सामाजिक जिवनात प्रस्थापित झाले होते त्यामुळे लोकामध्ये पक्षपात वाढला होता त्याचा परिणाम म्हणजे हिंदूची कुचंबना होत होती. एकूणच निजामी राजवटीत हिंदू संस्कृतीवर संक्रांत होती.[१] या संस्कृतीची वक्रदृष्टी संस्थानातील जनतेलाही भोगावी लागली. तत्कालीन समाज जीवनाच्या विविध पैलुंचा आपण आढावा घेऊ.

निजामी राजवटीत समाजाचे विभाजन विविध जाती व धर्मामध्ये झाले होते हिंदू बहुसंख्य असले तरी त्यांच्यात ब्राह्मण, मराठा, लिंगायत, सोनार, लोहार, सुतार, चांभार, कुणबी, दलित इत्यादी उपजाती होत्या. आंतरजातिय रोटी–बेटी व्यवहार बहुतांश होत नसे या विविध जातीमध्ये पोटजाती होत्या. दलित समाज हा उपजातीत विभागला होता प्रत्येक जातीचे पाणवटे व विहीरी वेगवेगळ्या होत्या कनिष्ट जाती आपल्या उपजाती बरोबर अस्पृश्यता पाळीत असत अस्पृश्यतेमुळे दलितांना अत्याचार व छळ सोसावा लागला होता. खेड्यात राहणाऱ्या दलितांची संख्या अधिक होती या दलितांना गावातील कामे करावी लागत असत. उदा. मृत जनावरे ओढणे, मयतांची खड्डे खोदणे, लाकडे फोडणे, वरिष्ठांच्या घरी अंग मेहनतीची कामे करणे इत्यादी कामासाठी मिळणाऱ्या किरकोळ मोबदल्यात त्यांना उपजिवीका भागवावी लागत असे.[२]

कौटुंबिक जीवनाचा विचार केल्यास स्पष्ट होते की, हिंदू व मुस्लीम समाजात एकत्र कुटूंब पध्दती अस्तित्वात होती. मुलीपेक्षा मुलांना कुटूंबात महत्व होते, स्त्रीयांची परिस्थिती गंभीर होती स्त्रीने केवळ आदर्श माता व उत्तम गृहीणी या भूमिका पार पाडाव्या ही समाजाची अपेक्षा होती. मुस्लीम समाजाच्या स्त्रीयांबाबत देखील हीच धारणा होती. गोशा पध्दती मुस्लीम समाजात रुढ होती. हिंदू पेक्षा मुस्लीम समाजात गोशा पध्दती अधिक कटाक्षाने पाळली जात होती. विवाह संस्कारास असामान्य महत्त्व होते आंतरजातीय विवाह होत नव्हते विवाहीत स्त्रीला समाजात प्रतिष्ठा होती. हिंदू समाजात बाल विवाह पध्दती रुढ होती.[३] मुस्लीम समाजात घटस्फोटासही परवानगी होती. एकंदरीत निजाम राजवटीमध्ये मराठवाड्याची समाजिक परिस्थिती अस्थैर्याची होती.

आर्थिक परिस्थिती :

सरंजामशाही अर्थव्यवस्था हाच निजाम राजवटीचा मुळ गाभा होता. सर्व निजामांनी प्रत्येकाला आपल्या नियंत्रणाखाली ठेवण्यासाठी कटाक्षाने सरंजामशाही अर्थव्यवस्थेचा पुरस्कार केला. पहिला निजाम हाच या सरंजामशाहीचा जनक होय. त्याने माळवा प्रांतातून अनेक हिंदू व मुसलमान सरदार आपल्या राज्यात आणले. युध्दात अथवा प्रशासनात राजसत्तेस सहाय्य करणाऱ्यास निजामाने जहागीरी दिल्या.[४] या जहागीरदारापैकी बहुसंख्य सरदार मुस्लीम होते त्यांना जहागीरी देऊन त्यांच्यावर राज्याच्या संरक्षणाची जबाबदारी सोपविली. पहिल्या निजामाप्रमाणे पुढील निजामाने देखील अनेकांना जहागीर दिल्या. जहागीरदारांचे विश्लेषण पुढील तक्त्यानुसार केलेले आहे.[५]

अ.क्र.	जिल्ह्याचे नाव	दिवाणी	सर्फेखास	विविध सवलती असलेली जहागीर	विविध सवलती नसलेली जहागीर	एकूण
१	औरंगाबाद व जालना	१४४९ १२६५	९२ १५०	८२ १२३	४० — — —	२०२६ — — —
२	परभणी व हिंगोली	११४३	— —	— —	१००	१६३८
३	नांदेड	७९२	११	११३	१५८	१४२५
४	बीड	— —	८३	४८	१२७	१०५०
५	उस्मानाबाद	२४३	३७१	२६०	२१	९०१
	एकूण	४८९२	७१३	६२६	८०९	१०४०

१	तेलंग	६८९२	६४७	१०८०	७४४	१०३६२
२	कर्नाटक	२१८७	६०१	१४४५	८३१	५०५५
३	संस्थानात एकूण	— —	— —	— —	— —	— —

वरील तक्त्यानुसार पाहिल्यास हैद्राबाद संस्थानाच्या अर्थव्यवस्थेची वैशिष्ट्ये सांगता येतात. सर्फेखास पासून निजामाला भरपूर उत्पन्न मिळत असे कारण तेथील जमीनी फार सुपीक होत्या. हैद्राबाद संस्थानाचा तुलनात्मक अभ्यास केला तर हे लक्षात येते की, तेलंगणा व कर्नाटकाच्या तुलनेत मराठवाड्यात सर्फेखासमध्ये अधिक खेडी होती. त्यामुळे जनतेचे आर्थिक शोषण व कुचंबना झाली हा भाग मराठवाड्यातील विकासापासून वंचीत राहिला. संस्थानातील दिवाणी भागाचा विचार केल्यास मराठवाड्यापेक्षा तेलंगणात अधिक खेडी होती कर्नाटकात हे प्रमाण मराठवाड्यापेक्षा तुलनेने कमी होते. मराठवाडा अंतर्गत जिल्ह्याचा विचार केल्यास औरंगाबाद जालना जिल्ह्याच्या दिवाणी भागात सर्वाधिक म्हणजे १४४९ खेडी होती तर उस्मानाबाद व लातूर जिल्ह्यात सर्वात कमी म्हणजे २४३ खेडी होती. विविध सवलती असलेली जहागीरी खेड्याची संख्या मराठवाड्याच्या तुलनेने तेलंगणा व कर्नाटकात अधिक होती. मराठवाडा अंतर्गत जिल्ह्याच्या संदर्भात हे प्रमाण उस्मानाबाद व लातूर जिल्ह्याचा क्रमांक शेवटचा होता. जहागीरदारांपैकी काही अरब, रोहीले व पठाण होते ते सावकारी करीत असत गरीब जनतेला त्याचा बराच उपद्रव होत असे. त्यामुळे सरंजामशाही अर्थव्यवस्था जोपासली गेली. तत्कालीन अर्थव्यवस्थेचे प्रमुख दोन भाग होते. त्यापैकी एक सरकारी अथवा दिवाणी जमीन व दुसरा भाग जहागीरी हा होता.

I सरकारी अथवा दिवाणी जमीन :

या जमीनीचे उत्पन्न सरकारच्या प्रत्यक्ष तिजोरीत (कोषात) जमा होत असे. त्याचे व्यवस्था व नियंत्रण दिवाणाकडे होते. सालारजंग या दिवाणाने महसूल क्षेत्रात सुधारणा केल्या होत्या.[६]

II जहागीर :

जहागीरीमध्ये सर्फेखास, पायगा, जहागीर व संस्थाने असे चार प्रकार होते. या चारही प्रकारातून निजामाला फार मोठ्या प्रमाणात आर्थिक उत्पन्न मिळत असे.

III कर पध्दती :

सर्वच निजामांनी सरंजामी आणि परावलंबी अर्थव्यवस्थेचा पुरस्कार करुन विकासाकडे बुध्दीपरस्पर दुर्लक्ष केले. पहिल्या निजामाने सरंजामशाहीची सुरुवात केली तर नंतरच्या निजामाने त्यात भर टाकली. चौथ्या निजामाच्या काळात लिलाव पध्दती रुढ झाली त्यामुळे संस्थानातील जनतेचे शोषण वाढले. इ.स. १८५३ पर्यंत निजामाचे आर्थिक धोरण अत्यंत उपद्रावक होते. सालारजंग या दिवाणाने त्यात सुधारणा केली तरीही प्रशासनाच्या व्यवस्थेसाठी अधिक तरतूद करणे आवश्यक आहे याचा गंभीरपणे विचार झाला नाही. करदात्याची आर्थिक क्षमता ही कर आकारणीचे सुत्र असले पाहिजे पण निजामी राजवटीत या तत्वाचा अवलंब केलेला नाही तसेच कराच्या प्रमाणात जनतेस सुख सोयी उपलब्ध करुन देणे हे शासनाचे कर्तव्य आहे हा संकेत धाब्यावर बसविण्यात आला. या काळात उत्पन्नाची प्रमुख साधने तीन होती. त्यात शेतसारा अथवा जमीन महसुल, जकात आणि अबकारी यांचा समावेश होता.[७]

वरील तिन्ही कराच्या माध्यमातून निजाम सरकार संस्थानातील जनतेवर अन्याय अत्याचार करुन कर जबरदस्तीने वसुल करुन घेत कर वसुलीबाबत निजामाची जनतेवर जबरदस्त दहशत होती. हे वरील विवेचनावरुन स्पष्ट होते. एकंदरीत पाहता निजाम संस्थानिकाकडून समाजाच्या प्रगतीकडे म्हणावे तसे लक्ष दिलेले दिसून येत नाही.

निष्कर्ष :

१. हैद्राबाद संस्थानातील बहुसंख्य समाज सरंजामशाहीत व्यवस्थेत गुरफटलेला होता.

२. निजामाने हैद्राबाद संस्थानातील समाजाच्या प्रगतीसाठी ठोस पावले उचललेली दिसत नाही.

३. हैद्राबाद संस्थानातील समाजामध्ये स्त्रीयांना दुय्यम वागणुक मिळत होती.

४. हैद्राबाद संस्थानात पारंपारिक पध्दतीने जाती व्यवस्था जोपासलेली दिसून येते.

५. हैद्राबाद संस्थानातील सामान्य वर्गाला कोणत्याही पध्दतीचे अधिकार नव्हते.

६. निजामाने संस्थानाच्या आर्थिक प्रगतीसाठी महत्वपूर्ण कार्य केलेले दिसून येत नाही.

७. निजामी अर्थव्यवस्था शोषित स्वरुपाची असल्यामुळे संस्थानातील शेतकरी, शेतमजुर व सामान्य मनुष्याची आर्थिक परिस्थिती हालाखीची होती.

८. अबकारी कर हे निजाम संस्थानातील उत्पन्नाचे महत्वपूर्ण साधन होते.

संदर्भसूची :

१. एस.एस.भांडवलकर आणि यु.एस. हनवते, मराठवाड्याचा इतिहास, अभिजित पब्लिकेशन, लातूर, जुन १९९९.

२. सोमनाथ रोडे, मराठवाड्याचा इतिहास, प्रथमावृत्ती, विद्या बुक्स पब्लिशर्स, औरंगाबाद, जुन १९९९, पृ.क्र. ५३—५७.

३. अनिल कठारे आणि एन.एन. नगराळे, मराठवाड्याचा इतिहास, प्रथमावृत्ती, कल्पना प्रकाशन, नांदेड, सप्टें. १९९९, पृ.क्र. २०५—२०८.

४. अनंत भालेराव, हैद्राबादचा स्वातंत्र्य संग्राम आणि मराठवाडा, स्वामी रामानंद तीर्थ संशोधन संस्था, औरंगाबाद, पृ.क्र. ५५—६०.

५. पी.व्ही. काटे, मराठवाड्याचा इतिहास, प्रथमावृत्ती, कैलास पब्लिकेशन, औरंगाबाद, जुन १९९९, पृ.क्र. ९—१०.

६. उपरोक्त, पृ.क्र. ११—१२.

७. चंद्रशेखर लोखंडे, हैद्राबाद मुक्तीसंग्राम का इतिहास, प्रथम संस्करण, श्री गुढमल प्रल्हादकुमार आर्य धर्मार्थ ट्रस्ट, हिंडौन सिटी, राजस्थान, डिसें. २००४, पृ.क्र. १५८—१६०.

40. अक्कलकोटच्या विकासात अक्कलकोट संस्थानिकांचे योगदान

श्री . धिरज भिमशा शाखापुरे
सहा . प्राध्यापक (राज्यशास्त्र)
संघवी केशरी महाविद्यालय, चिंचवड, पुणे .

अक्कलकोट या शब्दाची व्युत्पत्ती ः

'अक्कलकोट' या शब्दाची व्युत्पत्ती करताना पं . श्रीपादशास्त्री किंजवडेकर लिहितात की,'अक्कल' हा शब्द 'अक्कलकाढा' या वनस्पतीच्या नावावरून आला असावा . तर अक्कलकाढा हा शब्द संस्कृत अक्कलक य शब्दावरून बनला आहे . अक्कलकाढा ही एक औषधी वनस्पती असून जिव्हादोषावर, स्पष्ट उच्चारावर आणि वोबडेपणा घालवण्यासाठी याचा उपयोग होतो . अक्कल हा शब्द वुद्धीचा निदर्शक मानला जातो . अशी ही वनस्पती या भागात विपूल प्रमाणात उगवत असे . 'कोट' या शब्दाचा अर्थ समुह असा आहे . 'अक्कल म्हणजेच अक्कलक नावाची वनस्पती ज्या भूमीत विपूल प्रमाणात उगवते ते म्हणजे अक्कलकोट होय .'[१]

अक्कलकोट संस्थानचा राजकीय इतिहास ः

'अक्कलकोट संस्थानात १0७ खेडी व माळशिरस तालुक्यातील ६ गावे तसेच खटाव तालुक्यातील कुर्ले हे गाव होते . अक्कलकोट ही अक्कलकोट संस्थानची राजधानी होती .'[२] अक्कलकोट परगण्यावर पूर्वी सातकर्णी किंवा आंध्रभृत्य (आंध्राचे सेवक) घराण्याचे राज्य होते . यानंतर पल्लव, चालुक्य आणि राष्ट्रकुट घराण्यांनी अक्कलकोटवर राज्य केले . १२ व्या शतकात देवगिरीच्या यादवांनी आपला अंमल या प्रांतावर बसवला . चपळगाव, कडबगाव ,नागणसूर व जेऊर या अक्कलकोट संस्थांनातील गावात सापडलेल्या शिलालेखावरून येथे यादवांचे राज्य होते हे स्पष्ट होते . यानंतर वाहमनी राज्य इ . स १३४७ ला अस्तित्वात आले .

'१७ व्या शतकाच्या सुरूवातीला 'अक्कलकोट' अहमदनगरच्या निजामशाहाच्या अंमलाखाली आले . इ . स १६३३ मध्ये निजामशाहीच्या पतनानंतर अक्कलकोट विजापूर राज्याचा भाग वनला . इ . स १६८६ मध्ये औरंगजेबाने विजापूर जिंकले . १७व्या शतकाच्या शेवटी इ . स १६९९ मध्ये संभाजीपुत्र छ . शाहूच्या विवाहाच्या वेळी औरंगजेबाने त्याला लग्नाची भेट (दूधभात) म्हणून अक्कलकोट दिले .'[३] अशा प्रकारे अक्कलकोट परगाणा सातारा राज्याचा भाग बनला . इ . स १७0७ मध्ये शाहू महाराज मोघलांच्या कैदेतून सुटुन येत असताना, त्यांना औरंगाबाद जिल्हयातील कन्नड तालुक्यातील पारद गावचा मोगल किल्लेदार सयाजी लोखंडे याने विरोध केला, तेव्हा झालेल्या युदधात लोखंडेचा मृत्यू झाला . आपल्या पतीच्या मृत्यूने व्याकुळ झालेल्या त्यांच्या पत्नीने आपला लहान मुलगा राणोजी याला शाहूंच्या पायावर ठेवले व त्याचा संभाळ करण्याची विनंती केली . शाहूंनी ही विनंती मान्य केली व छोटया राणोजींचा संभाळ आपल्या राजवाडयात आपल्या स्वत :च्या मुलाप्रमाणे केला . त्याला सर्व प्रकारचे सैनिकी शिक्षण देऊन कर्तवगार वनवले . राणोजीने इ . स १७१५ मध्ये निजामाशी झालेल्या एका युदधात शाहूंच्या सैन्याला मोठा विजय मिळवून दिला . राणोजीमुळे फत्ते झाली म्हणजे विजय मिळाला म्हणून शाहूंनी त्याला 'फत्तेसिंह' असे उपनाम दिले . तसेच 'राजा' हा किताव दिला व अक्कलकोट परगण्याची जहागिरी दिली . हेच ते फत्तेसिंहराजे भोसले (पहिले) अक्कलकोट संस्थांनचे संस्थापक होय .[४] 'छ . शाहू महाराजांची मानसपूत्र म्हणून फत्तेसिंहाना ओळखले जात होते . छ . शाहूंनी कर्नाटक मोहीमेचे नेतृत्व फत्तेसिहांना दिले . त्यांना एका राजपुत्राप्रारखे त्यांनी वागवले आणि कदाचित साता-याची गादीही त्यांना मिळाली असती, पण राज्याचा स्वामी होण्यापेक्षा एका छोटया जहागिरीचा मालक होणेच त्याने पसंत केले .'[५]

फत्तेसिंहानंतर अनेक पराकमी राजे या संस्थानात होऊन गेले . पुढे हे संस्थान ब्रिटीशांच्या नियंत्रणाखाली कारभार करू लागले . इ . स १८४८ ते १९४८ या काळात (शतकभरात) अनेक पराकमी राजे होऊन गेले . 'स्वातंत्र्यानंतर १९४८ पर्यंत हे संस्थान भारतात विलिन झाले नव्हते . स्वातंत्र्यसैनिक श्री . रत्नाप्पा कुंभार यांनी आंदोलन केले व त्यानंतर हे संस्थान १९४८ मध्ये भारतात सामील झाले .'[६] या राजांनी राज्यकारभाराबरोवरच प्रजेच्या हिताची अनेक कामे केली तसेच अक्कलकोट शहराचा विकास घडवून आणला . सदर शोधनिवंधात 'अक्कलकोट शहराच्या विकासात अक्कलकोट संस्थानचे योगदान' यावर प्रकाश टाकण्याचा प्रयत्न केला आहे .

अक्कलकोट संस्थानांची शैक्षणिक प्रगती ः

अक्कलकोट संस्थानातील सर्वच राज्यकर्त्यांनी शैक्षणिक क्षेत्राकडे सुरूवातीपासूनच विशेष लक्ष दिले . तिसरे शहाजीराजे भोसले (इ . स . १८६७ ते १८९६) यांनी अक्कलकोट शहरामध्ये प्राथमिक शाळा सुरू केली . शाळेसाठी उत्तम ,रेखीव अशी दगडी इमारत वांधली ती शाळा आज 'सेंट्रल स्कूल' या नावाने ओळखली जाते .[७]

प्राथमिक शिक्षणानंतर पुढील शिक्षणाची सोय शहरातच व्हावी यासाठी माध्यमिक शाळा सुरू केली . त्यासाठी त्यांनी अक्कलकोट शहराच्या मध्यभागी राजवाडयाशेजारी आकर्षक दगडी इमारत बांधली . या हायस्कूलचे वांधकाम इ . स १८८६साली सुरू झाले व इ . स १८८८ ला पूर्ण झाले . ही शाळा आज 'शहाजी हायस्कूल' या नावाने ओळखली जाते .[८] संपूर्ण तालुक्यातील विदयार्थी तिथे आज शिक्षण घेत आहेत . शाळेसोवत त्यांनी मोठे वाचनालय सुरू केले ते आज ' शहाजीराजे वाचनालय' या नावाने ओळखले जाते . शहाजीराजांच्या या उल्लेखनीय कामगिरीवददल ब्रिटीश सरकारने

त्यांना 'हिज हायनेस' (His Highness) ही उपाधी वहाल केली होती .

महाराणी ताराबाई यांनी शहाजीराजांचा वारसा पुढे चालवला . त्यांनी आपल्या संस्थानाच्या हददीतील ५0 गावी प्राथमिक शिक्षणाची सोय केली, तिथे उत्तम शिक्षकांची नेमणूक केली . त्याचप्रमाणे राजधानीत (अक्कलकोटमध्ये) सेंट्रल स्कूल, गर्ल्स स्कूल, उर्दू स्कूल या शाळा सुरू केल्या .[९] मुलींच्या शिक्षणाकडे विशेष लक्ष दिले त्याकरीता त्यांनी राजवाडयाशेजारी 'प्रमिलाराजे गर्ल्स स्कूल' हि शाळा खास मुलींसाठी सुरू केली . मुलींनी शिकले पाहीजे असा त्यांचा आग्रह होता . शालेय शिक्षणावरोवरच गायन, भरतकाम, विणकाम इ . वर्ग सुरू केले . मागासवर्गीय विदयार्थिनींसाठी 'स्वतंत्र शिष्यवृती' सुरू केली .[१०] फत्तेसिंहराजेंची वहूजन समाजासाठी छात्रालय (वसतीगृह) सुरू करण्याची इच्छा होती, ती ताराराणींनी पूर्ण केली . त्यांनी १३ जूलै १८२७ रोजी 'श्री फत्तेसिंह मराठा वसतीगृह' या नावाचे वसतीगृह काढले .[११] मराठा म्हणजे महाराष्ट्रात राहणारा, या भूमीवर प्रेम करणारा असा अर्थ त्यांना अभिप्रेत होता . स्वातंत्र्यानंतर या संस्थानिकांच्या वारसांचे शैक्षणिक कार्य अखंडितपणे चालू आहे . जयसिंहराजे यांच्या पत्नी श्रीमती मृदुलाराजे यांनी त्यांचे तत्कालीन सेक्रेटरी कै . एम . पी . वागुल, व कै . सी . वी . खेडगी यांच्या सहकार्यायाने 'श्री . सी . वी . खेडगी सायन्स, श्री . राजा विजयसिंह कॉमर्स, व श्री . राजा जयसिंह आर्टस कॉलेज' स्थापन केले .

अक्कलकोट संस्थानातील पायाभूत सुविधांचा विकास ः

१ . पाणीपुरवठा ः

अक्कलकोट शहरात पाण्याची टंचाई होती . प्रजेला फार दुरून पाणी आणावे लागत असे . त्याकाळी प्रत्येक घरोघरी पाण्याचे हौद होते . पण अपुया पावसामुळे पाण्याची टंचाई भासू लागली . त्यावर उपाय म्हणून फत्तेसिंह महाराज (तिसरे) यांनी आपल्या स्वत:च्या मालकीच्या 'खासवाग' विहीरीतील पाणी जनतेला पाईपलाईनद्वारे उपलब्ध करून दिले . जसजशी लोकसंख्या वाढू लागली तशी ही योजना अपुरी पडू लागली . ही समस्या कायमस्वरूपी सोडविण्यासाठी त्यांनी बोरी नदीवर धरण बांधण्याचा विचार केला . त्यांच्या पश्चात राजमाता ताराराणी यांनी तत्कालीन सुप्रसिदध अभियंता 'श्री . विश्वेश्वरय्या' यांच्याशी चर्चा करून अक्कलकोट पासून ६ कि . मी . अंतरावरील 'सांगवी' गावाजवळ धरण बांधण्याचे निश्चित केले . हे काम कै . बाचल या अभियंत्याच्या देखरेखीखाली पूर्ण झाले .[१२] याकाळी धरण बांधण्यासाठी १0 ते १२ लाख रूपये खर्च झाला अशी नोंद आहे . याच धरणातून वीजनिर्मिती करून त्याकाळी नागरीकांना स्वस्त दरात वीज उपलब्ध करून दिली . ताराराणी यांनी अक्कलकोटवागदरी हा पूल बांधला . त्याकाळी बोरी नदीला सातत्याने पूर येत असल्याने अक्कलकोटवागदरी हा रस्ता बंद होत असे, म्हणून या नदीवर पूल बांधण्याचे ठरवले, हा पूल मे १९३८ ला पूर्ण झाला . पूलाची लांबी एक हजार फुट आहे .

२ . आरोग्य ः

अक्कलकोट संस्थानिकांनी त्यांच्या संस्थानांमध्ये दवाखाना सुरू केला होता . तज्ज्ञ डॉक्टरांची नेमणूक केली . त्यात प्रसतीगृह तसेच इतर सुविधा सुरू केल्या . आजही हा दवाखाना अक्कलकोट शहरात उत्तम रीतीने चालू आहे . ग्रामीण भागातही डॉक्टर उपलब्ध व्हावे अशी व्यवस्था श्रीमंत ताराराणी यांनी केली होती .

३ . औद्योगिक कार्य ः

अक्कलकोट संस्थानातील उद्योग वाढून आपली प्रजा सुखी व्हावी यासाठी श्रीमती ताराराणी यांनी प्रयत्न केले . आयातनिर्यात व्यापारावरील कर कमी ठवले . दळणवळणाच्या सोयी वाढवल्या, पक्के रस्ते तयार केले . ताराराणींनी अक्कलकोटमध्ये काडी पेटीचा कारखाना , ऑईल मिल , लक्ष्मी होजिअरी वर्क्स लिमिटेड अक्कलकोट नावाचा कारखाना सुरू केला . लक्ष्मी होजिअरी वर्क्स लिमिटेड या कारखान्यात लोकरी सुती कोट, स्वेटर्स, मफलर्स अशा वस्तू तयार होत असत . या उद्योगांमुळे अक्कलकोटमध्ये मोठया प्रमाणात रोजगार निर्माण झाला होता .[१३]

संस्थानातील इतर महत्वपूर्ण वास्तू ः

१ . श्रीमंत फत्तेसिंह महाराज (तिसरे) शस्त्रागार व संग्रहालय ः

फत्तेसिंह महाराजांनी हे संग्रहालय उभारले आहे . एका व्यक्तीने उभारलेले जगातील सर्वात मोठे संग्रहालय अशी याची ख्याती आहे . पुर्वी हे संग्रहालय शहराच्या मध्यभागी असणा-या जुन्या राजवाडयात होते . सध्या ते नवीन राजवाडयात स्थलांतरीत करण्यात आले आहे . फत्तेसिंह महाराज (तिसरे) यांनी दुस-या महायुध्दात इ . स १९१४ मध्ये इंग्रजाच्या वतीने लढताना अतुलनीय कामगिरी केली होती . या युध्दात ते इंग्रजांच्या वतीने फ्रान्समध्ये जमनीविरूध्द लढले .[१४] ते घोडदळाचे प्रमुख होते . त्यांची कामगिरी लक्षात घेऊन ब्रिटिश सरकारने त्यांना 'ऑनररी कॅप्टन' ही वहुमानाची पदवी वहाल केली . या युध्दातील कामगिरीवददल इंग्रजांनी ३ मशिन गन्स व ११0 वंदुका भेट दिल्या . फत्तेसिंह महाराजांनी निजामाच्या राज्यातून व विविध संस्थांमधून अनेक शस्त्र आणून त्यात भर घातली आहे . ही सर्व शस्त्रे या शस्त्रागारात ठेवण्यात आली आहेत .[१५] शस्त्रागारामध्ये विविध प्रकारच्या तलवारी,कटयारी, सु-या, वाघनखे , कुकरी, जंवीये, खंजीर, गुप्त्या, पट्टे, विचवे, चक्र, ढाली, धनुष्यवाण, भाले, अंकुश, परशु, पिस्तूल, वंदूका, राजफली, तोफा, शिंगडे, फरशीकु-हाडे इ . शस्त्रे ठेवली आहेत . या व्यतिरीक्त महाराजांनी शिकार केलेले प्राणी पेंढा व भुसा भरून जतन केले आहेत . यात वाघ, सिंह, हरीण, काळवीट, चित्ता, मगर, अस्वल इ . प्राणी आहेत . शहामृगाची अंडी ही जतन करून ठेवले आहेत .[१६]

२ . मनोहर कारंजा ः

संस्थानकालीन अक्कलकोटचे नंदनवन ठरलेले तारामाता उद्यान आजही आहे . या उद्यानात १०५ वर्षाचा ऐतिहासिक वारसा लाभलेला आकर्ष क कारंजा उभा आहे . तत्कालीन नरेश शहाराजीराजे मालोजीराजे भोसले यांच्या स्मरणार्थ उद्यान साकार करून कारंजा उभा करण्यात आला आला होता . ब्रिटिश सरकारने शहाजीराजांनी केलेल्या जनहिताच्या कामाची दखल घेऊन सुंदर कारंजा अक्कलकोटला पाठविला होता . ब्रिटिश राजदुत ए . एस मेकॅनिक (आय . पी . एस) यांच्या उपस्थितीत १८९९ मध्ये हा कारंजा बसवला गेला .[१७] तारामाता उद्यानात श्रीमंत ताराराणी यांचा पुतळाही आहे . पुतळयाखाली त्यांच्या कार्याचा उल्लेख केला आहे . ताराराणीच्या कार्याची प्रशंसा करताना त्यांना ब्रिटिश सरकारचे तत्कालीन मुंबई ईलाख्याचे गव्हर्नर लॉर्ड ब्रॅबोर्न यांनी 'कैसर ई हिंद' हा किताव देऊन गौरव केला होता , त्यांच्या पुतळयाचे उदघाटन दि . ११ मे १९५१ साली तत्कालीन मुंबई इलाख्याचे राज्यपाल श्री . डी . आर . घोंगडे यांच्या अध्यक्षतेखाली झाले, याचा उल्लेख पुतळयाखाली असणा-या कोनशीलेवर आहे .[१८]

सारांश ः

भारतातील सर्व संस्थानिक हे ब्रिटिशधाजिर्णे (Pro-British) होते, किंवहुना तसे असणे त्यांना भाग होते . अक्कलकोट संस्थान ही त्यास अपवाद नव्हते . असे असले तरी, येथील संस्थानिकांनी प्रजेच्या हितासाठी अनेक विकासकामे केली होती . ब्रिटिशांच्या अंमलाखाली संस्थानात दळणवळणाची साधने, रस्ते, पोस्ट व तार ऑफिसची व्यवस्था केली, अभिमान वाटवा अशा सार्वजनिक इमारती व संस्था केल्या गेल्या . हे सर्व ब्रिटिश राज्यकर्ते व भोसले राजे यांच्या संयुक्त परिश्रमाचे फळ म्हणता येईल . स्वातंत्र्योतर काळातही त्यांनी भारत सरकारला सहकार्य केले . भविष्यातही त्यांचा वैभवशाली भुतकाळाची गाथा गाईली जाईल . यापुढे संशोधकांना या घराण्याच्या अभ्यासाची साधने अक्कलकोटच्या संग्रहालयात विपुल प्रमाणात उपलब्ध आहेत, फक्त त्यांच्या अभ्यासाकडे लक्ष देणे गरजेचे आहे .

संदर्भ आणि टीपा ः

१) श्रीपादशास्त्री किंजवडेकर , ' श्री स्वामी चरित्र ',

२) तात्यासाहेब घाटगे , 'अक्कलकोट संस्थानाचे मानकरी ', अप्रकाशित ग्रंथ कच्चा आराखडा पृ . क . ६

३) कित्ता , पृ . क . ९

४) मुकुंद कुळे , 'चित्रलेखा साप्ताहिक ', दि १७ जाने २००५ पृ . क . १८

५) अ . रा . कुलकर्णी , ' महाराष्ट्र समाज आणि संस्कृती ', डायमंड पब्लिकेशन , पुणे , प्रथमवृत्ती , मे २००८ पृ . क . १३१

६) लक्ष्मण शास्त्री जोशी (संपादक) 'मराठी विश्वकोष खंड १' महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई १९७६ . पृष्ठ क . ९१

७) तात्यासाहेब घाटगे, उपरोक्त पृ . क . १३

८) कित्ता, पृ . क . १३

९) पहा सोबत जोडलेला शाळेच्या नामफलकाचे छायाचित्र क . ४

१०) तात्यासाहेब घाटगे, उपरोक्त पृ . क . २२

११) कित्ता, पृ . क . २२

१२) कित्ता, पृ . क . २५

१३) कित्ता, पृ . क . २३

१४) मुकुंद कुळे, उपरोक्त पृ . क . १८

१५) तात्यासाहेब घाटगे उपरोक्त पृ . क . २६

१६) या संस्थानच्या शस्त्रागारातील वंदुकीची पहाणी करताना असे दिसले की ब्रिटीशांनी या वंदुका त्यांच्या विरूध्द वापरता येऊनये म्हणून वंदूका अशा पध्दतीने कापल्या आहेत की ज्यामुळे दाव तयार होऊन गोळी उडत नाही . यावरून ब्रिटिशांची दूरदृष्टी दिसून येते . अक्कलकोट संस्थानातील ' फत्तेसिंह शस्त्रागार व संग्रहालय' येथील भेटीत ही शस्त्रे संग्रहालयाच्या या सहकार्याबद्दल लेखक त्यांचा आभारी आहे .

१७) सदर शोधनिबंधामध्ये हे छायाचित्र जोडले आहे . (छायाचित्र क . १, २, ३, ४)

१८) पहा छायाचित्र क . ३

41. Mission Kolhapur

Dr. B. S. Mali,
Assistant Professor,
K.N.P.CollegeWalwa.
Tal Walwa, DistSangli

19th century makes landmark in the socio-cultural life of Indian society. The Charter act of 1913, permission granted to missionary to work in Indian society and various sects of the missionary's arrival in India. Their work of missionaries made impact on the society and galvanize the mind of Indian society. There is doubt of the Indian cultural has great background of great values of human life, but due to some orthodoxy Indian society made unwanted values which were not developed the national developing attitude. The society of Indian divided on the birth right. Due to this right various barriers imposed on the selected class. Once upon time Indian society was developed by the values and other part of the human life. The source of the progression utilized very liberally. But the orthodoxy of the priest class develops the birthright concept and the progression of the Indian society was stop. The activities of priest class badly impacted on the Indian society. Some practices like child marriage, polygamy, untouchably, prohibition of education for particular class were usually used and expected in the society. So the condition of the Indian society was travel in the Dark Age.

The missionaries played great role to develop the Indian society but some social development also took place in the Kolhapur state. In 1841 the sati prohibition act was issued by the Kolhapur state.[1] after the declared this act, not single issue happened in the Kolhapur state. It was sign that society of Kolhapur wanted the social development.The example shows that the society of the Kolhapur was under the development before the arrival of the missionaries. Usually its clam that the new vision of the human life shows by the missionaries but its nit correct. Indian people had the human philosophy.

Missionaries at Kolhapur :

In the early period of Nineteenth century three missions were working in the Kolhapur State. American Presbyterian Mission, Roman Catholic and the society for the propagation of the gospel.[2]The foreign mission of the American Board set up in the Kolhapur up to 1810. The Bombay Missions Mr.Gorden Hall and Samuel Nott were arrival in Bombay in 1834. Until 1882 this Bombay mission known as Kolhapur mission. This mission selected area of Kolhapur and sangli.[3]

American Marathi mission sent Rev. royal Gould Wilder in 1846. He chooses the Kolhapur princely state for his missionary work and hi arrived in December 1852. He was first missionary came into the Kolhapur. Near *Rankala*area there was a military camp where was he lived.[4] firstly he started his work with preaching the Christian religion. His preaching of Christian religion values could not accepted the *Brahmin*community of the Kolhapur. They tried to appose to the preaching of the Rev. wilder. That peoplesend petition against this work to the Bombay Governor by political Agent of Kolhapur. But the Governor of Bombay denied the demand of the Kolhapur opponents group and replied that, "Christian missionaries must be given the same rights and privileges as a member of the other religion".[5]

The decision of the Bombay Governor made free to Rev. Wilder for his work. Was the work of Rev Wilder start without any trouble? No absolutely not. The Governor of Bombay what said in his decision that was not accepted by the opponents group of Kolhapur? They again tried to make trouble in the work. That group asked that about the miracle. The mentality of the people was that the religion can not stand without the miracle. Rev Wilder replied very wisely to this people, said that 'in future the *Maharas* and *Brahaminies* people will take food together.[6]this answer could not be accepted by the opponent class. They treated his statement as fun. The answer of the Rev. Wilder was to shows that the cultural changes should be changes in the State of Kolhapur. The philosophy of the protestant Christian is that all men are equal and should be treated as an equal level in the society.

Constructive work :

Rev. Wilder starts the settlement for the work of missionary. He was first person who established the first church in the Kolhapur. He purchased the land and constructed the church for preaching and prayer. The length of the church was 50 × 32 feet. He visited the deep and remote area of Kolhapur state with help of bullock cart and walking. He tried to present the literature of Christianity. But the response of the people was not good. He came to know that the why the people refused the literature. There was illiteracy among the people where they could not read properly. He observed the social calamity of illiteracy. Then he turned towards the educational development.

The statues of education were very poor in state of the Kolhapur. In the year of 1848 the population of the state was forty four thousands. The Kolhapur *Darbar*started four schools at *Kolhapur, Panhala, Alate and Shirol*. In these four schools, only twelve boys were admitted. There was no single school for Girls. The educational condition was very poor of the Kolhapur state. Rev. Wilder takes help of Ruler of Kolhapur IVShivaji alias *Babasaheb Maharaj*.[7] His two sisters *Aubai*and *Balabai*who helped Rev Wilder to start the school. This was first Girls school in the Kolhapur state. Rev wilder stated about the educational condition of

Kolhapur state that, 'Vain will be the attempt to reserve man from the ruin and desolation which Hinduism creates. If women still left to men's charities…… only Christian education can take the Hindu females out of the lowest depth of degradation and sorrow. Which the human mind and human heart can know, and elevate them to the dignified and blissful sphere for which God creates her.[8] Rev. wilder keenly observed the educational statues of women in the Indian society. He blame on the staunch Hinduism who made barriers to the women for every liberty for her social development. That is why he said about the Christian education is only solution to emancipation of women. The work of these missionaries impacted on the ruler of the Kolhapur state. The ruler of Kolhapur State *BabasahebMaharaj* granted thirty acres land to the educational work.[9]

Here we can discuss the one point is that the ruler very well aware of the missionary and their preaching work which was dislike by some people of Kolhapur even that this people also made appeal to Governor of Bombay against the missionary work. Then why *BabasahebMaharaj*supported this missionary work? This point can be discussed on some points. First is that *BabasahebMaharaj* was well aware about the education statues of his state that is why he permitted the open the school in his palace. Second is that his vision could be that to no interruption to missionary work because this work supported by the British Government. If he tried to show the dislike of the missionary that could be loss the sympathy of British Government. So on the one side he wants change of made the progress of Kolhapur and another is that the rule of British. Was the *BabasahebMaharaj* under the pressure of Government? The answer is yes. He was under the pressure or under the dominance of Government. We can see the role of him in 1857 mutiny of Kolhapur. He never supported to this mutiny he was neutral.

He was well aware about another thing was that to show the dislike openly or opposed to missionary work in the state could accepted by British Government? So this could be making trouble to the state or his, own existence. So that was better to avoid the trouble and change the society of Kolhapur state through new philosophical attitude he supported the missionary work. Rev. Wilder constructed building for school, boarding and chapel. He tried to raise the funds for this work so he went to America and came back in 1861. After his arrival he saw that the church building in market area was sold to Muslim community. Meanwhile the American Mission closed his work. So Rev wilder went to America in 1861 to have his own mission. In his absence in Kolhapur A.P Mission sent two missionaries, Rev. G. W. Selier and Rev. Joseph Graham in 1870. In 1871 Wilder came back to Kolhapur and in 1873 he established Kolhapur Presbyterian Mission.[10]

Thework of his mission he started with purchased some lands. He purchased lands at *Kolhapur, Panhalaand WaranaKodoli.* The revenue officer of the revenueofficer of the*Rukdi*reported some problems to the *KohapurDarbar* in 1905. This report found in two sections made by the Chief Revenue Officer of Kolhapur State. It was submitted to the *Diwan*of Kolhapur two times first on 20th October 1905 and another on 18th November 1905. In his report he gave information about the land purchasing by the missionaries[11]. The present report said that there was no any document in the record office.

The report shows that which land purchased and how they were using. By this report we get the idea of the missionary work.

Kolhapur:-

1) RavivarPeth: Miss Grace Wilder, daughter of Rev Wilder purchased in 200/Rs in 1892 and donated to mission in 1897. Now it's using for the Girls school.

2) ShukarwarPeth: In 1905 mission purchased for religious activities. Now it's using for the Boys school.

3) SomwarPeth: In 1862 it was purchased by Rev Wilderfor American Mission. Now it's using for the Prayer House.

4) Near Market: In 1893 it was purchased. Now it's using for the reading Room And young Men Christian Association.

Panhala Kasaba :

The repot said that, the building purchased before 20 years ago. The present report made in 1905. This building could have beenpurchased in 1885. Now it's using for the Prayer house.

Kodoli :

At *Kodoli*two sides were purchased by the American mission.

a) Purchased before 15 years. It could have been purchased in 1885. Now it's using for the Medical Dispensary.
b) Purchased land and constructed building for boarding and school.

The report gave some idea of missionary work in the Kolhapur state. They devotedly work for the social development and that was missionary social movement. Generally people criticized on the missionary work but their method of work for the uses of the Kolhapur community. Any social movement brings out the changes of society. Missionary were also looking towards development or the changes by the educational development. The educational statue of the Kolhapur state was poor so the particular educational and medical field chooses by this missionary. Education is the main instrument to change the society attitude that can be used against fight with social evils.

Conversion :

The nature of work of missionaries was that the religious preaching and social facilities. The Christian religion based on the

social service. One side they strongly preaching the Gospel, and another side they made educational and medical facilities. In the state of Kolhapur how the Christian community grown? Defiantly by this missionary baptized the other religion people.

The first conversion happened in Kolhapur state, it done by Rev wilder. He baptized *GovindAppaChavhan* belong to *Maratha* community and *Savitribai* belong to *Mahar*community on 5th April, 1857. *Subhabai* was baptized in 1863.[12]The Christian community was grown up in the Kolhapur state. In the year 1863 the 51 members were baptized. In the year 1865 some members of *Jamadar*and *Thakur* family baptized. Rev wilder went to America in 1875, and in his absence, Rev.Ghooen and his wife came to Kolhapur in December 1875. To help the missionary work in the state of Kolhapur Rev G. S. Ferris and his wife came on January 1879 and Eshter Patton came in December 1880. Rev Ghooen baptized 196 people of the *Vadgoan* on 19th November 1880.[13] Baptism was that crime against the any religion? The particular religious leaders can be criticized against these activities. But one point can be discussed that Christian religion was not original in this country, which religion was the originally found in India? Second thing is that was that any crime to learn about new religion which based on the humanity and social service? Absolutely not, But that was the right attitude of the non-Christian persons to learn other religion and accept the new philosophy. If it is true that in those days the new philosophy was in the Christianity then why people were against? That was problem of the vision. The opponent group could not understand the activities for the social changes. That was not their fault then why they opposed? They opposed due to the lack of education and their custom for the long time. So it can be in any society. Then point is that who were accepted the Christianity? When we see the Indian religion mainly *Hindu Dharma* accepted*Chaturvarna*system and it was strictly followed from very long time. In this system who were suppressed and depressed classes accepted Christianity. That was their rite to live any religion.

Educational Work :

The missionary of the Kolhapur mission concentrated on the work of educational work, especially female educational. The tradition of Indian society looking towards the female was very narrowly. The belief of the people was 'Girls and buffalos were mentally on the equally foot.[14]

There was no single school for Girls in the whole state of Kolhapur until missionary started. Rev Wilder felt the need and started the first Girls school with 49 Girls.[15]

That was beginning of female education in the Kolhapur state. Mrs. Ferris set up girl's school at *Panhala* in 1881. She paid one pice to girls, to include them attaining the school.[16]MrGhoon opened orphan house in 1887 and another orphan house in 1900. For the girls where 175 girls took shelter. This orphan house leads the Esther Patton girl's school in the Kolhapur. The wife of Political agent gifted the building where Esther Patton was principal, later the school was renamed as Esther Patton girls School

The missionaries of the Kolhapur mission started the school for boys also. Rev. Wilder taught English in the state of Kolhapur from 1852 to1869. That was root foundation of the Irwin Christian High school of Kolhapur.[17] That school was moved to the morning side bungalow in 1871. In this school again the cast problem came into occur. The higher cast student's denied to learn with lower cast students. Missionaries refused that demand of upper class students. Finally the school was closed in 1875.[18]Again Rev. Selier started boy's school in 1885. Rev J.M. Irwin took charge in 1890 but due to the poor enrolment that school was closed. Same thing happen in 1906. In 1911 mission actively took charge and appointed Dr. WillamWanless, Rev. W. Hannumand Rev. E.W. Marshall in 1912.[19]Missionary were strongly supported to educational work. The ruler of Kolhapur state R. C. Shahu donated 32 acres land to the boy's school. Later on that school flourished and it's renamed as Irwin Christian Highschool.

The missionaries were started industrial education for the sake of common people. They try out some project on the industrial education at *Kodoli.* They started courses for the cotton and wool weaving, rope making, paper making, and carpenters courses started by the mission.[20]

In 1920 mission started some vocational courses and agricultural courses. R. C Shahu decided to ten scholarships for the deserving students.[21]this courses help to common people to develop theirlife.

Work at Kodoli Station

Kodoli was a small village near *Panhala*made out station of *Panhala*for mission work. Rev. Ferris took over charge the *kodoli* station on 1stAugust 1882 [22] He purchased 14 acres land and started hut school for the poor students belonging to *Kodoli* and surrounding areas students.Mission also started the hostel; it's grown up under the guidance of Miss Brown. She collected some donation for the hostel. Later the hostel was named as Brown Alice Home.[23]

Miss Brown went to America and the charge was taken up by rev Howerd as principal of this school. Due to hard work of the missionary and the society accepted the educational need the school was flourished. Soon, the enrolment of primary and secondary students reached up to 600. This school was known as *Kodoli*community school.

Rev. Howard preached into various villages. He had friendly relation with the renowned doctor of *Miraj*Dr. Whele. With the help of Dr. Whele Rev Howard arranged free medical camps in *Kodoli* and various villages.Heworks for the preaching and education for 50 years in this area.

Medical Facilities :

Dr. Wanless was father of medical development of *Kolhapur* and *Miraj.*Medical facilities became need of common, poor and especially lower cast people.DrWanless and his wife Mary served together. Unfortunately she passed away very short time.

R.C. *ShahuMaharaj* strongly supported to this work. Maharaj donated Hospital building to the mission. The letter dated 23rd January 1909 of the *Kolhapur Darbar* declared that the medical facilities should be given specially for common and lower cast people.[24] The mission sent another Dr. Mac Aurther to Kolhapur who spend more then one decade to serve the poor people.[25]

Panhala Kasaba:

The repot said that, the building purchased before 20 years ago. The present report made in 1905. This building could have beenpurchased in 1885. Now it's using for the Prayer house.

Kodoli:

At *Kodoli*two sides were purchased by the American mission.

a) Purchased before 15 years. It could have been purchased in 1885. Now it's using for the Medical Dispensary.

b) Purchased land and constructed building for boarding and school.

The report gave some idea of missionary work in the Kolhapur state. They devotedly work for the social development and that was missionary social movement. Generally people criticized on the missionary work but their method of work for the uses of the Kolhapur community. Any social movement brings out the changes of society. Missionary were also looking towards development or the changes by the educational development. The educational statue of the Kolhapur state was poor so the particular educational and medical field chooses by this missionary. Education is the main instrument to change the society attitude that can be used against fight with social evils.

Conversion :

The nature of work of missionaries was that the religious preaching and social facilities. The Christian religion based on the social service. One side they strongly preaching the Gospel, and another side they made educational and medical facilities. In the state of Kolhapur how the Christian community grown? Defiantly by this missionary baptized the other religion people. The first conversion happened in Kolhapur state, it done by Rev wilder. He baptized *GovindAppaChavhan* belong to *Maratha* community and *Savitribai* belong to *Mahar*community on 5th April, 1857. *Subhabai* was baptized in 1863.[12]The Christian community was grown up in the Kolhapur state. In the year 1863 the 51 members were baptized. In the year 1865 some members of *Jamadar*and *Thakur* family baptized. Rev wilder went to America in 1875, and in his absence, Rev.Ghooen and his wife came to Kolhapur in December 1875. To help the missionary work in the state of Kolhapur Rev G. S. Ferris and his wife came on January 1879 and Eshter Patton came in December 1880. Rev Ghooen baptized 196 people of the *Vadgoan* on 19th November 1880.[13] Baptism was that crime against the any religion? The particular religious leaders can be criticized against these activities. But one point can be discussed that Christian religion was not original in this country, which religion was the originally found in India?

Second thing is that was that any crime to learn about new religion which based on the humanity and social service? Absolutely not, But that was the right attitude of the non-Christian persons to learn other religion and accept the new philosophy. If it is true that in those days the new philosophy was in the Christianity then why people were against? That was problem of the vision. The opponent group could not understand the activities for the social changes. That was not their fault then why they opposed? They opposed due to the lack of education and their custom for the long time. So it can be in any society. Then point is that who were accepted the Christianity? When we see the Indian religion mainly *Hindu Dharma* accepted*Chaturvarna*system and it was strictly followed from very long time. In this system who were suppressed and depressed classes accepted Christianity. That was their rite to live any religion.

Educational Work :

The missionary of the Kolhapur mission concentrated on the work of educational work, especially female educational. The tradition of Indian society looking towards the female was very narrowly. The belief of the people was 'Girls and buffalos were mentally on the equally foot.[14] There was no single school for Girls in the whole state of Kolhapur until missionary started. Rev Wilder felt the need and started the first Girls school with 49 Girls.[15]

That was beginning of female education in the Kolhapur state. Mrs. Ferris set up girl's school at *Panhala* in 1881. She paid one pice to girls, to include them attaining the school.[16]MrGhoon opened orphan house in 1887 and another orphan house in 1900. For the girls where 175 girls took shelter. This orphan house leads the Esther Patton girl's school in the Kolhapur. The wife of Political agent gifted the building where Esther Patton was principal, later the school was renamed as Esther Patton girls School. The missionaries of the Kolhapur mission started the school for boys also. Rev. Wilder taught English in the state of Kolhapur from 1852 to1869. That was root foundation of the Irwin Christian High school of Kolhapur.[17]

That school was moved to the morning side bungalow in 1871. In this school again the cast problem came into occur. The higher cast student's denied to learn with lower cast students. Missionaries refused that demand of upper class students. Finally the school was closed in 1875.[18]Again Rev. Selier started boy's school in 1885. Rev J.M. Irwin took charge in 1890 but due to the

poor enrolment that school was closed. Same thing happen in 1906. In 1911 mission actively took charge and appointed Dr. WillamWanless, Rev. W. Hannumand Rev. E.W. Marshall in 1912.[19]Missionary were strongly supported to educational work. The ruler of Kolhapur state R. C. Shahu donated 32 acres land to the boy's school. Later on that school flourished and it's renamed as Irwin Christian Highschool. The missionaries were started industrial education for the sake of common people. They try out some project on the industrial education at *Kodoli.* They started courses for the cotton and wool weaving, rope making, paper making, and carpenters courses started by the mission.[20] In 1920 mission started some vocational courses and agricultural courses. R. C Shahu decided to ten scholarships for the deserving students.[21]this courses help to common people to develop theirlife.

Work at Kodoli Station:

Kodoli was a small village near *Panhala*made out station of *Panhala*for mission work. Rev. Ferris took over charge the *kodoli* station on 1st August 1882 [22] He purchased 14 acres land and started hut school for the poor students belonging to *Kodoli* and surrounding areas students.Mission also started the hostel; it's grown up under the guidance of Miss Brown. She collected some donation for the hostel. Later the hostel was named as Brown Alice Home.[23] Miss Brown went to America and the charge was taken up by rev Howerd as principal of this school. Due to hard work of the missionary and the society accepted the educational need the school was flourished. Soon, the enrolment of primary and secondary students reached up to 600. This school was known as *Kodoli*community school. Rev. Howard preached into various villages. He had friendly relation with the renowned doctor of *Miraj*Dr. Whele. With the help of Dr. Whele Rev Howard arranged free medical camps in *Kodoli* and various villages.Heworks for the preaching and education for 50 years in this area.

Medical Facilities :

Dr. Wanless was father of medical development of *Kolhapur* and *Miraj*.Medical facilities became need of common, poor and especially lower cast people.DrWanless and his wife Mary served together. Unfortunately she passed away very short time. R.C. *ShahuMaharaj* strongly supported to this work. Maharaj donated Hospital building to the mission. The letter dated 23rd January 1909 of the *Kolhapur Darbar* declared that the medical facilities should be given specially for common and lower cast people.[24] The mission sent another Dr. Mac Aurther to Kolhapur who spend more then one decade to serve the poor people.[25]

Ref :1 K. A. Shinde, History of Kolhapur state 1838AD To 1849 AD (unpublished Ph.D, Thesis) Shivaji University Kolhapur P.141

2 A. M. Sutar, Christianity In the Western Maharashtra in the ninetieth century AD (unpublished Ph.D, Thesis) Shivaji University Kolhapur P.42

3 Western India Notes, A Publication of Kolhapur Church Council, (American Presbyterian) A Western India, April 1953, Vol. XXXVI, P 24

4 M. D. David, Mission-Cross-Cultural Encounter And Changes In Western India.ISPCK,Delhi,2001, P.42

5 M. D. David. P.115

6 V. A. Bedekar, *Wilder Memorial ChurchchaItihas*, wilder Memorial Church Kolhapur 1953. P.4

7 V. A. Bedekar, P.4

8 A. M. Sutar P.181

9 M. D. David. P.121

10 Ibid P. 118

11 Kolhapur Archives, General file No 264, letter dated 12th December 1905.

12 V. A. Bedekar, P.5

13 A. M. Sutar P.117

14 M. D. David. P.115, 128, 130, 132, 134.

15 Western Indian Notes, April, 1962, P.27

17 Western India Notes- July 1956, Vol X XXX IX, P. 8

16 Western India Notes, July 1961, Vol XXX IX, P. 8

17 Western India Notes, December, 1944, Vol XXV,P. 26

18 A. L Willy, 'Kodoli Station', Western India Notes, , Vol IX No, 6th Auguest,19286, P. 6

19 Howerd (Mrs) A. H, *'AmranSuvartik'(Marathi)*Miraj Howerd Publication,1992, P.16

20 Kolhapur Archives, General file No 110.

21 M. D. David. P.134.

22 Rev.R.G.Wilder, Mission Schools In India Of American Board Of Missioanaries, New York, 1861.P.No 255

23 Ibid, P.No 265

42. कोल्हापूर संस्थानातील राजर्षी छत्रपती शाहू महाराज सामाजिक लोकशाहीचे आधारस्तंभ

प्रा. विनायक केरबा कांबळे
इतिहास विभाग, राजेंद्र महाविद्यालय,
खंडाळा. ता. खंडाळा, जि. सातारा

प्रस्तावना :—

आधुनिक भारताचा इतिहास म्हणजे केवळ ब्रिटिश भारताचा इतिहासच अभ्यासला जातो. सन १८५८ च्या राणीच्या जाहीरनाम्याने संस्थानिकांचे खालसा धोरण थांबविण्यात आले. म्हणून आधुनिक भारताचा अभ्यास करत असताना ब्रिटिश भारत व संस्थानिकांचा भारत यांचा अभ्यास करावा लागतो.या काळात भारतात एकूण ५६५ संस्थानिक अस्तित्वात होते. त्यापैकी ५६२ संस्थानिक भारताला स्वातंत्र प्राप्त झाल्यानंतर भारतात विलिन झाले. तर उर्वरित ३ संस्थानिक पाकिस्तान मध्ये विलिन करण्यात आले. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी स्टेट ॲण्ड मायनॉरिटिज या ग्रंथामध्ये एकूण संस्थानिकांची संख्या ६२९ असे सांगितले आहे.डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी संस्थानिकांची सांगितलेली संख्या अभ्यासपूर्ण, माहितीच्या आधारे दिली आहे.असे अनेक इतिहासकारांचे मत आहे. या संस्थानिकांपैकी सर्वात मोठे संस्थान म्हणजे हैदराबादच्या निजामाचे संस्थान होय.त्याकाळातील प्रमुख संस्थानापैकी हैदराबाद, जुनागड व काश्मिर या संस्थानिकांनी कोणत्याही संस्थानिकांत सहभागी न होण्याचे धोरण स्वीकारले.परिणामी सरदार वल्लभभाई पटेल यांनी हैदराबाद मध्ये पोलिस कारवाई केली. जुनागड मध्ये सार्वमत घेण्यात आले.तर काश्मिर हा प्रांत भारतात विलिन करण्यासाठी लष्करी कारवाई करावी लागली. दक्षिण भारतातील संस्थानिकांचा आढावा घेत असताना त्यात एकूण १८ संस्थानिकांचा समावेश होता.या १८ संस्थानिकांपैकी सर्वात मोठे संस्थान म्हणजे कोल्हापूरचे संस्थान तर सर्वात लहान संस्थान म्हणजे वाडीचे संस्थान होय.या वाडीच्या संस्थानामध्ये केवळ दोन गाव मोडत होते तर कोल्हापूरच्या संस्थानचे वार्षिक उत्पन्न १५ लाख रू. होते. अशा दक्षिणेतील सर्वात मोठया संस्थानाचा अभ्यास सामाजिक दृष्टीकोणातून या शोध निबंधात करण्यात आला आहे. या संस्थानिकातील सर्वात कर्तृत्ववान व आधुनिक महाराष्ट्राचा शिल्पकार म्हणून ज्यांचा उल्लेख केला जातो अशा राजर्षी छत्रपती शाहु महाराज सामाजीक लोकशाहीचे आधारस्तंभ या दृष्टीकोणातून त्यांच्या सामाजिक कार्याचा आढावा घेण्यात आला आहे.

कोल्हापूर संस्थानचा पूर्व इतिहास :—

महाराष्ट्राच्या इतिहासात १७ व्या शतकाला अनन्य साधारण असे महत्व आहे. छ.शिवाजी महाराज यांनी महाराष्ट्रात हिंदवी स्वराज्याची स्थापना करून रयतेचे राज्य निर्माण केले. या स्वराज्याला सामाजिक धार्मिक आधिष्ठान प्राप्त करून देण्यासाठी ०६ जून व २४ सप्टेंबर १६७४ रोजी दोन राज्याभिषेक केले. त्यामुळे भोसले घराण्याच्या राज्याला वंशपरंपरागत अधिकार प्राप्त झाले. ही घटना मराठयांच्या इतिहासातील पर्यायाने भारताच्या सामाजिक इतिहासातील एक महत्वपूर्ण घटना म्हणून ओळखले जाते. छ.शिवाजी महाराज (१६३० ते १६८०) छ.संभाजी (१६८० ते १६८९) व राजाराम महाराज (१६८९ ते १७००) राजाराम महाराजांच्या निधनानंतर हिंदवी स्वराज्याचे जतन महाराणी ताराबाई १७०० ते १७०७ पर्यंत मराठयांचा सर्वात मोठा शत्रु असणा—या मोगल सत्तेकडून केले. २४ एप्रिल १७०७ मध्ये औरंगजेबाच्या मृत्युनंतर संभाजी पुत्र शाहु यांचे मोगलांच्या कैदेतुन मुक्तता करण्यात आली. व १७०८ च्या खेडच्या लढाईत शाहु पक्षाने महाराणी ताराबाई यांच्या सैन्याचा पराभव केला. व यातुन मराठी सत्तेचे दोन सत्ता केंद्रे निर्माण झाली. त्यापैकी १७१० मध्ये महाराणी ताराबाई यांनी आपल्या राजधानीचे ठिकाण कोल्हापूर केले. तर छ.शाहुने राजधानीचे ठिकाण सातारा केले.

भारतातील संस्थानिकांचा इतिहास :—

१५२६ च्या पानीपत च्या पहिल्या युध्दाने भारतात मोगल घराण्याची स्थापना झाली. व अल्पावधीतच संपूर्ण भारतभर साम्राज्यविस्तार केला. मोगलघराण्यातील शेवटचा कर्तृत्ववान बादशहा औरंगजेबाचा उल्लेख केला जातो.औरंगजेबाच्या मृत्युनंतर मोगल साम्राज्याला उतरती कळा लागली. याचाच फायदा घेवून अनेक छोटी छोटी राज्ये भारत भर निर्माण झाली. ती आपसात सतत भांडत असत.याचाच फायदा घेवून ईस्ट इंडिया कंपनीने भारतात १७५७ च्या प्लासीच्या युध्दाने कंपनीच्या राज्याचे मुहूर्तमेढ रोवली. तर १७६४ च्या बक्सारच्या युध्दाने त्यांच्या राज्याला बळकटी प्राप्त करून दिली.तत्कालीन भारतातील राज्यापैकी कंपनीचे राज्य एक प्रमुख राज्य म्हणून त्याची गणना होवू लागली.सुरूवातीच्या काळात कंपनी सरकारने हैदराबाद चे निझाम,पेशवे, म्हैसूरचे टिपू सुल्तान, वजिरेआलम शाहसुजा इ. त्यांनी जाणीव पुर्वक मैत्री प्रस्तापित केली. लॉर्ड वेलेस्ली ने तैनाती फौजेचा स्वीकार करण्यात या संस्थानिकांस भाग पाडले.तर लॉर्ड हेस्टिंग्ज ने १८१३ ते १८२३ या कालावधीत ३१० संस्थानिकांवर तैनाती फौज लादली. १८४८ ते १८५६ या काळात लॉर्ड डलहौसी ने खालसा धोरणाचा अंगिकार करून अनेक संस्थानिके खालसा केली. १८१८ ला पेशवाई, १८४८ ला सातारा, झॉसी, नागपूर, संभलपूर इ. संस्थानिके खालसा केली व यातुनच १८५७ चा बंड घडुन आले. १८५८ च्या राणीच्या जाहीरनाम्याने ब्रिटीश साम्राज्याचा विस्तार व भारतीय धर्मातील ढवळाढवळ बंद करण्यात आली.ईस्ट इंडिया कंपनीची राजवट समाप्त करून भारतात ब्रिटिश राजपदाच्या मार्फत राज्यकारभारात सुरूवात झाली. १८६० मध्ये लॉर्ड कॅनिंग ने असे सूचित केले कि ब्रिटिश सत्ता ही भारतातील सर्वोच्च सत्ता आहे तर १८७२ मध्ये लॉर्ड लिटन ने इंग्लंडच्या राणीला कैसर हिंद हा खिताब देवून भारताचे सम्राटपद दिले.संस्थानिकांच्या अंतर्गत कारभारात हस्तक्षेप करण्याचा अधिकार ब्रिटिश सत्तेला आहे असे जाहिर केले. राष्ट्रीय सभेच्या स्थापने नंतर ब्रिटिश सत्तेने १९०५ पासून संस्थानिकांशी मैत्रीपूर्ण संबंध प्रस्तापित केले.परिणामी १९१४ ते १९१९ या पहिल्या महायुध्द काळात संस्थानिकांनी इंग्रजांना सर्वोतोपरी सहकार्य केले.१९२१ मध्ये संस्थानिकांचे नरेंद्र मंडळ स्थापन केले. १८५५ मध्ये तैनाती फौजेच्या खर्चासाठी हैदराबादच्या निझामाने व—हाड प्रांत ब्रिटिशांना दिला. १९२६ मध्ये निझामाने लॉर्ड रिडिंग कडे व—हाड परत मागितले असता सर हरलोक बटलर समिती गठित केली. व या समितीच्या अहवालानुसार ब्रिटिश सत्ता ही भारतातील सर्वोच्च सत्ता असल्याचे घोषित केले. १९३५ च्या कायद्याने संस्थानिकांना कायदेमंडळात ३३ टक्के प्रतिनिधित्व दिले. अशा पध्दतीने ब्रिटिशांनी भारतीय संस्थानिकात कॉग्रेसचा प्रचार आणि प्रसार विरोधी भूमिका घेतली.

राजर्षी शाहू महाराज सामाजिक लोकशाहीचे पुरस्कर्ते:—

कोल्हापूर संस्थानातील राजर्षी शाहू महाराज यांचा जन्म २६ जुलै १८७४ रोजी आबासाहेब घाटगे व राधाबाई यांच्या पोटी झाला. लहानपणी त्यांचे नांव यशवंत असे होते. कोल्हापूर संस्थानाचे संस्थानिक चौथे शिवाजी यांच्या निधनानंतर महाराणी आनंदीबाई यांनी आबासाहेब घाटगे यांचा यशवंत मुलगा १७ मार्च १८८४ रोजी दत्तक घेतला. व त्यांचे नांव शाहु असे ठेवण्यात आले. त्यांच्या शिक्षणाची व्यवस्था मुंबईच्या गव्हर्नर ने केली. १८८४ ते १८९४ या दरम्याने महाराजांनी फ्रेजर यांच्या मार्गदर्शनाखाली पाश्चात्य भाषा,इतिहास,ज्ञान व विज्ञान आत्मसात केला. ०२ ऑक्टोबर १८९४ रोजी त्यांचा राज्याभिषेक करण्यात आला.१८९४ ते १९२२ पर्यत च्या त्यांच्या अनेक सामाजिक सुधारणा मुळे तत्कालीन भारतातील संस्थानिकांपैकी पुरोगामी संस्थानिक म्हणून बडोद्यायाचे संस्थानिक सयाजीराव गायकवाडांबरोबरच छ.राजर्षी शाहू महाराजांचाही उल्लेख केला जातो.सम्राट अशोकाचे राज्य भारताच्या इतिहासात सुवर्ण अक्षराने लिहिले गेले आहे. ते त्याच्या साम्राज्य विस्तारामुळे किंवा कलिंग विजयामुळे तर त्यांने भेरीघोष ऐवजी धम्मघोष चा अंगिकार केल्यामुळे सम्राट अशोक जगातील सर्वश्रेष्ठ सम्राट म्हणून त्यांची ख्याती आहे. तसेच हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छ.शिवाजी महाराज यांनी रयतेचे राज्य निर्माण केले. त्यांना रयते विषयी असणारी कणव व स्वराज्यात १८ आलुतेदार व १२ बलुतेदार यांना सामावून घेवून स्वराज्य निर्मिती केली. व मराठयांमध्ये स्वाभीमान निर्माण केला. म्हणून आज महाराष्ट्राचे आराध्य दैवत म्हणून त्यांना संपूर्ण महाराष्ट्र मानतो.छ.शिवाजीमहारांच्या विचार सरणी नुसार व शिवाजी महाराजांचा निष्ठावंत उत्तराधिकारी म्हणून राजर्षी शाहू महाराज यांनी कार्ये केले. शिवाजींना जसे रयतेचा राजा म्हणून ओळखले जाते. तसेच राजर्षी शाहू महाराजांना लोकराजा म्हणून त्यांच्या कार्याचा गौरव केला जातो.

समाज क्रांतीकारक राजर्षी शाहू महाराज :—

०२ एप्रिल १८९४ रोजी राजर्षी शाहू महाराजांचा कोल्हापूर च्या गादीवर राज्याभिषेक करण्यात आला.छ.शिवाजी महाराजांनी चिपळुणच्या छावणीच्या अधिका—याला लिहिलेल्या पत्रामध्ये मराठा सैनिकांनी रयतेच्या भाजीच्या देठाला ही हाथ लावता कामा नये असे सूचित केले होते.त्याचप्रमाणे राजर्षी शाहू महाराजाने राज्याभिषेकानंतर १२ व्या दिवशी एक फर्माण काढुन संस्थानामधील जनतेची अधिका—याकडून पिळवणुक होवू नये अशी सक्त ताकीत दिली. तसेच कोल्हापूर संस्थानात ब्राहमणाचे असणारे वर्चस्व याचा आढावा घेवून सर्व सामान्यांना न्याय मिळवून देण्याचा प्रयत्न केला. त्यावेळी प्रशासनात दरबारी अधिका—यांची संख्या ७१ होती त्यापैकी ६० ब्राहमण तर ११ इतर जण होते. या इतर जणांमध्ये ॲग्लो इंडियन, पारसी, प्रभु यांचा समावेश होता.तर खाजगी अधिकारी वर्गात एकूण ५२ अधिकारी होते. त्यापैकी केवळ ७ इतर जण होते. तर शिक्षित म्हणून ८० टक्के ब्राहमण व २० टक्के मराठा, जैन, लिंगायत व मुस्लिम अशी परिस्थिती होती. यासाठी महाराजांनी ब्राहमणेतरांची परिस्थिती सुधारण्यासाठी आणि त्यांना प्रशासनात योग्य तो वाटा देण्याच्या उद्देशाने २६ जुलै १९०२ रोजी ५० टक्के आरक्षणाचा कायदा करून बहुजन समाजाला प्रशासनात सहभागी करून घेतले. महाराजांनी घेतलेला हा निर्णय समाज क्रांतीकारक होता. कारण त्या अगोदर प्रशासनातील सर्व जागी ब्राहमणांची मक्तेदारी होती.

ऑक्टोबर १८९९ मध्ये कोल्हापूरात वेदोक्त प्रकरण घडून आले. राजदरबाराजा पुरोहित नारायण भट्ट हा महाराज शाही स्नान करीत असताना वेदोक्त मंत्र म्हणणे गरजेचे होते. परंतु तो पुराणातील मंत्र म्हणत असल्याचे महाराजांचा मित्र राजाराम शास्त्री पंडित यांच्या निदर्शनात आले. त्याने महाराजांना याची जाणीव करून दिली. वेदोक्त मंत्र ब्राहमण व क्षत्रिय यांच्यासाठी म्हटले जातात. असे नारायण भटाने सांगितले. राजर्षी शाहू महाराज हे क्षत्रिय नसून शुद्र असल्यामुळे पुराणातील मंत्र म्हटले असे सांगितले.यपूर्वी ही भोसले घराण्यातील हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छ.शिवाजी महाराज यांना स्वराज्यभिषक प्रसंगी शुद्र म्हणून विरोध केला.गागाभटटाने द्रव्याच्या आमिषापोटी राज्याभिषेक केला.१८३५ मध्ये सातारचे प्रतापसिंह महाराज यांचाही वेदोक्त पध्दतीने विधि करण्यास विरोध केला. तर १८९६ मध्ये बडोदा नरेश सयाजीराव गायकवाड यांचाही वेदोक्त पध्दतीने विधि करण्यास नकार दिला होता. राजर्षी शाहू महाराजाने या वेदोक्त प्रकरणी नारायण भटटाला राजपुरोहित पदावरून दूर केले तेव्हा पुण्यातील लोकमान्य टिळकांनी केसरी वर्तमान पत्रातून आपले विरोधी मत नोंदविले.व त्यात वेदोक्ताचे खुळ या शिर्षका खाली खालील गोष्टी नमूद केल्या —

१. वेदोक्त म्हणजे इंग्रजी चिद्येने संस्कृत झालेल्या मराठयांच्या डोक्यात शिरलेले खुळ आहे.
२. धर्मशास्त्रावरील जे प्रसिध्द व सर्वमान्य ग्रंथकार आहेत त्यांच्या मते ख—या क्षत्रिय व वैश्य जाती नष्ट झाल्या आहेत.
३. शिवाजी महाराजांनी हिंदु धर्म व हिंदु राष्ट्र यांचे अस्तित्व कायम राखण्यासाठी मोठी कामगिरी केल्याने उच्चपद,उच्चमान,उच्चाधिकार कोणत्या रितीने मिळतील याचा कृतज्ञता बुध्दीने महाराष्ट्र विचार करीत होता. परिणामी गागाभट्टाच्या देखरेखी खाली व सल्याने सर्व ज्ञातीच्या मुत्सदयांच्या व शूर पुरूषांच्या संमतीने किंबहुना सर्व महाराष्ट्राच्या इच्छेने त्यांना शास्त्रोक्त,वैदिक पध्दतीने राज्याभिषेक केला गेला.
४. या प्रसंगी भोसले कुळावर लोकांची श्रध्दा होती. त्यामुळे हिंदु धर्माचे संरक्षण करणा—या या पुरूषास व्यवहाराने व शास्त्राने ज्याकाही सवलती देण्यासारख्या असतील त्यासर्व किंवा त्याहुनही कांकण भर जास्त देण्यात ते तयार होते. आताच्या मराठयांना तो अधिकार राहिलेला नाही.
५. शिवाजी महाराजांच्या काळात भोसल्यांच्या कुळातील गृहकर्म विषयी पुराणोक्त पध्दतच लावून दिली गेली.
६. भोसल्यांच्या कुळापेक्षा ज्यांचे कुळ कमी दर्जाचे आहे त्यांनी वेदोक्ताचा आग्रह धरणे ज्ञाती संप्रदायास व न्यायास अनुसरून आहे.
७. वैदिक मंत्राने संस्कार झाले म्हणजे मराठे, ब्राहमण एका जातीचे होतील तर ते अयोग्य आहे. ब्राहमण जातीतील स्त्रियांस वेदोक्त मंत्र म्हणण्याचा अधिकार नसताना ही त्या जातीने ब्राहमण आहे आणि मराठे लोकांनी वेदोक्त मंत्र म्हटले तरी ते मराठेच राहतील हे लक्षात ठेवले पाहिजे.
८. राज्याचे प्रमुख कार्य म्हणजे समाजात शांतता प्रस्तापित करणे होय. या संस्थानिकांनी जर सक्तिचा दुरूपयोग केल्यास त्याची दाद सार्वभौम सरकारास घ्यावी लागेल.तसेच ज्ञातीज्ञातीमध्ये तंटे संस्थानांच्या अधिपतीच्या प्रोत्साहनामुळे विकोपास जावू नये अशा बद्दल खबरदारी घेणे हे इंग्रज सरकारचे कर्तव्य आहे.

२६ जुलै १९०२ रोजी महारांनी कोल्हापूर संस्थानात ५० टक्के आरक्षण बहुजन समाजासाठी देण्याचा कायदा केला.त्यावेळी लोकमान्य टिळकांनी स्वजातीचे हित साधनारा कायदा अशी टीका केली. सन १९०५ मध्ये राधोपाध्ये प्रकरणात गव्हर्नर जनरल ने राजर्षी शाहू महाराजांच्या वतीने निर्णय दिल्यानंतर लोकमान्य टिळकांनी मराठा या वर्तमान पत्रात संस्थानिकांनी वतने खालसा करून संस्थानिकात विलीन करून घेतले.तसेच कोल्हापूर सस्थान ब्रिटिश साम्राज्यात विलीन झाल्यास जनतेला आनंद होईल. अशा पध्दतीने कोल्हापूर संस्थाना विषयी असणारा विरोध प्रकट केला.

कोल्हापूरात अनेक जातीधर्मातील विद्यार्थ्यांसाठी वसतीगृह :–

भारतीय चतुवर्ण्य व्यवस्थेनुसार ब्राहमणाला विद्या अध्ययन पौराहित्य व धर्माचा अर्थ सांगण्याचा अधिकार होता या मान्यतेला नाकारून राजर्षी शाहू महाराजांनी महात्मा ज्योतिबा फुले यांनी शुद्रांच्या गुलामगिरीचे कारण अविद्या असे सांगुण शुद्र व अतिशुद्रांना शिक्षण देण्यासाठी महाराष्ट्रात शिक्षणाची सोय केली. १८९६ मध्ये एक वसतीगृह कोल्हापूर मध्ये होते या वसतीगृहाची व्यवस्था गोखले नावाच्या ब्राहमण व्यक्तिकडे होती. त्याने यावसतीगहात ब्राहमणेतरांना प्रवेश नाकारला. म्हणून राजर्षी शाहू महाराजांनी कोल्हापूर संस्थानात अनेक जातीधर्मासाठी वसतीगृहांची निर्मिती केली. १८ एप्रिल १९०१ रोजी व्हिक्टोरिया मराठा बोर्डिगची स्थापना भास्करराव जाधव, विचारे,सावंत यांच्या पुढाकाराने केले. १९०७ मध्ये जैन वसतीगृहाची स्थापना केली. १९२० मध्ये गुरू फ्रेजर यांच्या अध्यक्षतेखाली दोन मजली मुस्लिम बोर्डिगची स्थापना केली. १९२० पर्यंत विविध जाती धर्मीयांसाठी कोल्हापूरात २० वसतीगृह स्थापन केले.भारतातील पहिले वसतीगृह कोल्हापूरात स्थापन झाल्यामुळे कोल्हापूरला वसतीगृहांचे शहर म्हणून ओळखले जाते.

अस्पृश्योध्दार :–

प्राचीन काळखंडापासून ते ब्रिटिशांच्या आगमनापर्यंत भारतीय समाज व्यवस्था ही चाकोरीबध्द होती. हिंदु धर्म म्हणजे वर्णव्यवस्थेचे पालन करणे असे होते. या धर्मानुसार अस्पृश्य गणल्या गेलेल्या जातींना पशुतुल्य वागणुक दिली जात होती. त्यांना माणुस म्हणून त्यांचे कोणतेही अधिकार दिले नव्हते. या व्यवस्थेने या जातींना स्वाभीमानशून्य जीवन जगण्यास बाध्य केले होते. राजर्षी शाहू महाराजांनी या अस्पृश्यजातींच्या उध्दारांसाठी शैक्षणिक सुविधा उपलब्ध करून दिल्या. १९१७ साली प्राथमिक शिक्षण मोफत व सक्तिचे केले. १९२० पर्यंत या प्राथमिक शिक्षणावर एकूण उत्पन्नाच्या २० टक्के खर्च केले. त्याचकाळात ब्रिटिश सरकारने महाराष्ट्रात गुजरात,महाराष्ट्र,कर्नाटक यासाठी ८० हजार रूपयांची तरतुद केली होती. तर महाराजांनी ३ लाख रू.यासाठी खर्च केले होते.अस्पृश्यांसाठी स्वतंत्र वसतीगृहाची स्थापना केली होती. परंतु सामाजिक समता प्रस्तापित करण्यासाठी १८१८ ला विविध जातीधर्मांसाठीची निर्माण केलेली वसतीगृहे बंद करून सर्वांना एकाच वसतीगृहात प्रवेश देण्यास सुरूवात केली. याच वर्षी वतने पध्दती खालसा केली. कुलकर्णी वतन खालसा करून त्याजागी तलाठी पद निर्माण केले.तलाठी म्हणून महार,माग, चांबाराची नियुक्ती केली. तसेच कोल्हापूर मुन्शिपाल्टी चा चेअरमन पदी दत्तोबा पोवार या चांबार व्यक्तीची निवड केली.तर क्लार्क म्हणून व्हटकर ची नियुक्ती केली.अनेक खात्यात अस्पृश्यांना सामावून घेतले. सरकारी पागेत,पील हत्तीखात्यात, शिकारी,टपाल , माहूत तर काहींना कोचमन , ड्रायव्हर म्हणून नियुक्ती केली.१९०८ साली राजकन्या आक्कासाहेब यांच्या लग्नाच्या वरातीत कमरेला तलवारी बांधून हत्तीवरील संस्थानी पोशाकातील माहूतांनी समाजाची प्रतिष्ठा वाढविली. सोनतळी कॅप किंवा रजपूत वाडीत महाराजांनी सामाजिक समतेचा प्रयोग केला. दशरथामांग यांस शिकारी स्टोअर्स चा जमादार बनविले. अंबा मांग व चंदा महार यांना शिकारी खात्याचे कामगार केले. दादू व रामू महार यांना राधानगरीचे हत्तीवरील माहूत बनविले अशा पध्दतीने राजर्षी शाहू महाराजांनी अस्पृश्य उध्दार करून समाज क्रांतीकारक कार्य केले. राजर्षी शाहू महाराजांचे सामाजिक कार्याविषयी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी राजर्षी शाहू महाराजांना लिहिलेल्या १९२१ च्या पत्रात द पिलर ऑफ सोशियल डेमोक्रॉसी म्हणून महाराजांचा उल्लेख करतात. अशा समाजक्रांतीकारक, आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार, आरक्षणाचे जणक लोकराजा राजर्षी शाहू महाराज यांचा महापरिनिर्वाण ०६ मे १९२२ रोजी मुंबई येथील पन्हाळ लॉज येथे झाले.म.फुलेचे कार्य राजर्षी शाहू महाराजानी सुरू ठेवले. म.फुले व राजर्षी शाहू महाराज यांचे कार्य डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी पुढे चालविले व त्यांच्या विचारांना भारतीय राज्यघटनेमध्ये समाविष्ठ करून न्याय मिळवून दिला. अशा या लोकराजाच्या निर्वाणाची वार्ता डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना कळताच त्यांनी महाराजांविषयी असे म्हटले कि,'शाहू महाराजासारखा सखा अस्पृश्यांना पूर्वी लाभला नव्हता व पुढेही लाभेल की नाही या बद्दल आम्हा शंका वाटते.'महात्मा गांधी यांनी राजर्षी शाहू महाराजांच्या कार्याचा गौरवार्थ,'सत्यशोधक समाजाच्या तत्वाप्रमाणे कै. राजर्षी शाहू महाराज यांनी अस्पृश्यता नष्ठ केली. हा त्यांनी स्वराज्याचा खरा पायाच घातला आहे. याची मला पूर्ण जाणीव आहे. प्रत्येकाने हा कित्ता पुढे ठेवून वागण्याचा प्रयत्न करावा.' राजर्षी शाहू महाराजांचे चरित्रकार धनंजय कीर असे म्हणतात,' राजर्षी शाहू च्या हया अलौकिक प्रेमामुळे व निष्ठेमुळे त्यांना मागासवर्गीय व अस्पृश्य मानलेला वर्ग देवासमान मानत होते.गौतम बुध्द,महात्मा फुले,डॉ.बाबासाहेब यांना जसे ते पुज्यनिय मानीत तसेच शाहुंना ते आपला उध्दारकर्ता म्हणून पूज्यनीय मानतात.'

संदर्भ ग्रंथ :–

१. राजर्षी शाहू एक विलक्षण भक्ती – डि.ए.सुर्वे
२. राजर्षी शाहू एक समाजक्रांतीकारक राजा – धनंजय कीर
३. राजर्षी शाहू आणि वैज्ञानिक दृष्टी – भा.ल. भोळे
४. वेदोक्त प्रकरण – ॲड.पी.बी. साळुंखे
५. राजर्षी शाहू व डॉ.बाबासाहेब आंबेडकर पत्र व्यवहार – डॉ.गंगाधर पानतावणे
६. राजर्षी शाहू चे निधन स्थान – पन्हाळा लॉज – श्रीमती राजकुँवर बोबडे
८. राजर्षी शाहू स्मारक ग्रंथ –सं.जयसिंग पवार

43. POLITICAL THOUGHT OF FREEDOM MOVEMENT IN PRINCELY STATE KOLHAPUR

Dr. More Sambhaji Ananda
M.H.Shinde Mahavidyalay, Tisangi.

There were many ideological influence at work bacause the British ruled territory was permeated by these ideology. In Kolhapur Princely State ideological influence was that of Non –Brahmin social movement which stood for social justice and social reforms. In this paper I have try to focus the political thought Princely State Kolhapur. The existence of approximate 562 big and small Indian states.[1] Revolt against the British rule in 1857 thereafter the rule of the East India Company was replaced by that of the Queen-In-parliament in great Britain. Some Indian States enjoyed states sovereignty. They not only differed in regard to the erea under their control, population, revenue ,standard of administration, degree of political awareness but they differed in the rights of their rulers to rule and magnitude of control by the British.[2]

Kolhapur was an important center of progressive social reforms moment, there were no political agitations in the state till the fag-end of Rajaram maharaj reign. The decade 1939-49 was full of political struggle in Kolhapur State. The State Praja Parishad speartheaded the struggle. Non –Brahmin leadership of Praja Parishad launched a powerful mass struggle to achieve the goal of political reforms. Praja Parishad in Kolhapur State get a rare opportunity to share power though for a brief period. The important strand of political thought in the Princely States could be found in the Praja Parishad movement in South Maharastra .There was a tremendous upsurge of peasant discontent in Miraj and Sangli States and farmers brought out a big morcha demanding the reduction in the land revenue . Policy of Miraj State was oppressive and the king didn't respond to demands of the people . Thus, the upsurge of peasantry was one of the salient feature of the Praja Parishad movement in Southern Maharastra Princely States.

The Praja Parishad movement demanded implementation of three important principles in the Princely States.

1) Reduction in the land revenue and controling the expenditure of the king.

2) Conceding basic democratic rights to the people and devolution of political power of the people

3) Reorganizing social, political and economic relation on the basic of principle of social justice

In the first three decades of 20th century, we have seen the emergence of Non-Brahmin movement in South India which wanted to end the dominance of one cast on the society and to implement the principle of social justice under the leadership of Rajarshi Shahu Maharaj.In Kolhapur state the Praja Parishad movement was led by Mr.Madhavrao Bagal who was a great Satyashodak and social reformer. Wey back in 1927 Mr. Bagal declared that now the Satyashodak should become socialist because the basic principles that were expounded by the Satyashodak were inherent in the socialist ideology. Bagal was a supporter of the ideology of secular and territorial nationalism as he said that irrespective of the cast ,creed,religion and sect everyone was an India. He stood for integrated and secular India,hence,the name of his weekly was 'Akhand Bharat'[3]

Bagal was supporter of socialism and held that the purpose of the Praja Parishad movement was to establish the workers and peasants state in India. He held that along with abolition of monarchy ,he would like to abolish the practice of money lending and rule by feudal lords. He was opposed to religious exploitation and held that along with political slavery the religious slavery should be abolished. To eradicate the exploitation of the people, the power should be given to broad masses of the people and the workers should play a leading role in it.[4]

The principle of sovereignty of the people ,universal adult franchise and establishment of autonomous Gram Swaraj were the main demands of the Praja Parishad. Its agenda was essentially anti-feudal and anti-imperial and it stood for establishment of workers and peasants State in Kolhapur.[5] Bagal stood for Bahujan Samajwad and emphasized the need of popularizing the socialist ideas in the broad masses of the people. Hence he pleaded for socializing the means of production ,land of the tillers and depriving capitalists, landlords, priests, and princes of their special privileges. Bagal held that securing political freedom was not the ultimate goal of the Praja Parishad and infect, it was a means to establish egalitarian and socialist society in India.[6] Nationalism should ultimately get converted into universal humanism. Every political leader should strive to secure welfare of the people and country's economy should be reorganized on the principles of socialism so as to free people of social, political and economic dependence. We should inculcated the spirit of patriotism and fraternity. He held that in India we must establish Socialism through the method of Satyagraha because for the establishment of casteless and classless society, socialism was necessary.[7]

Thus ,in Kolhapur the praja Parishad stood for radical political ideology . Bagal asked people in the realize that they were born with certain fundamental rights and these rights became positive when we tried to implement them. The state people should challenge the authority of the King and overthrow their Government.[8] The Praja Parishad Movements in the Princely State of Kolhapur expounded radical political thought which greatly influenced the future course of development and significantly contributed to making of modern India.

References :

1) Patil S.H. Thre Congress Party and Princely State,Himalay Publising House,Bombay,1981,p.4

2) Menon,V.P.The story of Integration of Indian State,Orient Longwans Ltd,Bdmbay,1961,p.10,11.

3) The Akhand bharat,28-12,1943.

4) Ibid,25-9,1947. 5) Ibid,3-7,1947. 6) Ibid,20-,2,1947. 7) Ibid,27-3,1947. 8) Ibid,26-6,1947.

44. कुरूंदवाड (सि.) संस्थानमधील सांस्कृतिक प्रगती

प्रा. डुबल दत्तात्रय रामचंद्र
सहायक प्राध्यापक, इतिहास विभाग.
मु. सा. काकडे महाविद्यालय, सोमेश्वरनगर.
ता. बारामती, जि. पुणे.

स्वातंत्र्यपुर्व कालखंडात मुंबई इलाख्यात १८ संस्थाने होती. ही संस्थाने दक्षिणेकडील संस्थाने म्हणुन ओळखली जात होती. कुरूंदवाड (सि.) संस्थान हे दक्षिणेकडील एक महत्त्वाचे संस्थान होते. मराठेशाहीतील जहागिऱ्यांना ब्रिटीश काळात संस्थाने असे म्हणण्यात येऊ लागले त्यापैकी कुरूंदवाड (सि.) एक प्रमुख संस्थान होय. पेशवाईत जी सरदार घराणी उदयास आली आणि दक्षिणेत ज्यांच्या पराक्रमाच्या आधारावर पेशवाई विस्तार पावलेली होती त्यात पटवर्धनांचे घराणे प्रमुख होते. स्वातंत्र्यपुर्व काळात पटवर्धनांची कुरूंदवाड (सि.) कुरूंदवाड (ज्यु.) मिरज, सांगली, तासगाव अशी संस्थाने होती. त्यामध्ये कुरूंदवाड (सि.) हे एक प्रमुख संस्थाने होते.

प्रस्तुत शोधनिबंधामध्ये कुरूंदवाड (सि.) संस्थानमध्ये सांस्कृतिक क्षेत्रात झालेले बदल आणि संस्थान अधिपतीनी त्यासाठी दिलेले योगदान यांचा अभ्यास करण्याचा प्रयत्न केला आहे. कुरूंदवाड (सि.) संस्थानातील सांस्कृतिक परंपरा हिंदु आणि मुस्लीम समाजाच्या पुर्वपरंपरेनुसार चालत आलेली होती. सांस्कृतिक परंपरा हिंदु आणि मुस्लीम समाजाच्या पुर्वपरंपरेनुसार चालत आलेली होती. सांस्कृतिक क्षेत्रात संस्थान अधिपती चिंतामणराव उर्फ बाळासाहेब पटवर्धन (१८७६ – १९०८) यांच्या कारकिर्दीपासुन काही नवीन प्रथा परंपरा रूढ झाल्या. त्यांच्या नंतरच्या राज्यकर्त्यांनी सांस्कृतिक क्षेत्रात भर घातली. संस्थानचे विलीनीकरण झाल्यानंतर आजही या परंपरा संस्थान कालीन सांस्कृतिक वारसा म्हणुन जपल्या जातात. त्यामध्ये प्रामुख्याने गणपती उत्सव, यात्रा, महाशिवरात्री कृषी प्रदर्शन, पशुप्रदर्शन, मोहरम उरूस, कुस्ती परंपरा किर्तन प्रवचन व्याख्याने संगीत नाट्य यासारख्या क्षेत्रात सांस्कृतिक बदल झालेला दिसतो. प्रस्तुत शोधनिबंधामध्ये कुरूंदवाड (सि.) संस्थानमध्ये सांस्कृतिक विकास कशा पध्दतीने झाला याचा शोध घेण्याचा प्रयत्न केला आहे.

सण आणि उत्सव :–

कुरूंदवाड (सि.) संस्थानमध्ये हिंदु आणि मुस्लीम धर्मीय लोक आपल्या पुर्वपरंपरेनुसार आपआपले सण, उत्सव साजरे करत असत. हिंदु दरवर्षी गुढीपाडवा, रामनवमी, दसरा, दिवाळी, मकरसंक्रांत, होळी, महाशिवरात्री, नारळी पौर्णिमा,गणपती उत्सव इत्यादी सण साजरे करत असत. तर मुस्लीम धर्मीय लोक ईद, मोहरम, बकरी ईद उरूस इ. सण आणि उत्सव साजरे करत असत.

राजवाड्याती उत्सव :–

कुरूंदवाड (सि.) संस्थान अधिपतींचे कुलदैवत गणपती असल्यामुळे गणपती उत्सव संस्थानात पुर्वपरंपरेनुसार साजरा केला जात असे. संस्थान अधिपती चिंतामणराव उर्फ बाळासाहेब पटवर्धन (१८७६–१९०८) यांच्या कारकिर्दीपासुन हा गणपती उत्सव मोठ्या थाटात साजरा करण्याची प्रथा रूढ झाली आणि या गणपती उत्सवाला सार्वजनिक उत्सवाचे स्वरूप प्राप्त झाले. संपुर्ण १० दिवस संस्थान अगदी वेगळ्या धार्मिक वातावरणात गुंतलेले असे. सनई, चौगडा, ताशा वाजंत्री यांच्या सुरात आणि संस्थानातील अधिकारी वर्ग, पोलिस राजवाड्यातील सर्व मंडळी काही मानकरी या सर्वांच्या उपस्थितीत गणपतीच्या मुर्तीची प्रतिष्ठापना केली जात असे. या गणपती उत्सवात संगीत, भजन, किर्तन, व्याख्याने यासारखे सांस्कृतिक कार्यक्रम होत असत. त्याचबरोबर चिंतामणराव उर्फ बाळासाहेब पटवर्धन (१८७६–१९०८) यांनी गणपती उत्सवात कुस्ती, अन्नदान, देणगी, यासारख्या परंपरा रूढ केल्या. या परंपरा नंतरच्या अधिपतींनी जपल्या आणि संस्थानाचे विलिनीकरण झाल्यानंतर आजही गणपती उत्सवावेळी संस्थानकालीन वारसा चालु आहे. राजवाड्यातील गणपती उत्सवाशिवाय संस्थानात घरोघरी आणि अनेक गणेश मंडळामार्फत गणेशाच्या मुर्तीची प्रतिष्ठापना करीत असत. या उत्सवाचे वैशिष्ट्य म्हणजे हिंदुबरोबर मुस्लीम लोकही मोठ्या उत्साहाने त्यामध्ये सहभागी होत असत. कुरूंदवाड येथे गणपती उत्सवात मुस्लीम, दर्गा आणि मशिदीमध्ये हिंदु व मुस्लीम समाजातील लोक मोठ्या उत्साहाने भक्तीभावाने गणेशमुर्तींची प्रतिष्ठापना करीत असत. ती प्रथा आजही रूढ आहे. हे एक धार्मिक सलोख्याचे आगळे–वेगळे वैशिष्ट्ये होय. हे महत्त्वाचे सांस्कृतिक वेगळपण होय.[१]

यात्रा :–

कुरूंदवाड (सि.) संस्थानमध्ये सांस्कृतिक दृष्ट्या यात्रेला खुप महत्त्व होते आणि आजही आहे. या संस्थानमध्ये अनेक खेड्यामध्ये स्थानिक पातळीवर वेगवेगळ्या देवदेवतांच्या यात्रा मोठ्या उत्साहाने भरत असत. परंतु या यात्रा लहान स्वरूपात असत याशिवाय कुरूंदवाड (सि.) संस्थानमध्ये काही ठिकाणी मोठ्या स्वरूपाच्या यात्रा असत. यामध्ये प्रामुख्याने कुरूंदवाड राजधानीच्या ठिकाणी "महाशिवरात्री यात्रा" अनगोळ तालुक्यात "वैजनाथ देवस्थान यात्रा" त्याचबरोबर कुरूंदवाड तालुक्यातील वाटेगाव येथील वाटेश्वर आणि 'वासुदेव देवस्थान यात्रा' इ. ठिकाणी मोठ्या स्वरूपात यात्रा भरत असत. महाशिवरात्री यात्रा या राजधानीच्या ठिकाणी कृष्णा घाटावर भरत असे. या यात्रेनिमीत्त संस्थानचे शेवटचे अधिपती चिंतामणराव उर्फ बाळासाहेब पटवर्धन (१९४१–१९४८) यांनी कृषी आणि पशुप्रदर्शन भरवत असत. या प्रदर्शनात शेती उपयोगी व जीवन उपयोगी अनेक कलाकृती आणि वस्तुचे प्रदर्शन व विक्री होत असे. आजही ही यात्रा मोठ्या उत्साहाने संपन्न होत असते. अनगोळ तालुक्यातील वैजनाथ डोंगर येथे "शंकराची यात्रा" वाटेगाव येथे "वाटेश्वर यात्रा" अशा मोठ्या स्वरूपाच्या यात्रा भरत असत. त्याचबरोबर संस्थानात स्थानिक पातळीवर खेड्यामध्ये वेगवेगळ्या देवताच्या यात्रा–जत्रा भरत असत.[२]

मोहरम आणि ऊरूस :–

कुरूंदवाड (सि.) संस्थानमध्ये हिंदु समाजाबरोबर मुस्लीम समाज गुण्या–गोविंदाने आपले जीवन जगत असे. मुस्लीम लोक आपल्या पुर्व परंपरेनुसार ईद, मोहरम, ऊरूस हे सण मोठ्या आनंदाने साजरे करत असत. मोहरम या सणाचे आगळे–वेगळे वैशिष्ट्ये म्हणजे हिंदु लोक मोठ्या संख्येने त्यामध्ये सहभागी होत असत. मोहरमच्या वेळी जो पीर नाचवला जातो तो प्रामुख्याने हिंदु लोक नाचवत होते. या सणाच्या वेळी कुरूंदवाड (सि.) संस्थानमध्ये आणि राजधानी कुरूंदवाड या ठिकाणी पीर बसवले जात. मोहरम सणाचे आणखी एक वैशिष्ट्ये म्हणजे प्रत्येक पीर हा राजवाड्यातील गणपतीचे दर्शन करून नारळ, सुपारी, दक्षिण घेऊन जात असे आणि नंतर त्याचे विसर्जन होत असे. आजही मोहरमच्या वेळी प्रत्येक पीर राजवाड्यात गणपतीचे दर्शन घेऊन जातो. जातीय सलोखा आणि सर्व धर्मसमभावाच्या संदेश देणारे ते एक ज्वलंत उदाहरण ठरते.[३]

कुस्ती परंपरा :–

सांस्कृतिक क्षेत्रामध्ये कुस्तीला फार महत्त्व आहे. कुरूंदवाड (सि.) संस्थानात कुस्तीची परंपरा संस्थान अधिपती चिंतामणराव पटवर्धन यांनी निर्माण केली. छत्रपती शाहु महाराजांच्या कुस्ती परंपरेचा प्रभाव होता.

ऐतिहासिक चिखली कुस्ती मैदान :– कुरूंदवाड :–

संस्थान अधिपती चिंतापणराव पटवर्धन (१८७६–१९०८) यांनी मल्ल विद्येला उत्तेजन देण्यासाठी आणि कुस्ती मैदानाची आवश्यकता ओळखुन कुरूंदवाड या राजधानी ठिकाणी "चिखली कुस्ती आखाडा" आणि सर्व सोयी नियुक्ती सभागृह निर्माण केले होते. मैदानात मध्यभागी चालु असलेली कुस्ती सर्वांना पाहता यावी म्हणुन मैदानाची सर्व बाजुंनी समान टप्प्या–टप्प्याने वर चढत जाणारी वर्तुळाकार बांधकाम रचना करण्यात आली होती. या मैदानात १०,००० प्रेक्षक बसतील अशी व्यवस्था करण्यात आली आहे. या ऐतिहासिक मैदानाची रचना ही कोल्हापुरच्या खासबाग मैदानाची प्रतिकृती होती. हे या मैदानाचे वैशिष्ट्य होय. या ऐतिहासिक चिखली कुस्ती मैदानात गणपती उत्सव व महाशिवरात्री दिवशी कुस्तीची स्पर्धा भरवण्याची परंपरा निर्माण केली होती. याच मैदानात अनेक नामवंत मल्लांनी आपले नाव कमबवले होते. परंतु संस्थान कालीन सांस्कृतिक वारसा उसलेले हे प्रसिध्द ऐतिहासिक चिखली मैदान आज दुर्लक्षीत स्थितीत आहे हे दुदैव होय.[४]

भारतीय सर्कसचा पहिला प्रयोग – कुरूंदवाड:–

संस्थान अधिपती चिंतामणराव पटवर्धन यांनी कुरूंदवाड संस्थानाचे रहिवाशी विष्णुवंत छत्रे यांच्या कलेला प्रोत्साहान देण्याच्या हेतुने कुरूंदवाड येथे सर्कसचा प्रयोग आयोजित केला. हाच भारतीय सर्कसचा पहिला यशस्वी प्रयोग ठरला आणि कुरूंदवाड संस्थानचे रहिवाशी विष्णुपंत छत्रे भारतीय सर्कशीचे जनक ठरले. हा सर्कस प्रयोग मुंबई इलाख्याचे गव्हर्नर फग्युसन यांच्या उपस्थितीत कुरूंदवाड नगरीत पार या सर्कस उभारणीस संस्थान अधिपती चिंतामणराव पटवर्धन यांनी आर्थिक मदत व प्रोत्साहन दिले होते. विष्णुपंत छत्रे यांचे सर्कस प्रयोग मुंबई बनारस आणि इतर अनेक संस्थानात होत असत.[५]

भालचंद्र मेमोरियल हॉल (सांस्कृतिक भवन) :–

संस्थान अधिपती भालचंद्र पटवर्धन (१९०८–१९२७) यांच्या कारकिर्दीत भालचंद्र मेमोरियल हॉल हे सांस्कृतिक भवन बांधले गेले. कुरूंदवाड या राजधानी ठिकाणी सार्वजनिक समारंभ आणि सांस्कृतिक कार्यक्रमासाठी प्रशस्त अशी इमारत बांधली संस्थान कालखंडात भालचंद्र मेमोरियल हॉल या हॉलमध्ये नाटके, संमेलने, व्याख्याने बोलपट इत्यादी सांस्कृतिक कार्यक्रमाबरोबर वार्षिक रयत दरबार दरबारी कार्यक्रम सभा इत्यादी कार्यक्रम होत असत आजही हा हॉल सुस्थितीत असुन सध्या हा हॉल भालचंद्र टॉकीज म्हणुन ओळखला जातो.[६]

व्याख्यान परंपरा :–

संस्थान अधिपती चिंतामणराव पटवर्धन (१८७६–१९०८) वक्तृत्वाची आवड होती. ते स्वत: आपल्या संस्थानात सामाजिक समतेसाठी व्याख्याने देत असत. त्यांनी आपले पुत्र भालचंद्र पटवर्धन यांच्या अध्यक्षतेखाली सामाजिक समता विधवा पुनर्विवाह यासारख्या विषयावर नामवंत वक्त्यांची व्याख्याने आयोजित केली होती.[७] संस्थानात महाशिवरात्री, गणपती उत्सव आणि इतर सांस्कृतिक कार्यक्रमानिमित्त व्याख्याने आयोजित केली जात असत. आजही संस्थान विलिणीकरण झाल्यानंतर संस्थानच्या वंशजाकडुन गणपती उत्सवानिमित्त व्याख्याने आयोजित केली जातात. त्याचप्रमाणे कुरूंदवाड नगरवाचन मंदिर एस. पी. हायस्कुल आणि वेगवेगळ्या सांस्कृतीक मंडळांच्या वतीने आज ही संस्थान कालीन सांस्कृतीक वारसा म्हणुन वेगवेगळ्या विषयावर व्याख्याने आयोजित केली जातात.[८]

कला परंपरा :–

कुरूंदवाड संस्थानामध्ये कलापरंपरा जपण्याचा प्रयत्न केला जात असे. सांस्कृतिक क्षेत्रातील महत्त्वाची कला म्हणुन संगीत, नाट्य, मुर्तीकला, गायनकला या सर्वच कलांना उत्तेजन दिले होते. कलेच्या माध्यमातुन कलाकारांनी स्वत:चे आणि संस्थानचे नाव सर्व जगभर प्रसिध्द केले होते.

संगीतकला :–

संगीतकला ही मानवी जीवनाचा एक अविभाज्य घटक असल्यामुळे प्राचीन कालखंडापासुन भारतभुमीमध्ये ही कला प्रगतीपथावर होती.

कुरूंदवाड संस्थानमध्ये ही संगीतकलेच्या आश्रय दिला होता. सर्वच संस्थान अधिपती संगीतकार व संगीत आश्रय दिला होता. संस्थान अधिपती चिंतामणराव पटवर्धन यांनी रहिमतखान यासारख्या प्रसिध्द संगीतकारास आश्रय दिला होता. गणपती उत्सव आणि इतर सांस्कृतिक कार्यक्रमाच्यावेळी आपल्या संगीताने प्रेक्षक वर्गाला मंत्रमुग्ध करीत असत. त्याचप्रमाणे विष्णु घडशी हे रहिमतखानासारखे दरबारी संगीतकार होते. त्याचप्रमाणे दरबारी संगीतकाराशिवाय गणपती उत्सव, महाशिवरात्री या उत्सवाच्यावेळी अनेक संगीतकार गायक यांचे अव्वल दर्जाचे कार्यक्रम होत असत.[९]

नाट्यकला:—

कुरूंदवाड संस्थान अधिपती चिंतामणराव पटवर्धन यांनी (१८७६—१९०८) यांनी गणपती उत्सव आणि इतर सांस्कृतिक कार्यक्रमानिमित्त नाट्यप्रयोग दाखविण्याची परंपरा रूढ केली होती. कुरूंदवाड नगरीत संस्थानचे रहिवाशी वामन कृष्ण उर्फ पंडितराव दातार हे नामवंत नाटककार होते. वामनराव दातार यांनी 'महाराष्ट्र नाटक कंपनी' स्थापन केली होती. या नाटक कंपनीला संस्थान अधिपतीनी अर्थसहाय्य केले होते. कै. दीनानाथ मंगेशकर, रघुवीर सावकार, लेले नाट्य कंपनी—कुरूंदवाड, शामराव शिरगुप्पीकर यांची आनंद संगीत नाट्य कंपनी कवडेगुलद, हरीभाऊ जोशी— बालमोहन नाटक कंपनी [१०] चिंतामणराव कोल्हटकर यांची "ललितकला कुंज नाटक कंपनी". भारत नाटक कंपनी — नरसिंहवाडी (नाटके—प्रभातचा मोटरवाला, सासुरवाशीन) इत्यादी अनेक नाटक कंपनीने आपले नाटकाचे प्रयोग भालचंद्र मेमोरियल हॉल (सांस्कृतिक भवन) येथे सादर करून कुरूंदवाड संस्थानातील रसिक श्रोत्याची मते जिंकली होती.[११]

मुर्तीकला :—

संस्थान अधिपतींनी मुर्तीकलेत प्राविण्य असलेल्या कलाकारांना आश्रयास ठेवले होते. त्यामुळे संस्थानात मुर्ती निर्माण करणाऱ्या कलेचा विकास झालेला होता. संस्थान अधिपती भालचंद्र पटवर्धन (१९०८—१९२७) यांनी कुरूंदवाड येथील रामभाऊ दातार, अप्पाजी जिनगर, भिवा सुतार, नरवणे मास्तर, गोपाळराव दातार यासारख्या असंख्य कलाकारांना आश्रयास ठेवले होते.[१२] अशा प्रकारे सांस्कृतिक क्षेत्रात कुरूंदवाड (सि.) संस्थानचा वेगळा ठसा निर्माण करण्याचा प्रयत्न केला होता. परिणामी कुरूंदवाड (सि.) संस्थान हे सांस्कृतिक दृष्ट्या प्रगतीपथावर होते. संस्थान अधिपतींच्या सांस्कृतिक क्षेत्रातील उदार आश्रयामुळे अनेक कलाकार, चित्रकार, गायक, कवी, नाटककार, किर्तनकार, मुर्तीकार यांची एक परंपराच निर्माण झाली होती. त्यामुळे कुरूंदवाड (सि.) संस्थानात विविध ललितकलांचे साम्राज्य निर्माण झालेले दिसुन येते.

संदर्भ साधने :—

१. आपटे गो. वि., संस्थानिक पटवर्धन घराण्याचा इतिहास. पृ.१३१.

२. कुलकर्णी धोंडो भाऊ, कुरूंदवाड संस्थानचे भुगोल वर्णन, पृ. ४.

३. पटवर्धन विजयादेवी, चिंतामणराव 'भावस्पंदने' पृ. ३१४.

४. बाळासाहेब ढवळे, लेख—ऐतिहासिक चिखली मैदान, दैनिक पुढारी दिनाक, १२ जानेवारी १९९१.

५. पटवर्धन विजयादेवी चिंतामणराव, "एका तेजस्वी कालखंडाचा मागोवा" कुरूंदवाड परिसर मित्र मंडळ स्मरणिका, पृ. १४—१५.

६. पटवर्धन वि. चि., एका तेजस्वी कालखंडाचा मागोवा, पृ.१६.

७. आपटे गो. वि., उपरोक्त, पृ. ११.

८. पटवर्धन वि. चि., राजप्रसादाची वास्तु (आत्मचरित्र) पृ. २१५.

९. पटवर्धन वि. चि., किल्ला, पृ. २४.

१०. कुन्नुर श्री. व्य. कुरूंदवाड परिसरातील गोड स्मृती, कुरूंदवाड परिसर मित्र मंडळ स्मरणिका, १९९२—९३, पृ. २८.

११. दैनिक त्रिकाळ रविवार दिनांक ७ ऑक्टोबर १९३४.

१२. दैनिक सत्यवादी दक्षिणी संस्थानचा खास अंक माहे जुन १९४०, पृ. ९७.

45. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे भारताच्या संस्थांना विषयीचे विचार

श्री. सचिन अभिमन्यू ओहोळ
सहा. प्राध्यापक (इतिहास)
संघवी केशरी महाविद्यालय, चिंचवड, पुणे.

प्रास्ताविक :

आधुनिक भारताच्या इतिहासात डॉ. भीमराव रामजी तथा बाबासाहेब आंबेडकर (इ.स.1891 ते इ.स 1956) यांचे महत्त्वपूर्ण योगदान आहे. भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार, स्वतंत्र भारताचे पहिले कायदामंत्री, 20 व्या शतकातील अग्रणी समाजसुधारक यासारखी विशेषणे त्यांना वापरली जातात. उच्चविद्याविभूषित आंबेडकरांचे अर्थशास्त्रज्ञ, समाजशास्त्रज्ञ, मानववंशशास्त्रज्ञ असेही पैलू आहेत.[1] स्वातंत्र्यपूर्वकाळातील सामाजिक, आर्थिक, राजकीय प्रश्नांवर त्यांनी सखोल वैचारिक लेखन केलेले आहे. स्वातंत्र्योत्तर काळातही देशाच्या पुनर्रचनेविषयी विविधांगी दृष्टीकोनातून त्यांनी विचार मांडले होते. जसे की स्वतंत्र भारताच्या अर्थव्यवस्थेविषयक विचार[2], भारताच्या परराष्ट्र धोरणा विषयीचे विचार[3] यांचा ऊहापोह त्यांच्या लेखनात होतो. स्वातंत्र्योत्तर काळात डॉ. आंबेडकरांकडे केवळ एक दलित नेता (दलित मसिहा) अशा संकुचित दृष्टीने पाहिले गेले. डॉ. आंबेडकरांचे दलितोद्धाराचे कार्य निश्चितच मौलिक आहे. परंतु त्यांच्या कार्याची सीमा तेवढयापुरतीच मर्यादित नाही. आधुनिक भारताच्या उभारणीतील त्यांचे योगदान लक्षात घेता त्यांच्याकडे केवळ दलित नेता म्हणून न पाहता एक 'राष्ट्रनिर्माता'[4] म्हणून पाहिले पाहिजे. प्रस्तुत संशोधन पेपरमध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे 'संस्थानांचे विलिनीकरण आणि त्यांची पुनर्रचना' याविषयीच्या भूमिकेवर प्रकाश टाकण्याचा प्रयत्न केला आहे. या त्यांच्या भूमिकेतून, विचारातून 'राष्ट्रनिर्माता' या बिरूदावलीची सार्थकताही जाणवते. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी संस्थानांविशयी बारकाईने अभ्यास केला होता. संस्थानांबाबत विचार मांडत असताना संस्थानांच्या त्यावेळेसच्या स्थितीपासूनची मांडणी ते करतात. त्यांनी म्हटले होते की, 'आजची संस्थाने म्हणजे मागच्या राज्यांची अवशेष आहेत. या संस्थानात राहणा-या लोकांची स्थिती गोठयात कोंडलेल्या जनावरांपेक्षा वेगळी नाही.'[5] प्रजेची दुरावस्था वर्णन केल्यानंतर त्यांच्या आर्थिक दुरावस्थेविषयी सांगताना ते नमूद करतात की, 'या संस्थानांपैकी एका संस्थानाचे उत्पन्न 500 रू असून त्यांची लोकसंख्या 206 एवढी आहे. एका संस्थानाचे उत्पन्न 165 रू असून त्यांची लोकसंख्या 125 एवढी आहे.'[6] फलटण संस्थानचे उत्पन्न साडेपाच लाख रू असून त्यांची लोकसंख्या 58 हजार एवढी आहे. मुंबईचे उत्पन्न साडेबारा कोटी रू असून त्यांची लोकसंख्या 2 कोटी एवढी आहे.[7] या प्रशासकीय आणि आर्थिक दुरावस्थेचे वर्णन आंबेडकर दोनच शब्दात करतात ते म्हणजे, 'Disorder and Misrule .'[8]

संस्थानांच्या प्रशासकीय आणि आर्थिक दुरावस्थेचे वर्णन केल्यानंतर त्यामागची कारणमीमांसाही ते करतात. ते म्हणतात, 'हिंदू धर्म हा संस्थानातील लोकांच्या अवनतीस जबाबदार आहे. धर्मग्रंथात राजाचे कर्तव्य म्हणजे 'गो-ब्राह्मण प्रतिपाळ' एवढेच सांगितले आहे. ते पार पाडल्यानंतर राजास राजा म्हणून दुसरे कर्तव्यच राहत नाही. चाणक्य, मनुस्मृती वगैरे ग्रंथांचे अवलोकन केल्यास असे दिसून येते की त्यांनी राजाचे कर्तव्य म्हणजे खेडयापाडयात शाळा काढून लोकांना सुविद्य करणे अगर लोकहिताच्या गोश्टी करणे याचा कोठेच मागमूस आढळत नाही. राम कृष्णाने स्कॉलरशीप दिल्या होत्या का ?' असा खोचक प्रश्नही ते विचारतात.[9] या धार्मिक कारणांबरोबरच संस्थानातील एकतंत्री राज्यकारभार, संस्थानांकडे राज्यकारभारासाठी आवश्यक असणारी संसाधने नसणे याचाही उल्लेख आंबेडकर करतात. संस्थानांची दुरावस्था आणि त्यामागची कारणमीमांसा करून झाल्यानंतर संस्थानांच्या विलीनीकरणाचा मुद्दा आंबेडकर मांडतात. संस्थानांचे विलीनीकरण करणे याबाबत ते आग्रही होते. संस्थानांची प्रशासकीय, राजकीय आणि आर्थिक दुरावस्था झाली होती त्यामुळे अशी संस्थाने ठेवणे म्हणजे गळफास लावून घेण्यासारखे आहे असे त्यांचे मत होते.[10] संस्थानांचे विलीनीकरण करावे यापाठीमागे संस्थानांमध्ये राहणा-या लोकांची दुरावस्था हा मुद्दा त्यांना खूप महत्त्वाचा वाटत होता. हा प्रश्न न सोडविणे म्हणजे या संस्थानात असुरक्षितपणे राहणा-या लोकांना शिक्षा करण्यासारखे नाही का ?[11] असा सवाल ते करतात. यावेळी काही संस्थानिक संस्थाने ही आमच्या पारंपारिक हक्काचा भाग आहे, या सबबीखाली विलीनीकरणास नकार देत होते. आंबेडकर त्यांना विचारतात की, पारंपारिक हक्क महत्त्वाचा की प्रजेचे कल्याण ?[12] या सर्व कारणांमुळे संस्थानांचे विलीनीकरण त्यांना आवश्यक वाटत होते. या मार्गाची आवश्यकता आणि अपरिहार्यता स्पश्ट करताना ते लिहितात की, 'संस्थानांचे विलीनीकरण करणे हा क्रांतिकारक मार्ग नसला तरी कायदेशीर मार्ग आहे.[13] त्यामुळे संस्थानांच्या शासकांना पेन्शन देऊन तात्काळ विलीन करावे.'

संस्थानांच्या विलीनीकरणाची आवश्यकता आणि विलीनीकरणाचा कायदेशीर मार्ग आंबेडकरांनी सांगितला असला तरी विलीनीकरण हे अंतिम उद्दिष्ट नसावे असेही त्यांचे मत होते. संस्थानांचे विलीनीकरण केल्यानंतर त्यांची पुनर्रचना करावी असे ते सुचवतात. येथील सत्ता प्रजेच्या ताब्यात दिली पाहिजे, समाजास प्राचीन मानसिकतेतून बाहेर आणले पाहिजे, दलित आणि अल्पसंख्याकांना मूळ प्रवाहात सामील करून घेतले पाहिजे[14] आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे हिंदुस्थानला व्यापून टाकील असे

नागरिकत्व निर्माण करणे गरजेचे आहे[15] या गोष्टी त्यांना अभिप्रेत होत्या. खरे तर 1935 च्या कायदयाच्या वेळीही ते याच मताचे आग्रही होते. 1935 च्या कायदयाच्या उणिवा दर्शविताना त्यांनी म्हटले होते की, या संस्थानांना फेडरेशनमध्ये सामील न होण्यास जी सूट दिली आहे त्यामुळे हिंदुस्थानचे ऐक्य घडून येईल का ?या संस्थानांचे भवितव्य काय होणार याची खुलेपणाने चर्चा झाली पाहिजे.[16] यावरून संस्थानांची पुनर्रचना करून त्यांच्यात एकराष्ट्रीयत्वाची भावना निर्माण करावी याबाबत आंबेडकर सुरूवातीपासूनच आग्रही होते असे दिसून येते.

निष्कर्ष**:-**

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या भारताच्या संस्थानांविषयक विचारांचा परामर्श घेता असे जाणवते की, या विचारांमध्ये वैचारिकता आाणि वास्तविकता यांचा मेळ आहे. संस्थाने भारतात सामील झाली पाहिजेत हा विचार मांडूनच ते थांबले नाहीत तर ती संस्थाने प्रत्यक्षात कशी विलीन करावीत त्याचबरोबर त्यांची पुनर्रचना कशी करावी याचा मार्गही दाखवितात. संस्थानांच्या विलीनीकरणाच्या आाणि पुनर्रचनेच्या विचारात मानवी कल्याणाचा विचार अखंडपणे जाणवतो. हा प्रश्न न सोडविणे म्हणजे या संस्थानात असुरक्षितपणे राहणा-या लोकांना शिक्षा करण्यासारखे आहे असे ते मानत. त्यांच्या या विचारात 'मानवमुक्तीचा विचार' आहे. दलित आणि अल्पसंख्याकांना मूळ प्रवाहात सामील करून घेतले पाहिजे यामधून या समाजाविषयीची तळमळ दिसते. आंबेडकर संस्थानांचे विलीनीकरण हे साध्य न मानता एक मैलाचा दगड मानतात. विलीनीकरणानंतर प्रजेत लोकशाहीची मूल्ये रूजवली पाहिजेत, समाजास प्राचीन मानसिकतेतून बाहेर आणले पाहिजे आणि या प्रजेला एकराष्ट्रीयत्वाच्या भावनेने बांधले पाहिजे या अपेक्षा व्यक्त करतात. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या या सर्व विचारातून त्यांच्या वैचारिकतेची आणि द्रष्टेपणाची प्रचिती येते.

संदर्भ व टीपा :

1. आंबेडकरांनी अर्थशास्त्रामधून M.A.,Ph.D. ,D.Sc. पदवी घेतली होती. मात्र त्यांनी 1913 ते 1916 या काळात Pol. Sci., Eco.,Socio., His., Anthropology याचा अभ्यास केला होता. आंबेडकरांनी Sociology चे सहा तर Anthropology चे चार Research Paper लिहिले होते.
2. पहा V. D. Nagar, K.P. Nagar, *'Economic thought and Policy of Dr. Ambedkar ,'* Segment Books, New Delhi,1992.
3. चां. भ. खैरमोडे, 'डॉ. भीमराव रामजी आंबेडकर चरित्र खंड 11,' महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, प्रथमावृत्ती, जुलै, 1990. पृ. क्र. 78.
4. डॉ. आंबेडकरांनी India Nation in Making सर्वप्रथम असे म्हटले होते. भारतास राश्ट्र बनविण्यास त्यांनी अमूल्य योगदान दिल्याने त्यांना 'राष्ट्रनिर्माता' म्हणणे संयुक्तिक ठरते.
5. Vasant Moon (Ed.), *'Dr. Babasaheb Ambedkar Writing and Speeches, Vol 18(2),'* Education Department, Gov. of Maharashtra, 2003. P.N. 264.
6. Mahesh Ambedkar, *'The Architect of Modern India- Dr.Bhimrao Ambedkar,'* Diamond pocket Books (p) Ltd. New Delhi,2005. P.N. 103.
7. नरेंद्र जाधव (संपा.), 'बोल महामानवाचे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची 500 मर्मभेदी भाषणे खंड 3 *(राजकीय)'* ग्रंथाली प्रकाशन प्रथमावृत्ती 2012 पृ. क्र. 296.
8. Mahesh Ambedkar, उपरोक्त, पृ. क्र. 103.
9. नरेंद्र जाधव (संपा.), उपरोक्त, पृ. क्र. 296.
10. कित्ता, पृ. क्र. 296.
11. Mahesh Ambedkar, उपरोक्त, पृ. क्र. 104.
12. कित्ता, पृ. क्र. 104.
13. कित्ता, पृ. क्र. 104.
14. नरेंद्र जाधव (संपा.), उपरोक्त, पृ. क्र. 296.
15. Vasant Moon (Ed.), उपरोक्त, पृ. क्र. 248.
16. नरेंद्र जाधव (संपा.), उपरोक्त, पृ. क्र. 290.

46. दुष्काळनिवारण विषयक शाहू महाराजांचे धोरण

प्रोफेसर सतिश यशवंत चौगुले
क्रांतीसिंह नाना पाटील कॉलेज, वाळवा.

प्रोफेसर मनोहर सुबराव कोळसेकर
टी. के. कोळेकर आर्टस अॅन्ड कॉमर्स कॉलेज, नेसरी.

आधुनिक महाराष्ट्राच्या इतिहासात आपल्या शैक्षणिक, सामाजिक व आर्थिक कार्याद्वारे बहुजन समाजाला जागृत करून त्यांची सर्वांगीण क्षेत्रात प्रगती घडवून आणणारे करवीर संस्थानाचे प्रजाहितदक्ष राजे म्हणजे 'राजर्षी शाहू महाराज' होय. 'आजच्या आधुनिक कोल्हापूरच्या सांस्कृतिक, सामाजिक व आर्थिक जडणघडणीचे मुळ उगमस्थान आहेत शाहू महाराज, त्यांच्या अलौकिक समाजोध्दाराच्या कार्याकडे पाहून त्यांना राजर्षी पदवीने लोकांनीच स्वयंस्पूर्तिने गौरविले होते.'[१] असे मत डॉ. जयसिंगराव पवार व्यक्त करतात. सर्वसामान्य माणसांचे कल्याण करणे हे त्यांचे शेवट पर्यंतचे ध्येय होते. शाहू महाराजाच्या राजकीय कालखंडात सन १८९६–९७, १८९९–१९०० व १९१८–१९ असे तीन वेळा कोल्हापूर संस्थानात तीव्र स्वरूपाचे दुष्काळ पडले. या नैसर्गीक दुष्काळरुपी संकटाच्या परिस्थितीवर मात करण्याकरीता महाराजांनी दीर्घ मुदतीचे धोरण आखले. इंग्रज सरकारने आपल्या अंमलाखालील प्रदेशात दुष्काळ निवारण करण्यासाठी काही धोरण ठरवले. अनेक आयोग नेमण्याचे प्रयत्न केले पण त्या दुष्काळावर मात करणे शक्य झाले नाही. इंग्रजानी राबविलेल्या धोरणाच्या अगदी उलटे धोरण महाराजानी राबविले. दुष्काळाचे आसमानी संकट कायमचे दुर करण्याकरीता शेती विकासाबाबतच्या ठोस उपाय योजना अंमलात आणल्या. त्यामुळे महाराज दुष्काळ निवारण्याच्या धोरणात त्याकाळी यशस्वी झालेचे हे स्पष्ट होते.

पूर्वी दुष्काळाचा अर्थ ठराविक चौकटीतून केला जात असे. नेहमीच्या खाण्या पिण्यात येणाऱ्या अन्नधान्याच्या पुरवठयात जेव्हा तीव्र तुटवडा येतो व त्यामुळे एखाद्या प्रदेशातील जनता जेव्हा भुकेने तळमळते तेव्हा त्या स्थितीस दुष्काळ म्हणतात. परंतू आधुनिक काळात दुष्काळाकडे पाहण्याचा दृष्टीकोन निराळा आहे. 'अन्न धान्याच्या किमती प्रचंड वाढणे व त्यामुळे गरीब माणसाला त्याच्या अपुऱ्या उत्पन्नात त्या त्याला विकत न घेता येणे व त्यामुळे उपासमार होणे असा ढोबळ अर्थ घेतला जातो.'[२]

शाहू महाराजांचा जीवन वृत्तांत :

छत्रपती शाहू महाराज हे कागलच्या जयसिंगराव घाटगे यांचे ज्येष्ठ चिरंजीव होते. त्यांचा जन्म २६जून १८७४ रोजी झाला. मूळ नाव यशवंतराव होते. कोल्हापूर संस्थानाचे राजे छत्रपती चौथे शिवाजी यांचा निपुत्रित अवस्थेत मृत्यू झाल्याने त्यांची पत्नी आनंदीबाईसाहेब यांनी १७ मार्च १८८४ रोजी यशवंतरावाना दत्तक घेतले. या पुढे ते 'शाहू छत्रपती महाराज' म्हणून कोल्हापूरच्या गादीवर आले, २ एप्रिल १८९४ पासून ते ६ मे १९२२ पर्यंत एकूण २८ वर्षे राज्यकारभार केला.[३] या कालावधीत महाराजानी सामान्य जनांच्या हिताची अनेक उल्लेखनीय कामे केली. त्यातील दुष्काळ निवारण्याच्या दृष्टीने उपाय योजना निर्माण करून यशस्वी पध्दतीने झुंज दिली. त्या कार्याचा ऐतिहासिक संशोधन पध्दतीने घेतलेला मागोवा आहे.

महाराजांच्या दुष्काळ निवारण्याबाबतच्या उपाय योजना :

अ. प्रशासकीय उपाय योजना :

दुष्काळाच्या वार्ता आल्या बरोबर महाराज कोल्हापूर संस्थानातील रयतेला प्रत्यक्ष भेटून विचारपूस करत असत. त्याचबरोबर महसूल अधिकाऱ्याना प्रत्यक्षपणे दुष्काळाची स्थिती पाहण्याचा व ताबडतोब ती माहिती दरबाराला देण्याचा हुकूम सोडत,१८९९–१९०० या काळात पडलेल्या दुष्काळाच्या वेळी महाराजानी दरबारतर्फे दिवाणी कचेरीत दुष्काळी कामासाठी एक स्वतंत्र विभाग उघडून ॲडिशनल कमिशनर ऑफ फॅमिन ऑफिसर व दोन सब ओव्हरसिअर्स यांची नेमणूक केली होती.[४] या त्यांच्या प्रशासकीय कामगिरी वरून महाराजांची प्रजेविषयक तळमळ कळून येते.

ब. कमी मुदतीची योजना :

प्रशासकीय उपाय योजने बरोबर दुष्काळी परिस्थीती हटविण्यासाठी इतर अनेक प्रकारचे उपाय योजावे लागले. दुष्काळाची मूलभूत कारणे शोधून काढून ती नष्ट करण्यासाठी खालील प्रमाणे उपाय योजना महाराजांनी आखल्या होत्या.

१. स्वस्त धान्याचे दुकान : दुष्काळच्या सद्रुश परिस्थीतीत अन्नधान्याच्या किमती मोठया प्रमाणात वाढत असत. महाराजानी यावर उपाय योजना म्हणून कोल्हापूर मध्ये ना नफा ना तोटा या तत्वावर स्वस्त धान्याची दुकाने उघडण्यात आली. त्याच बरोबर धान्य व्यापाऱ्याना दरबारतर्फे परप्रांतातून धान्य खरेदी करण्यासाठी बिनव्याजी कर्जे दिली.

२. धान्याची आयात : दुष्काळी काळात महाराजांनी इंग्रज सरकारकडून व कांही संस्थानकडून अन्नधान्य आयात करून ते धान्य आपल्या गरजू जनतेमध्ये न्याय्यरीतीने वाटप केले.[५]

३. पिण्याचे पाणी : दुष्काळामध्ये पिण्याच्या पाण्याची टंचाई निर्माण झाल्याने पाण्याविना माणसे जनावरे तडपडून मरण्याची वेळ आली होती. या संकटावर मात करण्यासाठी महाराजानी नदीकाठी गांवाजवळ दरबारच्या खर्चाने व लोकांच्या मदतीने नवीन विहिरी खोदणे व जुन्या विहिरींचा गाळ काढणे नवीन तलावे बांधणे व जुन्या तलावांची दुरूस्ती करण्याचे काम युध्द पातळीवर हाती घेतले जात असे. जेणे करून दुष्काळीकाळात पाण्याचा जनतेला मुबलक पुरवठा व्हावा ही महाराजांची तळमळ असे.[६]

४. रस्ते, पुल बांधकामे :

महाराजांनी दुष्काळी कामामध्ये रस्ते व पुल बांधण्याच्या कामाला फार महत्व दिल्याचे दिसते. अशा प्रकारची सार्वजनिक कामे देवून स्थानिक जनतेला रोजगार निर्माण करून दिले जात. या कार्यामुळे पक्का रस्ता व रोजगार असे जनतेचे दोन महत्वाचे उद्देश सफल होत.

५. दुष्काळी भत्ता :

दुष्काळी काळात महाराजानी संस्थानातील मजुर, नोकर, शिक्षक यांना १ नोव्हेंबर १८९६पासून दुष्काळी भत्ता द्यायला सुरूवात केली. ज्वारीच्या १० शेरांना जेवढी बाजारी किंमत असेल तेवढा दरमहा रू. दुष्काळ भत्ता म्हणून दिला जात असे.[७]

६. लहान मुलासाठी केलेली योजना :

दुष्काळामध्ये महाराजांचे लक्ष लहान मुलाबाळांकडे फार होते. कुटूंबातील स्त्री पुरूष दुष्काळी कामावर काम करीत असताना त्यांच्या लहान मुलांचे हाल होत असत. याची जाणिव महाराजांना झाल्याने त्यानी दरबारच्या खर्चाने कामाच्या ठिकाणी लहान मुलांचा सांभाळ होण्यासाठी ठिकठिकाणी शेडस् उभे केले व त्या मुलांच्या देखरेखीसाठी दरबाराकडून आया नेमल्या जात असत. त्या मुलाच्या दुध, पाणी जेवणाचा खर्च दरबाराकडून भागवला जात असे.

७. गरीबांसाठी आश्रम :

भूकेने कंगाल, पीडीत व प्लेग इतर रोगांनी जर्जर अशक्त झालेली आहेत अशा गरीब जनांना महाराजानी दुष्काळ काळात आश्रम खोलून दिले. त्या आश्रमात जेवणा खाण्याची, कपडेलत्ये, औषधपाण्याची फुकट सोय करून ठेवली. या त्यांच्या कार्यामुळे गरीब कंगाल जनतेलाही भूकबळी पडू दिले नाही.[८]

८. म्हातारे, आंधळे, पांगळे व दीन दुबळयांसाठी शिधावाटप :

लुळी पांगळी, आंधळी, म्हातारी कोतारी ही माणसे शारिरीक कष्ट घेऊ शकत नाहीत अशा वर्गाची महाराजांनी काळजी घेऊन त्यांच्या घरापर्यंत शिधा वाटण्याची व्यवस्था केली. अन्नधान्याविना आपल्या संस्थानातील कोणताही घटक भूकेने मरणार नाही याची खबरदारी थोर राजाने घेतली होती.

९. गरीब विद्यार्थ्यासाठी स्वस्तात बोर्डिंगची सोय : कोल्हापूरातील राजाराम कॉलेज व राजाराम हायस्कूलमध्ये शिक्षण घेणाऱ्या, खेडयातून आलेल्या गरीब विद्यार्थ्यांना राहण्यासाठी महाराजांनी स्वस्तात बोर्डिंगची खास व्यवस्था करून दिली. दुष्काळी परिस्थीतीचा या विद्यार्थ्यांच्या शिक्षणावर परिणाम होऊनये अशी महाराजांची तळमळ होती.[९]

१०. जनावरासाठी केलेली योजना : दुष्काळी काळात संस्थानातील सर्व जनावरे जगली पाहिजेत. याकरीता महाराजानी हुकूमनामे काढले होते. 'ज्याला आपली जनावरे पोषणाचे सामर्थ्य नाही त्याने आपली जनावरे संस्थानच्या छावणीत पाठवावीत तेथे ती पाळली जातील व जेव्हा मालकाला जरूरी वाटेल तेव्हा त्याने आपली जनावरे परत न्यावीत. अशा प्रकारची दुष्काळावर मात करणारी योजना राबवून आपल्या संस्थानातील एकही जनावर चाऱ्या विना मरणार नाही याची खबरदारी महाराजानी घेतली होती. त्याचबरोबर जनावरे चरण्यासाठी संस्थान ताब्यातील जंगले खुली केली. महाराजांच्या या उपाय योजनां मुळे संस्थानातील जनावरांची संख्या वाढली परंतु याच काळात ब्रिटिश प्रदेशातील जनावरे चाऱ्याविना तडपडत होती.[१०]

क. दीर्घ मुदतीची कामे :

महाराजानी दुष्काळाचा खोलवर विचार करून काही दीर्घकालीन उपाय योजना राबवल्या त्यातील काही योजना पुढील प्रमाणे

१. धरणे व पाटबंधाऱ्याची योजना :

निसर्गाच्या लहरीपणाचा फटका आपल्या जनतेला नेहमी बसत असतो. यावर कायमचा उपाय करण्यासाठी महाराजानी काही योजना उभा करण्याचा प्रयत्न केला. उदा. पावसाळयात पडणाऱ्या पाण्याचा वापर करून बारमाही शेतीला पाणी उपलब्ध करून देण्यासाठी महाराजानी राधानगरी धरणाची निर्मिती केली. त्यांच बरोबर आपल्या संस्थानात लहान मोठी तलावे व विहिरी बांधुन शेती पाण्याखाली आणली. ही महाराजाची क्रांतिकारक योजना असल्याचे दिसते.

२. शेतकऱ्यांना कर्जे :

दुष्काळाला तोंड द्यायचे असेल तर शेतीत गुंतवणूक मोठया प्रमाणावर झाली पाहिजे. असे मत महाराजांचे होते. याकरीता महाराजांनी शेती सुधारणेवर भर दिला होता. विहिरी खुदाई, बी–बीयाणे विकत घेण्यासाठी, खते, बैलजोडी, अवजारे, जमिन सपाटीकरण इत्यादी शेती सुधारणा कामासाठी महाराजांनी बिनव्याजी व अल्पव्याजानी कर्जे दरबारातर्फे उपलब्ध करून दिली.

दुष्काळ निवारण कार्यावर केलेला खर्च[९] (१८९६–९७ व १८९७–९८ या दोन वर्षात)

अ.नं	कामाचे स्वरूप	खर्च रूपये
१	रस्त्यासाठी खडी फोडण्याचे व गोळा करण्याचे काम	१,३०३९०
२	नवीन रस्ते बांधणे	१,३७३९३
३	तलावाची दुरूस्ती व सुधारणा	७७१९२
४	नव्या तलावाची बांधणी	१२२११
५	काटेरी निवडुंगाचे निर्मूलन	१४३१५
६	क्वारंटाईन कॅम्पमधील कार्याचा खर्च	७२४४
७	सहाय्यक कामे (पाण्याचे नळ पुरवठा करणे इ.)	४७५५
८	ठतर दुष्काळी कामावर केलेला खर्च	३०७३९
	एकूण खर्च	४,१४,२३९

दुष्काळशी झुंज देण्यासाठी केलेला निरनिराळया बाबींवरचा खर्च[१०] (१८९६–९७ व १८९७–९८ या दोन वर्षात)

अ.नं	कामाचे स्वरूप–घटकांचे नाव	खर्च रूपये
१	दुष्काळ निवारण कार्यावरचा खर्च	४१४२३७
२	काम न करणाऱ्या लहान मुलांना दिलेली मोफत मदत	७६१०९
३	गरिबांच्या आश्रमावरचा खर्च	२९९०८
४	खेडयात वाटलेला शिधा	६८२८
५	कमी पगार घेणाऱ्या नोकरांना धान्याच्या स्वरूपात मोबदला	४१८७१
६	कोल्हापूरमधील धान्य दुकानाच्या हमी निधीला दिलेला वाटा	९६१५
७	गरीब विद्यार्थ्यांसाठी स्वस्त खानावळीवर केलेला खर्च	९९१
८	आस्थापनावरील खर्च	२०१६१
९	ठतर (यंत्र सामग्री, साधने इ.)	३३७९०
	एकूण झालेला खर्च	६३३५१०

निष्कर्ष : या सर्व उपाय योजनांचा परिणाम कोल्हापूर संस्थानच्या नागरिकावर झाला. इतर प्रांतामध्ये दुष्काळाचा प्रचंड तडाखा जनतेला बसलेला असताना करवीर संस्थानात दुष्काळाची तीव्रता फार कमी होती. खुद्द ब्रिटिश मुलखात सुध्दा महाराजांच्या सारखी भूमिका घेता आली नाही. छत्रपती शाहु महाराजांच्या कार्य कर्तृत्वाचे मोठेपण या त्यांच्या कर्तृत्वावरून स्पष्ट होते. हा त्यांचा आदर्श आताच्या राजकारणी नेतृत्वाला, अभ्यासकांना लाभदायक ठरणारा आहे. महाराजांचा दुष्काळाकडे पहाण्याचा दृष्टीकोन विशाल व सर्वव्यापी असा होता हे या त्यांच्या दुष्काळ विषयक नियोजनाच्या कार्याच्या अभ्यासावरून स्पष्ट होते

संदर्भ सूची : १. डॉ. जयसिंगराव पवार, राजर्षी शाहू छत्रपती: एक मागोवा, सुमेरू प्रकाशन मुंबई,२००४, पृ. १
२. डॉ. रमेश जाधव, लोकराजा शाहू छत्रपती, सुरेश एजन्सी कोल्हापूर,२०१०, पृ. १२
३. डॉ. विलास संगवे आणि डॉ. बी. डी. खणे. (संपादक) राजर्षी शाहू छत्रपती पेपर्स,खंड २ (१८९४–१९००) शाहू संशोधन केंद्र, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर,१९८३पृ.१२
४. जाधव भ. बा, 'राजर्षी श्री शाहू महाराजांची भाषणे, कोल्हापूर, १९७१, पृ. ५८
५. Report on the general administration of Kolhapur state 1899-1900, p.61
६. लठ्ठे आ. बा,'श्रीमंत छत्रपती शाहू महाराज यांचे चरित्र, १९६४, पृ.१४४
७. मीना कुलकर्णी 'श्री. शाहू छत्रपतीचे अर्थकारण', गौरी नंदन पब्लिकेशन्स, कोल्हापूर, १९७५, पृ. १५१
८. धनंजय कीर, राजर्षी शाहू छत्रपती एक समाजक्रांतिकारक राजा, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, १९७९, पृ. ११८
९. य. दि. फडके, शाहू छत्रपती आणि लोकमान्य, श्रीविद्या प्रकाशन पुणे, १९८६
१०. Report on the general administration of Kolhapur state 1897-1898, p.73to75
११. डॉ. वि. बा. घुले, छत्रपती शाहूंचे समाजवादी आर्थिक धोरण, राजहंस प्रिंटिंग प्रेस,कोल्हापूर, १९७५, पृ १३०.

47. Sardar Patel and Integration of Princely states

Prof. S. R. Kattimani
Head Dept of History,
Shri. Sant Gadgebaba Mahavidyalaya, Kapashi.

Introduction:-

Sardar Patel was one of the leaders of the Indian National Congress and one of the founding fathers of the Republic of India. He was a social leader who played a leading role in the country's struggle for independence and guided its integration into a united, independent nation. In India and elsewhere, he was often addressed as Sardar, which means Chief in Hindi, Urdu and Persian. A 'Run for Unity' and pledge taking will mark India's first home minister Sardar Vallabhbhai Patel's birth anniversary on Oct 31, being observed as 'Rashtriya Ekta Divas'. He was raised in the countryside of Gujarat. Vallabhbhai Patel was employed in successful practice as a lawyer. Patel subsequently organised peasants from Kheda, Borsad and Bardoli in Gujarat in non-violent civil disobedience against oppressive policies imposed by the British Raj; in this role, he became one of the most influential leaders in Gujarat. He rose to the leadership of the Indian National Congress and was at the forefront of rebellions and political events, organising the party for elections in 1934 and 1937, and promoting the Quit India movement. As the first Home Minister and Deputy Prime Minister of India, Patel organised relief for refugees in Punjab and Delhi, and led efforts to restore peace across the nation. Patel took charge of the task to forge a united India from the British colonial provinces allocated to India and more than five hundred self-governing princely states, released from British suzerainty by the Indian Independence Act 1947. Using frank diplomacy, backed with the option and use of military force, Patel's leadership persuaded almost every princely state. Often known as the "Iron Man of India" or "Bismarck of India", he is also remembered as the "Patron Saint" of India's civil servants for establishing modern all-India services.

Early life:-

Sardar Vallabhbhai Patel was born in Karamsad village of Gujarat in a gurjar family. When he was eighteen years old, Patel's marriage was arranged with Jhaverba, a girl of twelve or thirteen years old from a nearby village. According to custom, the young bride would continue to live with her parents until her husband started earning and could establish their household. Patel travelled to attend schools in Nadiad and Borsad living self-sufficiently with other boys. He reputedly cultivated a stoic character. A popular anecdote recounts how he lanced his own painful boil without hesitation, even as the barber supposed to do it trembled. Patel passed his matriculation at the late age of 22; at this point, he was generally regarded by his elders as an unambitious man destined for a commonplace job. Patel himself harbored a plan to study to become a lawyer, work and save funds, travel to England and study to become a barrister. Patel spent years away from his family, studying on his own with books borrowed from other lawyers and passed examinations within two years. Fetching Jhaverba from her parents' home, Patel set up his household in Godhra and was called to the bar. During the many years it took him to save money, Patel – now an advocate – earned a reputation as a fierce and skilled lawyer. The couple had a daughter, Maniben, in 1904, and a son,Dahyabhai, in 1906.

Education and Primary Activities:-

Patel practiced law in Godhra, Borsad and Anand while taking on the financial burdens of his homestead in Karamsad. Patel was the first chairman and founder of the E.M.H.S. "Edward Memorial High School" Borsad which is at presently known as Jhaverbhai Dajibhai Patel High School. When he had saved enough for England and applied for a pass and a ticket, they arrived in the name of "V. J. Patel," at Vithalbhai's home, who bore the same initials. Having harbored his own plans to study in England, Vithalbhai remonstrated to his younger brother that it would be disreputable for an older brother to follow his younger brother. In keeping with concerns for his family's honour, Patel allowed Vithalbhai to go in his place. He also financed his brother's stay and began saving again for his own goals. In 1909, Patel's wife Jhaverba was hospitalised in Bombay to undergo a major surgical operation for cancer. Her health suddenly worsened and, despite successful emergency surgery, she died in the hospital. Patel was given a note informing him of his wife's demise as he was cross-examining a witness in court. According to others who witnessed, Patel read the note, pocketed it and continued to intensely cross-examine the witness and won the case. He broke the news to others only after the proceedings had ended.

Political Carrier:-

Patel settled in the city of Ahmadabad and became one of the city's most successful barristers. While urging of his friends, Patel won an election to become the sanitation commissioner of Ahmadabad in 1917. While often clashing with British officials on civic issues, he did not show any interest in politics. Upon hearing of Mohandas Gandhi, he joked to Mavlankar that "Gandhi would ask you if you know how to sift pebbles from wheat. And that is supposed to bring independence. But Patel was deeply impressed when Gandhi defied the British in Champaran for the sake of the area's oppressed farmers. Against the grain of Indian politicians of the time, Gandhi wore Indian-style clothes and emphasized the use of one's mother tongue or any Indian language as opposed to English . Patel was particularly attracted to Gandhi's inclination to action apart from a resolution condemning the arrest of political leader Annie Besant, Gandhi proposed that volunteers march peacefully demanding to meet her.

Problem of Integration of India:-

At the time of Indian independence in 1947, India was divided largely into two sets of territories, the first being the

 ISBN 978-93-5212-145-8

territories under the control of the Britishers, and the second being the territories under hereditary rulers. In addition, there were several colonial enclaves controlled by France and Portugal. Indian National Congress at that time dedicated itself to unite them.The first step in this process, carried out between 1947 and 1949, was to merge the smaller states that were not seen by the Government of India. Patel and Menon emphasized that without integration, the economies of states would collapse, and anarchy would arise if the princes were unable to provide democracy and govern properly. They pointed out that many of the smaller states were very small and lacked resources to sustain their economies and support their growing populations.

Treaties with rulers:-

They backed up their diplomatic efforts by producing two types of treaties. The first was the Standstill Agreement, which confirmed that the agreements and administrative practices that existed as between the princely state in question and the British would be continued by India. The second was the Instrument of Accession, by which the ruler of the princely state in question agreed to the accession of his kingdom to independent India, and to granting India control over specified subject matters. Obviously many rulers didn't agree to either so they took the charge of negotiating with the princes with more conciliatory approach than Nehru who in May 1947 declared that any princely state which refused to join the Constituent Assembly would be treated as an enemy state. Through a combination of factors, both convinced the rulers of the various princely states to accede to India. Having secured their accession, they then proceeded to, in a step-by-step process, secure and extend the central government's authority over these states and transform their administrations. Simultaneously, the Government of India, through a combination of diplomatic and military means, acquired de facto and de jure control over the remaining colonial enclaves, which too were integrated into India.

Contribution of Patel in Integration of India:-

To become a country, it was left upon Sardar Vallabhai Patel by the interim government to integrate all these kingdoms and provinces into the Indian Union. Sardar Patel was then the deputy Prime Minister of the country and Home Minister. These entities were left by the British to decide for themselves and either accedes to India, Pakistan or stay independent. The document that had to be signed by these kingdoms was The Instrument of Accession. However, the ruler of Travancore and the Nizam of Hyderabad declared they had decided on independence for their respective states. Kashmir and Manipur wanted independence, too. Junagarh was also an area of problems. He approached every kingdom out there to be a part of the country and negotiated with them. It was assumed that most states were weak enough and would consent to acceding to India and the same was achieved. It is said that the government was also open to allowing to give certain autonomy to some regions. Junagarh was finally incorporated in the union with a plebiscite that confirmed that its people wanted it to be merged with India. Hyderabad was incorporated in the country after the people dissented against the Nizam. He unleashed his paramilitary forces on them and after a period of revolt and violence, Indian army intervened and the Nizam surrendered. In Manipur, the king signed the Instrument of Accession as a result of the province becoming a constitutional monarchy at first and then, state congress coming to power which eventually pressured the King into signing the accord.

Conclusion:-

Sardar Vallabhai Patel is our first Home minister and Deputy Prime Minister. also he called as the Iron Man of India. Even today, many peoples of india were unaware about the contribution of Patel in Integration of India. The picture I have put in the description must make sense to you now. Had he not been there, we would not have an Indian map as it looks today. Indeed, the freedom fighters may have fought, revolutionaries may have struggles and the British may have left our country but Sardar Patel is the one who GAVE it to us.

References:-

1) Rangaswami, Vanaja (1981), The Story of Integration: A New Interpretation in the Context of the Democratic Movements in the Princely States of Mysore, Travancore and Cochin 1900–1947, New Delhi: Manohar
2) Ramusack, Barbara N. (2004), The Indian Princes and Their States, The New Cambridge History of India III.6, Cambridge, England: Cambridge University Press.
3) Menon, V.P. (1956), The Story of the Integration of the Indian States, New York: Macmillan
4) Lee-Warner, Sir William (1910), The Native States of India (2nd ed.), London: Macmillan
5) Mitra, Subrata Kumar (2006), The Puzzle of India's Governance: Culture, Context and Comparative Theory, London: Routledge,
6) Keith, Arthur Berriedale (1969), A Constitutional History of India, 1600–1935 (2nd ed.), London: Methuen
7) McLeod, John (1999), Sovereignty, Power, Control: Politics in the State of Western India, 1916–1947.

48. भोर संस्थानातील स्वातंत्र्याची चळवळ

प्रा . ए . जी . थोरात
प्रमुख, इतिहास विभाग
आर्टस ॲन्ड कॉमर्स कॉलेज, नागठाणे .

हिरडा सत्याग्रह, जंगल सत्याग्रह, फैजपूर मोर्चा इ . घटनांच्यामुळे भोर संस्थान प्रसिध्दीस आले होते . महाराष्ट्राच्या पुणे जिल्हयातील डेक्कन स्टेट एजन्सीच्या संस्थानापैकी हे एक संस्थान होते . संस्थानच्या राजधानीचे भोर हे शहर पुण्याच्या दक्षिणेस सुमारे ३0 मैलावर नीरा नदीच्या तीरी वसलेले आहे . हे संस्थान महाराष्ट्रातील पुण्यालगत १ लाख ४२ हजार लोकसंख्येचे, सहा लाख उत्पन्नाचे व ९२५ चौ . मैलाचे क्षेत्रफळ असलेले होते . संस्थानाचा तीन चतुर्थांश भाग डोंगराळ असल्यामुळे दारिद्रय गरीबीचा व निसर्गाच्या कोपाचा वारसा असलेल्या या चिमुकल्या संस्थानाला डोंगराळ मावळयांची भूमी म्हटले पाहिजे . जंगलामध्ये साग, हिरडा, जांभूळ, आंबा, फणस ही मुख्य झाड होती . भोरपासून उत्तरेस सुमारे २ मैलावर वेळवंडी नदीवर भाटघर येथे धरणाचे मोठे काम केले आहे . धरणामुळे संस्थानातील अनेक गावे बुडालेली आहेत . या ठिकाणचा शेतकरी खूपच कष्टात जीवन जगत होता . संस्थानातील शेतकरी सर्वसामान्य गरीब जनता, कष्टकरी यांना संस्थानात प्रजेच्या विरोधात घेतलेल्या धोरणामुळे जन आंदोलन किंवा स्वातंत्र्याची चळवळ उभी करावी लागली . त्यामधून संस्थानात विविध सत्याग्रह, मोर्चे ,निदर्शने इत्यादींचे आयोजन करण्यात आले त्याचा आढावा पुढीलप्रमाणे घेता येईल .

भोर संस्थानाचा व घराण्याचा इतिहास ः

हे संस्थान पंत सचिवांचे संस्थान म्हणून ओळखले जाते . संस्थानचे संस्थापक शंकराजी नारायण गांडेकर . हे देशस्थ ऋग्वेदी ब्राहमण कुटूंबामधील होते . पेशवे मोरोपंत पिंगळे यांच्याकडे ते नोकरीस राहिले . अमात्य रामचंद्र निळकंठ यांच्याकडे त्यांनी कारकुनाचे काम केले . कामातील हुशारी व शौर्य पाहून अमात्याने शंकराजीस सन १६८६ ला फौजेत घेतले . राजराम महाराज जिंजीला गेले त्याप्रसंगी महाराष्ट्रात प्रामुख्याने रामचंद्र पंत अमात्य एकटेच होते, त्यांच्यावर स्वराज्यरक्षणाची जबाबदारी होती त्यावेळी शंकराजीने राजगड किल्ला मुघलांच्या पासून सोडविला . मुघलांना पुणे प्रांतातून बाहेर घालविले सहयाद्रीच्या पर्वतामधील किल्ले बळकाविले . त्यामुळे राजारामांनी शंकराजीस 'महारूल महाम ' (विश्वास निधी कारभारी) हा किताब दिला . (१६९८) राजाराम महाराज जिंजीहून परत आल्यानंतर त्यांनी शंकराजीने स्वराज्यरक्षणार्थ बजावलेली कामगिरी लक्षात घेऊन शंकराजीस सचिवपद व जहागिरी दिली . (मराठी विश्वकोश नं . १२ पृ . ७७३) छत्रपती शाहूने शंकराजींचा मुलगा नारो शंकर यास सचिवपदाची सनद व भोर संस्थानची जहागिरी दिली . पुढे हेच भोर संस्थान म्हणून उदयास आले . नारोशंकराने चिमणाजी महादेव यास दत्तक घेतले,त्यास छ . शाहूनी सचिवपदाची वस्त्रे दिली . त्याने भोर ही संस्थानाची राजधानी केली . (१७४0)त्यावेळेपासून भोरच्या संस्थानिकांना पंतसचिव असे म्हणण्याचा प्रघात पडला असावा . चिमणाजी रघुनाथाने कर्ज फेड करून संस्थानात सुधारणांचा पाया घातला . (१८५२१८७१) तसेच शंकर चिमणाजी (१८७११९२२) व रघुनाथ शंकर यांच्या कारकीर्दीत अनेक सुधारणा झाल्या . त्यांनी संस्थानाचा दर्जा वाढविला . सन १९0३ मध्ये त्यांना ९ तोफांच्या सलामीचा मान मिळाला व पुढे १९११ साली आणखी दोन तोफांच्या सलामीचा मान व 'हिज मायनेस' ही पदवी मिळाली . दिल्लीस नरेंद्र मंडळ स्थापन होइपर्यंत राजमंडळाची जी सभा भरत असे त्या प्रत्येक सभेस रावसाहेबांना निमंत्रण येत असे व ते प्रत्येक सभेस हजर असत . (संदर्भविकीपिडीया भोर संस्थान)या संस्थानाने १८१८ पासून सातारची व इ . स . १८४८ पासून इंग्रजांची मांडलिकी स्वीकारली .

संस्थानच्या जनतेत असंतोष ः

शंकरराव चिमणाजी उर्फ रावसाहेब (१८७१ १९२२) यांच्या कालखंडात अनेक सुधारणा झाल्या असल्या तरी त्यांचा कारभार एकतंत्री होता . त्यामुळे नोकराच्या अंगी जबाबदारीने काम करण्याची पात्रता उत्पन्न झाली नाही तसेच राज्यकारभारात अनेक दोष निर्माण झाले . प्रसंगानुरूप व परिस्थितीनुसार बदलण्याचे कौशल्य त्यांचाकडे नव्हते . जुलमी कर नष्ट व्हावेत, प्रजेचे सहकार्य घ्यावे याकडे त्यांनी दुर्लक्ष केले . यामुळे संस्थानाच्या प्रजेत असंतोष निर्माण झाला, त्याची कारणे पुढीलप्रमाणे होती .

१ . संस्थानामध्ये जनतेवर अनेक अन्यायी कर आकारले, जबरदस्त करांचे ओझे .

२ . म्हैस पाळणे, लग्न होणे, पाटवा म्होतरवर कर, पाट लावण्यास कर .

३ . कुंडापटटी, तपकिरीवर कर, घाण्यावर, पेंडेवर, शेंदूर, गंधक, मोटारीवर कर .

४ . बंदरावरील माल, कोरडी मासळी, दसरा, दिवाळी सणाचे देकार कर . गणपत अभ्यंकरांनी वरील करांची स्थिती स्पष्ट केली आहे (संदर्भ डॉ . प्रकाशचंद्र व्यास, आधुनिक महाराष्ट्रातील परिवर्तनाचा इतिहास, यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठ, नाशिक २00४ पृ . क्र . ६९)

५ . शेती करणारा शेतकरी खूपच कष्टात जीवन जगत होता, काही शेतकयांच्या जमिनी धरणाखाली गेल्या, (मुळशी व भाटघर) काहींच्या जमिनी लिलावात गेल्या, जंगल विभागातीलही जमिनी गेल्या .

६ . हिरडा गोळा करण्याया शेतकयांच्यावर बंधने घातली .

७ . शेतकयांच्याकडून शेतसायाची सक्तीने वसूली .

८ . जनहिताच्या विरोधी धोरणे ठरविली .

वरील कारणामुळे भोर संस्थानात असंतोष निर्माण झाला .

प्रजा सभा /परिषदेची स्थापना ः

भोर संस्थानातील प्रजेत निर्माण झालेला असंतोष, संस्थानामध्ये नेत्यांनी केलेली जागृती तसेच महायुध्दानंतर नवी तत्वे, विचार, आकांक्षा व नवे वातावरण निर्माण होऊलागले . त्याच्या लाटा संस्थानी प्रजेवर आदळल्या . शंकरराव चिमणाजी उर्फ रावसाहेब यांच्या एकतंत्री कारभाराला लोक कंटाळले होते . जुलमी कर नाहीसे करा, जनतेच्या मागण्या मान्य करा अशा जनतेच्या मागण्या पुढे येत होत्या . लोकांना संघटित करणे आवश्यक होते . या पार्श्वभूमीवर जनतेचे प्रश्न सोडविण्यासाठी देशभक्तीने व समाजसेवेने भारावलेले लोक पुढे आले . मावळ तालुक्यातील उरवडे गावचे गोपीनाथ पोतनीस उर्फ दादा यांचे खंबीर नेतृत्व जनतेला मिळाले . दादा, भाऊसाहेब शेटे व इतर कार्यकर्ते १३ नोव्हेंबर १९२१ रोजी पुणे येथे एकत्र आले,भोर संस्थानासाठी त्यांनी प्रजासभेची स्थापना केली . श्री . तात्यासाहेब केळकर यांच्या अध्यक्षतेखाली भोर येथे प्रजासभेचे औपचारिक उदघाटन झाले . (संदर्भ Dr,Arun Bhosale, Freedom Movement in Princely States of Maharashtra S.U.Kolhapur, 2001) प्रजासभा किंवा परिषदेने भोर संस्थानात स्वातंत्र्याची चळवळ उभी केली . या प्रजासभेमध्ये गोपीनाथ पोतनीस न . चि . केळकर, भाऊसाहेब शेटे, शंकर रघुनाथ वाळिंबे, दासोपंत वाळिंबे, जानराव देशमुख, वापूसाहेब लिमये ,देशदास रानडे इ . मंडळी आघाडीवर होती .

जनआंदोलनाचे कार्य / स्वातंत्र्याची चळवळ ः

प्रजापरिषदेच्या स्थापनेपूर्वी प्रजापरिषदेच्या नेते मंडळीनी जनतेचे प्रश्न सोडविण्याचे कार्य चालविले होते प्रजापरिषदेच्या स्थापनेनंतर परिषदेने जन आंदोलनाचे कार्य चालू ठेऊन जनतेला भोर संस्थानामध्ये विविध बावतीत स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी चळवळ उभी केली . कार्यकर्त्यांनी ब्रिटिशांचे सभाबंदीचे आदेश धुडकाऊन लावले . संस्थानातील गावागावात व खेडयापाडयात सभांचे आयोजन केले . भोर संस्थानाच्या तालुक्यात सभा घेतल्या . आंदोलकांना संस्थानाच्या डोंगराळ भागात पायी चालत जावे लागले . शारीरीक व मानसिक त्रास सहन करून कठोर परिश्रम घेऊन त्यांनी कार्य केले . कितीही अडचणी आल्या तरी कार्य सोडले नाही . बंदी हुकूम मोडल्यामुळे ब्रिटीशांनी परिषदेच्या कार्यकर्त्यांची धरपकड चालू केली . ती टाळण्यासाठी त्यांना प्रचंड हाल, दु:ख, यातना सहन कराव्या लागल्या . जनतेमध्ये त्यांनी मोठया प्रमाणात जागृती केली . जनतेने अभूतपूर्व प्रतिसाद दिला . दि . २५ व २६ जानेवारी १९२२ रोजी प्रजा परिषदेची परिषद भोर या ठिकाणी भरवण्यात आली . त्यामध्ये पुढील ठराव मांडण्यात आले त्यामध्ये

१ . सभा व मिरवणुकीवरील बंदी उठवावी .

२ . काही कर कायमस्वरूपी रददबातल करावेत .

३ . काही करांचे प्रमाण कमी करण्यात यावे .

४ . मागण्या मान्य झाल्या नाही तर शेतसारा भरणेस नकार द्यावा .

प्रजा परिषदेच्या जन आंदोलनामुळे भोर संस्थानाने अनेक बदल केले . प्रजा सभेच्या अनेक मागण्या मान्य केल्या . काही कर कमी व रदद केले यावेळी संस्थानातील सावकार,व्यापारी,करसल्लगार,वकील इत्यादींनी प्रजापरिषदेच्या नेत्यांना अटक करण्याचे कारस्थान रचले परंतु नेत्यांनी त्यांचा डाव उधळून लावला . प्रजा परिषदेने जनता व शेतकयांच्या प्रश्नांना महत्व देऊन अव्याहतपणे साधले जाणारे स्वार्थ धुडकाऊन लावले . निस्वार्थी व प्रामाणिकपणे कार्य केले . त्यामुळे भोर प्रजा परिषद आखिल भारतीय संस्थांनी प्रजा परिषदेच्या स्थापनेला मार्गदर्शक ठरली . तसेच अन्य संस्थानात प्रजा परिषद स्थापन होण्यास प्रेरणादायी ठरली . दादा पोतनीसांच्या संपादकत्वाखाली प्रसिध्द झालेली 'दि मावळा' ही पत्रिका इतर प्रजापरिषदेसाठी जनक म्हणून उदयास आली .

हिरडा व इतर सत्याग्रह :

भोर संस्थानातील प्रजापरिषदेच्या माध्यमातून (१) हिरडा सत्याग्रह (२) . कादवे (भोर संस्थानातील खेडे) सत्याग्रह (३) जंगल सत्याग्रह इत्यादी महत्वाची जनआंदोलने झाली . ही आंदोलने राजेशाहीविरूध्द होती या आंदोलनांमधून जनता व शेतकयांचे प्रश्न मार्गी लागले .

हिरडा सत्याग्रह ः

भोर हे डोंगराळ भागाचे संस्थान होय या भागात हिरडयाचे भरपूर उत्पादन व्हायचे . हिरडा वनस्पती बहुगुणी व आयुर्वेदिक आहे, माताविहीत लहान मुलांची माता हिरडा असते असे संस्कृतमध्ये वचन आहे . (संदर्भ विकीपीडीया) यावरून त्याच्या उपयोगाची कल्पना येते . हिरडयात ५ रस आहेत त्यामुळे पित्तदोष, कफदोष व वातदोष दूर होतात . हिरडा बहुगुणी असल्यानुळे त्याची खरेदी विकी होत असे . संस्थानाने मुंबईच्या कंपनीला हिरडा द्यावा किंवा त्याची विकी कंपनीकडेच करावी असे स्पष्ट केले होते, हिरडा घेणारी मुंबई येथील पुरूषोत्तम मथुरादास यांची कंपनी होती . याच पार्टीला त्यांनी

सांगितलेल्या दरातच हिरडा विकावा अशी जबरदस्ती केली होती . कंपनीवाले हिरडयाला अधिक दर देत नव्हते . १९२२ मध्ये हिरडयाच्या किंमती वाढूनही संस्थानातील लोकांना वाढीव दर मिळाला नाही याउलट हिरडा पुण्याच्या मार्केटमध्ये विकला गेल्यास त्याचा दर १ रूपयात ३ते ४पायली असा होता (संदर्भ Dr,Arun Bhosale, Freedom Movement in Princely States of Maharashtra S.U.Kolhapur, 2001 page no.68) मुंबइचे मक्तेदार १ रूपयाला १३ ते १४ पायली असा दर बळजबरीने आकारत होते . भयंकर व दुष्ट असा हा व्यवहार शेतकयांना अत्यंत घातक होता . कंपनीच्या मक्तेदारीविरूध्द शेतकयांनी सत्याग्रह केला (१९२५)भोर संस्थानाने रॉयल्टी नामक निर्यात कर हिरडयावर आकारला होता या अन्यायाविरोधात हिरडा निर्यातीस परवानगी द्यावी यासाठी सत्याग्रह सुरू झाला . २ फेब्रुवारी १९२५ रोजी पुणे या ठिकाणी लोकांनी स्वत: हिरडा नेला . कंपनीने पठाणी माणसे पाठवून धाक निर्माण केला . प्रजा परिषदेच्या शेतकयांना एकत्र केले आणि ४ फेब्रुवारी १९२५ ला ४000 मावळयांचा व त्यांच्या कुटूंबियांचा मोर्चा नाचणीची भाकरी बांधून घेऊन पुण्याच्या डोंगराळ भागातून राहत्या घरापासून निघाला . शहरातील भागातून हा मोर्चा संस्थानप्रमुखांच्या कॅंप भागातील मंगलदास रोडवरील निवासस्थानापर्यंत नेला . मोर्चाच्या नेत्याशी प्रदीर्घ चर्चा झाली त्यानंतर संस्थान प्रमुखाने हिरडयावरील कंपनीची मक्तेदारी नष्ट केली .

जंगल सत्याग्रह :

भाटघर धरणाच्या विस्तारीकरणामुळे शेतकयांच्या जमीनी गेल्या . जंगलातीलही काही जमिनी घेतल्या . कॉंट्रॅक्टरने शेतकयांना नुकसान भरपाई देण्यास नकार दिला . जमीनी खंदावयास सुरूवात केली, रस्त्यांचे काम सुरू झाले, शेतकयांना मोबदला न देता वायावर सोडले . त्यांच्याकडून शेतासारा सक्तीने वसूल केला या अन्यायाविरोधात दादा पोतनीस व इतर कार्यकर्त्यांनी जमाव करून निदर्शने केली . जमिनी घेण्यास मज्जाव केला . निदर्शकांना भीती दाखविण्यासाठी संस्थानाने प्रांतिक व संस्थानाचे पोलिस दल पाठविले परंतु निदर्शकांनी शरणागती स्वीकारली नाही . संस्थानप्रमुखांना सत्याग्रहींच्या मागण्या मान्य कराव्या लागल्या .

कादवे सत्याग्रह ः

कादवे या लहान खेडयातील जमिनी, भोर संस्थानातील तत्कालीन सरदार नातू यांनी लिलावात विकत घेतल्या . पुढे शेतकयांची उपासमार होऊ लागली त्यांनी आंदोलन सुरू केले व लिलावात गेलेल्या जमिनी परत मिळवल्या (१९२६)

फैजपूर मोर्चा :

प्रजा परिषदेच्या नेत्यांनी ४00 शेतकयांचा मोर्चा भोरपासून जळगाव जिल्हयातील फैजपूर या ठिकाणी नेला त्या ठिकाणी २७ व २८ डिसेंबर १९३६ या कालखंडात आखिल भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेसचे अधिवेशन भरले होते ऐन कडाक्याच्या थंडीत हा मोर्चा चालत गेला हे आश्चर्य होते . शेतकरी राष्ट्रीय नेत्यांच्या भेटीसाठी उत्सुक होते . पंडित नेहरूनी सर्वांचे स्वागत केले . तेथील वातावरणामुळे सर्व शेतकरी राष्ट्रप्रेमाने भारावून गेले . हा मोर्चा भोर संस्थानासाठी नव्हेच तर भारतातील सर्व संस्थानी प्रजेसाठी प्रेरणा व स्फूर्ती देणारा ठरला .

निष्कर्ष :

भोर संस्थानातील प्रजा परिषदेचे कार्य व जनतेची चळवळ मोठया जोमाने व उत्साहाने चालू होती . इतर संस्थानासाठी व प्रजा परिषदेसाठी त्यांनी कार्याचा आदर्श घालून दिला यामुळे जनआंदोलनाला गती मिळाली त्यामुळेच संस्थानात झालेल्या विधानपरिषदेच्या निवडणुकीत प्रजा परिषदेला प्रचंड यश मिळाले . चार ते पाच पटीने अधिक मते मिळाली . जास्तीत जास्त उमेदवार निवडून आले . दादासाहेब पोतनीस यांची मुख्यमंत्री म्हणून निवड झाली . ही परिषदेच्या कार्याची पोहोचपावती होती .

संदर्भ :

१ . तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी, मराठी विश्वकोश, म . रा . म . वि . मंडळ, खंड १२, १८, १९८५

२ . प्रा . डॉ . प्रकाशचंद्र व्यास, आधुनिक महाराष्ट्रातील परिवर्तनाचा इतिहास, य . च . म . मु . वि .,२00४

३ . Dr,Arun Bhosale, Freedom Movement in Princely States of Maharashtra, S.U.Kolhapur, 2001

४ . राघवेंद्र शर्मा ,हैद्रावाद व देशी संस्थाने, अ . वि . पटवर्धन, हैद्रावाद १९२८

५ . विकीपिडीया, भोर संस्थान

49.औंध संस्थानाच्या विकासातील भवानराव श्रीनिवास तथा बाळासाहेब पंतप्रतिनिधींचे योगदान

प्रा.बोडखे संजीव सुखलाल
शरदचंद्र पवार महाविद्यालय लोणंद
ता.खंडाळा जि.सातारा

प्रा.डॉ.कोरडे दत्तात्रय ज्ञानदेव
डी.पी.भोसले कॉलेज,
कोरेगाव, जि.सातारा

प्रस्तावना-

छत्रपती राजाराम महाराजांनी इ.स.१६९८ मध्ये परशुरामपंतांना कऱ्हाड, आटपाडी व औंध हे परगणे जहागिरी देऊन प्रतिनिधी पद दिले होते. या संस्थानाची मूळ जहागीर १८ लाखांची होती. सातारचे छत्रपती शाहू महाराजांनी परशुरामपंतांनी वरील जहागिरीचा लेखी सनदा ८ एप्रिल, १७१४ रोजी दिल्या होत्या. सुरूवातीपासून प्रतिनिधींची राजधानी कऱ्हाड येथे होती. पण दळणवळणाच्या सोयीसाठी इ.स.१८५४ मध्ये इंग्रजांनी कऱ्हाड परगणा पंतप्रतिनिधीकडून काढून घेतला व त्या मोबदल्यात ७२ गावे व ३९ वाडयांचे औंध संस्थान प्रतिनिधींना दिले होते. तेव्हापासून आजतागायत पंतप्रतिनिधींच्याकडे औंध ही जहागिरी आहे. या घराण्यात परशुराम त्रिंबक नंतर श्रीपतराव जगद्जीवनराम, श्रीनिवास गंगाधर, परशुराम श्रीनिवास तथा थोटोपंत श्रीनिवास, परशुराम आणि सन १९0९ पासून भवानराव श्रीनिवास तथा बाळासाहेब प्रतिनिधी अधिकारारूढ झाले होते. ब्रिटीशांच्या औदार्यामुळे पंतप्रतिनिधींना महत्त्व प्राप्त झाले होते. तेव्हा या शोधनिंबधामध्ये भवानराव तथा बाळासाहेब प्रतिनिधी यांच्या कार्याची सविस्तर माहिती घेतलेली आहे.

औंध संस्थानचा पूर्वेतिहास-

छत्रपती राजाराम महाराजांच्या काळात औंध संस्थानचा विस्तार फार मोठा झाला होता. संस्थानाचा विस्तार हा मुलुखगिरीवरोबरच वाढत किंवा कमी होत असे. तथापि पेशवाईत संस्थानचा विस्तार कमी होत गेला. औंध संस्थानच्या मूळच्या प्रादेशिक व्याप्तीत सध्याच्या सातारा व सांगली जिल्हयामधील भाग होता. परंतु सध्याच्या विजापूर जिल्हयातीलही काही भाग होता. प्रतिनिधींच्या संस्थानाची राजधानी काही काळ कराड येथे होती.[१] परशूराम श्रीनिवास प्रतिनिधी यांना दुसरे बाजीराव पेशवे यांनी आपला सेनापती बापू गोखलेंना पाठवून पंतप्रतिनिधींचा कऱ्हाडमधील सरंजाम जप्त करून परशुरामपंतांना कैद केले होते. परशूराम श्रीनिवास प्रतिनिधी हे इ.स.१८0६ ते १८११ या कालखंडात पेशव्यांच्या कैदेत होते. इ.स.१८१८ मध्ये पेशवाईचा अस्त झाल्यानंतर इंग्रजांनी त्यांना सातारा राज्याच्या अंमलाखाली दिले होते. त्यावेळी कंपनी सरकारने परशुरामपंतांची अनेक दिवसांची खानदानी पाहून 'तुमचा दर्जा व मर्तबा पेशजीपासून चालत आल्याप्रमाणे चालेल' असे त्यांना अभिवचन दिले होते. तसेच ग्रँट डफ या सातारच्या पोलिटिकल एजंटने २२ एप्रिल, १८२0 रोजी त्यांच्याशी कंपनी सरकारमार्फत एक तहनामा केला होता. या तहनाम्यामुळे परशुरामपंत प्रतिनिधी इंग्रजांचे मांडलिक जहागीरदार बनले होते.तसेच त्यांच्या जहागिरीची संपूर्ण हमी इंग्रज सरकारने घेतली होती.[२] ग्रँट डफ व ब्रिग्ज या रेसिडेंटनी औंध जहागिरीतील काही अधिकाऱ्यांना कामावरून कमी केले होते.नाना फडणविसांनी नेमलेले कृष्णराव तात्या जोशी हे मख्य कारभारी होते. प्रतिनिधींच्याकडे इ.स.१८३६ च्या सुमारास घोडदळ-पायदळ सैनिकांची संख्या ४८७ एवढी होती. परशुरामपंत १0 मे, १८४८ रोजी सातारा येथे मरण पावले होते.[३]

इंग्रजांनी परशुरामपंतांच्या मृत्यूनंतर 'श्रीनिवासराव' यांना ११ जून, १८४८ रोजी जहागिरीचा कारभार सांभाळण्यास दिला होता. त्यावेळी साताऱ्यात राजमंडळाचा अधिकार होता. वार्टले फ्रेरर हे राजमंडळाचे प्रमुख होते. सातारा राज्य खालसा झाले होते. इंग्रज सरकार श्रीनिवास पंतप्रतिनिधींचा फारच मान राखीत होते. इंग्रज सरकारकडून इ.स.१८५४ मध्ये प्रतिनिधींना संस्थानची पूर्ण मुखत्यारी दिली होती. त्याचवेळी इंग्रजांना श्रीनिवासरावांशी तह करून दुअंमली गाव एक अंमली करून दिला होता. कऱ्हाड महालातील २२ गावे इंग्रजांनी सातारा प्रदेशात घेऊन पंतप्रतिनिधींना ७२ गावे व ३९ वाडयांचे संस्थान दिले होते. त्यामुळे श्रीनिवास पंतप्रतिनिधींनी कऱ्हाड ऐवजी आपली राजधानी औंध येथे केली होती.[४] इंग्रजांनी इ.स.१८५८ मध्ये कंपनीची सत्ता बरखास्त करून राणीच्या जाहीरनाम्यानुसार ब्रिटीश व्हॉईसरॉयमार्फत भारतीय संस्थानिकांना नवीन सनदापत्रे दिली होती. औंधच्या श्रीनिवासराव प्रतिनिधींना ११ मार्च, १८६२ रोजी व्हाईसरॉय कॅनिंगने नवीन सनद दिली होती. ब्रिटीशांनी दिलेल्या या सनदेमुळे पंतप्रतिनिधींना कायमस्वरूपी दत्तक घेण्याची परवानगी मिळाली, पण त्यामुळे कर्तव्यशून्य अशी मुले संस्थानात गादीवर आली. इंग्रजांनी श्रीनिवासराव प्रतिनिधींची मुंबई कायदेमंडळावर निवड केली होती.[५]

श्रीनिवासराव यांच्यानंतर परशुराम उर्फ दादासाहेब २0 फेब्रुवारी, १९0२ रोजी गादीवर आले पण त्यांच्या कारकिर्दीत इंग्रज व प्रतिनिधी यांचे संबंध बिघडले होते. दादासाहेबावर काही इंग्रज अधिकाऱ्यांना अपाय करण्याचा प्रयत्न केला, असा आरोप ठेवून त्यांना धारवाड येथील तुरूंगात ठेवले होते. तेथेच त्याचा १९0५ मध्ये मृत्यू झाला होता. औंध संस्थान १९0९ पर्यंत इंग्रजांच्या ताब्यात होते. त्यानंतर इंग्रजांनी दादासाहेबांचे चुलते भगवानराव उर्फ बाळासाहेब यांना गादीवर बसविले. त्यांना इंग्रजांनी १९३५ मध्ये 'राजा ऑफ औंध' ही पदवी दिली होती.

भवानराव श्रीनिवास तथा बाळासाहेब पंतप्रतिनिधी-

भवानराव श्रीनिवास तथा बाळासाहेब पंतप्रतिनिधी हे औंध संस्थानचे शेवटचे पंतप्रतिनिधी असून त्यांचा जन्म इ.स.१८६८ मध्ये झाला.

भवानराव श्रीनिवास मुंबई विद्यापीठाचे पदवीधर असून सर्वगुणसंपन्न होते . ते उत्तम वक्ता, लेखक, वाचनाची आवड, ज्येष्ठ चित्रकार, उदारमतवादी, अर्थशास्त्राचे अभ्यासक, समाजसुधारक होते . त्यांनी औंध संस्थानात अनेक सुधारणा केल्या होत्या .

रयत सभा-

बाळासाहेब पंतप्रतिनिधी हे संस्थानाचे अधिपती असताना ते लोकांचे प्रश्न समजून घेण्याचा सतत प्रयत्न करीत असत . त्यांनी ३१ ऑक्टोबर १९१७ रोजी औंध येथे पहिली रयत सभा भरविली . या सभेसाठी औंध संस्थानातील ७२ गावातील प्रतिनिधी बोलविले होते . या सभेत प्रतिनिधीनी लोकांना त्यांच्या समस्या, कर सवलत, रस्ते, तगाई कर्ज, धर्मशाळा व मंदिरे इत्यादींच्या मागण्या विचारल्या . सभेला दूरवरून औंधला येणे लोकांच्या गैरसोयीचे होते . इ .स .१९२१ पासून दरवर्षीच्या जमाबंदीकरीता बाळासाहेब पंतप्रतिनिधी दौरा करीत असताना ते वेगवेगळ्या गावात रयत नामक सभा घेऊन लोकांच्या मागण्याची परिपूर्ती करीत असत .[६]

लोकप्रतिनिधी सभा-

संस्थानच्या अर्थसंकल्पावर चर्चा करण्यासाठी काही जाणकार लोकांना निमंत्रित करण्याची प्रथा त्यांनी सन १९२१ पासून सुरू केली . सन १९२४ पासून ३५ सदस्यांच्या एका प्रातिनिधीक सभेत अर्थसंकल्पावर चर्चा होऊलागली . या सभेत १० शासकीय अधिकारी, ७ शासननियुक्त सभासद आणि १८लोकनियुक्त सभासदांचा समावेश करण्यात आला होता . या रचनेनुसार कौन्सिलची सभा औंधच्या राजवाडयात १६ फेब्रुवारी, १९२४ रोजी दिवाणांच्या अध्यक्षतेखाली झाली . दुसरे अधिवेशन २४ डिसेंबर, १९२४ रोजी औंध येथे झाले . या अधिवेशनात पुढील वर्षीच्या अंदाजपत्रकावर चर्चा झाली . लोकप्रतिनिधी पंडित सातवळेकर आणि पंतप्रतिनिधीवर अधिवेशनात कडक टीका केली . त्यांनी दिलेली वचने पाळावीत . अंदाजपत्रकांचे उल्लंघन करू नये . या मागण्या राजांनी मान्य केल्या व अंदाजपत्रक मंजूर झाले . राज्याचे कर्ज, आर्थिक स्थितीचा अभ्यास करण्यासाठी सातवळेकर, पटवर्धन व शासकीय अधिकारी अशा तीन सदस्यांची समितीची मागणी मान्य झाली . सन १९२६ मध्ये प्रातिनिधीक सभेचे अधिकार वाढवून तिला विधिमंडळासारखे अधिकार वहाल करण्यात आले . सन १९२८ मध्ये प्रातिनिधिक सभेला आपला अध्यक्ष निवडण्याचा अधिकार मिळाला . मार्च १९२९ संस्थानात स्वतंत्र उच्च न्यायालयाची स्थापना करण्यात आला आणि अल्पावधीत म्हणजे डिसेंबरमध्ये पंतप्रतिनिधीनी घोषणा केली की, आपण पाच वर्षा त प्रजेला संपूर्ण स्वराज्य देऊ . एवढेच नव्हे तर 'रिस्पॉसिंबल गव्हर्नमेंट' या तत्त्वावर राज्यपद्धती निर्माण करण्यासाठी त्यांनी नवीन घटना तयार करण्याचे काम हाती घेतले . यासाठी नेमलेल्या समितीत रा .रा .काळे, वामनराव पटवर्धन, रघुनाथराव करंदीकर, गणपतराव अभ्यंकर व नरसिंह चिंतामण केळकर वगैरेंचा समावेश होता .[७]

प्रजा परिषद-

मे १९३१ रोजी औंध संस्थानात प्रजा परिषद स्थापन करण्यात आली . डिसेंबर १९३१ मध्ये व्यवस्थित स्वरूपात संघटित केलेल्या प्रतिनिधी सभेने बरेच कार्य केले . पंडित श्री .दा .सातवळेकर, ना .गो .चाफेकर, बाग्भट नारायण देशपांडे, लक्ष्मणराव किर्लोस्कर, जनन्नाथ महाराज पंडित यांच्यासारख्या बुद्धिवंताचा संस्थानाच्या कारभारात सहभाग होता . संगीत, चित्रकला, नाटक, कीर्तन, व्यायाम यांची आवड असलेले भवानराव यांनी राज्यकारभार लोकाभिमुख करण्यासाठी विविध उपक्रम हाती घेतले .[८]

सन १९३८ सालचा दुष्काळातील शेतकऱ्यांच्या मागण्या-

औध संस्थानात सन १९३८ मध्ये दुष्काळ पडला होता . या दुष्काळात आटपाडी भागातील २००० हजार शेतकऱ्यांनी २१ एप्रिल, १९३८ रोजी औंध येथे रूस्तूमराव देशमुख, कलाल, मेस्त्री, देशपांडे इत्यादींच्या नेतृत्त्वाखाली मोर्चा काढला होता . त्यावेळी शेतकऱ्यांचे कराचे ओझे कमी करा, प्रजेला स्वातंत्र्य द्या . इत्यादी मागण्या केल्या होत्या . शेवटी शंकरराव देव यांनी केलेल्या मध्यस्थीमुळे हा मोर्चा मागे घेतला गेला .[९]

भवानराव श्रीनिवास पंतप्रतिनिधींची घोषणा-

भवानराव श्रीनिवास पंतप्रतिनिधी यांनी २३ नोव्हेंबर, १९३८ रोजी घोषणा केली की, औंध राज्याची सत्ता जनतेकडे सोपवून स्वतः एक नागरिक म्हणून जीवन जगणार आहे . तशी घटना तयार करून त्यांनी महात्मा गांधीजी व पंडित नेहरू यांना दाखविली . या घटनेत गांधीजींनी काही दुरूस्त्या सुचविल्या त्या दुरूस्त करण्यात आल्या . २१ जानेवारी, १९३९ रोजी कौन्सिलने घटना स्वीकारली . याच दिवशी ग्रामराज्य शासन पद्धती निर्माण करणारी नवीन राज्यघटना अमंलात आणली .[१०] रयत सभेने सुरू झालेला हा घटनात्मक विकास स्वराज्याच्या घोषणेने पूर्ण झाला . १९ फेब्रुवारी १९४८ रोजी भवानराव श्रीनिवास पंतप्रतिनिधी यांच्या कारकिर्दीत औंध संस्थान स्वतंत्र भारतात विलीन झाले . त्यावेळी मुंबई सरकारमार्फत भवानराव श्रीनिवास पंतप्रतिनिधी यांना ७५,२१२ रू . तनखा मंजूर केला होता .[११] औंधचे पंतप्रतिनिधी अखेरपर्यंत इंग्रजांशी एकनिष्ठ राहीले होते . पंतप्रतिनिधींनी इंग्रजांना सर्व प्रकारची मदत केली होती .

सारांश-

औंध संस्थानात एकूण ९ महाराजांनी राज्य केले होते . परंतु बाळासाहेब पंतप्रतिनिधी यांनी औंध संस्थानात फार मोठया प्रमाणात सुधारणा

केलेल्या होत्या . यामध्ये रयत सभेत प्रतिनिधीनी लोकांना त्यांच्या समस्या, कर सवलत, रस्ते, तगाई कर्ज, धर्मशाळा व मंदिरे इत्यादींच्या मागण्या विचारून त्या पूर्णत्वास नेण्याचा प्रयत्न केला . औंध संस्थानात प्रातिनिधीक सभेची निर्मिती करून प्रातिनिधीक सभेचे अधिकार वाढवून तिला विधिमंडळासारखे अधिकार वहाल केले . प्रजा परिषदेची निर्मिती केली . औंध राज्याची सत्ता जनतेकडे सोपवून स्वतः एक नागरिक म्हणून जीवन जगणार आहे . अशी क्रांतिकारी घोषणा बाळासाहेब पंतप्रतिनिधीनी केली . प्रजेला अधिकार देण्यास उत्सुक असलेले बाळासाहेब पंतप्रतिनिधीसारखे संस्थानिक त्या काळात निदान महाराष्ट्रात तरी नव्हते . म्हणून औंधसारख्या छोटया संस्थानाच्या मोठया मनाच्या राजाने अवलंबलेल्या प्रगतिशील धोरणांचे इतर संस्थानिकांनीही अनुकरण करावे असे महात्मा गांधीनी आवाहन केले होते . यावरूनच बाळासाहेब पंतप्रतिनिधी यांच्या कार्याचे महत्त्व समजते .

संदर्भ-

१) पाठक अरूणचंद्र (संपा .), सातारा जिल्हा गॅझेटियर, महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ, मुंबई, १९९९, पृ . १९o

२) Oglivy T., Memior of Satara territories, Selection from the Bombay Govt. Records (New Series), Vol.XLI, Bombay 1857,, P.67

३) Ibid, P.31

४) भागवत अनंत नारायण - सातारच्या प्रतिनिधी घराण्याचा इतिहास, पुणे, १९६२, पृ . ११७

५) Aitchison C.U., A collection of Treaties, Engagement and sanads relation to India and neighboring countries, Vol.VIII, Culcultta, 1882, P.146-148

६) पाठक अरूणचंद्र (संपा .), उपरोक्त, पृ . १९१

७) पंत अप्पा, मुलूखावेगळा राजा, १९८६, पृ . ३३

८) कित्ता, पृ . ३४

९) पटवर्धन व्ही . ए . , दक्षिण महाराष्ट्रातील स्वातंत्र्याच्या विलीनीकरणाची कथा, पुणे, १९६६, पृ . ८७

१o) चापेकर ना . गो . , आत्मवृत्त, १९४३, पृ . १o९

११) Loughnan and Sandford - Brief Notes on Satara Jageerdars, Satara, 1854, P.19

50. कोल्हापूरचा वारसाप्रश्न आणि अनुबाई घोरपडे

डॉ. सौ. शर्मिला अशोक सावळे
सहाय्यक प्राध्यापक
राजर्षी शाहू कला व वाणिज्य
महाविद्यालय, रूकडी. कोल्हापूर.

कु. भोसले शुभांगी भैरवनाथ
संशोधक विद्यार्थिनी
इतिहास अधिविभाग
शिवाजी विदयापीठ,कोल्हापूर.

प्रस्तावना –

मराठयांच्या स्वराज्याची विभागणी झाल्यानंतर वारणेचा तहाने शाहू व संभाजी यांनी एकमेकांच्या स्वतंत्र राज्यांना संमती दिली. शाहू महाराजांनी स्वतः राजकारणात लक्ष कमी देऊन पेशव्यांना अधिकार बहाल केले. त्यामुळे शाहूनंतर सर्व निर्णय पेशवा घेऊलागला. संभाजी महाराजांच्या मृत्यूनंतर त्यांना वारस नसल्याने पेशव्यांना कोल्हापूरच्या राज्यांचा मोह झाला व त्यांनी कोल्हापूरचे राज्य जप्त करण्याचा घाट घातला. यावेळी त्यांना सर्व माहिती पुरवणारी नानासाहेबांची आत्या अनुबाई ही घोरपडे संस्थानची जहागीर चालवित होती. करवीर व इचलकरंजीकर घोरपडे यांच्यात सतत वाढ निर्माण होत. कारण घोरपडे स्वतःस पेशव्यांचे जहागिरदार समजत. परंतु त्यांचे संस्थान कोल्हापूरशी अगदी जवळ होते व कोल्हापूर राज्यातील प्रदेश त्यांना जहागिरी म्हणून मिळालेला होता. हे मात्र ते पूर्णपणे विसरलेले होते. अनुबाईने कोल्हापूरातील सर्व घडामोडी पेशव्यांपर्यंत पोहचविल्या व तिलाही कोल्हापूरचे राज्य पेशव्यांच्या राज्यात सामील व्हावे असे वाटत होते म्हणून तिने कोल्हापूर विरोधात हालचाली केल्या. प्रस्तुतच्या शोधनिबंधामधून करवीरचा वारसाप्रश्न व त्यामधील अनुबाईची भूमिका यांचा अभ्यास करण्यात आलेला आहे.

अनुबाईचे घराणे –ः

अनुबाई ही पहिला पेशवा श्री बाळाजी विश्वनाथ यांची कन्या होती. बाळाजी विश्वनाथ हे कोकणातील श्रीवर्धन गावचे देशमुख होते. राजाराम महाराजांच्या काळातच ते या प्रदेशात आले. व नंतर शाहूच्या पक्षात सामील झाले. इ.स. १७१० साली धनाजी जाधवांच्या मृत्यूनंतर शाहूने त्यास 'सेनाकर्ते' हे पद दिले बाळाजी विश्वनाथास बाजीराव, चिमाजीअप्पा, भिमाबाई व अनुबाई अशी चार अपत्ये होती. अनुबाई ही बाळाजी विश्वनाथ यांची सर्वात लहान कन्या होती.

नारो महादेव –ः

मुळचे कोकणातील जोशी असणारे नारो महादेव हे वडिलांच्या मृत्यूनंतर घाटावर आले संताजी घोरपडे यांनी त्यास मानसपुत्र मानले त्यामुळे नारो महादेव यांनी सदैव पुत्रवत त्यांची सेवा केली. त्यामुळे संताजी घोरपडेंच्या कापशी संस्थानातील इचलकरंजी हे ठिकाण घोरपडयांनी नारो महादेवास दिले. त्यामुळे नारो महादेव यांनी घोरपडे हे नाव धारण करून इचलकरंजी येथे संस्थान वसविले. त्यांनी पेशव्यांच्या सहाय्याने व कोल्हापूरकर छत्रपतिंशी सख्य ठेवून रूई, रांगोळी, चिकोडी, मनोळी, आजरा इ. चा प्रदेश मिळवला. इचलकरंजीकरांना मिरज प्रांतातील देशमुखी व सरदेशमुखी तर इचलकरंजी व आजरा येथील मोकासा देण्यात आलेली होती.

इचलकरंजी संस्थान –

इचलकरंजी संस्थान कोल्हापूरपासून २९ कि. मी. अंतरावर आहे. याठिकाणी सन १७३९ साली व्यंकटरावांनी ठाणे वनविण्यास सुरवात केली.

घोरपडे व पेशवा संबंध –

अनुबाई ६/७ वर्षाची झाल्यानंतर तत्कालिन परंपरेनुसार त्यांसाठी योग्य वर बाळाजी पंत शोधत असताना नारो महादेव यांचा पुत्र व्यंकटराव यांचा विवाह झालेला नव्हता. त्यांस ते योग्य वाटले नारोपंतासही हा संबंध प्रिय वाटून त्यांनी उपाध्ये हरभटजी वावा यांच्या विदयमाने बोलणे होऊन अनुबाई व व्यंकटराव यांचा विवाह इ.स. १७१३ साली सातारा येथे झाला.

कोल्हापूर व इचलकरंजी संबंध –

वारणेच्या तहानंतर कोल्हापूर व सातारा यांचे संबंध चांगले होते. तसेच संभाजी हयात असतानाही इचलकरंजीकरांचे व कोल्हापूरचे संबंध चांगले होते. छत्रपति संभाजी यांनी अनुबाई यांच्या नावे नारायणराव घोरपडे यांस आज–याची वहिवाट असून ती कायमस्वरूपी केल्याची एक नक्कल नानासाहेब पेशवे यांनी पाठविली. यावेळी जिजाबाई व अनुबाई यांचेही संबंध मैत्रीचे होते. त्यांनी संभाजी महाराजांच्या निधनापूर्वी पाठविलेल्या दि. २०.०७.१७६० रोजीच्या पत्रानुसार अनुबाईना खुशाली विचारून त्यांना वस्त्रे पाठविली होती. यावरून कोल्हापूर दरबाराकडून इचलकरंजीकरांना कोण्त्याही प्रकारचा उपद्रव न देता त्यांच्याशी मैत्रीपूर्व व्यवहार होते. मात्र अनुबाई पेशव्यांच्या घराण्यातील असल्याने व नानासाहेब पेशवे व त्यांचे बंधू हे अनुबाईचे भाचे असल्यामुळे त्यांनी पेशव्यांच्या हिताचे धोरण अवलंबले.

संभाजी महाराजांचा मृत्यू –

संभाजी महाराजांचा मृत्यू टोपनजीकच्या माळावर झाला. यावेळी पेशव्यांनी छत्रपतिंच्या मृत्यूबद्दल शोक व्यक्त करणारे व राण्यांना सात्वंन देणारे पत्र पाठविणे हाही शिष्टाचार पाळला नाही. तसेच इचलकरंजीकरांशीही मैत्रीचे संबंध असताना व कोल्हापूरपासून हे संस्थान जवळ असताना इचलकरंजीकर छत्रपतिंच्या शोकसभेस हजर न राहिल्याने जिजाबाईना राग अनावर झाला. व तशा आशयाचे पत्र त्यांनी नारायणराव घोरपडे यांना लिहिलेले होते. (दि. २०.१.१७६१)

वारसाप्रश्न व अनुबाई –

संभाजी महाराजांच्या मृत्यूनंतर करवीर दरबारात घडणा–या सर्व घटना पेशव्यांपर्यंत पोहचविण्याचे काम अनुबाईतर्फे होत असे. अनुबाईनी करवीरचे राज्य पेशव्यांच्या राज्यात सामील व्हावे यासाठी प्रयत्न चालवले होते. संभाजी महाराजांच्या मृत्यूनंतर पेशव्यांनी त्यांच्या निधनाचा शोक व्यक्त करून त्यांच्या राण्यांना सात्वंनपर पत्र पाठविण्याचा शिष्टाचारसुध्दा पाळला नाही. उलट राज्यास कोणी वारस नाही म्हणून राज्यावर जप्तीसाठी फौज

पाठविली व कोल्हापूरचे राज्य जप्त करण्याची कामगिरी इचलकरंजीच्या जहागिरदारांवर सोपविली . पेशव्यांनी जप्तीची फौज पाठवून दिल्यामुळे जिजाबाईना संताप अनावर झाला . व कुसाबाई गरोदर असल्याची बातमी त्यांनी नारायणराव घोरपडे यांना दि . २0 . 0१ . १७६१ रोजीच्या पत्रातून दिली . यानंतर अनुबाईनी ही बातमी नानासाहेबांना पोहचविली व रघुनाथरावांनी दि . २६ . ४ . १७६१ रोजीच्या पत्रामध्ये अनुबाई यांनी कोल्हापूरला जाऊन कुसाबाई गरोदर असल्याचे निश्चित करण्यास सांगितले . त्यानुसार अनुबाई कोल्हापूरास जाणार होत्या . मात्र त्यांना नानासाहेबांनी टोक्यास बोलावल्यामुळे त्यांनी ती जबाबदारी व्दारकाबाई घोरपडे यांच्यावर सोपविली व त्यांनी ती पूर्ण करून कुसाबाई गरोदर असल्याची बातमी अनुबाईना दिली . पेशव्यांनी कुसाबाई गरोदर असल्याच्या कारणामुळे जप्तीची फौज परत मागविली . दि . २६ . ५ . १७६१ रोजी जिजाबाई यांनी अनुबाईना कुसाबाई प्रसुत होऊन राजपुत्र झाल्याबद्दल पत्र लिहून साखर पाठविली त्यामध्ये असा मजकूर होता .

श्री पुण्यशील अनुबाई यांना श्रीमंत महाराज मातुश्री जिजाबाईसाहेब यांनी आज्ञा केली ऐसी की, चिरंजीव कुसाबाई वैशाख वहुल सप्तमी इंदुवारी पाच तास रात्रीस प्रसुत झाल्या . राजकुंवर जन्मास आले . तुम्हांस कळवावे यास्तव आज्ञा केली असे . तुम्हा करणे साखर पाठविली असे, घेऊन स्विकार करणे जाणिजे छ . २१ माहे सवाल वहुत काय लिहिणे

लेखन सीमा वार यावेळी कुसाबाईना मुलगी झाली होती . मात्र जिजाबाईनी पेशव्यांच्या जप्तीची फौज परत पाठवण्यासाठी मुलगा झाल्याची अफवा पसरविली . त्यानंतर पानिपतच्या युध्दात मराठयांचा पराभव झाला व त्या धक्कयाने नानासाहेबांचा मृत्यू झाला . त्यामुळे करवीर राज्याच्या विलीनीकरणाची मोहिम अर्धवटच राहिली त्यानंतर जिजाबाई यांनी स्वतः पुण्यास जाऊन माधवरावांची भेट घेतली व कुसाबाईंना मुलगा झाला नसून मुलगी झालेली आहे असे स्पष्ट केले व आपल्या पसंतीचा वारस दत्तक घेण्यास पेशव्यांची संमती मिळवली .

निष्कर्ष –

1. इचलकरंजीचे घोरपडे कोल्हापूरच्या प्रदेशातील जहागिरीवर असताना त्यांनी पेशव्यांच्या बाजूने सतत धोरण आखले .
2. पेशव्यांच्या बरोबर नातेसंबंध निर्माण झाल्यामुळे त्यांनी कोल्हापूरच्या राजकारणात सतत पेशव्यांची बाजू घेतली .
3. अनुबाई ही बाळाजी विश्वनाथांची मुलगी वडिलांसारखीच शूर होती . ती पती निधनानंतर इचलकरंजीचा कारभार पाहत होती .
4. पेशव्यांच्या सैन्याबरोबर फौजेनिधी अनुबाई सतत मोहिमेवर असत .
5. जिजाबाईंच्यावर पेशव्यांचा जेवढा विश्वास नव्हता त्यापेक्षा कितीतरी अधिक अनुबाईंवर होता .

संदर्भ –

1. खरे वा . वा . इचलकरंजी संस्थानचा इतिहास इचलकरंजी दप्तरातून निवडलेले कागदपत्रे पृ . क्र . २६, २७
2. किला पृ . क्र . ४७
3. किला पृ . क्र . २७
4. आप्पासाहेब पवार (संपा) जिजाबाईकालीन कागदपत्रे पत्र क्र . १५ दि . २४ . ७ . १७५३ पृ . क्र . १६
5. उपरोक्त कागदपत्रे पत्र . क्र . ३८ दि . २0 . ७ . १७६0 पृ . क्र . ४३
6. उपरोक्त कागदपत्रे पत्र . क्र . ४२ दि . २0 . १ . १७६१
7. वा . वा . खरे इचलकरंजी संस्थानचा इतिहास पृ . क्र . ८७
8. जिजाबाईकालीन कागदपत्रे पत्र . क्र . ४२, २0 . 0१ . १७६१
9. वा . वा . खरे उपरोक्त पृ . क्र . ५८
10. जिजाबाईकालीन कागदपत्रे पत्र . क्र . ४५, २६ . 0५ . १७६१

51. जत संस्थानातील स्वातंत्र्य चळवळ : विशेष संदर्भ प्रजापरिषदेचे पहिले अधिवेशन १९३८'

प्रा. सुरेश मारूती चव्हाण
इतिहास विभाग प्रमुख,
ओंकार महाविद्यालय,गडहिंग्लज

प्रस्तावना :

इतर संस्थानांच्या तुलनेत जत संस्थानातील प्रजापरिषदेची स्थापना थोडीसी उशिराच झाली होती. यास काही कारणेही कारणीभूत होती. ती म्हणजे संस्थानी प्रजेत राजकीय जागृती व आकांक्षा यांसारख्या गोष्टींचा अभाव होता. भौगोलिक रचनेमुळे या संस्थानावर नेहमीच अवकृपा झालेली होती. संस्थानाचा सुमारे २/३ भाग हा डोंगराळ स्वरुपाचा होता. शेती हाच येथील लोकांचा ;जनतेचाद्ध मुख्य व्यवसाय होता. शेती ही पावसावर अवलंबून असल्याने शेतकऱ्यांना हमखास उत्पन्नाची हमी नव्हती. समाजात छोटे शेतकरी व मजुरांचाच भरणा अधिक होता. नैसर्गिक साधनसंपत्तीच्या अभावामुळे उद्योग धंद्याचा विकासही झालेला नव्हता. बैलगाडी हे वाहतुकीचे एकमेव साधन असून दळणवळणाची साधने अतिशय तुटपुंजी होती. विजापूर—चिपळूण—गुहाघर हा जतमधील प्रमुख रस्ता वगळता बहुतांशी रस्ते कच्च्या स्वरुपाचे होते. जत संस्थानात ११९ खेडी असूनही फक्त ६० शाळा ज्ञानदानाचे काम करत होत्या. पैकी काही शाळा चौथीपर्यंत काही शाळा सातवीपर्यंत शिक्षण देणाऱ्या होत्या. जतमध्ये एकमेव हायस्कूल होते. या सर्वच कारणामुळे संस्थानातील प्रजा अज्ञानी व मागासलेली अशीच होती. याशिवाय अधिपतींचा आपल्या संस्थांनातील प्रजेबद्दल उदार दृष्टीकोण नव्हता. श्रीमंत विजयसिंहराव डफळे हे १९२८ मध्ये जत संस्थानचे अधिपती बनले होते. ते उच्चविद्याविभूषित, हुशार, धूर्त आणि मुत्सद्दी राजकारणी होते. त्यांना आपल्या संस्थांनाबाहेरच्या जगामध्ये घडणा—या सर्व घडामोडींचे ज्ञान होते. पण आपल्या प्रजेला मात्र मुलभूत हक्क व राजकीय स्वातंत्र्य यांचा लाभ करून देण्याची त्यांची मनापासून इच्छा नव्हती. आपल्या संस्थानावरील एकतंत्री अधिकारांवर गदा येऊ नये म्हणून इतर संस्थानातील राजकीय सुधारणांचे वारे आपल्या संस्थानात येणार नाही यासाठी ते सदैव दक्ष असत,पण असे असले तरी इतर संस्थानातील राजकीय चळवळीचे पडसाद जत संस्थानरवर उमटल्याशिवाय राहिले नाहीत.या संस्थानातील प्रजेत राजकीय जनजागृती करण्यासाठी दक्षिण महाराष्ट्र व कर्नाटक संस्थानाचे अध्यक्ष भाई माधवराव बागल ,देशभक्त रत्नाप्पा कुंभार, तात्यासाहेब शिखरे,कर्नाटक प्रांतिक कॉंगेस अध्यक्ष गंगाधरराव देशपांडे, यांनी अविश्रांत प्रयन्त केले आणि यातूनच जत संस्थानातील प्रजापरिषदेचा उदय झाला.[१]

सभोवतालच्या जनजागृतीचा परिणाम जत संस्थानावर झालेचे लक्षात येताच बदलत्या काळाचे महत्त्व जाणून श्रीमंत राजेसाहेबांनी ३०/०७/१९३८ रोजी शेतकऱ्यांना शेतसाऱ्यांत सूट दिल्याचे घोषित केले. लोकल बोर्डाची मतदारसंख्या वाढावी म्हणून मतदानाचा हक्क विस्तृत केला. दरम्यानच ग्रामपंचायती कायदा लागू करून उमदी व बिळूर या ठिकाणी ग्रामपंचायती अस्तित्वात आणण्यात आल्या. पुढे १२/१०/१९३८ रोजी जत संस्थानाच्या अधिपतींनी खेडयातील प्रमुखांना बोलावून त्यांच्या समोर संस्थानात कायदेमंडळ स्थापन्याची घोषणा केली. वनचराई कर रद्दबातल केला. याशिवाय १९३४—३५ अखेरीची सारामाफीची सूट देऊन किरकोळ आणखी सवलती देण्यात आल्या होत्या.[२]

जत प्रजापरिषदेचे पहिले अधिवेशन —१९३८

जत संस्थान प्रजापरिषदेचे पहिले अधिवेशन बिळूर या ठिकाणी १० व ११ डिसेंबर १९३८ रोजी भरले होते[३]. कर्नाटक प्रदेश कॉंग्रेसचे कर्तबगार अध्यक्ष गंगाधरराव देशपांडे हे या अधिवेशनाचे अध्यक्ष होते,तर स्वागताध्यक्ष निंगाप्पा रूद्राप्पा निंगनूर हे होते. हे पहिले वहीले अधिवेशन अनेक दृष्टीकोनांतून संस्मरणीय असे ठरले, कारण मागील पंधरावीस वर्षांत येथे कोणत्याही प्रकारची परिषद भरली नव्हती. त्यामुळे आता लोकांना एक प्रकारचा उत्साह वाटत होता. आजूबाजूच्या सर्व संस्थानात परिषदा भरत असल्याने तेथील जनतेला मोठे वैषम्य (वेगळेपण) वाटत होते. पण राजेसाहेबांनी अनुमती दिल्याशिवाय काहीही होऊ शकत नव्हते. याची जनतेला जाणीव होती. त्यामुळे आतापर्यंतच्या नागरिकांच्या उत्साहावर विरजण पडले यात नवल नव्हते. पण अलीकडच्या काळात दक्षिण महाराष्ट्रातील संस्थानी राजकारणास जे नवे वळण मिळाले. त्याचाच परिणाम जतच्या श्रीमंत राजेसाहेबांवर झाल्याने त्यांनी परिषद भरविण्यास मान्यता दिली.[४]

या अधिवेशनाच्या निमित्ताने खेडयापाडयांत बरीच जनजागृती झाल्यामुळे अधिवेशनाला सुमारे दहा हजारच्या वर जनसमुहाची उपस्थिती होती. बहुसंख्य स्त्रिया ही परिषदेच्या मंडपात हजर होत्या.अधिवेशनासाठी जतबरोबरच सांगली व कर्नाटकातून आलेली बरीच मंडळी उपस्थित होती.[५] तसेच याअधिवेशनास निजलिंगाप्पा अंबली, वस्ताद, अंगडी, राजाराम दुबे, शंकरगोंडा पाटील, रत्नाप्पा कुंभार , तात्यासाहेब शिखरे इत्यादी नेते, रामभाऊ नणंदीकर, जीवाप्पाण्णा देशपांडे वकील, कल्लाप्पा गुरव, बाबूराव आरळी मोगली, हवालदार इत्यादी स्थानिक कार्यकर्ते व जवळपासच्या गावातील अनेक तरूण स्वयंसेवक म्हणून हजर होते . यावेळी बिळूर या छोटया गावाला एखादया यात्रेचेच रूप आले होते. घरघरांतील महिलांनी सर्व कार्यकर्ते व पुढाऱ्यांना सुग्रास जेवण करून घालण्याचा बेत आखाला होता. अशा वातावरणात हजारोंच्या उपस्थितीत जतचे ज्येष्ट नागरिक व मुंबई असेंब्लीचे उपाध्यक्ष नारायणराव जोशी यांच्या हस्ते झेंडावंदन होऊन अधिवेशनाला प्रारंभ झाला. अधिवेशनाचे चिटणीस रामभाऊ नणंदीकर यांनी अधिवेशनासाठी दूर वरून आलेले शुभसंदेश वाचले. संदेशवाचनानंतर अधिवेशनाचे अध्यक्ष कर्नाटकसिंह गंगाधरराव देशपांडे यांचे कानडीतून अध्यक्षीय भाषण झाले. ते आपल्या भाषणात म्हणाले की, संस्थानचे खरे वैभव शेतकऱ्यांच्या झोपडीत आहे. राजा हा प्रजेचा सवेक आहे. राजा व प्रजा यांच्यामध्ये कलह नसावा.

संस्थानिकांना आता ब्रिटिश सरकारचा पाठिंबा नाही. त्यांना आता कॉग्रेस सरकारचा पाठिंबा आहे. कॉग्रेसचे बळ आता वाढले आहे. ती आता संस्थानी प्रजेकडे लक्ष देईल. संस्थानी प्रजेला स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी आम्ही प्रयत्न करू हे सर्वांनी लक्षात ठेवावे.

अधिवेशनाचा समारोप करताना पुढे ते म्हणाले की, प्रजेने आपली संघटना करावी. आपल्या मागण्या निर्भिडपणे राजासमोर ठेवाव्यात. आपल्या चळवळीत सत्य व अहिंसा या तत्त्वाचे पालन करा. तुमच्या न्याय मागण्यास कॉग्रेस नेहमीच पाठिंबा देईल. या प्रजापरिषदेच्या कार्यात राजाने सहकार्य केल्यास आपल्या सर्वांचे कल्याण होईल[६]. या अधिवेशनामध्ये अनेक विषयावर चर्चा करण्यात आली आणि एकूण ३०—३५ ठराव बहुमताने मंजूर करून ते दरबाराकडे पाठविण्याचे ठरले. त्यातील तीन महत्त्वाचे ठराव पुढीलप्रमाणे होते.

१. शेतसाऱ्यांत झालेली अन्यायी वाढ रद्द करण्यात यावी.

२. प्रजेला जबाबदार राज्यपध्दती देण्यात यावी.

३. शेतक—यांची कनिष्ठ अवस्था सुधारण्यासाठी अधिपतींबरोबर चर्चा घडवून आणण्यासाठी ९ लोकांची समिती नेमण्यात यावी.

त्यानंतर अधिवेशनाचे अध्यक्ष गंगाधरराव देशपांडे व प्रजापरिषदेचे इतर नेते यांनी राजसाहेबांची भेट घेवून त्यांचेशी चर्चा केली. पुढे प्रजेच्या मागण्यांना राजेसाहबांनी आपली मान्यता देशपांडे यांना तारेने कळवली.[७]

अधिपतींकडून सवलतींची घोषणा :

प्रजापरिषदेच्या पहिल्या अधिवेशनानंतर संस्थानातील प्रजेत आपल्या हक्काबद्दल मोठी जागृती घडून आली होती. त्यामुळे अधिपती श्रीमंत विजयसिंहराजे डफळे यांनी आपल्या दहाव्या राज्यारोहण समारंभप्रित्यर्थ दिनांक १२ जानेवारी १९३९ रोजी आपल्या प्रजेला काही सवलती दिल्या त्या पुढीलप्रमाणे

१. राज्यात ;संस्थानातद्ध कायदेमंडळाची स्थापना शक्य तितक्या लवकर केली जाईल.

२. शेतकऱ्यांच्या कर्जनिवारणा बाबत योग्य ती उपाययोजना अमलात आणली जाईल.

३. लोकल बोर्डाला जादा निधी उपलब्ध करून दिला जाईल.

४. राज्यातील वेठबिगारीची पद्धत बंद करण्यात येईल.

५. शेळया —मेंढया खेरीज इतर जनावरांवरील वनचराई माफ केली जाईल.

६. राज्यात आणेवारी पद्धतीची अंमलबजावणी करण्यात येईल.

७. वैयक्तिक गरजेसाठी मीठ तयार करण्यात येईल.

८. शेतसाऱ्या पोटी जप्त करण्यात आलेल्या जमिनी १ वर्षांच्या आत निम्मी किंवा थोडी अधिक रक्कम भरणाऱ्यास परत दिल्या जातील.

९. शेतकऱ्यांनी थकीत शेतसाऱ्यापैकी ७०: रक्कम दीड वर्षाच्या आत भरल्यास त्यांना उरलेली ३० :रक्कम सारासूट म्हणून देण्यात येईल[८].

याशिवाय भावी विधीमंडळात निम्मे सरकारी निम्मे लोकनियुक्त सभासद घेण्याची मनिषा त्यांनी बोलून दाखविली. त्यासबंधीचे काम वामनराव पटवर्धन व कुलकर्णी वकील यांचेकडे सोपविले हाते. पण श्री. पटर्वधनांच्या आजरपणामुळे व श्री कुलकर्णी यांच्या निधनामुळे यात कसलीच प्रगती झाली नसल्याचा खुलासाही अधिपतींनी आपल्या भाषणात केला होता[९].

संस्थानातील प्रजापरिषदेचे कार्यकर्ते :

उमदी : श्री.बापू आरळी श्री.पंढरी पोतदार,श्री.मळसिद्दा आवटी व श्री कलाप्पाणा होर्ती

मुचंडी : श्री.शंकर पाटील आणि श्री पाडुरंग गुरूजी,

होसपेट : श्री. कमलाकर देसाई,

हळ्ळी : श्री अण्णाराव खवेकर श्री.अंगडी

उमराणी : श्री. बाळेशा वठारे, श्री.दत्तात्रय पुरोहीत,श्री. रामगोंडा,श्री बिराजदार

बिळूर : श्री. व्यंकटेश विजापुरे, श्री. धनजय कुलकर्णी ,श्री नणंदीकर

संख : श्री. बिराजदार, श्री. रामगोंडा पाटील, श्री बंडा परोळकर, श्री.भीमाशंकर कन्नुरे

शेगांव : श्री नाईक ,श्री पांडुरंग निकम, श्री बंडा कुलकर्णी

डफळापूर : श्री चन्नप्पा दुगाणी, बाबासाहेब शिंदे, श्री पंडीतकाका, परूळेकर, श्री. हिंदुराव पाटील

जत: श्री रामभाऊ बोर्गीकर , श्री.गिरमल्लाप्पा मोगली. [१०]

उपसंहार :

जत संस्थानच्या स्वातंत्र्य चळवळीत १९३८ मध्ये झालेले प्रजापरिषदेचे पहिले अधिवेशन अत्यंत महत्त्वाचे ठरले कारण या अधिवेशनामुळेच श्रीमंत अधिपतींना जनतेला द्यावच्या सुधारणांची घोषणा करणे भाग पडले यासुधारणांच्या संबंधी दैनिक केसरीने २८ जुलै १९३९ च्या अंकात ' जतच्या राजे साहेबांचे अभिनंदन' या मथळयाखाली पुढील वर्णन केले होते.'जतच्या तरूण राजेसाहेबांनी आपल्या ३०व्या वाढदिवसाच्या निमित्त आपल्या प्रजेला राजकीय अधिकार दान केल्याची घोषणा नुकतीच केली. या घोषणेत विधीमंडळाच्या क्षेत्राची मर्यादा व मंडळाचे अधिकार व त्यांचे स्वरूप काय राहील याचे दिग्दर्शनही केले. त्यावरून ती योजना विशेष प्रगतीवर नसली तरी लोकांच्या आशा—आकांक्षा वाढीस लावण्याचे श्रेय पटकावतील असे वाटते. विधिमंडळात लोकनियुक्त सदस्यांचे मताधिक्य रहाणार असून अंदाजपत्रकासंबंधी चर्चा करण्याचा, बिल मांडण्याचा व दरबाराने मांडलेले कायदे चर्चा करून मंजूर करण्याचा अधिकार मंडळास मिळणार आहे. यासंबंधीची अंमलबजावणी चालू वर्षाच्या आत करण्याचे आश्वासन राजेसाहेबांनी दिले आहे. तेव्हा या मुदतीत प्रजापरिषदेने वरील घोषणेचा सर्व बाजूंनी विचार करून काही विशेष दुरूस्ती सूचविल्यास खूपच बरे होईल. संस्थानाने लोकनियुक्त मंत्र्यांची नेमणूक केल्यास प्रजा व दरबार यांच्यातील सलोखा वाढविण्यास खूपच मदत होईल. जतसारख्या छोटेखानी संस्थानाने प्रजेस अधिकार दान देण्याची जी तत्परता दाखविली त्याबद्दल तरूण राजेसाहेबांचे कोणीही अभिनंदनच करेल.[११] शिवाय आत्मविश्वास वाढलेल्या कार्येकत्यांना जत संस्थान प्रजापरिषद चळवळीची पुढील दिशा निश्चित करता आली. म्हणूनच प्रजापरिषदेचे हे पहिले अधिवेशन जत संस्थानच्या वाटचालीत अविस्मरणीय असे ठरले.

संदर्भसूची :

१) वि.अ. पटवर्धन (संपादक) 'संस्थानातील लोकशाहीचा लढा' आर्यभूषण छापखाना पुणे. १९४० पा. नं. ३३१

२) कित्ता पा. नं. ३३२

३) दैनिक केसरी पुणे, १३ डिसेंबर १९३८

४) कित्ता

५) कित्ता

६) दैनिक केसरी, पुणे १६ डिसेंबर १९३८

७) दैनिक केसरी, पुणे. ७ फेब्रुवारी १९३९

८) दैनिक केसरी, पुणे. ३१ जानेवारी १९३९

९) वि. अ. पटवर्धन, उपरोक्त कित्ता, पा. नं. ३३३

१०) साप्ताहिक 'कृष्णाकाठ' सांगली, स्वातंत्र्यसैनिक जी. एल. पुरोहित लिखित 'इतिहास जत स्वातंत्र्य लढयाचा'लेखमालिका भाग—२, दि.१०/१२/२००१

११) दैनिक केसरी पुणे. २८ जुलै १९३९

52. फलटण संस्थानाचे अधिपती श्रीमंत मालोजीराजे यांचे शेती व उद्योग विषयक कार्य (१९१७ ते १९४८)

प्रा.डॉ. अनिल शिवाजी टिके
इतिहास विभाग,
मुधोजी महाविद्यालय, फलटण.

प्रास्ताविक ः

फलटण संस्थानचा प्राचीन व मध्ययुगीन काळाचा गौरवशाली इतिहास आहे. इ.स.१८१८ मध्ये मराठी सत्ता संपुष्टात आली. त्यानंतर संपूर्ण भारतात इंग्रजी सत्ता दृढमूल झाली. महाराष्ट्रातील जी १८ संस्थाने १८२० मध्ये एस.एम. सी. स्टेट म्हणून संबोधण्यात आली. त्यामध्ये फलटण संस्थानचा समावेश होता. इ.स.१२८४ ते १९४८ पर्यंत २५ सत्ताधिश होऊन गेले. त्यापैकी फलटण संस्थानचे शेवटची अधिपती श्रीमंत मालोजीराजे नाईक निवांळकर (१९१७ ते १९४८) यांच्या कालखंडातील फलटण संस्थानचा आर्थिक इतिहासाचा अभ्यास केलेला आहे.

मालोजीराजे यांचा जन्म ११ सप्टेंबर १८९६ रोजी निंभोरे येथे झाला. वडील रघुनाथराव संभाजीराव नाईक निंबाळकर हे फलटण संस्थानमध्ये पोलिस अधिकारी म्हणून नोकरीस होते. मालोजीराजांचा दि.१८ डिसेंबर १८९९ मध्ये दत्तक विधान समारंभ झाला. त्यांचे शिक्षण फलटण, कोल्हापूर, राजकोट येथे पूर्ण झाले. मुधोजी राजे यांनी त्यांना दत्तक घेतले होते. पुढे मुधोजी राजे यांचे वयाच्या ७९व्या वर्षी १७ आक्टोबर १९१६ रोजी निधन झाले. ब्रिटिश सरकारने मालोजीरावांना १५ नोव्हेंबर १९१७ मध्ये वयाच्या २१व्या वर्षी राज्याधिकार दिल्या नंतर राज्याभिषेक करून स्वतंत्र्य राज्यकारभार सुरू केला. आपल्या संस्थानात सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक सुधारणा केल्या. त्यापैकी या शोधनिबंधामध्ये आर्थिक सुधारणांच्या कार्याचा अभ्यास केलेला आहे.

निरा उजवा कालव्याचे योगदान ः

भारतात त्यावेळी ब्रिटिश सत्ता होती. भारतात दोन सरकारची सत्ता होती. एक संस्थानाची व दुसरी ब्रिटिशांची सत्ता होती. ब्रिटिशांनी देशात औद्योगिक व भौतिक सुधारणा कार्याला प्राधान्य दिले होते. फलटण संस्थानातून निरा उजवा कालवा (निरा राईट बॅक कॅनाल) चे काम चालू होते. त्याचा फायदा फलटण संस्थानाला १९२५ मध्ये झाला. निरा राईट बॅक कॅनालचे पाणी फलटण संस्थानातील शेतीला मिळू लागले. संस्थानात ऊसाच्या पिकाचे प्रमाण वाढले आणि शेतकरी एका वर्षात अधिक पिके घेऊ लागले व शेतीचे उत्पन्न वाढले.[१]

शेती सुधारणा ः उपाय योजना ः

१) पाण्याच्या पुरवठया शिवाय शेती धंदा स्थीर व उर्जितावस्थेत येणे शक्य नाही. तेव्हा शेतीस भरपूर पाणी पुरवण्याची व्यवस्था करणे.

२) पाण्याखालील शेतीस भरपूर भांडवलाच पुरवठा व तो वेळेवर मिळाला पाहिजे. तेव्हा पाण्याच्या जोडीस भरपूर भांडवल पाहिजे व ते शेतकऱ्यांना ते वेळेवर मिळाले पाहिजे.

३) बांध बंदिस्ती करून जमीन सुधारणे, उत्तम बि-बियाणांचा पुरवठा, निरनिराळी खते, बैल व अवजारे तसेच रोग प्रतिबंधक औषधे व फवारण्यास साधने ही सर्व उपलब्ध करून दिल्यास हमखास शेतीचे उत्पन्न वाढेल.

४) शेतकऱ्यांना घरखर्चास लागणारा रोख पैसा देणारी पीके उत्तमोत्तम पीके व त्यांचे पक्क्या मालात रूपांतर करून तो माल बाजारात आणल्याने हा फायदा शेतकऱ्यांना मिळवून देण्याच्या कामी प्रयत्न केरणे आवश्यक आहे.

५) विक्रीस आणलेला शेतकऱ्यांचा माल लवकर योग्य दरात, वाजवी कमिशन घेऊन प्रामाणिकपणे विकू करणाऱ्या संस्थेची आवश्यकता आहे. अनियंत्रित भरमसाठ नफा घेणारा मध्यस्थ नाहीसा झाला पाहिजे.

६) शेतकरी वर्ग अशिक्षित व अडाणी असल्यामुळे आधुनिक शेतीचे शास्त्रीय व तांत्रिक ज्ञान, व्यापारासंबंधी अडाखे, कोंबडयाची जोपासना, दुग्ध व्यवसाय वगैरे शेतीतील जोडधंदे वगैरेचे शिक्षण देणारी संस्था व तीही त्याचे व्यवसाय राखून याची माहिती करून देणारी अशीच पाहिजे. केवळ पुस्तकी ज्ञान देणारी व शेती व्यवसायापासून दूर नेणारी नसावी. हे कटाक्षाने पाळले पाहिजे.

शेतीस आर्थिक सहकार्य ः

शेतकऱ्यांचे खाजगी सावकारापासून मुक्तता करावयाची असेल तर सहकारी चळवळीस प्रोत्साहन दिले पाहिजे हे मालोजीरावांना माहित होते. म्हणून त्यांनी आपल्या संस्थानात सहकारी पतपेढया सोसायटया व बँक स्थापना केली. शेतकऱ्यांना कमी दरात कर्जपुरवठा केला. फलटण संस्थानात इ.स.१९१८ मध्ये दि फलटण बँक लिमिटेडची स्थापना करण्यात आली.[२] ही बँक जरी व्यापारी असली तरी संस्थानातील पतपेढयांना आर्थिक पुरवठा करीत असे राजेसाहेबांनी आपल्या संस्थानास सहकारी सोस्सायटीची स्थापना केली व आपल्या संस्थानात गरीब शेतकऱ्यांना कर्जपुरवठा केला. फलटण संस्थानात १९२६ मध्ये राजेसाहेबांनी श्री.लक्ष्मी सेंट्रल-को-ऑपरेटिव्ह बँकेमार्फत ६ लाख रूपयांचे कर्ज मिळवून दिले व या बँकेने संस्थानातील अनेक सहकारी सोसायटया व पतपेढयांना अर्थपुरवठा केलेला आहे. संस्थानात शेतकरी, बिगर शेतकरी लोकांच्या क्रेडीट सोसायतया मालोजीरावांच्या

प्रेरणेने गावोगावी निघाल्या आहेत . संस्थानात कांबळी तयार करणाऱ्या धनगरांची सोसायटी होती . तर साडी तयार करणाऱ्या विणकरांची ही सोसायटी कार्यरत होती . मुंबई प्रातांचे रजिस्टार व्ही . एस . भिडे, आय . पी . एस यांनी २८ नाव्हेंबर १९२७ रोजी बरड सोसायटीस भेट देऊन खालील समाधानाचे उद्‌गार काढले .

"I am glad to visit this society today. It is very satisfactory to note that for weaving, working very satisfactory and the members are realizing the advantage of having a society in their village. Weavers societies are generally not very successful but I am pleased to find this society an exceition to this rule."[४]

अशाप्रकारे मालोजीरावांनी फलटण संस्थानात शेती सहकार चळवळीला चालना देऊन आपल्या रयतेचे अनेक धार्मिक प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न केला . त्यात 'फलटण बँक व श्री लक्ष्मी बँकेचा सिंहाचा वाटा होता हे निर्विवाद होय .

शेती विषयक प्रदर्शन ः

१ ते ३ डिसेंबर १९२९ शेतकी प्रदर्शन श्रीमंत महाराज साहेब यांनी भरविले . निरा राईट बॅक कॅनॉल फलटण संस्थानातून गेल्यामुळे सुधारित शेती अवजारे रासायनिक खते इत्यादी ज्ञान असणे आवश्यक आहे दुभती जनावरे, शेतीची जनावरे, यंत्रे, इंजिन्स पाणी साधने ठेवलेली आहे . उत्तम नमुन्यास बक्षीस देण्यास फलटण शहर, लोणंद , पंढरपूर रस्त्यावर सदर्न मराठा रेल्वेचे लोणंद स्टेशन पासून १६ मैलावर आहे .

प्रदर्शनात खालील विभाग पाडून ठेवण्यात आले होते .

१) फळफळांचा विभाग

२) भाजीपालाविभाग

३) फळफळांच्या पासून तयार केलेल्या पदार्थांचा विभाग

४) ऊसाच्या पिकांचा विभाग

५) धान्य बि-बियाणे विभाग

६) वनस्पती संग्रहाचा विभाग

७) कापसाचा विभाग

८) कृषी संशोधन विभाग

९) खतांचा विभाग

१0) दुध-दुभत्यांचा विभाग

११) मुंबई इलाखा शेतकी खात्याचा विभाग

१२) स्पेशन इरिगेशन विभाग

१३) अवजारे विभाग

१४) सहकारी विभाग .[५]

शेतकऱ्यांना आधुनिक पद्धतीने शेती करता यावी व शेती किफायतशीर व्हावी व शेतकऱ्यांना उत्तेजन देणयसाठी इतर संस्थानात ही शेतकी प्रदर्शन भवली जात होती .

दि . फलटण शुगर वर्क्स (१९३३) ः

सन १९२५ मध्ये निरा उजवा कालवा सुरू झाल्यामुळे फलटण संस्थानातील बागायत क्षेत्र वाढू लागले . ऊस पैसा देणारे नगदी पीक असल्याने शेतकरी ऊस लावू लागले . हयाच वेळी मालोजीरावांना एखादा कारखाना असावा असे वाटले . त्यादृष्टीने प्रयत्न सुरू केले . सन १९२९-३0 मध्ये साखरवाडी येथे फलटण शुगर वर्क्स लि . या नावाचा साखर कारखाना काढण्यासंबंधी श्रीमान शेठ मफतलाल व आपटे या मंडळीशी वाटाघाटी करून व आवश्यक त्या सवलती प्रथम दहा वर्षे त्यांना देऊन ते काढला . या कामी धन्वंतरी डॉ . रा . ह . भडकमकर यांचे बहुमोल साहय झाले . त्यांना जमिनी ऊसाच्या लागवडीसाठी मिळवून तीस वर्षाच्या मुदतीने कराराने दिल्या . त्याच सुमारास म्हणून मुंबई सरकारने एक कमिटी नेमली गेली . त्यांच्या शिफारशीप्रमाणे भारतात लागणारी साखर येथेच तयार होईल व पुरवली जाईल . तेव्हा शेतकरी ऊसाची लागवड करतील व शेतीला कॅनॉलचे पाणी घेतील असा रिपोर्ट सरकारकडे सादर झाला . त्याचा परिणाम म्हणून श्रीमंत राजे साहेबांनी ताबडतोब पाडेगांव येथे सन १९३१ मध्ये ऊसाच्या जातीचे

संशोधनाचे प्रयोगक्षेत्र (फार्म) सरकारच्या मदतीने सुरू केले. आणि पुढच्याच वर्षी ब्रिटिश सरकारने परदेशी साखरेवर जबर जकात बसवली. त्यामुळे कॅनॉलचे पाणी घेण्यास व महाराष्ट्रात साखर कारखाने काढण्यास चालना मिळाली. वालचंदनगर, माळीनगर, बोरगाव नगर जिल्हयातील साखर कारखाने व कोल्हापूर इत्यादी त्याच सुमारास निघाले या साखरवाडीच्या साखर कारखान्यास खंडाने दिलेल्या जमिनी अगोदर पाच-सहा वर्षे शेतसारा व इरिगेशनची पाणी पट्टी वगैरेची थकबाकी न मिळाल्यामुळे सुमारे दहा हजार एकर जमीन जप्त होऊन सरकारजमा झालेली होती. ती सर्व जमीन श्रीमंत राजेसाहेबांनी फलटण शुगर वर्क्स या कंपनीस तीस वर्षे खंडाने दिली आणि त्यांचा तो दरसाल खंड येत असे. तो त्या जमीन मालकाच्या खात्यावर जमा करून त्याची थकबाकी पूर्ण करून घेतली आणि नंतर त्या सर्व जमिनी त्या मालकांना परत केल्या व तेव्हापासून ते सर्व जमीन मालक आपापल खंड घेऊ लागले.

मालोजी राजांच्या प्रयत्नामुळे श्रीधर आपटे या कारखानदाराने दि फलटण शुगर वर्क्स लि. ही फॅक्टरी सन १९३३ मध्ये सुरू केली.[५] व जवळजवळ ३५ लाख रूपये भाग भांडवल घातले त्यामुळे फलटण संस्थानातील २५00 ते ३000 लोकांना रोजगार मिळाला. तसेच शेतकऱ्यांना ऊसाला दर येऊ लागला. संस्थानात साखर कारखाना निघाला. ऊस पिकांचे क्षेत्र वाढू लागले. शेतीची मशागत ही आधुनिक पद्धतीने करणे गरजेचे होते. मालोजी राजांनी रशियाने केलेल्या आद्योगिक व शेती प्रगतीची माहिती होती. प्रगत देसात शेतीची मशागत करण्यासाठी बैलाऐवजी ट्रॅक्टर वापर करतात हे त्यांना माहित होते. म्हणून त्यांनी सन १९३३-३४ मध्ये ९३ हजार रूपये खर्च करून फलटण संस्थानात ट्रॅक्टर विकत आणला. व आधुनिक शेती पद्धतीची मुहूर्तमेढ रोवली. असे म्हणतात की, मालोजीराजांनी विकत घेतलेला ट्रॅक्टर हा आशिया खंडातील पहिला ट्रॅक्टर होय.[६]

उपसंहार :

फलटण संस्थानचे शेवटचे पंचवीसावे अधिपती श्रीमंत मालोजीराजे नाईक निंबाळकर यांनी आपल्या कारकिर्दीत फलटण संस्थानात सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक सुधारणा घडवून आणल्या. प्रामुख्याने प्रथमतः त्यांनी शेती विषयक सुधारणा केल्या. अनेक प्रकारच्या उपाययोजना केल्या. शेती करण्यासाठी आर्थिक सहकार्य करून शेतकी प्रदर्शन भरवून प्रोत्साहन दिले. निरा उजवा कालवा (१९२५) ब्रिटिश सरकारने संस्थानातून काढल्यामुळे सर्व शेती ओलीताखाली आणण्याचा प्रयत्न केला. त्यांनी आपल्या संस्थानात सहकारी पतपेढया, सोसायटया व बँक स्थापना करून शेतकऱ्यांना कमी दरात कर्ज उपलब्ध करून दिले. संस्थानातील जमीन बागायती झाल्यामुळे ऊस नगदी पीक असल्यामुळे शेतकरी ऊसाची लागवड करू लागला. ऊसाचे उत्पादन वाढावे म्हणून पाडेगाव येथे सन १९३१ मध्ये ऊस संशोधन केंद्र सरकारच्या मदतीने सुरू केले. मालोजी राजांच्या सहकार्याने व प्रयत्नामुळे श्रीधर आपटे या कारखानदाराने 'दि फलटण वर्क्स लि. साखरवाडी' ही फॅक्टरी सन १९३३ मध्ये सुरू केली. फलटण संस्थानातील लोकांना रोजगार मिळाला व शेतकऱ्यांच्या ऊसाला दर मिळू लगला. त्यामुळे एकंदर फलटण संस्थानातील आर्थिक क्षेत्रात फार मोठी सुधारणा झालेली दिसून येते. फलटण संस्थान ८ मार्च १९४८ रोजी मुंबई प्रांतात विलीन झाले. त्यावेळी संस्थानच्या तिजोरीत ६६ लाख रूपयांची रक्कम शिल्लक होती. ही रक्कम त्यांनी मुंबई सरकारकडे सुपूर्त केली. त्यामुळे यावेळी फलटण संस्थानात आर्थिक संपन्नता दिसून येते. सातारा जिल्हयातील फलटण हा एक तालुका बनला काळाबरोबर मालोजीराजांनी सुद्धा आपले राजेपद सोडून लोकशाहीचा स्वीकार करून नम्र सेवक झाले. फलटण संस्थान सन १२८४ मध्ये अस्तित्त्वात आले व सन १९४८ मध्ये भारतात विलीन झाले. सन १९१७ ते १९४८ या काळात संस्थानात अनेक पुरोगामी योजना आखून संस्थानाचा आर्थिक पाया भक्कम करून सामाजिक, शैक्षणिक व प्रशासकीय विकास घडवून आणला.

संदर्भ :

१) फलटण संस्थानचा वार्षिक अहवाल, सन १९२६-२७, पृ. २७

२) फलटण संस्थानचा प्रशासकीय अहवाल, सन १९२६-२७, पृ. १८

३) कित्ता, पृ. १९

४) फलटण संस्थानचा वार्षिक प्रशासकीय अहवाल, सन १९२७-२८, पृ. १९

५) फलटण संस्थानचा वार्षिक प्रशासकीय अहवाल, सन १९३३-३४, पृ. ८

६) पाटील बाळासाहेब, दक्षिण संस्थानावरील स्पेशल अंक, सत्यवादी, जुलै १९४0, पृ. १४६

53. अक्कलकोट संस्थानमधील प्रजा परीषदा

प्रा . डॉ . सौ . मंजिरी म . कुलकर्णी
सहयोगी प्राध्यापक
कन्या महाविद्यालय, मिरज .

अक्कलकोट संस्थान सोलापूर जिल्ह्यात पूर्वेस ४0 कि . मी . वर आहे . दक्षिण महाराष्ट्रात एकूण अठरा संस्थाने होती . कोल्हापूर, अक्कलकोट, औंध, भोर, जमखिंडी, जंजीरा, जत, कुरुंदवाड (थोरली पाती), कुरुंदवाड (धाकटी पाती), मिरज, मिरज मळा, मुधोळ, फलटण, रामदुर्ग , सांगली, सावनूर, सावंतवाडी या अठरा संस्थानांपैकी अक्कलकोट एक संस्थान होते . ७0° . १0° पूर्व रेखांश व १७° . ३0° उत्तर विस्तारात अक्कलकोट संस्थान वसलेले होते . समुद्र सपाटी पासूनची उंची १२00 फुट आहे . १0७ गावांचे मिळून हे संस्थान होते . ४९८ चौ . कि . मी . होते . अक्कलकोटला स्वतंत्र संस्थानचा दर्जा सातारचे शाहू छत्रपतींच्या आशिर्वादाने मिळाला .[१] फत्तेसिंग भोसले यांना अक्कलकोटची जहागिरी इ . स . १७0८ ला मिळाली . १७१२ साली शाहू छत्रपतींनी सनद दिली व त्यांनी फत्तेसिंगला आपले मानसपुत्र मानले व स्वत:चे नाव ही दिले .[२] फत्तेसिंग शाहूंचे विश्वासू, मानसपुत्र व अक्कलकोटकर संस्थानचा संस्थानाधिपती म्हणून त्यांचे मानाचे स्थान होते . अक्कलकोट संस्थान हे अशा रीतीने उदयास आलेले . हे संस्थान कदाचित भारतात इतरत्र नसेल . या संस्थानात १९४८ पर्यत ९ राजांनी आपली कारकीर्द केली . त्यातील अक्कलकोट संस्थानचे आठवे अधिपती फत्तेसिंग तिसरे यांचे वयाच्या २६ व्या वर्षी अकाली निधन झाले . त्यामुळे अक्कलकोट संस्थानचा कारभार पहाण्यासाठी रीजंट म्हणून ताराबाई राणी साहेबांना नेमले . त्यांचे माहेर कागलचे संस्थानिक श्री बापुसाहेब महाराज यांच्या त्या कन्या होत . यांच्याच काळात पहिली प्रजा परीषद झाली . अक्कलकोट संस्थानात एकूण चार प्रजा परिषदा झाल्या .

अक्कलकोट प्रज्ञा परिषदेचे पहिले अधिवेशन १६ /0९ /१९२३ :

अक्कलकोट संस्थान हितेच्छु मंडळा मार्फत अक्कलकोट संस्थान प्रजा परिषदेचे पहिले अधिवेशन संस्थानच्या बाहेर म्हणजे सोलापूर येथे भरवण्यात आले . अध्यक्ष ल . ब . भोपटकर हे होते . यातील ठराव म्हणजे संस्थानाधिपतींच्या अध्यक्षतेखाली जबाबदार राज्यपद्धती स्थापन करणे, परिषद भरवण्यास परवानगी न दिल्याबद्दल दरबारचा निषेध करणे, शेतसारा कपात करणे .

दुसरे अधिवेशन १६ व १७ ऑगस्ट १९२४ :

रोजी हे अधिवेशन ही सोलापूर येथे दादासाहेब करंदीकर यांच्या अध्यक्षतेखाली भरवण्यात आले .[४]

तिसरे अधिवेशन :

१ डिसेंबर १९२९ रोजी अक्कलकोटला शिवशरण मठात भरवण्यात आले . अध्यक्ष न . चिं . केळकर हे होते . या अधिवेशनास अक्कलकोट संस्थानच्या रीजंट ताराबाई राणीसाहेब उपस्थित होत्या . तसेच अधिकारी वर्गही उपस्थित होता . या अधिवेशनात शेतसारा कमी व्हावा, पाणी पुरवठ्याची योजना, रस्ते दुरुस्ती इ . ठराव पास झाले .[५] या नंतर मात्र राणीसाहेबांनी पुढे परिषदेस परवानगी दिली नाही . १९३३ साली प्रजा परिषदेचे नेते मंगरुळचे श्री रंगनाथ गोविंद पुजारी यांनी शेतकऱ्यांना सारा देवू नये सांगितले . म्हणून त्यांच्यावर चोरीचा आरोप ठेवून त्यांना कडक शिक्षा केली .[६] पण अक्कलकोट संस्थानातील प्रजा परिषदेचे नेते गप्प बसले नव्हते . त्यांनी जंगम वकील, माधव देशपांडे, महारुद्र लोकापुरे इतर संस्थानातील प्रजा परिषदेत सहभाग घेतला व संस्थान विरोधात चळवळी केल्या .[७] म्हणून त्यांना संस्थानच्या हद्दीबाहेर निघून जावे असे सांगितले .

२४ सप्टेंबर १९४६, अक्कलकोट संस्थान प्रज्ञा परिषदेची तात्पुरती कमिटी स्थापन करण्यात आली व प्रजा परिषदेचे चौथे अधिवेशन २८ नोव्हेंबर १९४६ रोजी करजगी येथे भरले . बाबासाहेब वारद हे स्वागताध्यक्ष होते . लोकसत्ताक जबाबदार राज्यपद्धती हेच या परिषदेचे ध्येय होते . त्यात शेतसारा कमी करणे व उद्योगधंदे वाढवणे, दारूबंदी करणे हे ठराव झाले .[८] या अधिवेशनास भाई माधवराव बागल हे अध्यक्ष होते . माधवराव बागल व नानासाहेब गोरे यांची ५१ बैलांच्या रथातून मिरवणूक काढण्यात आली .[९] अक्कलकोट संस्थानात गुलाबचंद गांधी, बसलिंगप्पा जंगम, माधव देशपांडे, अप्पासाहेब देशपांडे, बाबुराव फुटाणे, महारुद्रप्पा लोकापूरे, प्रभादेवी मोतीचंद शहा, उज्वला शहा इ . अनेक स्त्री पुरुषंनी अक्कलकोटच्या स्वातंत्र लढयात सहभाग घेतला .[१0] वेळे अभावी व जागे अभावी येथे जास्त माहिती मी देत नाही . त्यांनी स्वतंत्र आंदोलनात सहभाग घेतला . अक्कलकोट संस्थानात हिंदुस्थानास स्वातंत्र मिळाले त्यावेळी म्हणजे १५ ऑगस्ट १९४७ या दिवशी प्रजा परिषदेने स्वातंत्र महोत्सव साजरा करण्याचे ठरवले . त्या आधी ९ ऑगस्ट ला हुतात्मा दिन साजरा केला . त्या वेळी लाठीमार झाला व १५ ऑगस्टला तिरंगी झेंडा फडकावला .[११]

अक्कलकोट संस्थानात विलीनीकरणासाठी सत्याग्रह :

अक्कलकोट मध्ये १ जानेवारी १९४८ मध्ये १ हजार लोकांची प्रभात फेरी काढून लक्ष्मी मार्केटवर तिरंगी ध्वज लावला . तसेच दुसऱ्या दिवशी मामलेदार कचेरीवर व शहाजी हायस्कुलवर झेंडा लावला .[१२]

शेंगदाणा निर्यात बंदी सत्याग्रह : २ जानेवारी १९४८ :

२ जानेवारी १९४८ रोजी साडे तीन वाजता शेंगदाणा निर्यात बंदी तोडण्यासाठी २१ सत्याग्रहींनी सत्याग्रह केला व त्यांनी लहान लहान पिशव्यांतून सोलापूरकडे शेंगदाणे निर्यात करुन निर्यात बंदी मोडली . याच दिवशी अक्कलकोट प्रजा परिषदेचे चिटणीस रहिम अत्तार यांची तुरुंगातून सुटका झाली .[१३]

अक्कलकोटातील अशांतता, मारहाण व जाळपोळ : ३ जानेवारी १९४८ :

३ जानेवारी १९४८ रोजी प्रजा परिषदेची मोठी प्रभात फेरी राजवाड्याकडे निघाली . त्या वेळी हातात खराटे घेतले . त्या ५० स्त्रियांनी सत्याग्रहाविरोधी मिरवणूकीस अडवून त्यांच्यावर दगडफेक केली . १५ ते २० जनावरे सोडून फेरीवाल्यांना उधळून लावण्याचा प्रयत्न केला . या वेळी दगडफेकीत दहापंधरा लोक जखमी झाले . डॉ . देशपांडे यांना बेदम मारहाण केली . डॉ . देशपांडे यांच्या दवाखान्याची नासधूस केली . प्रजा परिषदेची कार्यकर्ते कस्तुरचंद शहा यांचे एक कापडाचे व स्टेशनरीचे दुकान फोडले . मार्केट मधील बाबा तंबाके यांना मारले . रतनलाल शहा यांच्या कापसाच्या गोडावूनला आग लावली . वेरड वस्तीतील गुरुलिंगप्पा महंत यांचे ही दुकान फोडले .[१४] रत्नाप्पा कुंभार येथे उतरले होते . त्यांची मोटार जाळण्याचा प्रयत्न झाला .[१५] ३ जानेवारी १९४८ रोजी दुपारी ३ ते सकाळी ६ वाजेपर्यंत कर्फ्यू होता . रात्रभर पोलिसांचा सशस्त्र अंमल होता . शेवटी ८ मार्च १९४८ ला S. M. C. चा करार होताच हे संस्थान बरखास्त झाले . अक्कलकोट संस्थान मुंबई प्रांतात विलीन होवून सोलापूर जिल्ह्याचा तो एक तालुका बनला . अक्कलकोट प्रजा परिषद बरखास्त झाली व अक्कलकोट तालुका कॉंग्रेस कमिटी म्हणून अस्तित्वात आली .[१६]

तळटीपा :

१ .	डफ ग्रॅट	हिस्ट्री ऑफ मराठाज .
२ .	सोलापूर गॅझेट १९७१	पृ . ५६४
३ .	अक्कलकोट संस्थानचा प्रशासकीय अहवाल	१९२४ पृ . २ .
४ .	पटवर्धन वि . अ .	संस्थानातील लोकशाहीचा लढा . आर्य भूषण प्रेस, पुणे १९३३, पृ . ३३४–३३५ .
५ .	केसरी मराठा ट्रस्ट	केसरीचे छोटे फाईल १९२९, पृ . ४६५ .
६ .	पटवर्धन	उनि . पृ . ११ .
७ .	सोलापूर समाचार	२५/०४/१९४६, पृ . १ .
८ .	सोलापूर समाचार	२६ सप्टेंवर १९४६, पृ . १ .
९ .	अखंड भारत	भाई माधवराव बागल, नोव्हेंवर १९४६, पृ . १० .
१० .	वी . जी . कुंटे	स्वातंत्र्य सैनिक चरित्र कोश . (सांगली, सातारा, कोल्हापूर, सोलापूर) मुंबई महाराष्ट्र राज्य पस्तीस खंड, १९७०, पृ . ४०० ते ६०० .
११ .	दै . सोलापूर समाचार	२० ऑगस्ट १९४७, पृ . २ .
१२ .	सोलापूर समाचार	२ जानेवारी १९४८, पृ . ४ .
१३ .	संस्थान विलीनीकरण फाईल १९४८,	पृ . M. ८८, M. ८९ .
१४ .	सोलापूर समाचार	२८ जानेवारी १९४८, पृ . २ .
१५ .	अक्कलकोट संस्थान विलीनीकरण फाईल	एम . ९० .

54. छ. राजाराम आणि अस्पृश्योद्धार

प्रा. डॉ. अनिल माने
इतिहास विभागप्रमुख, दूधसाखर महाविद्यालय,
बिद्री. ता. कागल, जि. कोल्हापूर

प्रस्तावना :

छ. शाहूंनी केलेल्या सामाजिक सुधारणांसाठी कोल्हापूर संस्थान उजेडात आले होते. अस्पृश्यता निर्मूलनासाठी अनेक कायदे करण्यात आले होते. गुन्हेगार जातींची हजेरी पद्धत बंद करण्या संदर्भात हुकूम झाला होता. अस्पृश्यांना सार्वजनिक ठिकाणी प्रवेश मिळणेसंदर्भात कायदा करण्यात आला होता. क्षात्र जगद्गुरू पीठाची स्थापना करण्यात आली होती. महार वतनाचा रयतावा, वेटवरळा प्रतिबंधक कायदा करण्यात आला होता. हे सर्व कायदे छ. शाहूंच्या कारकिर्दीच्या उत्तरार्धात झाले होते. छ. शाहूंनी केलेल्या सामाजिक सुधारणा कायद्यांची अंमलबजावणी करण्याची जबाबदारी छ. राजाराम यांच्या समोर होती. छ. राजाराम यांची कारकीर्द सुरू झाली त्यावेळची सामाजिक परिस्थिती परंपरागत विचारांची होती. या परिस्थितीला सामोरे जात छ. राजाराम यांनी सामाजिक सुधारणा कार्य करायचे होते. सत्यशोधक ब्राह्मणेत्तर चळवळींनी तयार केलेले वातावरण व ब्रिटिश अधिकाऱ्यांचा पाठिंबा या छ. राजाराम यांना पूरक होत्या.

अस्पृश्योद्धार :

ब्रिटिश भारतात येईपर्यंत अस्पृश्यांची स्थिती युरोप खंडातील गुलामांपेक्षा वाईट होती. ब्रिटिशांची दळणवळण व्यवस्था व प्रशासनामुळे भारतातील जातीव्यवस्था सैल होऊ लागली. ब्रिटिशांच्या प्रशासनातील सर्वसमावेशक धोरणामुळे अस्पृश्यांना नोकरीधंद्यात संधी मिळू लागली तरीही शेकडो वर्षेरूजलेली जाती व्यवस्था कायम होती. डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणत असत, ''आम्ही गुलामांचे गुलाम आहोत.''[१] याचा अर्थ भारतातील सवर्ण हिंदू हे ब्रिटिशांचे राजकीय गुलाम होते व या गुलामाचे शुद्र, अस्पृश्य हे सामाजिक, धार्मिकदृष्ट्या गुलाम होते. २०व्या शतकाच्या सुरुवातीपासून बडोदा सारख्या काही संस्थानामध्ये अस्पृश्यता नष्ट करण्यासाठी अनेक कायदे झाले व दलितांच्या उद्धाराचा जाणीवपूर्वक प्रयत्न झाला. त्यांना अनेक सुधारणा व संधी उपलब्ध करून दिल्या.

वेठवरळा प्रतिबंधक कायद्याची अंमलबजावणी :

प्राचीन काळापासून या प्रांतात ग्रामव्यवस्थेत बलुतेदारी पद्धत अस्तित्वात होती. बारा बलुतेदारामध्ये महार हा प्रथम श्रेणीचा बलुतेदार होता. बलुतेदारीतून येणारी कामे त्याला करावी लागत होती. या बदल्यात त्याला महारवतन मिळाले होते. हे वतन म्हणजे चार किंवा पाच गुंठ्याची जमीन असे. या महारवतनामुळे या वतनदाराला अनेक प्रकारची हीन कामे करावी लागत. या वतनामुळे ग्रामव्यवस्थेने त्याला वेठीस धरले होते आणि त्यामुळे महार बलुतेदाराची प्रगती खुंटली होती आणि त्याला गुलामाची कळा प्राप्त झाली होती.[२] ही सर्व परिस्थिती लक्षात आल्यामुळे १५ जुलै १९२१ रोजी कोल्हापूर संस्थानात 'वेठवरळा प्रतिबंधक कायदा' श. शाहूंनी केला.[३] कोल्हापूर संस्थानातील महार लोकांना या वेठवरळातून बाहेर काढण्यासाठी महाराजांच्याकडे असलेल्या इमान जमिनी त्यांच्याच नावावर व्हाव्यात म्हणून छत्रपती राजाराम यांच्या काळात मोठा प्रयत्न केला. १९२१ नंतर गावातील वरिष्ठ जातीकडून कोणत्याही प्रकारच्या वेठवरळा, गावकीची कामे सांगण्याची नाहीत जर कोणी आपल्या मनगटाच्या जोरावर महार लोकांस वेठवरळा करावयास लावतील तर त्यांना नोकरीतून कमी केले जाईल. याची दखलगीरी प्रत्येक गावकामगार पाटलाने घ्यावी व त्याप्रमाणे जरूर ती तजवीज करावी.[४] असा आदेश छ. राजाराम यांनी केला.

महारवतनाचा रयतावा :

वतनामुळेच बलुतेदारांची कोंडी झाली होती. त्यामुळेच कोणतीच प्रगती होत नव्हती. महार हा खेड्यातील वतनदार नोकर, या वतनदाराला गावची सफाई करणे, मेलेली गुरे ओढणे, मयताचा सांगावा देणे अशाप्रकारची अनेक कामे करावी लागत.[५] महारवतनदारांचे पोट रयतेकडून मिळणाऱ्या बलुत्यांवर भरत नसे. वतन असल्यामुळे तो दुसरे काही काम करू शकत नव्हता. या वतनांच्या बैत्यामुळे त्याचे काही भागत नव्हते. महारवतनाला महाराष्ट्रात वेगवेगळ्या शब्दांनी उल्लेखले जाते. गावकी, महारकी, हाडकी, हाडोळा, तराळकी, वेसकर, जागल्या या वतनांमुळे महारांचे जीवन गुलाम बनले होते.[६] हे छत्रपती शाहूंच्या लक्षात आल्यानंतर आपल्या संस्थानात त्यांनी महारवतन खालसा केले. त्यानंतर थोड्याच काळात शाहूंचे निधन झाले. छ. राजाराम यांनी महार वतनाचा रयतावा पूर्ण करण्याची जबाबदारी स्वीकारली. दि. १८ ऑगस्ट १९२६ रोजी त्यांनी एक हुकूम काढला तो पुढीलप्रमाणे. ''महार लोकांनी आपखुशीने इनाम जमीन रयतावा करून मिळणेबद्दल केलेला अर्ज हुजूर पसंत आहे. या लोकांना गुलामगिरीतून मुक्त करण्यास इनाम जमिनी रयतावा करून देणे हाच उत्तम मार्ग आहे. करिता सदर गावच्या महारकी इनाम जमिनी इनामातून कमी करून रयताव्यात दाखल कराव्यात. सदर जमिनीवर काही बाबी वगैरे बसलेल्या असल्यास त्या सर्व कमी करण्यात येत आहेत. या हुकूमांचे आधारे महारांना रयताव्यांचे पूर्ण हक्क देण्यात येत आहेत. त्यांच्याकडून कोणतीही नोकरी घेणेची नाही. ही ऑर्डर कोणत्याही ऑफिसात तीन दिवसांपेक्षा जास्त दिवस राहता कामा नये. मामलेदार यांनी ऑर्डरचा अंमल केल्याबद्दल तात्काळ रिपोर्ट करावा. जमीन ज्याचे त्याचे ताब्यात आहे, त्याचे त्याचेच ताब्यात राहाणेची आहे. कोणत्याही प्रकारे कब्जा तबदील कणेचा नाही''.[७] छ. राजाराम यांनी कोल्हापूर

संस्थानातील ४८० गावातील महार लोकांच्या जमिनीचा रयतावा करण्यात केला. महारवतन रयताव्यामुळे वतनाची कामे नोकरी करण्याची गरज राहिली नाही. त्यामुळे शेकडो वर्षांची महारवतनाची गुलामगिरी नष्ट झाली. महारांना स्वाभिमानाचे जिणे जगता येऊ लागले. कोल्हापूर संस्थानातील या क्रांतिकारक कृतीमधून प्रेरणा घेऊन पुढे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी मुंबई राज्यातील महारवतन नष्ट करण्याचा कायदा (१९३०-१९३१) मांडला.

अस्पृश्य जातींची हजेरी माफ केली :

ब्रिटिश सरकारने १८७१ च्या पूर्वी गुन्हेगार लोकांचा बंदोबस्त करण्यासाठी एक सर्व्हेकेला. त्या सर्व्हेमध्ये पोलीस पाटील या नोकरांनी काही जातीच हिंदू धर्मांमध्ये गुन्हेगार आहेत असे सांगितले.[८] त्यानुसार ब्रिटिश सरकारने मांग, बेरड इत्यादी अनेक जातीचा गुन्हेगार लोकांच्या स्वतंत्र वसाहती निर्माण केल्या.[९] महाराष्ट्रात सोलापूर या ठिकाणी अशी वसाहत होती. काही जातींना गुन्हेगार ठरवून त्यांचेवर अनेक निर्बंध घातले. अशा जातीतील लोकांना गावच्या पोलीस पाटलांकडे दिवसांतून ३ वेळा हजेरी लावायची.[१०] परगावाला जायचे असेल तर आपल्या पोलीस पाटलांची परवानगी घ्यायची व परगावाला गेल्यावर त्या गावच्या पोलीस पाटलांकडे आपली हजेरी द्यायची. अशाप्रकारची चाल १८७१ पासून सुरू झाली. छत्रपती शाहू कोल्हापूर संस्थानच्या सत्तेवर आल्यानंतर त्यांनी या प्रथेची माहिती मिळाली. कोणतीही व्यक्ती अथवा जात मुळापासून गुन्हेगार असू शकत नाही. तर प्राप्त परिस्थितीमुळे त्यांना चोऱ्या कराव्या लागल्या. याची जाणीव शाहूंना झाली आणि अनेक वर्षेसुरू असलेली 'गुन्हेगारी जातीची हजेरी पद्धत' छत्रपती शाहूंनी बंद केली.[११] तथापि संस्थानातील अनेक गावात ही पद्धत सुरू होती आणि गावचे पोलीस पाटील गावातील मांग लोकांची हजेरीच्या नावाने छळवणूक करत होते. ही बाब छत्रपती राजाराम यांच्या लक्षात येताच ही अमानुष पद्धत बंद करण्याचा आदेश महाराजांनी दिला व पोलीस पाटलांना तसे न करण्याबाबत समज देण्यात आली. त्यानंतर कोल्हापूर संस्थानातील ही पद्धत कायमची बंद झाली. त्यामुळछे संस्थानातील मांग लोकांची या पद्धतीतून कायमची सुटका झाली.[१२] अनेक वर्षेया जातींना गुन्हेगार म्हणून जीवन जगावे लागत होते. कोणत्याही प्रकारचा गुन्हा केला नसतानाही 'गुन्हेगार' म्हणून वागवले जात होते. हजेरी पद्धत बंद केल्यामुळे ही माणसं अकारण लादलेल्या गुन्हेगारीच्या विश्वातून बाहेर आली. जगण्याची एक नवी उमेद त्यांच्यात निर्माण केली. पुढे या जातीतील अनेक लोक स्वकष्टाने पुढे आले. ॲड. के. एल. मोरे हे मांग समाजातील वकील दिल्लीच्या सुप्रीम कोर्टात वकिली करू लागले.[१३] अस्पृश्य जातीचा विकास व्हावा. त्यांना वरिष्ठ जातींच्या लोकांकडून चांगली वागणूक व दर्जा मिळावा, त्यांचे अस्तित्व त्यांना कळावे यासाठी छ. राजाराम महाराज प्रयत्न करत होते.

अस्पृश्यांना खास निमंत्रण :

छत्रपती राजाराम महाराज खास निमंत्रितांसाठी काही कार्यक्रम नव्या राजवाड्यावर आयोजित करत असत. अशा कार्यक्रमांना महाराज अस्पृश्य बांधवांना मुद्दाम निमंत्रित करीत असत व त्यांना मानाने वागविले जाई.[१४] आक्कासाहेब महाराजांच्या लग्नात शाहू छत्रपतींनी अस्पृश्य लोकांच्याकडून पाहुण्यांच्या स्वागताची जबाबदारी सोपविली होती.[१५] या गोष्टींची त्या काळात मोठी चर्चा झाली. छत्रपती राजाराम महाराज यांनी अस्पृश्य बांधवांना खास कार्यक्रमासाठी निमंत्रित करून त्याच्या पुढची पायरी गाठली. हेतू हा की अशा प्रकारच्या कार्यक्रमातील उपस्थितीमुळे अस्पृश्यांचा आत्मविश्वास वाढावा व सामाजिक विषमतेची दरी कमी व्हावी.

हेडकोचमन म्हसू सेकू मानेची निवड :

छत्रपती राजाराम यांनी अस्पृश्य जातीमधील अनेक लायक व होतकरू उमेदवारांना नोकऱ्या दिल्या. महाराज नेहमी गुणवान लोकांच्या शोधात असत. महार समाजातील म्हसू रेकू माने यांची श्री लक्ष्मीविलास पॅलेसमधील पागेत 'हेड कोचमन' म्हणून नेमणूक झाली. हेडकोचमनची जागा ही हुद्द्याची असून त्याच्या हाताखाली जवळ-जवळ दोनशे लोक कामाला असत. दै. सत्यवादीत म्हसू रेकू माने संबंधी आठवण देताना श्रीमंत मामासाहेब महागावकर म्हणतात, ''म्हसू सेकू नावाचा एक महार जातीचा नोकर घोड्याच्या पागेकडे होता. अश्वपरीक्षेत व त्याची निगा राखण्यात त्याचे ठिकाणी असलेली दक्षता महाराजांच्या निदर्शनास आली. त्याचबरोबर महाराजांनी त्याला अश्वविद्येची विशेष माहिती देवून हेडकोच बनविले. राजाराचा कोचमन असणे ही गोष्ट मनाची समजली जात असल्याने या जागेसाठी बऱ्याच मराठ्यांनी खटपट केली पण त्यांना महाराजांनी एकाच वाक्यात सांगितले की, 'गुणापेक्षा मी जातीला अधिक किंमत देत नाही.''[१६] हे वाक्यच त्यांच्या व्यक्तित्वाची व राजकीय कर्तृत्वाची साक्ष आहे. छ. शाहू महाराजांनी श्री. गंगाराम कांबळे यांना हॉटेल काढून दिले व त्या हॉटेलमध्ये स्वत: चहा पित असत. सोबत त्यांचे अधिकारीही असत. अस्पृश्यता नष्ट करण्यासाठी तसेच त्यांना सन्मान देऊन स्पृश्य वर्गाला जातीयता संपविण्याचा धडा देण्यासाठी छ. शाहूंनी गंगारामचे उदाहरण समाजासमोर ठेवले होते. याचा आदर्श घेत छ. राजाराम यांनी वरिष्ठ वर्गाची पारंपरिक मानसिकता नष्ट करण्यासाठी व कनिष्ठांचा न्यूनगंड घालविण्यासाठी मसू सेकू मानेची हेडकोचमन पदी निवड केली. सोळा घोड्यांचा रथ चालविण्यामध्ये श्री. माने वाक्बगार होते आणि या रथामध्ये युरोपियन पाहुण्यासह छ. राजाराम बसत असत. गुणी व कर्तृत्ववान माणसांना छत्रपतींनी संधी दिली होती.

शाहू मिलजवळ दलितांना घरे बांधण्यासाठी जागा दिली :

कोल्हापूर शहराची लोकसंख्या वाढू लागली. तशी शहराची वाढ झपाट्याने होऊ लागली. छत्रपती राजाराम महाराज यांच्या काळात महाराजांनी लक्ष्मीपुरी, ताराबाई पार्क व राजारामपुरी या नव्या वसाहतीची स्थापना केली. पण या शहराच्या विस्तारामध्ये दलितांना घरे

बांधण्यासाठी जागा मिळणे अशक्यच होते. त्याचबरोबर गरीब दलितांना जागा विकत घेऊन घर बांधणे ही बाब कठीणच होती. याची जाणीव छत्रपती राजाराम महाराज यांना झाली. त्यानंतर महाराजांनी शाहू मिलच्या पूर्वेस नवीन ब्लॉक्स पाडले आणि मातंग समाजाच्या लोकांची राहण्याची सोय केली.[१७] सध्या ही वसाहत रेल्वेस्टेशन व मध्यवर्ती एस. टी. बसस्थानकापासून अगदी जवळच आहे. तसेच राजारामपुरीसारख्या उच्चशिक्षित व उच्चभ्रू वस्तीत या वसाहतीचा समावेश झालेला आहे. या वसाहतीतून निवडून गेलेल्या सौ. कांचन कवाळे या कोल्हापूरच्या पहिल्या दलित महिला महापौर झाल्या.[१८] तसेच पाचगाव तालुका करवीर येथील मांग लोकांनी सरकारी परवानगी न घेता घरासाठी सोडलेल्या खराब जागेत घरी बांधली यावर तेथील जवळच्या लोकांनी तक्रार केली. छ. राजारामांचे धोरण हे अस्पृश्यांच्या उन्नतीसाठी पूरक असल्याने पाचगाव येथील मांग लोकांकडून कोणत्याही प्रकारचा दंड न घेता ती घरे त्यांच्या नावावर कायम केली.[१९]

अस्पृश्य कार्यकर्त्यांना जमिनी दिल्या :

महार वतनाचा रयतावा करून अस्पृश्यांच्या उद्धाराला छत्रपती शाहू व छत्रपती राजाराम यांनी मोठा हातभार लावला. अस्पृश्यांच्या मागासलेपणाला आर्थिक कारण होते. पुरेशा प्रमाणात जमिनी नाहीत. उत्पन्नाची दुसरी साधने नाहीत. अशाही परिस्थितीत अस्पृश्यांना इतरांबरोबर आणण्याची जाणीव छत्रपती राजाराम यांच्या सामाजिक व आर्थिक धोरणात होती. दलितामध्ये आत्मोद्धारासाठी जागृती आवश्यक होती आणि ही जागृती करण्याची जबाबदारी कार्यकर्त्यांची होती. पण कार्यकर्ते आर्थिकदृष्ट्या भक्कम असतील तरच चळवळ पुढे जाते. महार समाजातील कार्यकर्तेछत्रपतींच्या पुरोगामी धोरणाचा प्रचार आणि प्रसार करण्यासाठी तयार होते. यामध्ये आप्पाजी रामजी मंडपाळे, बळवंत नारायण शिंगे, परशराम गुंडो कांबळे, बजाप्पा ईश्वरा हुलस्वार, गंगाराम यमाजी कांबळे, रा. करवीर इलाख्यातील सर्व महार लोकांच्या म्हारकी इनाम जमिनी रयतावा करून वेठबिगारी सारखे गुलामगिरीतून कायमचे मुक्त करून सरकारचेही १ लाख रुपयांपर्यंत उत्पन्न वाढविले. सदर कामगिरी आपण पायी फिरून केली. त्याबद्दल कै. हुजूरांची प्रत्येकास ४ बिघे जमीन देणेबद्दल आज्ञा झाली आहे ती मिळावी. असा अर्ज वरील कार्यकर्त्यांनी राजाराम महाराज यांचेकडे केला. यावर छत्रपती राजाराम यांनी पुढील आदेश दिला, '' करवीर इलाख्यातील सर्व महार लोकांच्या इनाम जमिनी रयतावा करून महार लोकांस गुलामगिरीतून कायमचे मुक्त करावे या शाहू महाराजांच्या इच्छेप्रमाणे सदरच्या पाच इसमांनी पायी फिरून उपदेशाद्वारे फारच महत्त्वाची कामगिरी पार पाडली आहे म्हणून त्यांना प्रत्येकी सरकार हक्कातील ४० रु. आकाराची दरसाल २०० रु. लागण होणारी जमीन देण्याचे छत्रपती राजाराम महाराजांनी मंजूर केले आहे''.[२०] अस्पृश्यांची गुलामगिरी ही जशी धार्मिक व सामाजिक स्वरूपाची होती, त्यांच्या सर्व प्रकारच्या अवनतीस अनेक प्रकारची कारणे होती. त्यातील महत्त्वाचे कारण म्हणजे त्यांची आर्थिक परावलंबिता मनुस्मृतीसारख्या धर्मग्रंथांनी सांगितले आहे की शुद्र हे निर्धन असले पाहिजेत.[२१] धार्मिक परंपरांबरोरच गावगाड्यांमध्ये अस्पृश्यांचे जीवन आर्थिक उत्पन्नाची साधने नसल्यामुळे अत्यंत हलाखीचे बनले होते. यासाठी कायदा केला पण ही प्रथा लवकरच बंद पडत नव्हती. छ. राजाराम यांनी ही प्रथा बंद पाडण्यासाठी प्रबोधनाची आवश्यकता होती. हे प्रबोधनाचे काम अस्पृश्य कार्यकर्त्यांनी केले. म्हणून त्यांना जमिनी दिल्या. हेतू हा की, अस्पृश्यांना वतनाच्या गुलामगिरीतून लवकरात लवकर मुक्त व्हावे. आपण माणूस म्हणून जगण्याचा हक्क आहे याची जाणीव जागृती त्यांच्यात निर्माण केली. कारण अस्पृश्य लोक हे समाज पुरुषाचे एक अविभाज्य अंग होते.

जनजागृती करणाऱ्या नोकरदार कार्यकर्त्यांस रजा :

फक्त कायदा करून प्रश्न मिटत नसतात. केलेल्या कायद्याची अंमलबजावणी करण्यासाठी प्रशासनाबरोबर लोकमत असावे लागते. लोक प्रबोधन झाले तर कायद्याचे महत्त्व पटते आणि कायदा अंमलात आणायला सोपे जाते. महारवतन कोल्हापूर संस्थानाचे कायद्याने कायमचे बंद केले आहे या वतनातून महारजातीची मुक्तता केली आहे. महाराजांना असलेल्या महारकी नावाची इनाम जमीन लोकांनी आपल्या नावावर करून घ्यावी आणि महारवतनाच्या गुलामगिरीतून स्वत:ची कायमची मुक्तता करून घ्यावी. असे धोरण छ. राजाराम यांचे होते. या धोरणाचा विचार करण्यासाठी जनजागृती करण्यासाठी महार समाजातील काही कार्यकर्त्यांनी रजा देऊन लोकप्रबोधन करण्यास प्रोत्साहन दिले. हेतू हा की आपल्या संस्थानातील महार वतनाची पद्धत कायमची बंद व्हावी. परशराम गुंडो कांबळे, तलाठी, करवीर याने आपणास मिळाले रजेस जोडून आणखी १० दिवस रजा गारगोटी व राधानगरी मधील महार लोकांस उपदेश करण्यासाठी रजा मिळावी असा मागणीचा अर्ज दि. ५/८/१९२२ ला केला. त्याची रजा छत्रपती राजाराम यांच्या प्रशासनाने मंजूर केली आहे.[२२] प्रशासनाचा वापर लोकहितासाठी नोकरदारांनी व राज्यकर्त्यांनी केल्याचे हे उत्कृष्ट उदाहरण आहे.

सामाजिक बहिष्कार प्रतिबंधक कायदा (३० मार्च १९३९) :

महारवतनाचा रयतावा, सार्वजनिक ठिकाणी अस्पृश्यांना प्रवेश, वेठवरळा प्रतिबंधक कायदा असे अनेक समाज सुधारणेचे कायदे छत्रपती शाहू यांनी केले होते. पण हे सर्व कायदे असून सुद्धा अस्पृश्यावरील अन्याय अत्याचार थांबले होते असे नाही. अस्पृश्यवर्गाच्या आर्थिक नाड्या स्पृश्य समाजाच्या हातात होत्या. वरिष्ठ जातीतील लोकक सनातनी व कर्मठ असल्याने अस्पृश्यातील सामाजिक अत्याचार सुरूच होते. दलितांनी सार्वजनिक ठिकाणी प्रवेश केला. सार्वजनिक पाणवठ्यावर पाणी भरले अथवा जुन्या परंपरा नाकारल्या की लगेच सवर्ण समाज संघटितपणे दलितांवर सामाजिक बहिष्कार घातल असत. तमुळे दलितांचा कोंडमारा होत असे. यामुळे त्यांचा आर्थिक कोंडमारा होईल. सामाजिक बहिष्काराचे अस्त्र दलितांवर उगारू नये यासाठी छत्रपती राजाराम महाराज यांनी 'सामाजिक बहिष्कार प्रतिबंधक कायदा' १९३९ पास

केला.[२३] दलितावर जर बहिष्कार घातला तर या कायद्यानुसार सहा महिन्याची किंवा ५०० रुपये दंड किंवा दोन्ही शिक्षा एकदम भोगाव्या लागतील अशी तरतूद केली. हा कायदा अजामीन पात्र होता. स्वातंत्र्यानंतर देशातील अनेक समस्या झटकन सोडविता येतील किंवा काही प्रश्न आपोआप मिटतील अशी आशा लोकांना होती. १९५० मध्ये भारतीय राज्यघटना अस्तित्वात आली. घटनेनंतर कलम १७ नुसार अस्पृश्यता नष्ट करण्यात आली.[२४] पण प्रत्यक्षात समाजात व्यवहार काय होता. गावागावात पूर्वीची जाती व्यवस्था जशीच्या तशी होती. अस्पृश्यांवर उच्च जातीचे वर्चस्व होते. जमिनी नाहीत, पुरेशा प्रमाणात रोजगार नाही. स्वाभिमानीचे जीवन नाही. घटनेत स्वातंत्र्य, समता, बंधूता पण प्रत्यक्ष व्यवहारात अस्पृश्यांच्या वाट्याला भयानक अशा सामाजिक दूरत्वाच्या वास्तवाला सामोरे जावे लागत होते. जातीप्रथा राष्ट्रविरोधी आहे. या मताचा प्रवाह व प्रसार झाला नाही. जातियता ही एक मानसिकता आहे. ती घालविणे हे अस्पृश्यांच्या हिताचे आहे तसेच ते उच्च जातीच्या पर्यायाने राष्ट्राच्या फायद्याचे अहे याची जाणी प्रस्थापित वर्गाला नसल्याने स्वातंत्र्यानंतरही ५० वर्षांत अस्पृश्यांवर बहिष्कार घालणे, मारणे, धमकावणे, त्यांचे शोषण करणे सुरू आहे हे लक्षात आल्यानंतर भारत सरकारने १९८९ मध्ये 'ॲस्ट्रॉसिटी ॲक्ट' पास केला.[२५] छ. राजाराम यांनी 'सामाजिक बहिष्कार प्रतिबंधक कायदा' स्वतंत्र भारत सरकारच्या पूर्वी १० वर्षे पास करून सामाजिक समता निर्माण करण्यासाठी एक महत्त्वाचे पाऊल कोल्हापुरात उचलले. यावरून त्यांच्या सामाजिक न्यायाचा दृष्टिकोन दिसून येतो.

अस्पृश्यांच्या संस्थांना आर्थिक मदत :

१९०८ मध्ये कोल्हापुरात अस्पृश्य विद्यार्थ्यांसाठी वसतिगृह सुरू झाले. १९०८ साली कुमारी 'व्हायोलेट क्लार्क' या युवतीने नृत्याचा कार्यक्रम आयोजित केला. त्या जमलेल्या पैशातून रविवार पेठ कोल्हापूर येथे 'मिस क्लार्क' वसतिगृहाची स्थापना करण्यात आली. १९०८ साली स्थापन झालेले हे संपूर्ण भारतातील पहिले अस्पृश्यांचे वसतिगृह आहे. सदर वसतिगृहासाठी कोल्हापूर दरबाराकडून प्रत्येक वर्षी ६५० रुपये अनुदान मिळत होते. पण बोर्डिंगच्या विकासासाठी महार समाजाचे एक शिष्टमंडळ राजाराम महाराज यांना भेटले आणि अधिक आर्थिक सहाय्य मिळावे म्हणून मागणी केली. महाराजांनी त्यांची मागणी मान्य केली व दरसाल जादा एक हजाराचे अनुदान बोर्डिंगला चालू केले.[२६] तसेच पंढरपूर येथील अस्पृश्य बोर्डिंगास आर्थिक मदत केलेली होती.[२७] चोखामेळा को-ऑप. क्रेडिट सोसायटी अनलिमिटेड करवीर शहर या अस्पृश्यांच्या संस्थेला द.सा.स.शे. ६% व्याजाने १००० रुपये कोल्हापूर दरबारने दिले.[२८] ढोरचांभार समाजातील विद्यार्थ्यांसाठी स्थापन केलेले वसतिगृह म्हणजे श्री देवी इंदुमती बोर्डिंग या बोर्डिंगला दरबाराकडून वर्षासन दिले होते. या बोर्डिंगची पडलेली भिंत बांधण्यासाठी दरबाराकडून २७३ रुपये देण्यात आले.[२९] अस्पृश्यांच्या गुलामगिरीसाठी त्यांची आर्थिक परावलंबिता हा एक घटक कारणीभूत होता. सामाजिक विषमतेचा संबंध आर्थिक बाबींशी संबंधित होता. नव्याने स्थापन झालेल्या अस्पृश्यांच्या संस्था टिकल्या तर त्यातून सामाजिक परिवर्तनाचे काम होणार होते. यासाठी छ. राजाराम यांनी संस्थानातील दलितांच्या संस्थांना मदत केलीच पण त्याचबरोबर बाहेरील संस्थाना आर्थिक मदत केली. या मदतीमुळे संस्था व संस्थांच्या मुळे काही लोकांची उन्नती होणार होती. दलितांना आर्थिक मदत व दिशा देऊन समाजाच्या मुख्य प्रवाहात अस्पृश्यांना आणणे ही विचारधारा छ. राजाराम यांच्या मनात होती.

मंदिर प्रवेशाची चळवळ व छत्रपतींचा जाहीरनामा :

१९३० मध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी नाशिक येथे मंदिर प्रवेशाची चळवळ सुरू केली.[३०] या चळवळीतून प्रेरणा घेऊन महाराष्ट्रातील काही ठिकाणी मंदिर प्रवेशाची चळवळ सुरू झाली. कोल्हापूर संस्थानात सामाजिक समतेसाठी व अस्पृश्यता निर्मूलनासाठी तसेच अस्पृश्यांना सार्वजनिक इमारती, ठिकाणे, नदीचे पाणवठे यासारख्या ठिकाणी प्रवेश मिळावा यासाठी कायदे झाले होते. मंदिरासारख्या सार्वजनिक ठिकाणी या कायद्याचा अंमल व्हावा अशी अपेक्षा होती. तथापि १९३२ पर्यंत या कायद्याला यश आले नाही. २५ सप्टेंबर १९३२ रोजी कोल्हापूर येथील महालक्ष्मी देवालयात 'मुक्तद्वार भोजन समारंभ' आयोजित केला. यावेळी महालक्ष्मी देवालय दलितांना खुले झाले.[३१] या घटनेचा आनंद छ. राजाराम यांना झाला आणि त्यांनी मंदिर प्रवेशाचा जाहीरनामा प्रसिद्ध केला. मंदिर प्रवेशाचा आनंद छत्रपतींना झाला यावरून त्यांच्या समतावादी विशाल मनाची कल्पना येते. अस्पृश्यता नष्ट करण्यासाठी कोल्हापूर संस्थानाने चंग बांधला होता. एवढेच नव्हे तर छ. राजाराम अस्पृश्यता तर नाकारतातच त्याशिवाय अस्पृश्य हा शब्द सुद्धा त्यांना मंजूर नव्हता. म्हणून ते स्पृश्य समाजाला आवाहन करतात की इथून पुढे कोणत्याही जातीसाठी 'अस्पृश्य' ही संज्ञा वापरू नका. आणि महत्त्वाचे छ. शाहूंच्या काळात 'अस्पृश्यता' नष्ट करण्याविषयी झालेल्या कायद्याची, हुकूमाच पुन्हा - पुन्हा समाजासमोर मांडणी करतात हे विशेष होय.

मंदिर प्रवेशाचा जाहीरनामा :

''रविवार तारीख २५ सप्टेंबर, १९३२ इ. रोजी करवीर शहरवासीयांनी आजपर्यंत अस्पृश्य मानलेल्या लोकांना श्री करवीर शहरवासीयांनी आजपर्यंत अस्पृश्य मानलेल्या लोकांना श्री करवीर निवासिनी देवालयात प्रवेश करून देवीचे दर्शन घेणेस उत्तेजन दिले याबद्दल श्रीमन्महाराज छत्रपती साहेब सरकार यांना आनंद वाटत आहे. करवीर दरबारने आजपर्यंत अस्पृश्य मानलेल्या जातीची अस्पृश्यता दूर करून त्यांना उर्जितावस्थेत आणणेसाठी वारंवार कायदेशीर जाहीरनामे वगैरे काढून प्रयत्न केले आहेत. त्यास आता लोकजागृती होऊन समाजाची संमती मिळाली आहे व लोक इच्छेने अस्पृश्यता नाहीशी होत आहे; याजबद्दल हुजूरांस समाधान वाटत आहे. यापुढे करवीर इलाख्यात कोणत्याही जातीस 'अस्पृश्य' ही

संज्ञा वापरणेचे कारण राहिले नसून, सर्व हिंदुमात्र हे स्पृश्य हिंदूच मानले जातील व देवळांत जाणेस अगर सार्वजनिक चाव्या, विहिरी, तलाव, धर्मशाळा वगैरेचा उपयोग करण्यास सारखाच हक्क राहील.

तळटीपा व संदर्भ :

१. गवळी, सुधीर (संपा.), डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची गाजलेली भाषणे, सुधीर प्रकाशन, गणेशनगर बोरगाव, वर्धा, २००१, पृ. ७४

२. येडेकर, शाम (संपा.) राजर्षी शाहू छत्रपती यांची भाषणे, मंगल प्रकाशन, कोल्हापूर, १९७१, पृ. ५७

३. बगाडे, द. रा., छ. राजर्षी शाहू महाराज आणि कायदेकानू, पद्म प्रकाशन संस्था, कोल्हापूर, १९८२, पृ. ३६.

४. कित्ता, पृ. ३८

५. अत्रे, त्रिं. ना., गावगाडा, पुणे, १९२५, पृ. ५१

६. कित्ता, पृ. ५१

७. हुजूर ठराव बुक १९२६, पृ. १०७

८. म्हासाळ, डी. बी., हिस्ट्री ऑफ एज्युकेशन इन सोलापूर सिटी, अप्रकाशित पीएच.डी. शोध प्रबंध, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर, २००२, पृ. २११

९. मोडक, बा. प्र., कोल्हापूर राज्याचा इतिहास, चित्रशाळा, पुणे, १८९३, पृ. २०४

१०. येडेकर, शाम (संपा.), उपरोक्त, पृ. ५६

११. करवीर सरकारचे गॅझिट, दि. २१/९/१९९८, पृ. १४०

१२. शिर्के, दा. म. साप्ताहिक गरूड, दि. १७/३/१९३७

१३. हंटर, ११ मे १९२८

१४. हेरवाडे, श्रीधर, छत्रपती राजाराम गौरव ग्रंथ, छ. राजाराम प्रतिष्ठान, कोल्हापूर, १९८३, पृ. ८०

१५. सत्यवादी खास अंक, १९२८, पृ. १७

१६. सत्यवादी ३/९/१९३३

१७. हेरवाडे, श्रीधर, उपरोक्त, पृ. ६२

१८. दै. पुढारी, २७ मार्च १९९९

२०. हुजूर ठराव बुक, ठराव क्र. ७९, दि. २०/७/१९२८

२१. हुजूर ठराव बुक, दि. २१/११/१९२, पृ. ४३७

२२. गणवीर, रत्नाकर (संपा.) बहिष्कृत भारतातील डॉ. आंबेडकरांचे स्फूट लेख, पृ. १२८

२३. करवीर सरकारचे गॅझिट, १९३४, दि. ३० मार्च १९३९, पृ. ४८

२४. भारताचे संविधान, भारत सरकार विधि व न्याय मंत्रालय, १९९२, पृ. ६

२५. अवस्थी, एस. के., प्रिव्हेंशन ऑफ अट्रॉसिटी ॲक्ट, १९८९, पृ. १२१

२६. शिर्के, दा. म., कोल्हापूरचा राज्यकारभार, पृ. ७८

२७. हुजूर ठराव बुक क्रमांक १०३१, दि. ९ सप्टेंबर १९२७

२८. जनरल फाईल नं. ४६

२९. हुजूर ठराव बुक क्रमांक ७०६, दि. २६/१/१९२५

३०. फडके, य. दि., आंबेडकरी चळवळ, श्रीविद्या प्रकाशन, पुणे १९९०, पृ. ५

३१. बागल, माधवराव, जीवनप्रवाह, माधवराव बागल प्रकाशन, कोल्हापूर, १९५४ पृ. ५

55. कोल्हापूर संस्थानातील प्रजापरिषद चळवळीत राधानगरी (महाल) तालुक्याचे योगदान

प्रा. डॉ. विजय विष्णू पाडळकर
प्रा. डॉ. एन डी. पाटील महाविद्यालय,
पेरीड–मलकापूर, ता. शाहूवाडी, जि. कोल्हापूर

प्रस्तावना

भारतीय स्वातंत्र्य चळवळीत विषेश करून संस्थान विलीनीकरणामध्ये प्रजापरिषद चळवळीचा महत्वपूर्ण सहभाग होता. प्रजा परिषदेमार्फत जनतेत राष्ट्रीय जागृती व स्वातंत्र्य लढयासाठी जनआंदोलने उभारण्याचे कार्य झाले. भाई माधवराव बागल, रत्नाप्पा कुंभार यांच्या नेतृत्वाखाली सन १९३८ मध्ये कोल्हापूर संस्थानात प्रजा परिषदेच्या चळवळीस प्रारंभ झाला. पूढे डेक्कन स्टेट पीपल्स कॉन्फरन्सच्या मार्गदर्शनाखाली कोल्हापूर प्रजा परिषदेची ६ फेब्रुवारी १९३९ रोजी निर्मीती झाली.[१] या प्रजापरिषदेच्या माध्यमातून सुरू झालेल्या चळवळीत कोल्हापूर संस्थानातील राधानगरी महालातील जनतेने उत्स्फुर्त सहभाग घेतला होता. कोल्हापूर संस्थान प्रजा परिषद या राष्ट्रीय वृत्तीच्या संघटनेवर १९०८ च्या क्रिमीनल लॉ अॅमेन्डमेंट अॅक्टच्या कलम ब १६ खाली दरबाराने बंदी घातली. दि. २९ मार्च १९३९ च्या विषेश राजपत्राद्वारे जाहीरनामा काढून बंदी हुकूम जारी केला. छत्रपती किंवा त्यांचे आदेशाविरूद्ध अनादर व्यक्त करणे, आंदोलन व शांतता भंग करणे. इत्यादी कारवायाविरूद्ध उपाययोजना करण्याचा निर्धार राजपत्राद्वारे व्यक्त करण्यात आला होता.[२] तरीही प्रजा परिषदेची चळवळ सुरूच होती. म्हणून दरबाराने प्रजा परिषदेची जागा, निधी, मालमत्ता जप्त केली. तसेच प्रजा परिषद ही संघटना बेकायदेशिर ठरवली. प्रजा परिषदेचा साधा सभासद असलेल्या व्यक्तीस सहा महिन्याची कैद, तर क्रियाशिल सभासदांना तीन वर्षांच्या कैदेची शिक्षा ठोठावण्याची तरतूद करण्यात आली. त्यामुळे संस्थानच्या बाहेर ब्रिटीश साम्राज्यात सीमा भागात राहून चळवळ गतीमान करण्याचा प्रयत्न कार्यकर्ते करत होते. त्यात राधानगरी महालातील गोपाळराव फराकटे, डॉ. लक्ष्मण मेडके, एकनाथ पाटील, धोंडीबा कुरणे इत्यादी कार्यकर्त्यांचा समावेश होता.[३]

सन १९४२ मध्ये कोल्हापूर संस्थानाने दुसऱ्या महायुद्धात भाग घेऊ नये म्हणून एकनाथ पाटील यांच्या अध्यक्षतेखाली कोल्हापूरात बैठक झाली. या बैठकीत संतराम पाटील या विद्यार्थी नेत्याने ब्रिटीशांनी येथून चालते व्हावे, सैन्यात कुणीही भरती होऊ नये हा ठराव मांडला. या बैठकीचे रूपांतर सभेत झाले. त्यामुळे पोलिसांनी एकनाथ पाटील सह कार्यकर्त्यांना अटक करण्यात आली. एकनाथ पाटील यांना एक महिना सक्त मजुरी व १०० रूपये दंड झाला होता. [४] १३ ऑगष्ट १९४२ रोजी प्रजा परिषदेच्या कार्यकारीणीची कोल्हापूर येथे बैठक झाली. या बैठकीत प्रत्येक तालुका कचेरीवर निरोधने करण्याचा निर्णय घेतला. त्यानुसार राधानगरी तालुका कचेरीवर डी.एस. खांडेकर, शिवाजीराव खोराटे, एकनाथ पाटील यांच्या नेतृत्वाखाली निरोधने करण्यात आली.[५] यानंतर प्रजा परिषदेचे कार्यकर्ते प्रभातफेऱ्या, मोर्चे, मिरवणूका, सभा, साराबंदी, या माध्यमातून चळवळ गतीमान करीत होते. त्यास लोकांचा पाठींबा मोठया प्रमाणात मिळत होता. तर क्रांतीकारक सशस्त्र दलाच्या सहाय्याने तारायंत्र तोडणे, टपाल गाडया लुटणे, सरकारी खजिना लुटणे, कचेरीवर हल्ला करणे, दारूगुत्ते उद्ध्वस्त करणे, चावडया जाळणे, प्रतीसरकार स्थापन करणे. इत्यादीद्वारे ब्रिटीश सरकार व कोल्हापूर दरबाराच्या विरोधात सशस्त्र क्रांती करत होते. त्यांचा क्रांतीसिंह नाना पाटील यांच्या प्रतीसरकारशी संपर्क होता.[६] क्रांतीकारकांनी हरीबा बेनाडे यांच्या नेतृत्वाखाली राधानगरी महालातील राशिवडे गांवची चावडी व दारूगुत्ते उध्वस्त करून गुत्तेवाल्याच्या तोंडाला डांबर फासून त्याची धिंड काढली. त्यास गावातील लोकांनी उत्स्फुर्त सहकार्य केले यावरून सरकारविरोधात किती असंतोष होता हे दिसून आले. याशिवाय तालुक्यातील सरवडे, आवळी येथील दारूगुत्ते जनतेने उत्स्फुर्तपणे उद्ध्वस्त केले. तर कोल्हापूर कणकवली टपाल गाडी दाजीपूर येथे लुटण्यात आली. त्यामुळे काही डॉ. मेंडके, एकनाथ पाटील, रघुनाथ गुळवणी इत्यादी क्रांतीकारकांच्या नेत्यांना पकडण्यात आले. परंतु, यातील बहुतांश कार्यकर्त्यांना पलायन करण्यात यश आले.[७] गारगोटी मामलेदार कचेरीवर आक्रमण हे गारगोटी, गडहिंग्लज, राधानगरी येथे पेटे स्वतंत्र करण्याच्या प्रयत्नातून झाले. १३ डिसेंबर १९४२ रोजी मध्यरात्री गारगोटी कचेरीवर हल्ला करण्याचे क्रांतिकारकांच्यात ठरले. त्यामध्ये ६० क्रांतीकारकांचा समावेश होता. त्यांचे पाच गट पाडण्यात आले होते. त्यामध्ये तालुक्यातील गोपाळ फराकटे, डॉ. मेडके, ईश्वरा विभुते, हरी शिरसेकर यांसह १० जणांचा समावेश होता. त्यांनी कचेरीवर हल्ला केला त्यात करवीर स्वामी शंकरराव इंगळे यांच्यासह ७ क्रांतीकारक हुतात्मे झाले. या भुदरगड पोलिस स्टेशनमध्ये गुन्हा रजि. क्र. ४६ सन १९४२ प्रमाणे या हल्ल्याची नोंद झाली. कोर्टाकडे चार्जशिट पाठवितांना काहींना फरारी गुन्हेगार म्हणून जाहिर केले. त्यात डॉ. मेडके, ईश्वरा विभुते व शिरसेकर यांचा समावेश होता. ११ ऑक्टोबर १९४३ रोजी खटल्यास प्रारंभ करून ३ मार्च १९४४ रोजी खटल्याचा निकाल लागला. त्यामध्ये ४२ पैकी ११ क्रांतीकारक निर्दोष सुटले. त्यामध्ये तालुक्यातील ईश्वरा विभुते यांचा समावेश होता.[८]

संस्थान सरकारने शेतकऱ्यांच्या विरोधी अनेक निर्णय घेतले होते. त्यामध्ये शेतसाऱ्यात वाढ व रयतेने आपली गरज सोडून उर्वरीत धान्य सरकारला विकले पाहिजे याची सक्ती केली. त्यामुळे शेतकऱ्यांमध्ये असंतोष निर्माण झाला होता. त्याचे पडसाद तालुक्यात उमटले. त्यानुसार राशिवडे येथे धान्य सभा झाली. त्या सभेत प्रजापरिषदेच्या नेत्यानी जनतेला संघटित होण्याचे व धान्य न विकण्याचे अवाहन केले. त्यास तालुक्यात मोठया प्रमाणात प्रतिसाद मिळाला. त्यानंतर ७ मार्च १९४२ रोजी सरवडे येथे शेतकरी परिषद झाली.[९] या परिषदेस तालुक्यातील हजारो शेतकरी उपस्थित होते. या परिषदेत खालील ठराव करण्यात आले.

श्री. पू. वा. महाराणी ताराराणीसाहेब यांना संवत्सर राज्याधिकार द्यावा.

सहकारी संस्थांचे कर्जाचे व्याज शे. ६.२५ रूपये पेक्षा अधिक नसावा.

शेतीचा विमा उतरण्याची सोय करावी.

गावोगावी सहकारी सोसायटया, दूध संस्था, पोल्ट्री फार्मस काढावेत.

प्राथमिक शिक्षणावर भर द्यावा.

त्यानुसार पेरी मंत्रिमंडळाने १९४२ मध्ये तालुक्यात सरवडे, तुरंबे व ठिकपूर्ली येथे मुलींच्या शाळा स्थापन केल्या.[१०] प्रजा परिषदेचे कार्यकर्ते गावोगावी ग्रामपंचायती, सहकारी संस्था स्थापन करून काही विधायक कार्यक्रम राबवत होते. त्यामध्ये गावची स्वच्छता, आरोग्याची काळजी, प्रभात फेरी, वृत्तपत्राचे सामुहिक वाचन, सामुदायिक शेती इत्यादीचा समावेश होता. यातून शेतकरी, शेतमजूर संघटित होत होते. त्यामुळे प्रजा परिषद चळवळीस गती आली होती.[११] तालुक्यात धामोड येथे प्रजापरिषदेचे झालेले अधिवेशन संस्थानात अधिक गाजले. या परिषदेत खंडकपातीला चालना देण्याचा, सावकारी जमीनदारी नष्ट करण्याचा निर्णय घेण्यात आला. या परिषदेनंतर शंकरराव देव यांच्या अध्यक्षतेखाली १ जून १९४६ ते ११ जून १९४६ पर्यंत ठिकपूर्ली, क।। वाळवे, व्हरवडे, राधानगरी, मोघवडे, सावर्डे इत्यादी ठिकाणी सभा पार पाडल्या.[१२] प्रजा परिषदेच्या चळवळीमुळे शेवटी कोल्हापूर संस्थानात लोकप्रतिनीधींच्या हाती कारभार आला. त्यानुसार वसंतराव बागल यांच्या नेतृत्वाखाली मंत्रिमंडळ स्थापन झाले, त्यात तालुक्यातील कोल्हापूर संस्थानाचे महसूलमंत्री म्हणून प्रजापरिषदेचे कार्यकर्ते ॲड. डि. एस. खांडेकर यांची निवड झाली.[१३] या मंत्रिमंडळाने राधानगरी, भूदरगड पेठयातील गरीब, धनगर, हरिजन या लोकांना नाममात्र आकार घेऊन ५००० एकर जमीन देण्यात आली. त्याशिवाय शेतकऱ्यांचे ५०० रूपयांपर्यंतचे कर्ज माफ केले.[१३] या मंत्रीमंडळाचा महत्वपूर्ण निर्णय म्हणजे संस्थानात चालू असलेली दशांश धान्य वसूली बंद करून पूर्वी वसूल केलेल्या धान्याचा साठा त्याच भागातील गरीब जनतेसाठी खुला करण्यात आला. १५ ऑगष्ट १९४७ रोजी भारताला स्वातंत्र्य मिळाले आणि १९४७ च्या भारतीय स्वातंत्र्य कायद्याने संस्थानिकाशी केलेले सर्व करार रद्द करण्यात आले. परंतु कोल्हापूर संस्थान विलीनीकरणाच्या प्रश्नावर दोन परस्पर विरोधी गट निर्माण झाले. त्यामुळे बागल मंत्रिमंडळाच्या विरोधात संस्थान विलीनीकरणवादी रत्नाप्पाआण्णा कुंभार यांनी आंदोलन चालू केले. त्यास तालुक्यातील बाळासाहेब पाटील कौलवकरसह अनेक कार्यकर्त्यांनी पाठिंबा दिला. त्यामुळे प्रजा परिषदेच्या कार्यकारी मंडळातील १५ पैकी ८ सभासदांनी राजीनामे देऊन कार्याध्यक्ष बागलांविरूद्ध अविश्वासाचा ठराव संमत करून विलीनीकरणाचा अंतीम निर्णय घेतला. त्यानुसार कोल्हापूर संस्थान १९४९ मध्ये भारतीय संघराज्यात विलीन झाले.[१४]

सारांश

भारतीय स्वातंत्र्य चळवळीत विषेश करून संस्थान विलीनीकरणामध्ये प्रजापरिषद चळवळीचा महत्वपूर्ण सहभाग होता. प्रजा परिषदेमार्फत जनतेत राष्ट्रीय जागृती व स्वातंत्र्य लढयासाठी जनआंदोलने उभारण्याचे कार्य झाले. भाई माधवराव बागल, रत्नाप्पा कुंभार यांच्या नेतृत्वाखाली सन १९३८ मध्ये कोल्हापूर संस्थानात प्रजा परिषदेच्या चळवळीस प्रारंभ झाला. पूढे डेक्कन स्टेट पीपल्स कॉन्फरन्सच्या मार्गदर्शनाखाली कोल्हापूर प्रजा परिषदेची ६ फेब्रुवारी १९३९ रोजी निर्मीती झाली. या प्रजापरिषदेच्या माध्यमातून सुरू झालेल्या चळवळीत कोल्हापूर संस्थानातील राधानगरी महालातील जनतेने उत्स्फुर्त सहभाग घेतला होता. १९४२ च्या चळवळीत येथील जनतेने गारगोटी खजिना लुट, गारगोटी मामलेदार कचेरीवर आक्रमण करून गारगोटी, गडहिंग्लज व राधानगरी पेठे स्वतंत्र करण्याचा प्रयत्न केला. याशिवाय संस्थान सरकारने शेतकऱ्याविरूद्ध घेतलेल्या निर्णयाविरोधात राधानगरी महालात धान्य सभा, इलाखा पंचायतीची सभा, शेतकरी परिषदा घेऊन जनजागृती केली. कोल्हापूर संस्थानात धामोड येथे झालेले प्रजा परिषदेचे अधिवेशन विषेश गाजले. राधानगरी महालातील शिवाजीराव खोराटे व बागल मंत्रिमंडळातील महसुल मंत्री ॲड. डि. एस. खांडेकर यांसारखे कार्यकर्ते प्रजा परिषदेच्या माध्यमातून उदयास आले होते.

संदर्भसूची

१) चौधरी कि.का. महाराष्ट्र राज्य गॅझेटियर , कोल्हापूर जिल्हा दर्शनिका विभाग – महाराष्ट्र शासन , मुंबई १९८९.

२) कत्ता.

३) अखंड भारत , १७ एप्रिल १९४४, पृष्ठ ३

४) दैनिक पुढारी , १४ मार्च १९४२, पृष्ठ २

५) दै पुढारी , १३ ऑगष्ट १९४२, पृष्ठ ३

६) डॉ. सुतार अ. मा. गारगोटी कचेरीवरील आक्रमण १९४२ , महालक्ष्मी ऑफसेट , कबनुर इचलकरंजी पृ. ३६

७) सुतार बापूसाहेब , कोल्हापूर जिल्हा स्वातंत्र्य लढा, सुवर्ण महोत्सवी ग्रंथ १९९१–९२ महालक्ष्मी ऑफसेट, कबनूर इचलकरंजी पृ.१३४

८) कित्ता

९) अखंड भारत , १ जुलै १९४४ पृ. ८

१०) दैनिक पुढारी, ९ मार्च १९४२ पृ.२

११) अखंड भारत , १ जुलै १९४६ अंक २२, पृ. ४

१२) दैनिक पुढारी, १२ जून १९४६ पृ.१–३

१३) अखंड भारत , ४ फेब्रु १९४७ अंक ४६, वर्ष ४ थे , पृ. १

१४) चौधरी कि.का. महाराष्ट्र राज्य गॅझेटियर , कोल्हापूर जिल्हा दर्शनिका विभाग – महाराष्ट्र शासन , मुंबई १९८९.

56. मिरज संस्थान व प्रजा-परिषद चळवळ

डॉ. सुवर्णा प्रकाश पाटील
इतिहास विभाग प्रमुख,
मिरज महाविद्यालय, मिरज.

मिरज संस्थानची स्थापना :-

'मिरज संस्थान' हे दक्षिण महाराष्ट्रातील एक महत्वपूर्ण संस्थान होते. पटवर्धन सरदारांच्या घराण्यातील नेतृत्व करणारे मिरज पटवर्धन घराणे होते. पेशव्यांच्या कालखंडामध्ये हे घराणे उदयाला आले. इ. स. १८१७ मध्ये इंग्रज व पेशवा बाजीराव दुसरा यांच्यामध्ये खडकी येथे युध्द सुरू झाले तेव्हा इंग्रजांनी सर्व पटर्धनांना लढाईत सामिल न होण्यासाठी कळविले. इंग्रजांनी दक्षिणेतील मिरज, तासगांव, कुरूंदवाड, जमखिंडी इ. पटवर्धनांशी स्वतंत्र करार केले व पटवर्धन संस्थानांना मान्यता दिली. इ. स. १८१९ मध्ये गलगले येथे मिरजकर व इंग्रज यांच्यामध्ये करार झाला आणि या करारानुसार मिरज संस्थान निर्माण झाले. यावेळी नारायण गंगाधर मिरजकर मृत्यूपावल्यामुळे त्यांचे अज्ञानी पुत्र गणेश नारायण यांच्यासाठी चुलते कारभारी माधवराव गंगाधर यांनी करारावर सह्या केल्या. मिरज संस्थान स्थापन झाल्यानंतर लगेचच संस्थानमध्ये वाटणी संदर्भात वाद निर्माण होऊन मिरज संस्थानच्या वाटण्या झाल्या. ३ मे १८२१ रोजी मिरज दौलतीच्या वाटण्या होऊन गणपतराव नारायण यांना मिरज, कृष्णराव गोविंद यांना सोनी माधवराव गंगाधर यांना मिरज मळा आणि गोपाळ गंगाधर यांना सुपारी बाग असा प्रदेश मिळाला. अशारितीने गणपतराव नारायण यांना १,८५,९३६ रूपये उत्पन्नाचा सरंजाम मिरज संस्थान म्हणून मिळाला त्यामध्येच मिरज भुईकोट किल्ल्याचा समावेश होता. मिरज संस्थानची निर्मिती झाल्यानंतर गणेश नारायण (सन १९१३-१८३३), गंगाधर गणेश (१८४९-१८६१) गणपत गंगाधार (सन १८७१-७४), गंगाधर गणेश (सन १८७५-१९३९), नारायण गंगाधर (सन १९३९-१९४८) अशा पाच संस्थानिकांच्या कारकिर्दीत मिरज संस्थानची वाटचाल झाली.[1] या संस्थानाधिपतींनी संस्थान राजसत्तेचा अधिकार एकतंत्री राजेशाही सारखा वापरला. गंगाधरराव बाळासाहेब यांनी ३४ वर्षे संस्थानचा कारभार केला.

प्रजा परिषद चळवळीची पार्श्वभूमी :-

ब्रिटीश राजवटीमध्ये भारताचे विभाजन इंग्रजांच्या प्रत्यक्ष अंमलाखालील मुलूख आणि छोटी मोठी संस्थाने असे झाले होते. ब्रिटीश अंमलाखालील प्रदेशात भारतीय राष्ट्रीय काँग्रेसच्या नेतृत्वाखाली स्वातंत्र्यचळवळ सुरू झाली होती. संस्थानी प्रदेशात त्याच अनुषंगाने प्रजा परिषदेची चळवळ सुरू झाली होती. दक्षिण महाराष्ट्रामध्ये संस्थानातील चळवळ उभी करण्याचे कार्य न. चिं. केळकर, वामनराव पटवर्धन, ग. र. अभ्यंकर यांनी सन १९२१ मध्ये पुणे येथे 'दक्षिण संस्थान हितवर्धन सभा' स्थापन करून केले होते. या सभेमुळे अनेक संस्थानांमध्ये राजकीय संघटना स्थापन करण्यास प्रेरणा मिळाली.[2]

मिरज संस्थानमध्ये प्रजा परिषदेची स्थापना :-

मिरज संस्थानचे संस्थानाधिपती गंगाधरराव पटवर्धन यांनी "मी प्रजेचा, प्रजा माझी" या तत्वानुसार हाती घेतला होता. पण प्रजेला कोणत्याही प्रकारचे अधिकार किंवा हक्क स्वातंत्र्य नव्हते. जनतेला स्वःताची दुःखे, तक्रारी कोठेही मांडता येत नव्हती या परिस्थितीमध्ये मिरज शहरातील तात्या शिखरे यांनी जनतेचे नेतृत्व करून ११ मे १९२२ रोजी संस्थानामध्ये प्रजापरिषदेची स्थापना केली.[3] "मिरज संस्थानामध्ये संस्थानाधिपतींच्या अधिपत्याखाली जबाबदार राज्यपध्दती शांततेच्या व न्यात मार्गाने प्राप्त करून घेणे" हे प्राजपरिषदेचे ध्येय होते.

मिरज संस्थान प्रजा-परिषदेचे कार्य :-

आंदोलने, मोर्चा, सभा, जनजागृती, पत्रके वाटणे हे व असे अनेक उपक्रम हाती घेतले. परिषदेची एकूण दहा अधिवेशने झाली. या अधिवेशनाचा थोडक्यात आढावा घेतल्यास आपल्याला परिषदेच्या कार्याचा आवाका लक्षात येण्यास मदत होईल.

अ.क्र.	अधिवेशन कालखंड	अधिवेशनाचे स्थळ	अध्यक्ष
१	११, १२ मे १९२२	मिरज	चिंतामणराव वैद्य
२	२६ मे १९२४	मिरज	ग. र. अभ्यंकर
३	२९ मे १९२७	मिरज	बाबुराव गोखले
४	९ सप्टेंबर १९२८	मिरज	गोविंदराव रानडे
५	२५ मे १९३१	मालगाव	न. चिं. केळकर
६	२८, २९ मे १९३२	लक्ष्मेश्वर	आण्णासाहेब लट्ठे
७	२२, २३ जून १९४०	लक्ष्मेश्वर	टी. भाष्यम
८	११ जाने १९४२	मालगाव	माधवराव बागल
९	८ डिसेंबर १९४४	मिरज	बाळासाहेब खेर
१०	२५, २६ डिसेंबर १९४६	मोडनिंब	रावसाहेब पटवर्धन

मिरज संस्थान प्रजा-परिषदेच्या अधिवेशनाचा थोडक्यात आढावा :-

१) पहिल्या अधिवेशनामध्ये संस्थानामध्ये जबाबदार राज्यपध्दतीची मागणी करण्यात आली होती. श्री. वैद्य यांनी "राज्य म्हणेज आपली खाजगी मिळगत आहे." ही संस्थानिकांनी कल्पना सोडून द्यावी, प्रजेला राज्यकारभाराचे हक्क देऊन मर्यादित राजसत्ता स्थापन करण्याचे आवाहन केले होते. भाषण स्वातंत्र्य, मुद्रण स्वातंत्र्य, शिक्षण, औषध पुरवठा, मद्यपानास बंदी, अस्पृश्यता निवारण करणे अशा अनेक मागण्या निर्भिडपणे संस्थानिकांसमोर मांडल्या होत्या. दुसया अधिवेशनामध्ये अभ्यकरांनी मिरज शहराची अवस्था लक्षात घेऊन 'भिकार मिरज' असा उल्लेख केला होता.[4] तिसया अधिवेशनामध्ये, मिरज संस्थानामध्ये जबाबदार प्रतिनिधिक राज्यपध्दतीची स्थापना, रॉयल कमिशनवर प्रजेचा एक प्रतिनिधी, पिण्याच्या पाण्याचा प्रश्न, शेतसारा वाढू देऊ नये अशा मागण्या दरबारकडे केल्या होत्या. सन १९२८ मध्ये संस्थानिकांनी संस्थानामध्ये ५०-६० ते ७५ % पर्यंत सारावढी केली होती. त्या विरोधात सध्याची मोहिम परिषदेच्या नेत्यांनी हाती घेतली. ते पाहून दरबारने सभाबंदी घोषित केली. अशा परिस्थितीमध्ये प्रजा परिषदेने चौथे अधिवेशन मिरज येथे घेतले. या अधिवेशनात सारावढी विरोधासंदर्भात ठराव पास केला.[5] ब्रिटीश मुलुखात गांधींच्या नेतृत्वाखाली सन १९३० मध्ये सविनय कायदेभंग चळवळ सुरू झाली. त्याचा परिणाम मिरज संस्थानवरही झाला होता. मिरज दरबारने केलेला सभाबंदी कायदा रद्द करावा म्हणून प्रजापरिषदेने १९२२ पासून प्रयत्न केले होते. तेव्हापासून त्या कायद्याचे पालनही केले होते. पण या चळवळीचा परिणाम म्हणून तात्या शिखरेंनी पुण्याच्या 'मराठा' वर्तमानपत्राचे संपादक श्री. दि. वा. दिवेकर यांची सभा आयोजित केली होती. या प्रसंगी मिरज दरबारने तात्या शिखरेंना तुरूंगवासाची शिक्षा व दंड ठोठावला. तुरूंगवास भोगल्यानंतर शिखरेंनी गणेशोत्सवामध्ये स्वदेशी संबंधीचे व्याख्यान दिले. तेव्हा दरबारने 'परस्थ कायद्यानुसार' शिखरेंना हद्दपार केले होते. या दरबारच्या दडपशाही धोरणाविरूध्द परिषदेने २५/०५/१९३१ रोजी न. चिं. केळकर यांच्या अध्यक्षतेखाली मालगाव येथे ५ वे अधिवेशन घेतले. या अधिवेशनात प्रजेला मुलभूत हक्क, जबाबदार राज्यपध्दती, पाण्याची सोय, मिरज स्टेट बँकेची स्थापना इ. मागण्या केल्या होत्या. या अधिवेशनानंतर संस्थानने कायदेमंडळ स्थापन करण्याचा निर्णय घेतला. हा प्रजा परिषदेला दहा वर्षांनी मिळालेला विजय होता.

संस्थानमध्ये कायदेमंडळ स्थापन झाले. पहिले अधिवेशनही झाले, पण श्रीमंतानी कायदे मंडळाच्या अधिवेशनामध्ये पास झालेल्या ठरावाची विशेष दखल घेतली नाही. यासाठी प्रजापरिषदेने लक्ष्मेश्वर येथे सहावे अधिवेशन भरविले. या अधिवेशनात जनतेच्या आर्थिक परिस्थीतीची पहाणी करणे व कर्जमुक्त करण्याकरीता एक कमिटी नियुक्त करण्याचा ठराव मंजूर केला होता. प्रजा परिषदेच्या २२ व २३ जून १९४० च्या लक्ष्मेश्वर येथे सातव्या अधिवेशनामध्ये अध्यक्ष टी. भाष्यम यांनी भाषणातून, राजेसाहेबांनी लोकशाही प्रणीत राजकीय सुधारणा करण्याकरीता ताबडतोब जबाबदार राज्यपध्दती स्थापन करण्याचे आवाहन केले या परिषदेने एकूण २४ ठराव पास केले होते.[6] त्यावेळच्या एकूण परिस्थितीचा विचार करून दरबारने जानेवारी १९४२ मध्ये जाहिरनामा काढून व्दिदल राज्यपध्दतीची स्थापना केली होती. पण दरबारचे हे कार्य असमाधानकारक व अपुया सुधारणा देणारे होते. याचा विचारविनिमय करण्यासाठी प्रजा परिषदेने आठवे अधिवेशन मालगाव येथे ११ जानेवारी १९४२ रोजी देशभक्त माधवराव बागल यांच्या अध्यक्षतेखाली घेतले होते. या अधिवेशनामध्ये एकूण दहा ठराव मंजूर केले होते. त्यामध्ये मालगावची पाणीपुरवठा योजना, हरिजनांना सामाजिक स्वातंत्र्य, शेतकयांना सायात सूट व राजकीय सुधारणा हे विषय होते.[7]

महात्मा गांधीजींची 'चलेजाव' चळवळ व त्याचा प्रजापरिषदेवरील प्रभाव :-

सन १९२० नंतर भारतीय स्वातंत्र्य आंदोलनाचे नेतृत्व महात्मा गांधींकडे आले. आणि हे आंदोलन खया अर्थाने जनआंदोलन बनले. गांधीजींचे संस्थानिकांबद्दलचे धोरण सकारात्मक होते. संस्थानिकांनी प्रजेचे विश्वस्त असल्याच्या भुमिकेतून कारभार करावा अशी अपेक्षा होती. व संस्थानी प्रजेने स्वतःला पचतील तेवढ्याच चळवळी कराव्यात असेही गांधीजीचे मत होते.[8] ८ ऑगस्ट १९४२ रोजी गांधीजींनी 'चलेजाव' चळवळ सुरू केली तेव्हा संस्थानी प्रजेने ब्रिटीशांविरूध्द तीव्र प्रमाणात चळवळ उभी करून ब्रिटीशांचे सार्वभौमत्व नष्ट करण्याचा आदेशच जनतेला दिला. वरील आदेशानुसार मिरज प्रजा परिषदेनेसुध्दा गांधींच्या 'करेंगे या मरेंगे' या घोषणेनुसार कायदेभंगाची चळवळ संस्थानात सुरू केली. संस्थानिकांनी ब्रिटीश सत्ता झुगारून द्यावी व जबाबदार राज्यपध्दती स्थापन करावी अशी मागणी केली. तात्या शिखरे, पुंडलीकजी कातगडे इं. नी याचळवळीचे नेतृत्व केले. संस्थानिकांनी संस्थानातील प्रमुख क्रांतीकारकांना कैद करून तुरूंगात टाकले. त्यांचा छळ केला. तुरूंगामध्ये कार्यकर्त्यांनी उपोषण केले पण दरबारने कोणतीही दखल घेतली नाही. पुढे चार महिन्याने जादा गॅझेट काढून राज्य घटना बनविण्याकरीता एक कमिटी नेमण्याचे मान्य केले. ती कमिटी म्हणजे 'बखले राज्यघटना कमिटी' होय. या कमिटीकडे मर्यादित अधिकार दिल्याने प्रजा परिषदेने या कमिटीवर बहिष्कार टाकला व पर्यायी राज्यघटना समिती स्थापन केली. या घटना समितीने घटना तयार केली. समितीचे अध्यक्ष श्री. पंडित सातवळेकर होते. पण दरबारने प्रजापरिषदेची राज्यघटना अमंलात आणली नाही. अशा परिस्थितीत प्रजापरिषदेने ८ डिसेंबर १९४४ रोजी मिरज येथे श्री. बाळासाहेब खेर यांच्या अध्यक्षतेखाली ९ वे अधिवेशन आयोजित केले. या अधिवेशनात महत्वाचे पाच ठराव मंजूर झाले होते. यामध्ये सामाईक हायकोर्ट योजना, प्रजा-परिषदेच्या घटनेस संमती, तात्या शिखरेंची कैदेतून मुक्तता, पिण्याचा पाण्याचा प्रश्न, व मोफत प्राथिमक सक्तीचे शिक्षण इ. विषय होते.[9] या परिषदेनंतर लगेचच मिरज संस्थानने,

नारायणराव तात्यासाहेब पटवर्धन यांनी स्वतःच्या पाचव्या राज्यारोहण प्रसंगी जबाबदारीच्या स्वराज्याची मुहूर्तमेढ १२ जानेवारी १९४५ रोजी जाहिरनामा काढून रोवली होती. पण दरबारने दिलेल्या राज्यघटनेनुसार कायदेमंडळास फारच कमी अधिकार दिले होते.

मिरज संस्थान प्रजा परिषदेचे दहावे अधिवेशन २५, २६ डिसेंबर १९४६ रोजी मोडनिंब येथे भरविले होते. या अधिवेशनाचे अध्यक्ष श्री. रावसाहेब पटवर्धन होते.[10] या अधिवेशनात अनेक महत्वाचे ठराव पास केले होते. स्वातंत्र्य जवळच्या टप्यात दिसत होते. त्यासाठी प्रजापरिषदेच्या कार्यकर्त्यांनी बहुमोल योगदाने दिले होते. या अधिवेशनात साक्षरता अभियान, शेतकरी हिताचे कायदे, अस्पृश्यता निवारण, देवस्थानचा निधी शेतकयांसाठी वापरावा असे सामान्याच्या कल्याणाचे ठराव पास करण्यात आले होते. या परिषदेने गांधीजींच्या जातीय ऐक्यासाठी केलेल्या उपोषणालाही पाठींबा दिला, तसेच संस्थानांतर्गत संघराज्य की विलीनीकरण याचा निर्णय प्रजा घेईल असे ठरले होते.

मिरज संस्थान प्रजा-परिषदेच्या ध्येयात बदल :-

आतापर्यंत संस्थानाधिपतीच्या अधिपत्याखाली जबाबदार राज्यपध्दती स्थापन करणे हे प्रजापरिषदेचे ध्येय होते. पण भारतातील बदललेल्या परिस्थितीनुसार प्रजा परिषदेने आपल्या ध्येयात बदल केला होता. बदललेल्या ध्येयानुसार "अखंड व भारताच्या एकीकरणासाठी प्रातांचा अविभाज्य भाग म्हणून सध्याच्या मिरज संस्थानचे विलीनीकरण व्हावे हे अंतिम ध्येय स्विकारले होते. हिंदुस्थानचे व्हाईसरॉय लॉर्ड माऊंट बॅटन यांनी दि. १५/०८/१९४७ रोजी हिंदुस्थानच्या स्वातंत्र्याची घोषणा केली. त्याचा परिणाम म्हणून भारताच्या निर्मितीसाठी मिरज संस्थानाधिपतींनी मिरज संस्थान स्वतंत्र भारतात विलीन केले. अशारितीने प्रजा-परिषेदेचा चळवळीची परिणती शेवटी संस्थानच्या भारतीय संघराज्याच्या विलीनीकरणात झाली. मिरज प्रजा परिषदेच्या चळवळीमध्ये वामनराव पटवर्धन, ग. रा. अभ्यंकर, तात्या शिखरे, डॉ. ना. वि. जोशी, पुंडलीकजी कातगडे, रा. ह. जयकर, नी. वि. महाबळ, बाबाण्णा घुळी, दि. रा. घोरपडे, गोविंदराव पटवर्धन अशा अनेक कार्यकर्त्यांनी आपले मोलाचे योगदान दिले होते.

प्रजा-परिषदेच्या चळवळीतून संस्थानी प्रजेला झालेला लाभ :–

१) जबाबदार राज्यपध्दती धोरण
२) कायदेमंडळ निर्मिती
३) नगरपालिकेत लोकनियुक्त बहुमत व लोकनियुक्त अध्यक्ष
४) लोकलबोर्ड स्थापना
५) हायकोर्ट स्थापना
६) स्टेट बँक स्थापना
७) सभाबंदीचा कायदा रद्द
८) जबर सारावाढ २ वेळा रद्द
९) परस्थानाचा कायदा रद्द
१०) काँग्रेस कमिटीवरील बंदी उठविली
११) स्त्रीशिक्षण व प्राथमिक शिक्षण सुधारणा
१२) शेतकरी वर्गासाठी ट्रस्टची योजना
१३) स्वातंत्र्य आंदोलनामध्ये योगदान

अशा प्रकारे मिरज संस्थानातील प्रजा परिषदेने जनतेच्या लोकशाही हक्कासाठी चळवळ सुरू केली. या चळवळीचा परिणाम म्हणून जनतेला अनेक गोष्टी मिळाल्या. भारताला जेव्हा स्वातंत्र्य मिळाले तेव्हा मिरज संस्थानातील ही चळवळ आखिल भारतीय लोकशाही प्रक्रियेस वेग देणारी महत्वाची राजकीय चळवळ ठरली.

संदर्भ

१) अग्रवाल गु. रा., मिरज संस्थानचा परिचय, हरीजन सेवक प्रेस, मिरज.
२) श्री. पटवर्धन वि. अ., संस्थानातील लोकशाहीचा लढा, संस्थानी स्वराज्य कचेरी, पुणे १९४०, पृ. क्र. १२६.
३) श्री. कोडोलीकर स. ज., मिरज नगरीचा इतिहास, जनार्दन प्रबोधन संस्था मिरज, १९९९, पृ. क्र. ८७.
४) स्पष्ट वक्ता' मिरज संस्थान सारावाढ आणि रयतांचा सत्याग्रह, आर्यभूषण प्रेस, पुणे, १९२९, पृ. क्र. ०४.
५) उपरोक्त, पृष्ठ क्र. ३५.
६) श्री. पटवर्धन वि. अ., दक्षिण महाराष्ट्रातील संस्थानच्या विलिनीकरणाची कथा, पुणे, १८६६, पृ. क्र. १८.
७) दै. ज्ञानप्रकाश पुणे, २८ जानेवारी १९४२.
८) डॉ. राजूरकर व कुरूंदकर, पंडित नेहरू – एक मागोवा, साधना प्रकाशन पुणे, ३०, १९७३ पृ. क्र. ९७.
९) श्री. पटवर्धन वि. अ. उपरोक्त पृ. क्र. ५१.
१०) श्री, शिखरे दा. न. संस्थानी प्रजेचे टिळक, तात्या शिखरे चरित्र प्रकाशन समिती पुणे, १९८० पृ. क्र. २०.

57. 'राजर्षी शाहू छत्रपती' आणि अस्पृश्यता-निवारण

प्रा. बालाजी गंगावणे
(इतिहास विभाग, प्रमुख) माऊली महाविद्यालय,
वडाळा, ता. उ. सोलापूर, जि. सोलापूर

भारतीय समाजव्यवस्थेला 'जातीप्रथा' हा लागलेला असाध्य रोग, कलंक असून त्याने भारतीय समाजातील शुद्रांचे, बहुजनसमाजाचे जीवनच पूर्णपणे उद्धवस्त करून टाकले होते. हजारो वर्षे बहुजन समाज या सामाजिक गुलामगिरीतच पशुपेक्षाही हीन जीवन जगत होता. आधुनिक काळात ही अमानवी प्रथो नष्ट करण्यांचा अनेक समाजसुधारक विचारवंत यांनी प्रयत्न केले. महात्मा ज्योतिराव फुले, डॉ.बाबासाहेब आंबेडकर, छत्रपती शाहू महाराज, महर्षी शिंदे, महात्मा गांधी व इतर अनेक सुधारकांनी जातीप्रथे विरोधात कार्य केले. जाती प्रथेचे निर्मूलन करण्यासाठी राजर्षी छत्रपती शाहू महाराजांचे कार्य वैशिष्ट्येपूर्ण आहे. कारण ते राज्यकर्ते असल्यामुळे त्यांच्या कार्याला कतीची जोड मिळाली व बहुजन समाजाचे कल्याण झाले. आधुनिक महाराष्ट्राच्या इतिहासात आपल्या शैक्षणिक सामाजिक, आर्थिक कार्याद्वारे बहुजन-समाजाला जागृत करून त्यांची सर्व क्षेत्रात प्रगती घडवून आणणारे प्रजाहितदक्ष सत्ताधीश म्हणजे राजर्षी शाहू छत्रपती होय. शाहू महाराजांच्या कार्यामुळे त्यांचे व्यक्तिमत्व केवळ कोल्हापूर संस्थानापुरतेच मर्यादित न राहता, अखिल महाराष्ट्रात नव्हे तर भारतातही लोकप्रिय झाले. एक आदर्श राजा, बहुजन समाजाचा नेता म्हणून असलेली त्यांची लोकप्रियता शेवटपर्यंत कायम टिकली. सर्वसामान्य माणसाचे कल्याण करणे हे त्यांनी आपले कर्तव्य मानले व सर्वसमाजालाही या कर्तव्याच्या अनुरोधाने मार्गदर्शन केले.

- **अस्पृश्यंता निवारणाचे कार्य :-**

जातीभेदाच्या परंपरेमुळे भारतीय समाजात राजकीय किंवा सामाजिक एकता अस्तित्वात नव्हती. जातिभेदामुळे बहुजनसमाजातील व्यक्तिला माणूस म्हणून असलेले अधिकार ही मिळत नव्हते. त्यामुळेच राष्ट्रीय व सामाजिक ऐक्य नष्ट करणारा हा जातिभेद दूर करून निदान हिंदूना तरी एक करावे असा महाराजांचा विचार होता. जातिभेद हेच जातीमत्सराचे मूळ असल्याने सर्व जाती नष्ट करून समाज एकजिनसी बनविण्याचे त्यांचे धोरण होते. आपल्या देशाच्या ऐक्याच्या व उन्नतीच्या मार्गातील जातिभेद ही धोंड नाहीशी केली पाहिजे. तथापि जातिनिर्मूलनाचे उद्दिष्ट सहजसाध्य नाही. त्यासाठो प्रत्येक जातीने शिक्षण व जागृतीच्याद्वारे आपले सामर्थ्य व संघटन वाढविले पाहिजे असे त्यांनी बहुजन समाजाला सांगितले. जातिभेद निर्मूलनाच्या संदर्भात महाराजांनी आपले विचारच मांडले असे नाही तर, आपल्या वैयक्तिक आचाराने या विषयी समाजासमोर आदर्श ठेवला. आवश्यक तेथे कायदे करून त्याची कडक अंमलबजावणी ही केली.

- **अस्पृश्यांत शिक्षणाचा प्रसार करण्यासाठी प्रयत्न :-**

हजारो वर्षाच्या सामाजिक गुलामगिरी विरूद्ध, बहुजनसमाजास संघर्ष करण्यासाठी तयार करणे, ही कांही सोपी गोष्ट नव्हतो. त्यासाठी त्यांना शहाणे करणे आवश्यक होते. ही गोष्ट शिक्षणाच्या प्रसाराशिवाय होणार नव्हती.

महाराजांनी संस्थानातील सर्वच मागासजातीस शिक्षित करण्याचे ठरविले. १९०८ साली महाराजांच्या मदतीने भास्करराव जाधव यांनी 'मागासजातीत विद्या प्रसारक मंडळी' नावाची संस्था स्थापन केली. या पूर्वीच मागासवर्गीयांसाठी त्यांनी वसतिगृह सुरु केले होते. त्या काळात अस्पृश्य वर्गात शिक्षणाविषयी प्रचंड अनास्था होती. तरीही महाराजांनी शिक्षण प्रसाराचे प्रयत्न सोडले नाहीत. त्यांच्या राज्यारोहणसमयी (१८९४) संस्थानात अस्पृश्यासाठी फक्त ०५ शाळा व १६८ विद्यार्थी होते. १९०७-०८ साली अस्पृश्यांच्या शाळांची संख्या १६ व विद्यार्थी संख्या ४१६ झाली तर १९१२ साली २७ शाळा व विद्यार्थी संख्या ६३६ इतकी झाली. उत्तोरोत्तर त्यात वाढ झाली. अस्पृश्यात इंग्रजी शिक्षणांचा प्रसार करण्यासाठी श्रीपतराव शिंदे यांच्या मागर्दर्शनाखाली विशेषवर्ग चालविले. त्यामुळे अस्पृश्य इंग्रजी शिक्षणात पुढे गेले.

- **अस्पृश्य समाजाच्या शिक्षणासाठी खास आदेश :-**

अस्पृश्यांच्या शिक्षण प्रसारासाठी शाहू महाराजांनी केलेल्या कांही खास प्रयत्नांचे उल्लेख त्यांच्या निवडक आदशात मिळतात. १९०६ साली कोल्हापूरात महार, चांभार वगैरे जातीच्यासाठी एक 'रात्रशाळा' होती. २८ नोव्हेंबर १९०६ च्या आदेशाने महाराजांनी ती शाळा कायम केली. ०४ ऑक्टोंबर १९०७ च्या आदेशानुसार कोल्हापूरात अस्पृश्यांच्या 'मुलीच्या शाळेला' मंजूरी दिली व खर्चाची तरतूद केली. १९०९ साली वसतिगृहाच्या इमारतीस जागा दिली. सर्वात महत्वाचा आदेश २४ नोव्हेंबर १९११ रोजी काढला. त्यानुसार संस्थानातील सर्व अस्पृश्य वर्गास, सर्व प्रकारचे शिक्षण मोफत करण्यात आले व दरबाराकडून हुशार विद्यार्थ्यांस शिष्यवृत्ती सुरु केली. ०७ एप्रिल १९११ च्या आदेशानुसार अस्पृश्य मुलांना पाटया, पुस्तके, पेन्सिल मोफत देण्याचे जाहिर केले. तलाठी वर्गातील अस्पृश्यमुलास दरमहा ६० रू. प्रमाणे खास शिष्यवृत्ती जाहिर केली. २८ सप्टेंबर १९१९ रोजीच्या आदेशानुसार अस्पृश्यांच्या स्वतंत्र शाळा बंद केल्या व अस्पृश्यांना सरकारी शाळेत सर्व जातीच्या मुलात एकत्र बसविले. महाराजांनी केवळ आपल्याच संस्थानात अस्पृश्यांच्या शिक्षणाचा प्रसार केला असे नाही तर संस्थानाच्या बाहेर ही विद्या प्रसारासाठी सढळ हस्ते आर्थिक मदत केली.

- **अस्पृश्य मुलांचे उपनयन :-**

अस्पृश्यांना उच्चवर्णीयांच्या बरोबर आणण्यासाठी महाराजांनी धाडशी व क्रांतीकारी निर्णय घेतले. अस्पृश्य मुलांना धार्मिक शिक्षण दिले व प्रथम त्यांची वैदिक पद्धतीने संथा केली. याकामी त्यांनी आर्यसमाजी स्वामींची मदत घेतली. त्यामुळे अस्पृश्यातील भेकडपणा कमी होऊन आत्मविश्वास निर्माण झाला. अस्पृश्यांच्या मुलांचे उपनयन करून त्यांना 'वेदाची संथा' देणारा व त्यांना ब्राह्मणांच्या सारखा श्रेष्ठ दर्जा मिळवून देणारा छत्रपती शाहू राजा, हे हिंदुस्थानच्या इतिहासातील पहिले राजे होय.

- **'हजेरी' पद्धतीचे निर्मूलन :-**

पद दलितांची सेवा हीच खरी ईश्वर सेवा या मानवतावादी भूमिकेतून महाराजांनी अस्पृश्यमुक्तीचा पहिला आदेश २७ जुलै १९१८ ला मंजूर केला. त्यानुसार अस्पृश्यावर लादलेली 'हजेरी' ह्या अमानुष पद्धतीचे निर्मूलन केले. महार, मांग, रामोशी व बेरड या चार जातीच्या लोकांची दररोज पाटलाकडील हजेरी बंद केली व २९ सप्टेंबर १९१८ रोजीच्या आदेशानुसार गुन्हेगार जमात 'गट्टेचोर' जातीची हजेरी बंद केली.

- **'वेठवरळा' पद्धतीचे निर्मूलन :-**

'हजेरी' प्रमाणेच महार समाजाच्या माथ्यावर 'वेठवरळा' ही अमानुष पद्धत लादली होती. या पद्धतीनुसार पाटील-कुलकर्णी व सरकारी अधकारी विना मोबदला महारास अनेक कामे सांगून राबवून घेत. महार हा वतनदार असून ही त्याला अशी कामे करावी लागत. माणगाव परिषदेनंतर अवघ्या महिन्याभरातच 'वेठरवळा' पद्धती कायद्याने बंद केली व आदेश काढून जर कोणी अशी कामे करवून घेणाऱ्यास जबरशासन करण्यात येईल असे जाहिर केले.

- **महार वतन खालसा :-**

महाराची वेठबिगारी पद्धत बंद केली. तरी महार वतनाबरोबर येणारी कामे त्यांना करावयीच लागत होती. 'महारवतन' म्हणजे एक प्रकारची गुलामगिरीच होती. ही गुलामगिरी नष्ट करण्याचा एकमेव मार्ग म्हणजे सर्व महाराचे 'महारकीचे वतनच' रद्द करणे. यासाठी महाराजांनी डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या बरोबर चर्चा करून में १९२१ मध्ये महार वतन खालसा केले व एक प्रकारची सामाजिक गुलामगिरी संपविली.

- **अस्पृश्यांना वकिलीच्या सनदा :-**

अस्पृश्यांची अस्मिता जागी व्हावी व त्यांचा आत्मविश्वास वाढावा म्हणून छत्रपती शाहू महाराजांनी मॅट्रिक पास झालेल्या अगर इंग्रजी चांगले शिकलेल्या महार, मांग, चांभार जातीच्या विद्यार्थ्यांना वकिलीच्या सनदा दिल्या. याप्रसंगी अनेकांनी त्यांच्यावर टीका केली पण ते डगमगले नाहीत.

- **पुढारी आपल्याच जातीचा असावा :-**

अस्पृश्य समाजाने आपल्या मुक्तीसाठी व उन्नतीसाठी वरिष्ठ वर्गातील पुढारी घेऊ नयेत असे महाराजांचे मत होते. "जो दुसऱ्यावरी विश्वासला। त्याचा कार्य भाग बुडाला। जो आपणच कष्टात गेला। तोचि जाण भला।
पशूदेखील आपल्या जातीशिवाय पुढारी स्विकारत नाहीत. मग मनुष्यांनी का स्वीकारावा? माणगांव परिषदेत, डॉ.आंबेडकरांच्या रूपाने अस्पृश्यांनी आपला 'खरा पुढारी' शोधून काढल्याबद्दल त्यांनी त्यांचे अभिनंदन केले.

- **पवित्र जीवन कार्य :-**

महाराजांनी कोल्हापूर संस्थानात बहुजन समाजाचा हवा तेवढा उद्धार करावा. त्याला ब्रिटीशांचा विरोध नव्हता. परंतु संस्थानाबाहेरच्या सामाजिक चळवळीत महाराजांनी भाग घेऊ नये असे इंग्रजांचे मत होते. १९२२ मध्ये इंग्रजांच्या पत्रास उत्तर देतांना महाराज म्हणतात. "महाराष्ट्रातील अस्पृश्यासकट तमाम बहुजन समाजाचा उद्धार, हे माझे पवित्र जीवन कार्य आहे. या लक्षावधी शेतकरी, कामकरी नि मजूर बांधवांची सामाजिक, धार्मिक नि आर्थिक सुधारणा झाल्याशिवाय, सरकारने राजकारणी हक्काची भाषा बोलावी तरी कशाला? तुम्ही पदच्युत करण्यापूर्वी मीच गादीचा राजीनामा देईन, पण एकदा हातात घेतलेली चळवळ, प्राण जाईतोवर हा शाहू सोडणार नाही."

- **तलाठ्यांच्या नेमणूका-एक सामाजिक क्रांती :-**

सरकारी सेवेत अस्पृश्याच्या नेमणूका केल्या जाव्यात. यासाठी महाराजांनी ५ ऑगस्ट १९१८ रोजी खास हुकूम काढला व अस्पृश्यजातीच्या लोकांची तलाठी म्हणून नेमणूका केल्या. महाराजांनी कुलकर्णीवतन खालसा केले व तलाठी नेमले. ज्या महाराचे बापजादे चावडीची पायरी चढून बसू शकत नव्हते. तो महार तलाठी शाहूच्या कृपेने पाटलाच्या मांडीला मांडी लावून बसला! आता पर्यंत 'जोहार मायबाप' म्हणणारा महार आता मराठ्यांचा 'रामराम' स्वीकारू लागला. पाऊनशे वर्षापूर्वी महाराष्ट्रात महाराजांनी निर्माण केलेले हे चित्र केवळ सामाजिक बदल नव्हता, तर ती एक सामाजिक क्रांती होती.

- **अस्पृश्यता निवारणाचे जाहिरनामे :-**

आपल्या संस्थानातील जातीयतेला कायद्यानेच कायमची मूठमाती देण्यासाठी महाराजांनी ०१ जानेवारी १९१९ रोजी दोन जाहिरनामे मंजूर केले. त्यातील पहिला महसूल व न्याय खात्यासंबंधी होता. "आमच्या संस्थानात जे अस्पृश्य नोकरदार आहेत. त्यांच्याशो प्रेमाणे व समतेने वागले पाहिजे. कोणा अधिकाऱ्यास असे वागण्याची इच्छा नसेल. त्यांनी ०६ आठवड्याच्या आत आपला राजीनामा द्यावा. त्यांना पेन्शन मिळणार नाही. अशाच आशयाचे हुकूम आरोग्य विभागाला देण्यात आले. सरकारी दवाखान्यात अस्पृश्याचे हाल केले जात होते. २३ ऑगस्ट १९१९ च्या आदेशानुसार विद्याखाते म्हणजे शिक्षण विभाग अस्पृश्यतेपासून मुक्त केला. शाळा, महाविद्यालयात अस्पृश्यता मानणे गुन्हा ठरविला. ०६ सप्टेंबर १९१९ च्या जाहिरनाम्याने सरकारी कार्यालये, अन्नछत्रे, इमारती, पाणवठे अस्पृश्यांना खुली केली. अस्पृश्यता पाळणाऱ्यास दंडाची तरतूद केली.

- **अस्पृश्य माहूत, कोचमन, ड्रायव्हर :-**

महाराजांनी अस्पृश्यांना आपल्या अनेक खात्यात सामावून घेतल. सरकारी पागेत, शिकारी खात्यात, टपाल खात्यात, सर्वत्र अस्पृश्य मंडळी नेमली, राजपरिवाराचे ड्रायव्हर, कोचमन, माहूत अस्पृश्यच होते. इतकेच नव्हे तर राजपरिवारातील सर्व देवदेवतांची पूजा गणू नावाचा महार करीत होता.

- **म्युनिसिपालिटीच्या चेअरमनपदी अस्पृश्य :-**

कोल्हापूर म्युनिसिपलिटीच्या कार्यालयात प्रथमच एक अस्पृश्य महाराजांच्या प्रेरणेने नेमला गेला. एवढेच नव्हेतर, महाराजांनी दतोबा पवार यांची चेअरमनपदी नेमणूक केली.

- **जाठ, सरदार आणि पंडित पैलवान :-**

- अस्पृश्य लोकांची आडनावे बऱ्याचदा जातीवाचक असत. त्यांच्या नावावरून जातीचा बोध लगेच होई. म्हणून महाराजांनी कोल्हापूर मधील अस्पृश्य पैलवानीची नावे बदलली जसे महार पैलवानास 'जाठ पैलवान' चांभारास 'सरदार पैलवान' तर भंगी पैलवानास 'पंडित पैलवान अशी नावे ठेवली. यामुळे दुसऱ्या जातीतील पैलवानास आपण महार, चांभार भंग्याशी कुस्ती करीत आहोत. हे समजत नव्हते.

- **अस्पृश्यांच्या हातच्या अन्नपाण्याचा जाहीर स्विकार :-**

महाराजांच्या काळात अस्पृश्यांना शिवणे म्हणजे फार अपवित्र घटना मानली जात होती. हे फक्त ब्राह्मणच मानीत असे नव्हे तर मराठा ही त्याला अपवाद नव्हता. तेंव्हा शाहू छत्रपतीने अस्पृश्यता निवारण्यासाठी अस्पृश्यांचे हातचे अन्न पाणी स्विकारून अस्पृश्यतच्या या बलदंड रूढीच्या पायाखालीच सुरूंगाचे स्फोट घडवून आणले. माणगांव परिषदेनंतर शाहू छत्रपतींनी डॉ.बाबासाहेब आंबेडकरांना सोनतळी कॅम्पवर भोजनाचे निमंत्रण दिले व जाहीर सहभोजनाचा कार्यक्रम घडवून आणला.

- **गंगाराम कांबळेची कथा :-**

गंगाराम कांबळे हा सरकारी पागेतील मोतदार. एके दिवशी त्यांने मराठ्यांसाठी असलेल्या पाण्याच्या हौदाला स्पर्श केला. मराठ्यांनी त्याला रक्तबंबाळ होईपर्यंत मारहाण केली. महाराज तेंव्हा दिल्लीत होते. महाराज परत आल्यावर गंगारामला मारहाण करणाऱ्यास महाराजांनी चाबकाचे फटकारे मारले. पुढे याच गंगाराम कांबळेस महाराजांनी कोल्हापूरात हमरस्त्यावर 'सत्यसुधारक हॉटेल' सुरु करून दिले. दररोज शाहूराजे गंगाराम कडेच चहा पित व आपल्या दरबारी लोकांनाही पाजित.

- **शाहू महाराज-अस्पृश्यांचा सखा :-**

महाराजांच्या अस्पृश्योद्धाराच्या कार्याविषयी, दलितांच्या मनात किती पूज्यभाव होता याचे वर्णन धनंजय कीर असे करतात. "शाहू राजाच्या या अलैकिक प्रेमामुळे व निष्ठेमुळे त्यांना दलित व अस्पृश्य मानलेले वर्ग देवासमान मानीत आहेत. गौतमबुद्ध, महात्मा फुले व डॉ.आंबेडकरांना ते जसे पूजनीय मानतात, तसेच ते शाहू राजांना आपला उद्धारकर्ता म्हणून पूजनीय मानतात." शाहू छत्रपतींच्या कार्याबद्दल बाबासाहेबांचे कृतज्ञतेचे उद्‌गार "शाहू महाराजांच्या सारखा सखा अस्पृश्यांना पूर्वी लाभला नव्हता, व पुढेही लाभेल की नाही याबद्दल आम्हांस शंका आहे." या पेक्षा शाहू छत्रपतीच्या कार्याचा उचित गौरव अन्य काय असू शकेल?

- **संदर्भ ग्रंथ सूची :-**

१) राजर्षी शाहू छत्रपती जीवन व कार्य :- डॉ.जयसिंगराव पवार, महाराष्ट्र इतिहास प्रबोधिनी, कोल्हापूर

२) महाराष्ट्रातील समाज सुधारणेचा इतिहास :- भिडे, पाटील, थोरात, फडक प्रकाशन, कोल्हापूर

३) डॉ.बाबासाहेब आंबेडकरांची पत्रे :- शंकरराव खरात, पुणे

४) राजर्षी शाहू स्मारक ग्रंथ :- डॉ.जयसिंगराव पवार, कोल्हापूर

५) राजर्षी शाहू छत्रपतीचे निवडक आदेश :- (संकलक) शामराव पाटील, मुंबई

६) राजर्षी शाहू छत्रपती : वाद आणि वास्तव - रमेश जाधव, कोल्हापूर

58. कोल्हापूर संस्थानातील शाहूंचा स्त्री सुधारणावाद

सोमनाथ दिनकर पाटील
एम. ए. बी. एड.
संशोधक विद्यार्थी, इतिहास विभाग,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

प्रस्तावना :

पूर्वीच्या काळी हिंदुस्थानातील स्त्री समाजाची स्थिती अत्यंत दयनीय होती. बालविवाह, बहुपत्नीकत्व, मुलीची विक्री, विधवा स्त्रियांवरील कडक बंधने, स्त्री शिक्षणाचा अभाव, घरकाम या सर्व गोष्टींमुळे तत्कालीन स्त्रिया घराच्या चार भिंतीत होत्या. या प्रथांच्या विरुद्ध तत्कालीन अनेक समाजसुधारकांनी बंड केले, त्यांचाच पावलावर पाऊल ठेवून करवीर संस्थानात शाहूनी स्त्री सुधारणावादाची एक नवी पहाट निर्माण केली. महात्मा फुल्यांनी सत्यशोधक चळवळ खऱ्या अर्थाने आपल्या संस्थानात रुजवण्याचा प्रयत्न केला.

स्त्री–शिक्षण सुधारणा :

स्त्रियांना पुरुषांच्या बरोबरीने आणण्यासाठी त्यांच्यात शिक्षणाचा प्रसार होणे आवश्यक होते. सत्यशोधकी चळवळीच्या मुशीत जन्म झालेल्या ब्राम्हणेतर चळवळीने स्त्री शिक्षणाकडे लक्ष पुरविल्याचे दिसते. पारंपारिक, सामाजिक वास्तव बदलण्यासाठी स्त्रियांना शिक्षित करणे ब्राम्हणेतर चळवळीला गरजेचे वाटले. त्यातून छ. शाहू आणि त्यांच्या चळवळीने महाराष्ट्रभर स्त्रीशिक्षण राबविल्याचे दिसते. स्त्रीशिक्षणाचे पुरस्कर्ते असलेल्या शाहूंनी शिक्षिका तयार करण्यासाठी १८८२ मध्ये स्त्रियांसाठी अध्यापक महाविद्यालय स्थापिले.[१] या अध्यापक विद्यालयातून शिकून बाहेर पडणाऱ्या विद्यार्थिंनीना पुढे स्त्रियांना शिक्षित करण्याचे काम करावे लागे. पुढे शाहूंनी कृष्णाबाई केळवकर या हुशार विद्यार्थींनीला मुंबईच्या ग्रँड मेडिकल कॉलेजमध्ये वैद्यकिय शिक्षणासाठी पाठविले. तेथे ती परीक्षेत प्राविण्योन उत्तीर्ण झाली. शाहूंनी १९०२ च्या जानेवारीत तिची नेमणूक सहाय्यक डॉक्टर म्हणून 'अल्बर्ट एटवर्ड मेमोरियल हॉस्पिटल' मध्ये केली. पुढे तिला उच्च शिक्षणासाठी शिष्यवृत्ती देऊन इंग्लंडमध्ये वैद्यकिय ज्ञानात पारंगत होण्यासाठी आणि सुतिकाशास्त्रात प्राविण्य मिळविण्यासाठी डब्लिन येथे पाठविले. तेथे ती यशस्वी होऊन १९०३ च्या फेब्रुवारीत कोल्हापूरला परत येऊन आपल्या कामावर रुजू झाली.[२]

शाहूंची सून इंदूमती राणीसाहेब वयाच्या साडे अकराव्या वर्षी विधवा झाल्या. इंदुमतीने स्वतःच्या पायावर उभे रहावे म्हणून शाहूंनी तिला शिकवण्याचा निर्णय घेतला. तेव्हा त्यांना तत्कालीन समाज, आप्तेष्य, सरदार, दरबारी मंडळी, इतकेच काय पण प्रत्यक्ष पत्नीच्या सुद्धा कडव्या विरोधाला तोंड द्यावे लागले. सर्व विरोधाचा परिहार करुन इंदुमतीच्या शिक्षणासाठी सोनतळीला खास आश्रम उघडला, उत्तम आणि निष्णात अशा शिषकाची नेमणूक केली. मॅट्रीकच्या परिक्षेत त्या दुसऱ्या क्रमांकाने पास झाल्या पुढे कोल्हापूरचे शिक्षण खातेच इंदुमतीच्या हाती देण्याचा शाहूंचा निर्णय होता, पण इंदुमतीच्या अकाली मृत्यूमुळे हे घडू शकले नाही.[३] इंदुमतीच्या सर्वांगीण शिक्षणासाठी शाहूंनी डॉ. ॲनी बेझंटचा सल्ला घेण्याचे ठरविले होते. यावरुन त्यांच्या स्त्रीशिक्षणाची तळमळ दिसून येते. करवीर संस्थानच्या शिक्षणाधिकारी मिस लिटल यांनी राजीनामा दिल्यानंतर त्या जागी रखमाबाई केळवकर यांची त्यांनी नेमणूक केली.

स्त्री शिक्षणविषयक शाहूंची दृष्टी व्यापक होती. स्त्री–पुरुष समतेसाठी पुरुषांच्या बरोबरीने स्त्रियांना शिक्षण मिळावे अशी त्यांची मनीषा होती. म्हणून त्यांनी मुलांच्या शाळेत मुली उत्तीर्ण झाल्याबद्दल शिक्षकांना इनाम देऊन त्यांना ५१२ रुपयांची खास मंजुरी दिली.[४] शूद्रातिशूद्र मुलींच्या शिक्षणाकडेही शाहूंनी लक्ष पुरविले. त्यांनी १९०७ मध्ये चांभार, ढोर यांच्या मुलींसाठी स्वतंत्र शाळा काढून ९६ रुपयांची खास मंजुरी दिली.[५]

शाहू महाराज, तोफखाने व भास्करराव जाधव यांच्यामध्ये स्त्री शिक्षणाबाबत नेहमी चर्चा होते. या चर्चेच्या वेळी शाहू महाराज म्हणाले, ''हल्लीच्या मुलींना भले–बुरे, चांगले–वाईट, योग्य–अयोग्य हे समजण्यासाठी शक्ती ज्या शिक्षणामध्ये आहे असे शिक्षण तयांना दिले पाहिजे. असे शिक्षण देणारे गुरुजी जर चारित्र्यसंपन्न असतील तर त्या मुली बेताल होणार नाहीत.''[६] थोरपणाचे, संयमी, नीतीधैर्यांचे, माणुसकीचे शिक्षण स्वतः आचरुन दाखविणाऱ्या शिक्षकांद्वारे हे कार्य केले पाहिजे. तसे शिक्षक मिळविण्यासाठी समाजाने वाटेल ती किंमत देण्यास तयार असले पाहिजे, असे धोरण शाहूंनी ठरविले होते.[७] स्त्रियांना पुरुषांबरोबरीचे समान शिक्षण मिळाले पाहिजे. ही शाहूंची भूमिका होती. समान शिक्षण घेतलेल्या स्त्रिया त्याचा उपयोग स्वउन्नतीसाठी करतील अशी त्यांची खात्री पटलेली दिसते.

राजघराण्यातील स्त्रियांनाही चांगल्या प्रकारचे शिक्षण दिले गेले पाहिजे, यासंबंधी शाहूंची खास मते होती. शाहूंच्या काळात राजघराण्यातील मुलींना राजीपदास योग्य असे शिक्षण खाजगीरीत्या दिले जात असे. महाराणी लक्ष्मीबाईंच्या (शाहूपत्नी) शिक्षणाची काळजी घेण्यासाठी मिसेस कॉकस या युरोपीय बाईंची नेमणूक करण्यात आली होती. तसेच त्या वेळच्या महिला शिक्षणाच्या सुपरिटेंडेन्टबाई मिस लिटल या होत्या. ललित कला, विणकाम, खेळ इतयादी विषयांत लक्ष्मीबाईंची प्रगती घडून आली. शाहूंना राजघराण्यातील मुलींना शिक्षण मुधोळच्या राणीसाहेबांप्रमाणे द्यावे असे वाटत होते. त्या शाहूंची चुलती होत्या, त्या अस्खलित इंग्रजी बोलत असत. भारतीय पद्धती व चालीरीती यांच्या त्या प्रतिक होत्या. शाहूंना मात्र राजघराण्यातील स्त्रियांनी घोड्यावर बसणे, मोटार चालविणे इत्यादी गोष्टी यावयास पाहिजेत असे वाटत होते. युरोपीय शिक्षणाने नातेवाईकांशी, बरोबरीच्या व्यक्तींशी व लहानांशी कसे वागावे हे स्त्रियांस समजणार नाही शाहूंना वाटत होते.[८]

पाश्चात्य शिक्षणाला विरोध न करणारे शाहू स्त्रियांच्या बाबतीत द्वंद्वात सापडलेले दिसतात. त्यांनी आपले धार्मिक व्यवहार हे कुटुंबातील स्त्रियांकडे सोपविल्याचे दिसते. या दृष्टीने ते नेहमी डॉ. भांडारकर, न्या. रानडे व चंदावरकर यांच्या पत्नींचा प्रामुख्याने उल्लेख करीत. या अभिजन

सुधारकांच्या पत्नींचे शिक्षण पारंपारिक पद्धतीने झाले होते. आपल्या मुलींच्या शिक्षणाबाबत शाहू महाराज म्हणाले, ''येथील शिक्षण पद्धतीप्रमाणेच तिचे शिक्षण झाले पाहिजे.''[९] वसाहतिक काळात व भारतीय परंपरेच्या जोखडातून शाहूंसारखे कर्ते सुधारक ही पुरतेपणी बाहेर आल्याचे दिसत नाही. नवऱ्याची व कुटुंबाची इच्छा प्रमाण मानणाऱ्या विचार प्रणालीचा शाहूंनी पुरस्कार करणे स्त्री सुधारणेच्या विरोधी होते. स्त्रीशिक्षणाचा पुरस्कार करताना पुरूषी मानसिकतेच्या द्वैतात शाहू स्त्रियांना काही अवकाश निर्माण करीत होते. एवढे मात्र म्हणतात येते.[१०]

५०% स्त्रिया असलेल्या या देशात शाहूंनी स्त्री उन्नतीसाठी स्वतः लक्ष घातले. करवीरच्या जनतेसाठी शाहू महाराजांनी तीन आदर्श ठेवले. ''पहिला करवीर नगरीत व संस्थानातही द्वेषाच्या कोणत्याही प्रकाराला वाव द्यावयाचा नाही. दुसरा, प्रजेला सर्वदृष्ट्या संतोष देणे व पुरूषांइतके स्त्रियांना शिक्षण देणे. तिसरे, पुरुषांच्या बरोबरीने स्त्रियांचा समान हक्क आपल्याला मान्य असल्याचे शाहूंनी मान्य केल्याचे गणपतराव सूर्यवंशी दाखवितात.'' शाहूंच्या या आदर्शाचा परिणाम स्त्रीशिक्षणाचा प्रसार झपाट्यानेक होण्यास व स्त्रियांना आत्मभान येण्यात झाला.[११]

शाहूंनी आपल्या संस्थानात पुरुषांच्या बरोबरीने स्त्रियांना शिक्षण देण्यास सुरुवात केली. स्त्री जर शिक्षित असेल तर तिच्या पोटी जन्माला येणारी पिढी शिक्षीत होईल, म्हणून त्यंनी राजाराम कॉलेजमध्ये शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थींनींना फी-माफी व शिष्यवृत्ती चालू केल्या. कोल्हापूर शहर व बावडा येथील मुलींच्या मराठी चौथ्या इयत्तेच्या वार्षिक परिक्षेत पहिल्या येणाऱ्या दोन मुलींना 'श्री राधाबाई आक्कासाहेब महाराज स्कॉलरशिप' व 'श्री नंदकुवर महाराणी भावनगर स्कॉलरशिप' अशा प्रत्येकी चाळीस रुपयांच्या दोन शिष्यवृत्त्या सुरु केल्या. तसेच, कोल्हापूर इलाख्यात परीक्षेत सर्वाधिक गुणांनी उत्तीर्ण होणाऱ्या पहिल्या तीन मुलींना स्कॉलरशिप व उत्तम वर्तनाबद्दल चाळीस रुपयांचे बक्षीस देण्यात येईल, असा ठराव पास केला होता. स्त्री शिक्षणाचा प्रसार व्हावा म्हणून त्यांनी आज्ञा काढली होती. त्यांच्या राहण्याची, जेवणाची व शिक्षणाचची सोय केली होती. शाहूंच्या प्रयत्नांमुळे स्त्रियांच्या साक्षरतेचे प्रमाण ०.१० टक्क्यांवरुन ०.३५ टक्क्यांपर्यंत वाढल्याचे दिसते.' शिक्षित स्त्रियांचे प्रमाण वाढविण्यामध्ये शाहूंच्या स्त्रीशिक्षण संस्थांचा मोठा वाटा होता. त्यांनी आपल्या राजवाड्याच्या पूर्वेस मुलींसाठी 'अहिल्याबाई गर्ल्स हायस्कूल' या नावाची मुलींसाठी मोफत शाळा सुरु केली. जवळच माध्यमिक शिक्षणासाठी 'मा. लक्ष्मीबाई गर्ल्स हायस्कूल' उघडले.[१२]

ब्राह्मणेतर स्त्री शिक्षणाबरोबरच ब्राह्मण स्त्रियांच्याही शिक्षणासाठी शाहूंनी प्रयत्न केल्याचे दिसते. डॉ. आनंदीबाई जोशी यांना अमेरिकेत त्यांनी अभिनंदनाचे पत्र पाठविले होते. परतीच्या प्रवासासाठी आर्थिक मदतही पाठविली. त्या आनंदीबाईंनी भारतात परत आलयावर कोल्हापूरातील नवीन सुरु झालेल्या सरकारी इस्पितळात 'अल्बर्ट एडवर्ड हॉस्पिटल' मध्ये 'असिस्टंट दरबार सर्जन' या उच्च हुद्दयावर काम करावे, त्यांना निवासाच्या लगतच सर्व सुखसोयींनी युक्त बंगला देण्यात येईल. दरमहा ३०० ते ५०० रुपये वेतन मिळेल, त्यांनी इकडील होतकरु व तरुण मुलींना वैद्यकीय व परिचारिका शिक्षण द्यावे, इत्यादीविषयी आनंदी बाईंना शाहूंनी लिहिले होते. पण भारतात आल्यावर आजारपणातच २६ फेब्रुवारी १८८७ ला आनंदीबाई मरण पावली.[१३]

शाहूंच्या प्रयत्नाने कोल्हापुरातच व्ही. टी. पाटील यांनी 'ताराराणी विद्यापीठ' ची स्थापना करुन तेथील स्त्री शिक्षणाचा पाया विस्तृत आणि भक्कम करण्याचा प्रयत्न केला.[१४] त्यामुळे स्त्रियांना उच्च शिक्षण घेण्याची संधी स्थानिक पातळीवर निर्माण झाली. सौ. सुचेता कोरगावकर यांनी 'महिला दक्षता समितीच्या माध्यमातून समस्याग्रस्त महिलांना आधार उपलब्ध करुन दिल्याने त्यांचे लक्ष शिक्षणाकडे वळू लागले.[१५]

डॉ. आनंदीबाई जोशींच्या मृत्यूने सुश्रुषेसाठी प्रशिक्षित सेविका निर्माण करण्याचे अपूर्ण राहिलेले कार्य शाहूंनी डॉ. कृष्णाबाई केळवकरांच्या मार्फत पूर्ण करणयाचा प्रयत्न केला. १९१४ मध्ये त्यांनी दवाखान्यात काम करणाऱ्या सेविकांना प्रशिक्षण व स्कॉलरशिप देऊ केल्याचे दिसते. प्रशिक्षण घेऊ इच्छिणाऱ्या मुलींसाठी ६ प्रकारच्या स्कॉलरशिप्स त्यांनी ठेविल्या होत्या.१६ कृष्णाबाई या हॉस्पिटलमध्ये स्थिर सुरु स्थावर झाल्यानंतर १९१७ मध्ये रुग्णपरिचारिकेचा नवा अभ्यासक्रम त्यांनी 'ए.ई.हॉस्पिटल' मध्ये सुरु केला आणि तिथे शिकवण्यासाठी स्त्रियांना उत्तेजन मिळावे म्हणून ६ स्कॉलरशिप्सही देऊ केल्या. ''कोल्हापूर ए. ई. हॉस्पिटलमध्ये तारीख १ माहे डिसेंबर सन १९१७ इसवीपासून नवीन नर्सिंग क्लास सुरु होणार आहे. करिता त्यामध्ये शिकण्याची इच्छा असेल त्यांनी चांगल्या वर्तणूकीबद्दल सभ्य गृहस्थांचा दाखला घेऊन सदर दिवशी हजर रहावे. विद्यार्थींनींची प्रवेश परीक्षा घेऊन पहिल्या ६ नंबरास स्कॉलरशिप देण्यात येईल.'' अशा प्रकारची नोटीस शाहूंनी प्रसिद्ध केली. यामुळे स्त्रियांच्या आरोग्याकडे शास्त्रीय दृष्टीने पाहण्याची दृष्टी देण्यास शाहू यशस्वी झाल्याचे दिसते.

शाहू महाराजांनी 'डेक्कन एज्युकेशन सोसायटी' आणि हुजुरपागा या पुण्यातील दोन मातब्बर शिक्षण संस्थांशी घनिष्ट संबंध प्रस्थापित केला होता.

स्त्री-सुधारणा विषयक कायदे :

छत्रपती शाहूंनी स्त्रीविषयक विविध प्रकारच्या प्रथा-परंपरेला विरोध करत स्त्री-सुधारणेची चळवळ आपल्या राज्यात राबविली व स्त्रियांसाठी पुढील कायदे केले.

१) २० मे १९११ रोजी आर्थिकदृष्ट दुर्बल घटकांना फी माफी.

२) २४ सप्टेंबर १९११ मागासलेल्या जातींच्या विद्यार्थ्यांना फी माफ.

३) २८ मे १९१३ प्रत्येक गावात शाळा स्थापन्याचा जाहिरनामा.

४) जुलै १९१७ 'विधवा पुनर्विवाह कायदा' व 'विवाह नोंदणी कायदा'

५) ८ सप्टेंबर १९१७ सक्तीच्या मोफत प्राथमिक शिक्षणाचा जाहीरनामा.

६) ३० सप्टेंबर १९१७ शाहूंच्या हस्ते 'स्त्री शिक्षण' मोहिमेला शुभारंभ.

७) २३ फेब्रुारी १९१८ कोल्हापूर संस्थानात 'मिश्र वा आंतरजातीय विवाहाला पाठिंबा देणारा कायदा'.

८) २५ जून १९१८ परंपरागत कुलकर्णी वतने रद्द.

९) २९ जून १९१८ महारांवर कामाची सक्ती न करण्याचा व त्यांच्या जमिनी त्यांच्या नावावर करण्याचा शाहूंचा जाहीरनामा.

१०) २७ जुलै १९१८ अस्पृश्यांची गुलामगिरी नष्ट करणारा व त्यांना मानवी स्वातंत्र्याचे हक्क देणारा शाहूंचा जाहीरनामा.

११) १ जानेवारी १९१९ प्राथमिक, माध्यमिक शाळा व महाविद्यालयातील अस्पृश्य मुलांना स्पृश्य मुलांसारखीच समानतेची वागणूक द्यावी, म्हणून खात्याला शाहूंची राजाज्ञा.

१२) २ ऑगस्ट १९१९ 'स्त्रियांचा छळ व घटस्फोट' या विषयी स्त्रियांना संरक्षण देणारा कायदा जारी.

१३) अस्पृश्यांच्या वेगळ्या शाळा बंद सरकारी शाळांमध्ये सर्व जाती-धर्माच्या मुलांना प्रवेश शाळांतील स्पर्शास्पर्श प्रथा बंद शाहूंची राजाज्ञा.

१४) ६ ऑक्टोंबर १९१९ मागासलेल्या वर्गातील मुलींना व स्त्रियांना मोफत शिक्षण खर्चाची सोय.

१५) ८ ऑक्टोंबर १९१९ संस्थानातील सर्व सरकारी व सार्वजनिक ठिकाणे अस्पृश्यांना खुली.

१६) १७ जानेवारी १९२० हिंदू-वारसा हक्काचा नवीन कायदा समंत, जोगिणी-देवदासी प्रथेचे निर्मूलन करण्याचा प्रयत्न.

फ संदर्भ साधने :

१) धनंजर किर, राजर्षी शाहू छत्रपती, मुंबई २००१, पृ. १०४

२) कित्ता, पृ. ११

३) गणपतराव सुबराव सूर्यवंशी, राजा शाहू आणि समाजप्रबोधन, इचलकरंजी, १९७८, पृ. ५४

४) भास्कर घाटावकर (संपा.), शाहू छत्रपतींचे निवडक आदेश, मुंबई, १९८८, पृ. १३९

५) कित्ता, पृ. ४५.

६) वा. द. तोफखाने, राजर्षी शाहू यांचे अंतरंग, कोल्हापूर १९६५, पृ. ७६.

७) कित्ता, पृ. ४५.

८) गणपतराव सुबराव सूर्यवंशी, पूर्वोकत, पृ. ५५.

९) कित्ता.

१०) कित्ता, पृ. २३९.

११) कित्ता, पृ. २४०.

१२) हिंदुराव साळुंखे, छत्रपती शाहू स्मृतिदर्शन, कोल्हापूर. १९८९, पृ. १६.

१३) कित्ता, पृ. १०६

१४) कित्ता, पृ. ७

१५) कित्ता.

१६) भास्कर घाटावकर, पूर्वीकत, पृ. ९४, ९५.

१७) Rajarshi Shahu Chhatrapati Papers, Vol. VII, Kolhapur, 1997, P.448.

१७) उत्तम कांबळे, राजर्षी शाहू महाराज आणि महिला मुक्ती, सुगावा प्रकाशन, पुणे. जुलै २०३, पृ. २३,२४.

59. राजर्षी शाहू महाराजांचे कोल्हापूर संस्थानातील सामाजिक व शैक्षणिक योगदान

प्रा. सचिन फाळके
सम्यक संकल्प महाविद्यालय,
कल्याण (पू.), जि. ठाणे.

प्रस्तावनाः

भारतात ब्रिटिश काळात ५६३ संस्थांनिकांपैकी छत्रपती शाहू महाराज हे एक संस्थानिक होते, ज्यांनी सामाजिक सुधारणांचे सर्वतोपरी प्रयत्न केले. त्यांचे महत्वाचे कार्य म्हणजे वंसपरंपरागत चालत आलेली जाति व्यवस्था मोडकळीस काढणे आणि दलितांच्या उत्थानासाठी प्रयत्न करणे त्यांच्या सुधारणावादी प्रयत्नांमुळे ज्योतिवा फुले आणि आणि विठठल रामजी शिंदे यांच्या प्रयत्नांना पाठबळ मिळाले आणि महाराष्ट्रातील ब्राहाणेतर चळवळ अधिक बळकट व प्रभावी झाली. कोल्हापूर संस्थानातील हया लोककल्यन राजाचा जन्म २६ जुन, १८७४ रोजी झाला. म्हणजेच एकुन हया लोक प्रीय कल्याणकारी राजाचा कार्यकाल जवळपास ४८ वार्षाचा होता. फलेच्या सत्यशोधक चळवळीचे आणि मराठा शूद्र आणि अति शूद्रांच्या उत्थानासाठी चाललेल्या प्रयतनांचे खरे आधारस्तंभ शाहू महाराजच होते. तसेच, शाहु महाराजांनी समाजातील स्त्रिया, दलित, मागासलेल्या वर्गासाठी जे कार्य केलेले आहे ते उल्लेखनीय आहे. त्यांच्या राज्यातील अस्पृश्य आणि काही आदीवासी जातीच्या लोकांना वर्षानुवर्षे गुलामी करावी लागायची. ती पध्त वंद करून, त्यांनी त्यांना समान हक्क देऊ केले. स्वतःच्या मानमर्यादेचा विचार न करता, शाहू महाराज अस्पृश्यांबरोवर वसून जेवले आणि समाजासमोर नवा आदर्श मांडला. त्यांना समाजातील भेदाभेद जाती व्यवस्था, असमानता नष्ट करावयची होती. त्यांच्या मते जातीव्यवस्थेमुळेच हिंदू समाज दुभंगला होता.

संशोधनाची उदिष्टयेः

१. शाहूंच्या जीवनपरिच्याचा अभ्यास करणे.

२. शाहुंच्या सामाजिक कार्याचा आढावा घेणे.

३. शाहुंच्या शौक्षणिक कार्याचा अभ्यास करणे.

छत्रपती शाहू महाराजांच्या सामाजीक कार्याचा आढावाः

भारत हा कृर्षी प्रधान देश आहे म्हणजेच शेतक-यांचा देश. परंतु अनिश्चित पावसामुळे दुषकाळाचे सावट राज्यात असत त्यामुळे अन्नान्न दशा होऊन बायकामूले, गुरे ढोरे हे सर्व भूखवळी होऊलागले राज्यात कमी पावसामुळे कींवा जास्त पावसामुळे पिकांचे नुकसान हेात असे शेतक-यांच्या पिकाला आणि शेत मालाला वाजर पेढ मिळवून देणे तसेच योग्य किंमत उपल्वध करून देणे हा चंगच महाराजांनी वांधला होता. त्यासाठी त्यांनी शेतक-यांना अर्थिक साहाय्य दोणे शेतक-याच्या शेतमालासाठी वेगवेगळया भागात वाजरपेढा निर्माण करणे. तसेच रोजगार निर्मीती साठी 'शाहूमील' या नावाने भारतातील सराकारी क्षेत्रातील पहिाला उदयोग व पहीली कापड गीरणी स्थापन केली औदयोगिक वसाहती निर्माण केल्या. शेतक-यांचा शेती विषयक पाणी टंचाई दूर करण्यासाठी शाहूंनी महाराणी लक्ष्मीवाई तलाव तथा धरण प्रकल्प राविला तसेच कालव्याच्या रूढ पध्दती आणि नव्या योजना स्विकारून राविल्या. शाहू महाराजांनी समाजातील स्पृश्य अस्पृश्य व ब्राहमण समाजातील लोकांनसाठी अत्यांत महत्वाचे कामे केले वेदोक्त प्रकरणाच्या वादा दरम्यान शाहू महाराजांनी मराठयांचे हक्क आवाधीत ठेवले. इतर कोणत्याही ब्राहाणेतर जातीपेंक्षा मराठा सर्वश्रेष्ठ आहे त्यांचे ठाम मत होते जाती व्यवस्थेची पाळंमुळं खणण्याचा आणि ती उखडून टाकण्याचा प्रत्येक त्यांनी केला. आयुष्याच्या शेवटी त्यांनी ही जाति व्यवस्थाच नष्ट झाली तर वरं होई ल असे म्हटले आहे. संपूर्ण प्रगतीला आळा घालणारी अशी ती महत्वाची धोंड आहे. जातिव्यवस्थेचा पुरस्कार हा एक सामाजिक अपराध आहे असे ते म्हणत. दवाखान्यात, सरकारी नोकरीत अस्पृश्यांना प्रधान्य देण्यात आले तर तसेच सरकारी नोक-यांन मध्ये तलाठी हे नवीन पद निर्मान केले समाजातील त्याच वरोवर विधवा पुर्नविवाहास मान्यता देण्यात आली व नोंदनी कायदा, आंतर जातीय विवाह कायदा रूढ केला.

छत्रपती शाहू महाराजांच्या शैक्षणिक कार्याचा आढावाः

छत्रपती शाहूंच्या मते हिदू धर्मातील असमानता जर दूर करावयाची असेल तर शिक्षणा शिवाय पर्याय नाही असे त्यांना नेहमी वाटे. त्यांनी प्राथमीक माध्यमीक आणी उच्च शिक्षणाच्या अनेक संस्था सुरू केल्या. त्यांनी कोल्हापूरात अनेक वस्ती गृहे स्थापन केली लोकांना शैक्षणिक स्थपन्यासाठी सढळ हाताने उद्युक्त केले, महाविदयालये त्यांनी वाढवली. औदयोगिक व व्यावसायीक शिक्षणाची व प्रशिक्षणाची सोय केली. शिक्षण प्रसाराचे व्रत घेऊन निष्ठेने तन मन धन अर्पून कार्य करणारा भारतातील प्रभावी पुरूष म्हणजे शाहु छत्रपती. तसेच शाहूंनी शिक्षण प्रसारार्थ ज्या ज्या राजाज्ञा काढल्या त्या त्या शिक्षणअधिकार्यांनी अमलात आणल्या म्हणुनच कोल्हापूर हे महाराष्ट्रातील एक महत्वाचे प्रेरणादायी शैक्षणीका केंद्र वनले विदयार्थीनी विविध विद्याशाखांचे अध्ययन करावे परगावी आणि परदेशी जाऊन त्यांनी उच्च शिक्षण घ्यावे अशी शाहूंची आस होती. मुलांना मुंवई, पुणे व अन्य काही ठीकाणी शाहूंनी १९१0 - ११ साली उच्चशिक्षणासाठी पाढवले होते

 ISBN 978-93-5212-145-8

विविध विषयांच्या विशिष अभ्यासासाठी देशात व परदेशात विदयार्थी पाठवण्याची व त्यांना व साहाय देण्याची कीया हा शाहूंच्या जिवनक्रमाचा एक भाग बनला होता . डॉ . भिमराव रामजी आंबेडकर हे ही विलायतेस जाऊन उच्चशिक्षण घेण्याच्या संदर्भात औदायोत न्हाऊन निघाले होते . षा औदार्याला वत्सल्याचा वास होता . उपकारकर्त्याचा किंवा देणगी दाराचा दर्प नव्हता शंकर बाळाजी ढवळे या ब्राहमण विद्यार्थ्यापासून ते डॉ . भिमराव रामजी आंबेडकर या अस्पृश्य विद्यार्थ्यापर्यत सर्वांठायी शाहूंचा समभाव होता . धर्म विचार प्रदूषणामूळे स्त्रिया,शूद्रदिक सर्वजन म्हणजे पंच्याण्णव टक्के जनता शिक्षणवंचित झाली होती . एवढेच नव्हे तर शिक्षण घेणे हे आपले कामच नव्हे, अशी तीची मनोधारणा झाली होती . त्यात जनता दारिद्रायाने पीडलेली . आर्थिक हालाखीतील लोकांच्या मुलांना फी माफ केल्याशिवाय शिक्षण प्रसार होऊ शकणार नाही, हे शाहूंनी ओळखाले आणि आर्थिक दृष्टया दुर्बल असलेल्यांना फी माफ करण्याचे पाऊल शाहूंनी दिनांक २० मे, १९११ रोजी उचलले . तसेच उरलेल्या फीशिप्स पुढारलेल्या वर्गातील मुलांना देण्यात याव्यात असा फतवा त्यांनी काढला शाहूंचे दुसरे पाऊल म्हणजे शाळांवर नजर ढेवण्यासाठी शाळा पंच नेमन्याची ऊढ परंपर कोल्हापूर राज्यात सूरू केली .तसेच वतनी शिक्षण योजना सूरू करून शिक्षण प्रसार जलद गतीने सुरू केला शाहूंचा शिक्षणा संबंधिचा पुढचा उपक्रम म्हाणजे शिक्षणाच्या प्रशिक्षणा बददलचा होता . मानवी समाजात चैतन्य निर्माण करणारी संजिवनी म्हाणजे शिक्षण . शिक्षणाची ही शक्ती ओळखून मोफत सक्तीचे शिक्षण सुरू करण्याचा चंग बांधला मुंबई सरकारकडून या योजनेस मान्यता मिळाली . मोफत शिक्षणासाठी शाहूंनी एक स्वतंत्र खाते निर्माण केले या मोहिमेचा प्रारंभ गणेश चतुर्थीच्या मुहूर्तावर ३० सप्टेंबर १९१७ रोजी होईल असा आदेश पाठवला . मुंबई विदयापीठाकडून मॅट्रिक परीक्षेचे केंद्र कोल्हापूरास प्रयोगादाखल शाहूंनी घेतले . टसेच परीक्षेला येणा-या विद्याथ्यांची राहण्याची व भोजनाची उ-तम आणी मोफत व्यवस्थेचा खर्च महाराजच्या खाजगी खात्याने केला . शाहूंनी स्त्री शिक्षणासाठी राजमार्ग घालून देण्याचे मह-तम कार्य केले .

सर्व जातीच्या विद्याथार्यासाठी शाहूंनी बोर्डिंगची स्थापना केली ती पुढील प्रमाणेः

१ . व्हिक्टोरिया मराठ बोर्डिंग (१८ एप्रील, १९०१)

२ . दिगंबर जैन बोर्डिंग (एप्रील, १९०१)

३ . वीरशैव लिंगायत विद्यार्थी वसतिगृह (१९०६)

४ . मुस्लीम बोर्डिंग

५ . मिस क्लर्क होस्टेल

६ . दैवज्ञ शिक्षण समाज बोर्डिंग (२४ डिसेंबर १९०८)

७ . श्रीनामदेव बोडिग (२ एप्रील, १९११)

८ . पांचाल ब्राहमण वसतिगृह (१९१२)

९ . श्रीमती सरस्वतीबाई गौड सारस्वत ब्राहमण विद्यार्थी वसतिगृह (२० मे, १९१५)

१० . इंडियन ख्रिश्चन होस्टेल (७ जुन १९१५)

११ . रावहाहाददूर सबनीस प्रभू बोडिंग (सप्टेंबर १९१५)

१२ . आर्य समाज गुरूकूल (१८ मार्च १९१८)

इत्यादी शाहूंनी कोल्हापूर राज्यात जवळपास २० बोडिंगा काढल्या पण त्याच वेळेस महाराजांनी कोल्हापूर बाहेरील पूणे अहमदनगर, नशिक, व नागपूर येथिल वस्तीगृहांना सढळ हाताने मदत केली .

संदर्भ ग्रंथः

आमदार पी . बी . साळुंखे, "राजर्षी शाहू गौरव ग्रंथ" कोल्हापूर

कृ . गो सूर्यवंशी , "राजर्षी शाहू राजा व माणूस"

डॉ . जयसिंगराव पवार, "राजर्षी शाहू स्मारक ग्रंथ"

य . दि . फडके, "शाहू छत्रपती आणि लोकमान्य"

60. अक्कलकोट संस्थानातील रिजंट लक्ष्मीबाई उर्फ ताराबाई राणीसाहेब यांचे कार्य (१९२३-१९३६)

डॉ. संतोष जेठीथोर
सहाय्यक प्राध्यापक इतिहास विभाग,
डी. आर. माने महाविद्यालय, कागल.

प्रस्तावना :

भारतीय इतिहासात अनेक राजघराण्यातील कर्तबगार स्त्रीया होवून गेल्या त्यामध्ये जिजाबाई, येसूबाई, ताराबाई, गोपिकाबाई, आनंदीबाई इ. होत. यांनी आपापल्या क्षेत्रामध्ये उल्लेखनीय अशी कामगिरी केली. तसेच या पुरुषप्रधान संस्कृतीमध्ये आपला वेगळा ठसा उमटविला. या राजघराण्यातील स्त्रीयाबरोबरच काही संस्थान परिवारातील स्त्रीयांनी महत्वपूर्ण कामगिरी बजाविल्याचे दिसून येते. यामध्ये कापशीच्या द्वारकाबाई घोरपडे, इचकरंजीच्या अनुबाई घोरपडे, जतच्या येसूबाई डफळे, फलटणच्या सगुणाबाई निंबाळकर इ. यामध्येच लौकिकास पोहचलेल्या अक्कलकोट संस्थानच्या रिजंट लक्ष्मीबाई उर्फ ताराबाई राणीसाहेब होय.

रिजंट ताराबाई यांचा पुर्वेतिहास :

लक्ष्मीबाई उर्फ ताराबाई ह्या पिराजीराव बापूसाहेब घाटगे, सर्जेराव वजारत, मा अब कागल (सिनिअर) यांची कन्या होय. लक्ष्मीबाईंचा विवाह अक्कलकोट संस्थानचे फत्तेसिंह तिसरे यांच्याशी २८ एप्रिल १९१२ रोजी झाला. या विवाहानंतर लक्ष्मीबाई ताराबाई असे नांव ठेवण्यात आले. यामुळे कोल्हापूर संस्थान व अक्कलकोट संस्थान यांच्यामध्ये नातेसंबंध निर्माण झाले. राजर्षी शाहू महाराजांनी लक्ष्मीबाईंच्या विवाहानंतर त्यांच्या शिक्षणाची उत्तम अशी सोय केली होती. त्यांनी लक्ष्मीबाई उर्फ ताराबाईंना मिस मॉक्सन यांच्या मार्गदर्शनाखाली शिक्षणासाठी पाठविले. ३ एप्रिल १९२३ मध्ये ताराबाईंचे पती फत्तेसिंह तिसरे यांचे आकस्मिक निधन झाले. त्यामुळे राज्यकारभाराची जबाबदारी त्यांच्यावर येवून पडली अचानक येवून पडलेली जबाबदारी योग्यरित्या पार पाडली.

रिजंट ताराबाई राणीसाहेब यांचे कार्य (१९२३-१९३६) :

फत्तेसिंह तिसरे यांच्या निधनानंतर सुपुत्र विजयसिंहराजे याला गादीवर बसविले तो अल्पवयीन असल्याने इंग्रज सरकारने आई ताराबाई राणीसाहेब यांना रिजंट म्हणून नेमले व त्यांच्या हाती राज्यकारभाराची सुत्रे दिली. त्यांनी आपल्या कारकिर्दीत रिजंट म्हणून काम पाहत असताना विविध क्षेत्रात भरीव अशी कामगिरी केली.

रिजंट ताराबाई राणीसाहेब यांचे विविध क्षेत्रातील कार्य :

रिजंट ताराबाई राणीसाहेब यांनी पाणी पुरवठा, शेतीविषयक सुधारणा, उद्योग इ. क्षेत्रात महतवाची कामगिरी केली.

शेती विषयक प्रदर्शन :

अक्कलकोटच्या रिजंट ताराबाई राणीसाहेब यांनी शेती विषयक प्रदर्शन भरविले. हे प्रदर्शन अतिशय आकर्षक असे होते. या प्रदर्शनात शेतामध्ये पिकविलेले उत्कृष्ट प्रकारची विविध धान्ये, फळे, भाजीपाला ठेवण्यात आला होता. तसेच गायी, म्हैशी, बैल इ. ठेवण्यात आले होते. अशा प्रकारच्या प्रदर्शनातून लोकांच्या शेतीविषयक ज्ञानात अधिक भर घातली.

शेती विषयक व्याख्याने :

अक्कलकोट संस्थानात राष्ट्रीय बालक सप्ताहानिमित्त दि. ६ व ७ फेब्रुवारी १९२८ रोजी श्री. तगारे ॲग्रीकल्चर इन्स्पेक्टर पुणे यांनी कृषीविषयक दोन दिवस व्याख्याने दिली. शेतीविकासासाठी शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले. तसेच कृषी प्रदर्शनात नंबर आलेल्या शेतकऱ्यांना बक्षीसे देण्यात आली.

कृस्ती स्पर्धा :

राष्ट्रीय सप्ताहानिमित्त अक्कलकोट संस्थानात कृस्ती स्पर्धेसाठी नामवंत पहिलवानांना आमंत्रित केले होते. तिकिट लावून स्पर्धा घेण्यात आली. जिंकणाऱ्यांना बक्षीसे देण्यात आली.

नाट्य प्रदर्शन :

अक्कलकोट संस्थानच्या रिजंट ताराबाई राणीसाहेब यांनी प्रदर्शनासाठी दोन नाटक कंपन्यांना आमंत्रित केले होते.

सुदृढ बालक स्पर्धा :

राष्ट्रीय बालक सप्ताहानिमित्त अक्कलकोट संस्थानात सुदृढ बालक स्पर्धा घेण्यात आली. यामध्ये १९ बालकांनी भाग घेतला होता. त्यातील ९ बालके निवडली व प्रत्येकी ५ रु. बक्षीस देण्यात आले.२

अक्कलकोट संस्थानात पाणीपुरवठा योजना :

जून १९३१ मध्ये अक्कलकोट संस्थानात म्हैसूरचे थोर स्थापत्य विशारद श्री विश्वेश्वरया यांना अक्कलकोट मध्ये पाण्याच्या नियोजनाकरिता बोलविण्यात आलेले होते. त्यांनी फेब्रुवारी १९३२ मध्ये नियोजित पाणी पुरवठा योजनेच्या ठिकाणी भेट दिली. ही पाणी पुरवठा योजना २० वर्षापूर्वीच अतिशय महत्वाची होती. रिजंट ताराबाई राणीसाहेब यांनी जनतेस मुबलक पाणी पुरवठा मिळावा म्हणून स्वतः जातीने लक्ष घालून त्यांनी बोरी नदीवरन सांगवी गावाजवळ चार मैल अंतरावर धरणाची सुरुवात करण्याचे ठरले या कामाच्या पायाभरणी समारंभास मुंबईचे गव्हर्नर अक्कलकोटला आले होते. तर श्री बाचल हे स्टेट इंजिनियर म्हणून काम पाहत होते. त्या निरिक्षणाखाली पाणी पुरवठ्याचे काम प्रगतीपथावर चालले होते.३

अक्कलकोट लक्ष्मी होजियरी वर्क्स लि. (१९३६) :

१९२३ पासूनच अक्कलकोट संस्थानात उद्योगधंद्याची सुरुवात रिजंट ताराबाई राणीसाहेब यांनी केली होती. रिजंट ताराबाई यांनी आपल्या स्वर्गीय सासूबाई व भूतपूर्व संस्थानाधिपती शहाजीराजे तिसरे यांच्या राणीसाहेब लक्ष्मीबाई यांच्या नावाने अक्कलकोट संस्थानात अक्कलकोट लक्ष्मी होजिअरी नावाची कंपनी १९३६ मध्ये सुरु केली या कारखान्यास रिजंट ताराबाई राणीसाहेबानी सर्वतोपरी मदत केली. या कारखान्यात लोकरी व सुती कोट, स्वेटर्स, फ्रॉक्स, मफलर इ. तयार होत असे तसेच या मालाची किंमत माफक होती.

सहकारी सोसायट्या :

अक्कलकोट संस्थानात रिजंट ताराबाई राणीसाहेब यांनी पाच सहकारी सोसायट्या सुरु केल्या. १. मांगरुळ, २. कर्जाळ, ३. नागणसूर, ४. करजगी, ५. अक्कलकोट या सहकारी सोसायट्याच्या माध्यमातून शेतकऱ्यांना मदत केली जात असे. तसेच शेतीसाठी लागणाऱ्या अवजारांसाठी माफक भाडे ठेवले होते. त्यामुळे शेतकरी आपली शेती करु शकत असे.

संदर्भ :

१. अक्कलकोट संस्थानचा वार्षिक प्रशासकीय अहवाल वर्ष १९१२, पृष्ठ ३

२. अक्कलकोट संस्थानचा वार्षिक प्रशासकीय अहवाल वर्ष १९२९, पृष्ठ ३

३. अक्कलकोट संस्थानचा वार्षिक प्रशासकीय अहवाल वर्ष १९३१, पृष्ठ ३

४. अक्कलकोट संस्थानचा वार्षिक प्रशासकीय अहवाल वर्ष १९४२, पृष्ठ ३

61. कोल्हापूर संस्थानातील १८७० ते १८९७ या काळातील शैक्षणिक प्रगती

विवेकानंद राजाराम माने
क्रांतीअग्रणी जी. डी. बापू लाड
महाविद्यालय, कुंडल. जि. सांगली.

दक्षिणी संस्थानात कोल्हापूर संस्थानाला फार महत्व होते. कोल्हापूर राज्य म्हणजे कोल्हापूर संस्थान होय. सन १७१० ते १९४९ या काळातील कोल्हापूरास कोल्हापूर राज्य असे म्हटले जाते. छत्रपती शिवाजी महाराजांच्या मृत्युनंतर छत्रपती संभाजीनी नऊ वर्षे व छत्रपती राजारामांनी अकरा वर्षे औरंगजेबाशी लढा देऊन स्वराज्य टिकविले. राजाराम महाराजांचे निधन २ मार्च १७०० रोजी सिंहगडावर झाले. त्यांच्या निधनासमयी त्यांच्या राणी ताराबाई व राजसबाई या पन्हाळयावर होत्या. रामचंद्रपंत अमात्य यांनी सिंहगडावर राजाराम महाराजांची उत्तरक्रिया आटोपून पन्हाळ्यावरील राण्यांचे सांत्वन केले आणि सर्व सेना प्रमुखांना पत्रे पाठवून राज्यरक्षणची आज्ञा केली. या दरम्यान महाराणी ताराबाईनी आपला मुलगा शिवाजी यांची मुंज करून विशाळगड येथे त्यांचा राज्याभिषेक केला आणि औरंगजेबाशी त्याच्या मृत्युपर्यंत संघर्ष सुरु ठेवला.[१] फेब्रुवारी १७०७ मध्ये औरंगजेबाचा मृत्यु झाल्यावर मोगलांच्या कैदेतील संभाजीपुत्र शाहूची सुटका झाली. शाहूची ताराबाई संघर्षात शाहू विजयी झाल्याने ताराबाईने सन १७१०ला कोल्हापूर राज्याची स्थापना केल्याची घोषणा केली. त्यावेळी कोल्हापूर राज्याच्या सीमा पुढीलीलप्रमाणे होत्या. उत्तर अक्षांश १७॰-१०'-४५" व १५॰-५०'-२०" पुर्व रेखांश ७४॰-४४'-११" व ७३॰-४३'-१६".[२] आजच्या कर्नाटकामधील रायबाग व कटकोळ हा भाग पूर्वी कोल्हापूर राज्यात होता. कोल्हापूर राज्य २८५५ चौरस मैलाचे होते. दक्षिणी संस्थानात कोल्हापूर हे सर्वात मोठे संस्थान होते. या राज्याच्या उत्तरेला सातारा जिल्हा असून वारणा नदी तर ईशान्येला कृष्णा नदी होती. पूर्व व दक्षिण दिशांच्या सरहद्दीस बेळगाव जिल्हा होता. नेऋत्य दिशेला सावंतवाडी राज्य होते पश्चिमेला रत्नागिरी जिल्हा होता तसेच पूर्वेस व ईशान्येस सांगली, मिरज व कुरूंदवाड हा पटवर्धनांचा प्रदेश होता.[३] कोल्हापूर राज्याचा पृष्ठभाग उंच सखल असून त्याची समुद्रसपाटीपासूनची उंची साधारण २००० फुट होती. कृष्णा, वारणा, हिरण्याकेशी, पंचगंगा, दूधगंगा, वेदगंगा या मुख्य सहा नद्या या राज्यात होत्या. पश्चिम सीमेवर दक्षिण-उत्तर सहयाद्रीची रांग होती. त्यामुळे अनेक टेकड्या व घनदाट अरण्यांनी व्यापलेला डोंगराळ प्रदेश हे या राज्याचे वैशिष्ट्य होते. राज्याच्या हद्दीतील डोंगर टेकड्यांची समुद्रसपाटी पासून सरासरी उंची २५०० फुट होती.[४] या राज्याच्या सहयाद्री पर्वत पठारावर पन्हाळा, विशाळगड, भुदरगड, रांगणा, सामानगड, गगनगड, पावरगड, मुडागड, शिवगड, महिपालगड, कलानिधीगड, पारगड, गंधर्वगड, हे दुर्ग होते.

कोल्हापूर संस्थानातील शिक्षणव्यवस्था :

कोल्हापूर संस्थानात पारंपारिक पद्धतीने शिक्षण दिले जात होते. बापाचा व्यवसाय शिकून घेवून पुढे तोच व्यवसाय चालविणे हाच शिक्षणचा प्रकार होता. वडिलांची हत्यारे त्याला आयती मिळत असत. वडिलोपार्जित धंद्याचे ज्ञान त्याला घरबसल्या मिळत असे. जाता येता वडिलांचे काम त्याच्या नजरेखाली जाई. ते काम करण्यासाठी लागणारे साहित्य त्याला घरीच उपलब्ध होत असे. त्यामुळे आधुनिक शिक्षणचा गंधही समाजाला नव्हता. शिक्षणाची ज्ञानगंगा बहुजन समाजापर्यंत नेण्याचा प्रयत्न काही खाजगी शिक्षणप्रेमी मंडळींनी व ब्रिटिश सरकारने केला होता. पण तत्कालीन राजकारण व बहूजन समाजात असणारी शिक्षणविषयक अनास्था हे शिक्षण प्रसाराच्या व प्रचाराच्या मार्गातील अडसर होते. सन १८५४ पर्यत कोल्हापूर संस्थानात शिक्षण क्षेत्रात म्हणावी तशी प्रगती झाली नव्हती.

सन १८४८ मध्ये कोल्हापूर संस्थानात कोल्हापूर शहरी तसेच आळते, पन्हाळा व शिरोळ येथे सरकारी शाळा सुरू झाल्या. सन १८५१ मध्ये कोल्हापूर शहरात पहिली इंग्रजी शाळा सुरू झाली होती. या शाळेमध्ये एकोणीस विद्यार्थ्यानी प्रवेश घेतला होता.[५] याच सुमारास कागल, बावडा, गडहिंग्लज, भुदरगड, व मलकापूर या ठिकाणी शाळा सुरू झाल्या होत्या. सन १८५३ मध्ये कोल्हापूरात पहिली मुलींची शाळा सुरू होती. परंतु काही दिवसांनी मुलींची संख्या कमी होत गेली. सन १८६६ मध्ये जेव्हा सर ग्रॅट हे शाळा पाहण्यासाठी आले तेव्हा शाळेचे नाव फक्त शिल्लक असलेले दिसून आले होते.[६] सन १८५३ नंतर कोल्हापूर संस्थानात शिक्षण क्षेत्रात प्रगती होत गेली. सन १८५४ मध्ये शाळांची संख्या नऊ होती. त्याच्या पुढील वर्षी शाळांची संख्या पंधरा झाली होती. त्या शाळांमध्ये ७०७ विद्यार्थी शिक्षण घेत होते. सन १८५५ मध्ये बालक्रीडा मंदिर, व उर्दूशाळा सुरू करण्यात आली. याच वर्षी भुदरगड येथे मुलींची शाळा सुरू करण्यात आली. सन १८५९ मध्ये कोल्हापूर संस्थानातील शाळांची संख्या सतराच्यावर गेली होती. या शाळांमध्ये ११७३ विद्यार्थी शिक्षण घेत होते अशी नोंद आढळते.[७] सन १८६३ मध्ये अल्पवयीन सरदारांच्या शिक्षणासाठी कोल्हापूर येथे एक शाळा सुरू करण्यात आली होती. त्यात चोवीस विद्यार्थी होते. सन १८६६ पर्यंत या शाळेत फक्त नऊ सरदारपुत्र शिकत होते.[८]

छत्रपती शिवाजी तिसरे उर्फ बाबासाहेब महाराजांनी सन १८६३ मध्ये राज्यकारभार हाती घेतला तेव्हा सरकारी शाळांची संख्या आठरा झाली. बाबासाहेब महाराजांनी शिक्षण प्रसारावर भर दिली. तसेच समाजातही शिक्षणाविषयी आस्था वाढत गेली. कोल्हापूर संस्थेसाठी श्री. बाळ परशुराम पंडित यांची पहिले डेप्युटी एज्युकेशनल इन्स्पेक्टर म्हणून नेमणूक झाली. चांगले शिक्षक तयार करण्यासाठी एक ट्रेनिंग शाळा सुरू करण्यात आली. ट्रेनिंग शाळेमध्ये छपन्न विद्यार्थी शिक्षण घेत होते. तसेच कोल्हापूर राज्यात इंग्रजी-मराठी व मराठी शाळा अशा एकूण बत्तीस शाळा होत्या.[९] सन १८६७ राजाराम हायस्कूल स्थापना करण्यात आली. या हायस्कूलची इमारत भव्य असावी पण राजवाडयापासून दूर नसावी म्हणून ही इमारत जुन्या राजवाडयाजवळील घरे विकत घेवून ती पाडून तेथे राजस्थानी वास्तूपध्दतीवर आधारीत भव्य इमारत सन १८७१ मध्ये पूर्ण करण्यात आली. या इमारतीचा

पहिला दगड राजाराम महाराजांनी बसविला होता. राजाराम महाराजांच्या अकाली निधनानंतर राजाराम महाराजांच्या स्मरणार्थ या हायस्कूलला 'राजाराम हायस्कूल' असे नाव देण्यात आले.[१०] या हायस्कूलचे पहिले मुख्याध्यापक महादेव मोरेश्वर कुंटे हे होते. सन १८७० मध्ये या शाळेत २५३ विद्यार्थी शिक्षण घेत होते. सन १८७० मध्ये या शाळेत शिक्षण प्रसार करण्यामध्ये फार मोठा वाटा होता. राजाराम हायस्कूलमध्ये न्यायमुर्ती महादेव गोविंद रानडे हे सन १८५१ मध्ये, नामदार गोपाळ कृष्ण गोखले सन १८७६ मध्ये शिक्षण घेत होते. सन १८८० मध्ये राजाराम कॉलेज सुरू होऊन तेथे कॉलेज विभाग, हायस्कूल व राजकुमार वर्ग सुरू होते. राजाराम कॉलेजचे पहिले प्राचार्य सी.एच.कॅडी हे होते.[११]

सन १८७२ पासून शिक्षणाचा प्रचार मोठया प्रमाणावर होत गेला. सन १८७२ मध्ये सरकारी शाळांची संख्या १०१ होती तर ४८७२ विद्यार्थी शिक्षण घेत होते. सन १८८१ मध्ये शाळांची संख्या १५० असून ८४०६ विद्यार्थी शिक्षण घेत होते. सन १८८१ मध्ये शिकणा-या व लिहिता वाचता येणा-या पुरूषांचे प्रमाण ७.६ टक्के व स्त्रियांचे प्रमाण ०.१५टक्के होते. मार्च १८८३ मध्ये कोल्हापूर येथे संस्कृत शाळा सुरू झाली होती. सन १८८३-८४ मध्ये १९० शाळा होत्या. त्यात राजाराम कॉलेज व हायस्कूल, एक ट्रेनिंग शाळा, एक स्त्रियांचा ट्रेनिंग वर्ग, सहा इंग्रजी-मराठी शाळा १५४ मराठी शाळा, एकोणीस रात्रीच्या शाळा व आठ मुलींच्या शाळा होत्या. सन १८८४-८५ मध्ये शाळांची संख्या २०२ होती तर विद्यार्थी संख्या १२,४०४ होती. सन १८८५-८६ मध्ये शाळांची संख्या २०८ असून १२,८४३ विद्यार्थी शिक्षण घेत होते. सन १८८६-८७ मध्ये शाळांची संख्या २१२ असून १२,८९७ विद्यार्थी शिक्षण घेत होते. सन १८९३-९४ मध्ये शाळांची संख्या २२४ असून १४,८१९ विद्यार्थी त्यामध्ये शिक्षण घेत होते.[१२]

ट्रेनिंग शाळा:

विद्यार्थ्यांना शिक्षण देणा-या शिक्षकांना प्रशिक्षण देण्यासाठी सन १८६७ मध्ये ट्रेनिंग शाळेची स्थापना करण्यात आली. या शाळेत तीन वर्षे अभ्यासक्रम चालत होता. सन १८८३—८४ पूर्वी या शाळेमधून सरासरी दहा विद्यार्थी शिक्षक होवून बाहेर पडत असत. तसेच स्त्रीशिक्षक तयार करण्याकरिता सन १८८२ मध्ये स्त्रियांचा ट्रेनिंग वर्ग सुरू करण्यात आला. सन १८८६-८७ मध्ये मिस.लिटल या ट्रेनिंग वर्गाच्या सुपरिटेंडेंट होत्या. सन १८८५ पर्यत एकूण १६४ प्रशिक्षित शिक्षक बाहेर पडले होते.[१]

मुलींची शाळा :

कोल्हापूर राज्यात स्त्री शिक्षणाकडे सुरूवातीला फारसे लक्ष दिले गेले नसल्याचे दिसून येते. कर्नल ॲंडरसन हे पोलिटिकल एजंट म्हणून आल्यावर त्यांनी कोल्हापूर शहरात मुलींची शाळा सुरू केली. काही ठिकाणी मुलांच्या शाळेत मुलींही शिक्षण घेत असत. कोल्हापूर शहरातील मुलींच्या शाळेत कशिद्याचे काम, अंगरखे, पैरणी, चौळया शिवण्याचे शिक्षण मुलींना देण्यासाठी एका शिक्षकाची नेमणूक करण्यात आली होती. सन १८८३ मध्ये कोल्हापूर राज्यात नऊ मुलींच्या शाळा असून ५०० मुली शिक्षण घेत होत्या. सन १८८६-८७ मध्ये होतकरू व तरूण मुलींना वैद्यकीय परिचारिका शिक्षण देण्यासाठी वैद्यकीय विद्यालय सुरू केले होते. ते अल्बर्ट एडवर्ड हॉस्पिटलच्या आवारात होते. या वैद्यकीय विद्यालयाचे सुपरिटेंडेंट पद डॉ. आनंदीबाई जोशी यांच्याकडे देण्यात येणार होते पण त्यांचे फेब्रुवारी १८८७ मध्ये निधन झाल्याने ही योजना प्रत्यक्षात साकार झाली नाही. सुईणकाम वर्गही अल्बर्ट एडवर्ड हॉस्पिटलमध्ये सन १८८९-९० मध्ये सुरू करण्यात आला होता. सन १८९३-९४ मध्ये कोल्हापूर राज्यात २६ मुलींच्या शाळा होत्या. त्यामध्ये १,४१९ मुली शिक्षण घेत होत्या.[१४]

रात्रशाळा:

कोल्हापूर राज्यात रात्रशाळाही सुरू करण्यात आल्या होत्या. मजूर, करागीर, कुणबी, माळी, गवंडी, यांना दिवसा काम करून रात्री शिक्षण घेता यावे म्हणून कर्नल अंडरसन यांनी रात्रशाळा सुरू केल्या. सन १८७१ मध्ये कोल्हापूर शहरात पहिली रात्रशाळा सुरू करण्यात आली. सन १८८३ मध्ये रात्रशाळांची संख्या एकोणीस झाली होती. सन १८८३- ८४ मध्ये कोल्हापूर येथील मध्यवर्ती तुरूंगामध्ये कैद्यांना शिक्षण देण्यासाठी रात्रशाळा सुरू केली होती. या शाळेची वेळ सांय ६ वे ८ अशी होती. सन १८९३-९४ मध्ये रात्रशाळांची संख्या राज्यात चार असून त्यामध्ये ११५ विद्यार्थी शिकत होते.[१५] राजाराम कॉलेजमध्ये चित्रकला वर्ग, शेतकी वर्ग सुरू करण्यात आले होते. शेतकी वर्ग श्री. डी. बी. मराठे यांच्या देखरेखीखाली होता. राजाराम कॉलेजमध्ये शारिरीक शिक्षणाकडेही लक्ष दिले जाई. येथील व्यायामशाळेचा दररोज वापर केला जाई राजाराम कॉलेजमध्ये उत्तमपणे क्रिकेट हा खेळ खेळला जात होता. जयसिंगपूर टेक्निकल शाळेत पितळी ओतकाम, सुतारकाम, चित्रकला, भूमिती, शिल्पकला व स्थापत्यशास्त्र हे विषय शिकवले जात असत.

कोल्हापूर राज्यात मुस्लीम धर्मियांच्या मुला-मुलींना शिक्षण देण्यासाठी तीन शाळा होत्या. मागासवर्गीय मुलांना शिक्षण देण्यासाठी कोल्हापूर राज्यात सन १८८९-९० मध्ये चार शाळा होत्या. त्या शाळांमध्ये १७२ विद्यार्थी शिकत होते. तर सन १८९१-९२ मध्ये मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या शाळेत १५६ विद्यार्थी शिकत होते. 'कोल्हापूर येथे चांभार जातीच्या मुलांसाठी स्वतंत्र एक शाळा होती त्यात ६० विद्यार्थी शिकत होते.' सन १८९२—९३ मध्ये कोल्हापूर राज्यात १४ शाळा बंद करण्यात आल्या होत्या. तर सन १८९३—९४ मध्ये एक रात्रशाळा, तीन खेडयांमधील शाळा, एक सुईणकाम वर्ग एकूण पाच वर्ग बंद करण्यात आले होते. विद्यार्थी बहुदा निर्व्यसनी असत. संयम व शिस्त यांनी बांधले गेलेले होते. गुरूजनांबद्दल, वडिलधा—यांबद्दल त्यांना आदर होता. 'छडीलागे छम छम विद्या येईल घम घम' ही म्हण त्याकाळी सर्वाच्या तोंडी असायची. 'अभ्यासात कच्च्या व उनाड मुलांना गुरूजी छडीने

मारत. तरी मुले हू की चू करीत नसत. याशिवाय अंगठे धरणे, कान धरून ऊठ बशा काढणे, मानेवर खडा ठेवून वाचायला लावणे अशा शिक्षण विद्यार्थ्याना देत.[१६]

निष्कर्ष:

भारतातील प्रथापरंपरेनुसार कोल्हापूर संस्थानातही पारंपारिक शिक्षणव्यवस्था होती. मात्र हळूहळू आधुनिक शिक्षणव्यवस्थेला सुरवात झाली. मराठीप्रमाणेच इंग्रजी शाळा सुरु करण्यात आल्या. सुरवातीला मुलींच्या शाळांना प्रतिसाद नव्हता मात्र नंतरच्या काळात तो मिळत गेला. छत्रपती शिवाजी तिसरे उर्फ बाबासाहेब महाराजांनी शिक्षण प्रसारावर भर दिला. राजाराम हायस्कूल व राजाराम यांचा शिक्षण प्रसार करण्यामध्ये फार मोठा वाटा होता. ट्रेनिंग शाळा, रात्रशाळा यांचाही शिक्षण प्रसार करण्यामध्ये मोलाचा वाटा आहे.

संदर्भ:

१. महल्ले-पाठक, मराठा सत्तेचा इतिहास, विद्या प्रकाशन, नागपूर; १९९७ पृ. ६२

२. करवीर राज्याचा इतिहास, श्री महाराणी ताराबाई टिचर्स कॉलेज पुस्तकालय, नं.१, पृ. ३

३. कित्ता पृ.४

४. शिंदे खंडेराव, कोल्हापूर राज्याचा इतिहास निर्मिती विचारमंच, कोल्हापूर; २००९ पृ .१६

५. शिंदे खंडेराव, उपरोक्त पृ.१६

६. मोडक बा. प्र., कोल्हापूर राज्याचा इतिहास, अनंत प्रकाशन, कोल्हापूर; १८९३ पृ. ७०

७. कित्ता पृ.१२०

८. कित्ता पृ.१५८

९. शिंदे खंडेराव, उपरोक्त पृ.१०५

१०. राजाराम हायस्कूल शत सांवत्सारिक महोत्सव विशेषांक; १९५३, पृ. ३६

११. शिंदे खंडेराव, उपरोक्त पृ.१०६

१२. शिंदे खंडेराव, उपरोक्त पृ.१०७

१३. मोडक बा. प्र., उपरोक्त पृ. २१४

१४. शिंदे खंडेराव, उपरोक्त पृ.१०८

१५. शिंदे खंडेराव, उपरोक्त पृ.१०९

१६. कोल्हापूर जिल्हा गॅझेटियर, महाराष्ट्र शासन प्रकाशन; १९६०, पृ. ४२६

62. श्रीमंत नारायणराव बाबासाहेब घोरपडे यांचा शिक्षणविषयक दृष्टीकोन व कार्य (१८९२ ते १९४३)

डॉ. खोत माधुरी राजाराम
जयवंत महाविद्यालय, इचलकरंजी.
जि. कोल्हापूर.

पश्चिम महाराष्ट्रात उदयास आलेले इचलकरंजी संस्थान एक महत्वपुर्ण संस्थान असून त्याला महाराष्ट्राचे मॅचेस्टर म्हणून ओळखले जाते. या जहागीरीचे संस्थापक नारो महादेव जोशी घोरपडे हे होत. या घराण्यातील शेवटचे जहागीरदार श्रीमंत नारायणराव बाबासाहेब घोरपडे यांनी आपल्या जहागिरीत अनेक सामाजिक, राजकीय, आर्थिक व शैक्षणिक सुधारणा घडवून आणल्या.

१) पूर्ववृतांत :–

इचलकरंजी संस्थानातील श्रीमंत गोविंदराव आबासाहेब निपुत्रिक वारले (१५ फेबूवारी १८७६) त्यांच्या पत्नी पद्मावतीबाईंनी १० ऑगस्ट १८७६ रोजी लक्ष्मणराव जोशी करंबकर यांचा धाकटा मुलगा गोपाळ याला दत्तक घेतले. या दत्तकाबद्दल करवीर दरबारला १,७०,००० रू. चा नजराणा देण्यात आला. या दतक पुत्राचे नांव नारायण बाबासाहेब असे ठेवण्यात आले[१]. त्यांनी कोल्हापूर, पुणे, मुंबई या ठिकाणी शिक्षण घेतले व एल.एल.बी. पदवी मिळवली. इतिहास, अर्थशास्त्र, इंग्रजी हे त्यांचे आवडते विषय होत. २८ मार्च १८८६ रोजी त्यांचा अहमदनगरचे वकील यांची मुलगी दुर्गाबाईंशी विवाह झाला. त्यांचे नाव पुढे गंगाबाई असे ठेवले पण त्यांना सर्वजण माईसाहेब या नावाने ओळखू लागले. १८ जून १८९२ रोजी त्यांना संस्थानची मुख्यत्यारी देण्यात आली. यानंतर आपली कारकिर्द इचलकरंजी जहागिरीच्या विकासासाठी घालविली. आपल्या रयतेमध्ये शैक्षणिक प्रसार व्हावा हे त्यांचे ध्येय होते ते ध्येय पूर्ण करण्याचा त्यांनी प्रयत्न केला.[२]

२) शैक्षणिक कार्य :–

(१) शिक्षण संस्थांना आर्थिक मदत :–

एक संस्थानिक या दृष्टीने तत्कालीन परिस्थितीत सार्वजनिक कार्य करताना इंग्रज सरकारचा रोष ओढवून न घेता शिक्षण प्रसाराचे कार्य त्यांना महत्वाचे वाटू लागले. पुण्याच्या डेक्कन सोसायटीचा त्यांच्यावर प्रभाव पडला. लो. टिळक व आगरकर यांनी स्थापन केलेल्या आणि त्यांनी चालविलेल्या संस्थासाठी आपणास करता येईल तितकी मदत करावी यासाठी त्यांनी अशा शिक्षणविषयक संस्थाना आर्थिक मदत केली पण त्यांची कार्यपध्दत लक्षात घेऊन ते आर्थिक मदत करत. महाराष्ट्रातील व महाराष्ट्राबाहेरील विद्यालयास त्यांनी देणग्यां देताना तेथे इचलकरंजीच्या विद्यार्थ्यांना विनाशुल्क विद्यार्जन करता येण्याची सोय करून ठेवली होती.[३]

(२) व्यावसायिक शिक्षण :–

पुस्तकी ज्ञानापेक्षाही शास्त्रीय, औद्योगिक, व्यावसायिक शिक्षणासाठी त्यांनी प्रयत्न केले. शेती, यंत्रशास्त्र, वैद्यक शिक्षण इ. चे शिक्षण घेण्यासाठी ते शिष्यवृत्ती देत. शिष्यवृत्ती घेणाऱ्या विद्यार्थ्यांवर शिक्षण समाप्तीनंतर इचलकरंजी संस्थानची थोडा काळ का होईना नोकरी करावी अशी अट ते घालत. विद्यार्थ्यांनी शूध्दचरणी व प्रयत्नशील असावे ही त्यांची अपेक्षा असे.

(३) स्त्रीशिक्षण :–

स्त्रिशिक्षणाच्या बाबतीत ते उदार हाते. स्त्री समाजाचा अर्धा भाग जर अज्ञानाच्या अंध:कारातच चाचपडत राहिला तर समाजाची प्रगती शीघ्र गतीने होणार नाही असे ते म्हणत. स्त्रीशिक्षणाच्या कार्यासाठी त्यांनी मदत केली पण स्त्रीशिक्षणाच्या उद्दिष्टाबाबत ते परंपरागत होते. स्त्रीने कुटूंबाचे स्वास्थ्य टिकविण्यासाठी व वाढविण्यासाठी आपल्या विद्येचा विनियोग केला पाहिजे. स्त्रीला अपरिहार्य असलेल्या पत्नी व माता या जबाबदाऱ्या निर्दोषपणे पार पाडण्याची पात्रता तिने संपादन करावी एवढाच स्त्रीशिक्षणाचा उद्देश त्यांना मान्य होता. उदारमतवादी सुधारक, विधवा पुर्नविवाह, वारसाहक्क इ. बाबतचा त्यांनी आग्रह धरला. कर्वेच्या हिगंणे येथील व गोपाळराव देवधरांचे सेवासदन यांना त्यांनी आर्थिक मदत केली.

श्रीमती काशीबाई कानीटकर, पार्वतीबाई आठवले अशा प्रागतिक स्त्रियांना बोलवून स्त्रीवर्गास नव्या विचारसरणीची ओळख करून दिली. शिक्षण संपादन करून स्त्रीने स्वावलंबी व्हावे. वैधव्याचा कडवटपणा कमी करून तिने आपले आयुष्य समाधानाने कंठावे असा त्यांचा विचार होात. आपल्या परिवारातील मुलींनाही त्यांनी उच्च शिक्षण दिले.[४]

४. प्राथमिक शिक्षण :–

शिक्षण हे मानवी जीवनाच्या प्रगतीचा पाया आहे असे त्यांचे मत होते. त्यामुळे राज्यकारभार हाती येताच त्यांनी शिक्षणावर लक्ष केंद्रित केले. आपल्या जहागीरीतील प्रत्येक गावी त्यांनी शाळा काढली. त्यांच्यापूर्वी १७ शाळा होत्या त्यांची संख्या ३२ वर नेली. प्रशिक्षित शिक्षकांची नेमणुक केली. मुलींसाठी इचलकरंजीत अनुबाई कन्या शाळा व पद्मावती कन्या शाळा सुरू केल्या. हरिजन विद्यार्थ्यांसाठी स्वतंत्र शाळा होत्या. त्या रद्द करून सर्वांनी एकत्रच शिक्षण घेतले पाहिजे असे बंधन घातले.

५. माध्यमिक शिक्षण :–

इचलकरंजीतील माध्यमिक शिक्षणासाठी गोविंदराव हायस्कूलची इमारत उभी केली. विद्यार्थ्यांसाठी वसतीगृह उभारले. (सध्या व्यंकटराव हायस्कूलच्या इमारतीत पूर्वी गोविंदराव हायस्कूलची वसतीगृह इमारत होती.)

इचलकरंजी जहागीरीत आजरा, आरग मणेराजूरी इ. दुरवरच्या गावांचा समावेश होता. तेथील विद्यार्थ्यांसाठी श्री. व्यंकटराव वसतीगृह काढले.[५]

६. उच्च शिक्षणासाठी शिष्यवृत्या व शैक्षणिक संस्थांना देणगी :–

इचलकरंजी जहागीरीच्या अल्पशा उत्पन्नातून महाविद्यालयासाठी खर्च करता येणे शक्य नव्हते. यासाठी नवीन धोरणांचा अवलंब केला. बाहेरील अनेक संस्थांना देणग्या दिल्या. आणि त्या देत असताना आपल्या जहागिरीतील विद्यार्थ्यांना मोफत किंवा कमी शुल्कात शिक्षण दिले पाहिजे अशी अट घातली.

१. सांगलीच्या विलिग्डन कॉलेजला प्रथम त्यांनी ५०,०००/– रू. कर्ज दिले. आणि नंतर त्याचे देणगीत रूपांतर केले.

२. म.धोंडो केशव कर्वे यांच्या शाळेस रू १४००/– देणगी देऊन इचलकरंजीच्या विद्यार्थ्यांनाही या शाळेत शिक्षण मिळावे अशी अट घातली.

३. ठाकरसी महाविद्यालयास रू. ३०००/– देणगी दिली व त्यातून लोन स्कॉलरशीप सुरू केली.

शिष्यवृत्या व देणग्या देण्यासाठी आर्थिक पुरवठा करता यावा यासाठी राज्यकारभारातील खर्च अगदी काटकसरीने केला आणि देणग्या, शिष्यवृत्या यासाठी वेगळे ट्रस्ट निर्माण करून त्यात सातत्य ठेवले. पुस्तकी ज्ञानापेक्षा शास्त्रीय, औद्योगिक आणि व्यावसायिक शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना ते शिष्यवृत्तीसाठी प्राधान्य देत. शिक्षण पुर्ण होऊन स्थिस्थावर झाल्यावर विद्यार्थ्यांनी लोन स्कॉलरशीपची रक्कम परत करावी अशी अट होती. ब्राम्हण व ब्राम्हणेतर अशा दोघांनाही ही स्कॉलरशीप दिली जाई. परदेशी जाऊन शिक्षण घेणाऱ्या गरीब व होतकरू विद्यार्थ्यांसाठी त्यांनी स्कॉलरशीप देण्यासाठी '' इचलकरंजी एज्युकेशन एंडावमेंट फंड'' हा ट्रस्ट स्थापन केला. टाटा इलेक्ट्रिक कंपनीचे रू. ७५,०००/– चे शेअर्स व रोख रक्कम रू. २५,०००/– असे मिळून एक लाखाचा निधी ट्रस्टकडे सोपवून त्यातून लोन स्कॉलरशीपसाठी आर्थिक स्त्रोत कायमचा उभा केला. मृत्युपूर्वी तिसरा एक 'डिपॉझिट ट्रस्ट' म्हणून पावणेदोन लाखाचा ट्रस्ट स्थापन केला. सरकार हयात असेपर्यंत अडीअडचणीसाठी त्याचा वापर करावा आणि त्यांचे पश्चात सदर ट्रस्टचा उपयोग धार्मिक व औद्योगिक शिक्षणासाठी मदत देण्यासाठी व्हावा अशी त्यांची इच्छा होती. आजही त्याप्रमाणे त्या ट्रस्टचे काम सुरू आहे.[६]

७. इतिहास संशाधनासाठी कार्य :–

भारत इतिहास संशोधन मंडळ आणि भांडारकर रिसर्च इन्स्टिट्यूट या पुण्याच्या इतिहास संशोधन करणाऱ्या मंडळांना त्यांनी देणग्या दिल्या. या मंडळाच्या कौन्सिलिंग बॉडीतही होते. रियासतकार गोविंद सखाराम सरदेसाई यांना अर्थसहाय्य केले.[७]

८. साहित्यक्षेत्रातील कार्य :–

१. १९११ साली झालेल्या इंग्लडच्या बादशहाच्या राज्यारोहण सोहळ्यावर आधारित 'Historical Records of the Imperial visit to India' या ग्रंथाचे मराठी भाषांतर केले.

२. मुंबईचे गव्हर्नर लॉर्ड सिडनेहॅम यांच्या दिवंगत कन्या मिस व्हायोलेट क्लार्क यांच्या Leaves या पुस्तकाचे 'पर्ण' या नावाने त्याचे मराठीत भाषांतर केले.

३. मुंबई इलाख्याचे डायरेक्टर ऑफ ॲग्रिकल्चर किटींग यांच्या 'Rural Economy in the Bombay Deccan' या ग्रंथाचे त्यांनी मराठीत भाषांतर केले.

४. Impression of British Life and Character हे युरोपच्या सफरीवरील अनुभवांचे इंग्रजी भाषेतील पुस्तक लिहीले व प्रकाशित केले.

५. टाईम्स ऑफ इंडिया या दैनिकातून व पुरूषार्थ, सह्याद्री, किर्लोस्कर, मनोहर यासारख्या मासिकातून त्यांचे विविध विषयावर लेख प्रकाशित झाले.

६. इंग्लडमध्ये ईस्ट इंडिया असोसिएशन या संस्थेच्या सभागृहात What had Briton done for India या विषयावर शोधनिबंध सादर केले.[८]

थोडक्यात मराठी व इंग्रजी भाषेतील लिखाण आणि भाषांतर या क्षेत्रात ठसा उमटवला.

मुल्यमापन :–

२१ आक्टोबर १९४३ रोजी श्रीमंत नारायणराव बाबासाहेब घोरपडे यांचे देहावसान झाले. त्यांनी अंत्यत प्रतिकूल परिस्थितीत इचलकरंजी व जहागीरीतील इतर गावे यांचा विकास घडवून आणला. स्वहितापेक्षा प्रजाहिताला महत्व दिले म्हणून त्यांची कारकिर्द प्रभावी ठरली.

संदर्भ :–

१. जगताप विजय, श्रीमंत नारायणराव बाबासाहेब घोरपडे जीवन चरित्र २०११ पृ.१७

२. तत्रैव पृ. १९,२०

३. ताम्हणकर ना.धो. श्रीमंत बाबासाहेब घोरपडे, १९५१ पृ. १५०,१५१

४. जगताप विजय पृ. ६६,६७

५. तत्रैव पृ. ६७

६. तत्रैव पृ.६८

७. तत्रैव पृ. ६९

८. ताम्हणकर ना.धो. पृ. १७७

परिशिष्ठे :–

इचलकरंजी जहागीरीचे क्षेत्र व गावे

- २४१ चौरस मैल – इचलकरंजी जागीरीचे क्षेत्रफळ
- इचलकरंजी जगागिरीशी संबंधीत प्रमुख गावे –

  बहिरेवाडी, शिरपूर, मौजे शिरढोण, गणेराजूरी, नांदणी, म्हापण, आरग, मत्तिवडे, उत्तूर, इचलकरंजी, अब्दुललाट, रांगोळी, शिरदवाड, सुळकूड (मिरज परगणा), टाकळी, शिरदवाड,
- आजरे महात्मातील गावे – अर्जुनी, गवसे, हुनंशियाळ, मुदेयनूर, मिरज मामल्यातील सतरा कमानी.
- इचलकरंजी जहागिरीच्या गादीवर बसलेले अधिपती व त्यांचा कार्यकल (१६९७ ते १९४३)

  १. नारो महादेव – (१६९७ ते १७२०)

  २. व्यंकटराव –(१७२० ते १७४५)

  ३. नारायणराव पहिले – (१७४५ ते १७७५)

  ४. व्यंकटराव (दुसरे) (१७७५ ते १७९५)

  ५. नारायणराव (दुसरे) (१७९५ ते १८२७)

  ६. व्यंकटराव (तिसरे) (१८२७ ते १९३८)

  ७. केशवराव तात्यासाहेब (१९३८ ते १८५३)

  ८. व्यंकटराव (चौथे) (१८५३ ते १८६४)

  ९. गोविंदराव – (१८६४ ते १९४३)

  १०.नारायणराव (तिसरे) (१८७६ ते १९४३)

63. दक्षिण महाराष्ट्रातील संस्थान विलीनीकरण चळवळीतील देशभक्त रत्नाप्पा कुंभारांचे योगदान

प्रा. सौ. शीला आ. जगताप
इतिहास विभाग प्रमुख,
श्री शिव-शाहू महाविद्यालय, सरुड,
ता. शाहूवाडी, जि. कोल्हापूर

दक्षिण महाराष्ट्रातील संस्थानांच्या प्रादेशिक परिषदेत रत्नाप्पा कुंभारांच्या मागे बहुमत होते. भाई माधवराव बागल व रत्नाप्पा कुंभार यांच्यात दोन गट पडले होते. यामध्ये भाई माधवराव बागल यांचा कोल्हापूर विलिनीकरणास विरोध होता. तर रत्नाप्पा कुंभार गटाचा विलिनीकरणास पाठिंबा होता.

दक्षिण संस्थान विलीनीकरणास सुरुवात :

दक्षिण संस्थान प्रादेशिक विभाग मंडळाचे कार्याध्यक्ष भाई माधवराव बागल यांनी कोल्हापूर संस्थान प्रजापरिषदेचे कार्याध्यक्ष या नात्याने प्रजापरिषदेच्या कार्यकारिणीने १७.११.१९४७ रोजी दिलेला आदेश मान्य केला नाही. तसेच कार्यकारिणीच्या आठ सभासदांनी राजीनामे दिल्यानंतर निर्माण झालेल्या राजकीय परिषदेचा विचार करण्यासाठी मध्यवर्तीची मागणीही त्यांनी धुडकावून लावली. याबाबतचा भाई माधवराव बागल यांना अखिल भारतीय देशी राज्य लोक परिषदेसारख्या लोकशाही प्रधान संस्थेच्या घटक विभागाचे अध्यक्ष म्हणून भाई माधवराव बागल यांचेवर या प्रादेशिक विभाग मंडळाचा विश्वास राहिला नाही. त्यामुळे १४.१२.१९४७ रोजी दक्षिण संस्थान लोकसभेच्या कार्यकारी मंडळाची सभा झाल्यावेळी संस्थाने मुंबई प्रांतात विलीन करण्याचा ठराव पास करण्यात आला. त्यामुळे दक्षिणी संस्थानचे संघराज्य करण्यापेक्षा त्यांचे विलीनीकरण करण्यातच जनतेचे हित आहे अशा प्रकारचे मत दक्षिणी संस्थानातील प्रजेच्या पुढाऱ्यांना कळून येऊ लागले. संघराज्य व विलीनीकरणासंबंधी काही काँग्रेसच्या पुढाऱ्यांनी गैरसमज निर्माण केले, त्यामुळे संघराज्य विरोधी वातावरण निर्माण होऊन लागले. १७.१०.४७ रोजी भोर येथे ८ संस्थानिकांनी (औंध, भोर, फलटण, मिरज, मिरजमळा, सांगली, कुरुंदवाड व रामदुर्ग, निर्माण केलेल्या दक्षिणी संस्थानाच्या संस्थानिकांना आपल्या दक्षिणी संस्थानाच्या संघराज्याबद्दल काळजी वाटू लागली.[१] त्याबाबत त्यांनी सरदार पटेल यांची भेट घेतली असता, त्यांनी सांगितले की, **'विलिनीकरणाबाबत राजा व प्रजा यांचे एकमत असेल तर त्यांना हिंदी संघराज्यात सामील करुन घेऊ'** या आश्वासनानुसार जमखिंडी राजेसाहेबांनी स्वत:चे संस्थान मुंबई प्रांतात सामील करण्याचा निर्णय जाहीर केला. या निर्णयाप्रमाणे मिरज संस्था प्रजापरिषदेनेही संघराज्याऐवजी विलिनीकरणाची मागणी केली.

ब्रिटिश साम्राज्याच्या मगरमिठीतून भारताला मुक्त करण्यासाठी धैर्याने लढण्याचा आदेश रत्नाप्पा कुंभारांनी आपल्या अनेक सहकाऱ्यांना दिला होता. या स्वातंत्र्य लढ्यात परकियांशी लढावे लागेल, तर स्वातंत्र्य प्राप्तीनंतर स्वकीयांशी लढण्याची वेळ येऊन ठेपली. संस्थानी प्रजाजनांना गुलामगिरीतून मुक्त करावयाचे होते या लढाईसाठी अखिल भारतीय पाठिंबा मिळवावयाचा होता, यासाठी वल्लभभाई पटेल यांची भेट घेऊन रत्नाप्पा कुंभार व त्यांचे सहकाऱ्यांनी संस्थानाचे विलिनीकरण करावे असे ठराव मांडला व तो पास झाला. यातून त्यांच्या धैर्याचे व चिकाटीचे दर्शन त्यांच्या हितशत्रूपासून हितचिंतकापर्यंत सर्वांना दिसून आले. दक्षिणी अठरा संस्थाने संघराज्यात विलीन करावयाची व राष्ट्रीय नेत्याचे एकसंघी भारताचे स्वप्न पूर्ण करावयाचे असा ध्यास रत्नाप्पा कुंभारांनी घेतला व त्या दृष्टीने स्वत:ची घोडदौड सुरु केली. मात्र या कामात अनेक अडथळे आले. या सहकाऱ्यांनी आजपर्यंत प्रेमाने खांद्याला खांदा भिडवून काम केले तेच सहकारी यावेळी आण्णांच्या विरुद्ध दंड थोपटून उभे राहिले होते. परंतु देशहितासाठी त्यांनी मित्रप्रेम झुगारले व ते कामास लागले. दक्षिणी संस्थानाच्या संघराज्याचे व घटना समितीचे औपचारिक उद्घाटन २०.१२.१९४७ रोजी मिरज येथे श्री कमल नयन बजाज यांच्या अध्यक्षतेखाली करण्यात आले.[२]

यावेळी समाजवादी कार्यकत्यांनी निदर्शने करुन विरोध प्रकट केला. अध्यक्षांचे भाषणही दुटप्पी होते. त्यामुळे या समारंभाच्या वेळी प्रदर्शित झालेले लोकमत व पुढे मंत्रीमंडळाच्या बनावामुळे राज मंडळास विलिनीकरण करणे इष्ट वाटले. ता. २१.१२.१९४७ रोजी पुढील ठराव करण्यात आला. 'नवीन घडलेली घटना व एकंदरीत लोकमत अजमावता असा ठराव करण्यात येत आहे की, संघराज्याची घटना तयार करीत न बसता मुंबई प्रांतात विलिन होण्याची जर संघराज्यातील संस्थानी जनतेची इच्छा असेल तर संस्थाने त्यांच्या मार्गाच्या आड येणार नाहीत.''[३] अशा प्रकारे दक्षिण महाराष्ट्रातील १८ संस्थानापैकी ९ संस्थाने मुंबई प्रांतात विलीन करण्याचे ठरविले.

दक्षिण संस्थान लोकसभा कार्यकारी मंडळात ६.१.४८ रोजीच्या बैठकीत भाई माधवराव बागलांच्या विरुद्ध अविश्वासाचा ठराव पास करण्यात आला. त्यांच्या जागी रत्नाप्पा कुंभारांची नियुक्ती झालेने त्यांनी पुढील ठराव पास केला.

१. संस्थानी प्रजापरिषदांनी विलिनीकरणास पाठिंबा द्यावा.

२. अक्कलकोट, जत, जंजिरा, मुधोळ येथील चळवळीस सहाय्य करावे.

३. घटनासमिती सार्वभौम असल्याने तीच विलिनीकरणाचा निर्णय घेऊ शकेल.[४]

जी संस्थाने विलिनीकरणास तयार नव्हती व ज्यांना कोल्हापूरच्या छत्रपतींचा पाठिंबा आहे असे वाटत होते अशा अक्कलकोट, जत,

जंजिरा, मुधोळ या चार संस्थानात चळवळ करण्याचे व प्रजापरिषद भरविण्याचे रत्नाप्पा कुंभार यांनी ठरविले. प्रजापरिषदेमार्फत पाठविलेले शिष्टमंडळाने संस्थानी अधिकाऱ्यांशी तडजोड करण्याचा प्रयत्न केला. परंतु वाटाघाटी फिसकटल्या. त्यामुळे रत्नाप्पा कुंभार यांच्या नेतृत्वाखाली अक्कलकोट प्रजापरिषदेने जबाबदार राज्य पद्धतीसाठी पहिला हल्ला १.१.१९४२ रोजी अक्कलकोटवर चढविला. अक्कलकोट दरबार व रत्नाप्पा कुंभार यांच्यामध्ये तडजोड होऊ शकली नाही. म्हणून सत्याग्रह सुरु झाला. लोकांची मशालीची मिरवणूक काढून चावडीतील सरकारी दप्तर ताब्यात घेतले. अक्कलकोट मध्ये सत्याग्रह शिबीर उघडण्यात आले. त्यात १५०० स्वयंसेवकांनी सहभाग घेतला. मिरवणूकीवर गोळीबार करण्यात आला, त्यामुळे संस्थानात शांतता निर्माण करण्यासाठी राजेसाहेबांनी सोलापूर कलेक्टरची मदत मागितली. ऑक्टोबर ५.१.१९४८ रोजी विलिनीकरणास राजेसाहेबांनी संमती दाखवली.[५]

५ व ६ जानेवारी १९४२ रोजी रिजनल कौन्सिलची बैठक घेण्यात येऊन रिजनल कौन्सिलचे अध्यक्षपद रत्नाप्पा कुंभार यांनी स्वीकारावे अशी विनंती करणारा ठराव पास झाला. परंतु अक्कलकोट लढ्याच्या परिस्थितीमुळे रत्नाप्पा कुंभार या बैठकीला हजर राहू शकले नाहीत. दक्षिण संस्थानात चालू असलेल्या या व चालू होणाऱ्या अक्कलकोट, जत, सावंतवाडी, मुधोळ, जंजिरा वगैरे ठिकाणी लढ्यास योग्य ते मार्गदर्शन करण्यासाठी व सर्व दक्षिणी संस्थानाचे विलिनीकरणाची पूर्तता करण्यासाठी खालील कृती समिती करण्यात आली. त्याचे सदस्य पुढीलप्रमाणे –

१) रत्नाप्पा कुंभार, कोल्हापूर. २) डॉ. देशपांडे, सांगली.

३) शंकरराव माने, कोल्हापूर. ४) रा. तु. बगाडे, कोल्हापूर.

५) गानू, कुरुंदवाड,

६) ज. बा. पाटणकर – निमंत्रक म्हणून या समितीचे कार्य करतील असे ठरले.[६]

१९४२ च्या लढ्यातील श्री रत्नाप्पा कुंभार हे निष्णात क्रांतीवीर व जबरदस्त संघटक होते, त्यामुळेच विलिनीकरणाच्या चळवळीतही रत्नाप्पा कुंभार यांनी तितकीच गती दिलेली आढळते. परंतु रत्नाप्पा कुंभारांचा गट हा व्यापारी, भांडवलदार व कारखानदार वर्गाचा प्रतिनिधित्व करणारा गट म्हणून बागलगट त्यांचेकडे पहात होता. स्वत: भाई माधवराव बागल आपला गट सर्वसामान्यांचा प्रतिनिधित्व करणारा गट आहे. अशा प्रकारची वातावरण निर्मिती करु पहात होते. परंतु अशा प्रकारचा टोकाचा विचार रत्नाप्पा कुंभार यांनी कधीच केला नाही. त्यांच्यामते, 'अशा टीकांकडे लक्ष द्यायचे म्हटले तर हाती घेतलेले काम पहाण्याला वेळ व शक्ती रहाणार नाही.'

संस्थानच्या विलिनीकरणाचा प्रश्न अत्यंत जोमाने चालू असल्याने दक्षिण संस्थान संघराज्यातील संस्थानिकांनी प्रजेच्या इच्छेप्रमाणे विलिनीकरणास मान्यता दिली. अक्कलकोटच्या संस्थानी प्रजेच्या व संस्थानिकाच्या विनंतीप्रमाणे हिंद सरकारने अक्कलकोट संस्थावर ताबा घेतला. विलिनीकरण विषयावर विचारविनिमय करण्यासाठी दक्षिण संस्थान रिजनल कौन्सिलचे अध्यक्ष रत्नाप्पा कुंभार यांना आमंत्रित केले. संस्थानच्या विलिनीकरणाच्या प्रकाराला खूप वेग आला होता. कोल्हापूर संस्थानचे विलिनीकरण करावे अशा आशयाचे ठराव कटकोळ, रायबाग, शिरोळ, हातकणंगले, इचलकरंजी इ. ठिकाणच्या तालुका संस्थानी पास केले. तसेच संस्थानचे प्रश्न सोडविण्यासाठी प्रत्येक तालुका सभेने जाहीर सभा घेऊन लोकमत जागृत करण्यास सुरुवात केली. यावेळी झालेल्या चर्चेचा समारोप करताना रत्नाप्पा कुंभार म्हणाले की, 'देशातील परिस्थिती झपाट्याने बदलत आहे व या बदलत्या परिस्थितीत संस्थानातून राजेशाही आणि लोकशाही एकत्र नांदणे शक्य नाही. लोकशाहीच्या वाढीसाठी राजेशाही ही नष्ट झालीच पाहिजे. विलिनीकरणाच्या दृष्टीने ही तात्विक भूमिका आहे. संस्थानात मिळालेले जबाबदार राज्यपद्धतीचे अपुरे अधिकारात आणि संस्थानच्या थोड्या उत्पन्नात जनतेच्या हिताचा राज्यकारभार चालविणे अशक्य आहे. संघराज्य स्थापन झाले, परंतु जनतेच्या विरोधामुळे त्याला विलिनीकरणाचा ठराव पास करावा लागला. इतर संस्थानाचेही विलिनीकरण होत चालले आहे अशा परिस्थितीत कोल्हापूरचे स्वतंत्र अस्तित्व रहाणे अशक्य आहे. यामध्ये काही स्वार्थी पुढाऱ्यांचा विरोध होईल. परंतु बदलत्या परिस्थितीत कोल्हापूर संस्थान अवघ्या सहा महिन्याच्या आतच विलिन होईल.[७]

विलिनीकरणाची चळवळ वेगाने सुरू झालेली होती. जर संस्थानातील विलिनीकरणाचा लढा रत्नाप्पा कुंभार यांच्या नेतृत्त्वाखाली सुरू झाला होता. विलिनीकरणाबाबत निर्णय घेण्यासाठी राजेसाहेबांना ३ वर्षाची मुदत दिलेली होती. १६ जानेवारी १९४८ पर्यंत जर योग्य निर्णय लागला नाही तर जत संस्थानात विलिनीकरणाचा लढा सुरू करण्याचा इशारा देण्यात आला होता. त्यासाठी स्वयंसेवकांचे शिबिरही उघडण्यात येणार होते. इतकेच नव्हे तर रत्नाप्पा कुंभार यांनी जाहिर सभेत भाषण करताना सांगितले की, ''अवघ्या दहा दिवसात आम्ही जतचा संग्राम संपवून यशस्वी होवू'' त्या दृष्टीने अक्कलकोटच्या पाठोपाठ दुसरी आघाडी जत संस्थानात उघडली जाणार होती. परंतु अक्कलकोट लढ्याचा धडा घेऊन जतच्या राजेसाहेबांनी तारीख १७.१.१९४८ रोजी विलिनीकरणास संमती दर्शविली.[८]

दक्षिणी संस्थानचे रिजनल कौन्सिलचे अध्यक्ष रत्नाप्पा कुंभार हे जत प्रजापरिषदेच्या विलिनीकरणाच्या चळवळीस मार्गदर्शन करत होते. जत संस्थानचा कारभार हिंद सरकारच्या हाती घेण्याच्या दृष्टीने वाटाघाटी यशस्वी झाल्या. २२ जानेवारी १९४८ रोजी रत्नाप्पा कुंभारांसारख्या यशस्वी नेत्याच्या नेतृत्त्वाखाली जत संस्थानचे विलिनीकरण यशस्वीपणे पार पडले.[९] लोक जागृती करण्याच्या दृष्टीने रत्नाप्पा कुंभार यांनी

ठिकठिकाणी जाहीर सभा घेतल्या. ''ब्रिटिशांनी स्वातंत्र्य जरी दिले असले तर अजुनही खऱ्या अर्थाने हिंदुस्थान स्वतंत्र झालेला नाही. संस्थानातील प्रजा गुलामगिरीतच होती ही सारी संस्थाने भारतात विलिन झाल्याशिवाय स्वातंत्र्यात राहिलेली उणीव दूर होणार नाही. साऱ्या देशाचे एकजीनसी स्वातंत्र्य प्रस्थापित करण्यासाठी सारी संस्थाने भारतात विलिन झाली पाहिजेत''[१०] असे रत्नाप्पा कुंभारांचे मत होते. पुढे सावंतवाडी संस्थान प्रजापरिषदेचे तिसरे अधिवेशन १४.२.१९४८ रोजी दक्षिण संस्थान प्रादेशिक मंडळाचे अध्यक्ष रत्नाप्पा कुंभार यांच्या अध्यक्षतेखाली यशस्वीपणे पार पडले.[११]

सावंतवाडी संस्थानाधिपतींनी प्रजेची मागणी लक्षात न घेतल्याने प्रज्ञापरिषदेने दि. २३.९.१९४८ रोजी प्रतिसरकारची स्थापना करून सावंतवाडीतील अधिकाऱ्यांना एक दिवस कुडाळला कैदेत नेवून ठेवले. मात्र दंगल होऊ नये म्हणून जिल्हाधिकाऱ्याची मदत घेतली व पुढे संस्थाधिपतींनी विलिनीकरणास मान्यता असल्याचे कळवले त्याप्रमाणे दि. २५.२.१९४८ रोजी सावंतवाडीच्या राजेसाहेबांनी विलिनीकरणाच्या करारनाम्यावर सही केली.[१२] जंजिरा संस्थानात देखील सत्याग्रहास सुरूवात झाली होती. या सत्याग्रहाचे रूपांतर पुढे प्रतिसरकार स्थापन होण्यास झाले. त्यामुळे संस्थानातील कारभार स्थगित झाला व पुढे मुंबई प्रांताच्या पोलिसांनी जंजिरा संस्थानात प्रवेश केला. जंजिराच्या नबाबांनी विलिनीकरणास मान्यता दिली व दि. ४.३.१९४८ रोजी जंजिरा संस्थानचा ताबा मुंबई प्रांताने घेतला.[१३]

कोल्हापूर शहरात देखील संस्थान विलिनीकरणाची चळवळ सुरू झालेली होती. परंतु भाई माधवराव बागलांचा गट विलिनीकरणाच्या विरोधी गट होता तर रत्नाप्पा कुंभार यांचा गट हा विलिनीकरण करणारा होता. पुढील काळात कोल्हापूरमध्ये कॅप्टन व्यकंट सुब्रम्हण्यम् नंजाप्पा यांची कोल्हापूरचे प्रशासक म्हणून नेमणूक झाली. नंजाप्पांनी दि. २२.३. १९४८ रोजी कोल्हापूरात आल्यानंतर त्याच दिवशी कोल्हापूरातील अधिकार हाती घेतले.[१४] रत्नाप्पा कुंभार यांनी विलिनीकरणाबाबत जागृती करण्यासाठी कोडोली, बोरपाडळे, देवाळे, कापशी, भेडसगांव, सरूड या ठिकाणी जाहीर सभा घेऊन जनजागृती करण्यास सुरूवात केली.[१५] अशा रीतीने कोल्हापूरच्या छत्रपतींनी आपल्या प्रजापरिषदेस डावलून विलिनीकरणास संमती दिली व प्रजेच्या संमतीची वाट न पाहता संस्थान खात्याने कोल्हापूरचे मुंबई प्रांतात विलिनीकरण करण्याचे ठरवले. ता. १ मार्च १९४९ रोजी प्रत्यक्ष विलिनीकरणाचा समारंभ मुंबई प्रांताचे मुख्यमंत्री श्री. बाळासाहेब खेर यांच्या अध्यक्षतेखाली झाला. अशाप्रकारे कोल्हापूरच्या विलिनीकरणाने दक्षिणी संस्थानचे संपूर्ण विलिनीकरण पूर्ण झाले.[१६] प्रजापरिदेच्या स्वातंत्र्य चळवळीच्या कार्यात रत्नाप्पा कुंभारांचा सिंहाचा वाटा होता. स्वातंत्र्य सैनिक म्हणूनही त्यांनी मोलाचे कार्य केले व पुढील काळात सहकारातून विकास करण्याकडे त्यांनी आपले लक्ष केंद्रित केले.

संदर्भ :

१. वि.अ. पटवर्धन, दक्षिण महाराष्ट्रातील संस्थान विलिनीकरणाची कथा, पृ. ८८.

२. कित्ता, पृ. ९१.

३. कित्ता, पृ. ९२.

४. कित्ता, पृ. ९३.

५. कित्ता, पृ. ९४.

६. सत्यवादी, ५ जानेवारी १९४८.

७. सत्यवादी, १३ जानेवारी, १९४८.

८. वि. अ. पटवर्धन, पश्चिम महाराष्ट्रातील संस्थान विलिनीकरणाची कथा, पृ.९४.

९. सत्यवादी, १२ जानेवारी, १९४८.

१०. सत्यवादी, ३० जानेवारी, १९४८.

११. सत्यवादी, १७ जानेवारी, १९४८.

१२. वि.अ. पटवर्धन, दक्षिण महाराष्ट्रातील संस्थान विलिनीकरणाची कथा, पृ.९७.

१३. कित्ता, पृ. ९७.

१४. सत्यवादी, २२ मार्च, १९४८.

१५. सत्यवादी, १९ व २० मे, १९४८.

१६. पुढारी, २ मार्च १९४८.

64. कोल्हापूर या संस्थानातील राजर्षी शाहू महाराज यांचे शैक्षणिक कार्य

अक्षय महादेव माने
चंद्राबाई शांताप्पा शेंडूरे कॉलेज हुपरी
बी.ए. भाग – ३ इतिहास – विभाग

प्रस्तावना ः

पदमपुराणातील करवीर खंडात कोल्हापूर क्षेत्राचे महात्म्य यशोचितपणे वर्णिले आहे. त्यावरून या शहराचे अतिप्राचिनत्व व पावित्रय मान्यता प्राप्त झाले आहे. या क्षेत्रास 'दक्षिण काशी' असेही म्हटले जाते. महाराष्ट्राच्या आधुनिक कालखंडाच्या इतिहासात कोल्हापूर जिल्हयाने अग्रभागी स्थान पटकावलेले दिसले.

कोल्हापूर संस्थानची स्थापना ः

छत्रापती शिवाजी महाराजांची पराकमी सुनबाई महाराणी तारावाई हिने छत्रापती राजारामाच्या मृत्यूनंतर खचून न जाता औरंगजेव सारख्या वलाढय मोघल वादशहाच्या आकमणाचा खंवीरपने प्रतिकार करून हिंदवी स्वराज्याचे निर्धाराने रक्षण केले. औरंगजेवाच्या मृत्यूनंतर छत्रापती संभाजीचा पुत्रा शाहू यास मोघलांनी मुक्त केले. त्यामुळे दूहीची परिणती म्हणून तारावाईने १७१0 मध्ये पन्हाळयास स्वतंत्रा राज्य स्थापन केले. त्याचवरोवर शिवछत्रापतींनी स्थापन केलेल्या राज्याचे विभाजन होऊन दोन स्वतंत्रा भाग पडले. पन्हाळयाला स्थापन झालेली स्वतंत्रा राजवट पुढे कोल्हापूरची गादी म्हणुन प्रसिदध झाली. तारावाईचा कालखंड प्रदिर्घ म्हणजे १७00 ते १७६१ या कालखंडातच कोल्हापूर संस्थान हे मुख्य ठिकाण वनले आणि कोल्हापूर हे संस्थान उदयास आले. शिवछत्रापती संभाजी राजाराम महाराज आणि तारावाई यांच्या प्रदिर्घ प्रयत्नानंतर कोल्हापूर संस्थानाला महत्व लाभले. यानंतर अनेक मराठी सत्ताधिशांनी कोल्हापूर संस्थानावर राज्य केले. मात्रा १९ व्या शतकात म्हणजे आधुनिक कालखंडात कोल्हापूरची प्रचंड प्रगती झाली. त्याचे एकमेव कांतीकारक राजे म्हणजे राजर्षी शाहू महाराज होय.

शोधनिवंधाचा उददेश ः

राजर्षी शाहू महाराज यांच्या कालखंडातील त्यांनी शैक्षणिक क्षेत्राात जो वदल घडवुन आणला. आणि त्यांच्याअथक प्रयत्नातून शैक्षणिक क्षेत्राची जी प्रगती झाली याचा आढावा घेणे हाच माझ्या शोधनिवंधाचा उददेश आहे.

संदर्भ साधने ः

महाराष्ट्र राज्य गॅझेटियर कोल्हापूर जिल्हा राजर्षी शाहू स्मारक ग्रंथ व इतर पुस्तके राजर्षी शाहू डॉ. आंवेडकर आणि कोल्हापूरची दलित चळवळव इतर पुस्तके शिक्षण महर्षी राजर्षी शाहू महाराज़ शाहूंच्या आठवणी व विविध पुस्तके राजर्षी छत्रापती शाहू महाराज कार्य व प्रभाव़ महाराष्ट्रातील समाज सुधारणेचा इतिहास व इतर विविध पुस्तके राजर्षी शाहू महाराज व इतर पुस्तके लोकराजा शाहू छत्रापती व इतर पुस्तके इ.

कोल्हापूरचा थोडक्यात इतिहास ः

शिवाजी महाराजांचा उदय हि महाराष्ट्रातील अभूतपुर्व घटना होय. त्यामुळे एका नविन युगाचा प्रारंभ झाला. विध्यमान कोल्हापूर जिल्हा भूतपुर्व संस्थानाचे मुंवई राज्यात विलिनीकरन झाल्यानंतर १९४९ मध्ये अस्त्विात आला, विलिनीकरनपूर्व कोल्हापूरच्या प्रशासनिक इतिहासाचे कालानुकमे चार कालखंड पाडता येतात. हे कालखंड म्हणजे हिदुंराज्यकर्त्याचा काळ, मुसलमान राज्यकर्त्याचा काळ, मराठा काळ, (१८४४) पर्यत आणि १८४४ मध्ये दाजी कृष्ण पंडित या कारभा–याची ब्रिटीशांनी नेमनूक केल्यापासून तो कोल्हापूर संस्–हान विलीनीकरण होईपर्यतचा काळ होय[१]. कोल्हापूर संस्थानाची स्थापना तारावाईंनी १७ व्या शतकात जरी केली असली तरी १९ वे शतक हे मोठे वैशिष्टयपूर्ण ठरले आहे. याच सुमारास इंग्रजांनी आपल्या आमलाखालील प्रदेशात पाश्चात्य शिक्षणाचा पाया घातला[२]. कोल्हापूर शिवाय दक्षिणेत अनेक संस्हाने होती त्यामध्ये भोर, औंध, सांगली, कुरूंदवाड, मुधोळ, जामखंडी इ. प्रमुख होती. इंग्रजांच्या सत्तेखाली भारताचे दोन विभाजन झाले. पहिला प्रत्यक्ष इंग्रजांच्या आमलाखाली असणारा भाग म्हणजे खालसा मुलूख; दुसरा संस्थानिकांच्या ताव्यात असणारा भाग म्हणजे संस्थानी मुलूख होय[३]. पाश्चिमात्य शिक्षण, वैज्ञानिक प्रगती आणि आधुनिक दृष्टिकोन यामुळे पूर्वीच्या रूढी व धार्मिक प्रथांमध्ये दिवसेंदिवस पुष्कळ परिवर्तन घडून येत आहे[४].

राजाराम महाराजांच्या थोरल्या राणी तारावाई यांनी सावर्डेकर घराण्यातून नारायण सावर्डेकर भोसले यांना दत्तक म्हणून घेतले. हे चौथे शिवाजी महाराज (१८७१ ते १८८३) कोल्हापूरच्या गादीवर आले. यावेळी संस्थानची लोकसंख्या ८ लक्ष २६६९१ होती. कोल्हापूरात ६ तालुके

आणि ४ जहागि–या होत्या . कालांतराने चौथ्या शिवाजी महाराजांच्या मृत्यूनंतर कोल्हापूरच्या गादीला वारसा लाभला नाही[५] .

राजर्षी शाहू महाराज : पूर्वायूष्य :

एकेकाळी दिल्ली जिंकून अटकेपार आपली सत्ता नेणा–या मराठयांची सत्ता पेशवाईच्या अस्तानंतार संपुष्टात आली[६] . पराकम आणि मुत्सदेगिरीच्या जोरावर जी राजपूत घराणी दक्षिणेकडे आली . त्यामध्ये कागलकर घाटगे हे घराणे अग्रेसर मानले जाते . या घराण्यातील जयसिंगरावर् राधाराणी या दांपत्याला २६ जुलै १८७४ रोजी पुत्रारत्न प्राप्त झाले . समतेचे ममतेचे जनी जनार्दन पाहण्याचे एक स्वप्न सत्य ठरले . "पुत्रा व्हावा ऐसा गुंड़ा ज्याच्या तिन्ही लोकी झेंडा" असाच पुत्रा त्यांना झाला . त्याचे नाव ठेवले यशवंत आपल्या जिवनाच्या विविध क्षेत्राांमध्ये ज्याने नेत्रादिपक यश मिळवले तो यशवंत... ॅॐ ते छत्रापती घराण्यात दत्तक झाले . त्यांचे दत्तक विधान १७ मार्च १८८४ रोजी झाले . तेव्हापासुन त्यांना शाहू हे नाव प्राप्त झाले . १८८४ रोजी कोल्हापूर संस्थानच्या गादीवर आरूढ झाले . शाहूपूर्वी म्हणजे जवळ जवळ ४0 ते ५0 वर्षापर्यत कोल्हापूर संस्थानाला कोणी स्थिर आणि समर्थ राजा लाभला नाही . रियासतकाराने या गोष्टीचे वर्णन करताना असे म्हटले की "The brightest morning of karvir state of modern period"[८] . माता पित्याच्या अकाली निधनामुळे शाहू महाराज खचुन न जाता खंबीरपणे उभे राहिले[९] . त्यांनी त्यांच्या शैक्षणिक प्रगतीचा अपेक्षित टप्पा गाठला . त्यांचे इंग्रजीचे शिक्षक 'फ्रेझर' यांच्या मार्गदर्शनाखाली निगडीत असलेल्या विषयांमध्ये चांगलीच प्रगती केली[१०] . यापुढे त्यांनी आपले आयुष्य हे शैक्षणिक आणि सामाजिक कार्यासाठी समर्पित केले .

राजर्षी शाहू महाराजांचे शैक्षणिक कार्य ः

राजर्षी शाहू छत्रापतींची इ . स . १८९४ ते १९२२ पर्यंतची अवघी अठ्ठावीस वर्षांची कारकिर्द केवळ कोल्हापूर संस्थानाच्याच नव्हे तर सार्या महाराष्ट्राच्या इतिहासाला कलाटणी देणारी ठरली . छत्रापती राजर्षी शाहू महाराजांनी शिक्षण क्षेत्राात आमूलाग्र सुधारणा घडवून आणण्यास तातडीने सुरवात केली . आणि शिक्षण क्षेत्राातील सुधारणांना खास अग्रक्रम व विशेष प्राधान्य दिले . कारण जनतेच्या सर्वांगीण प्रगतीचा शिक्षण हा पाया आहे[११] . त्यामूळे त्यांनी वसतिगृहांची स्थापना केली प्राथमिक शिक्षण सक्तिचे केले आणि स्त्रिा शिक्षणात त्यांनी चांगलीच प्रगती घडवून आणली .

विदयार्थी वसतिगृहाची स्थापना ः

शाहू महाराजांच्या राज्य रोहनाच्या वेळी १८९४ साली संस्थानात अस्पृश्यांसाठी फक्त ५ शाळा होत्या व त्यामधील विदयार्थ्यांची संख्या १६८ इतकी होती . १९0७ – १९0८ साली अस्पृश्य शाळाची संख्या १६ इतकी झाली . चार वर्षात म्हणजे १९१२ साली अस्पृश्य शाळांची संख्या २७ इतकी झाली . त्यामधील विदयार्थ्यांची संख्या ६३६ इतकी झाली . शाहू महाराजांच्या अथक प्रयत्नांनी शाळांच्या संख्येत उत्तरोत्तर वाढ झाली . चौथी पास झाल्यावर पाचवी मध्ये म्हणजे हायस्कुलच्या वर्गात प्रवेश मिळविण्यासाठी आवश्यक पात्राता विदयार्थ्यांच्या ठिकाणी होत नसे . त्यामुळे अस्पृश्य विदयार्थ्यांची हायस्कुल मध्ये जात नसे या अडथळयावर मात करण्यासाठी चौथी पासझालेल्या अस्पृश्य विदयार्थ्यांचे खास पात्राता वर्ग सुरू केले[१२] .

गरिबी व काही वेळा त्यांची जात या गोष्टींमुळे अडचणी निर्माण होतात . हे त्यांच्या लक्षात आले . शहरात त्यांच्या राहण्याची व जेवण्याची सोय होत नसे . ही समस्या दूर करण्यासाठी कोल्हापूरात विदयार्थी वसतिगृहांची निर्मिती करण्याचे धोरण त्यांनी आखले . सन १८९६ मध्ये कोल्हापूरात सर्व जाति – जमातींच्या विदयार्थ्यासाठी त्यांनी एक वसतिगृह सुरू केले[१३] . विदयार्थ्यांच्या राहण्याची व जेवण्याची मोफत सोय केली . जार्तीजमातींच्या विदयार्थ्यांसाठी स्वतंत्रा वसतिगृह स्थापन करण्याचा निर्णय घेतला . थोडयाच काळात व्हिक्टोरीया मराठा बोर्डीग, दिगंबर जैन बोर्डीग, वीरशैव लिंगायत विदयार्थी वसतिगृह, मुस्लिम बोर्डीग, श्री . नामदेव बोर्डीग, पांचाल ब्राम्हण वसतिगृह, इंडियन ख्रिश्चन हॉस्टेल, वैश्य बोर्डीग, ढोर चांभार बोर्डीग, सुतार बोर्डीग, नाभिक विदयार्थी वसतिगृह, रावबहाददूर सबनीस प्रभु बोर्डीग इत्यादी . निरनिराळया जातीची सुमारे वीस वसतिगृहे निर्माण झाली . या वसतिगृहातून विदयार्थ्यांची राहण्याची व भोजणाची व्यवस्था केली[१४] .

प्राथमिक शिक्षण सक्तीचे केले ः

शाहू महाराजांनी शिक्षक वर्गाचा प्रथम विचार करून शिक्षकांचा गाव कामगारात समावेश करूण वतनाने भाडेमुक्त जमिन देण्याचे निश्चित केले . शिक्षकांची पगारावरती नेमणूक केली[१५] . प्राथमिक शिक्षणावरोबरच माध्यमिक व उच्च शिक्षणाकडेही त्यांनी विशेष लक्ष दिले . पुढाकार घेतलेल्या मंडळींना त्यांनी इतर काही गोष्टीतुन मिळालेले पैसे शाळेसाठी वापरण्यासाठी सांगितले . २५ जुलै १९१७ रोजी हुकूम काढला . आणि प्राथमिक शिक्षण मोफत ठेवण्यात आले . कोल्हापूर संस्थानात प्राथमिक शिक्षण सक्तीचे केले . त्यामुळे आपल्या मुलांना शाळेत पाठवण्यासाठी पालकांना प्रोत्साहन मिळाले[१६] .

स्त्रीशिक्षण ः

वहुजन समाजाप्रमाणे स्त्रीजीवणाच्या मागासलेपणाची शाहू महाराजांना जाणिव होती . राजाराम विदयालयात शिक्षण घेणा–या स्त्रियांना फि माफीची सवलत महाराजांनी जाहिर केली . आपल्या सूनबाई इंदूमती राणीसाहेव यांना वैधव्य प्राप्त झाल्यानंतर त्यांना शिक्षण देऊन कोल्हापूर संस्थानाचे शिक्षण खाते त्यांच्याकडे सोपविण्याचा महाराजांचा विचार होता[१७] . तथापि राणीसाहेवांच्या मृत्यूमुळे तो पूर्ण झाला नाही . मात्रा संस्थानाच्या शिक्षणाधिकारी म्हणून मिस लिटल यांच्या नंतर त्यांनी श्रीमंत रखमाबाई केळकर यांची नेमणूक केली . यावरून महाराजांचा स्त्रीशिक्षण विषयक दृष्टिकोन स्पष्ट होतो . स्त्रीशिक्षणामुळे कुटूंवाला समाजात आदराचे व मानाचे स्थान मिळणे शक्य होते[१८] . म्हणून स्त्री शिक्षणासाठी शाहू महाराजांचे कार्य अतिशय मोलाचे ठरले आहे . शाहू महाराजांनी आणखी एका वेगळया प्रकारच्या शिक्षणाला हात घातला[१९] . तो म्हणजे धार्मिक क्षेत्रातील ब्राम्हणांची मिरासदारी मोडून काढण्यासाठी मराठयांचे धार्मिक विधी मराठयांमार्फतच करवून घेण्यासाठी त्यांना धार्मिक विधीचे शास्त्राशुध्द शिक्षण देण्यासाठी सत्यशोधक शाळा सुरू केली[२०] .

समारोप ः

प्राचिन काळापासून ते १९ वे शतकापर्यंत राजर्षी शाहू महाराजांच्या सारखा राजा हा करवीर नगरीला लाभला नाही . या राजाचा जन्म होण्यास १९ वे शतक उजडावे लागले . या राजाने सर्व लोकांना समानतेने जगवले . 'शिक्षणाशिवाय तरणोपाय नाही' हे त्यांनी त्यांच्या किशोर वयातच जाणले . म्हणूनच त्यांनी प्रथम शैक्षणिक प्रगती घडवून आणली . आणि म्हणून आज शिक्षणावर बंदी घालणारी प्रथा मोडली गेली आहे . त्यांनी शिक्षणावर भर देऊन आणि अनेक कलांना आश्रय दिल्यामुळेच आज त्यांच्या प्रेरणेने कोल्हापूर संस्थानात शाळा व महाविदयालय उभी आहेत . शाहू महाराजांनी शैक्षणिक कार्यात दिलेले योगदान अतिशय महत्वाचे ठरले आहे .

संदर्भ सुची ः

१ . चौधरी कि . का संपादक महाराष्ट्र राज्य गॅझेटियर कोल्हापूर जिल्हा प्रकाशन संपादक मंडळ दर्शनिका विभाग महाराष्ट्र शासन मुंबई मराठी आवृत्ती ह्यसुधारितह १९८९ . पृ . १

२ . जयसिंगराव पवार डॉ . संपादक राजर्षी शाहू स्मारक ग्रंथ प्रकाशन महाराष्ट्र इतिहास प्रवोधिनी कोल्हापूर प्रथम आवृत्ती २००१ . पृ . ३

३ . किल्ता – ६ .

४ . चौधरी कि . का संपादक महाराष्ट्र राज्य गॅझेटियर कोल्हापूर जिल्हा प्रकाशन संपादक मंडळ दर्शनिका विभाग महाराष्ट्र शासन मुंबई मराठी आवृत्ती (सुधारित) १९८९ . पृ . १३४

५ . सुधीर पोवार संपादक राजर्षी शाहू डॉ . आंवेडकर आणि कोल्हापूरची दलित चळवळ प्रकाशन दलित मित्रा जी . एम . पंडत मुद्रक गणेश प्रिंटस कोल्हापूर प्रकाशन २००२ . पृ . ८

६ . जयसिंगराव पवार डॉ . संपादक राजर्षी शाहू स्मारक ग्रंथ प्रकाशन महाराष्ट्र इतिहास प्रवोधिनी कोल्हापूर प्रथम आवृत्ती २००१ . पृ . ५

७ . भगत रा . तु . प्राचार्य संपादक शिक्षण महर्षी राजर्षी शाहू महाराज सिदधराज प्रकाशन कात्राज पूणे प्रथमावृत्ती 0१ जानेवारी १९९९ . पृ . १४

८ . किर्त्ता २१

९ . नानासाहेव साळुंखे प्रा . संपादक शाहुंच्या आठवणी वृषाली प्रकाशन कोल्हापूर आवृत्ती २६ सप्टेंवर २0१४ . पृ . १६

१0 . किल्ता– १७

११ . विलास संगवे डॉ . संपादक राजर्षी छत्रापती शाहू महाराज कार्य व प्रभाव प्रकाशक अर्जुन देसाई एक्सप्रेस पब्लिशिंग हाऊस कोल्हापूर प्रकाशन पुनर्मुद्रन १४ एप्रिल २००७ . पृ . २९

१२ . जयसिंगराव पवार डॉ . संपादक राजर्षी शाहू स्मारक ग्रंथ प्रकाशन महाराष्ट्र इतिहास प्रवोधिनी कोल्हापूर प्रथम आवृत्ती २००१ . पृ . ७६

१३ . भिड़ पाटिल थोरात संपादक महाराष्ट्रातील समाज सुधारणेचा इतिहास प्रकाशक सौ . भाग्यश्री मोरेश्वर फडके हेमंत मुद्रण दुसरी आवृत्ती २0१२ . पृ . १0३

१४ . किर्त्ता १0४

१५ . ज्ञानेश्वर तांदळे डॉ . संपादक राजर्षी शाहू महाराज प्रकाशन साधना सेवा प्रकाशन पूणे प्रथमआवृत्ती २0१४ . पृ . ११

१६ . किल्ता – १२

65. मराठे पोर्तुगीज संबंध

पाटील मारूती नागोजी
संशोधक विदयार्थी, इतिहास अधिविभाग
शिवाजी विदयापीठ, कोल्हापूर .

प्रस्तावना ः

पोर्तुगीजांचे गोवा हे प्रमुख ठाणे होते . येथे त्यांचे नाविक सामर्थ्य जास्त होते . त्यांचा कोरोमंडल म्हणजेच ज्यास पूर्वी कर्नाटक म्हटले जात असे या प्रदेशावरील राजांशी सलोख्याचे संबंध होते . मात्र मराठयांशी शत्रूत्वाचे संबंध होते . मराठे हे लुटारू दरोडेखोर आहेत अशी त्यांची भावना होती या दृष्टीकोनातून त्यांनी मराठयांचा पराभव करण्यासाठी सिध्दी मोघल यांची मदत घेतली होती . मात्र वस्तूतः त्यांचा कोणत्याही सत्तेवर विश्वास नव्हता त्यांची भूमिका दुटप्पीपणाची होती . त्यांची मराठयांविषयी धोरण १८व्या शतकात बदलले असले तरी त्यामध्ये त्यांनी मैत्रीचा स्वीकार केला नाही . काही कालावधीपुरते स्वीकारलेले त्यांचे ते धोरण होते . कोरोमंडल किना–यावरील प्रदेशास पूर्वी कर्नाटक म्हणून ज्याचा आजच्या कर्नाटक राज्याशी काहीही संबंध नाही . कर्नाटकच्या राजांशी पोर्तुगीजांचे सलोख्याचे संबंध होते . यांचा उपयोग मराठयांच्याविरोध कारवाया करण्यासाठी ते करून घेत . मात्र स्थानिक सत्ता असल्यामुळे जेव्हा कोरोमंडलच्या राजाने मैत्रीचा तह करण्यासाठी आपला प्रतिनिधी मराठयांकडे पाठवला तेव्हा पोर्तुगीजांनी त्यास पकडून राजाकडे पाठवून धमकीवजा समज दिली पुढील पत्रांवरून त्याची अधिक माहिती घेता येईल .

पत्र क्र . २ दिनांक १0 एप्रिल १६९९ गोवा

A Letter from the viceroy Sr. Antonio Luis Goncalves da Camara Coutnno probably to chana Basayya the general of Karnataka in which he reassures him that he will help him in defeating the Arabs who back the Marathas. He also expresses his inability to drive out the Marathas from the island in question on account of the approaching mansoon. But assures him that he will plan the expedition to liberate it in September Next.

यावेळी होनावरचे बेट मराठयांनी ताब्यात घेतले होते व अरबांनीही कोरोमंडलच्या किनायावर आक्रमण केले होते ते परतवून लावण्यासाठी पोर्तुगीज कोरोमंडलचा राज चन्ना वसच्या यांच्या मदतीसाठी सदैव तत्पर असून विश्वासघातकी व मित्रत्वाचा बुरखा पांघरणाया मराठयांशी सख्य ठेवण्याची आपणास काय आवश्यकता आहे . आम्ही सदैव आपल्याशी मैत्रीपूर्ण संबंध ठेवून जे शत्रू आपणांस त्रास देतील त्यांचे पारिपत्य घडवून आणण्यास सर्व सामर्थ्य पणास लावीन . सध्या पावसाळा तोंडावर आल्याने मराठयांविरोधात जरी मोहिम आखली तरी ती यशस्वी होण्यामध्ये साशंकता आहे त्यामुळे हे चार महिने शस्त्रे व दारूगोळा यांच्या तयारीत घालवून लुटारू मराठयांविरोधात मोहिम येत्या सप्टेंबरमध्ये हाती घेण्यात येणार आहे . व सध्या जरी तुम्हांस एखादया बेटास संरक्षण हवे असेल तर सैन्य पाठवून देण्यास मी तत्पर आहे . अशा प्रकारची भूमिका व्हाईसरॉयनी घेतलेली असून मराठयांविषयी त्यांचा व्देष दिसून येतो . जेव्हा पोर्तुगीजांनी मराठयांविरूध्द काहीच केले नाही म्हणून चन्ना वसच्या यांनी तहाची बोलणी करावयास आपला प्रतिनिधी पाठवला तेव्हा पोर्तुगीज प्रतिनिधींनी त्यास अडवून परत कोरोमंडलला निरोप देऊन पाठवले ते पत्र असे की

पत्र क्र . १६ दि . १८ मे १६९९ गोवा

A letter from viceroy Antonio Luis Goncalves da camara cout in to Chana Bassayya the General of Karnataka expressing his displeasure at the reported move for peace by the king of karnatated with Rajaram and certain incidents which effect his mean-mindedness. He seeks the classification from him in these matters with a threat that if the king of Karnataka veered away from the attitude of friendship with the Portuguese. He will rush the coustal fleet there to seek the reason for it.

यावेळी कर्नाटकच्या राजाच्या अधिपत्याखालील होन्नावरचे बेट मराठयांनी ताब्यात घेतले असता पोर्तुगीजांनी पावसाळा असल्याचा वनाव करून त्यांच्याविरूध्दची कारवाई पुढे ढकलली तेव्हा कर्नाटकच्या राजाने राजाराम महाराजांशी बोलणी करण्यासाठी पाठवलेल्या वकीलास पोर्तुगीज अधिकायांनी पकडून त्यांच्याशी तह नामा न करण्यावद्दल त्या वकीलास परत पाठवून धमकीवजा पत्र दिले त्यामध्ये असे सांगण्यात आलेले होते की, मराठयांशी तह केला तर कर्नाटकामधील साया बंदरांना वेढा देण्यासाठी पुरून उरतील इतकी जहाजे व सैन्य माझे स्वामी व पोर्तुगीजचे महनीय राजे यांच्यापाशी आहेत . जर तुम्ही त्याच्या इच्छेविरूध्द मराठयांशी तह केला तर नुकसानीस तुम्हीच जवाबदार राहाल .

पत्र क्र . १६ दि . १८ मे १६९९

Viceroy Antonio Luis Gonealves da Camara Coutinho writes to King of Karnataka pointing out to him that his personal assurance that he would send the fleet in September has been dishonoured by the letter realizing that the Maratha will not be able to cause any harm during mansoon. He complains that his governor has misused this assurance to such an extent that he has gone on record saying that he would destroy the churches Besides said Governor is coming in the way of collection of customs duty and the tributes he reminds the king that to keep friendly relations with the arabs is the nodation of trust reposed in him by the Portuguese state.

होनावरच्या वेटासंबंधी पोर्तुगीजांची भूमिका न पटल्याने कर्नाटकच्या राज्यपालांनी जेव्हा ख्रिश्चन लोकांना त्यांनी चर्च पाडून टाकण्याविषयी व पोर्तुगीजांना दिली जाणारी खंडणी व कस्टम कर न देण्याबावत धोरण स्वीकारले तेव्हा पोर्तुगीज गव्हर्नरने कर्नाटक राजास स्पष्टपणे समजावले की हे सरकार इतके सामर्थ्यवान आहे की, सदर खंडणी व कस्टम कर यापासून मिळणाया क्षुल्लक उत्पन्नावर ते मुळीच अवलंबून नाहीत. मात्र तेथून ज्या वस्तू तांदूळ खरेदी करण्यासाठी तुमच्या राज्यात जास्त असतात त्याचा फायदा तुम्हालाच जास्त होतो. तसेच ख्रिश्चन जनतेबावत केलेल्या गैरवर्तनाबावत व खंडणी कस्टमकर न दिल्याबावत योग्य तो खुलासा केला नाही तर सरकारकडून होणाया कृतीस सामोरे जावे. अशा आशयाचे हे पत्र असून पोर्तुगीजांनी कर्नाटकच्या राज्यावर आपली जरब वसवून मराठयांशी शत्रूत्व ठेवलेले होते. त्यांनी मराठयांची जहाजे वुडविण्याविषयी काढलेला जाहिरनामा पुढील पत्रावरून सांगता येईल.

पत्र क्र. ६ दि. २२ जानेवारी १७00

An order from viceroy Antonio Luis Goncalves da Camara Coutinho to the Captain General of Southern coastal command Sr. fernao soche pereica to treat warships or merchantships and try his best to seize or sink them.

वरील पत्रामध्ये उत्तर किनायावरील आरमार प्रमुख कॅप्टन सिन्योर फेर्नाव सोशि पैरेरा यांना हा हुकुमनामा देण्यात आला होता. त्यानुसार मराठयांची लढाऊ अगर व्यापारी जहाजे आढळली तर त्यांना शत्रूवत मानून ती पकडण्यासाठी अथवा वुडवून टाकण्यासाठी प्रयत्नांची शिकस्त करावी हा हुकुमनामा गोव्यात सिन्योर सेराफिन द कोश्त यांनी दि. २२ जानेवारी १७00 रोजी तयार करून सचिव सिन्योर आंतोनिकाम कोयेल्यु गैरेन्स यांजकडून लिहून घेण्यात आलेला होता. वरील पत्रावरून याकाळातील पोर्तुगीजांचे मराठयांविषयीचे धोरण स्पष्ट होते तर मराठयांनीही पोर्तुगीजांवर कधीच विश्वास ठेवला नव्हता. शिवाजी महाराजांनी किल्ले बांधून त्याठिकाणी सैन्य तैनात करून यांच्यावर नेहमी असणारा पारगड हा किल्ला गोव्याच्या पोर्तुगीजांवर लक्ष ठेवण्यासाठी बांधण्यात आलेला होता.

पारगड किल्ला :

गोवा आणि कोकणच्या सीमेवर असणारा सर्वात उंच हा किल्ला आहे. समुद्रसपाटीपासून त्याची उंची ७४७ मीटर आहे. राज्यातील महावळेश्वरनंतरचे सर्वात उंच ठिकाण हे आहे. शिवाजी महाराजांनी बांधलेल्या अनेक किल्ल्यांपैकी हा एक किल्ला आहे. त्यांनी गोव्याच्या स्वारीवरून परत येताना सोवत असणाया पाचशे शिलेदारांना तिथेच राहून स्वराज्याची सेवा करण्याचे आदेश दिले. या किल्ल्यावर तानाजी मालुसरे व शेलार मामा यांचे वंशज आजही वास्तव्यास आहेत. गोव्याच्या पोर्तुगीजांवर लक्ष ठेवण्यासाठी या किल्ल्याचा उपयोग करण्यात आलेला होता. या गडावरून सहजपणे गोव्याचे संपूर्ण दर्शन होते. त्यामुळे गोव्याच्या पोर्तुगीजांवर आपला दवदवा ठेवण्यासाठी त्यांच्या हालचालीवर नियंत्रण ठेवण्यासाठी शिवाजी महाराजांनी हा किल्ला वांधविला व त्याचा उपयोग पोर्तुगीजांवर लक्ष ठेवण्यासाठी करून घेतला.

निष्कर्ष :

१. पोर्तुगीजांचे धोरण सुरवातीपासून दुटप्पीपणाचे होते. एकीकडे ते कर्नाटक राज्यांशी मैत्री असल्याचे दाखवून त्यांच्यावर जरब वसविण्याचा प्रयत्न करीत.

२. मराठयांना प्रमुख शत्रू समजून मराठयांशी कर्नाटक राजाने तह करू पाहिल्यानंतर त्यांनी कर्नाटक राजास धमकीवजा पत्र पाठवले.

३. मराठयांशी तह किंवा मैत्री केल्यास कर्नाटकच्या साया वंदरास वेढा घालून उरतील इतक्या सैन्याची धमकी देऊन मराठयांशी वोलणी करावयास निघालेल्या वकीलास परत पाठवले.

४. मराठयांना शह देण्यासाठी त्यांची लढाऊ अगर व्यापारी जहाजे दिसली तर ती वुडवावी नाहीतर पकडून ठेवावी यासाठी सैन्यवळाचा वापर सर्व शक्तीने करावा असा हुकुम व्हॉईसरॉयनी दिलेला होता.

५. पोर्तुगीजांवर नजर ठेवण्यासाठी शिवाजी महाराजांनी पारगड किल्ल्याची निवड केली त्याठिकाणी पाचशे शिलेदार ठेऊन त्यांना पोर्तुगीजांवर लक्ष ठेवण्यास सांगितले.

६. आजही या गडावर शेलार मामा व तानाजी मालुसरे यांचे वंशज राहतात.

७. हा गड राज्यातील सर्वात उंच ठिकाणांपैकी दोन नंवरचे ठिकाण आहे.

८. आजही या गडावरून गोवा राज्य संपूर्ण दिसते.

संदर्भ साधने :

१. कोल्हापूर पोर्तुगीज संवंध गोवा पुरा अभिलेख संग्रहालयातून निवडलेले कागद (स. पा.) डॉ. प्र. पा. शिरोडकर प्रथमावृत्ती १९७९ राजहंस प्रिंटींग प्रेस नागाळा कोल्हापूर पत्र क्र. २ दिनांक १0 एप्रिल १६९९

२. पत्र क्र. १५ दि. १८ मे १६९९ ३. पत्र क्र. १६ दि. १८ मे १६९९

४. पत्र क्र. ६ दि. २२ जानेवारी १७00 दैनिक सकाळ दि. ३0 नोव्हेंवर २00५ ऐतिहासिक व धार्मिक स्थळे गडहिंग्लज कार्यालय वर्धापनदिन विशेषांक पृ. क्र. ३0.

66. श्री गणपती पंचायतन संस्थान मंदिर, सांगली : निर्मिती आणि विकास

सौ. पुष्पांजली चंद्रशेखर कोळेकर
पीएच. डी. विद्यार्थीनी, इतिहास विभाग,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

प्राचीन काळात मंदिरे विश्वाची प्रतिकृती आहे ही भावना मंदिराच्या निर्मितीस कारणीभूत ठरली. पुढे विश्वाविषयीच्या कल्पना मंदिराच्या वास्तूत आणि मूर्तीकामात दिसून लागल्यावर ही मंदिरे तत्वचिंतनाची, उपासनेची व अध्ययनाची केंद्रे बनली. कालांतराने मंदिरे केवळ धार्मिक वास्तूच न राहता ती त्या, त्या ठिकाणच्या सामाजिक व सांस्कृतिक जीवनाची प्रमुख ठिकाणे झाली. पुढील काळात नृत्य, गायन, वादन, शिल्पकला, चित्रकला व धातूकाम इत्यादी कलांना मंदिरांमुळेच उत्तेजन प्राप्त झाले. त्यामुळे विविध जाती–धर्माची व पंथाची उपासना केंद्रे म्हणून अनेक देवदेवतांच्या मंदिरांची निर्मिती झाली. महाराष्ट्रामध्ये पेशवे काळात गणपती पूजनाला महत्त्व प्राप्त झाले त्या काळात अनेक ठिकाणी गणपती मंदिरांची बांधकामे झालेली दिसतात. पेशव्यांचे सरदार पटवर्धन यांचे आराध्य दैवत गणपतीच असल्यामुळे काही पटवर्धन सरदारांनी त्यांच्या जहागिरीच्या ठिकाणी गणपती मंदिरांची स्थापना केली होती. प्रस्तुत शोधनिबंधामध्ये दक्षिण महाराष्ट्रातील सांगली शहरामध्ये श्रीमंत चिंतामणराव आप्पासाहेब पटवर्धन (पहिले) (१७८३–१८५१) यांनी स्थापना केलेल्या श्री गणपती पंचायतन संस्थान मंदिराच्या निर्मितीची ऐतिहासिक पार्श्वभूमी, संस्थान काळातील (१८०७–१९४८) मंदिराचा विकास व संस्थानाच्या विलिनिकरणानंतरचा (८ मार्च १९४८) मंदिराचा विकास व विस्तार यांचा आढावा घेतला आहे.

मंदिर बांधकामाचा पहिला टप्पा : (१८११–४४)

श्रीमंत चिंतामणराव आप्पासाहेब पटवर्धन (पहिले) (१७८३–१८५१) यांनी गणेशभक्तीच्या पूर्वपरंपरेचे जतन करीत आराध्य दैवत गणपतीचे मंदिर सांगली संस्थानात बांधण्याचा निश्चय केला होता. मंदिर बांधण्याचा त्यांचा हेतू त्यांनी मिरज संस्थानाचे अधिपती तात्यासाहेब मिरजकरांना[१] कळवून मिरजेच्या माधवजीच्या देवालयाचा नकाशा काढण्यासाठी एक गवंडी मिरजेस पाठवून दिला होता. या गवंड्यास नकाशा तयार करण्याची परवानगी द्यावी अशा आशयाचे एक पत्र त्यांनी तात्यासाहेब मिरजकरांना पाठविले होते.[२] प्रत्यक्ष मंदिराच्या बांधकामास सुरूवात करण्यापूर्वी मिरजेच्या माधवजीच्या देवालयाच्या नकाशाचा अभ्यास करून श्री गणपती पंचायतन मंदिर बांधकामाचा आराखडा तयार केला असावा. कारण मंदिर बांधकामाच्या सन १८१४–१५ सालाच्या खर्चाच्या कागदपत्रांमध्ये गणपती पंचायतन मंदिराचा नकाशा तयार करण्यासाठी एक गवंडी व त्याच्या हाताखाली काम करणाऱ्या मजुरांचा मजुरी खर्च १५ रू ८ आणे पहावयास मिळतो तर नकाशा तयार करण्यासाठी लागणाऱ्या वस्तूंचा खर्च १४ आणे सूतळी, १ आणा काव व ६ रू १२ आणे खादीचे कापड असा दिला आहे.[३] यावरून असे दिसते की, या वस्तूंचा वापर करून कपड्यावर तसेच प्रत्यक्ष जागयावर आखणी करून बांधकामास प्रारंभ केला असावा. बांधकामासाठी आप्पासाहेबांनी सर्व ठिकाणच्या जागेची पाहणी करून शेवटी स्वानंद भवनच्या माळावरील[४] विस्तृत जागा निश्चित करून बांधकामाची सुरूवात करण्यात आली. परंतु अल्प बांधकामानंतर पाण्याची कमतरता जाणवू लागल्याने त्या ठिकाणी मंदिराची वास्तू पूर्ण होऊ शकली नाही. या वास्तूचे अर्धवट अवशेष आजही त्या परिसरात पहावयास मिळतात.[५]

स्वानंद भवनच्या माळावरील मंदिराचे बांधकाम अर्धवट राहिल्याने चिंतामणराव आप्पासाहेबांनी कृष्णा नदीकाठच्या रम्य परिसराची निवड बांधकामासाठी केली.[६] परंतु तेथील जमिनीचा भाग वीस ते तीस फूट खोलगट होता. तसेच या संपूर्ण भागात गाळ पसरला होता. त्यामुळे हा भाग भर टाकून उंच करण्यासाठी वाळू व चुन्याचा वापर केला होता.[७] या पाठीमागे चिंतामणराव आप्पासाहेबांचा हेतू असा दिसून येतो की, भविष्यात कधीही कृष्णा नदीला पूर आल्यास पूराचे पाणी मंदिराच्या आवारापर्यंत येऊ नये याची प्रचीती सन २००४–०५ साली कृष्णा नदीला जो महापूर आला त्यावेळेस आली. या दोन वर्षात कृष्णा नदीच्या पाण्याची पातळी ५२ फूटापर्यंत होती. या महापूराने अर्धी सांगली पाण्याखाली गेली होती. परंतु गणपती पंचायतन मंदिराच्या आवारात मात्र पूराचे पाणी पोहोचले नव्हते. आज या मंदिराचे हे एक महत्वाचे वैशिष्ट्य मानले जाते व चिंतामणराव पटवर्धनांच्या भविष्यातील दूरदृष्टीचे दर्शन यामध्ये घडून येते.[८] घाणीत चुनातयार करण्यासाठी कृष्णा पवार, म्हादू बेकेट्या, अमृता सिंघ व बापू यादव चे चार मजूर कार्यरत होते.[९] मंदिराच्या मजबूत बांधकामासाठी चिंतामणराव आप्पासाहेबांना काळ्या कठीण पाषाणाची आवश्यकता भासत होती. त्यामुळे असा पाषाण मिळविण्यासाठी बराच शोध घेण्यात आला. अनेक पाषाणांचे नमुने पाहण्यात आले. सरतेशेवटी जोतिबाच्या डोंगरातील काळा कठीण पाषाण आप्पासाहेबांनी पसंत केला.[10] सन १८१४ साली जोतिबाच्या डोंगराचा संपूर्ण परिसर दाट झाडांनी वेढला होता आणि वाहतुकीची साधनेही त्या काळात उपलब्ध नव्हती. त्यामुळे हा पाषाण वडारी गाड्यांमधून सांगलीपर्यंत आणण्यासाठी आप्पाजी व भिकाजी वडर या दोन इसमांची नेमणूक केली होती. त्यासाठी त्यांना १००४ रू. इतकी मजुरी दिल्याचे उल्लेख सन १८१४ सालाच्या पंचायतनच्या खर्चाच्या कागदपत्रांमध्ये पहावयास मिळतात.[११] श्री पंचायतन देवतांच्या मुर्त्या तयार करण्यासाठी व इतर कामासाठी लागणारा संगमरवरी पाषाण महाबळेश्वर येथून आणले होते. या पाषाणापासून पंचायतन देवतांपैकी सूर्यनारायण देवाचा रथ तयार करण्यासाठी महिपती ओतारी यास९ रू. १० पैसे मजुरी दिली गेली होती तर त्याच्या हाताखाली काम करणारा जिवाण्णा देशिंगकरास १५ आणे मजुरी दिली होती. तसेच चिंतामणेश्वर देवाचा नंदी संगमरवरी पाषाणात घडविणारा नरसू पाथरवट यास १० रू. २ आणे मजुरी दिल्याचे उल्लेख सन १८१७ सालाच्या कागदपत्रांमध्ये पहावयास मिळतात.[१२] याशिवाय संगमरवरी पाषाणापासून पंचायतन गाभाऱ्याच्या जाळ्या तयार करणे, आरशास पारा लावणे व हस्तिदंती वस्तू तयार करण्याचे काम परमानंद नावाच्या कारागिराकडे सोपविले होते. यावरून हा कारागिर सर्व कामात कुशल असावा असे वाटते.[१३]

पंचायतन देवांच्या मुर्त्या घडविण्यासाठी मुकुंदा पाथरवट व जिवाण्णा देशिंगकर या दोन मजुरांची नियुक्ती केली होती.[१४] तर या मुर्त्या उभ्या असाव्यात की बसलेल्या, त्याच्या हातात आयुधे कोणती असावीत या संबंधीच्या सर्व बारीक–सारीक तपशीलांचा सल्ला पुण्याचे वेदशास्त्र संपन्न चिंतामण दिक्षीत आपटे यांच्याकडून घेण्यात आला होता.[१५] सन १८१७ सालाच्या कागदपत्रांमध्ये गणपतीची मुर्ती तयार करण्यासाठी एका महिन्याचा एकूण मजुरी खर्च १४ रू. १२ आणे दिला असून त्यातील मुकुंदा पाथरवट यास १३ रू. व त्याच्या हाताखाली काम करणारा जिवाण्णा देंशिगकरास १ रू.

१२ आणे मजुरी दिल्याचे पहावयास मिळते.[१६]

श्री गणपती पंचायतन संस्थान मंदिराचे बांधकाम सन १८४४ पर्यंत पूर्ण झाले होते. या बांधकामादरम्यान राजघराण्यातील सर्व मंडळी गणेशदुर्ग किल्ल्यातील राजवाड्यात वास्तव्यास होती. परंतु श्रीमंत चिंतामणराव आप्पासाहेब पटवर्धन (पहिले) यांचे वास्तव्य मंदिराच्या दक्षिण बाजूस असणाऱ्या साध्या छपरात होते. त्यांच्या काळात पंचायतन देवतांचे गाभारे, श्री गणपतीच्या तीन खणी सोप्याचे व शिखराचे बांधकाम पूर्ण झाले होते तर इतर चार देवतांच्या तीन खणी सोप्यांचे बांधकाम नुकतेच सुरू झाले होते.[१७] परंतु सन १८४४ च्या गणपतीच्या अर्चा सोहळ्यानंतर आप्पासाहेबांच्या वार्धक्यामुळे बांधकामात फारशी प्रगती झाली नव्हती.

मंदिर बांधकामाचा दुसरा टप्पा :

श्रीमंत चिंतामणराव आप्पासाहेब पटवर्धन (पहिले) हे सन १८५१ रोजी देवाधीन झाले. त्यांच्या पश्चात सांगली संस्थानाचे अधिपती म्हणून त्यांचे पुत्र श्रीमंत धुंडिराव तात्यासाहेब पटवर्धन (१८५१–१९०१) यांची नियुक्ती झाली होती.[१८] याच्या काळात मंदिराच्या मुख्य वास्तूचा सज्जा तसेच चार देवतांच्या तीन खणी सोप्यांची बांधकामे झाली होती. पंचायतन देवतांपैकी श्री लक्ष्मी नारायण मंदिराच्या तीनखणी सोप्याच्या बांधकामासाठी जोतिबाच्या डोंगरातून आणलेल्या पाषाणाचा खर्च ३९२ रू ८ आणे पहावयास मिळतो. तसेच गणपती मंदिराच्या आवारात डागडूजीची जी लहान कामे झाली होती त्याचा खर्च ९२ रू. १० पैसे दिला आहे.[१९]

मंदिर बांधकामाचा तिसरा टप्पा :

श्रीमंत धुडिंराव तात्यासाहेब पटवर्धन यांच्या मृत्युनंतर (१९०१) श्रीमंत चिंतामणराव आप्पासाहेब पटवर्धन (दुसरे) (१९१०–६५) यांची सांगली संस्थानाचे तिसरे अधिपती म्हणून निवड झाली होती. त्यांच्या काळात श्री गणपती पंचायतन मंदिराची दोन महत्वाची बांधकामे झाली होती[२०]

१) सभामंडप :

श्रीमंत चिंतामणराव आप्पासाहेब पटवर्धन (दुसरे) यांनी श्री गणपती पंचायतन मंदिराच्या शताब्दी महोत्सवाचा योग साधून १२ मार्च १९४४ रोजी श्री गणपतीच्या सभामंडप बांधकामास प्रारंभ केला. गणपती मंदिराच्या मूळ बांधकामास शोभेल अशाच पाषाणात सभामंडपाचे बांधकाम होणे गरजेचे असल्याने त्यासाठी लागणारा काही पाषाण जोतिबाच्या डोंगरातून आणण्यात आले होते तर काही पाषाण सांगली परिसरात केलेल्या उत्खननामध्ये सापडले होते. या पाषाणाचा नमुना तपासण्यासाठी चारशे रूपये खर्च झाल्याचे संदर्भ श्री गणपती पंचायतनच्या कागदपत्रांमध्ये पहावयास मिळतात.[२१] सभामंडपाच्या संपूर्ण बांधकामास नऊ वर्षाचा कालावधी लागला व त्यासाठी चार लाख रूपये खर्च झाले होते. सन १९५३ साली सभामंडपाचा उदघाटन सोहळा त्यावेळचे उपराट्राध्यक्ष डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन् (१९८८–१९७५) यांच्या हस्ते संपन्न झाला होता.[२२]

२) महाद्वार :–

महाद्वाराच्या बांधकामास सन १९५४ च्या दरम्यान प्रारंभ झाला. बांधकामासाठी लाल–गुलाबी रंगाचा पाषाण गोकाक या ठिकाणाहून आणला होता. हे बांधकाम सन १९६४ मध्ये पूर्ण झाले. या महाद्वारास तीन प्रवेशद्वारे असून वरील बाजूस घुमटाकार आकाराची रचना आहे. तीन प्रवेशद्वारांपैकी मुख्य प्रवेशद्वाराची उंची ५५ फूट असून बाजूच्या दोन प्रवेशद्वाराची उंची ४५ फूट आहे.[२३] मुख्य प्रवेशदवाराच्या वरच्या बाजूस शिखरासारखी एकेका मजल्याची रचना आहे. तीनही प्रवेशद्वारांच्या दर्शनीय बाजूस महिरपी आकाराची अर्धगोलाकार नक्षी आहे. महाद्वाराच्या दोन्ही बाजूस संगमरवरी पाषाणाच्या जाळ्या आहेत. महाद्वारावरच नगारखान्याची व्यवस्था असून या नगारखान्यात सनई, चौघडा, झांज, ताशा, नौबत, ढोल व शिंग अशी वाद्ये आहेत. ही वाद्ये सकाळी व संध्याकाळी आरतीच्या अगोदर अर्धा तास वाजविली जातात. संपूर्ण महाद्वाराच्या बांधकामास नऊ लाख रूपये खर्च आल्याचे उल्लेख मिळतात.[२४]

मंदिर बांधकामाचा चौथा टप्पा :

श्रीमंत विजयसिंह पटवर्धन (१९६५) यांनी सन २००२ सालापासून श्री गणपती पंचायतन संस्थानची नेत्रदीपक प्रगती केली आहे. काही काळ ते व्यवसायानिमित्त मुंबईस वास्तव्यास असल्यामुळे त्या कालावधीत त्यांच्या मातोश्री पद्मिनीराजे पटवर्धन श्री गणपती पंचायतन मंदिराची व्यवस्था पहात होत्या. त्यांनी त्यांच्या काळात मंदिराच्या किरकोळ दुरूस्त्यांबरोबर गणेशाच्या सुमुखासमोरच कारंज्याची निर्मिती करून मंदिर परिसराच्या सौंदयात भर घातली होती.[२५] श्रीमंत विजयसिंहराजे पटवर्धन यांनी प्रथम मंदिरांच्या जीर्णोद्धाराचे कार्य हाती घेतले. तसेच पंचायतन मंदिर परिसराच्या सुशोभिकरणाचे अत्यंत महत्वाचे काम पूर्ण केले आहे. त्यासाठी पंचायतन मंदिराच्या दुतर्फा वेगवेगळी फूलझाडे, फळझाडे व शोभेची अनेक झाडे लावून हिरवीगार वनराईच तयार केली आहे. या सर्व वनराईमुळे मंदिर परिसराचे सौंदर्य तर वाढतेच परंतु येथे येणाऱ्या भाविकांच्या मनावर येथील वातावरणाचा इष्ट व हितकारक परिणाम घडून येण्यास मदत होते.[२६] पटवर्धनांचे कुलदैवत केंगणेश्वरीचे मंदिर[२७] गणपती पंचायतन मंदिराच्या उजव्या बाजूस आहे. या परिसरातही भव्य अशा उद्यानाची निर्मिती केली असून त्यामध्ये वेगवेगळ्या प्रकारची फूलझाडे तसेच हिरव्यागार हिरवळीची लागवड केली आहे. त्याच बाजूस असणा–या हत्ती ठाणाच्या भव्य परिसरात नवग्रहांची व चिंतामणराव आप्पासाहेब पटवर्धन (पहिले) यांच्या पुतळयाची स्थापना केलेली पहावयास मिळते[२८] एकंदरीत शांतता, सौंदर्य, सुंगध व भव्यता आदि सर्व गोष्टींचा एकत्रित मिलाफ झालेल्या या मंदिरात भाविकांना पुन्हा, पुन्हा येण्याचे आकर्षण वाटेल अशीच या मंदिर परिसराची विशेषता दिसून येते.

निष्कर्ष :

सांगलीमध्ये श्री गणपती पंचायतन मंदिर स्थापन करण्यापाठीमागे श्रीमंत चिंतामणराव आप्पासाहेब पटवर्धन (पहिले) यांची श्री गणेश देवतेप्रती असणाऱ्या धार्मिक श्रद्धेचे दर्शन होते. हीच परंपरा जपण्याचे कार्य त्याच्या पश्चात श्रीमंत धुडिंराव तात्यासाहेब पटवर्धन व श्रीमंत चिंतामणराव आप्पासाहेब

पटवर्धन (दुसरे) यानी त्यांच्या काळात केलेच, त्यांचे वंशज श्रीमंत विजयसिंहराजे पटवर्धन यांनी दोनशे वर्षाच्या परंपरेचे पालन अगदी काळजीपूर्वक केलेले दिसते. मंदिर परिसराच्या सुधारणेसाठी त्यांनी केलेले प्रत्यक्ष प्रयत्न हेच त्यांच्या नव्या नव्या कल्पनांना जन्म देत गेले व प्रारंभी लहानशा झऱ्याएवढी भासणारी कल्पना त्यांच्या प्रयत्नांतून दृढ होत होत कार्यरूपाने गंगेच्या प्रवाहासारखी शतमुखी व विशाल बनून येणाऱ्या भाविकांना समाधानाची अनुभूती तर देतेच परंतु परिसरात पावित्र्य, मांगल्य व भक्ती यांचा त्रिवेणी संगम साधण्याचा फार मोठा प्रयत्न त्यांनी केलेला दिसून येतो.

संदर्भग्रंथसूची :

१ तात्यासाहेब पटवर्धन (१८१५—३३) मिरज जहागिरीचे अधिपती होते. सन १८२१ साली इंग्रज सरकारने मिरज संस्थानाच्या चार वाटण्या केल्या. त्यातील मिरजेची दौलत तात्यासाहेब मिरजकरांना देण्यात आली होती. त्याबरोबर १,८५,९३६ रूपये उत्पन्नाचा संरजामही त्यांना मिळाला होता. प्रजेच्या हिताच्या दृष्टीने सदैव प्रयत्नशील राहिलेले ते कर्तव्यदक्ष राजे होते. (अग्रवाल गु.ग., मिरज संस्थानाचा परिचय, मिरज, १९४२, पृ. ५)

२ कुंठे गो.ज., सांगली संस्थानाचे संस्थापक पहिले चिंतामणराव आप्पासाहेब पटवर्धन यांचे चरित्र, सांगली, १९७१, पृ. ४२

३ गणपती पंचायतन संस्थान कार्यालयातील सन १८१४ ची अप्रकाशित कागदपत्रे, पृ. ७.

४ स्वानंद भवन हे चिंतामणराव आप्पासाहेब पटवर्धन (पहिले) यांच राहण्याच्या वास्तूचे नाव होते. ही वास्तू श्री गणपती पंचायतन संस्थान पासून दोन किलोमीटर अंतरावर असून माधवनगरकडे जाणाऱ्या रस्त्यावर आहे. या वास्तूचे बांधकाम सांगलीपासून थोड्या अंतरावर व ओसाड रानामध्ये केल्याने त्या भागाला 'स्वानंद भवनचा माळ' असे नामाभिधान प्राप्त झाले आहे. (श्री गणपतीचे पुजारी पाटणकर रमेश यांच्या मुलाखतीतून प्राप्त)

५ टिळक अविनाश, सांगली आणि सांगलीकर, आवृत्ती १ ली, सांगली, २००१, पृ. २५८.

६ कित्ता, पृ. २५९

७ कित्ता, पृ. २५८

८ जाधव प्रतापसिंह, (संपा.) पुढरी, १४ ऑक्टो. २००५, पृ. ३.

९ गणपती पंचायतन संस्थान, सन १८१४, उपरोक्त पृ. १७.

१० टिळक अविनाश, उपरोक्त पृ. २५८

११ गणपती पंचायतन संस्थान, सन १८१४, उपरोक्त पृ. ४

१२ श्री गणपती पंचायतन संस्थन, सन १८१७, उपरोक्त पृ. ४

१३ कुंठे गो. ज., उपरोक्त, पृ. ५१

१४ श्री गणपती पंचायतन संस्थान, सन १८१७, उपरोक्त, पृ. ६

१५ टिळक अविनाश, उपरोक्त, पृ. २५९

१६ श्री गणपती पंचायतन संस्थान, सन १८१७, उपरोक्त, पृ. १३.

१७ कुंठे गो. ज., उपरोक्त, पृ. २०३.

१८ पारसनीस डी.बी. दि. सांगली स्टेट, सातारा, १९१७ पृ. ६५

१९ सन १९६० ची रोजकिर्द, उपरोक्त, पृ. २३

२० शिंदे मानसिंग, (संपा.) श्री गणपती पंचायतन संस्थान, सांगली श्री गणेश दर्शन विशेषांक, सांगली २००४, उपरोक्त,पृ. १५

२१ सन १९४४ ची श्री गणपती पंचायतन संस्थानची कागदपत्रे.

२२ शिंदे मानसिंग (संपा.) उपरोक्त, पृ. ३

२३ प्रत्यक्ष मंदिर भेटीतून माहिती घेतली.

२४ कित्ता.

२५ पारेकर दशरथ (संपा.) सकाळ वर्तमानपत्र, यांच्या मुलाखतीतून.

२६ पंचायतन मंदिराच्या बागेचे वरिष्ठ पर्यवेक्षक पाटील अनिल यांच्या मुलाखतीतून

२७ श्री केंगणेश्वरी ही देवी पटवर्धनांची कुलदैवत आहे. कृष्णा नदीच्या काठावर श्री गणपती पंचायतन मंदिराची स्थापना होण्यापूर्वी पासूनच या देवीचे मंदिर त्या ठिकाणीच आहे. पूर्वी ही देवी 'कुरणेश्वरी' या नावाने परिचित होता. चिंतामणराव आप्पासाहेब पटवर्धन (पहिले) यांनी या देवीच्या डाव्या बाजूस पंधरा फूटाच्या अंतरावर श्री पंचायतन देवतांची मंदिरे स्थापन केली. तसेच या देवीच्या मंदिराचेही छोटेसे बांधकाम केले. पंचायतन देवतांची जी नित्य धार्मिक कृत्ये होतात. त्याप्रमाणेच या देवीची सर्व धार्मिक कृत्ये पार पाडली जातात. या देवीच्या नित्य पूजेसाठी गुरव हे पुजारी असतात. आठवड्यातील प्रत्येक मंगळवारी व शुक्रवारी या देवीच्या दर्शनास स्त्रियांची प्रचंड गर्दी असते. नवरात्र उत्सवाच्या वेळेस या देवीपुढे मोठ्या प्रमाणात धार्मिक कार्यक्रम ठेवले जातात. विजयसिंहराजे पटवर्धनांनी या परिसराचे सुशोभिकरण करून येथील शोभा वाढविली आहे.(श्री गणपतीचे पुजारी रमेश पाटणकर यांच्या मुलाखतीतून)

२८ गणपती पंचायतन मंदिराचे व्यवस्थापक जाजू बी.के. यांच्या मुलाखतीतून.

67. काश्मीर विलिनीकरण एक दृष्टीक्षेप व भारत पाक संबंध (१९४७-२०१५)

प्रा. शशिकांत मोहिते
सहा. प्राध्यापक, इतिहास विभाग,
आर्टस् ॲन्ड कॉमर्स, कॉलेज, आष्टा.

रविकुमार शरणाप्पा होसमणी
एम. ए. विद्यार्थी, इतिहास विभाग,
आर्टस् ॲन्ड कॉमर्स, कॉलेज, आष्टा.

प्रस्तावना ः

१५ ऑगस्ट १९४७ रोजी भारत स्वतंत्र झाला . ब्रिटीश साम्राज्यातुन भारत मुक्त झाला . त्यावेळी भारतात एकुण ५६२ स्वतंत्र संस्थाने होती . ब्रिटीशांनी भारत सोडताना या संस्थानिकांसमोर तीन पर्याय ठेवले .

१) हवे तर या संस्थांनांनी भारतात/पाकीस्तानात विलिन व्हावे .

२) संस्थानिकांनी स्वतःचे सार्वभौम राज्य घोषीत करावे .

भारताला स्वातंत्र मिळुनही संस्थानी प्रजेचे नष्टचर्य संपले नाही . त्यांनी स्वतःचे भवितव्य ठरविण्याचा अधिकार नव्हता . राजाच्या मर्जीवर त्यांचे भवितव्य अवलंबुन होते . ता ५६२संस्थानच्या विलीनीकरणाचा प्रश्न भारत सरकारपुढे होता . विघटनाच्या संकटातुन देशाला ऐक्याकडे न्यावयाचे होते . काही संस्थानिकांनी विलिणीकरणास मान्यता दिली मात्र काश्मीर,जुनागड,हैद्रावाद,गोवा इ . च्या विलिणीकरणास भारताला लष्करी कारवाई करावी लागली . ब्रिटीशांनी संस्थानिकांना आपले स्वतंज्य अवाधीत ठेवण्याचे अधिकार/आश्वासन दिले त्यावावत त्यावेळचे लॉर्ड माऊंटबॅटनचे घटनात्मक सल्लागार व सरदार वल्लभभाई पटेलांचे मुख्य मदतनिस व्ही . पी . मेनन म्हणतात की, भारताची व संस्थानांची सर्वाधिक हानी करणारी कोणती एक गोष्ट ब्रिटीशांनी केली असेल तर त्यांनी संस्थानिकांना सार्वभौम निर्णयाचे दिलेले स्वातंज्य . ऑगस्ट १९४७ पर्यंत जुनागड,काश्मीर,हैद्रावाद इ . यांचा अपवाद वगळता इतर सर्व संस्थाने भारतात विलिन झाल्याचे हे जागतीक इतिहासातील पहिलेच उदाहरण आहे . त्यावेळी संस्थाने,विलिनीकरणाची सर्व सुत्रे शांततापुर्ण क्रांतीचे शिल्पकार सरदार वल्लभभाई पटेल यांच्याकडे होते . भारतातील संस्थानी प्रजेत स्वातंज्याची व लोकशाहीची भावना रूजवण्याचे अत्यंत महत्वपुर्ण कार्य पंडीत नेहरूंनी केले आहे माञ या संस्थानाचे कायदेशिररित्या विलिनीकरण घडवुन आणण्याचे श्रेय सरदार पटेल व त्यांचे सहाय्यक व्ही . पी . मेनन यांना जाते . त्यांच्या प्रयत्नामुळे वंदुकीची एकही गोळी न वापरता सुमारे ५ लाख चौरस मैलाचा प्रदेश व ९० दशलक्ष लोक भारतात एकरूप झाले . ११ सप्टेंवर १९४७ रोजी वॅ . जिनांच्या मृत्युनंतर हैद्रावाद विरूद्ध पोलीस कारवाई करण्याचा निर्णय भारत सरकारने घेतला . १३ सप्टेंवर मध्ये लेफ्टनंट जनरल राजेंद्रसिंग यांच्या नेतृत्वाखाली भारतीय लष्कर हैद्रावादकडे गेले . त्यानंतर १७ सप्टेंवर १९४८ मध्ये निजामाने भारत विलिनीकरणास मान्यता दिली तसेच फेबु . १९४८ मध्ये जुनागडचे भारतात विलिनीकरण झाले . त्यानंतर काश्मीरचेही भारतात विलिनीकरण झाले मात्र तत्पुर्वी काश्मीरची भौगोलिक माहिती,परिचय व काश्मीरचा पुर्व इतिहास समजणे महत्वाचे आहे .[१]

जम्मूकाश्मीर परिचय ः

कल्हणच्या राजतरंगिणी या ग्रंथात म्हटले आहे की,काश्मीर हे हिमालयाच्या पर्वत रांगातील अत्यंत सौंदर्यपुर्ण असा भारताचा मुकुट आहे . तसेच काश्मीरच्या सौदर्यावद्दल म्हटले जाते की,काश्मीर हे देवी पार्वतीने वसविले व त्याचा मालक भगवान शिव स्वतः आहे . काश्मीर म्हणजे पृथ्वीवरील नंदनवन आहे . मुघल सम्राट अशोक य प्रदेशाला गरवारएवाय असे म्हणत होते . जम्मु आणी काश्मीर हे भारतातील अती उत्तरेकडील महत्वाचे राज्य असुन त्याला भारताचा राजमुकुट असे म्हणतात . या काश्मीरच्या पश्चिमेला पाकीस्तान तर उत्तर व पूर्वेला चीन,दक्षिणेला हिमाचल प्रदेश इ . त्याच्या सीमा आहेत . त्याची सविस्तर माहीती खालीलप्रमाणे.....

१) क्षेत्रफळ ः २,२२,२३६ चौ . कि .

२) राजधानी ः जम्मु (हिवाळी) श्रीनगर (उन्हाळी)

३) लोकसंख्या ः १,२५,४८,९२६

४) प्रमुख भाषा ः उर्दु, काश्मीरी, डोग्री इ .

५) तांदुळ, मका, सफरचंद इ .

भौगोलीक,राजकीय,लष्करीदृष्टया काश्मीरचे महत्व जाणवते कारण प्रदेशाच्या सिमेलगत भारताची शत्रु राष्ट्रे आहेत . त्यामुळे संरक्षणदृष्टया या प्रदेशाचे महत्व अपार आहे . या काश्मीरचे अक्षवृत्तीय व रेखावृत्तीय स्थान खालीलप्रमाणे .

१) स्थान व सीमा ः "३२ . १७" व "३६ . ५८" उत्तर अक्षवृत्ते "८० . ३०" पुर्व रेखावृत्त [२]

जम्मु काश्मीरचा पुर्व इतिहास ः

काश्मीर प्रदेशाचा महाभारतामध्ये उल्लेख आहे . इ . स . पु . २५० मध्ये महान मौर्य राज सम्राट अशोकाने तेथे अनेक शहरे व विहार बांधले होते . या प्रदेशाचे त्यावेळीही फार महत्व होते . काही पुराव्यातुन गौतम बुद्धाने ही या प्रदेशाला भेट दिली होती . प्रसिद्ध कुशाण राजा सम्राट कनिष्क याने बौद्ध पंडीत वसुमित्रच्या अध्यक्षतेखाली काश्मीरमधील कुंडल वन विहार येथे इ . स . १०० मध्ये चौथी बौद्ध परिषद आयोजित केली यावेळी

वौद्धसंघामध्ये हिनयान व महायान इ. दोन भिन्न मत प्रवाहाचे पंथ तयार झाले. तसेच पहिला भारतीय इतिहास लेखक कल्हण याने आपल्या राजतरंगिणी या ग्रंथात काश्मीरचा प्राचीन काळापासुन ते मुस्लींमांच्या आक्रमणापर्यंतचा (१२ वे शतक) इतिहास सांगीतला आहे. काश्मीरमध्ये महान मुस्लीम राज होवुन गेला. त्यानंतर इ.स.१४२०१४७० मध्ये ॲजेलो या राजाने काश्मीरच्या कला,संस्कृती,संगीत इ. घटकाल योगदान दिले. त्यानंतर राजा झेनउलअबीदीन याने काश्मीरचा विशाल प्रांत गिळंकृत केला. १५८७ मध्ये सम्राट अकबराने काश्मीर जिंकले. त्याने आपला पुत्र जहांगिर सह अनेकवेळा काश्मीरमधील बागवगीचे,शाली,पर्यटन इ. मध्ययुगामध्येही प्रसिद्ध होते.[३]

१८४६ च्या लाहोर तहानुसार इंग्रजांना काश्मीरची प्राप्ती :

पंजाबचा राजा रणजितसिंहाने जम्मु काश्मीरपर्यंत आपला साम्राज्यविस्तार केला होता. रणजितसिंहाच्या मृत्युनंतर त्याचा अल्पवयीन मुलगा दिलीपसिंह सत्तेवर आला व त्याची आई जिंदनकौर ही त्याची संरक्षिका होती मात्र याचवेळी पंजाबचा राजकीय अस्थिरतेचा फायदा ब्रिटीशांनी घेतला व १८४५ च्या पहिल्या शिखइंग्रज युद्धात शिखांचा पराभव झाला व इंग्रजांनी शिखांवर लाहोरचा तह लादला. या तहानुसार युद्ध नुकसान भरपाई म्हणुन शिंखांवर १.५ कोटी दंड लावण्यात आला मात्र तेवढी रक्कम नसल्याने जम्मुकाश्मीरचा प्रदेश दिलीपसिंहाने इंग्रजांना दिला. मात्र पुढे तो प्रदेश इंग्रजांनी गुलाबसिंगास ७५ लाख रू. ला विकला. पुढे १९४७ मध्ये भारताल स्वातंत्र्य मिळाल्यानंतर हाप्रदेश भारताता विलिन करण्यात आला. या विलिनीकरणावी सविस्तर माहिती पुढीलप्रमाणे.....[४]

काश्मीरच विलिनीकरण व प्रमुख टप्पे :

स्वातंत्र्यपुर्व भारतातील संस्थानानी जरी विलिनीकरणास मान्यता दिली असली तरी त्यांचे केंद्रीयकरण आणी लोकशाहीकरण पुर्ण व्हायचे होते. ती प्रकिया २६ जाने,१९५१ पर्यंत पुर्ण झाली

१) २१६ संस्थानाचे शेजारच्या घटक राज्यात विलिनीकरण केले.

२) २७५ संस्थानाचे पाच संघात रूपांतर करून त्यांना व राज्यांचा दर्जा देण्यात आला.

३) ६१ संस्थानाचे सात विभाग करून त्यांना क राज्यांचा दर्जा देण्यात आला.

४) हैद्रावाद,जम्मुकाश्मीर,म्हैसुर इ. 'ब' वर्गात समावेश करण्यात आला.[५]

काश्मीरच्या प्रस्तावावरून भारतात युद्ध संकट ओढावले होते. कारण स्वातंत्र्यानंतर काश्मीर भारतात विलिन व्हावे यासाठी भारत सरकारने कोणत्याच हालचाली केल्या नव्हत्या. या उलट मुस्लीम बद्दल काश्मीरने पाकीस्तानात विलिन व्हायचे ठरवले होते मात्र त्यावर भारत सरकार त्यात काही गैर माननार नाही असा स्पष्ट निर्वाळा २८ ऑक्टों १९४७ मध्ये कॅम्पवेल जॉन्सन यांना असे वाटत होते शिवाय बॅ. जिना व त्यांचे धर्मवेढे यांनी काश्मीरचे विलिनीकरण करण्यासाठी टोळीवाल्यांच्या नावाखाली अदयावत शस्त्रासह काश्मीरवर हल्ला केला तेव्हा काश्मीर राजा महाराज हरिसिंग याने भारत सरकारकडे मदतीची याचना केली व भारत सामिलीकरणाचा करार करून दिला व भारताने १५ महिने पाकीस्तानच्या बरोबर युद्ध करून काश्मीरचे भारतात विलीनीकरण केले मात्र तत्पुर्वी काश्मीर मुक्ती संग्रामाचा विचार महत्वाचा आहे. काश्मीरचा राजा हिंदु व प्रजा बहुतांश मुस्लिम होती. काश्मीर नरेश हरिसिंग याला काश्मीर स्वतंत्र ठेवायचे होते. त्याच्या या विचाराला स्वा. वि. दा. सावरकरांनी पाठिंबा दिला होता मात्र गांधीजींनी हरिसिंगला भारतात विलिन होण्याचा सल्ला दिला होता त्यासाठी श्रीनगर येथे हरिसिंगची भेट ही घेतली होती. मात्र त्याचा उपयोग झाला नाही. त्याने स्वतंत्र राहण्याचा निर्णय घेतला आणी काश्मीर जनतेचीही तीच इच्छा होती. मात्र याचवेळी पाकीस्तानने काश्मीरवर पाकीस्तानात सामील व्हावे म्हणुन दबाव टाकला पाक सरकारने मत होते की काश्मीरमधील बहुसंख्य प्रजा मुस्लीम असल्याने तो प्रदेश पाकीस्तानात सामील व्हावा यासाठी पाकीस्तानात दोन मुद्दे सुचविले.[६]

१) युनायटेड नेशनच्या देखरेखी खाली काश्मीर मध्ये सार्वमत घेण्यात यावे.

२) नैसर्गिक व्यायाने काश्मीर पाकीस्तानात यायला हव कारण बहुसंख्य प्रजा मुस्लिम होती.

पाकीस्तानच्या या मतामुळे काश्मीर प्रश्नावरून भारतपाक यांत युद्धसदृश परिस्थिती निर्माण झाली कारण हे दोन्ही मुद्दे भारताला मान्य नव्हते. अशावेळी पाकने टोळीवाला मार्फत काश्मीरवर हल्ला केला तेव्हा राज हरिसिंगने भारताकडे मदतीची याचना केली तेव्हा भारत सरकारने सामिलीकरण करारास मान्यता देण्याचा मोबदल्यात हरिसिंगला लष्करी मदत केली आणी काश्मीरच्या राज्यावर कोणताच प्रकारचा दबाव न आणता काश्मीर भारतात सामील करून घेतला. संस्थानांचे भारतात विलिनीकरणाच्या कार्यामध्ये सरदार पटेलांचे महत्व फार आहे. त्याबद्दल नॅशनल हेराल्ड या वृत्तपत्राचे पत्रकार चलपतीराव म्हणतात की,देशाच्या एकीकरणावावत विस्मार्क पेक्षा सरदार पाटेलंचे येगदान महत्वाचे आहे. त्यांच्या योगदानामुळेच रक्ताचा एक थेंब ही न सांडता अनेक संस्थानांचे भारतात विलिन झाले. पुढे भाषावर राज्य पुर्नरचना आयोगानुसार प्रत्येक राज्याला स्वतंत्र घटक राज्यांचा दर्जा देण्यात आला.[७]

काश्मीर विलिनीकरणाचे भारतपाक वरील परिणाम :

१) १९६५ चे भारतपाक युद्ध :

काश्मीर विलिनीकरणाच्या प्रश्नावरून १९४७ मध्येच पाकीस्तानने भारतावरोवर युद्ध केले. पाकीस्तानी घुसखोर काश्मीरमध्ये शिरले तेव्हा

काश्मीर राजाच्या विनंतीवरून भारत सरकारने पाक टोळीवाल्यांचा पराभव केला . परिणामी पाकने भारताच्या अंतर्गत क्षेत्रात हस्तक्षेप केल्याने भारताचे पंतप्रधान पं . जवाहरलाल नेहरू यांनी पाक विरोधात युनोकडे तक्रार केली व काश्मीर प्रश्न संयुक्त राष्ट्र संघटनेच्या सुरक्षा समितीकडे नेला . परिणामी युनोच्या हस्तक्षेपाने दोन्ही देशात युद्धबंदी झाली . १९६५ मध्ये पाकीस्तानी घुसखोर पुन्हा भारतात घुसले . यावेळी देशाचे पंतप्रधान लाल बहादुर शास्त्री होते त्यांनी रशियाच्या मदतीने भारतपाक यांच्यात ताश्कंद करार करून १९६५ चे युद्ध संपवले . मात्र त्याचनंतर हदयविकाराने पंतप्रधान शास्त्रीचे निधन झाले . [८]

२) १९७१ चे भारतपाक युद्ध ः

पंतप्रधान इंदिरा गांधीच्या काळात ३ डिसे १९७१ मध्ये पाकीस्तानने भारतावर स्वारी केली मात्र या युद्धात इंदिराजींच्या कुशल नेतृत्वामूळे भारताला विजय मिळाला व त्यांनी बांगला देश याला स्वातंत्र्य मिळवुन दिले . या विजयाप्रित्यर्थ इंदिरा गांधीना भारत सरकाराने भारतरत्न हा सर्वोच्च नागरी पुरस्कार दिला व त्याचा भारताची सम्राज्ञी असा गौरव केला . तत्पुवी युद्धांच्या अगोदर पाकचे राष्ट्राध्यक्ष झुल्फीकार अली भुट्टो हे इंदिराजींना शैक्षणीकदृष्टया कमी लेखत होते . मात्र याच भूट्टोने भारत-पाक यांच्यातील सिमला करारावेळी इंदिरा गांधीच्या म्हटले आहे की इंदिरा गांधी या सर्वार्थाने त्यांच्या पिताच्या कन्या आहेत . हे जेव्हा मी म्हणतो त्यावेळी एक गोष्ट मला आवर्जुन सांगावीशी वाटते ती म्हणजे,मला नेहरूंबद्दल सर्वाधिक कौतुक व आदर होता" असे गौरवउद्गार काढले . १९७१ च्या युद्धामुळे पुर्व पाकीस्तान हे मुल पाकीस्तानापासुन फुटुन स्वातंत्र झाले व त्याला बांग्लादेश हे नाव मिळाले . एकाच राष्ट्रांची दोन शकले होऊन त्यापासुन एक स्वतंत्र सार्वभौम राष्ट्र निर्माण होण्याची ही पहिलीच घटना होय . काश्मीर प्रश्नावरून भारत आणी पाक यांच्यातील संबंध तणावग्रस्तच आहेत . पुढे या देशात कारगिलचे युद्ध झाले . यावेळी संयुक्त राष्ट्र परिषदेतील विल क्लिंटन यांनी पाकीस्तानवर युद्धबंदी साठी दबाव आणला होता . त्यामुळे पाकीस्तानी लष्करांनी संघर्ष थांबवला व त्यांच्या सैन्यांनी माघार घेतली . [९]

भारत-पाक संबंध (१९४७-२०१५) ः

१) १९४७ मधील संबंध ः

पाकीस्तान हे भारताच्या कुशीत सलणारे सततचे शल्य असुन ब्रिटिशांपासुन भारताकडे आलेला तो सर्वात विषारी वारसा आहे . फाळाणीच्या वेळी दान्ही देशांच्या निर्वासीतांची संख्या १२ दशसलक्ष होती . स्थलांतर होऊनही सुमारे ४० दशलक्ष मुस्लिम भारतात व १० दशलक्ष हिंदु पुर्व पाकीस्तानमध्ये राहीले होते . भारत व पाक यांच्या स्वंतंत्र लष्करी विभागाची निर्मीती करण्यासाठी ब्रिटीशांनी प्रसिद्ध सेनापती फील्ड मार्शल कलॉड ऑकिन्लेक (हा १५ ऑगस्ट नंतर भारत-पाक लष्कराचा सरसेनापती होता) यांच्या नेतृत्वाखाली संयुक्त संरक्षण समिती स्थापन केली . या समितीने मुस्लिम लष्करी अधिकारी पाकला व गैर मुस्लिम भारताला दिले . तसेच राष्ट्रीय मालमत्ता व संपत्तीच्या विभाजनाचे कार्य व्हाईसरॉयच्या विभाजन समितीकडे सोपवण्यात आला त्यानुसार ५५ कोटी रू . पाकला जाणार होते . [१०]

२) कच्छचा सीमावाद व भारत - संबंध ः

भारत-पाक सीमा तंटयापैकी लवादामार्फत निकालात निघालेला एकमेव वाद म्हणजे कच्छचे रण मैदान होय . हा गुजरात -पश्चिम पाक सीमेवरील ४०० मैलांचा दलदलीचा प्रदेश आहे . एप्रिल १९६५ मध्ये पाक सैनिक कच्छमध्ये शिरले . उभय देशामध्ये युद्धजन्य परिस्थिती निर्माण झाली तेव्हा ब्रिटीश प्रधानमंत्री हेरॉल्ड विल्सन यांच्या मध्यस्थिने ३० जुन १९६५ रोजी युद्धबंदी झाली . शेवटी हा सीमावाद ब्रिटिश लवादामार्फत सोडवण्यात आला . [११]

३) काश्मीर प्रश्न व भारत-पाक संबंध ः

काश्मीरचा राज हरिसिंग हा हिंदु असुन बहुसंख्य प्रजा मुस्लिम होती . त्याचे क्षेत्रफळ ८४४७१ चौ . मैल होते व त्याची लोकसंख्या ४२,५०,००० होती . त्याच्या ईशान्येला तिबेट,उ . चीन,तुर्कस्तान,अफगाणिस्तान ,पश्चिमेला पाकीस्तान इ . देश आहेत . १९७४ च्या स्वातंत्र्य कायदयानुसार भारतीय संस्थानांना स्वातंत्र्य राहण्याचा, भारत/पाक मध्ये सामील होण्याचा अधिकार होता . काश्मीर राजाने स्वातंत्र्य राहण्याचा निर्णय घेतला मात्र सप्टें १९४७ मध्ये पाकने आपले लष्कर काश्मीर मध्ये घुसवले याची माहीती त्यावेळचे भारताचे सरसेनापती जनरल लॉकहार्ट व संरक्षण प्रमुख जनरल बुचर यांना होती मात्र भारत सरकारला कळवले नाही . यावरून ब्रिटिश हे पाकीस्तानधार्जीण होतेप हे सिद्ध होते . त्यावेळचे काश्मीर मोहिमेचे प्रमुख एल . पी . सेन यांनी आपल्या स्लेंडर वॉज द थ्रेड या ग्रंथात काश्मीरच्या विलिणीकरणावावत असणा-या ब्रिटिशांच्या नितीचे वर्णन केले आहे . तसेव काश्मीरमधील हल्लेखोरांना पाक सर्वतोपरी मदत करीत होते अशी कबुली रसेल व्हाईट या अमेरिकन माणसाने न्युयॉर्क टाईम्सच्या रॉबर्ट रूम्बल याला दिली होती . तसेच पाक संस्थापक बॅ . जीना यांचे काश्मीर संदर्भातील विचार ॲलन कॅम्पबेल जॉन्सन यांनी आपल्या मिशन विथ माऊंटबॅटन या ग्रंथात दिले आहे . राजा हरिसिंगने काश्मीर-भारतात विलिन करण्याच्या करारावर सही केली तेव्हा त्याला शेख अब्दुल्ला यांच्या नेतृत्वाखाली काश्मीरमधील सर्वात बलशाली पक्ष नॅशनल कॉन्फरन्स याने आपला पाठींबा दिला होता . पुढे १९५१ मध्ये काश्मीरच्या घटानासमितीने भारतातील काश्मीरच्या विलिणीकरणावर शिक्कामोर्तब केल्याने काश्मीरचा प्रश्न कायदेशिरपणे सुटला आहे . मात्र पाक यावावत राजी नाही . त्यामुळे भारत पाक मधील वाद पंडीत नेहरूंनी १ जाने . १९४८ मध्ये युनोच्या सुरक्षा समितीकडे नेला व या समितीने १ जाने . १९४९ रोजी दोन्ही देशांत युद्धबंदी जाहीर कोली तत्पुर्वी काश्मीरचा एकतृतीयांश भाग पाकने हस्तगत केला आज त्याला पाकमध्ये आझाद काश्मीर असे म्हणतात . संयुक्त राष्ट्रसंघाने मार्च १९५० मध्ये काश्मीरवाद सोडवण्यासाठी ऑस्ट्रेलियाचा कायदेपंडीत ओवेन डिक्सन यांची निवड केली होती . १९५३ मध्ये शेख अब्दुल्ला नंतर बक्षी गुलाब महंमद काश्मीरचे नवे मुख्यमंत्री झाले . तसेच ऑक्टों १९५८ मध्ये पाकमध्ये जनरल अयुबखान सत्तेवर येवुन तेथे लष्करी राजवटीला प्रारंभ झाला त्यांच्या काळात भारत पाक मध्ये युद्ध झाले (१९६५) यावेळी युनोचे सरचिटणीस उ . थांट यांच्या मध्यथिने प्रधानमंत्री कोसिजित यांच्या सहकार्याने १९६६ रोजी ताश्कंद करार

झाला . १९६५ च्या भारत पाक युद्धात दु . महायुद्धापेक्षाही जास्त रणगाडयांचा वापर केला होता यावेळी प्रधानमंत्री शास्त्री व संरक्षणमंत्री यशवंतराव चव्हाण यांचे कार्य महत्वाचे होते .[१२]

४) १९५८ मधील संबंध :

प्रधानमंत्री राजीव गांधीनी पाक राष्ट्राध्यक्ष जनरल झिया-उल-हल यांची भेट घेतली व भारताच्या आमंत्रणावरून झिया हे भारतभेटीवर आले . १९८८ ची सार्क परिषद इस्लामाबाद मध्ये होती तेव्हा राजीव गांधी पाक दौ-यावर होते . १९६0 नंतर पाकीस्तानात जाणारे ते पहिले भारतीय प्रधानमंत्री होते . १२ मार्च १९९३ मध्ये मुंबई सारवळी येथे बॉम्बस्फोट झाला त्यावेळी आय . एस . आय . या पाकीस्तानी गुप्तहेर संघटनेचा हात असल्याचे पुरावे भारताला मिळाले . त्यामुळे भारत पाक संबंध तणावपुर्वक झाले .

५) डिसे . २0१४-जाने . २0१५ मधील भारताविरोधी कारवाई :

ऑक्टो २0१४ पासुन पााक सतत दोन्ही देशातील सीमा रेषांचे उल्लंघन करीत असुन त्यामध्ये अनेक नागरिक,दोन्ही देशाचे सैनिक मारले जात आहे . तसेच हजारो लोकांची घरे जाळली जात आहेत . पाक सतत भारताविरोधी कारवाई करून युद्धबंदी नियंमांचे उल्लंघन करीत आहे . डिसें . २0१४ मध्ये पाकीस्तानी सैन्याने नियंत्रण रेषांवर तोफांचा भडिमार केला मात्र भारतीय सैनिकांनी पाकीस्तानला चोख प्रतिउत्तर दिले आहे . आज ही काश्मीरच्या भागात दहशत सदृश्य परिस्थिती असुन या दहशतवादी कारवायांना पाकीस्ताान स्वतः खतपाणी घालत आहे .[१३]

८) काश्मीरवर भारताचाच हक्क :

लोकशाहीमध्ये सर्वसामान्य जनतेच्या मताला व लोकांनी निवडुन दिलेल्या लोकप्रतिनिधीच्या मताला फार महत्व असते . काश्मीरच्या भारत समिलीकरणाच्या करारावर काश्मीर राजा हरिसिंगने स्वाक्षरी केली व त्या स्वाक्षरीला काश्मीरमधील लोकप्रिय पक्ष नॅशनल कॉन्फरन्सच्या शेख अब्दुल्ला हे काश्मीरचे मुख्यमंत्री होते . काश्मीरी जनतेचा प्रमुखा प्रतिनिधी व सर्व जनतेच्या मतांचा प्रमुख या नात्याने त्यांनी काश्मीरच्या भारत समिलिकरणाला मान्यता दिली यावरून काश्मीरी जनतेला भारताता सामिल व्हायचे होते हे सिद्ध होते . याशिवाय १९५३ मध्ये काश्मीरच्या घटनासमितीने भारतातील काश्मीरच्या विलिणीकरणवर शिक्कामोर्तव केले त्यामुळे काश्मीरचे विलिणीकरण हे कायदेशिर आहे . काश्मीरी जनतेवर /काश्मीरी राजांवर भारत सरकारने कोणताच दवाव न आणता काश्मीरच्या लोकप्रतिनिधींनी काश्मीर जनतेच्या संमतीने भारतात सामील होण्याची इच्छा दर्शवली होती त्यामुळे पुन्हा काश्मीरचे जनमत घेताले जावे ही पाकीस्ताानची मागणी चुकीची व अमानवी आहे . कारण काश्मीर हा भारताचाच एक अविभाज्य घटक आहे . काश्मीरवर सर्वतोपरी भारताचाच हक्क आहे . यास काश्मीरी जनतेचीही संमती आहे . त्यामुळे जनमत घेण्याचा प्रश्नच निर्माण होत नाही काश्मीर भारतातीलच एक घटकराज्य आहे हे पाकीस्तानला मान्य नसेल तर ती पाकीस्तानची भारताविरोधी उघडउघड शत्रुत्व आहे . पाकीस्तान कोणत्याही परिस्थितीत काश्मीरला मिळवण्याचा प्रयत्न करीत आहे . त्यासाठी सतत तो देश भारताविरोधी कारवाई करताना दिसतो . भारताने जागतीक स्तरांवर पाकच्या या कारवाईला विरोध करणे महत्वाचे आहे . शक्य असेल तर काश्मीरमध्ये पुन्हा जनमत घेतले जावे मात्र त्यासाठी लष्करमुक्त अशा शांततापिय वातावरणाची गरज आहे . भारत यासाठी तयार आहे मात्र पाकीस्तान आपली लष्करी कारवाई सुरू ठेवतो आहे . कारण पाकला भिती आहे की,काश्मीरचे जनमत पुन्हा भारताच्याच वाजुने असेल . त्यामुळेच पाकीस्तान काश्मीरमध्ये पर्यायाने भारतामध्ये शांतता नांदु देत नाही . भारत सरकारने याची दखल घेणे महत्वाचे आहे .

संदर्भ :

१) वैद्य सुमन व शांता कोठेकर, आधुनिक भारताचा इतिहास, चौथी आवृत्ती, नागपूर, श्री साईनाथ प्रकाशन, २००१ पृ. २५५
२) कित्ता पृ. २५७
३) वैद्य सुमन व शांता कोठेकर, स्वतंत्र भारताचा इतिहास, चौथी आवृत्ती, नागपूर, श्री साईनाथ प्रकाशन, २००१ पृ. ९,१0
४) मेनन व्ही. पी., द स्टोरी ऑफ इंटीग्रेशन ऑफ इंडियन स्टेटस्, ओरिएंटल पब्लिकेशन, बॉम्बे, पृ. १0६
५) कित्ता, १0८
६) कित्ता, ११0
७) कित्ता, १११
८) बिपीनचंद्र ॲन्ड ऑदर्स : इंडिया आफ्टर इंडिपेन्डस, १९७४-२000, पृ. ४५,४६
९) गुहा रामचंद्र, गांधीनंतरचा भारत, २00७, पृ. २७
१0) कित्ता, पृ. २८
११) कित्ता, पृ. २९
१२) डॉ. कोलारकर शं. गो., स्वंतत्र हिंदुस्थानचा इतिहास, (१९४७-१९८0), श्री मंगेश प्रकाशन, नागपूर, पृ. ११६
१३) भोळे भा. ल., आधुनिक भारताचा राजकिय विचार, पृ. ४५

68. सांगली संस्थान : एक अभ्यास

प्रा. डॉ. प्रमोदकुमार ओलेकर
सहा. प्राध्यापक, इतिहास विभाग,
आर्टस् ॲन्ड कॉमर्स, कॉलेज, आष्टा.

लक्ष्मण जयसिंग कांबळे
संशोधक विद्यार्थी, इतिहास विभाग,
शिवाजी विद्यापीठ ,कोल्हापूर .

ब्रिटिश काळात मुंबई इलाख्याच्या दक्षिण आणि पश्चिम भागात लहानमोठी मिळून १८ संस्थाने होती . ही 'दक्षिणेकडील संस्थाने' किंवा 'डेकन स्टेटस्' म्हणून ओळखली जात होती . त्यातलेच एक सांगली संस्थान होय .१८ व्या शतकात पेशवाईत सरदारांची जी अनेक घराणी उदयाला आली आणि ज्यांच्या पराक्रमावर पेशव्यांच्या सत्तेचा विकास होऊन ती टिकून राहीली ,त्यात पटवर्धन घराण्याचे योगदान महत्वपूर्ण आहे . ज्यापठमाणात उत्तर भारतात शिंदे, होळकरनी राज्यविस्तार केला तशीच दक्षिणेकडे ती लाट श्रीरंगपटटणला धडकली . पेशवाइचा दक्षिण हिंदूस्थानात तो पठभाव पडला, या यशाचे पटवर्धन सरदार प्रमूख मानकरी आहेत . नानासाहेबांच्या कारकिर्दितच पटवर्धनांनी मंगळवेढा, मिरज, कुरूंदवाड आदी इतर ठिकाणच्या जहागिरी मिळवल्या . पूढे माधवराव पेशव्यांच्या कारकिर्दिमध्ये या जहागिरांना अधिकृत मान्यता पुणे दरबाराकडून देण्यात आली .

सांगली संस्थानचा पूर्वेतिहास ः

पटवर्धनांचे मूळ पुरूष हरभट मूळचे रत्नागिरी जिल्हयातील कोतवाडे गावचे होते . इ .स . १७00 च्या आसपास ते देशावर आले .[१] हरभटचा चौथा मुलगा गोविंद हरी यांनी कृष्णा काठी सांगली जवळ "हरिपूर" गाव वसवले . तसेच तेथे श्री गजाननाची स्थापना इ .स .१७६७ ला केली . गोविंद हरीने त्याच्या भावासह चाकरी करावी म्हणून माधवराव पेशव्यांनी मिरज,कुख्ंडवाड,सांगलीच्या आसपासचा पठदेश दिला . गोविंद हरीस गोपाळराव, वामनराव, पांडुरंग व गंगाधर अशी चार मुले होती . गोविंद हरीनंतर पांडुरंगरावांचा व्दितीय पुत्र चिंतामणराव आप्पा यांना ६ फेबुठवारी १७८३ रोजी पेशवे दरबाराकडून सरदारकीची वस्त्रे मिळाली .[२] हेच चिंतामणराव पटवर्धन पुढे सांगली संस्थानचे संस्थापक ठरले .

भौगोलिक पाश्वभूमी ः

सांगली संस्थानच्या भौगोलिक स्थानाबददल पातह असताना ते बरेच विस्तृत असल्याचे दिसते . उत्तरेस भिमानदी दक्षिणेस तुंगभद्रा नदीपर्यंत होते . संस्थानचा एकूण भूभाग १११२ चौरस मैल होता . पठशासकीय सोयीसाठी मिरज, कूची, मंगळवेढा, तेरदाळ, शहापूर, सांगली असे सहा तालुक्यामध्ये विभाजन केलेले होते . लोकसंख्या २,५८,५१२ इतकी होती . उत्पन्न ९ लाखावरून १६ लाखापर्यंत वाढत गेले .[३] मंगळवेढा तालुका भीमा नदीच्या दक्षिणेस व सांगलीपासून ८0 मैल अंतरावर होता, तर कूची तालुका सांगली व मंगळवेढयादरम्याण असून सांगलीपासून २५ मैल अंतरावर होता, मिरज तालुका कृष्णा नदीपासून ४मैल अंतरावर होता तर तेरदाळ व शहापूर तालुका दक्षिण पूर्व भागात सांगलीपासून अनुकठमे ४0 व १५0 मैल अंतरावर होते,या संस्थानचा इतिहास तीन पीढयांचा आहे .[४]

<u>अधिपती कारकिर्द</u> ः

१) चिंतामनराव आप्पासाहेब पटवर्धन पहिले (१७८३-१८५१) ः

पांडूरंग गोविंद पटवर्धन व लक्ष्मीबाई यांच्या पोटी ५ फेब्रुवारी १७७५ रोजी झाला . त्यांचे काका परशुराम भाऊपटवर्धन यांच्या मदतीने ६ फेब्रुवारी १७८३ रोजी सांगली जहागिरीची सुत्रे हाती घेतली .[५]

मिरज जहागिरीतून विभागणी ः

सांगली संस्थानचे अधिपती चिंतामनराव आप्पासाहेब पटवर्धन ज्यावेळी धोंडया वाघाविरूध्दच्या मोहिमेत अडकून पडले त्यावेळी त्यांचे चुलते गंगाधरराव पटवर्धन हे जहागिरीतील बरीच सत्ता काबीज करण्याच्या प्रयत्नात होते . त्यामुळे त्यांचे मित्र व नातेवाईकामध्ये वादविवाद होऊलागले . शेवटी तडजोड होऊन मिरज प्रांत हा गंगाधरराव पटवर्धनांकडे तर उरलेला कृष्णा नदिच्या आसपासचा प्रदेश चिंतामनराव आप्पासाहेब पटवर्धनांकडे राहिला . या प्रदेशामध्ये त्यांनी पूढे इ .स .१८0१ मध्ये कृष्णा नदिच्या काठी सांगली नावाचे मध्यवर्ती शहर वसवले . या शहराची भरभराट होण्यासाठी अनेक सोयी सवलती उपलब्ध करून दिल्या त्यापैकी कापड, सोने-चांदी खरेदीसाठी मारवाड पेठ वसवली . शेतीच्या उत्पादनासाठी , फळे किराणामालविकीसाठी गणपती पेठ वसवली .[६] इ .स .१८0८ मध्ये संरक्षणासाठी गणेशदुर्गनावाचा किल्ला बांधला . इ .स .१८४४ साली शहरात भव्य अप्रतिम अशा गणपती मंदिराची स्थापना केली .

२) धुंडीराम तात्यासाहेब पटवर्धन (१८५१-१९0१) ः

संस्थानचे दुसरे अधिपती म्हणून धुंडीराम तात्यासाहेब पटवर्धन हे इ .स . १८५९ मध्ये सांगली संस्थानच्या गादीवर विराजमान झाले . चिंतामणराव व अंबाबाई यांचे ते जेष्ठ सुपूत्र त्यांचा जन्म इ .स . १८३८ ला झाला .[७] त्यांनी वयाच्या २१ व्या वर्षी १२ जुलै १८५९ रोजी सांगली संस्थानच्या राज्यकारभाराची सुत्रे आपल्या हाती घेतली . सांगलीच्या राजेसाहेबांना राज्यकारभाराचा अनुभव कमी असल्याने ब्रिटिश शासनाने संस्थानाच्या मदतीसाठी प्रशासन अधिकारी नेमले होते . त्यांचा कालावधी तीन वर्षाचा होता . अधिपतींनी संस्थानात अनेक रस्ते , पूल बांधून प्रजेच्या सुखसुविधा वाढविल्या . इ .स .१८६४-६५ सांगली - आष्टा , मिरज- कूची रस्ते केले . दळणवळणाच्या दृष्टीने अनेक गावांचा सांगली शहराशी संपर्क होऊलागला . इ .स . १८६३ मध्ये संस्थानात अफू ,भांग, गांजा अशा मादक पदार्थांच्या व्यापारावर बंदी घालण्यात आली .[८] इ .स . १८६४ मध्ये सांगली संस्थानात पहिल्यांदा मराठी ,इंग्रजी शाळेची स्थापना झाली . इ .स .१८६४-६५ ला स्वतंत्र तुरूंगाची व्यावस्था कारण्यात आली . तसेच स्त्री व पुरूष गुन्हेगारांसाठी स्वतंत्र व्यावस्था करण्यात आली . इ .स .१८७५ मध्ये संस्थानात प्रथमच सांगली नगरपरिषदेची स्थापना झाली .[९] व्यापार ,कलाकैशल्याची वाढ, उदयोगधंदयांची स्थापना अशा प्रजेच्या हितसंबंधाच्या अनेक गोष्टी त्यांनी केल्या .प्रजेचा पैसा प्रजेच्या हितासाठी वापरलाा जात . व्यापारी पेठेची भरभराट श्रीमंत तात्यासाहेब यांनी केली . प्रजेचे हितसंबंध लक्षात घेऊन राज्यकारभार चालवला जात होता . शहापूर येथे एक

वर्तमानपत्रही प्रसिध्द होत होते . संस्थानचे दुसरे अधिपती धुंडीराम तात्यासाहेब पटवर्धनांच्या मृत्यूनंतर त्यांना पुत्रसंतान नसल्याने १९०१-१९१० पर्यंत ब्रिटिश प्रशासक सांगली संस्थानचा कारभार केला .[१०]

३) श्रीमंत चिंतामनराव आप्पासाहेब पटवर्धन दुसरे (१९०१-१९४८) ः

सन १९०१ ते १९१० या कालखंडात सांगली संस्थानात संस्थानिक अल्पवयीन असल्याने राज्य कारभार चालविण्यासाठी ब्रिटिशांनी प्रशासक नेमले होते . श्रीमंत तात्यासाहेब नंतर अज्ञान कारकिर्दीत सांगली संस्थानचे अधिकार काही वर्षे रावबहादुर अचुत भास्कर देसाई केला . त्यांनी संस्थानात रेल्वेसारख्या योजना सुरू केल्या . त्यानंतर कॅप्टन वर्क या ॲडमिनिस्ट्रेटरकडे गेला . शिक्षण , व्यापार, सुव्यवस्थित राज्यकारभार इ . गोष्टीची प्रगती झाली की, इतर संस्थानातील व खलसातील वांधव प्रेमळ हेव्याने सांगली संस्थानाकडे पाहू लागले . प्राथमिक व सक्तीच्या शिक्षण चालू केले त्यांनी 'रयत सभेची' स्थापना केली .[११] या काळात ब्रिटीश हिंदूस्थानात स्वदेशी, बहिष्कार, राष्ट्रीय शिक्षण अशा अनेक चळवळी लोकमान्य टिळकांकडून केल्या त्यास मनुष्यवळ ,द्रव्यवळ देण्यात सांगली संस्थानने मोठया प्रमाणात भाग घेतलेला दिसून येतो . श्रीमंत चिंतामनराव आप्पासाहेब पटवर्धन (दुसरे) यांचा जन्म राजघराण्याशी संबंधित एका कुटूंबात १४ फेबुठवारी १८९० मध्ये झाला . त्यांच्या वालपणीच त्यांच्या जनक पित्याचा मृत्यू झाला . सांगलीचे अधिपती श्रीमंत धुंडीराम तात्यासाहेब निपूत्रीक वारले . दत्तक विधान होवून विनायकराव भाउसाहेब सांगली संस्थानच्या राजघराण्यात आले . त्यांचे 'चिंतामनराव आप्पासाहेब'असे नामकरण केले . सांगली संस्थानचे तिसरे अधिपती म्हणून विठटीश सरकारकडून अधिकृतपणे त्यांची नियुक्ती झाली .[१२] त्यांची राजकोटच्या राजकुमार कॉलेजमध्ये शिक्षणाची व्यावस्था कारण्यात आली . सहा वर्षात औपचारिक शिक्षणावरोवर मैदनी खेळ ,पोहणे,घोडयावर वसणे असे पठशिक्षण घेतले .[१३] यावेळीच उदारमतवादी विचार, लोकशाहीनिष्टा हे संस्कार त्यांच्यावर झाले . शिष्टाचार, नागरिक नितीचे वस्तूपाठाचे पठतिविंव नंतर त्यांच्या निर्णयात पडलेले दिसतात . २जून १९१० रोजी त्यांनी राज्यकारभाराची सुत्रे हाती घेतली . श्रीमंतानी जुन्या कारकिर्दीची नव्या कारकिदीशी सांगड वरोवर घालून राज्यकारभार चांगला केला .[१४] साम्राज्या सरकारशी आपले संवंध पूर्वीप्रमाणे चांगले राखण्याची दक्षता घेतली . पहिल्या महायुध्दात सांगली संस्थानतर्फे सर्वतोपरी सहकार्य केले व साम्राज्या सरकारकडून पदव्या व वंशपरंपरा ११ तोफांची सलामी वगैरे सन्मान मिळवून संस्थानचा दर्जा वराच वाढविला . यावरून 'मूत्सददी संस्थानिक' म्हणून त्यांची योग्यता साम्रज्य सरकारास पडली . सक्तीच्या मोफत शिक्षणाच्यावावतीत सल्ला देण्यासाठी राजेसाहेवांनी इ . स .१९२९ मध्ये एक समिती नेमली व तिच्या शिफारशी संस्थानात लागू केल्या . वहुतेक सर्व गावांमध्ये प्राथमिक शाळांसाठी स्वतंत्र इमारती वांधण्यात आल्या . इ . स .१९३० साली या योजनेखाली संस्थानात ७१ स्कूल त्यामध्ये ११८७५ विदयार्थी होते . सांगलीत खाजगी माध्यमिक शाळांनाही राजेसाहेवांनी मदत केली . याशिवाय ट्रेनिंग कॉलेज, विजय मॉंटेसरी स्कूल यासारख्या संस्था तसेच संस्कृत भाषेच्या अध्ययनासाठी सांगलीत एक स्वतंत्र पाठशालासही मदत केली होती .[१५] संस्थानच्या शिक्षण खात्याने वालवीर चळवळीसाठी स्वतंत्र निधी उभा केला होता . विलीनीकरणाच्या वेळी ५000 रू चा स्वतंत्र निधी जिल्हा स्कूल वोर्डाकडे सुपुर्त करण्यात आला होता .

विलिनिकरण ः

१५ ऑगस्ट १९४७ रोजी भारत ब्रिटिश राजवटीखालून पूर्णपणे मुक्त व स्वतंत्र झाला . या स्वतंत्र भारताच्या प्रशासनाच्या मते भारतीय लोकांनी एकसंध भारत वनवण्यासाठी हातभार लावावा असे आवाहन केले यावेळी स्वतंत्र भारतातील वरिच संस्थाने विलीन झाली . १९ फेबुवारी १९४८ रोजी सांगली संस्थान भारतात विलीन झाले . ८ मार्च १९४८ ला विलिनीकरनाचा मोठा समारंभ झाला .[१६] तो यशस्वीरित्या पार पडला .

निष्कर्ष ः

ईस्ट इंडिया कंपनीकडून व्हिक्टोरिया राणीने भारताचा सर्व कारभार आपल्या ताव्यात घेतला . तेव्हा प्रत्यक्ष ब्रिटीशांनी पुर्वी जिंकून घेतलेला मुलुख सोडून भारतातील इतर सर्व सरदार, जहागीरदार यांच्याकडचा प्रदेश माञ त्यांना अंतर्गत स्वातंत्र्य देवून त्यांच्याकडेच ठेवली . मुंवई इलाख्याच्या दक्षिण आणि पश्चिम भागात लहानमोठी मिळून १८ संस्थाने नांदू लागली . त्यांना 'दक्षिणेकडील संस्थाने' किंवा 'डेकन स्टेटस्' असे नाव असून त्या सर्वांचा मुख्य अधिकारी रेसिडेन्ट कोल्हापूरात राहून त्यांच्यावर देखरेख केली . शेवटी ८ मार्च १९४८ रोजी सर्व संस्थाने विलीन झाली .

संदर्भ ः १) द . वा . पारसनीस : द सांगली स्टेट (मुंवइ १९१७)पृ:२

२) गो . ज . कुंटे : चिंतामणराव आप्पासाहेव यांचे चरित्र (सांगली :१९७१)पृ:१३

३) वि . अ . पटवर्धन :संस्थानातील लोकशाहिचा लढा संस्थान कचेरी पूणे १९४० पृ:१५४

४) किल्ता ; पृ:१५५ ५) वि . अ . पटवर्धन : संस्थानीकरणाच्या विलीनीकरणाच्या कथा १९६६ . पृ:७

६) किल्ता : द . वा . पारसनीस : द सांगली स्टेट (मुंवई , १९१७) , पृ:१७

७) पी . ए . लिमये : सांगली स्टेट (१९१०-१९४८) चिंतामणराव पटवर्धन , १९५५ , पृ:१३

८) ज . वा . आपटे : संस्थापक पटवर्धन घराण्याचा इतिहास , १९१९

९) भ . अ . दप्तरदारः हिज हायनेस श्रीमंत चिंतामणराव आप्पासाहेव पटवर्धन , १९६०

१०) साप्ताहिक द . महाराष्ट्र , सांगली

११) वि . अ . पटवर्धन :संस्थानातील लोकशाहिचा लढा , संस्थान कचेरी , पूणे , १९४०

१२) पठा . काळे क . श्री . , चिंतामणराव आप्पासाहेव पटवर्धन राजेसाहेव,अंक तुषार,१९६५-६६ ,पृ . १

१३) किल्ता : पृ . २ १४) भालचंद्र दडगे : सांगली नगरपरिषद महोत्सव , स्मरणिका (१९७६)

69. छत्रपती राजाराम महाराजांचे शैक्षणिक कार्य

कु. रोहिणी रामचंद्र हाके
संशोधक विद्यार्थी, इतिहास विभाग,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

सामाजिक आणि शैक्षणिक क्षेत्रात कांती करणाया राजर्षी शाहू महाराजांचे प्रथम चिरंजीव म्हणजेच छत्रपती राजाराम महाराज. राजाराम महाराजांचा जन्म ३0 जुलै १८९७ रोजी झाला. वयाच्या २५ व्या वर्षी ३१मे १९२२ रोजी त्यांचा राज्याभिषेक झाला.[१] १९१२ मध्ये राजाराम महाराज शिक्षणासाठी युरोपला गेले. बर्नहॅम हाऊस शाळेत व नंतर ऑक्सफर्ड येथील सेंट एडवर्डस शाळेत अत्याधुनिक शिक्षण घेतले.[२] नंतर शेतीच्या शिक्षणासाठी अलाहाबाद येथिल युविंग ख्रिश्चन कॉलेजमध्ये प्रवेश घेतला.[३] स्वतः सुशिक्षित असल्याने व परदेशी शिक्षण घेतल्याने आंतरराष्ट्रीय दृष्टीने शिक्षणाचे महत्व छत्रपती राजराम महाराजे जाणून होते. त्यामुळे वडिल छ.शाहू महाराजांचे शैक्षणिक कार्य राजराम महाराजांनी पुढे चालू ठेवले. कोल्हापूर संस्थानात शैक्षणिक कार्याची सुरवात १८४८पासून झाली.[४]

छत्रपती राजाराम महाराजांच्या कारकिर्दीत कोल्हापूरची नगरपालिका लोकनियुक्त झाली. (१९२५) व इलाखा पंचायतीची स्थापना १९२७ मध्ये करून प्राथमिक शिक्षण व देवस्थाने इ. लोकांकडे देण्यात आली.[५] अशाप्रकारे इलाखा पंचायतीकडे शिक्षण खाते आले. शिक्षणाच्या प्रवाहामध्ये तीन शाखा महत्वाच्या होत्या.उदा. देशी भाषातून शिक्षण देणाया शाळा इंग्रजी भाषातून शिक्षण देणाया शाळा व महाविद्यालये.मुलींच्या शाळेत घरकाम, शिवण काम, गाणी यांना महत्व दिले जात होते.[६] देशी भाषातून शिक्षण देणाया शाळा व इंग्रजी भाषातून शिक्षण देणाया शाळांमध्ये हरिजन विद्यार्थांना जोपर्यंत ते नापास होत नाहित तोपर्यंत शिक्षण विनामूल्य होते. महाविद्यालये व इंग्रजी शाळा ह्या मुंबई विद्यापीठाशी सलग्नित होत्या.[७]

सामान्य शिक्षण देणाया शाळा व महाविद्यालयांसोबत व्यवसायिक शेती व तंत्रज्ञान विषयक शिक्षण देणाया संस्था तसेच शिक्षण पुरक संस्था उदा. आयर्विन ॲग्रीकल्चरल म्युझियम, कोल्हापूर जनरल लायब्ररी तसेच सातवाहन, मोघल आणि ब्रिटिश काळातील नाणी, शिलालेख, ताम्रपट, प्राचिन वस्तू यांच्या संवर्धनासाठी पुरातत्व विभाग या सर्व संस्था कोल्हापूर संस्थानाने अनुदानित केल्या.[८]

कोल्हापूर संस्थानातील मध्यमिक शाळा व विद्यार्थी संख्या[९]

अ.क	मध्यमिक शाळांची नावे	वर्ष १९३८ ३९
१.	राजाराम हायस्कूल	४९८
२.	श्री महाराणी लक्ष्मीबाई गर्ल्स हायस्कूल	३११
३.	श्री महाराणी लक्ष्मीबाई राधाबाई हायस्कूल	१५५
४.	मॉडेल हायस्कूल	३१६
५.	शाहू दयानंद फ्री हायस्कूल	२२२
६.	सिटी हायस्कूल	२२२
७.	न्यू इंग्लीश स्कूल	३२७
८.	प्रायवेट इंग्लीश हायस्कूल	२७७
९.	विदयापीठ हायस्कूल	२७३
१0.	आयर्विन ख्रिश्चन हायस्कूल	२७९
११.	इस्टर्न पॅटर्न गर्ल्स हायस्कूल	१२८
१२.	श्री शाहू हायस्कूल कागल	१४६
१३.	गोविंदराज इंग्लीश हायस्कूल इचलकरंजी	२१४
	एकूण	३३६८

कोल्हापूर संस्थानात १९२२साली ५५९ इतक्या शैक्षणिक संस्था होत्या.[१०] त्यांची संख्या वाढून १९४0 साली ती ८५४ इतकी झाली. कोल्हापूर संस्थानातील शैक्षणिक संस्थाची संख्या व खर्च दाखविणारा तक्ता[११]

 ISBN 978-93-5212-145-8

अ . क	वर्ष	शैक्षणिक संस्थाची संख्या	खर्च
१ .	१९२९ ३0	७५५	४११९३0
२ .	१९३0 ३१	७८१	५६७७६१
३ .	१९३१ ३२	८0७	५२९१५३
४ .	१९३२ ३३	८१६	५५६२४१
५ .	१९३३ ३४	८१७	५९0६00
६ .	१९३४ ३५	८४२	६६७५२५
७ .	१९३५ ३६	८३५	६८४६00
८ .	१९३६ ३७	८४१	७१0७८0
९ .	१९३७ ३८	८३२	७२९१५0
१0 .	१९३८ ३९	८४२	७५६0७४
११ .	१९३९ ४0	८५४	७३४४७७

उच्च शिक्षण ः

१ साइक्स लॉ कॉलेज ः

जून १९३३ला साइक्स लॉ कॉलेजची स्थापना झाली . २ नोव्हेंबर १९३३ ला मुंबईचे गव्हर्नर फेडरीक साइक्स यांच्या नावावरून या कॉलेजला साइक्स लॉ कॉलेज असे नाव देण्यात आले . सुरवातीला लीगल एज्युकेशन कॉन्सिलकडे या कॉलेजचे प्रशासन होते . ३१ ऑक्टोबर १९३९ला ते प्रत्यक्ष कोल्हापूर संस्थानच्या नियंत्रणाखाली आले . या कॉलेजमध्ये १९३९ ४0 या वर्षात एकूण २११ विद्यार्थी शिक्षण घेत होते . या कॉलेजमध्ये कोल्हापूर संस्थानाशिवाय इतर संस्थानातील विद्यार्थीही शिकण्यासठी येत होते हे खालील तक्त्यावरून स्पष्ट होते .

संस्थान	विद्यार्थ्यांची संख्या	संस्थान	विद्यार्थ्यांची संख्या
वेळगाव	३६	कोल्हापूर	५५
वीजापूर	८	म्हैसूर	१८
धारवाड	२१	औंध	१
खारवार	१	नाशिक	१
साऊथ कॅनरा	१	अहमदनगर	२
नॉर्थ कॅनरा	२	खानदेश	३
वेल्लारी	४	वडोदा	१
रायचुर	१	ग्वाल्हेर	१
अनंतपूर	१	जमखंडी	४
रत्नागिरी	७	कुरूंदवाड	१
सातारा	१९	मिरज	२
सोलापुर	८	मोधोळ	४
मुंबई	१	सांगली	७

वी . टी . कॉलेज

वी . टी . कॉलेजची स्थापना २0जून १९३४ ला झाली . साइक्स लॉ कॉलेजप्रमाणे या कॉलेजमध्ये कोल्हापूर संस्थानाशिवाय इतर संस्थानातील विद्यार्थीही शिकण्यासठी येत होते हे खालील तक्त्यावरून स्पष्ट होते .

संस्थान	विद्यार्थ्यांची संख्या	संस्थान	विद्यार्थ्यांची संख्या
कोल्हापूर	२०	खानदेश	९
काश्मिर	२	मुंबई	१०
सांगली	२	पूणे	१०
औंध	२	रत्नागिरी	७
मिरज	१	सातारा	६
जमखंडी	१	सोलापुर	५
कुरूंदवाड	१	अहमदनगर	४
रामदुर्ग	१	बेळगाव	३
फलटन	१	धारवाड	२
करवीर	२	कुलाबा	३
वीजापूर	१	सुरत	१
नाशिक	१	गोवा	१
मुत्तरा	१	अहमदाबाद	२

वरील तक्ता वेगवेगळया संस्थानातून आलेल्या विद्यार्थ्यांची संख्या दर्शवतो .

राजाराम कॉलेज ः राजाराम कॉलेज १९२६ मध्ये दरबार देखरेखीखाली आले . १९२६ मध्ये राजाराम कॉलेजमध्ये१७० विद्याथी शिक्षण घेत होते . राजाराम महाराजांच्या प्रोत्साहनामुळे १९३८ मध्ये ही संख्या ८०० पर्यत पोहचली .

छ . राजारामकालीन तांत्रिक व व्यवसायिक शिक्षण देणाया संस्था ः

१ . जयसिंगराव घाटगे टेक्नीकल स्कूल ः सामान्य शिक्षणावरोवर तांत्रिक व व्यावसायिक शिक्षणाचे महत्त्व राजाराम महाराजांना वाटत होते . त्यामुळे त्यांनी आपल्या काळात वेगवेगळया प्रकारच्या तांत्रिक व व्यावसायिक शिक्षण शाखा सुरू केल्या व चालवल्या जयसिंगराव घाटगे टेक्नीकल स्कूलमध्ये ड्राईंग कारपेंटीग इ . विषय शिकवले जात होते . सन १९३९ ४० या शैक्षणिक वर्षात एकूण ६५ विद्यार्थी शिकत होते . या संस्थाचा खर्च दरवारामार्फत चालवला जात होता .

२ . ओव्रायन टेक्निकल स्कूल ः ओव्रायन टेक्निकल स्कूल या तंत्रशाळेची स्थापना १९२८ साली झाली . तिच्या इमारतीकरता एक लाख रू . खर्च झाला . शाळेच्या एकंदर सामग्रीवर ५० हजार खर्च झाले . शाळा कॉलेजमधील विद्यार्थ्यांना औद्योगिक शिक्षण देणे हे या संस्थेचे ध्येय होते . या शाळेत मॅकॅनिकल इंजिनिअरींग व्हिवींग इलेक्ट्रो प्लेटिंग इ . पूर्णवेळ कोर्स तर इलेक्ट्रोप्लेटिंग डाईंग ऑइल इंजिन इनग्रव्हींग अंशकालीन कोर्स उपलब्ध होते . १९३९ ४० या शैक्षणिक वर्षात ७३२ विद्यार्थी ओव्रायन टेक्निकल स्कूलमध्ये शिक्षण घेत होते . अशाप्रकारे राजाराम महाराजांनी प्राथमिक माध्यमिक व उच्च शिक्षणावरोवर व्यवसायिक शिक्षण शेती कायदा व उच्च शिक्षण यांनाही महत्व दिले . शिक्षणाचा प्रसार करण्यासाठी शिष्यवृत्ती वसतीगृह अशा सुविधा त्यांनी विद्यार्थासाठी उपलब्ध करून दिल्या . छत्रपती राजाराम महाराजांनी केलेल्या या प्रयत्नामुळे त्यांचे शैक्षणिक कार्य महत्वाचे ठरते .

संदर्भ ः गर्गे . स . मा ., करवीर रीयासत गो . य . राणे प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती, १९६८, पृ . ४५४

प्रि . राणे अमरसिंह (संपा .) , युगयुगीन करवीर, भारतीय इतिहास संकलन समिती, कोल्हापूर, २०१३, पृ . १७१

गर्गे . स . मा . , करवीर रीयासत, उपरोक्त, पृ . ४५४

Kolhapur Administration Report 1940-41 page 147

गर्गे . स . मा ., करवीर रीयासत, उपरोक्त पृ . ४५

Kolhapur Administration Report 1939-40 page 153, 154, 156, 159, 175

हेरवाडे श्रीधर, छत्रपती राजाराम चरित्र ग्रंथ, छत्रपती राजराम प्रतिष्ठान, कोल्हापूर, प्रथमावृत्ती १९८३, पृ ७२

प्रि . राणे अमरसिंह (संपा .) , युगयुगीन करवीर, उपरोक्त , पृ . १७१

70. छत्रपती शाहू महाराजांचे कृषि-विषयक योगदान

कु. शुभांगी माने
संशोधक विद्यार्थी, इतिहास विभाग,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

प्रस्तावना :

कोल्हापूर संस्थानची अर्थव्यवस्था भारत देशाप्रमाणे कृषीप्रधान अर्थव्यवस्था होती. कारण त्या काळात या संस्थानात कोणतेही उदयोगधंदे किंवा इतर पर्यायी अर्थव्यवस्था नव्हती. ज्या देशाची अथवा संस्थानाची अर्थव्यवस्था ही कृषीप्रधान आहे. तेथे शेती विकास व त्याचे आधुनिकीकरण हा विषय अत्यंत महत्वाचा असतो. म्हणून संस्थानचा आर्थिक विकास साधावयाचा असल्यास ज्या शेती व्यवसायात ७0 टक्के पेक्षा जास्त लोक गुंतलेले आहेत. त्या शेती विकासाला प्राधान्य देण्याशिवाय पर्याय नाही हे ओळखून छ. शाहु महाराजांनी कृषी विकासासाठी प्राधान्य दिले. त्यामुळे कोल्हापूर संस्थानातील कृषी विकासाचे संपूर्ण श्रेय छ. शाहु महाराजांना जाते. शाहु महाराजांनी आपल्या कार्यकर्तुत्वाने शेतीला विशेष प्रोत्साहन देऊन शेतीचा विकास घडवून आणला.

संस्थानाची भौगोलिक स्थिती :

"कोल्हापूर संस्थान ७३° ते ७४° पूर्व रेखांश व १५° ते १७° उत्तर अक्षांशावर आहे. पूर्व व दक्षिण सीमेवर बेळगाव जिल्हा (कर्नाटक राज्य) आणि गोवा प्रदेश, नैऋत्य व पश्चिम दिशेस गोवा व रत्नागिरी जिल्हा, उत्तर व पूर्व बाजूस सांगली जिल्हा असून संस्थानचा विस्तार ८२८८ चौ. कि. मी. आहे."[२] संस्थानातून पंचगंगा, दुधगंगा, वेदगंगा, भोगावती, कुंभी कासारी, घटप्रभा, कृष्णा इ. नद्या वाहत असून सह्याद्रीच्या कुशीत हे संस्थान वसलेले आहे. त्याची पूर्व पश्चिम लांबी सुमारे ११0 कि. मी. असून पर्जन्यमान, जमीन, हवामानाबाबत विविधता आहे. संस्थानात पश्चिमेकडील गगनबावडा पेट्यात सुमारे ६000 मि. मि. इतका पाऊस पडतो, तर पूर्वेकडे कमी कमी होत शिरोळ पेट्यात सरासरी ५00 मि. मि. पाऊस पडतो. "संस्थानात तांबट, मध्यम काळी आणि काळी अशा तीन प्रकारची जमिन असून या जमिनीमध्ये भात, खरीप ज्वारी, रब्बी ज्वारी, बागायत व जिरायत गहू इ. अन्नधान्ये, हरभरा, वाटाणा, तुर, इ. कडधान्ये आणि ऊस, हळद, भुईमुग, मिरची, कापूस, तंबाखू इ. नगदी पिके घेतली जात."[३]

● शाहु महाराजांचे कृषि-विषयक कार्य :

राधानगरी धरणाची निर्मिती :

शेतीला पाणीपुरवठा करण्यासाठी शाहु महाराजांनी १९0२ मध्ये सार्वत्रिक पाटबंधारे धोरण जाहीर केले. त्यासाठी स्वतंत्र पाटबंधारे खात्याची निर्मिती करुन त्यावर खास इरिगेशन ऑफिसरची नेमणूक केली. कृषीला पाणीपुरवठा करण्याची त्यांची सर्वात महत्वपूर्ण योजना म्हणजे त्यांनी बांधलेले राधानगरी धरण होय.[४] भोगावती नदीवरील राधानगरी धरण हा कोल्हापूर जिल्ह्यातील जलसिंचनातील सर्वात मोठा पहिला प्रकल्प होय. दुष्काळापासून शेतकऱ्यांची कायमची सुटका करण्यासाठी जागतिक किर्तिचे अभियंते विश्वेश्वरय्या यांना संस्थानचा पाहणी दौरा करण्यास महाराजांनी सांगितले. विश्वेश्वरय्या यांनी संस्थानचा दौरा करून अहवाल सादर केला. फैजिवडे नजीक भोगावती नदीवर धरण बांधण्याचे महाराजांनी निश्चित केले. या सर्व्हेसाठी दोन हजार एकशे सत्तेचाळीस रूपये इतका खर्च आला होता.

हा प्रकल्प उभा करण्यासाठी भोगावती नदी आणि तिचा परिसर निवडण्याचे कारण म्हणजे या भागात वार्षिक सुमारे ५000 मि. मि. इतका पाऊस पडतो. हा प्रदेश मातीचा पातळ थर असलेला ट्रॅप जातीच्या खडकांनी बनलेला आहे. अतिवृष्टी होऊन सर्व जलसाठा वाहुन गेल्यावर तेथील नद्याही उन्हाळ्यात कोरड्या पडतात. पाणलोटाच्या क्षेत्रात लोकवस्ती विरळ असून प्रकल्पाची मुख्य जागा जलसाठ्याच्या दृष्टीने सुयोग्य आहे. याशिवाय हा प्रदेश डोंगराळ असल्यामुळे नदीकाठची जमीन ऊसाच्या पिकासाठी अत्यंत उपयुक्त असुनही तिचा पाण्याअभावी वापर होऊ शकत नव्हता. या सर्व गोष्टीचा अभ्यास करून शाहु महाराजांनी फेजिवडे गावाजवळची ही जागा धरणासाठी निवडली.[५] या जागेवर ३६00 फूट लांबीचे आणि ११0 फूट उंचीचे धरण बांधले जाणार होते. या धरणाचा खर्च केवळ ३0 लाख रू. येणार होता. तर २0 हजारहुन अधिक जमीन ओलिताखाली येणार होती. तसेच या धरणामुळे बुडीत जाणाऱ्या जमिनीचे प्रमाणही अत्यल्प होते. महाराजांनी या योजनेस न ३९0/१९0८ दि. २२.0९.१९0८ रोजी महाराणी लक्ष्मीबाई तथा आईसाहेब यांच्या हस्ते सुरवात केली.[६] राधानगरी धरणास राधानगरी हे नाव छ. शाहु महाराजांच्या कन्या राधाबाई उर्फ आक्कासाहेब यांच्या नावावरून ठेवण्यात आले. त्यावेळी राधाबाईचा विवाह नुकताच संपन्न झाला होता. त्यांच्या स्मरणार्थ नियोजित धरणाजवळ राधानगरी हे गाव वसवले आणि धरणाला राधानगरी धरण हे नाव दिले.[७] तसेच धरणाच्या तलावाला राणी लक्ष्मीबाई हे नाव शाहु महाराजांच्या पत्नी राणी लक्ष्मीबाई यांच्या नावावरून देण्यात आले.[९]

महाराजांनी ८ मार्च १९0९ रोजी अबाजीराव ज्योत्याजीराव मोहिते यांची स्पेशल डेप्युटी मामलेदार पदी नेमणूक केली. त्यांच्यावर या प्रकल्पात जाणाऱ्या जमिनी ताब्यात घेण्याचे व त्यांची नुकसान भरपाई संबंधीत व्यक्तींना देण्याची जबाबदारी सोपवण्यात आली होती. त्यानुसार या प्रकल्पाच्या प्रभाव क्षेत्रात जाणाऱ्या ७ गावांच्या विस्थापितांच्या भरपाईचा अंदाज रू ७0 हजार इतका खर्च धरण्यात आला होता. तसेच प्रकल्पामध्ये जमिनी जाणाऱ्या शेतकऱ्यांना केळोशी, म्हासुर्ली, वाकीघोल, तारळे, चंदे व तिटवे इ. ठिकाणच्या जमिनी देण्याचा निर्णय घेतला.[१0] परंतू लोकांना आपल्या

परंपरा व गाव सोडणे अडचणीचे होऊ लागल्याने त्यांनी धरण प्रकल्पाशेजारी असणाऱ्या जंगलातील मुलकी पडजमिनी कसण्यास सुरवात करून तेथे वसाहत स्थापन केली. महाराजांनी या प्रकल्पात बुडणाऱ्या गावांना रोख रक्कम दिल्याचेही दिसुन येते. सन १६.०२.१९११ मध्ये फेजिवडे येथील मुसलमानवाडी हा गाव पूर्णपणे या प्रकल्पात जात असल्याने तेथील घरांच्या किमतीबद्धल पंचनामा करून २५ घराबद्धल कॉम्पेनसेशन २३५९ रू.१२ आणे देऊन सरकारात घेतली. एकंदरीत महाराजांनी शेतकऱ्यांबरोबर विस्थापित होणाऱ्या लोकांचीही काळजी घेतल्याचे दिसुन येते. सन १९१०-११ च्या अहवालानुसार या वर्षी २ लाख घनफुट बांधकाम झाले तर या वर्षी अखेर रू ६८२९९ इतका खर्च झाला. यावेळी या प्रकल्पामध्ये तीन हजार कामगार कार्यरत होते. पुढे सन १९१८ मध्ये राधानगरी धरण प्रकल्पाचे कामकाज बंद पडले. त्यास महायुद्ध, साधनसामग्रीची कामतरता व खाजगी कारणे कारणीभूत होती. परंतु हे बंद पडलेले बांधकाम महाराजांच्या हयातीत पुन्हा सुरू झाले नाही. सन १९१८ मध्ये १२०० फूट लांब व ४० फूट उंच बांधकाम पूर्ण झाले त्यावेळी त्यात ६०० दशलक्ष घनफूट इतके पाणी साचत होते.[११]

इ.स. १९११-१२ ते १९१७-१८ पर्यंत राधानगरी धरणाच्या कामाची प्रगती खालीलप्रमाणे दिसुन येते[१२]

वर्ष	वर्षातील वांधकाम (घनफूट)	एकुण वांधकाम (घनफूट)	वर्षातील खर्च रू.	एकुण खर्च रू.	कामगार
१९११-१२	२५२७००	८६६४००	१२९१७३	---	३१००
१९१२-१३	४१०५७७	५४१६१२	१४७०६७	४८६१०७	३१००
१९१३-१४	९१२९७७	२४५४५८९	२०७९६८	६९४०७६	३१००
१९१४-१५	७१६०००	३२१५५८९	१९९१६७	८९३२४३	३१००
१९१५-१६	६०००००	३८१५५८९	२२५२१९	१११८४६२	---
१९१६-१७	५०९३००	४३२४९००	१८३७०४	१३०२१६६	२०६०
१९१७-१८	६११२८	४३८६०२८	३३९६४	१३३६१३०	---

कृषी हाच विकासाचा मुलभूत पाया मानून शाहु महाराजांना राधानगरी धरण बांधले. त्यामुळे भोगावती व पंचगंगा परिसर बागायती झाला. या धरणामुळे शेतीला मोठ्या प्रमाणावर पाणी पुरवठा होऊलागला आणि कोल्हापूर संस्थानचे स्वरूप पालटले. दुष्काळापासून शेतकऱ्यांची मुक्तता झाली. धरणातील पाणी पुरवठ्यामुळे प्रचंड प्रमाणत ऊसाची लागवड, गूळ निर्मिती आणि साखर कारखाण्यांची निर्मिती यामुळे अनेक शेतकरी नगदी पिके घेण्याकडे वळलेले दिसून येतात.

कृषी विकास व विस्तार कार्यक्रम ः

पारंपारिक शेती पिके, फळपिके व औजारे यामध्ये आधुनिकता आणण्याच्या दृष्टीने छ.शाहु महाराजांनी कार्य केले.[१३] महाराजांनी कृषी विकास व विस्तार कार्यावर जास्ती भर देण्याचे ठरवून त्याकरिता एका स्वतंत्र अधिकाऱ्याची नेमणूक केली. त्याच्याकडून सर्व संस्थानात सुधारित बी-बीयाणे व औजारे वाटप करून नवीन फळ व इतर पिकांची लागवड याबाबत शेतकऱ्यांना मार्गदर्शन करण्यास सुरवात केली. तसेच नवीन बियाने, पिकाची प्रत्यक्ष लागवड करून शेतकऱ्यांना प्रत्यक्ष प्रात्यक्षीक दाखविण्यास सुरवात केली. शेतकऱ्यांना निवडक नवीन बियाणे मोफत पुरविले आणि नवीन औजारे आणून ती नाममात्र भाडख़ाने दिली. कृषी व्यवसायाचे महत्व समजून नंतरच्या काळात स्वतंत्र शेती खात्याची सुसूत्र यंत्रणा निर्माण केली. संस्थान विलीन होण्यापुर्वी या संस्थानात कृषी संचालक, राधानगरी, करवीर, हातकणंगले येथे प्रांत शेती अधिकारी व प्रत्यक्ष पेटा महालासाठी एक शेती कामगार अशी पदे मंजुर करून विस्तार कार्यास चालना दिली. शिरोळ, रायबाग, कटकोळ या भागातील विशिष्ट परिस्थिती विचारात घेऊन जमिनीची बांध बंदिस्तीची व्यवस्था व्हावी म्हणुन मृदसंधारण विभागही सुरू केला.[१४] याचबरोबर महाराजांनी कृषीमध्ये अनेक प्रयोग केले. संस्थानात भात, ऊस, ज्वारी, भुईमुग, कडधान्ये ही नेहमीची पीके घेतली जात, परंतू महाराजांनी संस्थानातील पश्चिम भागात मुबलक पर्जन्यमान असणाऱ्या सह्याद्रीच्या रांगात उतार जमिनीवर चहा, कॉफी, रबर यांचे मळे तयार केले. यापैकी चहाच्या मळ्याचा प्रयोग अपेक्षेहुन यशस्वी झाला. व्यापारी तत्वावर चहाचे उत्पादन सुरू होऊन पन्हाळा टी.नं.४ या नावाने तो संस्थानाबाहेर विशेषतः हिंदुस्थानातील राजेरजवाडे यांना पाठवला जाऊलागला.[१५]

रासायनिक खतांचा वापर ः

छ.शाहु महाराजांच्या कालखंडपूर्वी शेतकरी आपले शेतीस फक्त जनावरांपासुन मिळणारे शेण, मूत्र, काडीकचरा यापासून तयार होणरी गावखते वापरीत असत. तर नगदी व उच्च वर्गीय पिकांसाठी काही प्रमाणत ताग व कोरटा (काळातीळ) अशी पीके घेऊन जमिनीत गाडत असत व फेर माळराने बेवड पद्धतीने जमिनीची सुपिकता टिकवीत असत. भरड व हलक्या पिकांना सहसा गावखतही मिळत नसे. त्यामुळे शेती उत्पादन वाढीत रासायनिक खताचे महत्व विचारात घेऊन महाराजांनी अमोनियम सल्फेट, अमोनियम नायट्रेट, भुईमुग व करंजी पेंड वापराची मोफत प्रात्यक्षीके दाखवून अशा रासायनिक खतांच्या वापरास प्रोत्साहन दिले.[१५]

● इतर कार्ये ः सहकारी संस्थामार्फत कर्ज पुरवठा ः

शेतीचा विकास व आधुनिकीकरण होण्यासाठी शेतकऱ्यांना वेळेवर भांडवल पुरवठा होणे व मालाची योग्य विक्री व्यवस्था होणे अपरिहार्य

असते . हे शाहु महाराजांच्या लक्षात आले त्याकाळी शेतीस लागणारा कर्जपुरवठा हा बहुतेक सावकारांच्या हाती असे आणि व्याजाचा दर १२ ते ३० टक्के इतका जास्त असे . शिवाय बियाणांसाठी किंवा उपजिविकेसाठी धान्य दिले असल्यास त्याची परतफेड दुप्पटी तिप्पटीने केली जात असे आणि शेतकऱ्यांने कर्जफेड न केल्यास सावकार त्यांच्या जमिनी जप्त करत असत . त्यामुळे सेतकऱ्यांना शेतविरहीत होऊन शेतमजुर म्हणुन राबन्याची वेळ येइ .[१७] यातून शेतकऱ्यांना बाहेर काढण्यासाठी शाहु महाराजांनी संस्थानातून काही प्रमाणात मदत देऊन शेती विकासाबरोबरच शेती उदय़ोग व शेतीमालाची विक्री व्यवस्था व्हावी या उद्देशाने संस्थानात सह . पतपेठय़ा स्थापण करण्याचा निर्णय घेतला व १९१२ मध्ये सह . कायदा लागु केला . हे सहकारविषयक धोरण राबवण्यासाठी श्री . भास्करराव जाधव या धडाडीच्या अधिकाऱ्यावर या विभागाची जबाबदारी सोपविली . या प्रयत्नामुळे १९१३ मध्ये पहिली अर्बन को-ऑपरेटिव्ह संस्था स्थापन झाली . त्यानंतर बलभीम सहकारी व नंतर शाहु को-ऑपरेटीव्ह अशा संस्था निर्माण झाल्या .[१८]

इनामे अविभाज्य केली ः

कृषी अर्थव्यवस्थेस शाहु महाराजांचे सर्वात क्रांतीकारक कार्य म्हणजे त्यांनी मे १९१३ मध्ये संस्थानातील सर्व इनामे अविभाज्य ठरविली प्रत्येक पिढीबरोबर इनामाचे तुकडे होऊन कृषी उत्पादकतेवर त्याचा प्रतिकुल परिणाम होत असे म्हणून इनामे अविभाज्य करण्याचे पाऊल त्यांनी उचलले त्यामुळे मोठय़ा भावाकडे इनाम गेल्यावर उर्वरित भावांना इतर व्यवसाय शोधणे भाग पडले . याचा परिणाम असा झाला की, बरेच लोक उदय़ोगधंदे आणि व्यवसायाकडे वळले .[१९]

कृषी शिक्षण ः

शेतीचे आधुनिकीकरण व्हायचे असल्यास शेतीचे शिक्षण शेतकऱ्यांना देणे जरूरीचे आहे . हे ओळखून महाराजांनी १८९६ पासूनच राजाराम विदय़ालयात शेतीचा अभ्यासक्रम सुरु केला . पुणे येथील कृषीविषयक पदवीचे उच्च शिक्षण घेण्यासाठी शिष्यवृत्या संस्थानामार्फत सुरू केल्या . त्याचे ठळक उदाहरण म्हणजे या संस्थानातील डॉ . रावबहादर पी . सी . पाटील हे होय . त्यांनी या शिष्यवृत्तींचा लाभ घेऊन उच्च शिक्षण घेतले व आपल्या उच्च ज्ञानाचा संस्थानातील शेतकऱ्यांना फायदा करून दिला .[२०] एवढय़ावरच न थांबता शाहु महाराजांनी संस्थानचा कृषी व औदय़ोगिक विकास व्हावा म्हणून आपल्या दोन्ही सुपूत्रांना कृषी व औदय़ोगिक ज्ञान संपादन करण्यासाठी इंग्लंड व अलाहबाद येथे पाठविले होते .[२१] त्यामुळे राजाराम महाराज हे जिल्ह्यातील कृषी पदवी संपादन करणारे पहिले व्यक्तीमत्व ठरले .[२२] संस्थान काळात पुढील कृषी शिक्षण संस्था स्थापन झाला .

१ . किंग एडवर्ड ऑग्रीकल्चरल इन्स्टीटय़ुट ः

१९१२-१३ मध्ये शाहु महाराजांनी कोल्हापूर येथे "किंग एडवर्ड ऑग्रीकल्चरल इन्स्टीटय़ुट" या नावाची संस्था स्थापन केली . या संस्थेमार्फत शेतकऱ्यांत सुधारलेल्या शेती पद्धती लोकप्रिय करण्याचा प्रयत्न केला जात असे .[२३] या संस्थेची स्वतःची अशी अवजारे आहेत . उदा . ट्रॅक्टर, बोअरिंग मशिन, लोखंडी नांगर इ . त्याचबरोबर इतरही कृषीविषयक अवजारे आहेत . त्यांचा उपयोग जिल्ह्यातील सर्व शेतकऱ्यांना होता . त्याच बरोबर ही संस्था शेतकऱ्यांना सवलतीच्या दरात खते व बियाणे यांचा पुरवठा करते आणि जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या गुणवान मुलांना कृषी शिक्षण घेण्यासाठी आणि कृषी अवजारे खरेदी करण्यासाठी शिष्यवृत्या देण्याचे काम करते .[२४]

२ . राजराम हायस्कूल ः

छ . शाहु महाराजांनी राजाराम महाविद्यालयात एक मॉडर्न शेती फार्म लावून दिला व तेथे पीक प्रात्यक्षिके करवुन शेतकऱ्यांना शिक्षण देण्याचे प्रयत्न केले .[२५] १९०६-०७ मध्ये शेतकी शिक्षण आणि नमुण्याची शेती हे विषय राजाराम हायस्कूलल जोडण्यात आले . प्रत्येक वर्षी सरासरी १००० रू नमुना शेतीवर खर्च केले जात होते . अमेरिकन सुपारी विकत आणून ती तेथे पेरली जात होती . नांगर, कडबाकुट्टी यासारखी अवजारे विकत घेऊन त्याचा वापर करण्यास शेतकऱ्यांना मार्गदर्शन करीत असत . शेती विभागाने जपानमधील मोठी ५० पौडाची कुमठा व गदगा नं . १ ही वियाणे शेतकऱ्यांना देण्यास सुरवात केली . लोखंडी नांगर कमी किमतीत पुरवले गेले . जवळ जवळ ३०० शेतकऱ्यांनी प्रेसिडेन्सी शेतकी हा सिनेमा पाहिला . संबंधीत अधिकाऱ्यांनी शेतीच्या रोगराईबद्धल माहिती पुरवली .[२६]

३ . लॉर्ड आयर्विन शेतकी संग्रहालय ः **(The Irwin Agricultural Museum) :**

आयर्विन शेतकी संग्रहालय १९२४ मध्ये भारताचे व्हाईसराय आणि गव्हर्नर ज . लॉर्ड आयर्विन यांच्या नावाने स्थापन करण्यात आले . संग्रहालयात खासकरून शेतीमध्ये आवड असणारे लोक भेट देतात . या संग्रहालयाच्या माध्यमातून शेतकऱ्यांना आधुनिक कृषीची माहिती दिली जात असे .[२७]

४ . शाहु शेतकी शाळा **: (Shri Shahu Agricultural School)**

शाहु शेतकी शाळा ही संस्था जुनी असून कोल्हापूर संस्थानाने ती सुरू केली होती . दि . ०१ . ०६ . १९५४ पासून सरकारने सर्वत्र शाळातून सुरू केलेला २ वर्षाचा शेती कोर्स याही शाळेत शिकावला जात असे . या शाळेचे ६५ एकर ३ गुंठा क्षेत्राचे शेतकी फार्म असून ग्रामसेवक सराव केंद्राच्या व शाहु शेतकी शाळेच्या विद्यार्थ्याकडून या फार्मवर प्रात्यक्षीके करून घेतली जातात . या फार्मवर निरनिराळी पीके, भाजीपाला, फळे पिकविली जातात . तसेच शाळेची काही जनावरेही आहेत .[२८]

५ . अमेरिकन शेतकी शाळा ः

अमेरिकेच्या सेवाभावी सस्थेने संस्थान काळात कोल्हापूर मध्ये शेतकी शिक्षण देणाऱ्या शेतकी शाळा सुरू केल्या आणि प्रत्येक विद्यार्थ्याला १० रू विद्यावेतन सुरू केले .[२९] एका वर्षात वर्गामध्ये ७ विद्यार्थी शेतकी विषय शिकत होते . राज्याच्या प्रत्येक तालुक्यामध्ये शेतकी शाळा सुरू करण्यात

आल्या . छ . राजाराम महाराजांनी शेतकी विभागाच्या कामामध्ये फारच रस घेतला आणि लॉर्ड आयर्विन शेतकी संग्रहालयाला १ लाख रू . देण्याचा निर्णय घेतला . १९२७-२८ मध्ये अमेरिकेचे मिली ज्वारीचे २०० पौड वियाने शिरोळ तालुका व रायबाग महालमध्ये वाटप केले . त्याचप्रमाणे कापसाचा नवीन प्रकार कुमठाचे ३५ पौड वियाणे शिरोळ तालुक्यातील शेतकऱ्यांना वाटप केले . परिणामी अतिशय उत्तम उत्पादन २५ पौंडानी वाढले . जपानच्या मोठ्या शिंगाचे नवीन प्रकारचे वियाणे शेतकऱ्यांना वाटप केले .[३०]

संदर्भसूची ः

१ . फरास गनी (संपादक) ः भारतः स्वातंत्र्य आणि विकास प्रकाशन कोल्हापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि . ,कोल्हापूर . -पृ . १९८

२ . तर्कतीर्थ जोशी लक्ष्मणशास्त्री (संपादक) ः मराठी विश्वकोष खंड-४, प्रकाशक सचिव, महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ, मुंबई . पृ . ३७१

३ . फरास गनी - उपरोक्त पृ . १९७

४ . पवार जयसिंगराव (संपादक) ः राजर्षी शाहु स्मारक ग्रंथ, प्रकाशक-डॉ . पवार संचालक महामंडळ, राधानगरी रोड, कोल्हापूर ४१६०१२ . पृ . २०२

५ . पाडळकर विजय विष्णू ः स्वातंत्र्योत्तर काळातील राधानगरी तालुक्याचा राजकीय, आर्थिक व सामाजिक अभ्यास, पी . एचडी प्रबंध (अप्रकाशित) शिवाजी विद्यापिठ कोल्हापूर . पृ . २८

६ . चौधरी कि . का ः महाराष्ट्र राज्य गॅझेटियर, कोल्हापूर जिल्हा, दर्शनी विभाग महाराष्ट्र राज्य मुंबई - १९८९ . पृ . २१५

७ . पाडळकर वि . वि . - किल्ता पृ . २९

८ . चौधरी कि . का . - पृ ४७८

९ . चौधरी कि . का . - उपरोक्त पृ . २१३ .

१० . पाडळकर वि . वि . - उपरोक्त पृ . २९

११ . किल्ता पृ . ३०

१२ . चौधरी कि . का . - उपरोक्त पृ . २१३

१३ . फरास गनी- पृ . २०३

१४ . किल्ता - पृ . २०४

१५ . पवार जयसिंगराव उपरोक्त पृ . ६९४

१६ . फरास गनी उपरोक्त पृ . २०४

१७ . किल्ता पृ . २०५

१८ . किल्ता पृ . २०६

१९ . चौधरी कि . का . पृ . २४२

२० . फरास गनी- उपरोक्त पृ . २०४

२१ . किल्ता पृ . २०५

२२ . हेरवाडे श्रीधर- छ . राजराम चरित्र, ग्रंथ प्रकाशन-ॲड-महादेवराव आडगुळे चिटणीस, छ . राजाराम प्रतिष्ठान, कोल्हापूर . पृ . ५

२३ . फरास गनी- उपरोक्त पृ . २०४

२४ . Administrative Report-1930-31. P-84

२५ . फरास गनी- उपरोक्त पृ . २०४

२६ . रमेश खोत - कोल्हापूर संस्थानातील कृषी विकास (१९०१-४९) एम . फिल . प्रबंध (अप्रकाशित) शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर- पृ-१००

२७ . Administrative Report-1930-31. Opcit-84

२८ . महाराष्ट्राचे जिल्हे- कोल्हापूर- प्रकाशन - महाराष्ट्र शासन प्रसिद्धी विभाग . पृ-१०१

२९ . खोत रमेश - उपरोक्त पृ . १००

३० . किल्ता पृ-१०१

71. छ. शाहू महाराजांची क्रांतीकारी राजवट

कु. राणी गुंगा पाटिल
संशोधक विद्यार्थी, इतिहास विभाग,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

एतददेशीय संस्थाने ही मध्ययुगीन सरंजामशाही व्यवस्थेची अवशेष होते. स्वातंत्र्यपूर्व काळात आपल्या देशात लहानमोठी पाचशे बासष्ठ संस्थाने होती. मुंबई प्रांताच्या मध्य व दक्षिण भागात लहानमोठी सतरा संस्थाने व एक लहान जहांगिर होती. त्यांना सदर्नमराठा स्टेटस असे म्हणत असत. त्या अठरा संस्थानापैकी कोल्हापूर हे प्रमुख व ऐतिहासिक दृष्टया महत्वाचे संस्थान होते.[१] देशातील बहुतेक सर्व संस्थानिक ब्रिटिश अधिसत्तेचे अंकित असून त्यांचा कारभार काही अपवाद वगळता अनियंत्रित स्वरूपाचा होता. संस्थानात 'कायद्याचे राज्य' हे तत्व नावापुरते सुद्धा नव्हते. संस्थानी प्रजेला महत्वाचे राजकीय हक्क नव्हते. मात्र विसाव्या शतकाच्या सुरूवातीपासून संस्थानातील परिस्थितीत सुधारणा होऊ लागली. कोल्हापूर संस्थान हे क्षेत्रफळाच्या दृष्टीने सर्वात मोठे व सर्वाहून श्रेष्ठ असे मराठयांचे सत्ता केंद्र मानले जाते. कोल्हापूर संस्थानास करवीर संस्थान म्हणूनही ओळखले जाते. कोल्हापूर छत्रपती शिवाजी महाराजांची गादी असल्याने या संस्थानाबद्दल जनमानसात आदर, आपुलकी, जिव्हाळा रूजलेला दिसून येतो.[२] करवीर संस्थानात शाहू महाराज कोल्हापूरच्या गादीवर येण्यापूर्वी म्हणजे १८१५ ते १८८४ या ७० वर्षाच्या कालखंडात सर्वत्र मोठी बेबंदशाही होती. या काळातील पाचही छत्रपती दुर्बळ ठरले. संस्थानात पुरोहित, जहागिरदार यांच्यात ब्राम्हणांचेच वर्चस्व वाढले होते.[३]

छ. शाहू महाराजांची क्रांतीकारी राजवट :

कागलचे जहागिरदार आणि कोल्हापूर संस्थानचे रीजंट जयसिंगराव ऊर्फ आबासाहेब घाटगे यांचे चिरंजीव यशवंतराव घाटगे करवीर गादीचे वारस बनले व तेच कोल्हापूरचे छत्रपती शाहू महाराज म्हणून विख्यात झाले. ते कोल्हापूरच्या गादीवर आल्यानंतर ख-या अर्थाने कोल्हापूर संस्थानात परिवर्तनाचे नवे पर्व सुरू झाले. २ एप्रिल १८९४ रोजी शाहू छत्रपतींचा राज्यभिषेक सोहळा सपंन्न झाला.[४] एक संस्थानाधिपती यापेक्षा महाराष्ट्रातील बहुजन समाजाचे महान नेते हीच त्यांची खरी ओळख आहे. शाहू महाराजांची कारकिर्द महाराष्ट्राच्या सामाजिक चळवळीच्या दृष्टीने एक अत्यंत महत्वाचा टप्पा म्हणून ओळखली जाते.

वेदोक्त प्रकरण :

राजर्षी शाहू छत्रपतींच्या जीवनात घडून आलेले वेदोक्त प्रकरण म्हणजे आधुनिक महाराष्ट्राच्या सामाजिक जीवनात येऊन गेलेले एक प्रचंड वादळ होते. या वेदोक्ताच्या वादळाने कोल्हापुरात आमूलाग्र क्रांती घडून आली.[५] राजर्षी शाहू महाराजांच्या स्नान प्रसंगी वेदोक्त मंत्र म्हणण्याऐवजी पुराणोक्त मंत्र म्हणणा-या नारायणभटास त्यांनी जाब विचारला असता 'शुद्रासाठी पूराणोक्त मंत्र म्हणावे लागातात,' असे उद्धट उत्तर नारायण भटाने शाहू महाराजांना दिले. शुद्र म्हणून आपली हेटाळणी करावी याची त्यांना मनस्वी चीड आली व त्यांच्या डोक्यात विविध विचारांचा कल्लोळ उठला. यामधूनच ब्राम्हण व शाहू महाराज यांच्यात वेदोक्त संघर्ष सुरू झाला.[६] राजवाडयातील सर्व धार्मिक विधी वेदोक्त पद्धतीनेच केले पाहिजेत अन्यथा दक्षिणा व ब्राम्हणांना दिले जाणारे उत्पन्न बंद केले जाईल असा हुकूम राजर्षी शाहू महाराजांनी काढला. वेदोक्त प्रकरण संपूर्ण महाराष्ट्रभर गाजले. या प्रकरणात लोकमान्य टिळकांनी व प्रा. वि. घो. विजापूरकरांनी ब्राम्हणांची बाजू उचलून धरली.[७]

वेदोक्त प्रकरणाचा समारोप करताना सयाजीराव गायकवाडांचे चरित्रकार दाजी आपटे म्हणतात की शिवाजी महाराजांच्या काळी हा निर्णय लागल्यानंतर त्यांच्या वंशजांना व नातलगांना वेदोक्ताधिकार ओघानेच आले. छत्रपतीचे क्षत्रियत्व मानल्यावर कोल्हापूर बडोदे संस्थानिकांनी वेदोक्ताधिकार घेतले तर त्यांच्या कृत्याला टिळकासारख्यांनी 'खुळ' म्हणणे हे अगदी तर्कदृष्ट आहे.[८] वेदोक्त संघर्षातूनच ब्राम्हणेत्तर समाजाचा स्वाभिमान जागृत झाला. ब्राम्हणांचे वर्चस्व नष्ट करण्यासाठी राजर्षी शाहूंनी अनेक सामाजिक, शैक्षणिक प्रयत्न केले. त्यामुळेच पुढे सत्यशोधक चळवळ, आर्यसमाजाची स्थापना, क्षत्रिय जगदगुरू व्यासपीठ व ब्राम्हणेत्तर चळवळ इ. घडामोडींचा कोल्हापूर संस्थानात प्रारंभ झाला. इ.स.१९२० मध्ये राजर्षी शाहू महाराजांनी ब्राम्हणांचे वर्चस्व पुरोहितशाहीचा अंत करण्यासाठी 'शिवाजी क्षत्रिय वैदिक पाठशाळा' स्थापन केली. या शाळेतून धार्मिक विधीशिक्षण सर्व जातीतील विद्यार्थ्यांना मिळू लागले.हे विद्यार्थी विधीशिक्षण घेऊन अनेकविध धार्मिक विधी करू लागले. समाजामध्ये विवाह सुद्धा वैदिक पद्धतीने होऊलागले.[९]

सत्यशोधक चळवळ :

राजर्षी शाहू महाराजांची सर्वात महत्वाची कामगिरी अशी की महात्मा फुले यांच्या नंतर निष्प्राण होत चाललेल्या सत्यशोधक चळवळीला त्यांनी संजीवनी देऊन तिच्यात नवचैतन्य निर्माण केले. त्यामुळे येथील बहुजन समाजाची अस्मिता जागृत झाली. त्यांच्या प्रेरणेने १९११ मध्ये कोल्हापुरात सत्यशोधक समाजाची पुन:स्थापना झाली. त्यावेळी सत्यशोधक समाजाचे अध्यक्ष म्हणून भास्करराव जाधव व उपाध्यक्ष म्हणून अण्णासाहेब लठ्ठे हे काम करत होते. सत्यशोधक चळवळीला शाहूंनी आर्थिक तसेच अन्य सर्व प्रकारची मदत केली आणि बहुमोलाचे मागदर्शनही केले.[१०] सत्यशोधक चळवळीतून कोल्हापूरमध्ये बहुजन समाजातील अनेक कार्यकर्ते निर्माण झाले. भास्करराव जाधव, रामचंद्र आबाजी जाधव, दिनकराव जवळकर, खंडेराव बागल, बाबुराव यादव इ. कार्यकर्त्यांनी सक्रीय सहभाग घेऊन सत्यशोधक चळवळीची मूळ तत्वे समाजात रूजवून समाज जागृतीचे कार्य केले. यातूनच पुढे ब्राम्हणेत्तर चळवळीचा उगम झाला.[११]

ब्राम्हणेत्तर चळवळ ः

शिक्षण प्रसार, धार्मिक, सामाजिक सुधारणा इ . कारणाने जागृत झालेल्या बहुजन समाजात राजकीय आकांक्षा निर्माण करून त्यास राजकीय दृष्टया संघटित होण्याचा मंत्र देण्याचे बहुमोल कार्य शाहू महाराजांनी केले . त्यांच्याच प्रेरणेने १९२0 साली ब्राम्हणेत्तर पक्ष स्थापन झाला . त्यांच्या झेंडयाखाली फक्त कोल्हापुरातच नव्हे तर संपूर्ण महाराष्ट्रभर ब्राम्हणेत्तर चळवळ फोफावली . त्यामुळे छ . शाहूमहाराज ब्राम्हणेत्तर चळवळीचे निर्माते होते असे म्हटले जाते . महात्मा फुलेंची सत्यशोधक चळवळ ही सामाजिक, धार्मिक घटना होती तर या उलट ब्राम्हणेत्तर चळवळ ही तेली, तांबोळी, कुणबी, महार, मांग, कुंभार, लोहार आदी शुद्रातिशुद्रांना (बहुजन समाजाला) राजकीय सत्तेत सन्मानपूर्वक सहभाग लाभला पाहिजे . यासाठी अस्तित्वात आलेली राजकीय घटना होती . ब्राम्हणेत्तर चळवळीचे लोण खेडोपाडी वाडयावस्ती व समाजाच्या तळागाळा पर्यंत जाऊन पोहचले . या चळवळीच्या वाढत्या प्रभावामुळे या पुढील काळात कोल्हापुरातच नव्हे तर संपूर्ण महाराष्ट्राच्या राजकीय व सामाजिक जीवनात बहुजन समाजाला महत्वपूर्ण स्थान प्राप्त झाले .

शैक्षणिक चळवळ ः

'विद्येनेच मनुष्याला आले श्रेष्ठत्व या जगामाजी न दिसे एकही वस्तू विद्येनेही असाध्य आहे जी' यातील इंगित शाहू महाराजांनी पूर्ण ओळखले होते . विद्येचे मानवी जीवनातील महत्व ओळखून त्यांनी आपल्या संस्थानातील शिक्षणापासून वंचित असलेल्या समाजाला शिक्षण मिळावे याकरिता विविध शाळा, कॉलेज, वसतिगृह सुरू केली . शाहू महाराजांनी शिक्षण सर्वांसाठी खुले केले होते . संस्थानातील गोरगरीब विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती, सवलती, वसतिगृह इ . शैक्षणिक सुविधा त्यांनी उपलब्ध करून दिल्या . तसेच त्यांनी स्त्रिशिक्षण व अस्पृष्य शिक्षणाचाही पुरस्कार केला . त्यांनी शिक्षणातील मूठभरांची मक्तेदारी नष्ट करून शिक्षणाचे मुक्तद्वार सर्वांसाठी खुले केले .[१३] शिक्षणापासून पिढयान्पिढया वंचित असलेल्या वर्गातून बॅ . पी . जी . पाटील, रा . कृ . कणवरकर, डॉ . दत्ताजीराव साळुंखे, डॉ . राम ताकवले, डॉ . वि . भि . कोलते, प्रतापराव साळवी, शंकरराव खरात यांनी विद्यापीठाचे कुलगुरूपद भूषविले हा राजर्षी शाहू महाराजांच्या अथक परिश्रमाचा परिपाकच म्हणावा लागेल .[१४] बहुजन समाज शिक्षणामुळे जागृत झाला आणि स्वत: आपल्या हक्कासाठी लढा देण्यास सज्ज झाला . छ . शाहू महाराजांच्या या सामाजिक, शैक्षणिक चळवळीतूनच ख-या लोकशाही चळवळीस प्रारंभ झाला . या शैक्षणिक चळवळीतूनच बहुजन समाजातील अनेक नेतृत्व पुढे आले . छ . शाहूंची राजवट ही जनतेच्या अंतकरणात आपुलकी निर्माण करणारी व इतर संस्थानातील जनतेपेक्षा निराळा अनुभव देणारी होती .

संदर्भ ः

१ . Patil Padmaja, The problem of princely states and annasaheb Latthe, in "Freedom movement in princely states of Maharashtra," (Edidor) Arun Bhosale, et.al,p.134

२ . गर्गे स . मा ., करवीर रियासत, दुसरी आवर्ती, १९८0, पृ . ८५

३ . पटवर्धन वि . अ . (संपा), संस्थानातील लोकशाहीचा लढा, पृ . ४४

४ . घोरपडे ए . के, कोल्हापूरचे शाहू छत्रपती - चरित्र व कार्य पृ . ३४

५ . चौधरी कि . का . (संपा), महाराष्ट्र राज्य डिस्ट्रीक्ट गॅझेटिअर, कोल्हापूर जिल्हा, १९८९, पृ . ८२

६ . पवार डॉ . जयसिंगराव (संपा), राजर्षी शाहू छत्रपती जीवन व कार्य . पृ . ३३

७ . कित्ता, पृ . ३४

८ . खंडागळे अ . वा ., भाई माधवराव बागल एक राजकीय अभ्यास अप्रकाशित एम . फिल . शोधप्रबंध, पृ . ७

९ . कित्ता, पृ . ८

१0 . जाधव रमेश, शाहू छत्रपती आणि सत्यशोधक चळवळ, पवार डॉ . जयसिंगराव (संपा),राजर्षी शाहू स्मारक ग्रंथ पृ . ७५

११ . पोवार छाया, पोवार विलास, सत्यशोधक दासराम : जीवन व कार्य, पृ . १ व १२

१२ . चौधरी कि . का . (संपा), उपरोक्त , पृ . १0४

१३ . सूर्यवंशी कृ . गो ., राजर्षी शाहू राजा व माणूस, पृ . १६७

१४ . कित्ता, पृ . १६८

72. अहिल्याबाई होळकरांचे धार्मिक कार्य

प्रा. डी. जे. दमामे
सहा. प्राध्यापक, मराठी विभाग,
आर्टस् अॅन्ड कॉमर्स, कॉलेज, आष्टा.

मौसिन इलाई मुलाणी
एम. ए. विद्यार्थी, इतिहास विभाग,
आर्टस् अॅन्ड कॉमर्स, कॉलेज, आष्टा.

अहिल्याबाई होळकरांचा जन्म ३१ मे १७२५ रोजी अहमदनगर जिल्हयातील चौडीगाव येथे माणकोजी शिंदे याच्या घरी झाला . अहिल्याबाई ८वर्षाच्या असताना खंडेराव होळकरांशी विवाह झाला . होळकर घराणे मुल वाफगावचे . त्यांचे कुलदैवत जेजुरी येथील खंडोबा होय . १७४५मध्ये आहिल्याबाईना पुत्र मलेराव झाला . १७४८ कन्या मुक्ताबाईचा जन्म झाला . १७ मार्च १७५४ मध्ये अहिल्याबाईना मोठे दु:ख सहन करावे लागले ते म्हणजे खंडेराव लढाईत धारातीर्थी पडले . अहिल्याबाईना मल्हाररावानी सती जाऊदिले नाही . १२ वर्षानंतर मल्हारराव होळकरांचा मृत्यु झाला . त्यानंतर मलेराव होळकर राज्याचे वारस झाले पण वर्षभरातच त्यांचा मृत्यु झाला . पुढे अहिल्याबाईनी स्वत:कडे सत्तेची सर्व सुत्रे घेऊन राज्यकारभार केला . अहिल्याबाई धार्मिक कार्य मोठया प्रमाणावर केले . अनेक ठिकाणी मंदिरे उभारली . परमेश्वराचे चिंतन व जनहितरक्षण या दोन तत्वांचा स्विकार केला . काशीच्या गंगेचे पाणी रामेश्वरपर्यंत पोहचवण्याची व्यवस्था, रामेश्वरला मोठे अन्नछत्र हवे . शोमनाथच्या देवाची पुन:स्थापना करणे इ . त्यांच्या संकल्पांना व्यवहारात आणल्या .

हातून पुण्यकृत्य झाले की जीवनाचे सार्थक झाले असे त्यांना वाटत असे . अहिल्याबाईनी आंबागाव याठिकाणी मंदिरामध्ये तेलवातीची व्यवस्था केली . त्यांनी अनेक धर्मशाळा बांधल्या . आयोध्या या ठिकाणी श्रीराम मंदिर बांधले . अमरकंटक या ठिकाणी धर्मशाळा बांधली . आनंद कांचन या ठिकाणी विश्वेश्वराच्या मंदिराचा जीर्णोध्दार केला . मल्हाररावांची छत्री बांधून त्यासमोरच खंडेराव मार्तंडाचे देवालय बांधले आहे . काशी येथील घाटाला २५000 रू खर्च केला . गंगा नदिचा उगमस्थानी विश्वेश्वर, केदारनाथ, भैरव आणि अन्नपूर्णा अशी चार मांदिरे बांधली . गरिबांना दान देण्यासाठी चिंचवाड या ठिकाणी व्यवस्था केली . अहिल्याबाईनी चिखलदरा, पैठण, रामेश्वर येथे अन्नछत्र सूरू केले . चिञकुट येथे राम मंदिर बांधून तेथे मूर्ती स्थापना करण्यासाठी सुनेला गावच्या खंडो अनंत याचे नाव सुचवले होते त्यांना त्यांनी पञ केले की,मूर्ती कशा तयार करणार त्याचा नकाशा पाढवावा . सुनेला गावी संगमरवरी दगड पाठविण्याकरता तोफखान्यातले दोन छकडे पाठवून दिले . मूर्ती तयार करण्याचे काम दोन वर्ष चालले . मूर्ती १७७८ ला पूर्ण झाल्या . राम वनवासात निघताना भरताने अखेरची भेट घेतली त्या ठिकाणी मूर्तीची स्थापना होणार होती . सुनेल गाव ते चिञकूट हे अंतर लांब होते त्यामूळे त्यास संरक्षण दिले .

अहिल्याबाईनी मंदिराची देखभाल व पूजाअर्चा करण्यासाठी व्यावस्था केली . पूजाऱ्याला काही गावे इनाम दिली . अनेक जून्या मंदिराचा जिर्णो ध्दार केला . बीड,पराळी येथील वैजनाथ,वेरूळ येथील घृणेश्वर या मंदिराचा जिर्णोध्दार केला . आपल्या माहेरगावी नदीवर घाट,महादेवाचे मंदिर बांधले . रामदास स्वामींच्या मठाला मदत केली . पंढरपूर येथे राम मंदिर बांधले . इंदूर परगण्यात खजराणा महालात पीर मशीदीस १५ बिघे जमीन फकीरास इनाम वंशपरंपरेने त्याच्या शिष्याकडे जावे अशी दिली . णर्मदा तीरावर घाट बांधला . संगमेश्वर येथे राममंदिर बांधले . अहिल्याबाई हया संपूर्ण भारत खंडाच्या राजकारणावर विचार करीत होत्या . अहिल्याबाईचे हिमालयातील केदारेश्वरपासून दक्षिणेतील रामेश्वरपर्यंत आणि पूर्वेच्या जगन्नाथपुरीपासून पश्चिमेच्या द्वारकेपर्यंत सर्व त्यांच्या कृपेने कथा किर्तने चालू होती . अहिल्याबाईनी या देशाच्या चारी दिशांना उभी केलेली मंदिरे या भूमीची सुंदर लेणी आहेत . अनेक धार्मिक कार्ये केलेल्या या महान अहिल्याबाई होळकरांचा मृत्यू १३ ऑगस्ट १७९५ ला झाला .

संदर्भ :

१) विनय खडपेकर : ज्ञात अज्ञात अहिल्याबाई होळकर , राजहंस प्रकाशन , एप्रिल २००७

२) गो . ज . कुंटे : चिंतामणराव आप्पासाहेब यांचे चरित्र (सांगली :१९७१) पृ:१३

73. शाहू महाराजांचे वसतिग्रहाचे कार्य

प्रा. डॉ. प्रमोदकुमार ओलेकर
सहा. प्राध्यापक, इतिहास विभाग,
आर्टस् अॅन्ड कॉमर्स, कॉलेज, आष्टा.

आसिफ इकबाल संदे
एम. ए. विद्यार्थी, इतिहास विभाग,
आर्टस् अॅन्ड कॉमर्स, कॉलेज, आष्टा.

कोल्हापूर संस्थानचे राजे चौथे शिवाजी महाराज यांच्या मृत्यूनंतर त्यांच्या पत्नी आनंदीबाई यांनी यशवंतरावांना १७ मार्च १८८४ रोजी दत्तक विधान केले व त्यांना दत्तक घेतले. राजर्षी शाहू छत्रपती ही एक अष्टपैलू महान व्यक्ती होती. हिंदी शास्त्रीय संगीताचा एक उत्साही पुरस्कर्ता, मराठी रंगभूमीचा एक प्रमुख शिल्पकार, मल्ल विदयेचा एक मोठा आधारस्तंभ व आधुनिक महाराष्ट्राच्या विविध भूमिका त्यांनी यशस्वीरित्या वढविल्या. त्यातीलच वसतिगृहाचा आढावा पूढीलप्रमाणे

स्थानिक राज्यकारभारात आणि सार्वजनिक संस्थात मागासवर्गियांना मोठयाप्रमाणात प्रतिानधित्व दयावयाचे असे छत्रपतींना वाटत होते. त्यामुळे मागासवर्गीयांनी आपल्या अधिकाराविषयी जागृत व्हावे आणि त्यासाठी आपण त्या वर्गामध्ये शिक्षण प्रसार केला पाहिजे. त्याप्रमाणे त्यांनी मागासवर्गि यांसाठी खेडयापाडयातील विदयार्थ्यांच्या शिक्षणाच्या सोयीसाठी कोल्हापूरात वसतिगृहे बांधण्यास आरंभ केला.[१] वसतिगृह स्थापण्याची आपली योजना आमलत आणण्यापूर्वी शाहूनी न्यायमूर्ती रानडे आणि देशभक्त गोपाळ कृष्ण गोखले यांचा सल्ला घेतला. ही योजना न्यायमूर्ती रानडे आवडली. शाहू पुण्याच्या डेक्कन एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष असल्यामूळे शिक्षण प्रसारासाठी त्यांना लागलेली तळमळ रानडे व गोखले यांना सुपरिचित होती. त्यांनी यास पाठिंबा दिला. यामूळे सर्व समाजाला फायदाच होणार होता. शाहूंनी सरकारी शिक्षण खात्याचे संचालक गाइल्स यांचाही सल्ला घेतला. त्यांनाही वसतिगृहाची कल्पना आवडली. माध्यमिक, तांत्रिक किंवा उच्च शिक्षणाची संधी उपलब्ध असूनही त्याचा फायदा घेता येणार खेडयातील विदयार्थ्यांना याचा फायदा घेता येत नाही हे महाराजांनी जाणले.[२] शहरात त्यांच्या राहण्या व जेवनाची सोय होत नाही. गरिबी व काही वेंलि त्यांची जात या गोष्टीमूळे अडचणी निर्माण होतात हे त्यांच्या लक्षात आले. ही समस्या दूर करण्यासाठी कोल्हापूरात विदयार्थी वसतिगृहांची निर्मीती करण्याचे धोरण त्यांनी आखले. १८९६ मध्ये कोल्हापूरात सर्व जातीजमातींच्या विदयार्थीसाठी त्यांनी एक वसतिगृह सुरू केले. विदयार्थ्यांच्या राहण्याची व भोजनाची तेथे मोफत सोय केली. तथापि या वसतिगृहात तीन वर्षाच्या काळात केवळ ब्राम्हण विदयार्थ्यानाच समाविष्ट केले गेले हे लक्षात आल्यानंतर शाहू महाराजांनी कोल्हापूरात निरनिराळया जातींच्या विदयार्थ्यासाठी स्वतंत्र वसतिगृह काढण्याचा निर्णय घेतला. थोडयाच काळात कोल्हापूरमध्ये व्हिक्टोरिया मराठा बोडिंग, दिगंबर जैन बोर्डिग, वीरशैव वसतिगृह, मुस्लिम बोर्डिग, श्री नामदेव बोर्डिग, पांचाल ब्राम्हण वसतिगृह, ढोर चांभार बोर्डिग, सुतार बोर्डिग इ. निरनिराळया जातींची सुमारे वीस वसतिगृह निर्माण झाली. या वसातिगृहांमधून विदयार्थ्यांच्या राहण्याची व भोजनाची व्यवस्था केली.[३]

कोल्हापूरात निरनिराळया जातींची वसतिगृहे स्थापन केली या काळात महाराष्ट्रात जातिव्यावस्थेचा प्रभाव होता. त्यामुळे सर्व जाती साठी एकच वसतिगृह सुरू केल्यास त्यास अल्प प्रतिसाद मिळेल याची शाहू महाराजांना जाणीव होती. याशिवाय प्रत्येक जातवार वसतिगृहे चालवल्यास समाजाचा सहभाग मिळण्याची शक्यता होती. त्यासाठी प्रत्येक जातीतील प्रमूख कार्यकर्त्यांना एकत्र करून वसतिगृहाच्या स्थापनेसाठी प्रोत्साहित केले. या वसतिगृहांना त्यांनी इमारती व जागा दिल्या. तसेच नियमित अनुदाने दिली. या प्रेरणेमुळेच अवघ्या २५ वर्षाच्या काळात कोल्हापूरात स्वतंत्रपणे २० विदयार्थी वसतिगृहांची स्थापना झाली. शैक्षणिक प्रसाराच्या किंवा समाजसुधारणेच्या प्रयत्नांची पहिली अवस्था म्हणून विशिष्ट जातीच्या विदयार्थी वसतिगृहे काढणे आवश्यक वाटत असली तरी त्याचे पर्यवसान जातीभेद नष्ट होण्यास, विविध जाती मध्ये समभाव प्रस्थापित होण्यास व राष्ट्रीयता निर्मा ण होणे उद्दश होता. म्हणूनच कोल्हापूरात त्यांनी निरनिराळया जातींची वसतिगृहे काढली. विदयार्थ्यांना अलगपणाची भावना निर्माण होऊनये म्हणूनही विशेष दक्षता घेतली. तसेच एका जातीच्या वसतिगृहात दुसऱ्या जातीची विदयार्थी देण्यास सूरवात केली. व्हिक्टोरिया मराठा बोर्डिमध्ये सुरवातीपासून मुस्लिम व अस्पृशांच्या मुलांना प्रवेश देऊन इतरांसमोर आदर्श मांडला.[४] या विविध वसतिगृहामध्ये विदयार्थ्यांसाठी निरनिराळया सोयी केल्या त्यांना घरापेक्षा वसतिगृहात शांततेने व एकाग्रतेने अभ्यास करता यावा असे वातावरण निर्माण केलेले होते. वसतिगृहातील विदयार्थी एकलकोंडा न बनता सर्वांशी मिळून मिसळून राहण्याची त्याची प्रवृत्ती विकसित होईल याकडे लक्ष दिले जात होते. वसतिगृहातील विदयार्थी स्वावलंबी, सहिष्णू, शिस्त व नियमितपानाचे पालन कारणारा व या देशाचा चारित्र्यसंपन्न व सुसंस्कृत नागरिक बनावा अशी दक्षता घेतली जात होती. सर्व आवश्यक सोयींची पूर्तता असलेल्या या वसतिगृहांच्याद्वारे महाराजांनी बहूजन समाजचा विकास घडवूनच कोल्हापूर शहर हे विदयार्थी वसतिगृहांची जननी व छत्रपती शाहू महाराज हे भारतातील विदयार्थी वसतिगृहांचे आदयजनक मानले जातात. वसतिगृहांच्या निर्मितीमागे असलेल्या त्यांच्या शैक्षणिक व राष्ट्रवादी प्रवृत्तीची प्रकर्षाने जाणीव होते. विदयार्थी वसतिगृहे केवळ कोल्हापूरातच स्थापन न करता पुणे, नागपूर,अहमदनगर ला स्थापन केली. कोल्हापूरात महाराष्ट्रबरोबर गुजरात,आंध्र,कर्नाटक, मध्यप्रदेश या इतर प्रांतातूनही बहुजन समाजाचे विदयार्थी शिक्षण घेण्यासाठी येत. शिक्षण संपल्यावर छत्रपती शाहू महाराजांच्या विचारांच्या स्फुल्लिंग घेऊनच स्वगृही जात.[५] विदयार्थ्यामध्ये रूजलेली ही प्रेरणाच पुढील काळात भारतात बहुजन समाजाच्या जागृतीला सहाय्यभूत ठरली असे दिसून येते. शाहू छत्रपतींनी जाणीवपूवक महाराष्ट्रातील बहुजनांच्या शैक्षणिक विकासासाठी उभ्या केलेल्या वसतिगृह चळवळीचे सर्वात मोठे योगदान हे की,महाराष्ट्राच्या शैक्षणिक ,राजकीय ,आर्थिक,सामाजिक क्षेत्रात गेल्या अर्ध्या शतकात अनेक कर्तबगार व्यक्ती उदयाला आल्या त्यांची जडण-घडण याच चळवळीने केली.

संदर्भ - १) डॉ. सुर्यवंशी ग.सु. - राजाशाहु आणि समाजप्रबोधन ,रणजित प्रकाशन, इचलकरंजी

२) किर धनंजय - राजर्षी शाहु छत्रपती पॉप्युलर प्रकाशन,मुंबई ३) डॉ. जाधव रमेश -लोकराजा शाहु छत्रपती ,सुरेश एजन्सी ,पुणे

४) डॉ. भोसले एस. एस. (संपा)-क्रांतिसुक्ते :राजर्षी छत्रपती शाहु महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई

५) डॉ. पाटील पी. सी. - 'माझा आठवणी' मॉज प्रकाशन गृह, मुंबई

74. किल्ले पारगड येथील सीदोजी सेलार यांना मुंबई सरकार यांचे सन १८६४ मधील कौलपत्र

अमोल दिनकर गायकवाड
पीएच. डी. विद्यार्थी, इतिहास विभाग,
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे.

इतिहासाच्या व्याखेत असे असे पडले असे म्हटले तरी काय झाले, कसे झाले हे सांगणारा अभ्यासक इतिहासकथनाच्या अथवा इतिहास लेखनाच्या प्रक्रियेत स्वतःचा तर्क संगत स्वतंत्र दृष्टिकोन ठेवत असतो. मानवी इतिहास काल व स्थल यांनी बद्ध झालेला आहे. काल, स्थल व्यक्ती या त्रयींनी जी सांगड घातली जाते तिलाच प्रसंग व ऐतिहासिक प्रसंग ही संज्ञा देतात. इतिहासाचार्य विश्वनाथ राजवाडे यांनी केलेली इतिहासाची व्याख्या व्यापक आहे. मानवाची सर्वांगीण कहानी म्हणजे इतिहास होय. मात्र घडणाऱ्या इतिहासामधील जो लिहिला जातो. त्यालाच आपण इतिहासाची बद्धता म्हणून ओळखतो. मानवी जीवनातील महत्वपूर्ण घटनांची सुव्यवस्थितपणे ठेवलेली नोंद म्हणजे इतिहास होय. इतिहास म्हणजे प्रत्यक्ष घडलेले वृत्त अथवा घटना हा त्याचा विषय नसून इतिहास म्हणजे घडलेल्या घटनेचे वा वृत्ताचे संशोधन व लेखन हा त्याचा विषय होय. इतिहासामध्ये नवीन पुरव्यांची उपलब्धता आणि सिद्धतेबरोबर ऐतिहासिक सत्याचे पुनर्निधारण होऊ शकते. त्याचप्रमाणे नवीन विचारप्रणाली निर्माण होऊन इतिहासाला नवीन संदर्भ लाभतात.



स्वराज्य वाढीच्या कामी आलेल्या मालुसरे कुटुंबियांना किल्ले पारगड येथे गडकरी म्हणून शिवाजी महाराजांनी नियुक्त केले. पुढे पेशवे कालखंडामध्ये गडकरी म्हणून त्यांचाच अंमल किल्ले पारगडावर दिसून येतो. दिनांक ८ ऑगस्ट १८१८ मध्ये जनरल सर थॉमस मन्रो यांनी किल्ल पारगडचे गडकरी म्हणून मालुसरे कुटुंबियांना कौलपत्र दिले. मालुसरे कुटुंबियांपैकी काहींनी शेलार हे आडनाव धारण केलेले दिसते. पुढे लखोजी शेलार यांची औरस पुरुष संतती कायम असेपर्यंत वार्षिक नेमणूक संभू बिरबानी यांना ३२ रुपये किल्ल्याचे गडकरी म्हणून नेमणूक केलेली दिसून येते. या संदर्भात कोर्ट ऑफ कलेक्टर यांनी १७ एप्रिल १८५४, पत्र नं. १० अशी दोन पत्रे मुंबई सरकारास लिहिली त्यात असा ठराव मंजूर करण्यात आला आणि शेलार कुटुंबियांची गडकरी म्हणून नियुक्ती कायम करण्यात आली. त्यासंदर्भातील १६ मार्च १८६८ मधील हे मूळ मोडीतील कौलपत्र अप्रकाशित आहे.

मूळ मोडीतील कौलपत्राचा मराठी लिप्यांतर पुढीलप्रमाणे

धोंडी बीन सीदोजी सेलार किल्ले पारगड तालुके पाछापूर जिल्हा बेळगांव यांस कळावे की मेहरबान जनरल सर थॉमस मन्रो साहेब यांनी तारीख ८ ऑगस्ट १८१८ इसवीचे कौलपत्र पारगडचे गडकरी याचे नावे दिले त्यात गडकरी मजकूर पेशवे सरकार अंमलापासोन जी मिळकत अनभवीत आले ती चालविण्यात येईल म्हणोन नमुद असो मेहेरबान हार्टसाहेब आणी ईनाम कमीशनर याणी चौकशी करून मूळ तैनात संपादन करणार तुमचा पणजा लखोजी शेलार याची अवरस (औरस) पुरूष संतती कायम असेतोपावतो वार्षीक नेमणूक शंभू बिरबानी रूपये ३२ याचे सरकारी रूपये २६=५० आणे किल्याचे गडकरी चाकरीच्या नात्याने अनभवीत जाणेतो सरकारानी नंबर ४११८ तारीख २७ माहे जून सन १८४९ ईसवीचे पत्र मेहरबान — कमीशनसाहेब दक्षिण भाग यांस लीहीले त्यात मंजूर केला आहे हा ठराव कोर्ट ऑफ कलेक्टर यांनी नंबर १४ तारीख १७ अेप्रील १८५० ईसवीचे व तारीख ५ माहे अेप्रील सन १८५४ ईसवी रोजी पत्र नंबर १० चे अशी पत्रे मुंबई सरकारास लीहीली त्यात मंजूर केला तो कायम आहे याजकरीता ही ताकीद तुम्हांस देण्यात येते की सदरहु ठरावान्वये तुम्ही आपली नेमणुक दरमहा घेत जावून सरकार नोकरी इमाने इतबारे करून सुखरूप रहाणे

तारीख १६ माहे मार्च सन १८६४ इसवी

तपासणार

दिनकर दाजी	**गणेश रामचंद्र**	**सही इंग्रजी**
हुजूर कारकून	**दप्तरदार**	**अंमलदार**

उपसंहार:

कोंडाणा घेतेवेळी नरवीर तानाजी मालुसरे आणि इतर स्वराज्याच्या कामी आले. त्यावेळी छ. शिवाजी महाराजांनी मालुसरे कुंटूंबियांना किल्ले पारगडची जहागीरी देऊन सर्व मालुसरे कुंटूंब तेथे स्थलांतरीत केले होते. त्यामागचा त्यांचा उद्देश स्वराज्याच्या चतु:सीमा मजबूत करून स्वराज्याभोवती एकप्रकारे विश्वासू सरदारांच्या माध्यमातून एक संरक्षण कडे उभे करण्याचा होता. मराठी सत्तेचा पाडाव झाल्यानंतर सर्वत्र इंग्रज अंमल सुरू झाला. परंतु किल्ले पारगडची देखभाल करण्याची जबाबदारी मालुसरे आणि शेलार कुंटूंबियाकडेच होती. वंशपरंपरागत चालत आलेली जबाबदारी त्यांना परत मिळावी यासाठी सीदोजी शेलार यांनी तशी मागणी केली असता मुंबई सरकार यांच्या वतीने कोर्ट ऑफ कलेक्टर यांनी त्यांची मागणी मंजूर करून किल्ले पारगडच्या देखभालीची जबाबदारी शेलार कुंटूंबियाकडे दिलेली दिसून येते व त्यांची मागणी कोर्ट ऑफ कलेक्टर यांनी मान्य केलेली दिसून येते. मालुसरे आणि शेलार कुंटूंबियांनी इंग्रज सरकारशी एकनिष्ठ राहून आपला हक्क बजावावा, असे या कौलपत्रातून अधोरेखित होताना दिसून येते.

Agencia International ISBN
International ISBN Agency
Media etc. in Publishing, Distribution and
Library Practices International Standard Numbering System for Books,
Software, Mixed etc. in Publishing, Distribution and Library Practices

Raja Rammohun Roy National Agency for ISBN
Government of India,
Ministry of Human Resource Development
Department of Higher Education,

International ISBN Agency,
United House, North Road,
London, N7 9DP, UK
Tel. +44 207 503 6418

Room No. 13, Fourth Floor,
Jeevan Deep Building,
Sansad Marg,
New Delhi-110001 (India)
E-mail: Tel: 26179675 and 26172493 Ext.12
Website: www.education.nic.in

F.No.5212/2015-ISBN

New Delhi, dated 09.02.2015

To,

Principal, Arts & Commerce College, Ashta, Tal. Walwa, Dist. Sangli(M.S.)-416 301

Allotment of Publisher's Identifier under ISBN system.

Sir,

Please refer to your letter dated Nil relating to registration of publication(s)under ISBN system for the title(s)and allotted ISBN's numbers are as under :

S.No.	ISBN	Title of the books
1.	ISBN 978-93-5212-145-8	Historical Resources in the Princely States of British India

2. You can print the above-mentioned ISBN on the verso of the title page of the book. In case of paperback, it should appear on the extreme right foot of the outside of back cover. Besides in case of Hard Bound, it should appear on jacket. After final publication, please send a complementary copy of each ISBN title to this Agency.

3. Please note that a separate ISBN should be assigned to Paperback and Hardbound titles.

Thanking you.

Yours faithfully,

(DR. SURESH CHANDA)
Special Officer